# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

बी. ए. भाग–३ इतिहास

सत्र–५ : पेपर–१० DSE-E64

# मराठ्यांचा राजकीय इतिहास

**(Political History of the Marathas)**

सत्र–६ : पेपर–१५ DSE-E189

# मराठाकालीन राजनिती, अर्थव्यवस्था आणि समाज

**(Polity, Economy and Society under the Marathas)**

(शैक्षणिक वर्ष २०२१–२२ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२२
बी. ए. भाग - ३ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ५००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-92887-64-2

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) आर. जी. कुलकर्णी**
प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**अभ्यासमंडळ : इतिहास**

अध्यक्ष – **डॉ. अवनिश पाटील**
इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती एन. डी. पारेकर**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. डी. बी. मासाळ**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **डॉ. श्रीमती संघमित्रा व्ही. सरवदे**
  आण्णासाहेब डांगे कॉलेज, हातकणंगले,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. दिपक शंकरराव जाधव**
  लाल बहाद्दूर शास्त्री कॉलेज, सातारा
- **डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले**
  चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. एम. व्ही. जाधव**
  यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. निवासराव अधिकराव वरेकर**
  आदर्श महाविद्यालय, विटा, ता. खानापूर,
  जि. सांगली
- **डॉ. सुरेश मारूती चव्हाण**
  आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. राजश्री दिलीप निकम**
  कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु।।, शिवनगर,
  ता. कराड, जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मंजिरी कामत**
  इतिहास अधिविभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
- **डॉ. चंद्रकांत अभंग**
  सचिव, भारत इतिहास संशोधक मंडळ,
  इमिनंट स्कॉलर ऑफ मराठा हिस्ट्री.
- **डॉ. अरुण भोसले**
  निवृत्त प्राध्यापक, इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. भरतभूषण माळी**
  सचिव, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद
- **डॉ. अमर आडके**
  सल्लागार, किल्ले जतन आणि संवर्धन, कोल्हापूर

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्यामार्फत जून २००७ पासून बहिःस्थ विद्यार्थ्यांची गरज ओळखून दूरशिक्षण योजनेचा उपक्रम हाती घेतला आहे. सन २०२०-२०२१ पासून बी. ए. ३ इतिहास विषयाचा अभ्यासक्रम बदललेला आहे. सत्रपद्धती राबविण्यात येत आहे. सदरच्या योजनेअंतर्गत बी.ए.भाग-३ इतिहास पेपर क्र. १० व १५(सत्र ५ व ६) या विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी सत्र ५ साठी मराठ्यांचा राजकीय इतिहास व सत्र ६ साठी मराठाकालीन राजनिती, अर्थव्यवस्था आणि समाज या पेपरचे स्वयं अध्ययनासाठी हे पुस्तक लिहिले आहे. अभ्यासक्रमातील वेगवेगळ्या घटकांचे स्पष्टीकरण सुलभ भाषेतून केल्यामुळे विद्यार्थी वर्गाला विषयाची माहिती होण्यास अडचण राहणार नाही असे वाटते. प्रत्येक उपघटकाच्या शेवटी स्वयं अध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे घटकाच्या शेवटी दिलेली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, सारांश व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची यादी दिलेली आहे.

या पुस्तकामध्ये मराठ्यांचा राजकीय इतिहास व मराठाकालीन राजनिती, अर्थव्यवस्था आणि समाज या पेपरची माहिती दिलेली आहे. या पेपरमध्ये सत्र ५ व ६ साठी प्रत्येकी ४ घटकांचा समावेश केलेला आहे. सत्र ५ मध्ये सन १७०७ ते १७४० पर्यंतची राजकीय स्थिती, बाळाजी बाजीराव आणि पानिपतची लढाई, पानिपत युद्धानंतर मराठा राजकारण, मराठेशाहीचा अस्त आणि सत्र ६ मध्ये साधने, मराठी सत्तेची राज्यव्यवस्था, आर्थिक परिस्थिती, सामाजिक परिस्थिती इत्यादी घटकांचा समावेश केलेला आहे. मध्ययुगीन भारताच्या इतिहासाचा बारकाईने अभ्यास करणे गरजेचे असल्याने सदर पुस्तकाचे लेखन केलेले आहे.

पुस्तकामध्ये विविध घटकांच्या अनुषंगाने विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. तरीही त्यामध्ये कांही उणिवा राहिल्यास प्राध्यापक व विद्यार्थी यांनी त्या निदर्शनास आणून द्याव्यात. पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित अद्यावत करण्यासाठी याचा उपयोग होईल. हे पुस्तक पदवी व विविध स्पर्धा परीक्षांच्यासाठी महत्त्वाचे ठरेल असा आम्हाला विश्वास वाटतो. सदरच्या पुस्तकातील विविध घटक लेखनाची जबाबदारी संबंधीत घटक लेखकांवर आहे.

सदर पुस्तकाच्या लिखानाचे काम शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील विविध मान्यवर प्राध्यापकांनी पूर्ण केल्याबद्दल संपादक मंडळ त्यांचे आभारी आहे. या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठ आणि दूरशिक्षण विभागातील प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल संपादक मंडळ मनापासून आभार मानत आहे.

■ **संपादक** ■

**डॉ. चंद्रवदन नाईक**
देवचंद कॉलेज अर्जुननगर,
ता. कागल, जि. कोल्हापूर

**डॉ. खंडेराव शिंदे**
राजर्षी शाहू आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, रुकडी,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**मराठ्यांचा राजकीय इतिहास**
**मराठेकालीन राजनिती, अर्थव्यवस्था आणि समाज**
**बी. ए. भाग–३ इतिहास सत्र ५ व ६**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–५ घटक क्रमांक | सत्र–६ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **डॉ. एस. आर. पाटील**<br>दूधसाखर महाविद्यालय, बिद्री मौनीनगर, ता. कागल, जि. कोल्हापूर | १ | – |
| **डॉ. गौतम नामदेव ढाले**<br>श्रीमती गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालय, जयसिंगपूर ता. शिरोळ, जि. कोल्हापूर | २ | – |
| **डॉ. महेशकुमार अरुण घाडगे**<br>श्री. संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा | ३ | – |
| **डॉ. चंद्रवदन नाईक**<br>देवचंद कॉलेज, अर्जुननगर, व्हाया निपाणी, ता. कागल, जि. कोल्हापूर | ४ | – |
| **डॉ. सुरेश चव्हाण**<br>आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालय, गडहिंग्लज | – | १ |
| **डॉ. सुवर्णा पाटील**<br>शांतिनगर शिवमंदीरजवळ स्फुर्ती चौक, गव्हर्मेंट कॉलनी विश्रामबाग, सांगली | – | २ |
| **डॉ. काशिलिंग रघुनाथ गावडे**<br>बाबा नाईक महाविद्यालय, कोकरूड, ता. शिराळा, जि. सांगली | – | ३ |
| **डॉ. ज्योती जे. व्हटकर**<br>यशवंत चव्हाण कॉलेज, हलकर्णी, ता. चंदगड | – | ४ |

**■ संपादक ■**

**डॉ. चंद्रवदन नाईक**
देवचंद कॉलेज अर्जुननगर,
ता. कागल, जि. कोल्हापूर

**डॉ. खंडेराव शिंदे**
राजर्षी शाहू आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, रुकडी,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **सेमिस्टर–५ : पेपर–१०**<br>**मराठ्यांचा राजकीय इतिहास** | |
| १. | सन १७०७ ते १७४० पर्यंतची राजकीय स्थिती | १ |
| २. | बाळाजी बाजीराव आणि पानिपतची लढाई | ३६ |
| ३. | पानिपत युद्धानंतर मराठा राजकारण | ६५ |
| ४. | मराठेशाहीचा अस्त | १०३ |
| | **सेमिस्टर–६ : पेपर–१५**<br>**मराठेकालीन राजनिती, अर्थव्यवस्था आणि समाज** | |
| १. | साधने | १२३ |
| २. | मराठी सत्तेची राज्यव्यस्था | १४३ |
| ३. | आर्थिक परिस्थिती | १६४ |
| ४. | सामाजिक परिस्थिती | १ |

■ **विद्यार्थ्यांना सूचना**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरे घटकाच्या शेवटी देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२०-२१ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक – १

# सन १७०७ ते १७४० पर्यंतची स्थिती

**अनुक्रमणिका**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ छत्रपती शाहू – ताराबाई संघर्ष, मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध

१.२.२ बाळाजी विश्वनाथ०

१.२.३ पेशवे बाजीराव पहिले

१.३ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.४ सारांश

१.५ सरावासाठी स्वाध्याय.

१.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

**१.० उद्दिष्टे :**

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला

- छत्रपती शाहू, महाराणी ताराबाई, मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धातील घडामोडी यांची माहिती मिळेल.
- बाळाजी विश्वनाथांचा उदय व त्यांची कामगिरी.
- पेशवे बाजीराव पहिले – साम्राजविस्ताराच्या मोहिमा यांचा आढावा घेता येईल.

**१.१ प्रस्तावना :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी सतराव्या शतकात प्रतिकूल परिस्थितीत मराठयांच्या स्वतंत्र राज्याची स्थापना केली. महाराष्ट्राच्या इतिहासातील ही क्रांतिकारक घटना आहे. शिवाजी महाराजांनी मराठमोळ्या माणसांचे संघटन करून सामान्य मराठी माणसाला स्वधर्म, स्वदेश, स्वभाषा व स्वसंस्कृती यांच्या रक्षणासाठी लढण्याची व प्रसंगी आत्मसमर्पण करण्याची प्रेरणा दिली. राज्याभिषेकाद्वारे स्वतंत्र व सार्वभौम राज्याची निर्मिती

केली. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर औरंगजेब सर्व सर्वशक्तीनिशी महाराष्ट्रात आला. मात्र मराठी राज्य जिंकून घेण्याचे त्याचे स्वप्न साकार झाले नाही, त्याचे दफन याच महाराष्ट्राच्या भूमीत झाले. मराठ्यांच्या संघर्षामागे छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाच्या व छत्रपती संभाजी राजांच्या हौतात्माच्या प्रेरणा होत्या.

२० फेब्रुवारी १७०७ रोजी औरंगजेबचा मृत्यू झाला आणि मराठ्यांचे मुघलांबरोबर प्रदीर्घकाळ चालू असलेले स्वातंत्र्य युद्ध संपले.मराठे विजयी झाले. छत्रपती संभाजीपुत्र शाहू मोगलाच्या कैदेत होते. तेव्हा महाराणी ताराबाईंनी मराठी सत्तेचा कारभार सांभाळला. छत्रपती शाहू राजांच्या वारसा हक्काबद्दल महाराणी ताराबाईनी प्रश्नचिन्ह उभे केल्यामुळे मराठी सत्तेसाठी ताराबाई व शाहू यांच्यात यादवी युद्ध झाले. त्यावेळी बाळाजी विश्वनाथांने छत्रपती शाहूंची बाजू भक्कम करण्याचा प्रयत्न केला, परिणामी छत्रपती शाहूंनी त्यांना पेशवेपद दिले. तिथूनच पुढे मराठी सत्तेत पेशवाई सुरू झाली.

पेशवे बाजीराव पहिले यांनी खऱ्या अर्थाने मराठी सत्तेचा विस्तार केला. वृक्षाच्या फांद्या तोडीत बसण्यापेक्षा त्याच्या मुळाशी घाव घालावा, म्हणजेच लहान लहान सत्ता प्रमुखांशी लढण्यापेक्षा प्रत्यक्ष दिल्लीवरच घाव घालावा म्हणजेच साम्राज्याचा डोलारा कोलमडून पडेल असे पहिल्या बाजीरावाने धोरण अवलंबले. पेशवे काळात मराठी सत्तेच्या स्वरूपात व ध्येय धोरणात बदल झाला. छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रखर विरोध असणारी वतनदारी पद्धत पुन्हा सुरू झाली.

## १.२ विषय विवेचन :

### १.२.१ छत्रपती शाहू महाराज :

१८ मे १६८२ रोजी छत्रपती संभाजी महाराज व महाराणी येसूबाई यांच्या पोटी शाहूंचा जन्म झाला. शाहूंचे मूळ नाव 'शिवाजी' होते. औरंगजेबाच्या कैदेत असताना त्यांचे नाव 'शाहू' पडले. १८ वर्षे शाहू महाराज मोगलांच्या कैदेत होते. औरंगजेबाने शाहूंना 'राजा' हा किताब व सात हजाराची मनसब दिली होती. छत्रपती शाहूंच्या बरोबर मुघल कैदेत असलेले रायभानजी भोसले, मदनसिंह व जोत्याजी केसरकर हेच त्यांचे खरे सल्लागार होते.

जोत्याजी केसरकर यांनी शाहूंना घोड्यावर बसणे, तलवार व भाला चालवणे इ. लष्करी शिक्षण दिले. शाहू मुघल कैदेत असताना त्यांची दोन लग्ने झालीत. त्यातील पहिली पत्नी सकवारबाई या जाधव घराण्यातील 'रुस्तमराव' मानसिंगराव जाधवरावांची मुलगी होती. तर दुसरी पत्नी अंबिकाबाई कण्हेर खेडचे शिंदे यांची मुलगी होती. मुघल कैदेत असताना राणी येसूबाई फार हुशारीने व मुत्सद्देगिरीने वागल्याचे दिसतात.

छत्रपती संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर सन १६८९ मध्ये मुघल सरदार झुल्फिकारखानाने रायगडास वेढा दिला आणि रायगड ताब्यात घेतला. यावेळी झुल्फीकारखानाने राणी येसूबाई, संभाजी पुत्र शाहू यांना तसेच राज कुटुंबातील इतर लोकांना कैद केले. स्वराज्याचे वारस शाहू औरंगजेबाचे कैदी झाले तेव्हा त्यांचे वय फक्त सात वर्ष होते.

**● छत्रपती शाहूंची सुटका (८ मे १७०७)**

२० फेब्रुवारी१७०७ रोजी अहमदनगर येथे औरंगजेबाचा मृत्यू झाला. दिल्लीचे तख्त व बादशाही मिळवण्यासाठी त्याचे पुत्र आजमशहा व शहाआलम उर्फ मुअज्जम यांच्यात संघर्ष सुरू झाला. आजमशहाने पित्याचा अंत्यसंस्कार उरकला. औरंगजेबाच्या इच्छेप्रमाणे औरंगाबादजवळील 'खुलदाबाद' येथे दफन करण्यात आले. त्यानंतर आजमशहाने स्वतःला 'बादशहा' म्हणून जाहीर केले आणि मराठ्यांबरोबरचे युद्ध थांबवले. उत्तरेकडे जाताना त्याने राणी येसूबाई, शाहू महाराज व छत्रपती कुटुंबातील इतरांना घेतले. शाहूनी झिनतुनीसा व झुल्फिकारखानामार्फत सुटकेचा प्रयत्न केला. झुल्फिकारखानाने आजमशहास शाहूंची सुटका करण्याविषयी सुचवले. शाहूंना मुक्त केले तर मुघलांना त्याचा पायदा होईल असे त्याने आजमशहास सांगितले. मुक्त झालेले शाहू मराठी राज्याचे वारस म्हणून ताराबाईंकडे राज्य मागतील आणि ताराबाई ते देणार नाहीत. त्यांच्यात यादवी सुरू होईल हा सल्ला आजमशहास पटला. शेवटी भोपाळच्या वायव्येस २० मैलावर असलेल्या 'दोराह' येथे ८ मे १७०७ रोजी शाहूंची सुटका करण्यात आली. सुटका होताच शाहूंनी दक्षिणेची वाट धरली. कैदेत असलेल्या छत्रपतीच्या कुटुंबातील कोणासही मुक्त केले नाही. फक्त शाहूंची सुटका करण्यात आली. सुटकेपूर्वी आजमशहा व शाहू यांच्यामध्ये तोंडी करार झाला. पुढीलप्रमाणे –

१) शिवाजी राजांच्या स्वराज्यावर मुघल साम्राज्याचा जहागीरदार म्हणून शाहूंनी राज्य करावे.

२) मुघल बादशहास गरज भासेल तेंव्हा शाहूंनी फौजेसह बादशहाची सेवा चाकरी करावी.

३) दक्षिणेतील सहा सुभ्यातून त्यानी चौथाई व सरदेशमुखी वसूल करावी.

**● छत्रपती शाहूंचे स्वराज्यात आगमन :**

छत्रपती शाहूंची सुटका झाली तेव्हा त्यांच्याबरोबर अनेक स्वार होते. शाहू नर्मदा ओलांडून खानदेशात आले तेव्हा त्यांना मोहनसिंग रावळ, अमृतराव कदमबांडे मिळाले. धुळ्याजवळ असलेल्या 'लामकानी' येथे त्यांचा अनेक दिवस मुक्काम पडला. शाहूंनी सर्व प्रमुख सरदार वतनदार देशमुख देशपांडे इ. पत्रे लिहून स्वामीच्या दर्शनास येऊन सेवा करावी असा निरोप पाठवला. परिणामी अनेक प्रतिष्ठित सरदार शाहूंना येऊन मिळाले. शाहूंची बाजू भक्कम झाली. त्यानंतर अहमदनगर येथे दोन महिने मुक्काम केला आणि राजधानी सातारा ताब्यात घेण्याचे ठरवले. महाराणी ताराबाईंना कळवले की आम्ही निघून स्वदेशी परत येत आहोत आता राज्य आम्ही करू, बादशाही आज्ञा ही तशीच आहे. आपण मातोश्री आहात, मराठी राज्य आपल्या सल्लयाने व अनुमतीने चालवले जाईल, आम्हाला आपला आशीर्वाद व अनुभव यांचा उपयोग होईल. पण महाराणी ताराबाईंनी शाहूंच्या निरोपाची दखल घेतली नाही. उलट संघर्षाचा पवित्रा घेतला.

**● छत्रपती शाहू व महाराणी ताराबाई यांच्यातील यादवी :**

छत्रपती शाहू मुघलांच्या कैदेतून सुटले हे समजल्यानंतर महाराणी ताराबाईनी त्यांना विरोध करण्यास सुरुवात केली. सात वर्षे जिद्दीने औरंगजेबाशी संघर्ष करून प्रयत्नाची पराकाष्टा करून जे राज्य राखले ते राज्य केवळ

ज्येष्ठतेच्या वारसाहक्काने शाहूंना देण्यास ताराबाई तयार नव्हत्या कारण ताराबाईंना स्वतः राज्यकारभार करण्याची तीव्र इच्छा होती. ताराबाईंनी शाहूंचा स्वराज्याच्या गादीवरील रितसर वारसाहक्क डावलला. स्वराज्यावरील स्वतःच्या मुलाचा हक्क सोडण्यास त्या तयार झाल्या नाहीत. परिणामी शाहू आणि ताराबाई यांच्यातील यादवीला सुरुवात झाली. शाहूंना तोतया ठरवण्याचा प्रयत्न ताराबाईंनी केला, मात्र त्याचा उपयोग झाला नाही. महाराणी ताराबाईंनी स्वराज्यातील वारसाहक्काबाबत पुढील युक्तीवाद केला.

१) छत्रपती संभाजी राजांच्या हत्येबरोबरच मराठी स्वराज्य संपुष्टात आले. पुढे छत्रपती राजाराम महाराजांनी मुघलांविरुद्ध लढून स्वपराक्रमाने नवीन राज्य संपादन केले.

२) छत्रपती शिवाजी महाराजांना असे वाटत होते की, आपल्या पश्चात राजारामाला स्वराज्याची गादी मिळावी.

३) छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर राजारामाचा राज्याभिषेक होवून ते गादीवर बसले होते. त्यामुळे शाहू राजे मराठा राज्याचा वारस होऊ शकत नाहीत.

ताराबाईंचा हा युक्तीवाद तपासून पाहता ऐतिहासिक पुरावे वस्तुनिष्ठता याच्यावर टिकू शकत नाहीत. त्यामुळे मराठा सरदार व मराठी जनता यांनी शाहूंचा पक्ष व शाहू हेच राज्याचे खरे वारस आहेत असेच वाटत होते. यातून शाहूंचा पक्ष बळकट होत गेला. ताराबाईंनी हा वारसा प्रश्न शस्त्राने सोडवण्याचे ठरविले. ताराबाईनीही आपणास मानणाऱ्या सरदारांचे संघटन केले. या सरदारांना ताराबाईंनी 'दूधभातावर' हात ठेवून एकनिष्ठ राहण्याची शपथ दिली होती. शाहूंनीही सामोपचाराने गादी मिळत नाही, हे लक्षात येताच युद्धाची तयारी केली आणि साताऱ्याच्या दिशेने वाटचाल केली.

**● खेडची लढाई (१२ ऑक्टोबर १७०७) :**

महाराणी ताराबाईंनी छत्रपती शाहूंबरोबर लढण्याची तयारी केली. या काळात रामचंद्रपंत अमात्य व परशुरामपंत प्रतिनिधी यांच्यातील वितुष्ट त्यांना नडले. रामचंद्रपंतांचा कल शाहूंकडे होता. हे ताराबाईंच्या लक्षात येताच रामचंद्रपंत अमात्य यांना कराडजवळील वसंतगडावर त्यांनी कैदेत ठेवले, त्याचा परिणाम पक्षातील सरदारांच्यावर झाला व त्यांच्यात दुफळी निर्माण झाली. धनाजी जाधव यांची संभ्रमावस्था झाली. ताराबाईंनी सेनापती धनाजी जाधव व परशुराम पंतप्रतिनिधींबरोबर मुख्य सरदार व ४०,००० फौजेसह शाहूंचा बिमोड करण्यासाठी पाठवले. ते लष्कर पुणे मार्गे आपणावर चालून येत आहे हे समजताच शाहूंनीही भीमा नदी काठी खेड येथे तळ दिला. धनाजी जाधव व परशुरामपंत प्रतिनिधी शाहूंवर चालून गेले.

भीमा नदीच्या दोन्ही काठांवर दोन्ही फौजा होत्या. यावेळी शाहूंविषयी सर्वांना सहानुभूती होती, परंतु त्यांच्याकडे एकसंघ लष्कर व श्रेष्ठ सेनापती नव्हता. उलट ताराबाईंकडे धनाजी जाधवांसारखा प्रसिद्ध सेनापती होता. त्यावेळची स्थिती अशी होती जिकडे धनाजी जाधव तिकडे विजय ठरलेला होता. शाहूंनी द्विधा अवस्थेत असलेल्या धनाजीशी संपर्क साधून इतर मराठा सरदारांना शाहूंच्या बाजूस वळविले.धनाजी जाधव व शाहूंची गुप्त बैठक झाली. त्यांनी योग्य वेळी शाहूंच्या पक्षात येण्याचे आश्वासन दिले. १२ ऑक्टोंबर १७०७ रोजी छत्रपती शाहू

व महाराणी ताराबाई यांचे खेड येथे युद्ध सुरू झाले. युद्धाच्या वेळी धनाजीनी ताराबाईंचा पक्ष सोडला. ते रणभूमीवर तटस्थ राहिले. परशुराम पंतप्रतिनिधी शाहूंविरुद्ध निकराने लढले. मात्र त्यांचा पराभव झाला. ते रणांगण सोडून पळाले व साताऱ्यास आले. खेडच्या युद्धात शाहूंचा विजय झाला. यांतून शाहूंच्या राजकीय कारकिर्दीला प्रारंभ झाला. या घटनेमुळे शाहूंचा कित्येक पटीने आत्मविश्वास वाढला. धनाजी जाधवांसारखा सेनापती त्यांना मिळाला. खंडोबल्लाळास चिटणीसी देऊन त्यांचा गौरव केला. व इतर मराठा सरदारांचा मान सन्मान व गौरव केला गेला.

**● साताऱ्याचा ताबा व छत्रपती शाहूंचा राज्याभिषेक (१२जानेवारी १७०८) :**

छत्रपती शाहूंना खेडच्या लढाईत विजय मिळाल्याने त्यांनी आक्रमक धोरणाचा स्वीकार केला. त्यानुसार किल्ले जिंकण्यास सुरुवात केली. रोहिडा किल्ल्यावर शंकराजी नारायण सचिव होते. त्यांना शाहूंनी भेटीस बोलावले. त्या वेळी त्याना कोणत्या पक्षात जाऊन मिळावे हा निर्णय घेता येईना म्हणून त्यानी आत्महत्या केली. यावेळी शाहूंना फार दुःख झाले. त्यांनी सचिव यांच्या पत्नीचे सांत्वन केले. त्यांचा एक वर्षाचा मुलगा नारोशंकर यास आपल्या राज्याचे सचिव पद दिले. त्यानंतर शाहूंनी सिंहगड, तोरणा, राजगड, पुरंदर इत्यादी किल्ले व त्याखालचा प्रदेश आपल्या ताब्यात घेतला. तसेच वाई परगण्यातील चंदन-वंदन, वैराटगड घेऊन नोव्हेंबर १७०७ मध्ये ते साताऱ्यास पोहोचले.

छत्रपती शाहू साताऱ्यात पोहोचण्यापूर्वी राजधानी साताऱ्याच्या संरक्षणाची जबाबदारी परशुराम पंतप्रतिनिधीवर सोपवून ताराबाई पन्हाळगड किल्ल्यावर निघून गेल्या. शाहूंनी परशुराम पंतास किल्ला स्वाधीन करण्याविषयी निरोप दिला. मात्र त्यानी किल्ला लढण्याचा निर्धार केला. सातारा किल्ल्याचा किल्लेदार शेखमीरा होता. शाहूंनी शेखमीराचे वाई येथे असणारे कुटुंब कैद केले आणि आठ दिवसात किल्ला स्वाधीन केला नाही तर त्याच्या बायकामुलांना ठार मारण्याची धमकी दिली. तेव्हा शेखमीराने परशुरामास पंतास पकडून ७ डिसेंबर १७०७ रोजी किल्ला व पंतास शाहूंकडे सोपवले. अशा रीतीने मराठ्यांची राजधानी सातारा शाहूंच्या ताब्यात आली. परशुरामपंतास कैदेत ठेवले आणि शुभ मुहूर्तावर म्हणजेच माघ शुक्ल प्रतिपदा सोमवार दिनांक १२जानेवारी १७०८ रोजी शाहू महाराजानी स्वत:स विधियुक्त राज्याभिषेक करून घेतला आणि आपले अष्टप्रधान मंडळ जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| १) प्रतिनिधी-गदाधर प्रल्हाद | २) पेशवा-बहिरोपंत पिंगळे | ३)सेनापती-धनाजी जाधव |
| ४) अमात्य - बाळकृष्ण हणमंते | ५) सचिव - नारोशंकर | ६)सुमंत -महादजी गदाधर |
| ७) मंत्री - रामचंद्रपंत पुंडे | ८) न्यायाधीश - होनाजी आनंत | ९) पंडितराव - मुदगल भट |

परसोजी भोसले यांना 'सेनासाहेब सुभा', हैबतराव निंबाळकरास 'सरलष्कर' हे किताब व जहागिरी दिली. मदत करणाऱ्यांना योग्य बक्षिसे व जहागिरी देण्यात आल्या. मराठ्यांच्या राज्यावर खरा वारस प्रस्थापित झाला आणि नव्या राजवटीचा शुभारंभ झाला. शाहू महाराज छत्रपती झाले.

**● छत्रपती शाहू महाराज यांची पन्हाळा व रांगणा मोहीम :**

छत्रपती शाहूंनी राज्याभिषेकानंतर ताराबाईंबरोबर सामोपचाराच्या मार्गाने तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न

केला. १६ जानेवारी १७०८ रोजी ताराबाईंना एक पत्र पाठवले होते. त्यात छत्रपती शाहूंनी वारणा नदीच्या दक्षिणेकडील तुंगभद्रा नदीपर्यंतचे सर्व किल्ले व त्याखालचा मुलुख ताराबाईंचा पुत्र शिवाजी यांच्या ताब्यात देण्याचे ठरवले होते, परंतु ताराबाईंना हा प्रस्ताव मान्य नव्हता म्हणून ताराबाईंनी शाहूंचा हा प्रस्ताव फेटाळला. प्रस्ताव फेटाळल्यानंतर त्यांनी छत्रपती शाहूंबरोबर लढण्याची तयारी देखील सुरू केली. पण त्यांचे विश्वासू सेनानी छत्रपती शाहूंच्या कैदेत होते म्हणून ताराबाईंनी वसंतगडावर कैदेत असणाऱ्या रामचंद्रपंत अमात्यांबरोबर तडजोडीचे व सबुरीचे धोरण स्वीकारले. पंतांनी ताराबाईंचा पक्ष धरला कारण छत्रपती शाहूंनी त्यांच्या अष्टप्रधान मंडळामध्ये पंतांना स्थान दिलेले नव्हते. पंत आल्यामुळे ताराबाईंना एक मुत्सद्दी संघटक मिळाला होता. वाडीचे खेमसावंत कान्होजी आंग्रे, पिराजी व बहिर्जी घोरपडे इत्यादी मातब्बर सरदार ताराबाईंच्या बाजूस होते. त्यामुळे ताराबाईंना विजयाची खात्री होती.

महाराणी ताराबाईंच्या हालचालीची बातमी कळताच फेब्रुवारी १७०८ मध्ये छत्रपती शाहूंनी पन्हाळ्याची मोहीम हाती घेतली. वसंतगड व पावनगड घेऊन त्यांनी पन्हाळा किल्लास वेढा दिला. शाहू पन्हाळ्याला पोहोचण्यापूर्वीच ताराबाई रांगण्याकडे गेल्या होत्या. शाहूंनी पन्हाळा विशाळगड किल्ले जिंकून मार्च १७०८ मध्ये रांगण्यास वेढा दिला. तेव्हा रामचंद्रपंतांच्या सल्ल्यानुसार ताराबाई सिंधुदुर्गकडे निघून गेल्या होत्या. रामचंद्रपंत अमात्य यांच्या सल्ल्याने सेनापती पिराजी घोरपडे व नारोपंत यांनी नेटाने रांगणा किल्ला लढवला. पण पावसाळा सुरू होण्यापूर्वीच छत्रपती शाहूंनी रांगण्याचा वेढा उठवला. जून १७०८ मध्ये ते पन्हाळ्यास आले.छत्रपती शाहूंचा हा पहिला पराभव होता. सेनापती धनाजी जाधव हे खानदेशच्या मोहिमेवरून शाहूंच्या भेटीसाठी पन्हाळ्याकडे येत असताना २७ जून१७०८ रोजी वारणा नदीच्या काठी वडगांव येथे अल्पशा आजाराने त्यांचा मृत्यू झाला. छत्रपती शाहूंसाठी ही दुसरी दुःखद व धक्कादायक बातमी होती. सेनापतीच्या मृत्यूनंतर मोहिमेची सूत्रे परसोजी भोसलेंकडे सोपवून छत्रपती शाहू साताऱ्यास आले, कारण नवीन बादशहा बहादूरशहा (शहाआलम)हा दक्षिणेस त्याचा बंधू कामबक्ष याचे पारिपत्य करण्यासाठी आला होता.

**● बादशाही सनदा मिळवण्यासाठी छत्रपती शाहू व महाराणी ताराबाई यांचे प्रयत्न :**

छत्रपती शाहूंची सुटका करून आजमशहा दिल्लीची गादी मिळवण्यासाठी जात असताना आग्राजवळ शहाआलमच्या फौजेबरोबर लढाई झाली. यात शहाआलम विजयी झाला. या लढाईत आजमशहा मारला गेला. शहाआलम याने दिल्ली ताब्यात घेतली व दिल्लीचा बादशहा झाला. दिल्लीचा बादशाह होत असताना त्याने स्वतः 'बहादुरशहा' ही पदवी धारण केली. शहाआलमला आता फक्त कामबक्ष याचे आव्हान होते. कामबक्ष हा हैदराबादजवळ होता आणि म्हणूनच बहादूरशहा त्याचे पारिपत्य करण्यासाठी दक्षिणेत आला होता. ३ जानेवारी १७०९ रोजी बहादूरशहा व कामबक्ष यांच्यात हैदराबादजवळ लढाई झाली. त्यात कामबक्ष मारला गेला आणि पर्यायाने बहादूरशहास आता कोणीही विरोधक राहिलेला नव्हता. या युद्धात नेमाजी शिंदे याने चांगला पराक्रम गाजविल्यामुळे छत्रपती शाहूंविषयी बहादूरशहाचे चांगले मत बनले.

हैदराबादमधून दिल्लीकडे जात असताना मे १७०९ रोजी बहादूरशहाचा मुक्काम अहमदनगर येथे होता. या ठिकाणी शाहूंच्या वतीने प्रतिनिधी गदाधर प्रल्हाद, रायभानजी भोसले व मदनसिंह यांनी बहादुरशाहाची भेट घेऊन

दक्षिणेच्या सहा सुभ्यांच्या चौथाईची व सरदेशमुखी सनदांची मागणी केली. दक्षिणेतील राजकारणाचा जाणकार असणाऱ्या झुल्फीकारखानाने शाहूंना सनद देण्याविषयी बहादुरशहास सुचवले. पण त्याच वेळी अहमदनगर येथे आलेल्या ताराबाईंच्या वकिलांनी ताराबाईंच्या वतीने दक्षिणेच्या सहा सुभ्यांच्या चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा मागितल्या. बादशहाचा नवीन वजीर मुनीमखान याने ताराबाईंची बाजू घेतली, त्याने बादशहास सुचवले की शाहू व ताराबाई यांच्यात सुरू असलेल्या संघर्षात जो यशस्वी होईल त्याला बादशहाने सनदा द्याव्यात.बादशहास हा सल्ला पटला. त्याने दोन्हीकडील वकिलांना तसे सांगितले व तो उत्तरेकडे निघून गेला. सनदा मिळणे लांबणीवर पडल्यामुळे दोन्ही पक्षांचे वकील निराश होऊन परत आले. मराठी राज्याच्या वारसांमध्ये मुघलांनी दुहीचे बीज पेरले व मराठ्यांमधील यादवी धुमसत राहिली.

इ.स. १७०९ हे वर्ष छत्रपती शाहूंना फार प्रतिकूल गेले. कारण दक्षिणेतील सुभ्यांच्या चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा मिळाल्या नाहीत. सेनापती धनाजी जाधव, मातब्बर सरदार परसोजी भोसले यांचा मृत्यू झाला. तसेच रायभानजी भोसले हे ऑगस्ट १७०८ मध्ये मृत्यू पावले.बादशहाने मदनसिंह भोसले यांना दिल्लीस नेले. हे सर्व होत असताना ताराबाईंनी पन्हाळा विशाळगड हे दोन किल्ले घेऊन कोल्हापूर प्रांतात आपला जम बसवला. शाहूंच्या विरोधात झंझावाती वादळ निर्माण करून प्रखर विरोध करण्यास प्रारंभ केला व शाहूंचा सेनापती चंद्रसेन जाधव यास फितवून अनेक मराठा सरदारांना शाहूंच्या विरोधी केले.

धनाजी जाधवांच्या मृत्यूनंतर छत्रपती शाहूंनी त्यांचा मुलगा चंद्रसेन जाधव यास नोव्हेंबर १७०८ मध्ये आपला सेनापती केले. चंद्रसेन हा पराक्रमी व धाडसी होता, पण त्याचा कल ताराबाईंकडे होता. प्रारंभी त्यानी छत्रपती शाहूंच्या आज्ञेनुसार चाकण, जुन्नर व वाई प्रदेशांवर शाहूंचे वर्चस्व प्रस्थापित केले व अनेक मुघल ठाणेदारांना हुसकावून लावले. दरम्यान इ.स.१७१० मध्ये ताराबाईनी पन्हाळा येथे आपला मुलगा शिवाजी यांच्या नावे स्वतंत्र राज्याची स्थापना केली व मुलगा छत्रपती झाल्याचे घोषित केले. त्यांच्या या कृतीमुळे सातारा व पन्हाळा अशी दोन सत्ताकेंद्रे मराठ्यांच्या राज्यात उदयास आली व स्वराज्याचे दोन भाग पडले.

मराठा सरदारांना आपल्याकडे वळविण्यासाठी प्रयत्न दोन्ही सत्तेकडून परस्परविरोधी हुकूम दिले. त्यामुळे मराठा सरदार, वतनदार गोंधळून गेले. त्यांना निर्णय घेणे अवघड झाले. या संधीचा फायदा अनेक सरदारांनी घेतला व स्वतःचे स्वार्थ साधले. या परिस्थितीत कोणता सरदार कोणाशी एकनिष्ठ हे कोणालाच समजत नव्हते. या गोंधळाच्या परिस्थितीचा फायदा घेऊन उदाजी चव्हाण, कृष्णराव खटावकर, दामाजी थोरात यांनी लूटमार करण्यास सुरुवात केली व शाहूंच्या प्रदेशात धुमाकूळ घातला. अशा विचित्र परिस्थितीत कर्तबगार व एकनिष्ठ बाळाजी विश्वनाथावर छत्रपती शाहूंचा विश्वास वाढला व ते बाळाजीच्या सल्ल्याने वागू लागले. यामुळे मराठा सरदार शाहूंवर नाराज झाले. या सर्वांचे नेतृत्व चंद्रसेन जाधव करीत होता व त्यास ताराबाईंची फूस होती. त्यातच छत्रपती शाहूंनी बाळाजी विश्वनाथ यांना 'सेनाकर्ते पद' दिले. त्यामुळे चंद्रसेन जाधव छत्रपती शाहूंवर नाराज झाला आणि संघर्ष करण्याचे कारण शोधू लागला.

कराडजवळ एका हरणाच्या शिकारीवरून दोघांचे बिनसले. धुमसत असलेल्या संतापामुळे तंटा विकोपाला गेला व चंद्रसेनने बाळाजीच्या गोटावर चढाई केली. बाळाजी तिथून निसटला व पांडवगडास गेला. छत्रपती शाहूंनी

त्यांना आश्रय दिला. यामुळे सन १७११ मध्ये चंद्रसेन जाधव उघडपणे ताराबाईंच्या बाजूस जाऊन मिळाला. त्याला ताराबाईंनी सेनापती पद दिले. चंद्रसेनने शाहूंच्या प्रदेशात धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली अशा बिकट परिस्थितीत बाळाजी विश्वनाथ यांनी मोठ्या धैर्याने छत्रपती शाहूंवर ओढवलेल्या सर्व संकटांवर मात केली.

**● कोल्हापूरची राज्यक्रांती (इ.स १७१४) :**

महाराणी ताराबाईंच्या बाजूला चंद्रसेन जाधव आल्यामुळे त्यास सेनापती पद दिले. त्यामुळे ताराबाईंच्या पक्षातील जुने सरदार नाराज झाले. पुढे चंद्रसेन व ताराबाई यांचे न पटल्यामुळे ताराबाईंचा पक्ष सोडून निजाम उल मुल्ककडे गेला. सन १७१४ च्या दरम्यान कोल्हापूर येथे एक महत्त्वाची राज्यक्रांती घडून आली. छत्रपती राजाराम महाराजांची दुसरी राणी राजसबाई व त्यांचा मुलगा संभाजी यांनी गुप्तपणे कट रचून ताराबाईंच्या पक्षातील लोकांना वश केले आणि कोल्हापूरची राज्यसत्ता आपल्या हाती घेतली व त्यानंतर ताराबाई व मुलगा शिवाजी यांना पन्हाळगडावर कैद केले आणि कोल्हापूरच्या गादीचा वारस म्हणून महाराणी राजसबाईंनी संभाजी यांचा राज्याभिषेक केला.

**● यादवी युद्धाचे परिणाम :**

१) छत्रपती शाहूंची मुघली कैदेतून सुटका झाल्यानंतर ताराबाईंनी मराठा राज्यातील शाहूंचा कायदेशीर वारसा हक्क डावलला व दोघेही शिवाजी महाराजांचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व विसरले व मुघलांचे चाकर बनण्यास तयार झाले.

२) छत्रपती शाहू व महाराणी ताराबाई यांच्यातील यादवीमुळे मराठे सरदार स्वार्थाच्या मागे लागले.

३) मराठा राज्यात दोन सत्ताकेंद्र निर्माण झाली.

४) छत्रपती शाहूंच्या पेशव्यांनी पुढे उत्तर हिंदुस्थानात साम्राज्यविस्तार केला. मात्र दक्षिणेची चिंता राहिली.

५) यादवीचा फायदा या काळातील मराठ्यांचा शत्रू निजाम-उल-मुल्क याने घेतला.

६) या यादवीमुळे मराठ्यांचे शत्रू सिद्धी व पोर्तुगीज यांनी आपल्या सत्ता प्रबळ करून ते शेवटपर्यंत मराठ्यांना त्रास देत राहिले.

७) छत्रपती शाहू व महाराणी ताराबाई यांच्यात वेळीच समझोता झाला असता तर मराठ्यांचे घर दुभंगले नसते.

**● स्वयं- अध्ययनासाठी प्रश्न १**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) कोणत्या ठिकाणावरून छत्रपती शाहूंची सुटका करण्यात आली ?

२) महाराणी ताराबाईंनी मराठ्यांची दुसरी गादी कोठे निर्माण केली ?

३) छत्रपती शाहूंनी आपली राजधानी कोठे स्थापन केली?

**ब) रिकाम्या जागा भरा.**

१) छत्रपती शाहूंनी धनाजी जाधवांच्या मृत्यूनंतर ........... यास आपला सेनापती म्हणून नेमले.

अ) परसोजी भोसले ब) चंद्रसेन जाधव क) कृष्णराव खटावकर ड) कान्होजी आंग्रे

२) १२ ऑक्टोबर १७०७ रोजी छत्रपती शाहू व महाराणी ताराबाई यांच्यात ........... येथे युद्ध झाले.

अ) सातारा ब) खेड क) अहमदनगर ड) कोल्हापूर

३) ........... येथे औरंगजेबाचे दफन करण्यात आले.

अ) वेरूळ ब) खुल्दाबाद क) अहमदनगर ड) औरंगाबाद

४) छत्रपती शाहू साताऱ्यात पोहोचण्यापूर्वी राजधानी साताऱ्याच्या संरक्षणाची संपूर्ण जबाबदारी ........... कडे सोपवून महाराणी ताराबाई पन्हाळगड किल्ल्यावर निघून गेल्या.

अ) शंकराजी नारायण ब) परशुरामपंत प्रतिनिधी क) कान्होजी आंग्रे ड) दमाजी थोरात

## १.२.२ बाळाजी विश्वनाथ :

मराठ्यांच्या इतिहासामध्ये शिवशाही पेशवाई असे दोन भाग पडतात. पेशव्यांचा उदय ही त्यातील महत्त्वाची गोष्ट आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी कोणतेही पद वंशपरंपरेने दिले नाही. मात्र छत्रपती शाहूंनी आपल्या कारकिर्दीमध्ये अष्टप्रधानातील पदे वंशपरंपरेने दिली. या अष्टप्रधान मंडळातील पेशवेपद हे भट घराण्योत वंशपरंपरेने दिले.पेशवे पदावरील व्यक्ती कर्तबगार निघाल्या. छत्रपतींचा मुख्यप्रधान या नात्याने बदलत्या काळात हळूहळू सर्व सत्ता पेशव्यांच्या हाती गेली. ते मराठा राज्याचे चालक व कर्ते बनले.पेशव्यांच्या कर्तबगारीच्या काळात मराठेशाहीस पेशवाईचा काळ म्हटले जाते. पेशवाईचा मूळ पुरुष बाळाजी विश्वनाथ भट हा होय. एका विशिष्ट परिस्थितीमुळे बाळाजी विश्वनाथ व पेशवाईचा उदय मराठ्यांच्या राज्यात झाला.

**● बाळाजी विश्वनाथ व पेशवे यांच्या उदयाची कारणे :**

**१) मराठ्यांचे यादवी युद्ध :**

छत्रपती शाहू हे मराठी राज्याचे कायदेशीर वारस होते. त्यांचा मराठा गादीवरील वारसा हक्क कायदेशीर होता, मात्र महाराणी ताराबाईंच्या मतानुसार राज्याचा खरा वारस आपला मुलगाच आहे असे त्यांनी सर्वांना सांगितले. याला शाहूंचा विरोध होता. या वेळी मराठ्यांचे प्रबळ सरदार हाताशी धरून ताराबाईंनी शाहूंच्या प्रदेशात धुमाकूळ माजवला. छत्रपती शाहूंवर अनेक संकटे आणली, या काळात शाहूंना बाळाजी विश्वनाथने साथ दिली. त्याच्या या निष्ठेमुळे बाळाजीला पेशवेपद मिळाले.

**२) छत्रपती शाहूंपुढील अडचणी :**

शाहू महाराज छत्रपती झाले त्यावेळी त्यांच्या पुढे अनेक असंख्य अडचणी होत्या. राजकीय वातावरण अशांत होते. मराठा सरदारांना फक्त स्वार्थ दिसत होता. खेडच्या युद्धापासून शाहूंना विश्वासाने साथ देणाऱ्या आणि

असंख्य अडचणी व संकटे यांचे निष्ठेने निवारण करणाऱ्या बाळाजी विश्वनाथांवर त्यांचा विश्वास बसला. म्हणून त्यांनी पेशवाईची सूत्रे बाळाजीच्या हाती दिली. त्यातूनच बाळाजी विश्वनाथ व पेशवे घराण्याचा उदय झाला.

**३) मराठा सरदारांचा स्वार्थ :**

मुघल सत्तेबरोबर मराठ्यांनी संघर्ष करून स्वातंत्र्य युद्ध जिंकले. ही गोष्ट अभिमानास्पद आहेच, पण जहागिरी पद्धतीमुळे मराठा सरदार स्वार्थी बनले.ते राज्य हित यापेक्षा स्वहित पाहू लागले. अशा वेळी प्राणपणाने झगडणाऱ्या, प्रामाणिक, राजनिष्ठ असणाऱ्या बाळाजी विश्वनाथांवर शाहूंचा विश्वास बसला. आणि त्यांस आपला पेशवे केले.

**४) छत्रपती शाहूंचा स्वभाव :**

छत्रपती शाहू अत्यंत सरळमार्गी होते तसेच विश्वासू व नेहमी आपल्या सरदारांवर व सेवकांवर विश्वास ठेवत होते. त्यांच्यावर सोपवलेल्या जबाबदारीमध्ये कधीही हस्तक्षेप करत नसत. त्यांनी सेवकांच्या गुणांचा गौरव केला. त्यांचा हा स्वभाव बाळाजी विश्वनाथ व नंतरच्या पेशव्यांच्या कार्यास पूरक ठरला.

**५) अष्टप्रधानांचा दुबळेपणा :**

मराठा स्वातंत्र्ययुद्धाच्या काळामध्ये अष्टप्रधान मंडळ नामशेष होत गेले. स्वातंत्र्याच्या काळात अमात्य, सेनापती व नवीन निर्माण केलेले प्रतिनिधी हे प्रधान प्रभावी कामगिरी करणारे ठरले. इतर प्रधान कुमकुवत ठरले. त्यामुळे छत्रपती शाहूंच्या काळात अष्टप्रधान मंडळामध्ये पेशव्यांशिवाय कोणीही कर्तबगारी दाखवू शकले नाही. यामुळेच बाळाजी विश्वनाथ व पेशव्यांचे महत्व वाढत गेले. परिणामी बाळाजी विश्वनाथ आणि पेशवाईचा उदय होण्यास ही गोष्ट कारणीभूत ठरली.

**६) निजाम-उल-मुल्कची कारस्थाने व मुत्सद्देगिरी :**

छत्रपती शाहूंनी बाळाजी विश्वनाथास पेशवाईची वस्त्रे दिली. त्याच वर्षी निजाम-उल-मुल्क दक्षिणेचा मुघलांचा सुभेदार बनला. हा अत्यंत कर्तबगार, मुत्सद्दी, कूटनीती तसेच महत्त्वकांक्षी होता.तो मराठ्यांचा कट्टर शत्रू होता. दक्षिणेत स्वतःचे स्वतंत्र राज्य निर्माण करण्याची त्याची महत्त्वकांक्षा होती. दक्षिणेमध्ये चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याच्या मराठ्यांच्या हक्कास त्याने आक्षेप व विरोध केला. मराठ्यांमध्ये निर्माण झालेल्या दुहीचा फायदा त्याने घेतला.

**७) कर्तृत्वान पेशवे :**

पेशवे घराण्याच्या उदयास एका पाठोपाठ एक असे कर्तबगार पुरुष पेशवे पदावर आसनस्थ झाले. उदाहरणार्थ बाळाजी विश्वनाथ, पहिले बाजीराव, बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब हे पेशवे शूर, मुत्सद्दी, कर्तबगार होते. त्यांची योग्यता श्रेष्ठ दर्जाची होती. त्यामुळे पेशवाईचा उदय होण्यास मदत झाली.

- **बाळाजी विश्वनाथ यांचे सुरुवातीचे कार्य :**

बाळाजी विश्वनाथांचे मूळ घराणे कोकणातील श्रीवर्धनचे भट होय. या घराण्याकडे परंपरेने श्रीवर्धनची

देशमुखी वतन होते. चित्तपावन ब्राह्मण घराण्यात सन १६६० मध्ये बाळाजी विश्वनाथ याचा जन्म झाला. देशमुखी वतन हे जंजिराच्या सिद्दीच्या जहागीरीत होते. त्यावेळी सिद्दीने भट घराण्यावर अत्याचार केला. या अत्याचाराला कंटाळून बाळाजी विश्वनाथ भानू बंधूसह स्वराजामध्ये दाखल झाले. छत्रपती संभाजी महाराजांच्या हत्येनंतर मुघल-मराठा संघर्ष तीव्र बनला. त्यानंतर मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध सुरू झाले. या स्वातंत्र्य लढ्याच्या काळात रामचंद्रपंत अमात्यांच्या हाताखाली अनेक घराणी व पराक्रमी पुरुषांचा उदय झाला. यामध्ये बाळाजी विश्वनाथचा समावेश होतो. बाळाजी विश्वनाथ हे सन १६८९ च्या दरम्यान रामचंद्रपंत अमात्य यांच्या हाताखाली पुरंदरचा वसुली कारकून म्हणून नोकरीस होते. यावेळी त्यांचे वास्तव सासवड येथे होते. स्वातंत्र्य युद्धाच्या काळात सेनापती धनाजी जाधव आणि बाळाजी विश्वनाथ यांचा संबंध आला. अहमदनगरपासून दौलतबादपर्यंतच्या प्रदेशाचा महसूल वसूल करण्याची जबाबदारी धनाजी जाधवांनी बाळाजीवर सोपवली. त्यावेळी ते धनाजी जाधवांचे वसुली कारकून झाले. अत्यंत बिकट आणि कठीण परिस्थितीमध्ये या भागाचा महसूल बाळाजीने गोळा केला. सन १६९६ ते १७०७ या काळात त्यांनी पुणे व अहमदनगर ते दौलताबाद या प्रांताचा सुभेदार म्हणूनही कामकाज पाहिले. या प्रदेशातील वसुलीचे  अवघड काम त्यांनी केले. त्या प्रदेशात सातत्याने मुघल सत्तेचा वावर असतानाही हे काम बाळाजीने यशस्वीरित्या पार पाडले. सन १७०३ ते १७०७ या कालावधीमध्ये औरंजेबाचा लष्करी तळसुद्धा याच प्रदेशात होता. यामुळे त्याकाळात अनेक मुघल सरदार, अधिकारी यांच्याशी त्यांचा परिचय झाला. आणि मुघल कैदीतील शाहूंचा संबंध याच काळात आला असावा.

छत्रपती शाहूंच्या सुटकेनंतर मराठी राज्यात शाहू व ताराबाई यांच्यात सत्तेसाठी संघर्ष सुरू झाला. खेडच्या युद्धावेळी बाळाजी विश्वनाथ यांनी  सेनापती धनाजी जाधवांस शाहूंच्या पक्षात आणले, त्यामुळे शाहूंचा पक्ष भक्कम झाला, आणि शाहूंचा विजय निश्चित झाला. छत्रपती शाहूंसाठी बाळाजी विश्वनाथांचीही पहिली कामगिरी होय. खेडच्या विजयामुळे सातारपर्यंतचा प्रदेश व मराठ्यांची राजधानी सातारा शाहूंच्या ताब्यात आली.ताराबाईंचा बंदोबस्त करण्यासाठी छत्रपती शाहूंनी पन्हाळा व रांगण्याची मोहीम हाती घेतली. धनाजी जाधवांच्या मृत्यूनंतर धनाजी जाधव यांचा पुत्र चंद्रसेन जाधव यास सेनापतीपद दिले. मात्र चंद्रसेन जाधवांची छत्रपती शाहूंवर निष्ठा नव्हती. त्याचा कल ताराबाईंकडे होता. चंद्रसेन व बाळाजी या दोघांमध्ये सख्य नव्हते. छत्रपती शाहूंचा विश्वास निष्ठावंत बाळाजी विश्वनाथवर जास्त होता. चंद्रसेन जाधव बाळाजींचा द्वेष करू लागला, तसेच छत्रपती शाहूंवरसुद्धा नाराज झाला. चंद्रसेन जाधव हा अनेक मराठा सरदारांचा प्रमुख असल्यामुळे  मराठा सरदार शाहूंवर नाराज झाले ते सर्वजण बाळाजी विश्वनाथांचा द्वेष व मत्सर करू लागले.

कराडजवळील हरणाच्या शिकारीच्या शुल्लक कारणावरून चंद्रसेन जाधव व बाळाजी विश्वनाथ यांच्यातील संघर्ष विकोपास गेला. त्यावेळी चंद्रसेन जाधवांनी बाळाजीवर फौज पाठवली. त्यावेळी बाळाजी पराभूत होऊन छत्रपती शाहूंच्या आश्रयास गेली, तेव्हा छत्रपती शाहूंनी बाळाजी विश्वनाथाची बाजू घेतली. या गोष्टीमुळे चंद्रसेन जाधव संतापला आणि त्याने सन १७११ मध्ये छत्रपती शाहूंचा पक्ष सोडून उघडपणे ताराबाईंच्या पक्षात सामील झाला. यावेळी  शाहूंचा सरलष्कर हैबतराव निंबाळकरसुद्धा त्याच्यापाठोपाठ ताराबाईंच्या बाजूस गेला. यामुळे सेनापती व सरलष्कर या सैन्यातील सर्वश्रेष्ठ पदाधिकाऱ्यांनी शाहूंचा पक्ष सोडल्यामुळे शाहूंच्या पक्षाची लष्करी व्यवस्था पूर्णपणे कोलमडून पडली. मातब्बर मराठा सरदार विरोधात गेल्यामुळे बाळाजी विश्वनाथ संकटकाळी

छत्रपती शाहूंच्या बाजूस राहिले. त्यामुळे छत्रपती शाहूंनी सेनाकर्ते हे नवीन पद निर्माण करून बाळाजी विश्वनाथास दिले. छत्रपती शाहूंच्या समोर निर्माण झालेल्या या समस्येवर मात करण्यासाठी बाळाजी विश्वनाथ यांना प्रबळ व प्रभावी लष्कराची निर्मिती करणे अत्यावश्यक होते.

सामर्थ्यशाली लष्कराशिवाय मराठा सरदारांचा बिमोड करणे शक्य नव्हते, म्हणून छत्रपती शाहूंनी 'सेनाकर्ते' बाळाजी विश्वनाथ यांच्यावर स्वतःचे सैन्य उभा करण्याची जबाबदारी काम सोपविली. शाहू छत्रपतींची आर्थिक परिस्थिती बिकट होती. अशा काळात अत्यंत धैर्याने बाळाजी विश्वनाथ परिस्थितीस सामोरे गेले आणि आपले मित्र पिलाजी जाधव, अंबाजीपंत पुरंदरे यांच्या साह्याने कर्ज काढून सैनिक भरती करून उत्तम असे लष्कर उभा केले आणि लष्करी सामर्थ्य वाढवले. अत्यंत कमी वेळेत तडफेने ही कामगिरी केली. बाळाजी विश्वनाथ यांच्यामुळे या संकटावर छत्रपती शाहूंनी मात केली. बाळाजीने संकटकाळी छत्रपती शाहूंची बाजू सावरून कृष्णराव खटावकर, कान्होजी आंग्रे, दमाजी थोरात, रंभाजी निंबाळकर, उदाजी चव्हाण या बंडखोर सरदारांचा बंदोबस्त केला.

**● बंडखोर सरदारांचा बंदोबस्त :**

**१) कृष्णराव खटावकर यांचा बंदोबस्त (२ डिसेंबर १७११)**

खटाव या ठिकाणी कृष्णराव खटावकर नावाचा जहागीरदार होता. मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या काळात तो औरंगजेबास जाऊन मिळाला. आणि मुघल लष्कराला रसद पुरवून मुघलांची सेवा त्याने केली होती. त्या मोबदल्यात त्याला औरंगजेबाने खटावची जहागिरी देऊन मुघलांचा मनसबदार बनवला. त्यावेळेपासून तो स्वतंत्र वृत्तीने वागू लागला. त्याने शाहूंना त्रास देण्याची भूमिका घेतली. ही भूमिका छत्रपती शाहूंना आणि राजधानी सातारा यांना फार धोकादायक होती, म्हणून खटावकर यांचा बंदोबस्त करण्याची आज्ञा छत्रपती शाहूंनी बाळाजी विश्वनाथला दिली. बाळाजी विश्वनाथाने अचानकपणे २ डिसेंबर १७११ रोजी खटावकर यांच्यावर हल्ला केला.त्यामध्ये कृष्णराव व त्याचा एक मुलगा मारला गेला. व दोन मुले शरण आली. छत्रपती शाहूंनी त्यांना क्षमा करून त्यांचे वतन पुढे चालू ठेवले. या लढाईत परशुरामपंत त्र्यंबक प्रतिनिधींचा मुलगा श्रीपतराव यांने मोठे शौर्य गाजवल्यामुळे छत्रपती शाहूंनी परशुराम प्रतिनिधींची कैदेतून सुटका केली. अशा प्रकारे बाळाजी विश्वनाथने बंडखोर कृष्णराव खटावकराचा बंदोबस्त केला.

**२) बाळाजी विश्वनाथांचा कान्होजी आंग्रेसोबत सलोखा :**

कान्होजी आंग्रे म्हणजे कोकणातील मोठी शक्ती होती. छत्रपती राजाराम महाराजांनी कान्होजी आंग्रे यांची मराठा आरमार प्रमुख म्हणून नेमणूक केली. त्यांना 'सरखेल' हा किताब देऊन त्याचा गौरव केला होता.छत्रपती शाहूंच्या सुटकेनंतर शाहू-ताराबाई संघर्षामध्ये तो शाहूंच्या पक्षात सामील झाला. मात्र चंद्रसेन जाधव यांच्या सांगण्यावरून तो ताराबाईंच्या पक्षात सामील झाला. शाहूंना विरोध करत असताना कल्याणचा व तुंगचा प्रदेश, तिकोना, राजमाची इत्यादी किल्ले जिंकून घेतले व आपला मोर्चा छत्रपती शाहूंची राजधानी साताऱ्याच्या दिशेने वळवला. राजधानीस धोका निर्माण झाला.अचानक त्याने हल्ला करुन लोहगड किल्ला जिंकून घेतला, कान्होजी आंग्रे साताऱ्यावर चालून येण्याची तयारी करू लागला.

छत्रपती शाहूंसमोर मोठे संकट उभे राहिले, अशा परिस्थितीत आंग्रेस रोखून धरेल असा बाळाजी शिवाय दुसरा कर्तबगार सेनानी नाही असा अभिप्राय परशुराम पंतप्रतिनिधी व खंडोबल्लाळ यांनी शाहूंकडे व्यक्त केला. तसेच बाळाजीकडे सेनाकर्ते पद असल्यामुळे शाहूंच्या सैन्याचे प्रेम त्याच्यावर आहे अशी पुष्ठी जोडली. त्यामुळे छत्रपती शाहूंनी बाळाजी विश्वनाथवर कान्होजी आंग्रे यांच्या बंदोबस्ताची कामगिरी सोपवली.आणि कामगिरी फत्ते झाल्यानंतर त्यांना पेशवेपद देण्याचे निश्चित केले. पण आपणास प्रथम पेशवेपद द्यावे, पेशवेपदाची ताकद मागे असल्यानंतर सोपवलेली कामगिरी सोपी होईल असा युक्तिवाद बाळाजीने केला, त्यानुसार छत्रपती शाहूंनी १७ नोव्हेंबर १७१३ रोजी पुण्याजवळील 'मांजरी' येथे एक समारंभ भरवून बाळाजीला पेशवेपदाची वस्त्रे व काही महालांची देशमुखी दिली.

बाळाजी विश्वनाथास पेशवेपद मिळाल्यानंतर त्यांने चार हजार फौजेसह कान्होजी आंग्रे यांच्यावर मोहिम आखली. बाळाजी अत्यंत चाणाक्ष व मुत्सदी होता. तलवारीचा वापर करण्यापूर्वी त्यांने लेखणीचा वापर केला. त्यांनी कान्होजी आंग्रेस गोड पण तर्कशुद्ध पद्धतीने पत्रव्यवहार केला. बाळाजी विश्वनाथ आणि कान्होजी आंग्रे यांचा घरोबा होता. कान्होजीस त्याने भेटीस येत असल्याचे कळवले. बाळाजी विश्वनाथ यांनी नैसर्गिकदृष्ट्या शाहू हेच गादीचे खरे वारस आहेत आणि तुम्ही छत्रपती शाहूंच्याकडे आल्यास कोणते फायदे होणार,ताराबाईंच्या पक्षात राहणे म्हणजे बुडत्या जहाजाचा कप्तान होण्यासारखे आहे हे बाळाजी विश्वनाथने कान्होजी आंग्रेच्या मनावर बिंबवले. त्याशिवाय सिद्दी पोर्तुगीज इंग्रजांच्या सागरी सत्तांचा कान्होजींस असलेला धोका त्यास पटवून दिला. परिणामी कान्होजी व बाळाजी यांची लोणावळ्याजवळ'वळवण' येथे भेट झाली. त्याचा आदर सत्कार केला. त्यांच्यामध्ये सलोख्याची बोलणी झाली, आणि बाळाजी विश्वनाथ कान्होजींच्या भेटीस कुलाब्याला गेला. कान्होजींने पेशव्यांचा मोठा सत्कार केला. बोलणी झाली आणि छत्रपती शाहू व कान्होजीं आंग्रे यांच्यात ८ फेब्रुवारी १७१४ रोजी तह झाला.

● **कुलाब्याचा तह :**

कान्होजीने छत्रपती शाहूंचे स्वामित्व मानले. वर घाटचे घेतलेले किल्ले पेशव्यांच्या स्वाधीन करावेत, तळघाटचे किल्ले पेशव्यांनी घेतले असतील ते आंग्र्यांचे स्वाधीन करावेत. (लोहगड, तुंग, तिकोना, कोरगड, धनगड, पेशव्यांकडे द्यावेत. राजमाची वगैरे किल्ले आंग्र्यांना द्यावेत).आंग्रेंनी रायगड घेतल्यास तो छत्रपतींना द्यावा. कान्होजी आंग्रे यांना पूर्वीप्रमाणेच 'सरखेल'ही पदवी असावी.एकमेकांचे युद्ध कैदी मुक्त करावेत (भैरोपंत पिंगळे). प्रतिवर्षी दसऱ्यापासून मार्गशीर्षपर्यंत पेशव्यांनी कोकणची मसलत करावी. सिद्दी,फिरंगी मारून गर्देस मिळवावे.

हा तह पूर्ण करून पेशवा बाळाजी विश्वनाथ साताऱ्यात आला. छत्रपती शाहूंना आनंद झाला.बाळाजीच्या विनंतीवरून छत्रपतींनी कान्होजी आंग्रेस 'सरखेल' पद, वस्त्रे व शिक्के कट्यार पाठवली. थोडक्यात कान्होजी सारखा सरदार केवळ मुत्सदेगिरीच्या जोरावर बाळाजीने छत्रपती शाहूंच्या पक्षात आणला.

**३) दमाजी थोरातांचा बंदोबस्त (१७१६-१७१८) :**

मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धामध्ये थोरात घराण्याचा उदय झाला. रामचंद्रपंत अमात्य याने दमाजी थोरातास सुपे

व पाटस या परगण्यांची जहागिरी दिली. तसेच पुण्याच्या पूर्व भागाच्या संरक्षणाची जबाबदारी त्याच्यावर सोपवली. स्वातंत्र्ययुद्धामध्ये त्यांना 'रुस्तुमराव' हा किताब छत्रपतींनी दिला. दमाजी हिंगणगाव येथे गढी बांधून राहत होता. चंद्रसेन जाधवांबरोबर छत्रपती शाहूंच्या पक्षात आला. मात्र चंद्रसेन जाधव ताराबाईंच्या पक्षात गेल्यावर तो छत्रपती शाहूंना त्रास देऊ लागला. कान्होजी आंग्रे यांच्या मोहिमेवेळी त्याने शाहूंच्या प्रदेशात धुमाकूळ घातला. कोल्हापूरच्या राज्यक्रांतीवेळी महाराणी ताराबाई व छत्रपती शिवाजी कैदेमध्ये पडताच दमाजी थोरात मुघलाकडे गेला. छत्रपती शाहूंनी त्याच्या बंदोबस्तासाठी बाळाजीला पाठवले. कान्होजी आंग्रेप्रमाणे बाळाजी विश्वनाथांनी सलोख्याची बोलणी सुरू केली. बेल-भंडाऱ्याची शपथ घेऊन पुढील बोलणी व स्नेह वाढवण्यासाठी हिंगणगाव येथे दमाजी थोराताच्या घरी कुटुंबकबिल्यासह गेले. मात्र दमाजीने त्याला विश्वासघाताने कैद केले. आणि मोठ्या दंडाची मागणी केली.

छत्रपती शाहूंनी मोठी रक्कम देऊन बाळाजी विश्वनाथाची सुटका केली. त्यानंतर नारोशंकर व त्याचा कारभारी रांझेकर यांना छत्रपती शाहूंनी दमाजी थोरातावर पाठवले.दमाजी थोरातने धूर्तपणे अल्पवयीन सचिवास रोहिडा किल्ल्यावर छापा टाकून कैद केले. व आपल्या गढीमध्ये डांबून ठेवले. दमाजीने छत्रपती शाहूंना असे कळवले कि, आमच्यावरील मोहिमा थांबवा, अन्यथा सचिवास ठार करू. यावेळी देखील मोठी रक्कम देवून सचिवाची सुटका केली. पेशवे व सचिव यांना दमाजी थोरात भारी ठरला. शेवटी जेजुरी मुक्कामी त्यास भेटीस बोलावले. पण भेटी वेळीसुद्धा तो छत्रपती शाहूंशी उद्दामपणे वागला. सन १७१८ मध्ये सय्यद हुसेन अली व त्याचा तोफखाना घेऊन दमाजीवर मोहीम काढली.तिथे दमाजीचा पराभव झाला. पुरंदर किल्ल्यावर त्यास कैदेत ठेवले. त्याच ठिकाणी सन १७१८ मध्ये त्याचा मृत्यू झाला. मराठ्यांचा स्वातंत्र्ययुद्धात पराक्रम गाजवणाऱ्या दमाजीचा शेवट अशा रीतीने झाला.

**४) रंभाजी निंबाळकर :**

फलटणच्या महादजी निंबाळकरांचा हा नातू होय. हे घराणे छत्रपतींच्या संबंधित होते. यांनी मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धात फार मोठा पराक्रम केला होता. चंद्रसेन जाधव, दमाजी थोरात यांच्याबरोबर शाहूंच्या पक्षात रंभाजी होता. पुढे तो मुघलांकडे गेला. मुघल सुभेदार दाऊतखान पन्नी याने त्यास अहमदनगरचा फौजदार म्हणून नेमले आणि पुण्याची जहागिरी दिली. यामुळे छत्रपती शाहू व रंभाजी यांचा संघर्ष सुरू झाला. छत्रपती शाहूंनी बाळाजीस पुणे जिंकण्याचा हुकूम दिला. यातूनच रंभाजी निंबाळकर आणि बाळाची यांच्यात संघर्ष सुरू झाला.रंभाजीने या प्रांतात बाळाजीचा जम बसवू दिला नाही. शेवटी अत्यंत चिकाटीने बाळाजीने त्याची सर्व ठाणी नष्ट केली. आणि मुघल सुभेदार सय्यद हुसेन अली बरोबर तह करून पुणे प्रांत स्वराज्यात आणला.त्यानंतर रंभाजी हैदराबादच्या निजामाकडे गेला. अखेरपर्यंत तिथेच राहिला आणि रावरंभा निंबाळकर म्हणून प्रसिद्धीस आला.तिथेच त्याचा मृत्यू झाला.

**५) उदाजी चव्हाण :**

औरंगजेबाच्या तंबूचे कळस कापून आणण्याच्या मोहिमेत संताजी घोरपडेंसोबत विठोजी चव्हाण हे सामील

झाले होते, म्हणून छत्रपती राजारामानी त्यास हिंमतबहादूर हा किताब दिला होता. उदाजी चव्हाण हा बापाप्रमाणे पराक्रमी शूर व कर्तबगार होता. मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धात त्याने पराक्रम गाजवला होता. रामचंद्रपंत अमात्यने त्याच्या गुणामुळे बत्तीस शिराळापासून जतपर्यंतच्या मुलखाची जहागीर उदाजीस दिली होती. शाहूंच्या सुटकेनंतर निर्माण झालेल्या गोंधळाच्या परिस्थितीमध्ये उदाजी स्वतंत्रपणे वागू लागला. तो गढी बंधन बत्तीसशिराळामध्ये राहत होता. मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या कालावधीमध्ये तो तटस्थ होता. सन १७१० नंतर तो ताराबाईंच्या पक्षात गेला आणि छत्रपती शाहूंना त्रास देऊ लागला. तो साताऱ्यापर्यंत लुटालूट करून चौथाई वसूल करत होता. त्यासाठी महाराणी ताराबाई, चंद्रसेन जाधव, दमाजी थोरात यांची फूस होती. उदाजीच्या बंदोबस्ताची जबाबदारी बाळाजीवर सोपवली, पण तो उदाजीचा बंदोबस्त करू शकला नाही. कारण त्यांला दिल्ली जाणे भाग पडले, पुढे कोल्हापूरकर संभाजी व उदाजी चव्हाण यांच्याविरुद्ध मोहीम काढली या मोहिमेचे नेतृत्व श्रीपतराव पंतप्रतिनिधी यांनी केले आणि छत्रपती संभाजी व उदाजी चव्हाण यांचा पराभव केला. या दोघांनी छत्रपती शाहूंचे वर्चस्व मान्य केले.

**● छत्रपती शाहू व कोल्हापूरकर छत्रपती संभाजी संघर्ष :**

सन १७१४ मध्ये कोल्हापुरात क्रांती होवून महाराणी ताराबाई व त्यांचा पुत्र छत्रपती शिवाजी दुसरे यांना राजसबाई व त्यांचा पुत्र संभाजी यांनी कैद केले. त्यानंतर संभाजी कोल्हापूरच्या गादीचे छत्रपती झाले. त्यानी छत्रपती शाहूंबरोबर संघर्ष सुरू ठेवला. या यादवीस निजाम व बंडखोर मराठा सरदार चंद्रसेन जाधव, रंभाजी निंबाळकर, उदाजी चव्हाण यांनी खतपाणी घातले. पुढे सन १७२३ मध्ये ताराबाईंचा पुत्र शिवाजी दुसरा यांचा मृत्यू झाला. त्यानंतर छत्रपती संभाजीनी छत्रपती शाहूंबरोबर संघर्ष सुरू ठेवला आणि १७२५-२६ ते १७२६-२७ मध्ये कर्नाटकच्या दोन मोहिमा काढून त्यात यश मिळवले. छत्रपती शाहूंनी कर्नाटकात असलेल्या पेशवे बाजीराव यास तातडीने महाराष्ट्रात बोलवले आणि निजामाविरुद्ध मोहिम उघडली.

सन १७२८ मध्ये पालखेड येथे मराठा सरदारांसह निजामाचा पराभव केला. या पराभवाने छत्रपती संभाजीनी धडा घेतला नाही. यावेळी कोल्हापूरकर संभाजी विरुद्ध छत्रपती शाहूंनी मोहीम उघडली. यामध्ये श्रीपतराव पंतप्रतिनिधी, शंभुसिंग जाधव, दावलजी सोमवशी, शिदोजी निंबाळकर, पिलाजी जाधव इत्यादी सरदार सहभागी झाले. वारणा नदीच्या तीरावर दोन्ही फौजांची लढाई झाली. त्यामध्ये छत्रपती संभाजी यांचा पूर्ण पराभव झाला. छत्रपती संभाजी, उदाजी चव्हाण पन्हाळ्यावर पळून गेले. संभाजी महाराजांच्या राण्या व ताराबाई शाहूंच्या हाती सापडल्या. यावेळी छत्रपती शाहूंनी राण्यांची रवानगी सन्मानपूर्वक पन्हाळ्यावर केली. ताराबाईंच्या इच्छेप्रमाणे त्यांना साताऱ्यामध्ये ठेवले. यावेळी ताराबाई व छत्रपती संभाजी यांची पत्नी जिजाबाई यांनी दोन्ही छत्रपतींमध्ये मध्यस्थी करून वाद मिटवण्याचे ठरवले. त्यानुसार २७ फेब्रुवारी १७३१ रोजी जखीणवाडी कराड येथे दोघा राज बंधुंची शाही भेट झाली. दोघात वाटाघाटी होवून वारणेचा तह झाला.

**● वारणेचा तह-१३ एप्रिल १७३१ :**

१) इलाखा वारुण महाल (बत्तीसशिराळा) तहत संगम (कृष्णा व वारणा संगम दक्षिण तीर कुल दुतर्फा मुलूख दरोबस्त देखील व किल्ले तुम्हास दिले असत.

२) तुंगभद्रेपासून रामेश्वरदेखील संस्थाने आम्हाकडे ठेवून निम्मे तुम्हाकडे करार दिले.

३) किल्ले कोपल तुम्हाकडे दिला. त्याचा मोबदला तुम्ही रत्नागिरी आम्हाकडे दिले.

४) वडगाव ठाणे पाडून टाकावे.

५) तुम्हासी जे वैर करतील त्याचे पारिपत्य आम्ही करावे. आम्हासी जे वैर करतील त्याचे पारिपत्य तुम्ही करावे.तुम्ही आम्ही एक विचारी राज्याभिवृद्धी करावी.

६) वारणा व कृष्णेच्या संगमापासून दक्षिण तीर तहत तुंगभद्रेपावेतो दरोबस्तदेखील गड ठाणी तुम्हाकडे दिली.

७) कोकण प्रांत साळशी पलीकडे तहत पंचमहाल अकोलेपावेतो बरोबर तुम्हाकडे दिली.

८) इकडील चाकर तुम्ही ठेवू नये. तुमच्याकडील चाकर आम्ही ठेवू नये.

९) मिरज प्रांत, विजापूर प्रांताची ठाणी देखील अथणी, तासगाव वगैरे तुम्ही आमचे स्वाधीन करावी.

**● तहाचे महत्त्व :**

वारणेच्या तहानुसार सातारा व कोल्हापूर राज्याची सरहद्द वारणा नदी ठरली.या तहाने सातारा व कोल्हापूरमध्ये सुरू असलेली यादवी पूर्णपणे संपुष्टात येऊन शांतता प्रस्थापित झाली. छत्रपती संभाजीनी छत्रपती शाहूंशी असलेले शत्रुत्व कायमचे सोडून दिले. छत्रपती संभाजीना मिळालेल्या प्रदेशावर संतोष मानावा लागला. यादवी संपल्यामुळे मराठ्यांना राज्य विस्ताराचा मार्ग मोकळा झाला.

**● बाळाजी विश्वनाथची दिल्ली स्वारी व सनदांची प्राप्ती :**

दिल्लीच्या राजकारभारात मराठ्यांचा प्रवेश होण्यास सय्यद बंधू कारणीभूत ठरले. दक्षिणेचा सुभेदार दाऊतखान पन्नी याची नेमणूक दक्षिणेच्या सुभ्यावरून गुजरात सुभ्यावर केली. त्याच्या जागी दक्षिणेचा सुभेदार निजाम-उल-मुल्क याची नेमणूक सन १७१३ साली केली.तो मराठ्यांचा कट्टर विरोधक असल्याने त्याला स्वतःचे असे स्वतंत्र राज्य निर्माण करावयाचे होते. दिल्लीत फरुखसियर व सय्यद बंधू त्यांच्यात तीव्र मतभेद झाले. बादशहाने सय्यद बंधूंचे खच्चीकरण करण्यास सुरुवात केली. आणि निजामाच्या जागी सय्यद हुसेन अलीस नियुक्त केले. बादशहाने दाऊतखान पन्नीला सय्यद बंधूस ठार मारण्याचा आदेश दिला. त्यानुसार तो चालून गेला. दोघांमध्ये बुऱ्हाणपुर जवळ लढाई झाली. यामध्ये दाऊतखान पन्नी मारला गेला. हुसेन अली दक्षिणेचा सुभेदार झाला. तो मराठ्यांचा विरोधक होता. मात्र बादशहा आपणास संपवण्याचा प्रयत्न करत आहे आणि मराठ्यांची ताकद त्याच्या लक्षात आल्यानंतर त्याने मराठ्यांबरोबर चांगले संबंध निर्माण केले. आणि बादशहाविरुद्ध मराठ्यांची मदत घेऊन तहाची बोलणी सुरू केली.हुसेन अलीने बादशहाच्या वतीने छत्रपती शाहूंबरोबर तह केला.

**● छत्रपती शाहू व सय्यद हुसेन अली यांच्यातील तह (१७१८) :**

छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य सर्व गड कोटांसह छत्रपती शाहूंना मिळावे. मराठ्यांनी जिंकलेले प्रदेश

स्वराज्यात दाखल करावेत. (खानदेश, गोंडवन, वऱ्हाड, हैदराबाद व कर्नाटक). दक्षिणेतील ६ सुभ्यांची चौथाई व सरदेशमुखी मराठ्यांनी वसूल करावी. चौथाई व सरदेशमुखीच्या मोबदल्यात छत्रपती शाहूंनी १५००० सैन्य मुघलांच्या मदतीस ठेवून दक्षिणेचा बंदोबस्त ठेवावा.छत्रपती शाहूंनी कोल्हापूरच्या संभाजीस उपद्रव करू नये. बादशहाला मराठ्यांनी प्रत्येक वर्षाला दहा लाख रुपये द्यावेत. राजमाता येसूबाई व इतर कैद्यांची कैदेतून सुटका व्हावी.

**● बाळाजीची दिल्ली स्वारी (नोव्हेंबर १७१८) :**

तहाचा मसुदा बादशहा फरुखसियरकडे पाठवला. पण त्याने नामंजूर केला, कारण बादशहाने दिल्लीत असलेल्या सय्यद अब्दुल्लाला संपवण्याचा कट केला. त्यासाठी त्याने निजाम सर बुलंदखान, अजितसिंग अशा अनेक सुभेदारांना दिल्लीमध्ये बोलावले. दक्षिणेत असणाऱ्या हुसेन अलीस तात्काळ बोलवले. तो दिल्लीकडे निघाला. मराठा फौजेचे नेतृत्व पेशवे बाळाजी विश्वनाथ करत होता. त्याबरोबर बाळाजीचा मुलगा बाजीराव, खंडेराव दाभाडे, संताजी व रामजी भोसले, संताजी जाधव यांसारखे अनेक नामांकित सरदार त्याच्यासोबत होते. मराठ्यांची फौज दिल्लीच्या रोखाने येत आहे हे कळताच बादशहाने मराठ्यांच्या तहास मान्यता दिली. फौज परत घेऊन जाण्यास सांगितले. मात्र राजमाता येसूबाईंची सुटका करून व सनदा घेतल्याशिवाय मराठे परत फिरणार नव्हते. शेवटी फेब्रुवारी १७१९ मध्ये मराठे व हुसेनअली दिल्लीत पोहचले.

**● चौथाई व सरदेशमुखी सनदांची प्राप्ती (मार्च १७१९) :**

बादशहा व सय्यद बंधू यांच्यातील संघर्ष पराकोटीला गेला. सय्यद बंधूंनी बादशहला कैद केले व 'रफी उदरकजीत' यास बादशहा केले. या प्रसंगी मुघल व मराठा यांच्यात संघर्ष झाला. यामध्ये दीड ते दोन हजार मराठे मारले गेले. मराठ्यांनी तहात ठरल्याप्रमाणे चौथाई सरदेशमुखी व स्वराज्याच्या तीन प्रकारच्या सनदा लिखित स्वरूपात बादशहाकडून घेतल्या व राजमाता येसूबाईआणि कुटुंबातील इतर कैद्यांची मुक्तता केली. या सर्वांना घेऊन बाळाजीने दिल्ली सोडली. व ४ जुलै १७१९ रोजी ते साताऱ्यात दाखल झाला. यावेळी छत्रपती शाहूंनी बाळाजीचा फार मोठा सन्मान केला. आणि पाच महालांचे सरदेशमुखीचे वतन दिले. अशा रीतीने बाळाजीची दिल्ली स्वारी यशस्वी झाली.

**● मराठा राज्यमंडळ / राज्यसंघ उदय :**

राजाराम महाराज छत्रपती झाल्यानंतर औरंगजेबाच्या तीव्र हल्ल्यातून स्वराज्याचे व स्वातंत्र्याचे रक्षण करणे हेच एकमेव ध्येय मराठ्यांपुढे होते.राजधानी रायगड मुघलांच्या ताब्यात गेली. राणी येसूबाई व शाहू मुघलांचे कैदी बनले. मराठी राज्याची अवस्था अत्यंत बिकट झाली. अशा परिस्थितीत मुघलांपुढे शरणागती स्वीकारायची नाही हा चंग बांधून छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणा स्फूर्ती उराशी बाळगून मराठे औरंगजेबाशी लढत होते. राजधानी रायगड मुघलाच्या ताब्यात गेल्यामुळे कर्नाटकातील जिंजी येथे राजधानी निर्माण करून छत्रपती राजारामानी स्वातंत्र्ययुद्धाचे नेतृत्व केले.त्यासाठी रामचंद्रपंत अमात्य यांच्या नेतृत्वाखाली मराठा सरदार मुघलांशी लढत होते. लष्कर उभारणी करण्यासाठी प्रचंड खर्च येत होता. मराठ्यांना आर्थिक पाठबळ कमी पडत होते.त्यात

दुही माजवण्यासाठी औरंगजेबाने मराठा सरदारांना जहागिरी देण्याचे आमिष दाखवले. या सर्व परिस्थितीत छत्रपती राजाराम व मुत्सद्दी मराठ्यांनी स्वराज्य रक्षणासाठी मुघलांचे आक्रमण थोपवून व त्यांना पराभूत करण्यासाठी मराठा सरदारांना जहागीर देण्याची पद्धत सुरू केली. त्या प्रदेशातून मुघली फौजांना हुसकावून लावणे व ते प्रदेश आपल्या ताब्यात घेऊन आपली ठाणी निर्माण करण्याच्या आज्ञा दिल्या. छत्रपती राजारामांच्या मृत्यूनंतर महाराणी ताराबाईंनीसुद्धा छत्रपती राजारामांची जहागिरी पद्धत स्वीकारली. त्यामुळे जहागीरदार प्रबळ झाले. अशावेळी शाहूंची कैदेतून सुटका झाल्यानंतर शाहू व महाराणी ताराबाई यांच्यात यादवी सुरू झाली. याचा फायदा घेवून मराठा जहागीरदारांनी आपले आसन अधिकच बळकट केले. त्यामुळे शाहू व ताराबाई यांना सरदारांच्या लष्करावर अवलंबून राहावे लागले. त्यामुळे अष्टप्रधानमंडळ निरुपयोगी ठरले. अशावेळी शाहूंनी ही पद्धत बंद करण्याचा प्रयत्न केला असता तर, त्यांच्या स्थानास धक्का बसला म्हणूनच छत्रपती शाहू व बाळाजी विश्वनाथाने परिस्थिती पाहून ऐक्य निर्माण करण्यासाठी मराठा सरदारांना आपल्या पराक्रमासाठी नवीन क्षेत्र निर्माण केली व मराठा सत्तेचा सर्वदूर विस्तार करण्यासाठी मराठा राज्य मंडळाची अथवा मराठा राज्य संघाची निर्मिती केली.

सर्वांनी आपला जीव धोक्यात घालून आपली जहागिरीवर (प्रदेशावर) आपले वर्चस्व निर्माण केले. त्यानंतर त्या प्रदेशाची जहागिरी, वसुलीची, संरक्षणाची, शांतता सुव्यवस्थेची जबाबदारी देण्यात आली.जहागीरींना मान्यता दिल्यानंतर मराठा राजमंडळ संदर्भात काही बाबी ठरवण्यात आल्या. त्यामध्ये छत्रपतींशी एकनिष्ठ राहून सरदारांनी ऐक्य भावनेने राहावे. मराठ्यांचे राज्य वाढवावे. जहागिरीतून वसूल केलेल्या महासूलाचा हिशोब ठेवावा. एकमेकांच्या प्रदेशावर हल्ला करू नये व शेजारच्या जहागिरीत ढवळाढवळ करू नये. सर्वांनी छत्रपतींच्या आज्ञा पाळाव्यात. वसूल महसुलापैकी दोन तृतीयांश भाग फौजेच्या खर्चासाठी ठेवावा. व एक तृतीयांश छत्रपतींना द्यावा. सरदार व त्यांच्या जहागिरी पुढीलप्रमाणे-

१) पेशवा - खानदेश व बालाघाट

२) सेनापती दाभाडे - गुजरात व बागलाण

३) सेनासाहेब सुभा भोसले - वऱ्हाड, नागपूर व गोंडवन

४) सरलष्कर निंबाळकर - गंगथडी व औरंगाबाद

५) प्रतिनिधी - नीरा व वारणा यामधील प्रदेश व बिदर

६) आंग्रे - कोकण किनारपट्टी

७) फत्तेसिंह भोसले - अक्कलकोट व कर्नाटक

८) सचिव नारोशंकर - भोर व पुण्याच्या दक्षिणेकडील प्रदेश

९) घोरपडे - कृष्णा नदीच्या दक्षिणेस कर्नाटक इत्यादी.

● **बाळाजी विश्वनाथांचा मृत्यू :**

बाळाजी विश्वनाथ दिल्लीस गेले तेव्हा कोल्हापूरकर छत्रपती संभाजीनी छत्रपती शाहूंना त्रास दिला. बाळाजी विश्वनाथ दिल्लीवरून परत आल्यानंतर छत्रपती शाहूंनी त्यास कोल्हापूरकर संभाजींचा बंदोबस्त करण्यासाठी पाठवले आणि वडगाव येथे बाळाजींने संभाजींचा पराभव केला. याच काळात ते आजारी पडले. सासवड येथे २ एप्रिल १७२० रोजी बाळाजी विश्वनाथाचा मृत्यू झाला.

● **स्वयं– अध्ययनासाठी प्रश्न २**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) बाळाजी विश्वनाथाला छत्रपती शाहूंनी कोणता किताब दिला ?

२) बाळाजी विश्वनाथांचे मूळ घराणे कोणते ?

३) हरणाच्या शिकारीच्या कारणावरून बाळाजी विश्वनाथांचा कोणाशी संघर्ष झाला?

४) बाळाजी विश्वनाथांच्या पेशवे पदाचा समारंभ कोठे झाला ?

**ब) रिकाम्या जागा भरा.**

१) इ. स १७१९ मध्ये ........... याने मोगल बादशहाकडून चौथाई व सरदेशमुखीची सनद मिळवली.

२) खटाव येथील ........... या जहागीरदाराचा बाळाजी विश्वनाथांने बंदोबस्त केला.

३) छत्रपती राजाराम महाराजांनी कान्होजी आंग्रे यास ........... हा किताब दिला.

४) ........... येथे २ एप्रिल १७२० रोजी बाळाजी विश्वनाथाचा मृत्यू झाला.

## १.२.३ पेशवे बाजीराव पहिले :

कोल्हापूरकर छत्रपती संभाजी यांचा बंदोबस्त करण्याचे सुरु असताना २ एप्रिल १७२० रोजी सासवड येथे बाळाजी विश्वनाथ यांचा मृत्यू झाला. छत्रपती शाहूंनी बाळाजी विश्वनाथचा मुलगा बाजीराव यास कराडजवळील मसूर येथे १७ एप्रिल १७२० रोजी पेशवे पदाची वस्त्रे दिली. बाळाजीची पूर्वीची जहागीर व सरंजाम दिला. शिवाय दमाजी थोरात यांची जप्त केलेली जहागीर बाजीराव यांना दिली. त्याचा लहान भाऊ चिमाजी आप्पास पंडित ही पदवी देऊन सरदारकी बहाल केली.

● **बाजीराव यांचा जन्म व बालपण :**

बाळाजी विश्वनाथ व राधाबाई यांच्या पोटी १८ ऑगस्ट १७०० रोजी बाजीरावाचा जन्म झाला. अत्यंत अस्थिर राजकीय परिस्थितीमध्ये त्याचे बालपण गेले. वडिलांचा कामाचा व्याप वाढला असल्यामुळे त्यांना बाजीरावाच्या शिक्षणाकडे लक्ष देता आले नाही, तरीसुद्धा संस्कृत मोडीचे ज्ञान त्यांला मिळाले. पुस्तकी शिक्षणापेक्षा लष्करी शिक्षणामध्ये बाजीरावला आवड होती. यामध्ये तलवार चालविणे, तिरंदाजी करणे, भाला

फेकणे, घोड्यावरुन भरधाव रपेट करणे हे शिक्षण यामध्ये पिलाजी जाधव व नाथा धुमाळ यांनी दिले. बाळाजीच्या मृत्यूसमयी बाजीराव फक्त एकोणीस वर्षाचा होता. बाजीरावाची तब्येत जोर-बैठकांमुळे अत्यंत रेखीव व कसदार होती. कोणत्याही मस्तवाल घोड्याला बाजीराव वठणीवर आणत. वयाच्या बाराव्या वर्षापासून त्यांनी लष्करी मोहिमांमध्ये भाग घेतला. युध्दातील डावपेच कूटनीती अनुभवता आली. सन १७१८ च्या बाळाजीच्या दिल्ली स्वारीमुळे मोगली दरबार तेथील शह-काटशहाचे राजकारण, उत्तरेकडील राजकारणातील चढ-उतार व दिल्लीच्या अस्थिर परिस्थितीची जाणीव या सर्व गोष्टींचे बाळकडू त्याला लहानपणीच मिळाल्यामुळे त्याला मराठी राज्याचे साम्राज्यात रूपांतर केले.

बाजीरावास पेशवेपद मिळाले असले तरी मराठा दरबारातील अनेक ज्येष्ठ श्रेष्ठ सरदारांनी त्यास विरोध केला. कारण लहान पोराने आपली बरोबरी करावी, आपणावर वर्चस्व निर्माण करावे हे मुत्सद्दी मराठा सरदारांना खटकले. यामध्ये सर्वात जास्त विरोध श्रीपतराव प्रतिनिधी यांनी केला. मात्र छत्रपती शाहूंना बाजीरावाच्या भवितव्याबद्दल आत्मविश्वास वाटत होता, बाजीराव पेशवे पदास पात्र ठरला नाही तर त्यास आपण काढून टाकू, असे वचन छत्रपती शाहूंनी मराठी सरदारांना दिले. यामुळे बाजीरावाला होणारा विरोध कमी झाला.

**● पेशवे बाजीरावाचे धोरण :**

बाजीरावाने स्वतःच्या कर्तृत्वावर छत्रपती शाहूंच्या राज्याचे धोरण निश्चित केले आणि मराठा राज्याचे साम्राज्य विस्तार करण्याचे ठरविले. त्यानुसार लष्कर उभारणे, जुन्या जाणकार सरदारांना न दुखवता साम्राज्य विस्ताराचे धोरण अवलंबले. यामुळे एक नवीन चैतन्य निर्माण करून बाजीरावाने आपले धोरण आणि साम्राज्य विस्तार करण्यास सुरुवात केली.

**● दिल्लीतील राजकारणाचे चढ उतार :**

दिल्लीच्या मुघल सत्तेमध्ये अनेकदा चढ-उतार झाले. सन १७२० मध्ये महमदशहा बादशहा झाला. हा बहादुरशहाचा नातू होता. त्याचे नाव 'रोशन अख्तार, असे होते. हसनअली व हुसेनअली या बंधूनी फरुखसियरला पदच्युत करून महमदशहास सत्तेवर आणले. सय्यद बंधूचा राजकारणात इथून पुढे वारंवार हस्तक्षेप होऊ लागला, म्हणून महमदशहा सुद्धा सय्यद बंधूंचा तिरस्कार करू लागला. त्याची माता अत्यंत धूर्त कटकारस्थानी होती. तिने वरवर सय्यद बंधूवर प्रेम दाखवले पण तिने सय्यद बंधूंचा काटा काढण्यासाठी निजाम-उल-मुल्क याच्याबरोबर संधान साधले. निजाम हा सय्यद बंधू विरोधी गटाचा प्रमुख होता. सय्यद बंधूंनी त्यास माळव्याची सुभेदारी दिली होती. त्याची वारंवार बदली करून त्याला सतावून सोडले होते. यामुळे तो सय्यद बंधूवर चिडून होता.

माळवा प्रदेशात निजामाने मोठे सैन्य जमा केले आणि आपण माळवा प्रदेशातून मराठ्यांना हकलून लावण्याकरता सैन्य जमा करीत आहोत असा खुलासा निजाम-उल-मुल्क याने सय्यद बंधूकडे केला. परंतु सय्यद बंधूचा पाडाव करण्याकरता सैनिक जमा केले आहे याची शंका सय्यद बंधूना आली, म्हणून त्यांनी निजामाची बदली अकबराबादला केली. त्यावेळी निजामाने सय्यद बंधूबरोबर लढण्याचे ठरवले आणि ससैन्य तो दक्षिणेकडे निघाला. त्याने नर्मदा नदी ओलांडून पुढे खानदेश प्रांत काबीज केला. सय्यद बंधू विरोधात बंड सुरू केले.

महमदशहास मनापासून सय्यद बंधूचा पाडाव व्हावा व आपली त्यांच्या त्रासातून मुक्तता व्हावी असे वाटत होते, अशा यावेळी त्याने निजाम-उल-मुल्कला पत्रे पाठवलेली दिसून येतात.

**● खांडव्याची लढाई(१९ जून १७२०) :**

सय्यद बंधूनी निजामाला आवर घालण्यासाठी दिलावर अलीखान यास दक्षिणेस पाठवले. तर दक्षिणेकडून अलम अलीस निजामावर तुटून पडण्यास सांगितले. उत्तर व दक्षिण बाजूमध्येच निजामाला कात्रीत पकडायचे व त्याचा पाडाव करायचा. असे धोरण सय्यद बंधूंनी ठरवले. पण निजाम अत्यंत धूर्त चाणाक्ष होता, तसा शूर होता. त्याने दिलावर अलीखान अलमअली खान हे एकत्र येण्यापूर्वी एकेकाला गाठून पराभूत करण्याचे ठरवले. निजामाने याची वाट न पाहता १९ जून १७२० रोजी खांडवा या ठिकाणी हल्ला चढवला. इतिहासात ही लढाई खांडव्याची लढाई या नावाने ओळखली जाते. यामध्ये दिलावर अलीखान मारला गेला. निजामाला मोठा विजय मिळाला.आलमअली बुऱ्हाणपुर येथे दाखल झाला. निजामाचा आत्मविश्वास वाढत गेला आणि निजाम-उल-मुल्क आपल्या सैन्यासह बुऱ्हाणपूरकडे रवाना झाला.

**● बाळापूरची लढाई (१० ऑगस्ट १७२०) :**

आलमअली व निजाम-उल-मुल्क या दोघांनी मराठ्यांची मदत मागितली. पण मराठे तटस्थ राहिले. पावसाळा सुरू झाला होता त्यामुळे युद्धाचा धोका पत्करू नये असा सल्ला आलमअलीस ज्येष्ठांनी दिला, मात्र त्याने त्याकडे दुर्लक्ष करुन आपली मोहीम चालूच ठेवली आणि पूर्णा नदीच्या काठावरील 'बाळापूर' या ठिकाणी दोन्ही सैन्यांची गाठ पडली. दोघात युद्ध झाले. या वेळी आलमअली मारला गेला त्याचे सैनिक पळून गेले. निजामाला मोठा विजय मिळाला. अशा रीतीने सय्यद बंधूच्या ऱ्हासाची सुरुवात झाली. आणि दक्षिणेमध्ये निजाम सत्तेची मुहूर्तमेढ रोवली गेली. याचा परिणाम मराठा राजकारणावरही झाला. यामुळे मराठ्यांना निजामाची दखल घ्यावी लागली.

**● सय्यद बंधूंचा ऱ्हास :**

दिलावर अलीखान व आलम अलीखान यांचा झालेला पराभव म्हणजे सय्यद बंधूंच्या वर्चस्वास धक्का बसला. बादशहाने वरकरणी निजामाचा पराभव करण्यासाठी हुसेन अलीने दक्षिणेत जावे व हसनअलीने दिल्लीच्या बंदोबस्तासाठी राहावे अशी योजना आखली होती. बादशहा हुसेनअलीसह निघाला सय्यद बंधूंचे विभाजन झाले. हुसेनअली अजमेरच्या रस्त्याने दक्षिणेकडे जात असताना जयपूरच्या पूर्वेस साठ मैल अंतरावर तोडाभीम येथे छावणी पडली असतानाच आमीरखान, हैदरकूली खान, सादतखान या तिघांनी मिळून ४ ऑक्टोबर १७२० रोजी हुसेनअलीचा खून केला. त्यामुळे बादशहा दिल्लीकडे परतला. आपल्या बंधूस विश्वासघाताने ठार मारून टाकल्याची बातमी कळताच हसनअली संतापला आणि त्याने दिल्लीवर दुसरा बादशहा बसवण्याचे ठरवले. त्याची महमदशहा बरोबर १४ नोव्हेंबर १७२० रोजी यमुना नदीच्या तीरावर हसनपुर येथे मोठी लढाई झाली. या लढाईत हसनअली पराभूत झाला.११ नोव्हेंबर १७२२ रोजी हसनअलीस ठार मारण्यात आले. आणि सय्यद बंधूंची कारकीर्द संपुष्टात आली.

● **पेशवा पहिला बाजीराव व निजाम संबंध :**

दक्षिणमध्ये मराठे व निजाम यांच्यात सातत्याने संघर्ष झाला. सय्यद बंधूंचा ऱ्हास होताच दिल्लीत निजामाचे वर्चस्व प्रस्थापित झाले. त्यामुळे त्याच्या मराठ्यांविरोधात हालचाली सुरू झाल्या. दक्षिणेत सय्यद बंधूंनी बादशहाकरवी मराठ्यांना दिलेल्या चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा नामंजूर करण्याच्या हालचाली केल्या. मराठ्यांच्या वसुलीत अडथळे निर्माण केले. शिवाय मराठा घराण्यात अंतर्गत कलह सुरू करण्याचा प्रयत्न केला, म्हणजेच छत्रपती शाहू प्रमाणेच कोल्हापूरकर छत्रपती संभाजीस चौथाई व सरदेशमुखीचे हक्क वसूल करण्याचे अधिकार आहे असे मत मांडले. याच काळात दिल्लीचा वजीर व निजामाचा नातेवाईक अमीनखान मृत्यू पावला. यावेळी बादशहाने निजामास वजीरपद स्वीकारण्यासाठी दिल्लीस बोलवले, मात्र निजामाची द्विधा मनस्थिती झाली. मुबारिझखानाकडे दक्षिणेचा कारभार सोपवून निजाम दिल्लीस गेला.१३ फेब्रुवारी १७२२ रोजी मुघल बादशहाचे वजीरपद त्याने स्वीकारले. दक्षिणेचे सहा सुभे माळवा व गुजरात हे प्रांत आपल्याकडे घेतले. यामुळे मराठ्यांच्या हितसंबंधांना आव्हान निर्माण झाले. यावेळी बाजीराव पेशवे व निजाम यांची माळवा सरहद्दीवर भेलसा येथे भेट घडून आली.

निजामाच्या वाढत्या प्रभावामुळे बादशहा साशंक झाला आणि निजामाचे खच्चीकरण करण्यासाठी बादशहाने त्याची औधच्या सुभ्यावर नियुक्ती केली. याचा निजामाला राग येऊन त्याने २७ डिसेंबर १७२३ रोजी वजीरपदाचा राजीनामा दिला. बादशहाने निजामाचा मुलगा गाजीउद्दीन यास वजीरपद दिले. बादशहाने मुबारिझखानाकडे दक्षिणेची सुभेदारी दिली. मुबारिझखान व निजाम यांच्यातील संभाव्य युद्धाचा फायदा उठवण्यासाठी बाजीराव उत्तरेकडे गेला. धारजवळ नालछा येथे बाजीराव पेशवे व निजाम यांच्यात मे १७२४ मध्ये भेट झाली ती भेट मैत्रीपूर्ण होती. यावेळी मुबारिझखानने छत्रपती शाहूंशी मैत्रीचे बोलणे केले.

● **साखरखेड्याची लढाई (फत्तेखडी) ३० सप्टेंबर १७२४ :**

निजाम व मुबारिझखान या मोगल सरदारांच्या युद्धात कोणाचा विजय होणार याचा अंदाज बांधता येत नसल्यामुळे छत्रपती शाहूंनी २९ जुलै १७२४ रोजी आपल्या सरदारांना तटस्थ राहण्याविषयी कळवले. या वेळी मराठ्यांनी मिळालेल्या संधीचा फायदा घेऊन बऱ्हाणपूरचा सर्व प्रदेश आपल्या ताब्यात आणला. निजामाने प्रचंड वेगाने कूच करून औरंगाबाद ताब्यात घेतले. आणि मुबारिझखानची युद्धसामग्री ताब्यात घेतली. खानास दिल्लीहून मदत येण्यापूर्वीच औरंगाबादच्या पूर्वेस पूर्णा नदीच्या काठी साखरखेडा येथे ३० सप्टेंबर १७२४ ला मुबारिझखान व निजाम यांच्यात घनघोर लढाई होऊन मुबारिझखान व त्याचे दोन मुलगे मारले गेले. मुबारिझखानाचा खजिना हत्ती घोडे असे प्रचंड युद्धसाहित्य निजामाला मिळाले व निजामाचा मोठा विजय झाला.या घटनेचा बादशहाला धक्का बसला.

साखरखेड्याचा विजय प्राप्त झाल्यामुळे त्याचे नाव बदलून फत्तेखडी असे करण्यात आले. साखरखेड्यामध्ये बाजीराव आठ हजार सैन्यानिशी हजर होता, मात्र ते तटस्थ राहिले. या युद्धानंतर निजामाने बाजीरावांची भेट घेऊन त्यांचा मोठा सन्मान केला. या लढाईत झालेल्या घटनेबद्दल निजामाने बादशाहाकडे माफी मागितली त्यामुळे बादशहाने निजामास दक्षिणेच्या सुभेदारीवर कायम केले.

छत्रपती शाहूंनी उत्तरेतील साम्राज्यविस्ताराप्रमाणे दक्षिणेत देखील लक्ष दिले. सन १७२४ मध्ये छत्रपती शाहूंनी मुघल बादशहाकडे केलेल्या मागण्यांमध्ये तंजावरचे राज्य मराठ्यांना परत करण्याविषयी अट घातली होती. कारण या राज्याबद्दल छत्रपती शाहूंना मोठी जवळीक होती. तंजावरचा सरफोजी भोसले हे अडचणीत आले होते. कर्नाटकातील चौथाई व सरदेशमुखीचे हक्क वसूल करणे सादुल्लाखानापासून तंजावरचे रक्षण करणे कर्नाटकातील मराठा सरदारांना मदत करून त्यांना राजकीय वर्चस्वाखाली आणणे आणि निजामाच्या महत्त्वकांक्षेस प्रतिबंध करणे अशा अनेक कारणांमुळे कर्नाटक प्रांतावर मोहीम काढणे गरजेचे होते. शिवाय मराठा साम्राज्य उत्तरेत आणि दक्षिणेत वाढवणे यासाठी छत्रपती शाहूंनी कर्नाटकवर दोन स्वाऱ्या केल्या. त्या पुढील प्रमाणे –

● **चितळदुर्गची पहिली मोहीम (चित्रदुर्ग) :**

या मोहिमेचे नेतृत्व छत्रपती शाहूंचा मानस पुत्र अक्कलकोटचे जहागीरदार फत्तेसिंह भोसले यांच्याकडे होते. ही मोहीम नोव्हेंबर १७२५ ते मे १७२६ या कालावधीत चालू होती, यामध्ये फत्तेसिंह भोसले यांच्या मदतीसाठी त्रिंबकराव दाभाडे, प्रतिनिधी, रघुजी भोसले, सुलतानजी निंबाळकर आणि स्वतः पेशवा बाजीराव सहभागी झाला. बाजीरावाची कामगिरी महत्त्वपूर्ण ठरली. मराठा सैन्याने सातारा येथून कर्नाटककडे प्रयाण केले.गुत्तीहून मुरारराव घोरपडे मराठा सरदारास येवून वाटेत मिळाले. मराठ्यांची फौज पन्नास हजारांवर पोहोचली. इंदापूर, पंढरपूर, विजापूर, गुलबर्गा कोप्पलमार्गे मराठे १६ मार्च १७२६ रोजी चितळदुर्ग येथे पोहोचले. गेलेली ठाणी परत मिळवली. प्रदेशातील बाकी वसूली केली. छत्रपती शाहूंच्या आज्ञेप्रमाणे मराठा फौजेने सौंधे संस्थानास त्रास दिला नाही. त्यांनीही प्रत्येक वर्षी मराठ्यांना खंडणी देण्याचे मान्य केले. पावसाळ्यामुळे मराठ्यांनी २२ मे १७२६ रोजी मोहीम आवरती घेऊन सातारा गाठले.

● **श्रीरंगपट्ट्णची दुसरी मोहीम :**

बाजीराव पेशव्याच्या कारकीर्दीतील कर्नाटकातील मराठ्यांची ही दुसरी मोहीम होय. चित्रदुर्गवरून मराठे मागे फिरताच निजामाने फौज पाठवून कर्नाटकच्या प्रदेशात अत्याचार केले. त्यावेळी येथील जहागीरदारांनी छत्रपती शाहूंकडे मदत मागितली यामुळे छत्रपती शाहूंना कर्नाटकवर दुसरी मोहीम काढावी लागली.२३ ऑक्टोबर १७२६ मध्ये हिवाळ्यात पेशवे बाजीरावांच्या नेतृत्वाखाली मराठी फौज कर्नाटककडे रवाना झाली. बेळगाव, लक्ष्मेश्वर, बेदनूर मार्गे खंडण्या वसूल करत ४ मार्च १७२७ मध्ये श्रीरंगपट्टणमध्ये पोहोचली. मराठी फौजेने अकार्टच्या सादुल्ला खानाबरोबर मैत्री करार करून तंजावरच्या सरफोजी भोसले यांचे स्थान सुरक्षित केले. मराठ्यांना मोठी खंडणी मिळाली. शिवाय बाजीरावाने अनेक ठाणी मराठा साम्राजाच्या प्रभावाखाली आणली. व गुत्तीचे मुरारराव घोरपडे यांना मराठा मंडळात स्थान दिले. ही मोहीम अत्यंत फलदायी ठरली. यावेळी निजामाने चंद्रसेन जाधवामार्फत कोल्हापूरकर छत्रपती संभाजीस फतविण्यास सुरुवात केली. त्यामुळे छत्रपती शाहूंनी पेशवा बाजीरावाला परत बोलावले. पेशवा बाजीराव ही मोहीम आटोपती घेऊन एप्रिल १७२७ मध्ये साताऱ्यास परत आला.

● **कोल्हापूरकर छत्रपती संभाजी निजाम संयुक्त हालचाली :**

निजामाने छत्रपती शाहूंच्या विरोधात हालचाली सुरु केल्या. बाजीराव पेशव्याच्या कर्नाटकातील दोन्ही

मोहिमा म्हणजे आपल्या प्रदेशावरील घाला असल्याचे त्याला वाटत होते. म्हणून कोल्हापूरकर संभाजीशी संधान साधून छत्रपती शाहूंच्या राज्यात त्याने लष्करी हालचाली सुरू केल्या. बाजीराव व प्रमुख मराठा सरदार कर्नाटकात लढण्यात गुंतले असल्याचा फायदा घेऊन कोल्हापूरकर छत्रपती संभाजी व निजाम यांची संयुक्त फौज पुण्यावर चालून गेली. पुण्याच्या आजूबाजूचा प्रदेश उजाड बनवला. अशाप्रकारे निजामाने छत्रपती संभाजी यांच्या सहाय्याने मराठ्यांपुढे आव्हान निर्माण केले.

**● बाजीराव-निजाम पालखेडची लढाई (२५ फेब्रुवारी १७२८) :**

कोल्हापूरकर छत्रपती संभाजी व निजामाच्या संयुक्त हालचालीमुळे छत्रपती शाहू अडचणीत आले. यावेळी चिमाजी आप्पांनी छत्रपती शाहूंना सोबत घेऊन मराठी मुलखाचा दौरा केला. बाजीराव आपली कर्नाटक मोहीम अर्धवट टाकून आला आणि बाजीरावाने निजामाबरोबर गनिमीकावा पद्धतीने लढण्याचे ठरवले. यावेळी निजाम पुण्यात होता. बाजीरावाने पुण्यात न जाता निजामाच्या मुलखात हालचाली केल्या आणि जालना सिंदखेड लुटले. वऱ्हाडमध्ये शिरून माहूर व वाशिम लुटले आणि तापी नदी ओलांडून खानदेशात हालचाली सुरू केल्या. निजामाचा प्रदेश उद्ध्वस्त केला.

उत्तरेचा प्रदेश बाजीरावांनी लूटल्याने निजाम उत्तरेकडे निघाला. यावेळी बाजीरावांनी अशी हूल उठवली की आपण बऱ्हाणपूर उध्वस्त करणार आहे. त्यामुळे बऱ्हाणपूरच्या संरक्षणासाठी निजाम मोठा लवाजमा घेऊन निघाला पण बाजीरावाने आपणास फसवले हे जेव्हा निजामाच्या लक्षात आले तेव्हा निजामाने पुण्यावर चाल केली. बाजीरावाने निजामाचे वैजापूर गंगापूर परगणे लुटले. बाजीरावाला प्रतिकार करण्यासाठी निजाम निघाला मात्र २५ फेब्रुवारी १७२८ रोजी पालखेड येथे बाजीराव निजाम भिडले बाजीरावाने निजामास चहूबाजूंनी घेरले आणि रसद तोडली. निजामाने बाजीरावांच्या समोर शरणागती पत्करली. यावेळी निजाम व बाजीराव यांच्यामध्ये मुंगी शेवगावचा तह झाला.

**● मुंगी-शेवगावचा तह (६ मार्च १७२८) :**

१) निजामाने दक्षिणेच्या सहा सुभ्यांतून छत्रपती शाहूंचा चौथाई व सरदेशमुखीचा अधिकार मान्य करावा.

२) निजामाने कोल्हापूरकर संभाजीस मदत करू नये.

३) पंचगंगा व कृष्णा या नद्यांच्या दरम्यानच्या प्रदेशावर छत्रपती संभाजीचा हक्क राहील.

४) पुणे बारामती खेड या भागांमध्ये निजामाने जिंकलेला प्रदेश छत्रपती शाहूंना परत करावा.

५) दक्षिणेतील सहा सुभ्याचा कारभार मोगलानी मराठ्यांच्या सल्ल्यानुसार करावा. मोगलाचे हितसंबंध मराठ्यांनी जोपासावेत.

थोडक्यात मराठ्यांच्या चौथाई व सरदेशमुखीच्या हक्काला निजामाने मान्यता दिली. त्यामुळे बंडखोर मराठा सरदारांना चपराक बसली. मातब्बर निजामासारख्या सरदाराचा पराभव झाला.पेशवे बाजीरावांचा व मराठी सत्तेचा दरारा निर्माण झाला व मुघल सत्तेवर वचक निर्माण झाली.

● **पेशवे बाजीरावाचा उत्तरेकडील साम्राज्यविस्तार :**

**१) माळव्यावर स्वारी :**

उत्तरेकडील साम्राज्य विस्तारास काही जेष्ठ मराठा सरदारांचा बाजीरावाला विरोध होता. मात्र छत्रपती शाहूंची मर्जी असल्याने त्याचा मार्ग मोकळा झाला. रिकामी झालेली मराठी राज्याची तिजोरी भरून काढण्यासाठी वैयक्तिक हेवेदावे बाजूला ठेवून मराठी राज्याचा विस्तार करणे हे उद्दिष्ट ठेवून बाजीरावाने उत्तरेकडील स्वारी निश्चित केली. यामध्ये राणोजी शिंदे, उदाजी पवार, मल्हारराव होळकर या सारख्या मातब्बर सरदारांना घेऊन माळव्यामध्ये विस्ताराचे धोरण राबविले. गिरीधर बहाद्दर व त्याचा भाऊ दयाबहादुर या बंधूनी बादशहाकडून मदत मिळवून मराठ्यांना माळव्यातून हाकलून लावण्याचा चंग बांधला होता. मराठा सरदारांनी त्यास दाद दिली नाही. जयपूरचा सवाई जयसिंग व गिरीधर बहाद्दर यांच्यामध्ये शत्रूत्व होते. योग्य संधी मिळताच बंधू चिमाजी आप्पा व बाजीरावने वेगवेगळ्या मार्गांनी माळव्यामध्ये प्रवेश केला. गणपतराव मेहेंदळे, नारोशंकर, अंताजी माणकेश्वर, गोविंदपंत बुंदेले हे सरदार चिमाजी आप्पांसोबत तर बाजीरावांबरोबर पिलाजी जाधव, शिंदे, होळकर, पवार इत्यादी सरदार होते. दोघांनी परस्परांशी संपर्क ठेवला होता. माळव्यातील अनुकूल परिस्थितीचा फायदा उठवण्याचे मराठ्यांनी ठरवले.

● **आमझेऱ्याची लढाई (२९ नोव्हेंबर१७२८) :**

चिमाजीआप्पानी जलद हालचाली करून २९ नोव्हेंबर १७२८ रोजी 'आमझेरा' या ठिकाणी मुघल सुभेदार गिरीधर बहादुर यास गाठले.या दोघांमध्ये मोठी लढाई झाली. यामध्ये गिरीधर बहादुर व त्याचा बंधू दयाबहादुर दोघेही मारले गेले. मुघल सैन्याचा धुव्वा उडाला उदाजी पवारने मांडवगडचा किल्ला काबीज केला. बाजीरावाला आमझेऱ्याच्या विजयाची बातमी वाशिममध्ये समजली. दोघा बंधूंचे सर्वत्र नाव झाले. आणि साम्राज्यविस्तारचा महत्वपूर्ण टप्पा गाठला. त्यानंतर चिमाजी आप्पांनी माळव्यात प्रशासन व्यवस्था लावली आणि कोळी लोक,नंदलाला मंडलोई आणि इतरांच्या मदतीने मराठ्यांचा माळव्यात जम बसविला. अनेक ठाणेदारांकडून खंडणी वसूल केल्या. काही शहरांचा अपवाद वगळता सर्व माळव्यात मराठ्यांचे वर्चस्व निर्माण झाले.

● **बाजीरावाची छत्रसालला मदत व महंमदखान बंगशचा पाडाव :**

छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून बुंदेलखंडात छत्रसाल बुंदेलेने स्वतंत्र राज्य निर्माण केले. बुंदेलखंड मोगलांच्या अलाहाबाद सुभ्यात येत असल्यामुळे तेथील सुभेदार महंमदखान बंगशने छत्रसालवर आक्रमण केले आणि अनेक ठाणी काबीज केली. छत्रसालचा अनेक ठिकाणी पराभव केला. त्यामुळे छत्रसालने इ.स. १७२३ मध्ये जैतपूर येथील किल्ल्याचा आश्रय घेतला. त्यावेळी जैतपुर किल्ल्यालाही महंमदखान बंगशने वेढा घातला. त्याच्या कैदेत छत्रसाल सापडला. त्यावेळी त्यानी तिथूनच बाजीराव पेशव्याशी पत्रव्यवहार केला. छत्रसाल अडचणीत असल्याचे समजताच बाजीराव पेशव्यांनी २५ हजार घोडदलासह बुंदेल खंडामध्ये आला.३० मार्च १७२९ रोजी छत्रसालने आपली सुटका करून घेतली आणि बाजीरावांच्या भेटीस गेला. यावेळी त्याने मुघल सरदार महंमदखान बंगश याच्या विरोधात मोहीम आखली. महंमदखान बंगश जयपूर विजयाच्या धुंदीत होता. ३० मार्च १७२९ मध्ये बाजीरावाने जैतपुर किल्ल्यास वेढा दिला आणि महंमदखान बंगशची रसद तोडली. यावेळी

मोगल सरदार काशीमखान आपल्या वडिलांच्या मदतीस धावला, परंतु मराठ्यांनी त्याचा वाटेतच पराभूत केले. महंमदखान बंगशला दिल्लीवरून कुणाचीही मदत मिळाली नाही. त्याने बाजीराव पेशव्यांपुढे पुढे शरणागती पत्करली. इथून पुढे छत्रसालला कोणताही त्रास देणार नाही असे लेखी वचन त्याच्याकडून घेतले आणि त्याला सोडून देण्यात आले. या लढाईमध्ये बाजीरावाला घोडी, हत्ती व प्रचंड युद्धसाहित्य मिळाले.

बाजारावांने या लढाईत केलेल्या मदतीबद्दल छत्रसालने कृतज्ञता व्यक्त केली व आपल्या राज्याचा तिसरा भाग बाजीरावाला देऊ केला. यामध्ये काल्पी, सागर, झाशी, सिरोंज, कुंच व हर्देनगर या प्रदेशांचा समावेश होता. याच वेळी राजा छत्रसालकडून अतिसुंदर मस्तानी बाजीरावांला भेट देण्यात आली. या प्रदेशाची व्यवस्था चिमाजी आप्पाने लावली. यावर गोविंदपंत बुंदेले (खेर) ची नेमणूक केली.

● **दाभाडे प्रकरण :**

सेनापती खंडेराव दाभाडे यांचा मृत्यू २७ सप्टेंबर १७२९ रोजी झाला. त्यावेळी छत्रपती शाहूंनी त्यांचा मुलगा त्रिंबकराव दाभाडे यास ८ जानेवारी १७३० रोजी सेनापती पद दिले. बाजीराव पेशवा झाल्यानंतर त्यांनी पेशवे व सेनापतीपद ही दोन्ही पदे स्वतःकडे ठेवली. त्यावेळी छत्रपती शाहूंनी गुजरात व खानदेश हे सेनापतींचे कार्यक्षेत्र ठरवून दिले. त्यामुळे पेशव्यांच्या स्वाऱ्या गुजरातमध्ये होऊ लागल्या. गुजरातमध्ये मराठी सत्तेचे पाय रोवण्याचे काम दाभाडे, गायकवाड व कदमबांडे या सरदारांनी केले. सर बुलंदखान या मोगल सरदाराकडून चौथाई व सरदेशमुखीचे हक्क घेतले. छत्रपती शाहूंनी दाभाडे यांना गुजरातचा प्रदेश दिला असल्याने सहाजिकच बाजीरावांचे अतिक्रमण आहे असे दाभाडे सरदारांना वाटू लागले. याव्यतिरिक्त बाजीरावांच्या निजाम माळवा बुंदेलखंड या विजयामुळे दाभाडे बाजीरावाचा द्वेष करू लागला. त्रिंबकराव दाभाडे यांची बाजू सत्याची होती, मात्र बाजीरावविरोधी धोरणामुळे त्यांनी नंतर निजामाकडे संधान बांधले. ही बातमी छत्रपती शाहूंना लागताच त्रिंबकराव दाभाडे यांना आणण्यासाठी तळेगाव येथे त्यांनी आपली माणसे पाठवली. पण तो आला नाही. दरबारामध्ये दोघांना बोलवून त्यांची भांडणे मिटवण्याचा प्रयत्न छत्रपती शाहूंनी केला. पण तोही अयशस्वी झाला.

दाभाडे तळेगाववरून गुजरातकडे गेले आणि तिथून त्यांनी निजामाकडे मदत मागितली. या संधीचा फायदा घेऊन निजामाने त्रिंबकराव व फुटीर मराठा सरदारांना एकत्र केले. माळव्याचा सुभेदार महमद बंगश यालाही मदतीला घेतले. सर्वांना घेवून निजाम लष्करासह नर्मदेकडे निघाला. यावेळी बाजीरावांने दाभाडेंवरती बारीक लक्ष ठेवून या सर्वांना एकत्र येऊन देता फक्त दाभाड्यांचा निकाल लावणे जरूरीचे वाटले आणि चिमाजी आप्पासह बाजीराव निघाला. मुघल सुभेदार अभयसिंह याला निजामाची महत्वकांक्षा माहीत असल्यामुळे त्याने गुजरातबाबत सावध पवित्रा घेतला. बाजीरावासोबत मैत्री करून त्यांना मदत करण्याचे मान्य केले.

निजाम जेव्हा नर्मदेवर पोहोचला तेव्हा त्याने महमद बंगशबरोबर वाटाघाटी केल्या. त्रिंबकराव दाभाडे ३५ हजार सैन्यासह भिल्लापूरच्या मैदानावर लढाईच्या तयारीने उभा राहिला. बाजीरावाने पहिल्यांदा सामोपचाराचा मार्ग स्वीकारला, मात्र त्याला त्यात यश आले नाही.१ एप्रिल १७३१ रोजी बाजीराव-त्रिंबकराव एकमेकांवर तुटून पडले. लढाईच्या वेळी गोळी लागून त्रिंबकराव दाभाडे मारले गेले. बाजीरावाचा हा मोठा विजय होता. डभाईच्या (भिल्लापूर) पराभवानंतर दाभाडे यांची सत्ता कमकुवत झाली. मुघल सरदारांच्या हालचाली थंडावल्या. पेशवे

बाजीराव यांच्या आयुष्यात दाभाडे प्रकरण अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण निजामाने बाजीरावास एकटे पाडण्यात यश मिळवले होते. बाजीरावांनी निजामाचे हे कारस्थान उधळून लावले. नंतर छत्रपती शाहूंनी दाभाडे प्रकरणात लक्ष घालून पेशव्यांशी असलेले वैर संपवण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणांमध्ये दाभाडे घराणे मागे पडून इतर घराणी पुढे आली.

**● पेशवे बाजीराव–निजाम भेट (१७३२) :**

मराठ्यांच्या हालचालीस कसा पायबंद घालावा हे मोगल बादशहाला समजेनासे झाले. त्यावेळी सवाई जयसिंग व मिरबक्षी खानदौरान यांनी मराठ्यांबरोबर मैत्रीचे संबंध ठेवून मुघल साम्राज्याचे पतन थांबवावे असा सल्ला बादशहाला दिला. पण तो त्याला रुचला नाही. उत्तरेत अशाप्रकारे हालचाली होत असताना निजाम बाजीरावाच्या भेटीसाठी धडपडत होता. बाजीरावाने दाभाडेवरती मिळवलेला विजय पाहता निजामाने नमते घेण्यास सुरुवात केली आणि आपण एकमेकांच्या शेजारी असून आपल्यामध्ये कायम संघर्ष योग्य नाही अशा प्रकारची जाणीव निजामाने वारंवार अर्ज विनंत्या यांच्या माध्यमातून तसेच छत्रपती शाहूंच्या आग्रहाखातर २७ डिसेंबर १७३२ रोजी लातूरजवळ रोहेरामेश्वर येथे बाजीरावाने निजामाची भेट घेतली. बाजीरावाचे मोठे स्वागत झाले. ही बैठक गुप्त होती. चर्चेमध्ये असे ठरले कि, दक्षिणेत मराठा सरदारांनी चौथाई सरदेशमुखीशिवाय निजामाला त्रास देऊ नये. मराठ्यांच्या उत्तरेकडील साम्राज्यविस्तारास निजामाने कोणत्याही प्रकारची आडकाठी आणू नये. निजामाने मराठ्यांना खानदेशातून जाऊ द्यावे. मराठे खानदेशातून जात असताना मराठ्यांनी लुटालूट अथवा पिकाची नासाडी करू नये.

**● माळव्यामधील मराठ्यांच्या हालचाली :**

माळव्यामधून मराठ्यांना हाकलून लावण्याचा चंग सवाई जयसिंगाने बांधला होता. मराठ्यांच्या विरोधात रजपूत संघ निर्माण केला होता. यावेळी चिमाजी आप्पाने सलोखा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मात्र तो अयशस्वी झाला. जयसिंगाचे आव्हान चिमाजी आप्पाने स्वीकारले. युद्धाची तयारी करून आनंदराव पोवार या मराठी सेनानीने हल्ला करून जयसिंगाला घेरले. जयसिंगाला बादशहाची मदत मिळाली नाही. इ.स. १७३३ ला त्याचा पराभव झाला. वसूल केलेल्या रकमेशिवाय आणखी सहा लाख रुपये देऊन जयसिंगाने आपली सुटका करून घेतली. नंतरच्या काळात बादशहाने खानदौरान वजीर कमरुद्दीनखान यांच्या नेतृत्वाखाली दोन मोहिमा मराठ्यांविरोधात काढल्या. त्यावेळी मोगल सैन्याची संख्या दोन लाख होती.

महाराष्ट्रातून पेशवे बाजीराव व पिलाजी जाधव माळव्याकडे निघाले. होळकर, शिंदे सरदार माळव्यातच होते. त्यांनी मारवाड, मेवाड, जयपूरपर्यंतचा प्रदेश जिंकला. गनिमी कावा पद्धतीने मराठ्यांनी मोगलांना हैराण केले.२४ मार्च १७३५ रोजी मुघलांनी मराठ्यांना २२ लाख रुपये खंडणी दिली. थोडक्यात २० हजार मराठा सैनिकांनी दोन लाख सैन्य असलेल्या मुघल सैन्यावर अद्वितीय विजय मिळवला. ४ मार्च १७३६ मध्ये जयसिंगाने बाजीरावांची भेट घेतली. बादशहाच्या संमतीने बाजीरावाला जयपूरच्या सुभ्यातून प्रतिवर्षी पाच लाख रुपये देण्याचे कबूल केले. गुजरात व माळवा प्रांताच्या सनदा मिळवून देण्याचे आश्वासन दिले, परंतु बादशहाला हा मराठा रजपूत सलोखा मान्य झाला नाही.

**● बाजीरावाची दिल्ली स्वारी (१७३७) :**

इ.स. १७३७ च्या सुरुवातीला बाजीराव प्रचंड सैन्य घेऊन उत्तरेच्या मोहिमेवर निघाला. त्याने माळव्यात प्रवेश करून भोपाळ भेलसा या जाठांच्या प्रदेशात प्रवेश केला. चंबळ नदीपर्यंतचा प्रदेश ताब्यात घेणे मराठ्यांना शक्य झाले. बाजीरावाने शिंदे होळकर यांना गंगा यमुनेच्या दुआबाच्या प्रदेशात पाठवले. त्यांनी अनेक ठिकाणी हल्ले करून विजय मिळवला. बादशहाकडे माळवा, बनारस, अलाहाबाद व मथुरा हे हिंदुंची तीर्थक्षेत्र व दक्षिणेतील चौथाई सरदेशमुखी वसुली करण्याच्या हक्काची मागणी केली. बादशहाने ती फेटाळून लावली. मराठा सैन्यास विरोध करण्यासाठी १७३७ मध्ये सरदार सादतखान याची नेमणूक केली.

सादतखान व मल्हारराव यांच्यामध्ये लढाई झाली. यामध्ये मल्हाररावांचा पराभव झाला. त्याचा बदला घेण्यासाठी बाजीराव पेशव्याने दिल्लीवर धडक मारली.२९ मार्च १७३७ रोजी बाजीराव राजधानी दिल्लीजवळ येऊन पोहोचला. बाजीराव अचानक दिल्लीत आलेला पाहून मुघल दरबार गोंधळला. बादशहाने तातडीने निजाम व सादतखान यांना मदतीसाठी बोलावले. मोगलांनी युद्ध करण्याची तयारी केली. मात्र बाजीरावाने दिल्लीत दहशत निर्माण करून मुघलांचे प्रयत्न निष्फळ ठरवले. यावेळी सादतखान प्रचंड फौजेनिशी मुघल बादशहाच्या मदतीस येत असल्याचे समजल्यानंतर बाजीरावांनी दिल्लीचा वेढा उठवला आणि दक्षिणेकडे कूच केली.

**● भोपाळची लढाई (१७३८) :**

मराठ्यांच्या आक्रमणामुळे बादशहा हतबल झाला. त्याने निजामास उत्तरेकडे  तातडीने बोलाविले कारण दिल्लीचे राजकारण सावरण्यास हाच एक सक्षम सरदार असल्याचे बादशहाला वाटले. जुलै १७३७ मध्ये निजाम दिल्लीला पोहोचला. तोपर्यंत बाजीराव दक्षिणेकडे निघून गेला. बादशहने खास दरबार भरवून निजामाला 'आसफजहाँ' ही पदवी, एक कोटी रुपये व पाच सुभ्याचे अधिकार दिले. मराठ्यांच्या प्रतिबंधाची जबाबदारी निजामावर टाकण्यात आली. ही बातमी समजताच बाजीराव ऑक्टोबर १७३७ मध्ये उत्तरेकडे निघाला. निजामाचा मुलगा नासिरजंग दक्षिणेतून मोठे सैन्य घेऊन उत्तरेकडे आल्याची बातमी बाजीरावांला समजली. त्यावेळी बाजीरावांने चिमाजी आप्पाकडे नासिरजंगच्या बंदोबस्ताची जबाबदारी सोपवली. मराठा सैनिकांनी निजामास हुलकावणी देत भोपाळपर्यंत आणले. बाजीरावाने भोपाळला वेढा दिला. निजामाची रसद तोडली. त्याच्या मदतीस नासिरजंग येऊ शकला नाही. बाजीरावाने निजामाचा मोठा पराभव केला. पराभूत निजामाने ७ जानेवारी १७३८ रोजी दुराई सराई येथे बाजीरावासोबत तह केला. त्यानुसार निजामाने मराठ्यांना ५० लाख रुपये देण्याचे मान्य केले. नर्मदा ते यमुनेपर्यंतचा प्रदेश बादशाहाकरवी मराठ्यांना देण्याचे मान्य केले. निजामाला पूर्ण नष्ट करण्याची संधी बाजीरावांना आली होती, पण तसे झाले नाही. त्यामुळे पुढील काळात निजाम मराठ्यांचा डोकेदुखी ठरला.

**● इराणच्या नादिरशहाची हिंदुस्थानावर स्वारी (१७३९) :**

'नादीरकुली'या तुर्क सरदाराने महम्मुदखानला इराणच्या राजधानीतून हाकलून दिले. हा तुर्क सरदार म्हणजेच नादिरशहा होय. इ.स. १७३६ मध्ये तो इराणच्या गादीवर आरुढ झाला. हा मुघल बादशहाचाच सरदार होता. बादशहाने केलेल्या तक्रारीकडे त्याने कधी लक्ष दिले नाही. निजाम व सादतखान या मुघल सरदारांनी इराणच्या नादिरशहाला हिंदुस्तानात येण्याचे आमंत्रण दिले कारण नादिरशहाची मदत झाल्यास मराठ्यांचा बंदोबस्त करता

येईल असे त्यांना वाटले. एकेक प्रांत काबीज करत ७ मार्च १७३९ रोजी नादिरशहा दिल्लीत आला व त्याने दिल्ली जिंकली. इराणचा नादिरशहा १० मार्च १७३९ रोजी दिल्लीच्या सिंहासनावर बसला. दिल्लीत अत्याचार, लूट, जाळपोळ व बलात्कार सुरु झाले. दिल्ली सोडून जाताना त्याने प्रचंड लूट, कोहिनूर हिरा, मयूर सिंहासन, अनेक विविध अलंकार व कसबी कलाकार इराणला नेले. हे सर्व होत असताना बाजीराव पोर्तुगीजांसोबत लढण्यात गुंतला होता. बुऱ्हाणपूरजवळ नादिरशहा परत फिरल्याचे कळले त्यामुळे नादिरशहाच्या बंदोबस्ताचे काम अपूर्ण राहिले.

**● पेशवे बाजीराव – सिद्दी संघर्ष :**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालखंडापासून जंजिऱ्याच्या सिद्दीबरोबर मराठ्यांचा संघर्ष सुरू झाला. छत्रपती शिवाजी महाराजांनी सिद्दीचे दंडराजापुरी व जंजिरा ही ठाणी जिंकण्याचा प्रयत्न केला होता. मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या कालखंडात मराठ्यांना सिद्दीकडे लक्ष देता आले नाही, त्यामुळे त्याच्या ताब्यात असणारा जंजिरासारखा प्रबळ सागरी दुर्ग असल्याने तसेच इंग्रज व पोर्तुगीज यांची त्यास मदत मिळत असल्यामुळे सिद्दीस जिंकणे कठीण झाले होते. यामुळे सिद्दीचे सरदार मराठ्यांच्या प्रदेशात लूटमार, जाळपोळ करत असत व गुन्हेगारांना आश्रय देखील देत असत.

शिवकालापासून जंजिऱ्याच्या सिद्दीने मराठ्यांना त्रास देण्याचे धोरण स्वीकारले होते. मराठी सत्तेच्या सीमा समुद्रास भिडल्यापासून व मराठ्यांचे वर्चस्व सागरी किनारपट्टीवर निर्माण झाल्यापासून सिद्दी मराठ्यांचा कायमचा शत्रू बनला होता. पेशवे कालखंडामध्ये सिद्दी–मराठा संघर्षाने उग्र रूप धारण केले. बाजीराव निजाम व त्रिंबकराव दाभाडे यांचा बंदोबस्त करण्यास गुंतला असताना सिद्दीच्या सरदाराने मराठ्यांच्या कोकणातील प्रदेशावर हल्ले सुरू केले. त्यामुळेच सिद्दी व मराठा संघर्ष सुरू झाला.

मराठा व सिद्दी संघर्षाचे एक तत्कालीन कारण म्हणजे सावनूरच्या नबाबाच्या हत्तीचे निमित्त होय. ते असे, चिपळूणजवळील परशुराम येथे ब्रह्मेंद्रस्वामी वास्तव करून होते. ते परशुराम मंदिरात भक्ती करत असत. ब्रह्मेंद्रस्वामी इ.स. १७२६ मध्ये काही कामानिमित्त कर्नाटकात गेले. त्यावेळी नवाबाने सिद्दीला भेट दिलेला हत्ती आणण्याची जबाबदारी स्वामींनी स्वतःवर घेतली. ब्रह्मेंद्रस्वामी कर्नाटकातून परत येत असताना माखजनपर्यंत त्यांनी हत्ती सुखरूप आणला. यावेळी आंग्रे सरदारांनी स्वामींना अडवून धरले व वाहतूक परवाना मागितला. स्वामींकडे वाहतूक परवाना नसल्यामुळे जयगडच्या आंग्रे सरदारांनी हत्ती आपल्याबरोबर नेला. परिणामी सिद्दी सात यास मराठ्यांचा राग आला आणि ब्रह्मेंद्रस्वामी यांनीच काहीतरी निमित्त करून आपणास दिलेला हत्ती आंग्रेंच्या हाती मुद्दामच दिला असा समज करून त्याने परशुराम मंदिरावर हल्ला केला. मंदिर लुटले व भ्रष्ट करून टाकले. ही लष्करी कारवाई त्याने महाशिवरात्रीच्या दिवशी केली. या घटनेमुळे हिंदू समाजात संतापाची लाट उसळली. मराठे सरदार सिद्दीच्या या अत्याचारामुळे पेटून उठले आणि छत्रपती शाहूंकडे सिद्दीविषयी तक्रार केली. बाजीराव पेशवे दाभाडेच्या मोहिमेवरून परत आल्यानंतर त्यांनी सिद्दीवरील स्वारीची योजना आखली.

**● सिद्दीवरील स्वारीची योजना :**

इ.स. १७२९ मध्ये मराठा आरमार प्रमुख सरखेल कान्होजी आंग्रे यांचे निधन झाले. त्यांच्या जागी त्यांचा

मुलगा सेखोजी आंग्रे आरमार प्रमुख बनला. त्याची मदत घेऊन बाजीरावाने स्वारी करण्याचे निश्चित केले आणि अंजनवेल गोवळकोंडा या सिद्दीच्या ठाण्यांवर हल्ला करण्याची योजना आखली. तसेच स्वराज्याची राजधानी असणारा रायगड किल्ला इ.स.१६८९ पासून औरंगजेबाने सिद्दीच्या ताब्यात दिला होता. तो जिंकणे मराठ्यांना आवश्यक वाटत होते म्हणून सिद्दीवरील स्वारीची योजना आखली. पेशवे बाजीरावाने सेखोजी आंग्रे यांची भेट घेऊन सिद्दी विरोधात एकाच वेळी जमिनीवरून व समुद्रातून लढण्याचे निश्चित केले. मात्र छत्रपती शाहूंच्या दरबाराकडून थोड्या संथ हालचाली झाल्या, कारण पावसाळ्यामध्ये मोहीम सुरू केल्यामुळे हा हेतू साध्य झाला नाही तरीसुद्धा मंडणगड, बिरवाडी, निजामपुर, तळे, घोसाळे व नागोठाणे इत्यादी सिद्दीच्या ठाण्यांवर मराठ्यांनी आपला अंमल प्रस्थापित केला. जंजिऱ्यास बाजीरावाने वेढा घालून सिद्दीचे आरमार बुडवले.

८ जून १७३३ रोजी छत्रपती शाहूंनी प्रतिनिधीस रायगड घेण्यास पाठवले. त्यावेळी त्याने मोठा पराक्रम करून रायगड जिंकून घेतला. मराठ्यांची अस्मिता असलेला रायगड घेतल्याने मोठे उद्दिष्ट पूर्ण झाले. या मोहिमेबाबत मराठ्यांमध्ये एकवाक्यता नव्हती. रायगड प्रतिनिधीने जिंकल्यामुळे पुन्हा मराठा मंडळात वर्चस्व निर्माण होईल अशी भीती बाजीरावांला वाटत होती. यावेळी सेखोजी आंग्रे यांचा सरदार बकाजी नाईक याने अंजनवेल गोवळकोटच्या किल्ल्यास वेढा दिला. यामुळे सिद्दीसातने प्रतिनिधी यांच्या बरोबर बोलणे करून प्रतिनिधीकडे अंजनवेल व गोवळकोट देण्याची तयारी दाखवली. रायगड बरोबर ही ठाणी आपल्याला मिळाल्यास आपल्या लौकिकात भर पडेल असे वाटून त्याने बकाजी नाईकास गोवळकोटचा वेढा उठवण्यास सांगितले. बाजीरावाने सेखोजीस सांगून बकाजीस मागे बोलवले. बकाजी वेढा उठवून निघून गेल्यावर प्रतिनिधीस सिद्दीसातने गोवळकोट व अंजनवेल ही ठाणी दिली नाहीत आणि प्रतिनिधींची फसवणूक केली. सिद्दी सरदारांनी पुढील काळात पोर्तुगीज निजाम यांची मदत मिळवली. दरम्यान २८ ऑगस्ट १७३३ रोजी सेखोजी आंग्रे कुलाबा येथे मृत्यू पावले, त्यामुळे आंग्रे कुटुंबामध्ये कलह निर्माण झाला. बाजीरावांना सिद्दीवरील मोहीम फत्ते करता आली नाही. यामागे एकमुखी नेतृत्वाचा अभाव, पेशवे व प्रतिनिधी यांच्या मधील स्पर्धा, आंग्रे कुटुंबातील कलह अशी अनेक कारणे कारणीभूत ठरली.

**● चिमाजी आप्पांचा पराक्रम व सिद्दीचा बंदोबस्त :**

बाजीरावाने सिद्दीबरोबर तात्पुरता तह केला तरी परशुराम मंदिरावरील हल्ल्याचा सूड घेणे आणि अंजनवेल व गोवळकोट ही सिद्दीची ठाणी ताब्यात घेणे आवश्यक होते. आंग्रे घराण्यातील दुफळीचा फायदा घेऊन कुलाब्यावर आक्रमण करून तो घेण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू केल्या. बाजीरावाने आपला बंधू चिमाजी आप्पास सिद्दीवर चालून जाण्यास सांगितले. त्यावेळी त्याने २० मार्च १७३६ रोजी रेवासजवळ सिद्दीला गाठून सिद्दी सैन्याची कत्तल केली. यावेळी सिद्दी सातचा पराभव होऊन तो मारला गेला. सिद्दी याकूद जखमी झाला. परशुरामाचे मंदिर भ्रष्ट करणाऱ्या व ब्रह्मेंद्रस्वामीना त्रास देणाऱ्या सिद्दी साताला ठार मारून चिमाजी आप्पाने सूड उगवला. चिमाजी आप्पांच्या पराक्रमामुळे सिद्दी मराठ्यांच्या वर्चस्वाखाली आले. तुळाजी आंग्रेने अंजनवेल व गोवळकोट सिद्दीची ठाणी जिंकली. सिद्दीच्या ताब्यातील अकरा महालांपैकी साडेपाच महालांत मराठ्यांचे अधिकारी कारभार पाहू लागले.

● **बाजीराव व पोर्तुगीज यांच्यातील संबंध :**

इ.स. १४९८ मध्ये भारतात सर्व प्रथम पोर्तुगीज खलाशी वास्को-द-गामा याने पाऊल ठेवले. यानंतर अनेक पोर्तुगीज व्यापारी, व्यापारासाठी भारतामध्ये आले. किनारपट्टीच्या प्रदेशात गोव्यापासून दमणपर्यंतच्या प्रदेशात त्यांनी आपली ठाणी स्थापन केली. ठाणे, वसई ही पोर्तुगीजांची प्रबळ ठाणी होती. शिवकालापासून पोर्तुगीजांबरोबर मराठ्यांचा संबंध आला. पोर्तुगीजांनी मराठ्यांच्या प्रदेशात केलेल्या हालचालीमुळे मराठ्यांचा पोर्तुगीजांबरोबर संघर्ष होण्याची अनेक कारणे दिसून येतात ती म्हणजे, पाहिले बाजीराव यांचे साम्राज्य विस्ताराचे धोरण, कोकण किनारपट्टीच्या संरक्षणाचे धोरण, सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे ख्रिश्चन धर्मप्रसार होय. पोर्तुगीज अधिकाऱ्याने, ख्रिस्ती व्हा अन्यथा चालते व्हा. असा फतवा किनारपट्टीवरील गावांमध्ये काढला होता. याशिवाय ख्रिश्चन धर्म तत्वे आचरणात आणण्याची सक्ती केली होती. पोर्तुगीजांनी आधुनिक शस्त्रांची भीती दाखवून धार्मिक अत्याचाराचा कळस केला. अनेकांना ठार मारून त्या कुटुंबांना ख्रिस्ती धर्म स्वीकारण्यास भाग पाडले. हिंदू स्त्रियांवर भयानक अत्याचार केला. अनेक प्रदेशात हिंदू लोकांना गुलाम केले. हा अत्याचार हिंदु लोकांना सहन झाला नाही त्यामुळे गंगाई नाईक, रामचंद्र जोशी, अंताजी रघुनाथ व मालाड परिसरातील देशमुख, देशपांडे या लोकांनी छत्रपती शाहूंकडे पोर्तुगीजांविषयी तक्रारी केल्या.

सेखोजी आंग्रे मरण पावल्यानंतर आंग्रे घराण्यात सरखेल पदासाठी संघर्ष निर्माण झाला. यामध्ये पोर्तुगीजांनी भाग घेतला. संभाजीची बाजू पोर्तुगीजांनी घेतली तर बाजीरावाने मानाजीची बाजू घेतली. आंग्रे घराण्याच्या वारसा हक्कातून पोर्तुगीजांचा हस्तक्षेप सुरू झाला. वरील गोष्टी पोर्तुगीज संघर्षास कारणीभूत ठरल्या. इ.स. १७३२ च्या दरम्यान काउंट-डी-सॅन्डोमिन गोव्याचा गव्हर्नर होता. त्याने मराठ्यांच्या विरोधात आक्रमक धोरणाचा स्वीकार करून हिंदू धर्मियांच्यावर उघडपणे अत्याचार करण्यास सुरुवात केली. वाडीच्या सावंतांवर आक्रमण करून प्रदेशाची लुटालूट केली. मराठा वकीलास अपमानास्पद वागणूक दिली. मराठा सत्तेबाबतचे काउंट-डी-सॅन्डोमिन व लुई बोटॅल्ली यांचे धोरण संघर्षास कारणीभूत ठरले.

● **मराठा-पोर्तुगीज लष्करी संघर्ष :**

विठोजी जाधव व कृष्णाजी महादेव या मराठा सरदारांनी इ.स. १७३०-३१ मध्ये पोर्तुगीजांच्या विरोधात मोहीम काढली. त्यावेळी 'मनोहर' येथील युद्धात पोर्तुगीजांचा पराभव करून 'कॅम्बे' हे ठाणे जिंकून घेतले. पोर्तुगीजांनी मराठा सत्तेला शह देण्याच्या उद्देशाने, आपली संरक्षण व्यवस्था भक्कम करण्याच्या उद्देशाने ठाण्याच्या किल्ल्याचे बांधकाम सुरू केले. बांधकाम पूर्ण झाल्यावर मराठ्यांना या प्रदेशात अंमल बसवणे शक्य होणार नाही हे ओळखून बाजीरावाने २६ मार्च १७३७ रोजी चिमाजी आप्पासह मराठा सैन्याने ठाण्यावर लष्करी मोहीम काढून किल्ला आपल्या ताब्यात घेतला आणि किल्ल्याचे बांधकाम पूर्ण केले. यावेळी साष्टी परिसरातील अनेक ठाणी मराठ्यांनी ताब्यात घेतली.

वसईचा किल्ला हा पोर्तुगीज सत्तेचे प्रबळ ठाणे होते. ठाण्याचा किल्ला मराठ्यांच्या ताब्यात आल्यानंतर शंकराजी फडके यांनी वसईचा किल्ला जिंकण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांना यात यश आले नाही. त्यानंतर पेशवे बाजीरावाने नोव्हेंबर १७३८ मध्ये पवार, शिंदे, होळकर यांना बरोबर घेऊन चिमाजी आप्पांच्या नेतृत्वाखाली

माहीम व धारावी येथे पोर्तुगीजांविरोधी मोहीम सुरू केली. मराठ्यांचे संभाव्य आक्रमण लक्षात घेऊन पोर्तुगीजांनी लढण्याची तयारी केली. रसद जमा करून ठेवली. शिवाय इंग्रजांचे सहाय्य मिळवण्याचा प्रयत्न केला. मराठ्यांनी माहीमवर हल्ला केला. त्यावेळी 'पेट्रो डिमेलो' याने ठाण्याच्या किल्ल्यावर चढाई करण्याचा प्रयत्न केला. होळकरांबरोबर झालेल्या संघर्षात तो मारला गेला. चिमाजी आप्पाने ९ जानेवारी १७३९ रोजी माहीम ताब्यात घेतले. यामुळे मराठ्यांना स्फूर्ती मिळाली. यानंतर तारापुर, धारावी, डहाणू, चिंचणी व शिरगाव इत्यादी प्रदेश मराठ्यांच्या ताब्यात आला. वसई हे महत्त्वपूर्ण ठाणे मिळवण्यासाठी मराठ्यांनी तिकडे लक्ष दिले.

**● वसईचा वेढा (१७३९) :**

७ फेब्रुवारी १७३९ रोजी चिमाजी आप्पाने वसईच्या किल्ल्याला वेढा दिला. चिमाजी आप्पाने व्यंकटराव घोरपडे यांना पोर्तुगीजांच्या गोवा या ठाण्यावरून वसईला मदत मिळू नये म्हणून गोव्यास पाठवले. घोरपडेंनी गोव्यावर आक्रमण करून आसपासचा प्रदेश उजाड बनवला. मडगाव परिसरात पोर्तुगीजांना सळो कि पळो करून सोडले. गोव्याचा बराच प्रदेश जिंकून गव्हर्नरास जेरीस आणले. यामुळे गोव्याहून वसईला मदत मिळू शकली नाही. चिमाजी आप्पाने वसईचा किल्ला जिंकण्याचा प्रयत्न केला, किल्ल्यावर मराठ्यांनी लावलेल्या सुरुंगामध्ये पोर्तुगीज किल्लेदार 'सिल्व्हेरा' मारला गेला. त्याचा मदतनीस 'परेरा' याने वसई किल्ला निकराने लढवला. मराठा सैन्याने किल्ल्याच्या उत्तरेच्या तटाला सुरुंग लावून किल्ल्याची तटबंदी उध्वस्त केली. यामध्ये काही मराठा सैनिक ही मृत्युमुखी पडले. पोर्तुगीजांची इतर ठाणी जिंकण्यासाठी गेलेली मराठा फौज चिमाजी आप्पास येऊन मिळाली. मराठ्यांनी किल्ल्यावर जोराचा हल्ला चढवला. मराठ्यांपुढे आता आपली धडगत नाही हे ओळखून किल्लेदार परेरा याने किल्ल्यावर शरणागतीचे पांढरे निशाण फडकवले. अशा रितीने ४ मे १७३९ रोजी वसई किल्ला मराठ्यांच्या ताब्यात आला. मराठा पोर्तुगीज यांच्यात तह घडून आला.

**● वसईचा तह (५ मे १७३९) :**

१) पोर्तुगीज सैनिक, लोक व स्त्रिया यांना सन्मानाने किल्ल्याबाहेर जाऊ द्यावे.

२) पोर्तुगीज जोपर्यंत किल्ला खाली करत नाहीत, तोपर्यंत मराठ्यांनी किल्ल्यात प्रवेश करू नये.

३) वसईतील ख्रिश्चन लोकांना आपल्या कुटुंबासह इतर ठिकाणी जाण्याची मुभा मराठ्यांनी द्यावी.

४) वसईतील ख्रिस्ती कुटुंबांना मराठ्यांनी त्रास देऊ नये.

५) वसईतील ख्रिश्चन चर्चना कोणतीही झळ पोहोचू देऊ नये.

६) वसई बंदरातील पोर्तुगीजांची जहाजे सुरक्षित जाऊ द्यावीत.

७) एकमेकांची युद्धकैदी परत करावेत.

८) तहातील अटी पूर्ण होईपर्यंत एकमेकांकडे वकील ठेवावेत.

● **तहाचे महत्त्व :**

या विजयामुळे मराठ्यांचे उत्तर-दक्षिण कोकणामध्ये वर्चस्व प्रस्थापित झाले. मोठा प्रदेश विस्तार झाला. अनेक गडकोट, गिरीदुर्ग, खेडी आणि महत्वाची ठाणी मराठ्यांना मिळाली. यामध्ये पोर्तुगीजांचे मोठे नुकसान झाले. पश्चिम किनारपट्टीवरील सिद्दी व इंग्रज या सत्तांना प्रचंड दहशत बसली. दमणचे ठाणे वगळता मराठ्यांनी पोर्तुगीजांची उत्तर कोकणातील सत्ता नामशेष केली. गोवा प्रदेशातून मराठ्यांना वार्षिक खंडणी पोर्तुगीजांकडून मिळू लागली. मराठ्यांना युद्ध नुकसान भरपाई म्हणून एक लाख ६० हजार मिळाले. या युद्धाने मराठ्यांची प्रतिष्ठा वाढली, मराठ्यांचे सागरी प्रभुत्व सिद्ध झाले.

● **नासिरजंगचा पाडाव (१७४०) :**

मुंगी-शेवगावच्या तहातील काही अटींची पुर्तता निजामाकडून झाली नव्हती. निजाम दिल्लीत होता. दक्षिणेकडील प्रदेशाची व्यवस्था निजामाने नासिरजंग या मुलाकडे सोपवली होती. नासिरजंगने पेशव्याच्या प्रदेशात लुटालूट केली होती. चिमाजी आप्पा व बाजीरावाने सातत्याने त्याचा पाठलाग केला. शेवटी औरंगाबादमध्ये त्याने आश्रय घेतला असता त्याची रसद बाजीरावाने तोडली. परिणामी उपासमारीने तो शरण आला. अशा रीतीने ही स्वारी यशस्वी ठरली.

● **बाजीरावचा मृत्यू (२८ एप्रिल १७४०) :**

बाजीराव उत्तरेकडे जाण्यापूर्वी त्यांने चिमाजी आप्पास पुण्यास पाठवले. बाजीराव मस्तानी प्रेम प्रकरणामुळे पेशवे कुटुंबात कलह निर्माण झाला होता. त्यामध्ये तेल ओतण्याचे काम कर्मठ समाजाने केले. चिमाजी व नानासाहेब यांनी मस्तानीला कैदेत टाकले. उत्तरेमध्ये गेलेल्या बाजीरावाला दक्षिणेची बातमी बरेच दिवस आली नव्हती. तरीही बाजीरावाने नानासाहेबाला मस्तानीस कैदेतून मुक्त करावे अशी विनंती केली होती. बाजीरावाला आपल्या प्राणप्रिय मस्तानीस आपण सोडवू शकत नाही यांचे दुःख झाले; त्याला मोठा मानसिक धक्का बसला. त्यामध्ये त्याला ताप येण्यास सुरुवात झाली आणि दिनांक २८ एप्रिल १७४०रोजी नर्मदा काठी 'रावेर' या ठिकाणी बाजीरावाचा मृत्यू झाला. मृत्यूसमयी काशीबाई व मुलगा जनार्दन हे उपस्थित होते.

● **स्वयं अध्ययन प्रश्न - ३**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) छत्रपती शाहूंनी बाजीराव पहिले यास पेशवे पदाची वस्त्रे कोठे दिली ?

२) पेशवे बाजीरावाने बुंदेलखंडात कोणास मदत केली ?

३) भोपाल येथे बाजीरावाने कोणाचा पराभव केला ?

४) चिमाजी आप्पास छत्रपती शाहूंनी कोणती पदवी दिली ?

## १.३ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

प्रश्न १ (अ)

१) दोराह २) पन्हाळा ३) संभाजी ४) सातारा

प्रश्न १ (ब)

१) चंद्रसेन जाधव २) १२ ऑक्टोबर१७०७ ३) खुलदाबाद ४) परशुराम पंतप्रतिनिधी

प्रश्न २ (अ)

१) सेनाकर्ते २) भट ३) चंद्रसेन जाधव ४) मांजरी

प्रश्न २ (ब)

१) बाळाजी विश्वनाथ २) कृष्णराव खटावकर ३) सरखेल ४) सासवड

प्रश्न ३ (अ)

१) मसूर २) छत्रसाल ३) निजाम ४)पंडित

## १.४ सारांश :

छत्रपती शाहू व महाराणी ताराबाई संघर्षात मराठ्यांचे प्रचंड नुकसान झाले. मराठा मंडळाच्या निर्मितीमुळे मराठा सरदारांत स्वार्थ निर्माण झाला. मराठा स्वातंत्र्ययुद्धामुळे सत्ता संघर्षासाठी प्रयत्न झाले.यातूनच पेशवाईचा उदय झाला. यामध्ये बाळाजी विश्वनाथ आणि बाजीराव पेशवे पहिले यानी प्रचंड साम्राज्य विस्तार करून स्वतःचे आणि पेशवाईचे महत्त्व वाढविले. बाळाजी विश्वनाथांनी चौथाई सरदेशमुखीच्या सनदा मिळवून तिजोरीत भर टाकली. बाळाजी अतुल पराक्रमी सेवक होता. छत्रपती शाहूंसाठी त्याने फौज उभा केली आणि बंडखोर सरदारांना वटणीवर आणले. पेशवे बाजीराव पहिले त्यांनी केलेली कामगिरीचं त्यांची महती देते. पेशवे बाजीराव पहिले उत्कृष्ट सेनापती होते. युद्धकलेच्या बाबतीत त्यांची बुद्धी चलाख होती. बाजीरावाने पालखेड युद्ध, भोपाळ विजय, महमद बंगशवरील विजय, दिल्ली स्वारीमधून त्यांच्या नेतृत्व गुणांची साक्ष पटते.

## १.५ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा ( दीर्घोत्तरी प्रश्न )**

१) छत्रपती शाहू- ताराबाई यांच्यातील यादवी स्पष्ट करा.

२) मराठा सत्तेतील बाळाजी विश्वनाथांचे योगदान स्पष्ट करा.

३) पेशवे बाजीराव पहिले यांच्या विस्तारवादी धोरणाचा आढावा घ्या.

४) पेशवे बाजीराव पहिले व निजाम यांच्यातील संबंध स्पष्ट करा.

**ब) टिपा लिहा (लघुत्तरी प्रश्न)**

१) बाळाजी विश्वनाथ

२) मराठा राज्यसंघ

३) वारणेचा तह

४) पालखेडचे युद्ध

५) चिमाजी आप्पा

## १.६ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१) M.G.Ranade : Rise of the Maratha Power.

२) Brij Kishore : Tarabai and his times.

३) जयसिंगराव पवार : महाराणी ताराबाई, मराठा साम्राज्याचा उदय आणि अस्त.

४) प्र. न. देशपांडे : मराठी सत्तेचा उदय आणि उत्कर्ष.

५) स. मा. गर्गे : करवीर रियासत.

६) गो. स. सरदेसाई : मराठी रियासत खंड - ३ व ४.

७) आसाराम सैंदाणे : छत्रपती थोरले शाहू महाराज (सातारा) (१६८२-१७४९).

८) डॉ. आप्पासाहेब पवार : ताराबाईकालीन कागदपत्रे खं १, २, ३.


❖❖❖

# घटक – २

# बाळाजी बाजीराव आणि पानिपतची तिसरी लढाई
## (१४ जानेवारी १७६१)

अनुक्रमणिका :

२.० उद्दिष्टे –

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ जीवन चरित्र

२.२.२ आंग्रेशी संबंध

२.२.३ रघुजी भोसलेबरोबरचा संघर्ष

२.२.४ पानिपतची तिसरी लढाई – १४ जानेवारी १७६१

२.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

२.४ स्वयं अध्ययन प्रश्न व प्रश्नांची उत्तरे

२.५ सारांश

२.६ सरावासाठी प्रश्न

२.७ संदर्भ ग्रंथ यादी

## २.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला–

- बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब यांच्याबद्दल माहिती सांगता येईल.
- या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला बाळाजी बाजीरावचा प्रामाणिकपणा व उत्तम प्रशासन कौशल्याची माहिती मिळेल.
- या घटकाच्या अभ्यासानंतर बाळाजी बाजीरावांच्या सुरुवातीच्या स्वाऱ्यांची सन १७४० ते १७४८ या कालखंडातील स्वाऱ्यांची माहिती मिळेल.

- बाळाजी बाजीराव व आंग्रे यांच्यातील संबंध स्पष्ट करता येईल.
- रघुजी भोसले प्रकरण काय आहे? हे समजण्यास मदत होईल.
- पानिपतच्या तिसऱ्या लढाईची (१४ जानेवारी १७६१) कारणे स्पष्ट करता येतील.
- या घटकाच्या अभ्यासानंतर आपणाला पानिपतच्या युध्दाचे वर्णन, लढाईतील प्रमुख घटना, मराठ्यांचा पराक्रम इत्यादींची माहिती मिळेल.
- पानिपतच्या तिसऱ्या लढाईचे (१४ जानेवारी १७६१) परिणाम स्पष्ट करता येतील.

## २.१ प्रस्तावना :

मराठ्यांच्या इतिहासामध्ये पेशवेकाळाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पेशवे काळ म्हणजे मराठी राज्याच्या विस्ताराचा काळ मानला जातो. पेशवाईची सुरुवात सन १७१३ पासून झाली. ही एक क्रांती मानावी लागेल. कारण पिंगळे घराण्याकडून भट घराण्याकडे पेशवाई आली. या दृष्टीने पेशवे कालखंड एक महत्त्वपूर्ण कालखंड होता. पेशव्यांनी मराठ्यांची राजधानी पुणे या शहराचा मूलभूत पाया तयार केला. पेशव्यांच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय व धार्मिक निर्णयांचा एकूणच महाराष्ट्राच्या समाज जनजीवनावर परिणाम झाला. साधारणपणे सन १७१३ ते १८१८ हा पेशवाईचा कालखंड मानला जातो. या काळामध्ये अनेक पेशव्यांनी आपली कर्तबगारी दाखवली. मराठी सत्तेचा मोठा विस्तार केला. मराठ्यांचे वर्चस्व दक्षिण व उत्तर भारतात निर्माण केले. मराठ्यांची राजधानी पुणे म्हणजे महाराष्ट्राचे भूषण मानावे लागेल. नानासाहेबांनी मनगटी बळाचा वापर करण्यापेक्षा बुद्धीचातुर्याच्या जोरावर आपली राजवट दैदिप्यमान केली.

पेशव्यांनी मराठी सत्तेचा विस्तार करत असताना प्रामाणिकपणा, सचोटी, लढवय्येपणा, जिद्द, चिकाटी, आत्मविश्वासाच्या जोरावर नवीन सरदार घराणी उदयास आणली. या सरदार घराण्यांचा देशाच्या स्वातंत्र्यासाठी, सुरक्षिततेसाठी व मराठी राज्याच्या विस्तारासाठी उपयोग करून घेतला. मराठ्यांच्या इतिहासामध्ये 'सरदारकीने काम करावे' या धोरणानुसार नानासाहेब पेशव्यांनी मराठी साम्राज्याचा विस्तार दिल्लीपासून ते श्रीरंगपट्टण आणि बंगालपासून गुजरातपर्यंत केलेला दिसून येतो. त्यांनी खऱ्या अर्थाने मराठी सत्तेचा जरीपटका अटकेपार पोचवला. तसेच दक्षिणेकडील शत्रू प्रामुख्याने निजाम, हैदरअली व नबाबांचा बंदोबस्त केला. त्यांच्याकडून चौथाई, सरदेशमुखी वसूल केली. याचा उपयोग आपल्या राज्यातील विविध सुधारणा, लष्कर खर्च व सुरक्षितता यावर केला. याचबरोबर उत्तरेकडील मोघल असोत, रोहिले असोत अथवा इतर जाट, रजपूत या विरोधकांचाही त्यांनी बंदोबस्त केला व मराठी सत्तेला नावारूपाला आणले. नानासाहेब पेशवे हे लढवय्यापेक्षा उतम प्रशासक होते. मराठ्यांच्या इतिहासामध्ये राजकारण धुरंधर आणि प्रशासक म्हणून ओळखला जाणारा पेशवा होता. नानासाहेब पेशव्याला सन १७४० ते १७६१ असा २१ वर्षांचा काळ मिळाला. या २१ वर्षांच्या काळामध्ये नानासाहेबांनी छत्रपती शाहूंचा विश्वास संपादन केला. एवढेच नव्हे तर मराठी सत्तेचा मोठा विस्तार केला.

## २.२ विषय विवेचन :

### २.२.१ जीवन चरित्र –



पेशवा बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब

२८ एप्रिल १७४० रोजी नर्मदा नदीकाठी रावेरखेड येथे पहिला बाजीराव पेशवे यांचा मृत्यू झाला. त्याच वर्षी १७ डिसेंबर १७४० रोजी चिमाजी आप्पा यांचे पुण्यात निधन झाले. बाजीराव पेशव्याला तीन मुले. पहिला बाळाजी, दुसरा रघुनाथराव आणि तिसरा मस्तानीपासून झालेला समशेर बहाद्दूर. या सर्वांमध्ये छत्रपती शाहूंना बाळाजी हा अत्यंत कुशाग्र बुध्दीचा, व्यवहार चतुर, प्रामाणिक आणि मनमिळाऊ वाटला. त्यामुळेच छत्रपती शाहूंनी दि. २५ जून १७४० रोजी बाळाजी बाजीरावाला पेशवेपदाची वस्त्रे दिली. १९ वर्षांचा बाळाजी बाजीराव मराठेशाहीतला तिसरा पेशवा होय. पुढील काळात तो नानासाहेब पेशवे या नावाने ओळखला जाऊ लागला. त्यांचे पूर्ण नांव बाळाजी बाजीराव भट्ट असे होते. त्याचा जन्म १२ डिसेंबर १७२१ रोजी नाणेमावळ साते जि. पुणे येथे झाला. चुलते चिमाजी आप्पाच्या देखरेखीखाली त्याचे शिक्षण पूर्ण झाले. वडील बाजीराव पेशवेच्या राजकारण व युध्दाचा त्याला अनुभव होता. त्यांच्यात व्यवहार चातुर्य व मुत्सद्दीपणा हे गुण होते.

**● पेशवाई :**

२५ जून १७४० रोजी बाळाजींना पेशवाईची वस्त्रे मिळाली. यावेळी बाळाजींचे वय अवघे १९ वर्षे इतकेच होते. या वेळेपर्यंत पेशवेपद वंशपरंपरागत बनले होते. पण तेवढेच अत्यंत महत्त्वाचे बनले होते. पहिल्या बाजीरावाने आपल्या कारकिर्दीत केलेल्या विजयी लढायांमुळे मराठा सत्तेचा प्रसार भारतात दूरपर्यंत होऊन मराठ्यांचा सर्वत्र दबदबा निर्माण झाला होता. आपल्या या पराक्रमाने बाजीराव पहिला हाच मराठेशाहीचा वास्तविक प्रमुख बनला होता व त्यामुळे वडिलांनी केलेल्या कार्याची मोठी जबाबदारी बाळाजींवर येऊन पडली होती. एवढेच नव्हे तर पेशवाईचा विकास करण्याची महत्त्वाची जबाबदारी आपोआपच बाळाजींच्या खांद्यावर आली होती व ती त्यांनी सक्षमपणे पार पाडली होती.

**● मुत्सद्दीपणा व उत्तम प्रशासन :**

भारताच्या इतिहासामध्ये बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवा यांना प्रशासकीय पेशवा म्हणूनही ओळखले जाते. चिमाजीआप्पांच्या देखरेखीखाली त्यांचे शिक्षण झाले होते. लहानपणापासूनच त्यांना राजकारणाचा जवळून अभ्यास करण्याची संधी मिळाली. पहिल्या बाजीरावांच्या अनेक मोहिमांसंदर्भात त्यांना माहिती होती. अनेक युध्दात त्यांनी भाग घेतला होता. त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळे त्यांनी सर्वांची मने जिंकून घेतली होती. पहिल्या बाजीरावांसारखी शौर्यवृत्ती जरी त्यांच्याजवळ नसली तरी व्यवहारचातुर्य प्रचंड होते. आपल्या कारकिर्दीत युध्द मोहिमांवर न जाता आपल्या बुध्दीने व मुत्सद्दीपणानेच त्यांनी अनेक लढाया जिंकल्या

व मराठी सत्तेचा साम्राज्य विस्तार केला. एवढेच नव्हे तर त्यांनी शेती, उद्योग, व्यापार व महसूल या क्षेत्रात महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या. पहिल्या बाजीराव पेशव्यांच्या काळात सतत केलेल्या युध्दामुळे सावकारांचे प्रचंड कर्ज झाले होते. या कर्जाची परतफेड बाळाजी बाजीरावाने केली होती.

**● विरोध :**

बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब यांना पेशवेपद मिळू नये म्हणून रघुजी भोसले व बाबुजी नाईक यांनी खूप प्रयत्न केले. बाबुजी नाईक बारामतीकर यास स्वतःला पेशवा व्हायचे होते. तर रघुजी यांचे प्रत्यक्ष नातेसंबंध शाहू महाराजांशी होते. बाबुजी नाईक सावकार असल्याने पुढे मागे पेशव्याचे कर्ज फेडेल व आपल्या मर्जीतील व्यक्ती पेशवेपदावर विराजमान होईल असे बाबूजीला वाटत होते. तर छत्रपती शाहू निसंतान असल्यामुळे आपल्या मुलाला त्यानी दत्तक घ्यावे, अशी रघुजीची इच्छा होती व त्यासाठी आपल्या बाजूचा विचार करणारा पेशवा असावा असे रघुजी भोसले यांना वाटत होते. त्यामुळेच रघुजी भोसले यांनी बाळाजी बाजीरावला पेशवेपद मिळू नये, यासाठी प्रयत्न केला होता. परंतु छत्रपती शाहुंनी या सर्व प्रयत्नांना तिलांजली देऊन वंशपरंपरागत हक्काची कल्पना मान्य करून बाळाजी बाजीराव यांना पेशवेपदाची सूत्रे दिली.

**● नानासाहेबांची कारकिर्द :**

बाळाजी बाजीरावच्या कारकिर्दीचे दोन भाग पडतात. ते खालीलप्रमाणे-

सन १७४० ते १७४९ - भाग १

सन १७४९ ते १७६१ - भाग २

या पहिल्या काळामध्ये नानासाहेबांनी उत्तरेकडे एकूण चार स्वाऱ्या केल्या.

**१) माळवा स्वारी (२३ नोव्हेंबर १७४०)**

पहिल्या बाजीरावाने माळव्याची सनद मिळविण्यासाठी उत्तरेकडे मोहीम काढली. उत्तरेत राजपूतांच्या सहाय्याने आपले वर्चस्व निर्माण करणे हा विचार नानासाहेबांचा हेतू होता. यासाठी त्यांनी जयसिंगाची भेट घेतली. दक्षिणेतील मराठ्यांचा शत्रू निजाम याच्या कूटनितीस शह देणे या उद्देशाने नानासाहेबांनी चुलते चिमाजीआप्पाला बरोबर घेऊन नोव्हेंबर १७४० मध्ये उत्तरेची मोहीम आखली. दरम्यान १७ डिसेंबर १७४० रोजी चिमाजी आप्पांचा मृत्यू झाला. याच दरम्यान हैदराबादचा प्रमुख निजाम-उल्-मुल्कची दिल्ली दरबारातील स्थिती गंभीर झाली होती. त्याने इराणचा शासक नादिरशहाबरोबर केलेल्या कट कारस्थानामुळे मोघल बादशहाचे त्याच्याविषयीचे मत कलुषित झाले होते. अशातच निजामाचा मुलगा नासिरजंगने आपल्या वडिलांविरुध्द बंड केले. या संधीचा फायदा नानासाहेबांनी घेतला. १७ जानेवारी १७४१ रोजी पूर्णा नदीकाठी एदलाबाद येथे नानासाहेब-निजाम भेट झाली. उत्तरेतील राजकारणासाठी निजामाने विरोध करू नये म्हणून नानासाहेबांनी निजामाला नासिर जंगचे बंड मोडून काढण्यासाठी आश्वासन दिले. हीच नानासाहेब पेशव्यांची माळवा सनद मिळविण्यासाठी केलेली उत्तर स्वारी होय.

### २) बंगालची स्वारी (१८ डिसेंबर १७४१) :

नानासाहेबांनी उत्तर भारतातील दुसऱ्या मोहिमेची मोठी तयारी केली. बुंदेलखंड लष्करीदृष्ट्या महत्त्वाचे होते. यामुळे माळव्यालाही सुरक्षितता मिळणार होती. तसेच गंगा, यमुना नद्यांमधील दुआबचा प्रदेश येथे मराठ्यांचे वर्चस्व निर्माण होणार होते. यातूनच बंगालसारख्या सधनसुभ्यावर वर्चस्व ठेवण्यासाठी नानासाहेबांनी दुसरी स्वारी हाती घेतली. यामध्ये नानासाहेब पेशवे, रघुजी भोसले यांच्यात संघर्ष झाला होता.

### ३) भेलसा स्वारी (२० नोव्हेंबर १७४४-४५)

नानासाहेब पेशव्यांनी उत्तरेत तिसरी मोहीम काढली. याचे मुख्य कारण म्हणजे बुंदेल खंडामधील मराठ्यांचे चौथाई वसुलीचे हक्क मजबूत करण्यासाठी नानासाहेबांनी झाशी आणि सागर या ठिकाणी मराठ्यांची लष्करी ठाणी उभी केली. राणोजी शिंदे या मराठी सरदाराने महंमदखानाशी मोठा मुकाबला केला आणि १७४५ मध्ये भेलसा जिंकून घेतले. अशा रितीने नानासाहेबांनी बुंदेलखंड, चंदेरी, जोधपूर, दत्तीया, पन्ना, कालिंजर या सत्ताधीशांवर वचक बसविला व या सत्ताधिशांवर अंकुश ठेवण्यासाठी शिंदे-होळकर यांच्याकडे नेतृत्व दिले.

### ४) नेवाईची स्वारी (१७४८)

नानासाहेबांनी मराठी सत्तेचा साम्राज्य विस्तार करण्यासाठी रजपूतांशी सलोख्याचे संबंध ठेवले. धोलपूर येथे सवाई जयसिंगची भेट घेतली. परंतु मराठ्यांनी रजपूतांच्या अंतर्गत प्रश्नात हस्तक्षेप केल्यामुळे रजपूत हे मराठ्यांचे कट्टर शत्रू बनले. ३ ऑक्टोबर १७४३ रोजी जयपूरचा मुख्य सत्ताधीश सवाई जयसिंगचा मृत्यू झाला. त्याला ईश्वरसिंग व माधोसिंग ही दोन मुले होती. थोरला मुलगा ईश्वरसिंगाने स्वतःला जयपूरचा सत्ताधीश म्हणून बादशहाची मान्यता मिळविली. दरम्यान सन १७१० मध्ये पुष्कर करारानुसार राज्याचा वारस उदयपूर घराण्यातील मुलास मिळावा असे ठरले होते. त्यामुळे माधोसिंगाने जयपूरच्या गादीवर हक्क सांगितला. यातूनच ईश्वरसिंग व माधोसिंग यांच्यात संघर्ष सुरू झाला. या संघर्षात ईश्वरसिंगांने शिंदे होळकर यांना ३ लाख रुपये दिले व मदत घेतली आणि माधोसिंगाचा पराभव केला. दरम्यान सन १७४५ शिंदे घराण्यातील मुख्य पुरुष राणोजी शिंदेचा मृत्यू झाला. त्यानंतर शिंदे घराण्याची सूत्रे जयाप्पा शिंदेकडे गेली. मात्र शिंदे-होळकर यांच्यात पूर्वीसारखे ऐक्य टिकले नाही. त्यांच्यातील फुटीचा फायदा माधोसिंगाने घेतला आणि मल्हाररावांना ६५ लाख रुपये देऊन आपल्या बाजूला वळविले तर ईश्वरसिंगाने जयाप्पा शिंदेची मदत घेतली. अशा प्रकारे रजपूत प्रकरणात स्वार्थापोटी मराठ्यांमध्ये दुही निर्माण झाली. नानासाहेब पेशव्यांनी सन १७४८ मध्ये सैन्यासह जयपूरला जाण्याचा निर्णय घेतला. हीच नानासाहेब पेशव्यांची प्रसिध्द नेवाईची मोहीम होती. शिंदे-होळकर सरदारातील संघर्ष मिटविणे आणि छत्रपती शाहूंचे कर्ज फेडण्यासाठी पैसा उभा करणे हा उद्देश या मोहिमेचा होता.

या वरील सर्व स्वाऱ्यांमधून चौथाई, सरदेशमुखी हक्क मिळविले. त्यानंतर मात्र दुसऱ्या कालखंडात सन १७४८ ते १७६१ पर्यंत हा नानासाहेब पेशवा उत्तरेच्या स्वारीवर गेला नाही. उत्तरेच्या स्वारीची पूर्ण जबाबदारी आपला लहान बंधू रघुनाथराव ऊर्फ राघोबादादा यांच्याकडे सोपविली. रघुनाथरावांच्या मदतीला शिंदे आणि होळकर हे मराठ्यांचे मातब्बर सरदार दिले होते. नानासाहेबांनी कोल्हापूरवर छत्रपती संभाजींबरोबर छत्रपती

शाहूंच्या अपरोक्ष सहा कलमी करार केला होता. कारण या दोघांनाही संतान नव्हते. तेव्हा छत्रपती शाहूंचे 'दत्तक वारस' या दृष्टीने या कराराला महत्त्वाचे स्थान आहे.

### २.२.२ आंग्रेशी संबंध :

पश्चिम किनारपट्टीवर आंग्रे यांची जबरदस्त आरमारी सत्ता होती. कान्होजी आंग्रे हा मूळपुरुष होता. कान्होजी आंग्रेला 'सरखेल' हा किताब देण्यात आला होता. ते आरमारप्रमुख होते. या आंग्रेनी सिद्दी, पोर्तुगीज व इंग्रज या सत्तांवर दहशत बसवली होती.

कान्होजी आंग्रेनंतर सेखोजी आंग्रे हे सरखेल बनले. सेखोजी आंग्रेच्या मृत्यूनंतर त्यांच्या मुलांमध्ये यादवीला सुरुवात झाली. तेव्हा पेशवा बाजीराव पहिल्याने सेखोजीच्या संभाजी व मानाजी आंग्रे या दोन मुलात सत्तेचे विभाजन करून दिले. त्यानुसार संभाजी आंग्रेला सरखेल हे पद दिले आणि सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग हे प्रदेश दिले. तर मानाजी आंग्रेस वजारतमाब हा किताब दिला व कुलाबा हे ठिकाण दिले. दरम्यान १२ जानेवारी १७४२ रोजी संभाजी आंग्रे मरण पावले. त्याच्या मृत्यूनंतर सरखेल पदासाठी मानाजी आंग्रे व तुळाजी आंग्रे यांच्यात संघर्ष सुरू झाला. आंग्रे घराण्यात भाऊबंदकी वाढू लागली. त्यामुळे पोर्तुगीज हातपाय पसरू लागले. यामुळे नानासाहेब पेशव्यांना यामध्ये हस्तक्षेप करावा असे वाटू लागले. यातूनच पेशवे व आंग्रे यांची तेढ वाढू लागली. यातच तुळाजी आंग्रे यांनी पेशव्यांना आव्हान दिले.

पेशव्यांचा कोकणातील सुभेदार रामाजी महादेव यास तुळाजीचा त्रास होऊ लागला. त्यातच आंग्रे व सावंतवाडीकर यांचे वैर वाढू लागले. पोर्तुगीजांनी आंग्रेशी जवळीक वाढविण्यास सुरुवात केली. तेव्हा नानासाहेबांना तुळाजी आंग्रेचा बंदोबस्त करणे आवश्यक वाटू लागले. तुळाजी आंग्रेचे विजयदुर्ग हे ठिकाण मुख्य केंद्र होते. नानासाहेब पेशव्याविरुध्द तुळाजी आंग्रे, फेंच, पोर्तुगीज व महाराणी ताराबाई इ. विरोधक निर्माण झाले.

असा विरोधकांचा चतुष्कोन तयार झाला. यामध्ये तुळाजी आंग्रे हा इंग्रज विस्तारवादाला अडथळा बनत होता. तो इंग्रजांना त्रास देत होता. अशा स्थितीत नानासाहेब पेशव्यांनी इंग्रजांशी संधान बांधून सन १७५५ मध्ये एक करार केला. त्यानुसार –

१) इंग्रज व तुळाजी आंग्रे यांच्यात लढाईच्या काळात दोन्ही आरमारावर वर्चस्व इंग्रजांचे राहील.

२) पश्चिम किनारपट्टीवर आंग्रेंना मदत मिळणार नाही याची जबाबदारी इंग्रजांची.

३) आंग्रेच्या जहाजांची वाटणी समान धर्तीवर व्हावी.

४) दक्षिण किनारपट्टीवर बाणकोट, हिंमतगडसह पाच गावे इंग्रजांना कायमस्वरूपी देण्याचे नानासाहेब पेशव्यांनी मान्य केले.

५) तुळाजी आंग्रे यांच्या किल्ल्यातील साहित्य पेशव्यांना मिळावे.

● **सुवर्णदुर्गाचा पाडाव (२२ मार्च १७५५)**

इंग्रज आरमार प्रमुख जेम्सच्या नेतृत्वाखाली होते. आणि पेशव्यांच्या आरमाराने तुळाजी आंग्रे यांच्या आरमारावर हल्ला केला. तुळाजीचे आरमार जाळून टाकले. तेव्हा तुळाजीला माघार घ्यावी लागली. २९ मार्च १७५५ रोजी विजयदुर्गाजवळील आंग्र्यांच्या आरमारावर इंग्रज व मराठे यांनी हल्ला केला. आंग्रेनी शर्थीचे प्रयत्न केले पण उपयोग झाला नाही. बाणकोट, रसाळगड, पालगड हे किल्ले तसेच अंजनवेल, गोवळकोट, रत्नागिरी या सर्व प्रदेशावर वर्चस्व मिळविले. तुळाजी आंग्रेचे विजयदुर्ग हे ठिकाण जिंकण्याची योजना मराठ्यांनी आखली.

● **विजयदुर्गाचा पाडाव (१७५६) :**

तुळाजी आंग्रे यांचे मुख्य ठिकाण विजयदुर्ग होते. इंग्रज व पेशव्यांविरुध्द तुळाजीने पोर्तुगीजांशी संधान साधले. परंतु मराठ्यांनी त्यांचा पराभव केला. रॉबर्ट क्लाईव्ह आणि वॅटसनच्या नेतृत्वाखाली इंग्लंडहून पाठविलेले सैन्य मद्रास बंदरात उतरले. तेथून ते निघून विजयदुर्गच्या रोखाने आले. १२ फेब्रुवारीला विजयदुर्गवर तोफांचा मारा करून आंग्रेचे आरमार उद्ध्वस्त केले. त्यामुळे आपला टिकाव लागणार नाही हे ओळखून तुळाजी आंग्रेनी रामाजीपंतासमोर शरणागती स्विकारली. तुळाजी आंग्रे कुटुंबासहीत कैद झाला. पुढील काळात सन १७८६ मध्ये वंदन या किल्ल्यात कैदेत असतानाच त्याचा मृत्यू झाला.

या स्वारीमुळे–

१) विजयदुर्ग व कोकणचा परिसर पेशव्यांना मिळाला.

२) माणकोट व शेजारील दहा गावे इंग्रजांना देण्यात आली.

३) तुळाजी आंग्रेना कुटुंबासहित पेशव्यांच्या स्वाधीन केले.

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्या मते पेशव्यांनी सर्वात मोठी चूक कोणती केली असेल तर ती म्हणजे जे आरमार छत्रपती शिवाजी महाराजांनी दूरदृष्टीने स्थापन करून प्रसिध्दीस आणून ठेवले होते. ते नानासाहेबांनी बुडविले. कोकणातील कोळी व भंडारी ह्यांच्यासारख्या उत्कृष्ट खलाशी पृथ्वीवर क्वचितच सापडतील. त्यांना पाश्चात्यांचे नौकानयन शिकवले असते तर राज्यास बळकटी आली असती. प्राचीन काळापासून नौकानयनात हिंदुस्थानचे नाव होते. विद्या व कलाकौशल्याच्या जोरावर हिंदुंनी आपले वर्चस्व आरमारच्या नौकानयनात क्षेत्रात निर्माण केले. शेवटचा अवशेष म्हणजे मराठा आरमार हे छत्रपती शिवाजी महाराजांनी मोठ्या परिश्रमाने पश्चिम किनाऱ्यावर परकीय सत्तेला शह देण्यासाठी निर्माण केले होते. ते मराठी आरमार बाळाजी बाजीरावाने इंग्रजांची मदत घेऊन बुडविले. म्हणून इतिहासाचार्य वि. का. राजवाडे म्हणतात, ''एवढा चाणाक्ष नानासाहेब पेशवा असा कसा चकला.'' इतिहासकार सरदेसाई म्हणतात– नानासाहेबांनी मराठ्यांचे आरमार बुडविले हे विधानात अतिशयोक्ती वाटते. कारण विजयदुर्गच्या बंदरात तुळाजीची ६० जहाजे बुडविली हे कृत्य इंग्रजांनी केले. इंग्रजांनाच तुळाजीच्या आरमाराचा त्रास होता. नानासाहेब पेशव्यांचा राग फक्त तुळाजीवर होता, त्यांच्या आरमारावर नव्हता. अशा रितीने नानासाहेब पेशवे व आंग्रे यांच्यातील अहंकार व वितुष्टामुळे मराठी आरामाराचे नुकसान झाले. याचा फायदा पुढील काळात इंग्रजांना झाला.

नानासाहेबांनी पुढे मोहिमा आखल्या. त्या पुढीलप्रमाणे –

१) दक्षिणेतील हैदराबादचा प्रमुख निजामचा बंदोबस्त केला.

२) कर्नाटकमध्ये सदाशिवराव भाऊंच्या सहाय्याने सन १७५३ ते १७५७ या काळात मोहिमा आखल्या. त्यामध्ये श्रीरंगपट्टण मोहीम जानेवारी १७५३ ते जून १७५३, बागलकोट व सावनूरची मोहीम, जानेवारी १७५४ ते जून १७५४.

३) बेदनूरची मोहीम ऑक्टोबर १७५४ ते एप्रिल १७५५.

४) सावनूर प्रांताची मोहीम ऑक्टोबर १७५५ ते जुलै १७५६.

५) श्रीरंगपट्टणची दुसरी मोहीम जानेवारी १७५७ ते जून १७५७.

६) हैदरअली मोहीम.

अशा प्रकारे नानासाहेब पेशव्यांनी कर्नाटकातील मेहंदळे, रास्ते, पटवर्धन या सरदारांवर दक्षिणेची मोहीम सोपविली. कर्नाटकातील शिरा, कर्नुल, सावनूर, कडाप्पा येथे मराठ्यांचे कायमचे वास्तव्य निर्माण झाले. शेवटी नानासाहेब पेशव्यांनी सदाशिवरावभाऊ यांच्या नेतृत्वाखाली उदगीर येथे १७६० मध्ये निजामाचा पूर्ण पराभव केला. अशा रितीने दक्षिणेकडे मराठी सत्तेचा मोठा साम्राज्यविस्तार या काळात झाला होता.

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – १**

**अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१) उत्तर कोकण हे पेशव्यांच्या ताब्यात असून तेथे ........... हा सुभेदार होता.

अ) मानाजी ब) जावजी गवळी क) खंडोजी मानकर ड) रामाजी महादेव

२) .......... मध्ये इंग्रज आरमार जेम्सच्या नेतृत्वाखाली सुवर्णदुर्गाकडे निघाले.

अ) मार्च १७५५ ब) मार्च १६५५ क) मार्च १७६५ ड) मार्च १६६५

३) विजयदुर्गचा पाडाव .............. मध्ये केला.

अ) फेब्रुवारी १७५६ ब) जानेवारी १७४७ क) जुलै १७५६ ड) मार्च १९५५

४) नानासाहेब पेशव्यांचा मृत्यू ............. रोजी झाला.

अ) २० जानेवारी १७६१ ब) २३ जून १७६१
क) ११ फेब्रुवारी १७५६ ड) २३ मार्च १७६०

५) तुळाजी आंग्रे याचा मृत्यू १७८६ मध्ये ............. किल्ल्यावरील कैदेत झाला.

अ) सुवर्णदुर्ग ब) विजयदुर्ग क) वंदन ड) चंदन

**उत्तरे –** १) ड – (रामाजी महादेव) २) अ – (मार्च १७५५)
३) अ – (फेब्रुवारी १७५६) ४) ब – (२३ जून १७६१)
५) क – (वंदन)

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) संभाजी आंग्रेंचा मृत्यू केव्हा झाला?

२) छत्रपती शाहू महाराजांनी नानासाहेबांना पेशवाईची वस्त्रे केव्हा बहाल केली?

३) सेखोजी आंग्रे यांच्या मुलांची नावे काय?

४) रॉबर्ट क्लाईव्ह आणि वॅटसन यांच्या नेतृत्वाखाली इंग्लंडहून पाठविलेले सैन्य कोणत्या बंदरात उतरले?

५) तुळाजी आंग्रेचे मुख्य आरमारी ठाणे कोणते?

**उत्तरे –**

१) संभाजी आंग्रेचा मृत्यू जानेवारी १७४२ मध्ये झाला.

२) छत्रपती शाहू महाराजांनी नानासाहेबांना पेशवाईची वस्त्रे २५ जून १७४० रोजी बहाल केली.

३) सेखोजी आंग्रे यांच्या मुलांची नावे संभाजी व मानाजी ही होती.

४) रॉबर्ट क्लाईव्ह आणि वॅटसन यांच्या नेतृत्वाखाली इंग्लंडहून पाठविलेले सैन्य मद्रास बंदरात उतरले.

५) तुळाजी आंग्रेचे मुख्य आरमारी ठाणे विजयदुर्ग हे होते.

## २.२.२ रघुजी भोसले व नानासाहेब पेशवे संघर्ष :

छत्रपती शिवरायांचा एक कर्तबगार सैनिक परसोजी भोसले हे होते. छत्रपती राजारामनी जी मुलूखगिरीची योजना आखली त्यानुसार वऱ्हाड आणि गोंडवन हे प्रदेश परसोजी भोसले यांना दिले होते. त्यांच्या कर्तबगारी व कार्यकुशलतेमुळे छत्रपती राजारामानी त्यांना 'सरसेनासुभा' हे पद दिले होते. एवढेच नव्हे तर वऱ्हाड प्रदेशाची चौथाई, सरदेशमुखी वसूल करण्याचे अधिकारही दिले होते. छत्रपती शाहूंच्या काळातही हे अधिकार कायम होते. परसोजी भोसलेंच्या मृत्यूनंतर त्यांचा कर्तबगार मुलगा कान्होजी भोसले याला सरसेनासुभा हे पद मिळाले. सन १७३० मध्ये कान्होजीचा मृत्यू झाला. त्यानंतर रघुजी भोसले यांना सरसेनासुभा हे पद मिळाले. ते कर्तबगार होते. त्यांनी मराठी राज्याचा मोठा विस्तार गोंडवनात केला. अशा या रघुजी भोसलेची कामगिरी खालीलप्रमाणे–

१) रघुजी भोसलेने छत्रपती शाहूंच्या आज्ञेनुसार फत्तेसिंह गायकवाडसह कर्नाटकातील त्रिचनापल्ली किल्ला जिंकला.

२) रघुजीने अर्काटच्या नबाबाचा जावई चंदासाहेबाला अटक केली.

३) रघुजीने बंगालच्या नबाबाची मुर्शिदाबाद राजधानीची लुट केली.

४) ओरिसा, पाटणा जिंकले. अशा प्रकारे रघुजीने सर्वत्र आपला दबदबा निर्माण केला. छत्रपती शाहूंकडून बुंदेलखंड, अलाहाबाद, बिहार, ढाका, पाटणा हे कार्यक्षेत्र मिळविले.

५) रघुजीने बंगाल जिंकण्याचा प्रयत्न केला. बंगालचा नबाब अलिवर्दीखान हा महत्त्वकांक्षी व धूर्त होता. त्याने बंगाल प्रांतात आपले वर्चस्व निर्माण केले होते. रघुजीने नागपुरातून परत आल्यानंतर बंगाल, ओरिसावर मोहीम आखण्याची योजना केली. आपला दिवाण भास्करराम याला १७४१ मध्ये बंगाल मोहिमेवर पाठवले.

सन १७३९ मध्ये अलीवर्दीखान या बिहारच्या नायब सुभेदाराने बंड केले. त्याने शुजाखानच्या वारसांचा पराभव करून दिल्लीतील लोकांना लाच देऊन बंगाल प्रांताची सुभेदारी टिकवून ठेवली होती. त्यावेळी शुजाखानच्या वारसदारांनी रघुजी भोसले यांना मदतीला बोलावले आणि तेव्हापासूनच रघुजींचा बंगालमध्ये प्रवेश झाला.

**● रघुजींची कामगिरी :**

बाळाजी बाजीरावांना पेशवेपद प्राप्त झाले. तेव्हापासूनच रघुजी भोसले व पेशवे यांच्यात सख्य नव्हते. त्यातच भर पडली म्हणजे रघुजीचा बुंदेलखंडातील हस्तक्षेप होय. भोपाळ युध्दावेळी नानासाहेब पेशव्यांना मदत केली नाही. रघुजी भोसलेने बाबुजी नाईक बारामतीकर याला पेशवा बनविण्यासाठी आग्रह धरला होता. याचे कारणही तसेच होते. शाहू महाराजांनी आपला मुलगा दत्तक घ्यावा असे रघुजी भोसलेचे मत होते. या गोष्टीला मजबुती यावी यासाठी आपली विश्वासू, जवळची व्यक्ती पेशवा असावा असे रघुजी भोसलेला वाटत होते. त्यातच बाळाजीं बाजीरावाने दिल्लीकडे बंगाल व पाटणा यांच्या चौथाईच्या हक्काची मागणी केली. त्यावेळी बंगालवर वर्चस्व असणाऱ्या रघुजी भोसलेचा बंदोबस्त करावा व चौथाई घ्यावी असे दिल्लीच्या मुघल बादशहांनी सांगितले. त्यामुळे बाळाजी बाजीराव व रघुजी भोसले यांच्यातील संघर्ष अधिकच तीव्र झाला.

सन १७४२ च्या सुमारास रघुजीने कर्नाटकामध्ये भरघोस यश मिळविले. नंतर आपला दिवाण भास्करराम यांना बंगालमध्ये पाठविले. अलिवर्दीखानही आपल्या सेनेसह निघाला पण त्यांच्या सैन्याची कोंडी रघुजीच्या सैन्याने बरद्वान भागात केली. भास्कररामने मे महिन्यात मुर्शिदाबाद ही बंगालची राजधानी जिंकून घेतली. हुगळीबंदर ताब्यात घेऊन संपूर्ण बंगाल आपल्या वर्चस्वाखाली आणला. सप्टेंबर १७४९ मध्ये दुर्गा पूजेचा उत्सव चालू असताना अलिवर्दीखानाने अचानक कटवावर हल्ला केला व भास्करराम याला हाकलून लावले. त्यामुळे रघुजी संतापला. त्यामुळे रघुजीने स्वतः बंगालवर स्वारी करण्याचे ठरविले. परंतु त्याचवेळी बंगालच्या चौथाईबाबत मोगलाशी वाटाघाटी चालू होत्या. पेशवा बंगालवर कोणत्याही हेतूने हल्ला करणार आहे हे जाणून घेण्याची रघुजीची इच्छा होती. त्यामुळे रघुजीने अलिवर्दीखानाची भेट घेतली पण आपल्या मनसुब्याचा सुगावा पेशव्यांनी रघुजीस लागू दिला नाही.

या दरम्यान नानासाहेब पेशवे व अलिवर्दीखान या उभयतात एक करार झाला. त्यानुसार...

१) अलिवर्दीखानने पेशव्यांच्या फौज खर्चासाठी २२,००,००० रु. द्यावेत.

२) छत्रपती शाहू महाराजांना बंगालची चौथाई द्यावी.

३) पेशवे व अलिवर्दीखान या दोघांनी मिळून रघुजीचा बंदोबस्त करावा.

यानुसार सन १७४३ मध्ये पाचेटनमध्ये रघुजी भोसलेचा पराभव केला. रघुजी भोसले नागपूरकडे निघून गेला व पेशवा गयेकडे गेला.

**● रघुजी भोसलेचा पराभव :**

मोगल बादशहाने रघुजी भोसलेला दंड करावा असा आदेश दिल्यामुळे नानासाहेब पेशव्यांनी त्याच्याविरुध्द मोहीम काढली. कारण रघुजी पेशव्याला जुमानत नव्हता. तसेच यावेळी रघुजी भोसले कटवा आणि बरद्वान यांच्या दरम्यान लुटालूट करीत होता. पेशवा व अलिवर्दीखान यांच्यात करार झाल्याचे कळताच तो तसाच परतला. परंतु अलिवर्दीखानाने रघुजीचा पाठलाग चालवला. परंतु पेशव्यांना अलिवर्दीखान हा रघुजी भोसलेजवळ जाऊ शकणार नाही असे वाटत होते व त्यामुळे पेशव्यांनीही रघुजीचा पाठलाग केला. रघुजी आणि पेशवे यांच्यामध्ये संघर्ष होऊन यात रघुजी भोसलेचा पराभव झाला.

**● छत्रपती शाहूंची दिलजमाई :**

✻ मराठा राज्यातील मराठा सरदारांनी केंद्रीय सत्तेच्या आज्ञा निमूटपणे पाळाव्यात, त्याच्यावर कुरघोडी करता कामा नये असे नानासाहेब पेशव्यांना वाटत होते.

✻ आपले स्वतःचे राज्य स्वतःच्या कर्तबगारीवर निर्माण केले पाहिजे व त्यात कोणाचाही हस्तक्षेप नको असे रघुजी भोसलेंना वाटत होते.

या सर्व संघर्षाची कल्पना छत्रपती शाहूंना होती. त्यांना वरचेवर या दोघातील संघर्षाच्या बातम्या कळत होत्या व या संघर्षामध्ये मराठे शाहीचेच नुकसान होईल असे छत्रपती शाहूंना वाटत होते. यामुळे त्यांनी या दोघा उभयतांमध्ये सलोखा घडवून आणला. यामध्ये मित्रत्व करार खालीलप्रमाणे झाला.

१) नानासाहेबांना बंगालवरील आपला हक्क सोडून द्यावा लागला.

२) नानासाहेब पेशव्यांकडे त्यांचे मूळ परगणे कायम ठेवण्यात आले.

३) कोकण आणि माळवा याचा कारभार पेशव्यांनीच पहावा.

४) अलाहाबाद, आग्रा, अजमेर, परगण्यातील खंडणी पेशव्यांनीच वसूल करावी.

५) लखनऊ, पाटणा, दक्षिण बंगाल, बिहार, वऱ्हाड व कटक यातील चौथाई रघुजींनी वसूल करावी.

६) नर्मदा, शोण, गंगा नद्यांच्या मर्यादेत असलेल्या प्रदेशात पेशव्यांनी हालचाली कराव्यात.

७) शोण नदीच्या पुर्वेकडील संपूर्ण प्रदेश हा भोसल्यांच्या प्रभावाखालील प्रदेश म्हणून घोषित केला. अशा रीतीने रघुजी भोसले व नानासाहेब पेशवे यांच्यातील बराच काळ चाललेला संघर्ष संपुष्टात आला.

**● स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – २**

**अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१) नानासाहेब पेशव्यांचा जन्म .......... रोजी झाला.

अ) १२ डिसेंबर १७२१ ब) १२ नोव्हेंबर १७२०

क) २८ एप्रिल १७४० ड) २५ जून १७४०

२) शिलेदार परसोजी भोसले यांना ............ यांनी सरसेना सुभा हे पद बहाल केले.

अ) छत्रपती राजाराम महाराज ब) छत्रपती शाहू महाराज

क) छत्रपती शिवाजी महाराज ड) शहाजीराजे

३) रघुजी भोसले यांनी बंगालच्या नवाबाची राजधानी .......... लुटली.

अ) बुंदेलखंड ब) मुर्शिदाबाद क) ओरिसा ड) बिहार

४) .......... रोजी संभाजी आंग्रे मृत्यू झाला.

अ) मार्च १७५५ ब) फेब्रुवारी १७५६ क) जानेवारी १७४२ ड) मार्च १९५५

५) बाळाजी बाजीरावांना छत्रपती शाहू महाराजांनी पेशवाईची वस्त्रे ............ रोजी दिली.

अ) २५ जानेवारी १७४० ब) १७ डिसेंबर १७४०

क) २५ जून १७४० ड) १४ जानेवारी १७६१

६) रघुजी भोसले यांचे .............. हे कार्यक्षेत्र होय.

अ) ग्वाल्हेर ब) बंगाल क) धार ड) पंजाब

**उत्तरे –**

१) अ (१२ डिसेंबर १७२१) २) अ (छ. राजाराम महाराज)

३) ब (मुर्शिदाबाद) ४) क (जानेवारी १७४२)

५) क (२५ जून १७४०) ६) ब (बंगाल)

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) नानासाहेब पेशव्यांचा मृत्यू कोठे झाला?

२) रघुजी भोसले व नानासाहेब यांच्यात कोणी सलोखा घडवून आणला?

३) बाजीरावाच्या मृत्यूनंतर रघुजी भोसलेने कोणास पेशवेपद द्यावे असा आग्रह केला?

४) नानासाहेबांस पेशवेपद मिळू नये म्हणून कोणाचा विरोध होता?

५) बाळाजी बाजीरावांची कारकिर्द किती वर्षांची झाली?

६) बाळाजी बाजीरावास वयाच्या कितव्या वर्षी पेशवाईची वस्त्रे मिळाली?

**उत्तरे –**

१) नानासाहेब पेशव्यांचा मृत्यू पुण्याजवळील पर्वती येथे झाला.

२) रघुजी भोसले व नानासाहेब यांच्यात छत्रपती शाहूंनी सलोखा घडवून आणला.

३) बाजीरावाच्या मृत्यूनंतर रघुजी भोसलेने बाबुजी नाईक बारामतीकर यांना पेशवेपद द्यावे असा आग्रह केला.

४) नानासाहेबांस पेशवेपद मिळू नये म्हणून रघुजी भोसले यांचा विरोध होता.

५) बाळाजी बाजीरावांची कारकिर्द एकूण २१ वर्षांची होती.

६) बाळाजी बाजीरावास वयाच्या १९ व्या वर्षी पेशवाईची वस्त्रे मिळाली.

## २.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ :

१) सरखेल (आरमारप्रमुख)

२) सरसेना सुभा (प्रांताचा प्रमुख)

३) बाळाजी बाजीराव ऊर्फ (नानासाहेब पेशवे)

४) पेशवा (प्रधान)

५) जिहाद (धर्मयुध्द)

## २.२.४ पानिपतची लढाई – (१४ जानेवारी १७६१)

मराठ्यांच्या इतिहासात पानिपतच्या युध्दाला जीवन मरणाएवढे महत्त्व आहे. या पानिपत युध्दाची माहिती 'भाऊसाहेबांची बखर', 'भाऊसाहेबांची कैफियत' अनुपगीर गोसावी यांच्या वर्णनात मिळते. मराठे व अफगाणिस्तानचा बादशहा अहमदशहा अब्दाली यांच्यात पानिपतचे तिसरे युध्द झाले. या युध्दात मराठ्यांचा पराजय झाला. पण संपूर्ण भारत वर्षाला हादरा बसला. इतिहासकार शेजवलकर म्हणतात– ''पानिपतची लढाई ही जगाच्या इतिहासातील एक क्रांतिकारी घटना होती.'' पानिपत युध्दात मराठ्यांचा दारुण पराजय झाला

असला तरी मराठे संपले नाहीत, ज्याप्रमाणे विसाव्या शतकात दुसऱ्या महायुध्दात जपानच्या पराभवाने जपान संपला नाही तर तो युध्दाच्या राखेतून पुन्हा आत्मविश्वासाने उभा राहिला त्याचप्रमाणे पानिपतच्या युध्दानेही मराठे संपले नाहीत. तर उलट आत्मविश्वासाने पुढील अकरा वर्षांच्या कालावधीत संपूर्ण भारतभर मराठ्यांनी दरारा निर्माण केला. या युध्दाने एक राष्ट्र हा संदेश दिला. म्हणूनच पानिपतमध्ये मराठ्यांचा पराजय झाला असला तरी एक राष्ट्रसंदेश देणारी पानिपत ही प्रमुख गाथा ठरली.

**● पानिपत लढाईची कारणे –**

**१) उत्तरेतील सत्ता विस्तार :**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वप्नातून सत्यात उतरलेल्या स्वराज्याची घोडदौड पेशव्यांच्या काळात संपूर्ण भारतभर पसरली. यामध्ये उत्तर हिंदुस्थान व दक्षिण हिंदुस्थान असा प्रचंड साम्राज्यविस्तार पेशव्यांच्या काळात झाला. याचा परिणाम म्हणजे जाट, राजपूत, रोहिले, बुंदेले यांना मराठ्यांचा हा विस्तार रुचला नाही. त्यांना मराठ्यांचे वर्चस्व नकोसे वाटू लागले. त्यामुळे मराठेशाहीशी त्यांचे नेहमी संघर्ष होऊ लागले. यामधूनच पानिपतच्या युध्दाची बिजे रोवली गेली.

**२) पंजाब प्रश्न :**

पानिपतच्या युध्दाचे मूळ कारण म्हणजे पंजाबचा प्रश्न होय. अब्दालीला पंजाबसारखा सधन प्रदेश नेहमीच आपल्याकडे असावा असे वाटत होते. अगदी इराणचा शासक नादिरशहाच्या काळापासूनच. नादिरशहाने पंजाब हा सधन प्रदेश आपल्या कब्जात ठेवण्याचा प्रयत्न केला. परंतु मोगल बादशहाने या प्रदेशाची व्यवस्था अगदी चोख ठेवली होती. त्यामुळे या पंजाबवर मालकी हक्क दाखविण्यासाठी नादिरशहानंतर सन १७४८ मध्ये अब्दालीने पंजाबवर आक्रमण केले.

* सन १७५१ मध्ये अब्दालीने भारतावर तिसरी स्वारी केली. मराठ्यांच्या मदतीशिवाय अब्दालीचा पाडाव करणे अशक्य आहे हे ओळखून मोघल बादशहाचा वजीर सफदरजंगने मराठ्यांशी करार केला. परंतु त्यापूर्वीच मोगल बादशहाने अब्दालीकडे आपला वकील पाठवून त्याच्याशी तह केला.

या तहानुसार संपूर्ण पंजाब प्रांत अब्दालीस मिळाला. अब्दालीला अद्दल घडविण्यासाठी मराठ्यांची एक संधी या तहामुळे हुकली.

* १७५६ मध्ये अहमदशहा अब्दालीने दिल्लीवर चौथी स्वारी केली. चौथ्या स्वारीची कारणे–

अ) पंजाबचा कारभार मुगलानी बेगमच्या हाती दिला हे वजीर गाझीउद्दीनला मान्य झाले नाही.

ब) मलिका जमानी व मुगलानी बेगम यांनी अब्दालीला निमंत्रण दिले.

क) रोहिल्यांचा प्रमुख सरदार नजीबखान रोहिला यांना जाट व मराठ्यांचे वर्चस्व अमान्य होते.

ड) नजीबचे वजीरपदाचे स्वप्न होते.

इ) इस्लामचे रक्षण करणे.

या वरील सर्व कारणामुळे नजीबखानाने अब्दालीस भारतावर स्वारी करण्याचे निमंत्रण दिले.

* भारतावर स्वारी केल्यानंतर पंजाबचा सुभेदार आदिनाबेगचा पराभव केला.

* दिल्लीच्या जनतेवर भयंकर अत्याचार केले.

* बादशहाने राजवाडा सोडला.

* लोक दिल्ली सोडून पळून जाऊ लागले.

* २४ दिवस दिल्ली लुटली

* स्त्रियांवर अत्याचार केले.

बादशहाच्या जनानखाना व खजिन्याची माहिती देणाऱ्या मुगलांनी बेगम हिला अब्दालीने 'सुलताना मिर्झा' हा किताब दिला.

● अब्दालीच्या हिंदुस्थानवरील पाच स्वाऱ्या.

* मोगल बादशहाने झकेरियाखान याला पंजाबची सुभेदारी दिली होती. त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या पुत्रांमध्ये सत्ता संघर्ष सुरू झाला. त्यात शहानवाजखानने अब्दालीशी संधान बांधले व हिंदुस्थानवर स्वारी करण्याचे निमंत्रणच दिले. वारसायुध्दाचे निमित्त साधून अब्दाली सन १७४८ मध्ये दिल्ली रोखाने आला. यावेळी मोगलांचा वजीर कमरुद्दीन, सफदरगंज, मीरमन्नू, ईश्वरसिंह या सर्वांनी मिळून अब्दालीचा पराभव केला.

* सन १७४९ मध्ये अब्दाली पुन्हा हिंदुस्थानावर चालून आला. मीर मन्नुने त्याला विरोध केला. परंतु दिल्लीतून मदत मिळाली नाही. त्यामुळे मीरमन्नुने अब्दालीशी तह केला. तहानुसार १०,००० रु. नजराना अब्दालीस दिला व पंजाबच्या उत्तरेकडील ४ जिल्ह्यांचे वर्षासन देण्याचे ठरले.

या आक्रमणावेळी अंताजी माणकेश्वरने अब्दालीस विरोध केला पण प्रचंड फौजेपुढे त्याचा निभाव लागला नाही. यावेळी जाटांचा नेता सूरजमल जाटानेही अब्दालीस प्रखर विरोध करून थोपवून धरले. यानंतर पुढे साथीचे रोग, उन्हाळा यामुळे अब्दालीने मोहीम आटोपती घेतली. मायदेशी परत जातेवेळी आलमगीर बादशहास पुन्हा दिल्लीच्या गादीवर बसविले.

गाजीउद्दीन यास वजीर व नजीबखान यास मीरबक्षीपदी बसविले. परंतु मुगलांनी बेगमला पंजाब प्रांत दिला नाही. तिची त्यांनी फसवणूक केली.

### ४) रघुनाथरावांच्या स्वाऱ्या –

| | पहिली स्वारी | दुसरी स्वारी |
|---|---|---|
| १) | रघुनाथराव १७ वर्षांचे | १७५७ मध्ये रघुनाथरावाने दुसरी मोहिम काढली. |
| २) | रघुनाथरावाला मदत – जयाप्पा शिंदे व मल्हारराव होळकर | रजपुतांकडून खंडण्या वसूल केल्या. |
| ३) | बादशहा व रोहिले सरदार नजीबखान यांच्यात वितुष्ट | विठ्ठल शिवदेव याने दिल्ली काबीज केली. नजीबखानाला पकडले. |
| ४) | बादशहाने रघुनाथरावास मदतीला बोलावले | मल्हाररावांच्या प्रयत्नामुळे राघोबांनी नजीबखानास सोडले. |
| ५) | गाजीउद्दीनने मल्हाररावास आपल्याकडे वळविले. | हाच नजीबखान पुढील काळात अब्दालीस मिळून मराठ्यांच्या नाशास कारणीभूत ठरला. |
| ६) | सूरजमलचा पराभव करण्यासाठी रघुनाथरावाला आग्रा व अजमेरची सुभेदारी दिली. | |

- **कुंभेरीचा लढा (१८ मे १७५४) :**

रघुनाथरावाने सूरजमल जाटाकडे एक कोटी रुपयांची मागणी केली तेव्हा सूरजमलने कुंभेरी किल्ल्यात आश्रय घेतला. मराठ्यांनी या किल्ल्याला वेढा दिला. तोफांचा मारा सुरू असतानाच मल्हाररावाचा पुत्र खंडेराव होळकर जाटांच्या तोफेचा गोळा लागून ठार झाला. मल्हारराव प्रचंड संतापला. त्याने सूरजमलचा शिरच्छेद करीन आणि कुंभेरीची माती यमुनेत टाकेन तरच जन्मास आलेचे सार्थक अन्यथा प्राणत्याग अशी कडवी शपथ घेतली. शेवटी सूरजमलने जयाप्पा शिंदेच्या मदतीने मध्यस्थी करून ३० लाख रुपये रघुनाथरावाला दिले व वेढा उठविला. हे मल्हारराव होळकरला आवडले नाही. यामुळे पुढील काळात शिंदे-होळकर वितुष्ट निर्माण झाले. त्याचे प्रायश्चित मराठ्यांना पानिपतात मिळाले.

| | | |
|---|---|---|
| ✻ | १ कोटी रुपयांची मागणी<br>४० लाख देण्याची सूरजमलची तयारी | रघुनाथरावांनी आलमगीर यांना दिल्लीच्या गादीवर बसविले. |
| ✻ | रघुनाथरावाने ती स्विकारली नाही. | |

| | | |
|---|---|---|
| * | सूरजमलने कुंभेरी किल्ल्याचा आश्रय घेतला व तोफांचा मारा सुरू केला. यामध्ये मल्हाररावांचा पुत्र खंडेराव ठार झाला. त्यामुळे मल्हाररावाने सूरजमलला मारण्याची शपथ घेतली. जयाप्पाच्या मध्यस्थीने १७५४ रोजी सूरजमलने वाटाघाटी केल्या व ३०,००,००० रु. मराठ्यांना दिले. यामुळे होळकर शिंदे वितुष्ठ निर्माण | अटकेपार झेंडे<br>सन १७५८ आदिनाबेग मराठ्यांना मिळाला. शीख मराठ्यांना मिळाले.<br><br>सरहिंद काबीज केले. तैमूरशहा या अब्दालीच्या मुलाने अफगाणिस्थानात पळ काढला.<br><br>लाहोर व मुलतानचा प्रदेश आदिनाबेगला दिला. झाले. साबाजी, तुकोजी व रायाजी यांच्याकडे उत्तरेची जबाबदारी सोपविली. |

**● दिल्ली क्रांती (२५ मे १८५४) :**

बादशहा व वजीर गाजीउद्दिन यांच्यात वितुष्ठ आले. मल्हाररावांच्या मदतीने गाजीउद्दीनने दिल्लीला वेढा दिला. यातून बादशहा व वजीर सिकंदराबादला पळून गेले. मल्हाररावाने २५ मे १७५४ रोजी बादशहाच्या छावणीवर हल्ला करून लूट केली.

बादशहा पुन्हा दिल्लीकडे गेला. त्यावेळी गाजीउद्दीनला वजीर बनविण्यात आले. त्याने बादशहा अहमदशहा व उधमबाई यांना ठार मारले व आलमगीर दुसरा याला गादीवर बसविले. आलमगीर दुसरा हा विलासी होता. यातच वजीरपदाचा दबदबा नष्ट झाला होता. गाजीउद्दीनच्या सैनिकांनी पगारासाठी उठाव केला, त्याच्या जनानखान्यात जाऊन स्त्रियांवर अत्याचार केले.

या दिल्लीतील क्रांतिनंतर मराठ्यांनी गाजीउद्दीनकडे वसुली सुरू केली. पण खजिना रिकामा झाला होता. महसूल वसुली जवळजवळ बंदच पडली होती. कसेबसे १०,००,००० रु. खंडणी राघोबास दिली. यावेळी दिल्लीतील सत्ता स्थिर करण्याकडे मराठ्यांनी लक्ष दिले नाही. सरदेसाई म्हणतात–

''रघुनाथरावाने या स्वारीत तीर्थक्षेत्रांचे पुण्य पैदा करण्यापलिकडे या बहाद्दूराने अन्य काही विशिष्ट कामगिरी केल्याचे दिसून येत नाही.''

**● शुक्रतालची लढाई (१७५९)– (बरारीघाटचे युध्द) :**

**दत्ताजीचा पराक्रम :**

नजीबखान रोहिल्याकडून अब्दालीस निमंत्रण मिळाल्यामुळे त्याने जहानखानास लाहोर घेण्यास पाठविले. परंतु साबाजी शिंदेने त्याचा पराभव केला. त्यामुळे स्वतः अब्दाली लाहोरवर चालून आला. साबाजी

दत्ताजीजवळ शुक्रतालकडे गेला. इकडे गाजीउद्दीनने बादशहाचा खून केला. दिल्लीमध्ये गोंधळाची स्थिती निर्माण झाली. याचा फायदा घेण्यासाठी अब्दाली दिल्लीकडे निघाला.

दत्ताजीने दिल्लीपासून १० किलोमीटरवर छावणी टाकली. नजीबखानने साबाजीवर आक्रमण केले. मराठ्यांनी रोहिल्यांची कत्तल केली. त्यातच दत्ताजी शिंदे हा साबाजी शिंदेच्या मदतीस आला. या धुमश्चक्रीत यशवंतराव जगदाळे ठार झाले. त्यांना आणण्यास गेल्यावर दत्ताजीस गोळी लागल्याने ते खाली पडला. जखमी दत्ताजीस शत्रुसैन्याने वेढा घातला. तेव्हा तत्परतेने नजीबखानच्या सरदार कुतुबशहाने घायाळ झालेल्या दत्ताजीस सवाल केला, 'क्यों पटेलजी अब क्या करोंगे?' दत्ताजीने दिलेले उत्तर आजही इतिहासात अजरामर आहे, त्याने बाणेदारपणे उत्तर दिले- 'बचेंगे तो और भी लढेंगे!' कुतुबशहाने दत्ताजीचे शीर कापून अब्दालीस दिले. या युध्दात जनकोजीही जखमी झाला. दत्ताजीच्या मृत्यूमुळे मराठ्यांना फार मोठी हानी झाली. दत्ताजी शिंदेच्या मृत्यूनंतर मराठ्यांचे धैर्य संपले व ते मागे मैदानात आले. जखमी जनकोजीला व येसाई भोईटे, जानराव बावळे यांनी पाठिशी घालून पळण्यास सुरुवात केली. दत्ताजी शिंदेसारखा पराक्रमी सेनानीच्या मृत्यूमुळे उत्तरेतील मराठ्यांच्या वर्चस्वाला प्रचंड धक्का बसला. अशा प्रकारे या शुक्रतालच्या लढाईत मराठ्यांचा पराभव झाला. या शुक्रतालच्या लढाईलाच बरारीघाटची लढाई असेही म्हणतात.

**● सदाशिवराव भाऊ उत्तरेकडे :**


दत्ताजी शिंदेंना वीरमरण आल्याची बातमी पुण्याला समजली. त्यामुळे पेशवा नानासाहेबांनी त्यांचा मुलगा विश्वासराव, चुलतभाऊ सदाशिवरावभाऊ यांना उत्तरेच्या स्वारीवर पाठवले. सोबत बळवंतराव मेहंदळे, नाना पुरंदरे, नारोशंकर, दमाजी गायकवाड, विठ्ठल शिवदेव, यशवंतराव पवार, समशेर बहादूर, अंताजी माणकेश्वर, नाना फडणीस व मराठ्यांचा तोफखानाप्रमुख इब्राहीमखान गारदी व त्याचा उत्कृष्ट तोफखाना आणि ५० हजाराची फौज घेऊन सदाशिवरावभाऊ उत्तरेच्या मोहिमेला निघाले. या मोठ्या पराक्रमी योध्दयांना पंजाब व दुआबातील मराठ्यांचे वर्चस्व अबादित राखण्यासाठी व अब्दालीचे पारिपत्य करण्यासाठी त्वरेने रवाना केले. वाटेत सदाशिवरावभाऊंना मल्हारराव होळकर मिळाले. ते १४ जुलै १७६० रोजी आग्र्यास पोहोचले. सोबत बिनलढाऊ लोकही होते. त्यामुळे मराठ्यांच्या हालचालींना मर्यादा पडल्या. १ ऑगस्ट १७६० रोजी सदाशिवरावभाऊने अब्दालीचा सरदार याकुबअलीखान याचा पराभव करून दिल्ली ताब्यात घेतली. जवळजवळ सव्वादोन महिने भाऊसाहेबाने दिल्ली येथे तळ ठोकला. मराठ्यांना अंतर्वेदितून रसद पुरवठा करणाऱ्या गोविंदपंत बुंदेले यांचा प्रदेश उद्ध्वस्त झाला होता. बिनलढाऊ लोकांमुळे रसद पुरवठा कमी पडू लागला. मराठ्यांपुढे अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली. तेव्हा भाऊसाहेबांनी दिल्लीच्या लाल किल्ल्यातील दिवाण-ई-खासचे चांदीचे छत काढून विकले. त्याला ९ लक्ष रुपये मिळाले. पण तरीही मराठ्यांना अन्नधान्य तुटवडा पडू लागला.

**● कुंजपुऱ्यावरील विजय (१७ ऑक्टोबर १७६०) :**

दिल्लीच्या उत्तरेस ७८ मैलावर यमुना नदीकाठी कुंजपुरा हे अब्दालीचे महत्त्वाचे ठिकाण. येथे अन्नधान्य व युध्दसामग्री असल्याची माहिती भाऊंना मिळाली. तेव्हा भाऊसाहेब १७ ऑक्टोबर १७६० रोजी कुंजपुरा



जनकोजी याने कुंजपुरा येथे कुतुबशहाचा वध केला



मराठे व अफगाण सैन्यांच्या छावण्या

किल्ल्याकडे निघाला. या किल्ल्याची जबाबदारी नजीबखानचा भाऊ नजीबतखान याच्याकडे दिली होती. त्याच्या मदतीस कुतुबशहा व अब्दुल समदखान होते. इब्राहीमखान गारदी याने किल्ल्यावर तोफांचा भडीमार करून खिंडार पाडले व दहा हजार पठाणांना यमसदनास पाठविले. अब्दुल समदखान, नजीबतखान यांना ठार केले. या स्वारीमध्ये दत्ताजीचे शिर कापणारा कुतुबशहा मराठ्यांच्या हाती लागला. मराठ्यांनी त्याचे शीर कापून सर्वत्र फिरवले व दत्ताजी शिंदेच्या वधाचा बदला घेतला. दहा लाखाचे सामान व रोख साडेदहा लाख अशी प्रचंड संपत्ती मराठ्यांना मिळाली.

**● पानिपतची छावणी :**

कुंजपुऱ्यातील पराभव अब्दालीच्या जिव्हारी लागला होता. त्याने तीन दिवसामध्ये यमुना पार केली. त्यामुळे भाऊंना पानिपतजवळ थांबणे क्रमप्राप्त झाले. यामुळे मराठे उत्तरेकडे व अब्दालीचे सैन्य दक्षिणेकडे समोरासमोर आले. परस्परांनी एकमेकांचा मार्ग अडविला. या ठिकाणी जलद हालचाली झाल्या असत्या तर भाऊंना विजय मिळाला आला असता. परंतु शेजवलकरांनी म्हटल्याप्रमाणे बिनकामाचे व बिनलढाऊ लोक बरोबर आणलेले यांच्या संरक्षणातच त्यांचा वेळ गेला.

अब्दालीने दिल्लीपासून उत्तरेस २० मैल अंतरावर बागपतजवळ नदीपात्र रुंद असल्याने यमुना नदी पार केली. आणि आपल्या सैनिकांना त्याने प्रोत्साहन दिले. अल्लाने कौल दिला आहे, मी चाललो आहे. माझ्या पाठोपाठ यावे असे आवाहन करून यमुना नदी पार केली व जलद हालचाली करून भाऊसाहेबांचा पानिपत येथे रस्ता अडविला. अशा रीतीने मराठे व अब्दाली पानिपतच्या रणमैदानावर समोरासमोर छावण्या करून परिस्थितीवर लक्ष ठेवून होते. त्यामुळे किरकोळ चकमकी उडत होत्या. त्यातच नजीबखानने केलेल्या हल्ल्यात बळवंतराव मेहंदळे हे ठार झाले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मराठ्यांना रसद पुरविण्याचे काम करणारे गोविंदपंत बुंदेले यांचा बंदोबस्त करण्यासाठी नजीबखानने अताईखान व करीमदादखान यांना ५ हजार सैन्यानिशी पाठवले. १६

डिसेंबरला नारोशंकर या मराठी सेनानीचा पराभव झाला तर २० डिसेंबरला गोविंदपंत बुंदले हे रोहिल्यांची अचानक गोळी लागून ठार झाले. अशा प्रकारे मराठ्यांना रसद पुरविणारा महत्त्वाचा सेनानी गोविंदपंत बुंदले मारला गेल्यामुळे अंतर्वेदितून मराठ्यांना मिळणारी रसद बंद झाली. अब्दालीने सर्वत्र मराठ्यांची कोंडी केली. मराठी सैन्य, हत्ती, घोडे, बिनलढाऊ लोक या सर्वांवर उपासमारीची वेळ आली. ही भयानक परिस्थिती विश्वासरावाने नानासाहेबांना कळविताना म्हणतात– ''गिलचाचा पेच भारी पडला आहे. आम्हासारखे पूत्र आपणास आहेत व होतील पण भाऊसारखा बंधू मिळणार नाही. प्रसंगी येऊन मदत करावी. रसदीचा प्रश्न भयंकर गंभीर बनला आहे.'' यावरून विश्वासरावाने परिस्थितीची मांडलेली व्यथा स्पष्ट होते. रसद कमी पडू लागल्याने उपासमार होऊ लागली. त्यामुळे भाऊंनी सरदारांची बैठक बोलावली व १४ जानेवारी रोजी हल्ला करण्याचे निश्चित केले.

### ● पानिपतची तिसरी लढाई (१४ जानेवारी १७६१) :

पानिपतचा नेता
सदाशिवरावभाऊ

पानिपतचा तिसरा रणसंग्राम १४ जानेवारी १७६१ रोजी मराठे व अहमदशहा अब्दाली यांच्यात झाला. सदाशिवभाऊने अब्दालीवर हल्ला केला. तो दिवस होता १४ जानेवारी १७६१, सकाळी ९ वाजता. तोफखानाप्रमुख इब्राहीमखानाने शत्रुला धडकी भरविली. पायदळाची ९ पथके तयार केली. उजव्या बाजूस दमाजी गायकवाड व विठ्ठल शिवदेव यांचे घोडदळ, मध्यभागी भाऊसाहेब व विश्वासराव तर उजवीकडे समशेरबहाद्दर, यशवंतराव पवार, अंताजी माणकेश्वर, संताजी वाघ, सेकोजी जाधव, नाना पुरंदरे व



पाठीमागे स्त्रिया, मुले व बिनलढाऊ लोक व बाजूस जनकोजी शिंदे, महादजी शिंदे, मल्हारराव होळकर अशी संरक्षक यंत्रणा मराठ्यांनी केली. अब्दालीने सैन्याची गोलाकार रचना केली. त्यात राखीव तुकड्या तयार केल्या. इब्राहीमखान गारदीच्या तोफा शत्रुसैन्यावर आग ओकू लागल्या. तोफांच्या माऱ्यापुढे रोहिल्यांची पळता भुई थोडी झाली. वजीर शहावलीचा धुव्वा उडविला. अताईखान व त्याच्या तीन हजार फौजेस मराठ्यांनी कापून काढले. मराठ्यांनी पराक्रमाची शर्थ केली. तसेच गोविंदपंत बुंदेले यांचे शीर कापून पेशव्यांकडे पाठविणारा अताईखान मराठ्यांच्या हाती सापडला तेव्हा धारचे सरदार यशवंतराव पवार यांनी हत्तीवर चढून त्याला ठार केले. आणि गोविंदपंत बुंदेले यांच्या वधाचा बदला घेतला. यामुळे अब्दालीस धक्का बसला. मराठ्यापुढे आपला निभाव लागणार नाही हे अब्दालीस कळले. दुपारी दोनपर्यंत मराठ्यांची सरशी झाली. या अटीतटीच्या लढतीमध्ये अब्दालीने राखीव फौज (तलुगमा तुकड्या) पुढे आणल्या. दरम्यान अचानक विश्वासरावास गोळी लागली. विश्वासराव पडल्याचे समजताच मराठ्यांना प्रचंड धक्का बसला. आता आपला निभाव लागणार नाही असे वाटून काही मातब्बर मराठा सरदारांनी रणांगणातून पळ काढला. विश्वासराव पडल्याचे दिसताच सदाशिवरावभाऊंना मोठा धक्का बसला. सदाशिवरावभाऊ हत्तीवरून घोड्यावर स्वार झाले.

हाणा, मारा असे म्हणत शत्रु सैन्यावर हल्ला केला. आता कोणीकडे जावे? काय तोंड दाखवावे, क्षात्रधर्माची शर्थ करीत पानिपतात सदाशिवरावभाऊंना वीर मरण आले. मराठी सैन्य दु:खाने शत्रू सैन्यावर तुटून पडले पण त्यातच ते मारले गेले. सदाशिवरावभाऊ दिसेनात म्हणून सर्वत्र गोंधळ निर्माण झाला. मराठे वाट दिसेल तिकडे पळू लागले. याचा फायदा घेऊन अब्दालीच्या सैन्याने मराठी सैन्याचा ४० मैलापर्यंत पाठलाग केला व प्रचंड कत्तल केली. या लढाईत भाऊसाहेब, विश्वासराव, यशवंतराव पवार, जनकोजी शिंदे, संताजी वाघ, मानाजी पायगुडे हे पराक्रमी सेनानी ठार झाले तर इब्राहीमखान गारदी याला अंगावरील जखमांवर मीठ चोळून हाल हाल करून ठार मारले. अनेकांची डोकी उडविण्यात आली. अशा प्रकारे या युध्दात मराठ्यांची सव्वालाख बांगडी फुटली आणि मराठ्यांची एक पिढीच जणू गारद झाली. याबद्दल काशिराज म्हणतात- 'मराठ्यांची फौज कापरासारखी नाहिशी झाली. मैदानावर कोणी राहिले नाही. सर्वत्र प्रेतांचा ढिग दिसू लागला.''

अशा प्रकारे पानिपतचे तिसरे युध्द म्हणजे राष्ट्रीय भावनेने लढणाऱ्या महापराक्रमी मराठ्यांचा महान रणयज्ञ होता.

**● पानिपतच्या तिसऱ्या युध्दातील मराठ्यांच्या पराभवाची कारणे :**

**१) रघुनाथराव ऊर्फ राघोबादादाच्या चुका :**

राघोबाने १७५३ ते १७५५ व सन १७५७ ते १७५८ या कालखंडात उत्तर भारतात मोहिमा काढल्या. पण जाट व रजपूत प्रकरणात रघोबाने मोठ्या चुका केल्या. त्यामुळे शिंदे-होळकर वितुष्ट निर्माण झाले. राघोबाने जिंकलेल्या प्रदेशाची सुव्यवस्था नीट लावली नाही. पंजाबसारखा सधन प्रांताच्या संरक्षणाची व्यवस्था त्याने केली नाही. अटकेपर्यंत मजल मारली पण उपयोग झाला नाही. राघोबा दादाने रोहिल्यांचा नेता नजीबखान याला मल्हारराव होळकरच्या मध्यस्थीने सोडून दिले ही दादाची मोठी घोडचूक होती. हाच नजीबखान पुढील काळात पानिपतात मराठ्यांवर उलटला. या वरील राघोबांच्या चुकांमुळे पानिपतात मराठ्यांचा पराभव झाला.

**२) मराठ्यांमध्ये एकीचा अभाव :**

पानिपतात मराठ्यांमध्ये प्रारंभी एकी दिसून आली मात्र जाट, रजपूत प्रकरणामुळे शिंदे होळकर वितुष्ठ यामुळे उत्तरेच्या स्वारीतील प्रमुख सरदार एकीने राहिले नाहीत. त्याचा फटका पानिपतात बसला. अंताजी माणकेश्वर, नारोशंकर, बापूजी हिंगणे यांच्यात ऐक्य निर्माण झाले नाही. या सरदारांमधील ऐक्याच्या अभावामुळेच पानिपतात मराठ्यांचा दारूण पराभव झाला.

**३) मराठ्यांमध्ये दूरदृष्टी राहिली नाही :**

उत्तर हिंदुस्थानातील राजकारण मराठ्यांना नीट हाताळता आले नाही. शीख, रजपूत, जाट, रोहिले यांचे सहकार्य मिळविण्यात मराठे कमी पडले. जबरदस्तीने मराठ्यांनी खंडण्या वसूल केल्या. पानिपतला बिनलढाऊ लोक सोबत घेतले. परिणामी मराठ्यांच्या अदूरदर्शीपणामुळे मराठ्यांचा पराभव झाला.

**४) पानिपतावरील नियोजनेचा अभाव :**

भाऊसाहेबांनी उत्तरेच्या स्वारीवर जात असताना सोबत, बायका मुले व बिनलढाऊ लोक घेतले. त्यामुळे त्यांच्या संरक्षणाचा प्रश्न झाला. काही ठिकाणी धर्मस्थळे यामध्ये वेळ गेला. शिंदे-होळकर यांच्यातील वितुष्ट भाऊसाहेबांना मिटविता आले नाही. रोहिले, जाट, रजपूत, शीख, मुघल यांना आपल्याकडे वळविता आले नाही. उलट भाऊसाहेबांनी लाल किल्ल्यातील दिवाण-इ-खासचे चांदीचे छत तोडल्यामुळे मोगल दुखावले गेले. बाजारबुणगे व बिनलढाऊ लोक यामुळे रसदीचा प्रश्न निर्माण झाला. उमासमार होऊ लागली. मराठ्यांना आक्रमक पवित्रा घेण्याऐवजी संरक्षणात्मा पवित्रा घ्यावा लागला. गोलाकार लढाई पध्दतीमुळे शिस्त बिघडली. सर्वत्र गोंधळ निर्माण झाला. विश्वासरावला गोळी लागताच भाऊसाहेब भावविश्व झाला. व शत्रुवर तुटून पडले. सेनानायक नसल्यामुळे सैनिक पळू लागले. परिणामी पानिपतात नियोजनाच्या अभावामुळे मराठ्यांचा पराभव झाला.

**५) मल्हाररावांचे वर्तन :**

उत्तरेचे राजकारण सांभाळण्यास मल्हारराव मुख्य होते. उत्तरेच्या राजकारणाची जबाबदारी या मुख्य आधारस्तंभाकडे होती. परंतु हव्यास व जाट रजपूत प्रकरण यामुळे दोन्ही सरदारात कलुषित भावना निर्माण झाली. याचा परिणाम पानिपतच्या पराभवात झालेला दिसून येतो.

**६) गनिमीकावा युध्द पध्दतीचा अभाव :**

छत्रपती शिवरायांच्या काळात गनिमी कावा हे युध्दतंत्र होते. यानुसार मराठ्यांनी शत्रुंना सळो की पळो करून सोडले. पण पानिपतमध्ये या पध्दतींचा मराठ्यांनी अवलंब न केल्यामुळे मराठ्यांचा पराभव झाला.

**७) मुत्सद्दीपणाचा अभाव :**

सदाशिवरावभाऊ यांच्याकडे अब्दालीपेक्षा मुत्सद्दीपणाचा अभाव दिसून येतो. अब्दालीने यमुना नदी पार करून मराठ्यांचा रस्ता अडविला. राखीव फौजच्या सहाय्याने अब्दालीने मराठ्यांवर विजय मिळविला.

**८) अब्दालीकडे आधुनिक शस्त्रे :**

मराठ्यांकडे ढाल, तलवार, भाले व इब्राहीमखान यांचा तोफखाना होता. तर अब्दालीकडे तलवारी, भाल्याबरोबरच बंदुकाही होत्या. त्याच्या सैनिकांकडे चिलखत होते. शिवाय अब्दालीकडे सैनिकांची मोठी फौज होती. मराठ्यांकडे अवजड तोफखाना होता. अब्दालीकडे तत्परता व गतीमानता होती. पण मराठ्यांनी तत्परता व गतीमानतेचा स्वीकार केला नाही. दिल्ली जिंकल्यानंतर भाऊसाहेबांनी दोन महिने वाया घालविले. याचा फायदा शत्रुला मिळाला. परिणामी मराठ्यांची रसद संपली. त्यामुळे मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले.

**९) रजपुतांच्या अंतर्गत राजकारणात हस्तक्षेप :**

मराठ्यांनी जाट, रजपूतांच्या प्रकरणात हस्तक्षेप केला. मारवाड प्रकरणात रजपूत दुखावले. मराठ्यांनी रजपुतांचा विश्वास गमावला तर कुंभेरीच्या प्रकरणात जाट दुखावले. या रजपूतांच्या अंतर्गत राजकारणात

मराठ्यांनी ढवळाढवळ केली. परिणामी जाट रजपुतांनी उत्तरेत मराठ्यांना सहकार्य केले नाही. याचा दुष्परिणाम पानिपतात पराभवास सामोरे जावे लागले.

**१०) अन्नपाण्याचा गंभीर प्रश्न व बाजारबुणग्यांचा भरणा :**

पानिपतच्या लढाईचे नेतृत्व भाऊसाहेबांकडे होते. तत्पर व जलद हालचाली झाल्या नाहीत. सोबत बाजारबुणगे घेतल्यामुळे अन्नपाण्याचा प्रश्न गंभीर बनला. घोडे, हत्ती, उंट मोठ्या प्रमाणात होते. त्यामुळे त्यांचा चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला. तसेच अंतर्वेदितून रसद पुरवठा करणारा गोविंदपंत बुंदेले मारला गेल्यामुळे मराठ्यांसमोर अन्नपाण्याचा प्रश्न गंभीर बनला. परिणामी पानिपतात त्यांना दारुण हार पत्करावी लागली.

**११) उत्तरेतील प्रादेशिक ज्ञानाचा अभाव :**

उत्तरेतील प्रादेशिक व भौगोलिक परिस्थितीची सदाशिवराव भाऊंना आवश्यक तेवढी माहिती असणे गरजेचे होते. भाऊसाहेब, तडफदार शूर, कार्यक्षम असले तरी मुत्सद्देगिरीत कमी पडले. उत्तरेची परिस्थिती त्यांना हाताळता आली नाही. अब्दालीने यमुना नदीला महापूर आला असता उतार शोधून नदी पार केली. मराठ्यांचा रस्ता अडविला. पानिपतच्या युध्दावेळी थंडीचे दिवस होते. भाऊसाहेबाने थंडीपासून संरक्षणाची कोणतीही व्यवस्था केली नाही. चामडी कपडे, उबदार वस्तू सोबत घेतल्या नाहीत. परिणामी थंडी, उपासमार आणि अब्दालीचे हल्ले या सर्वांमुळे पानिपतात मराठ्यांचा पराभव झाला.

**● अब्दालीची जिहादची घोषणा :**

अब्दालीने धर्मयुध्दाची घोषणा केली. तसेच रोहिले सरदार नजीखाननेही हिंदुस्थानातील सर्व मुसलमान धोक्यात असल्याचा प्रचार केला व अब्दालीला भारतावर आक्रमणासाठी निमंत्रण दिले. मराठे उच्च ध्येयाने देशाच्या रक्षणासाठी व परकीय शत्रुला हुसकावून लावण्यासाठी पानिपतावर लढले. तर अब्दालीने या संघर्षाला धर्मयुध्दाचे स्वरूप देऊन आपल्या विजयाचा मार्ग सोपा केला. अशा प्रकारे पानिपतच्या या तिसऱ्या युध्दात मराठ्यांचा दारुण पराभव झाला. नानासाहेब पेशव्यांचे सरदारकी काम करावे हे धोरण पानिपतच्या पराभवास कारणीभूत ठरले. उत्तरेच्या राजकारणाची बिघडलेली अवस्था सावरण्यासाठी नानासाहेब पेशव्यांनी जाणे आवश्यक होते. पण असे घडले नाही.

वरील सर्व कारणांमुळे मराठ्यांचा पानिपतात दारूण पराभव झाला.

**● पानिपतच्या युध्दाचे परिणाम :**

पानिपतच्या तिसऱ्या युध्दाने मराठ्यांच्याच नव्हे तर भारताच्या इतिहासावर दुरगामी परिणाम झाले. जदुनाथ सरकार म्हणतात- '१७६१ च्या पानिपतच्या युध्दाने मराठ्यांना जबरदस्त धक्का बसला'. एल्फिस्टन म्हणतात- 'पानिपतात मराठ्यांचा सर्वांगीण आणि पूर्ण पराभव झाला'. डॉ. एस. एन. सेनच्या मते 'पानिपतात मराठ्यांचा पराभव झाला पण मराठ्यांचा सर्वनाश झाला असे म्हणणे धाडसाचे ठरेल. पानिपतच्या पराभवामुळे मराठ्यांच्या साम्राज्य विस्ताराला आळा बसला असे म्हणणे उचित होईल.' इतिहासकार सरदेसाई म्हणतात- 'पानिपतावर

मराठे संपले नाहीत तर मराठी सत्तेचा उत्कर्षच होत गेला. माधवराव पेशवे, महादजी शिंदे, नाना फडणीस यांनी पुढील काळात पानिपतच्या पराभवाचा कलंक धुवून काढला व मराठी सत्तेला पुन्हा वैभवाचे स्थान मिळवून दिले.' अशा या युध्दाचे परिणाम खालीलप्रमाणे -

**१) मराठ्यांच्या कर्तबगार पुरुषांची एक पिढी युध्दात मारली गेली :**

पानिपतच्या पराभवाची बातमी नानासाहेब पेशव्यास एका व्यापाऱ्याच्या पत्रावरून मिळाली. ''दोन मोती गळाले, २७ मोहरा हरविल्या, अनेक रुपये, पैसा याचा खुर्दा झाला याचे गणित नाही. जदुनाथ सरकारच्या मते ''महाराष्ट्रात असे एकही घर नव्हते की ज्या घरातून पानिपतच्या लढाईत कोणी मृत झाले नाही, जणू महाराष्ट्रातील एक पिढीच गारद झाली. या युध्दात मराठ्यांचे मातब्बर सरदार सदाशिवरावभाऊ, विश्वासराव, इब्राहीमखान गारदी, यशवंतराव पवार, जनकोजी शिंदे, तुकोजी शिंदे, बळवंतराव मेहंदळे, संताजी वाघ, गोविंदपंत बुंदेल, अंताजी माणकेश्वर, समशेरबहाद्दर असे मातब्बर सेनानी मारले गेले.

**२) नानासाहेब पेशव्यांचा शेवट :**

पानिपत युध्दाच्या पराभवाची बातमी नानासाहेब पेशवे यांना समजताच उत्तरेच्या राज्यकारभाराची व्यवस्था लावण्यासाठी स्वतः नानासाहेब झाशीजवळील पच्छोरपर्यंत गेले होते. पण उपयोग झाला नाही. नानासाहेबांच्या मनावर मोठा आघात झाला. २३ जून १७६१ रोजी पुण्यातील पर्वती येथे त्यांनी भाऊ... भाऊ... आक्रोश करीत आपला प्राण सोडला.

**३) मराठ्यांचे उत्तरेतील वर्चस्व नष्ठ झाले.**

पानिपतच्या पराभवाने मराठ्यांच्या अजिंक्यपणास तडा गेला. अटकेपार मारलेल्या मराठ्यांच्या भरारीस पानिपतच्या युध्दाने तडा गेला.

**४) मराठ्यांच्या राजकीय वर्चस्वाला जोरदार धक्का**

नानासाहेब पेशव्यांच्या काळात मराठे किंगमेकर होते. दिल्लीचा मुघल बादशहा कोण हे पुण्यातून ठरत होते. मराठा सरदारांची उत्तरेकडे प्रचंड घोडदौड, दबदबा व वचक होता. परंतु पानिपतच्या पराभवाने मराठ्यांच्या राजकीय वर्चस्वाला मोठा धक्का बसला.

**५) अब्दालीचेही नुकसान झाले. पुन्हा तो भारताकडे आला नाही.**

पानिपतमध्ये मिळालेला विजय अब्दालीला महागडा पडला. त्याच्याही सैन्याचे मोठे नुकसान झाले. म्हणून त्याने पुन्हा हिंदुस्थानावर स्वारी केली नाही.

**६) पंजाबमध्ये शीख सत्ता वाढीस लागली.**

पानिपतचे युध्द हे पंजाबच्या प्रश्नावरून निर्माण झाले होते. पण मराठ्यांचाच पराभव झाल्याने पुन्हा मराठ्यांनी या प्रांताकडे लक्ष दिले नाही. अब्दालीही मायदेशी निघून गेला. परिणामी पंजाबमध्ये शीख सत्तेचा उदय झाला.

**७) बंगाल व मद्रास येथे इंग्रजांनी पाय रोवले.**

पानिपतच्या युध्दाचा मोठा परिणाम म्हणजे उत्तर भारतात पोकळी निर्माण झाली. याचा फायदा इंग्रजांना मिळाला. १७५७ च्या प्लासीच्या लढाईत इंग्रजांनी बंगालमध्ये ब्रिटिश सत्तेचा पाया घातला. उत्तर भारतात इंग्रजांना कोणताही प्रबळ स्पर्धक उरला नाही.

**८) सातारा-कोल्हापूर गादी जोडण्याची कल्पना मागे पडली.**

**९) जानोजी भोसल्यांचे वजन वाढले.**

रघुजी भोसल्यानंतर भोसले घराण्यातील जानोजी भोसले वर्चस्व निर्माण झाले.

**१०) मल्हारराव, राघोबा यांचे खरे स्वरूप कळले.**

पानित युध्दानंतर रघुनाथराव दादाचा उदय झाला. त्याच्या मनात पेशवा होण्याची लालसा निर्माण झाली. यामुळे मराठी सत्तेचे प्रचंड नुकसान झाले.

**१०) मराठ्यांच्या अजिंक्यपणास तडा गेला.**

पानिपत युध्दातील पराभवाने मराठे अजिंक्य आहेत, त्यांचा कोणीही पराभव करू शकत नाही, या विचाराला ठोकर बसली. उत्तरेकडील राजकारणात पोकळी निर्माण झाली.

**११) दक्षिणेस हैदरअलीचा उदय झाला.**

पानिपता युध्दातील पराभवाने मराठ्यांचे कर्नाटक प्रांताकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे कर्नाटकातील शत्रूंनी डोके वर काढले. पश्चिम किनारपट्टीवर जंजिऱ्याचा सिद्दी कारवाया करू लागला. हैदराबाद येथे निजामाचा उदय झाला तर म्हैसूर येथे हैदरअलीने आपले वर्चस्व निर्माण केले.

**१२) मोगल सत्ता दुबळी बनली**

पानिपतच्या तिसऱ्या युध्दातील पराभवाने मोगल सत्तेचे प्रचंड नुकसान झाले. सन १७६१ ते १७७२ या काळात मोगल बादशहाला दिल्लीत प्रवेश मिळाला नाही. पानिपतनंतर मोगल सत्तेची वाताहत झाली व पुढील काळात महादजी शिंद्यांनी रोहिल्यांच्या हाती गेलेली मोगल बादशाही पुन्हा मोगल बादशहाकडे सुपुर्द केली.

अशा प्रकारे पानिपतावर मराठे संपले नाहीत तर या युध्दामुळे मराठी सत्तेला धक्का बसला. उत्तरेकडील गेलेले वर्चस्व माधवराव पेशवे, महादजी शिंदे व नाना फडणीस यांनी पुन्हा मिळविले.

या युध्दाबद्दल इतिहासाकारांच्या खालील प्रतिक्रिया दिसतात.

श्री. नाडकर्णी म्हणतात- ''पानिपतचा पराभव हा मराठ्यांचा नैतिक विजय होता.''

इतिहासकार सरदेसाई म्हणतात- या पराभवाने भारतात तिसऱ्या इंग्रज सत्तेचा उदय प्लासीच्या लढाईने झाला. डॉ. श्रीवास्तव म्हणतात- पानिपतचे युध्द हे निर्णायक होते.

## २.५ सारांश :

सन १७४० ते १७६१ हा नानासाहेब पेशव्यांचा कालखंड दोन विभागात विभागलेला दिसून येतो. पहिला १७४० ते १७४९ या काळात छत्रपती शाहूंच्या आज्ञेनुसार त्यांनी केलेली कामगिरी महत्त्वपूर्ण होती. सन १७४० मध्ये ते पेशवे बनले. बाबुजी नाईक बारामतीकर यांना पेशवेपद मिळण्यासाठी रघुजीने मोठे प्रयत्न केले. पण उपयोग झाला नाही. नानासाहेब पेशव्यांचा प्रामाणिकपणा पाहून छत्रपती शाहूंनी सन १७४० मध्ये त्यांना पेशवेपदाची वस्त्रे दिली. नानासाहेबांनी तुळाजी आंग्रेचे बंड मोडून काढले. नागपूरच्या रघुजी भोसलेंचा पाडाव केला. निजामाचा बंदोबस्त केला तर उत्तरेत रघुनाथराव दादा व शिंदे होळकर यांच्या मदतीने मराठ्यांचे वर्चस्व निर्माण केले. अशा प्रकारे या पहिल्या कालखंडामध्ये नानासाहेब पेशव्यांनी छत्रपती शाहू महाराजांचा विश्वास संपादन केला आणि मराठी सत्तेचा सर्वत्र नावलौकिक केला. सन १७४९ मध्ये छत्रपती शाहूंचा मृत्यू झाला. १७४९ ते १७६१ हा नानासाहेब पेशव्याचा कर्तबदारीचा दुसरा कालखंड. या काळात सातारा राजधानीचे महत्त्व कमी होऊन पुणे ही पेशव्यांनी राजधानी बनविली. नानासाहेब पेशवे हेच पुढील काळात सर्वेसर्वा बनले. साताराचे छत्रपती रामराजे हे राज्य कारभाराबाबत अनभिज्ञ होते. त्यामुळे नानासाहेब पेशवे यांना राज्य कारभाराचे अधिक स्वातंत्र्य मिळत गेले.

नानासाहेब पेशव्याच्या आयुष्यातील बरीच वर्षे उत्तरेच्या राजकारणात गेली. मात्र सन १७४९ नंतर ''सरदारकीने काम करावे'' या धोरणानुसार त्यांनी उत्तरेच्या राजकारणाची जबाबदारी आपले बंधू रघुनाथराव दादा यांचेकडे दिली. त्यांच्या मदतीस शिंदे-होळकर हे मातब्बर सरदार दिले. नानासाहेबांनी, बंगाल, मेवाड, बुंदेलखंड, जयपूर, जोधपूर या प्रकरणात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. रघुनाथराव दादांच्या मदतीने अटकेपार झेंडे लावले. तर सदाशिवरावभाऊंच्या मदतीने उदगीरच्या तहानुसार निजामाचा दारुण पराभव केला. नानासाहेब पेशव्यांच्या काळात मराठे हे किंगमेकर बनले होते. नानासाहेबांनी पुण्याचे महत्त्व वाढविले. पुण्यामध्ये इन्फ्रास्ट्रक्चरच्या माध्यमातून पुण्याचा कायापालट केला. शेती, उद्योग, व्यापार, महसूल या सर्वच क्षेत्रात त्यांनी उत्तम प्रशासन केले. एक उत्तम प्रशासक म्हणून त्यांची कामगिरी ही अविस्मरणीय ठरली. पानिपतचा पराभव ही त्यांच्या कार्याची एक बाजू होती. परंतु त्याच्या कारकिर्दीतील दुसरी बाजू त्यांनी केलेला साम्राज्यविस्तार, वडील बाजीराव पेशवे यांचे लढायाच्या माध्यमातून झालेले कर्ज, पुणे राजधानीचे महत्त्व व सुधारणा, शेती महसूल, उद्योग, व्यापार या माध्यमातून त्यांनी केलेले आर्थिक व्यवस्थापन आणि प्रशासन, मराठी सत्तेचा केलेला विस्तार ही त्यांची दुसरी बाजू महत्त्वपूर्ण ठरते. यामुळे नानासाहेबांचे कर्तृत्व निर्विवादपणे मान्य करावे लागेल. नानासाहेबांनी केलेली राज्याची मजबूत अर्थव्यवस्था यासाठी फडणीसी खाते अधिक कार्यक्षम केले. कारकून, वतनदार, जहागीर, सरदार यांच्या कारभारावर वचक ठेवून गैरव्यवहार कमी केला. देणेकरी, सावकार यामध्ये रघुनाथ भट, पटवर्धन, ब्रम्हेंद्र स्वामी, बाबुजी नाईक बारामतीकर या सावकारांची देणी फेडून टाकली. पोर्तुगीजांचा बंदोबस्त केला. नानासाहेबांच्या काळात छत्रपतींना राज्यकारभारात फारसे लक्ष देता आले नाही. त्यामुळे सर्वच कारभार पेशव्यांच्या कर्तृत्वावर अवलंबून होता. म्हणूनच नानासाहेब पेशवे यांचे नाव श्रेष्ठ पेशवा म्हणून इतिहासात नोंदवले गेले. श्री. पुणतांबेकर म्हणतात- ''बाळाजी बाजीरावच्या कारकिर्दीने मराठा राज्याचा उत्कर्ष बिंदू

पाहिला. भारताच्या वेगवेगळ्या भागात मराठ्यांच्या तलवारीचा खणखणाट ऐकला. मराठ्यांचे यश पाहिले, त्यांची कारकिर्द भारताच्या राजकीय सत्तास्पर्धेत यशस्वी झालेले दिसून येते.

## २.६ स्वयंअध्ययानासाठी प्रश्न :

**प्रश्न – योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१) पानिपतचे तिसरे युध्द ............... रोजी झाले.

अ) २३ जून १७५७ ब) १४ जानेवारी १७६१
क) १५ जानेवारी १७६२ ड) २४ जून १७५८

२) पानिपतच्या तिसऱ्या युध्दात ............... हा मराठ्यांचा तोफखानाप्रमुख होते.

अ) शहावल्लीखान ब) गाजीउद्दीन क) इब्राहीमखान गारदी ड) आदिना बेग

३) अब्दालीने .............. हिला सुलतान मिर्झा हा किताब दिला.

अ) मुगलानी बेगम ब) आदिना बेगम
क) बडीसाहेबा बेगम ड) मदिना बेगम

४) जाटांचा .................... हा प्रसिध्द नेता होता.

अ) कमरुद्दीन ब) ईश्वरसिंह क) माधोसिंह ड) सूरजमल

५) अब्दालीचा ................. हा मुलगा अफगाणिस्तानात पळून गेला.

अ) मिर मन्नू ब) तैमूरशहा क) सफदरजंग ड) कमरुद्दीन

**उत्तरे –**

१) ब) १४ जानेवारी १७६१ २) क) इब्राहीमखान गारदी
३) अ) मुगलानी बेगम ४) ड) सूरजमल
५) ब) तैमूरशहा

**प्रश्न : एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) कुंभेरीच्या वेढ्यात मल्हारराव होळकरचा पुत्र मारला, त्याचे नाव सांगा.

२) मराठ्यांना अंतर्वेदितून रसद पुरविणारा प्रसिध्द सरदार कोण?

३) 'बचेंगे तो और भी लढेंगे' असे बाणेदार उत्तर कोणी दिले?

४) मराठ्यांनी कुंजपुरा जिंकून कोणाचे शीर कापून दत्ताजी शिंदेचा वधाचा बदला घेतला?

५) अब्दालीला हिंदुस्थानावर स्वारी करण्याचे निमंत्रण कोणी दिले?

**उत्तरे –**

१) कुंभेरीच्या वेढ्यात मल्हारराव होळकरचा पुत्र मारला, त्याचे नाव खंडेराव होळकर होते.

२) मराठ्यांना अंतर्वेदितून रसद पुरविणारा प्रसिध्द सरदार गोविंदपंत बुंदेले हे होते.

३) 'बचेंगे तो और भी लढेंगे' असे बाणेदार उत्तर दत्ताजी शिंदे या सरदाराने दिले.

४) मराठ्यांनी कुंजपुरा जिंकून कुतुबशहा शीर कापून दत्ताजी शिंदेचा वधाचा बदला घेतला.

५) अब्दालीला हिंदुस्थानावर स्वारी करण्याचे निमंत्रण नजीबखान या रोहिले सरदारने दिले.

## २.५ सरावासाठी प्रश्न :

१) नानासाहेब पेशवे यांची प्रारंभीची कामगिरी स्पष्ट करा.

२) नानासाहेब पेशवे व रघुजी भोसले यांच्यातील संघर्षाची माहिती लिहा.

३) नानासाहेब पेशवे व आंग्रे यांच्यातील संघर्षाची माहिती लिहा.

४) पानिपतच्या तिसऱ्या युध्दाची कारणे सांगा.

५) पानिपतमध्ये मराठ्यांच्या पराभवाची कारणे सांगा.

६) पानिपतच्या तिसऱ्या युध्दाचे वर्णन करा.

७) पानिपतच्या तिसऱ्या युध्दाचे परिणाम लिहा.

**टिपा लिहा.**

१) नानासाहेब पेशवे व रघुजी भोसले संबंध

२) शुक्रतालची लढाई व दत्ताजी शिंदे

३) आंग्रे व नानासाहेब पेशवे

४) पानिपतची तिसरी लढाई १४ जानेवारी १७६१

५) नानासाहेब पेशव्यांच्या उत्तर स्वाऱ्या

६) कुंभेरीचा वेढा

७) छत्रपती शाहू

८) कुंजपुऱ्यावरील विजय (१७ ऑक्टोबर १७६०)

९) सदाशिवरावभाऊ

१०) विश्वासराव

## २.७ संदर्भग्रंथ सूची :

**मराठी :**


१. गो. स. सरदेसाई, मराठी रिसासत भाग १, २, ३

२. प्र. न. देशपांडे, मराठी सत्तेचा उदय आणि उत्कर्ष

३. जयसिंगराव पवार, महाराणी ताराबाई, मराठी साम्राज्याचा उदय आणि अस्त

४. त्र्यं. श. शेजवलकर, श्री शिवछत्रपती, पानिपत १७६१, निजाम-पेशवे संबंध.

५. न. र. फाटक (अनु.), मराठी सत्तेचा उत्कर्ष.

६. वि. का. राजवाडे (संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड १ ते २२

७. डॉ. आप्पासाहेब पवार - जिजाबाईकालीन कागदपत्रे.


❖❖❖

## घटक – ३

# पानिपत युद्धानंतर मराठा राजकारण

**अनुक्रमणिका**

३.१. उद्दिष्टे

३.२. प्रास्ताविक

३.३. विषय विवेचन

३.४. पेशवे माधवराव

३.५. महादजी शिंदे

३.६. नाना फडणीस

३.७. स्व–अध्ययन प्रश्न व परिशिष्ट्ये

### ३.१ उद्दिष्टे :

१) या घटकाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थ्यांना इ. स. १७६१ नंतरच्या पानिपत युद्धानंतर मराठा राजकारणामध्ये घडून आलेले बदल लक्षात येण्यास मदत होईल.

२) पेशवा माधवराव यांचा उदय त्यांच्यासमोर अडचणी त्यांचे कार्य याची ओळख होण्यास मदत होईल.

३) महादजी शिंदे यांचे कार्य व कर्तृत्व याची ओळख होईल.

४) मराठ्यांचा इतिहासात नाना फडणीस यांचे स्थान काय होते? हे अधोरेखित करण्यास मदत होईल.

### ३.२ प्रास्ताविक :

इ. स. १७६१ च्या पानिपत युद्धापूर्वी जवळजवळ पन्नास ते साठ वर्षे मराठा हे उत्तर भारताच्या राजकारणात एक प्रभावी सत्ता म्हणून वावरत होते. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर दिल्लीची मोगलशाही उत्तर भारताच्या राजकारणातून केव्हाच गायब झाली होती. उत्तरेत थोड्याफार प्रमाणात रजपूत व जाट सत्ता कार्यरत असल्या तरी मराठ्यांपुढे त्यांचा प्रभाव होता. दक्षिणेत निजाम व बंगालमध्ये इंग्रज सोडल्यास अठराव्या शतकाच्या पूर्वार्धात संपूर्ण भारताचा राजकारणामध्ये सगळ्यात प्रभावी सत्ता म्हणून मराठ्यांचा वावर होता. इ. स. १७६१ च्या पानिपत युद्धामध्ये झालेल्या पराभवामुळे मराठ्यांची अपरिमित हानी झाली. त्याचा परिणाम एकंदरीत मराठा राजकारण व त्याचबरोबर संपूर्ण भारताच्या राजकारणावर झाला होता.

## ३.३ विषय विवेचन :

पानिपत युद्धापूर्वी मराठ्यांचा दबदबा पाहता पुढील काळात मराठे भारतीय राजकारणामध्ये सर्वात प्रभावी होतील असा अंदाज बांधला जात होता. पानिपत युद्धामुळे मराठ्यांच्या परिस्थितीवर पाणी पडले. या पराभवामुळे मराठ्यांचा अखिल भारतीय सत्ता म्हणून स्थापन होण्यास अडथळा निर्माण झाला. त्याचा फायदा घेऊन इंग्रज व इतर प्रादेशिक सत्तांनी आपले वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला. असे असले तरी इ.स. १८१८ पर्यंत मराठ्यांचा इंग्रजांकडून पराभव होईपर्यंत मराठ्यांचे भारतीय राजकारणातील महत्त्व कमी झाले नाही. याचे कारण म्हणजे मराठा राज्य संवर्धनासाठी अनेक व्यक्तींनी आपले योगदान दिले होते त्यामध्ये पेशवे माधवराव, महादजी शिंदे, नाना फडणीस यासारख्या व्यक्तींचा महत्त्वाचा वाटा होता.

१४ जानेवारी १७६१ रोजीच्या पानिपत युद्धामुळे मराठ्यांची प्रचंड जीवित व वित्तहानी झाली. महाराष्ट्राची कर्तृत्वान पिढी यामध्ये गारद झाली होती. पानिपत युद्धात सदाशिवराव व विश्वासराव यांचा झालेल्या मृत्यूचा धक्का पेशवे नानासाहेब यांना सहन झाला नाही. अशातच २३ जानेवारी १७६१ रोजी पर्वतीवर त्यांचे निधन झाले. पानिपत युद्धानंतर निर्माण झालेल्या विचित्र परिस्थितीत माधवराव यास पेशवेपद मिळाले. या काळात उत्तर व दक्षिण भारताच्या राजकारणामध्ये मराठ्यांचे स्थान काही अंशी कमी झाले होते. उत्तरेत व दक्षिणेत इंग्रजांचा प्रभाव वाढत होता. शीख पंजाबमध्ये, रजपुत राजस्थानमध्ये आपले राज्य विस्तारित करण्याचा प्रयत्न करत होते. त्याचप्रमाणे पेशवे माधवराव यांच्यापुढे अंतर्गत कलहामुळे मोठा प्रश्न निर्माण झाला होता. अशा परिस्थितीतही माधवराव पेशवे यांनी गृहकलह नष्ट करून मराठ्यांची सत्ता पूर्ववत करण्याचा प्रयत्न केला. निजाम, हैदर अली यांचा पराभव करत कर्नाटकामध्ये वर्चस्व निर्माण केले. राघोबादादा व जानोजी भोसले यांचा बंदोबस्त केला. त्याचप्रमाणे इंग्रजांना मराठा राजकारणापासून दूर ठेवत जाट यांना वर्चस्वाखाली आणले. ही सर्व कामगिरी त्यांनी सोळा वर्षाच्या कारकिर्दीत पूर्ण केली या सर्व परिस्थितीचा अभ्यास आपण सदर घटकांमध्ये करणार आहोत.

## ३.४ पेशवे माधवराव (इ. स. १७६१ ते १७७३)

### ३.४.१ पेशवे माधवराव जन्म, बालपण, शिक्षण :



माधवराव पेशव्यांचा जन्म इ. स. १७४५ मध्ये बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब व गोपिकाबाई यांच्या पोटी झाला. त्यांना दोन भाऊ होते. मोठा भाऊ विश्वासराव, लहान भाऊ नारायणराव हे होते. माधवराव यांची आई अत्यंत करारी स्वाभिमानी व राजकारणी स्त्री होती. तर वडील नानासाहेब पेशवे हे अत्यंत मुत्सद्दी धोरणी व कावेबाज होते. त्यामुळे सहाजिकच त्यांचा प्रभाव पेशवे माधवराव यांच्या जीवनावर जाणवतो. नानासाहेब पेशव्याच्या मृत्यूनंतर पेशवे घराण्यात रघुनाथराव व गोपिकाबाई या दोन व्यक्तींचा वावर होता रघुनाथराव हे अत्यंत चंचल दुसऱ्याच्या तंत्राने वागणारे होते तर गोपिकाबाई अत्यंत करारी राजकारणी असल्यामुळे पेशवेपद माधवराव यांना मिळावे अशी त्यांची इच्छा होती. शेवटी सर्वानुमते माधवराव यांना महाराणी ताराबाईंच्या

संमतीने छत्रपती रामराजांकडून २० जुलै १७६१ रोजी पेशवाईची वस्त्रे प्रदान करण्यात आली. यावेळी बाबा पुरंदरे यांना मुखतारी सखारामबापू बोकील यांना दिवाणगिरीची वस्त्रे मिळाले. रघुनाथराव यांना नाममात्र सल्लागाराची भूमिका देण्यात आली होती. पेशवा माधवराव व रघुनाथराव यांच्यात संघर्षास सुरवात झाली. रघुनाथराव उर्फ राघोबादादा हे पहिला बाजीराव पेशवे यांचा मुलगा व नानासाहेब पेशवे यांचे लहान बंधु होते. पेशवेपद नानासाहेब यांच्यानंतर आपणास मिळावे ही त्यांची मनोमन इच्छा होती. पेशवेपद माधवरावांना मिळाल्यामुळे रघुनाथराव यांच्या आशेवर पाणी पडले. त्याचीच परिणीती पुढील काळामध्ये पेशवा माधवराव व रघुनाथराव यांच्या संघर्षात झाली. रघुनाथराव यांनी पेशवा माधवराव यांना मदत करण्याऐवजी पेशव्यांच्या पुढे अनेक अडचणी निर्माण कशा होतील याचा विचार केला होता.

**३.४.२ पेशवा माधवराव व रघुनाथराव यांच्यामधील संघर्षाची कारणे :**

१) रघुनाथराव यांना पेशवे पदाचे असणारी लालसा

२) कमी वयाच्या माधवराव यांनी आपल्या वर्चस्वाखाली राहावे ही रघुनाथरावांची इच्छा

३) पेशवे माधवराव यांना पेशवेपदाची वस्त्रे मिळताच हा संघर्ष अधिक तीव्र

४) पेशवे माधवराव यांच्या शत्रूचा पक्ष राघोबा घेत असल्याने माधवराव यांच्यापुढे निर्माण केलेल्या अनेक अडचणी ही प्रामुख्याने पेशवे माधवराव व रघुनाथराव यांच्यामधील संघर्षाची कारणे होती.

**३.४.३ दोन्ही गटांची निर्मिती :**

रघुनाथराव व पेशवे माधवराव यांच्यामधील संघर्षाचा परिणाम मराठा सरदारावर होण्यास सुरुवात झाली. या संघर्षामुळे मराठा सरदार दोन भागात विभागले गेले होते. पेशवा माधवराव यांच्या गटांमध्ये पटवर्धन, त्रिंबकराव पेठे, बाबुराव फडणीस, बापूजी नाईक बारामतीकर यांचा समावेश होता. तर रघुनाथराव यांच्या गटांमध्ये सखाराम बापू बोकील, मल्हारराव होळकर, दमाजी गायकवाड, इंग्रज, निजाम, हैदर अली यासारख्या सरदारांचा पाठिंबा होता. पेशवा माधवराव व रघुनाथराव यांच्यामध्ये गृहकलहामुळे पानिपत युद्धानंतर मराठा राज्य सावरण्यास आता कुठेतरी सुरुवात झाली होती. अशा प्रसंगामुळे अनेक प्रश्न निर्माण होण्यास सुरुवात झाले होते. या वेळेस या सर्व परिस्थितीचा अंदाज घेऊन गोपिकाबाई व इतर मंडळींनी हा संघर्ष मिटवण्यासाठी आटोकाट प्रयत्न केला. मात्र त्यात त्यांना यश आले नाही. पेशवे माधवराव यांनीही सावध पवित्रा घेत सखारामबापू बोकील यांना कारभारातून निवृत्त करत त्यांची जबाबदारी त्रिंबकराव पेठे व बाबुराव फडणीस यांच्याकडे सोपवली. त्यामुळे त्यामुळे रघुनाथराव नाराज झाले. आम्ही व सखारामबापू यांना कारभारातून कारभार सोडवून बापूराव फडणीस यांना दिला. आम्ही भोळे जे मनात येईल ते बोलतो आम्हास दौलत करण्याची तिळमात्र हाऊस नाही. अशा प्रकारची निवृत्तीची भाषा करीत रघुनाथरावांनी अंतर्गत कटकारस्थाने करण्यास सुरुवात केली यातूनच आळेगावचे युद्ध घडून आले.

**३.४.४ आळेगावचे युद्ध – १२ नोव्हेंबर १७६२ :**

पानिपत युद्धातील मराठ्यांचा पराभव, रघुनाथराव व पेशवे माधवराव यांच्यामधील गृहकलह याचा फायदा घेण्याचा प्रयत्न अनेक मराठा विरोधकांनी केला. त्यामध्ये हैदरअलीचा समावेश होता. हैदरअलीचा बंदोबस्त

करण्यासाठी जानेवारी १७६२ मध्ये पेशवे माधवराव व रघुनाथराव यांनी संयुक्त स्वारी काढली. मात्र वाटेत दोघांमधील मतभेदांनी टोकाचे पाऊल गाठले. रघुनाथराव यांनी मोहीम अर्धवट सोडून पुण्याकडे प्रयाण केले. यावेळी रघुनाथराव यांनी उत्तरेत मल्हाराव होळकर यांना बोलावून घेतले. ही गोष्ट लक्षात येताच हैदरअली विरोधातील मोहिमेचे नेतृत्व गोपाळराव पटवर्धन यांच्याकडे सोपवून पेशवे माधवराव पुण्यास परतले. यावेळी पुण्यातील वातावरण पराकोटीचे संशयपूर्ण होते. म्हणून पेशवा माधवराव यांनी तडजोडीचे धोरण स्वीकारले. रघुनाथराव यांनी पाच महत्त्वाचे किल्ले व वार्षिक दहा लाख उत्पन्नाच्या जहागिरीची मागणी केली. ही मागणी मान्य होण्यासारखी नव्हती. यामुळे संघर्ष अधिक वाढला. माधवराव यांच्याकडून रघुनाथराव यांना कैद केले जाणार या अफवेमुळे रघुनाथराव यांनी आपला मोर्चा विंचूरकडे वळवीत सैन्याची जमवाजमव करण्यास सुरुवात केली. रघुनाथराव आणि मल्हारराव होळकर, सखाराम बापू बोकील, बाबा पुरंदरे, नारोशंकर, विठ्ठल शिवदेव व पन्नास हजारांची फौज तयार केली. पेशवे माधवराव यांनीही गोपाळराव पटवर्धन, पिराजी नाईक, त्रिंबकराव पेठे यांना आपल्या पक्षात घेऊन नाईलाजास्तव युद्धाची तयारी केली. यातून ७ नोव्हेंबर १७६२ रोजी घोडनदीच्या काठी पेशवे माधवराव व रघुनाथराव यांच्यामध्ये प्रथम उघड संघर्ष घडून आला. यात कोणत्याही पक्षास निर्णायक यश मिळाले नाही. पुढे भीमा नदीकाठी माधवराव हे बेसावध असताना पेशव्यांच्या सैन्यावर रघुनाथरावानी अचानक हल्ला करत माधवरावाचा पराभव केला व त्यांना कैद केले. माधवरावांच्या विरोधात १२ नोव्हेंबर १७६२ आळेगावच्या युद्धात निजामाने केलेली मदत लक्षात घेऊन रघुनाथराव यांनी उदगीरच्या तहाने मराठ्यांना दिलेला ६० लक्ष उत्पन्नाचा प्रदेश व दौलताबादचा किल्ला निजामास परत केला. या काळात पेशवे माधवराव, गोपिकाबाई यांना नजरकैदेत ठेवले होते. याच काळात मराठ्यांच्या राजकारणामध्ये तीन शहाण्यांचा वावर होता. त्यामध्ये जानोजी भोसले यांचा दिवाण देवजी पंत, निजामाचा दिवाण विठ्ठल सुंदर, रघुनाथराव यांच्याकडून सखाराम बापू बोकील यांचा समावेश होता. या काळात निजाम व इतरांच्या सहाय्याने जानोजी भोसले यास छत्रपती पद व रघुनाथराव यांना पेशवे पद देण्याचा घाट घातला गेला. याच काळात त्रिंबकराव पेठे, बाबुराव फडणीस यांना कामावर निवृत्त करून त्यांची जागा सखारामबापू बोकील यांना दिली. रामचंद्र जाधव यांना सेनापती पद बहाल केले. तर चित्तो रायरीकर यास फडणीस पद बहाल करण्यात आले.

पेशवे माधवराव यांचा पक्ष कमजोरी करण्याचा त्याच्या पक्षातील अनेक सरदारांना आपल्या पक्षात वळवण्याकरता अनेक प्रलोभने या काळात दाखवण्यात आली. त्यामध्ये मिरजेच्या पटवर्धनांचा समावेश होता. पटवर्धन पेशवे माधवराव यांच्याशी एकनिष्ठ असल्यामुळे रघुनाथराव व पटवर्धन यांच्यात संघर्ष सुरु झाला. यावेळी रघुनाथराव यांनी मोठ्या सैन्यासह २९ डिसेंबर १७६२ रोजी मिरजेच्या किल्ल्याला वेढा दिला. पुढे काही कालावधीनंतर गोपाळराव पटवर्धन यांनी मिरजेचा किल्ला रघुनाथराव यांच्याकडे सुपुर्द करण्यात केला. पुढे बाबा पुरंदरे यांनी जमखंडीजवळ गोपाळ पटवर्धन यांचा पराभव केला.

**३.४.५ साठ–चाळीसचा करार :**

पेशवे माधवराव व रघुनाथराव यांच्यातील संघर्ष, पेशवे माधवराव यांना कैद केल्यानंतर गोपाळराव पटवर्धन हे ही निजामाला सामील झाले. त्यामुळे निजामाची बाजू अधिक मजबूत बनली. मराठा राज्य संपुष्टात आणण्यासाठी

निजामाने प्रयत्न करण्यास सुरुवात केली. निजामाचा दिवाण विठ्ठल सुंदर व प्रतिनिधीचा मुतालिक यमाजी गामाजी यांच्या पुढाकाराने ९ फेब्रुवारी१७६३ रोजी गुलबर्गा याठिकाणी निजाम व जानोजी भोसले यांच्यात एक करार घडून आला. त्यास साठ-चाळीस करार असे ओळखले जाते. या कराराद्वारे पेशव्याच्या परदेशातून मिळालेल्या लुटीचा ६० टक्के हिस्सा निजामाला तर ४० टक्के हिस्सा भोसले यांना देण्याचे ठरले. तसेच जानोजी भोसले यांना छत्रपती पद मिळवून देण्यासाठी निजामाने सहाय्य करण्याचे मान्य केले होते.

### ३.४.६ राक्षसभुवनची लढाई व रघुनाथराव पेशवे माधवराव यांच्यामध्ये समेट :

निजामाची ४५,००० भोसलेंची ३०,००० फौजेंनी पेशव्याचा प्रदेश उद्धस्त करण्यास सुरुवात केली. यावेळी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पेशवा माधवराव व रघुनाथराव हे एकत्र आले. या दोघांच्या संयुक्त फौजांनी अनेक लढाईमध्ये निजामाच्या फौजेचा पराभव केला. पुन्हा एकदा पेशवे व रघुनाथराव यांच्यामध्ये संघर्ष सुरु झाला. दक्षिणेत निजाम हा हैदर अली बरोबरच्या संघर्षात गुंतला असताना पेशवे माधवराव यांना रघुनाथराव यांनी मदत केली नाही. उलट माधवराव यांच्या मार्गात अनेक अडचणी निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. यावेळी रघुनाथराव यांनी उत्तर मोहीम काढली. रघुनाथराव यांच्या उत्तर मोहिमेमुळे मराठ्यांना फायदा होण्याऐवजी खूप अडचणींचा सामना करावा लागला. रघुनाथराव उत्तर मोहीम अर्धवट सोडून परत आल्यानंतर मोहिमेची जबाबदारी पेशवे माधवराव यांनी रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण बिनीवाले यांच्यावर सोपवली. मात्र मल्हाराव होळकर आणि विसाजी कृष्ण व रामचंद्र गणेश यांच्यामध्ये समन्वय नसल्यामुळे मराठ्यांच्या उत्तर मोहिमेत अपेक्षित यश मिळाले नाही. यावेळी रोहिले व जाट यांचे पारिपत्य करण्यात मराठे यशस्वी झाले.

### ३.४.७ रघुनाथरावाचे आव्हान :

पेशवे माधवराव यांनी रघुनाथराव यांना नेहमी सन्मानाने वागवले. परंतु त्याचा फायदा झाला नाही. आपण स्वतंत्र व अनुभवी असतानाही माधवराव यांच्या नेतृत्वाखाली काम करणे रघुनाथराव यांना मान्य नव्हते. तर दुसरीकडे पेशवे माधवरावाचा स्वभाव रघुनाथरावाच्या परस्पर विरुद्ध होता. पेशवे स्वतः महत्वकांक्षी असल्यामुळे दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या वर्चस्व वाढणे त्यांना मान्य नव्हते. त्यामुळे पेशवे माधवराव व रघुनाथराव यांच्यामध्ये अनेक वेळा संघर्ष निर्माण झाल्याचे चित्र आपणास पहावयास मिळते. पेशवे माधवराव यांनी संकट प्रसंगी मदत करण्याऐवजी उलट पेशवे माधवराव यांच्या मार्गात अनेक अडचणी निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी निजाम हैदर अली बरोबर सलोखा करण्यास मागेपुढे पाहिले नाही. आळेगावच्या लढाईत पेशवेनी माधवराव यांचा पराभव करून कैद केले. राक्षसभुवनची लढाई सोडल्यास रघुनाथरावाने माधवरावला कधीच मदत केली नाही. मराठ्यांच्या उत्तरेकडील मोहिमेत सुद्धा उत्तरेचे प्रश्न सोडवण्याऐवजी रघुनाथराव यांच्यामुळे अधिक गुंता निर्माण झाला.

### ३.४.८ घोडपची लढाई व रघुनाथरावांचे कैद :

पेशवे माधवराव-रघुनाथराव यांच्यामध्ये सामोपचाराची सर्व प्रयत्न फोल झाले. नाइलाजास्तव पेशवे माधवराव यांनी रघुनाथराव यांचा बंदोबस्त करण्याचे ठरवले. पेशवे माधवराव ससैन्य आनंदवल्ली पोहचले. पेशवे

माधवराव यांची सैन्यसंख्या पाहून आपला निभाव लागणार नाही हे ओळखून रघुनाथराव यांनी सामोपचाराची भाषा करण्यास सुरुवात केली. १३ सप्टेंबर १७६७ रोजी पेशवे माधवराव व रघुनाथराव यांची भेट चांदवड येथे झाली. हा प्रश्न सामोपचाराने सोडवायचा प्रयत्न पेशवे माधवरावांनी केला. यावेळी रघुनाथराव यांना उद्देशून ते म्हणतात 'तुमच्या मनात दौलतीचा कारभार करणे असेल तर आम्ही सांगेल तसे तुम्ही वागले पाहिजे. नाहीतर पाच लाखाची जहागिर लावून देतो तो पैसा घेऊन तुम्ही स्वस्थ बसा. दुसरे क्षेत्र आम्ही लावून देणार नाही.' यावेळी रघुनाथरावांनी एक पाऊल मागे घेत आपल्या मागण्या पेशवा माधवराव यांच्यासमोर ठेवल्या. उत्तर मोहिमेत झालेला २५ लाखाचे कर्ज फेडण्यासाठी पेशव्यांकडून पैसे मिळावेत. ठरल्याप्रमाणे सन्मानजनक जहागीर मिळावी व आपल्या ताब्यातील किल्ले मी पेशव्यांना सुपूर्त करीन. रघुनाथरावांच्या अटी मुळात माधवराव यांना मान्य होण्यासारखी नव्हती. परंतु रघुनाथराव प्रकरण काही करून मिटवण्यासाठी रघुनाथरावांच्या अटी पेशवे माधवरावाने मान्य केल्या. यावेळी त्यांच्यामध्ये आनंदवल्लीचा तह झाला. आनंदवल्लीचा तह रघुनाथराव यांनी पाळला नाही. उलट इंग्रजांची मदत घेऊन पेशवे माधवराव यांचा पराभव करण्याची योजना आखली. पुण्यातील इंग्रज वकीलाने रघुनाथराव यांना माधवरावच्या विरोधात मदत करण्यास तयार झाला होता. यावेळी घोडप येथे छावणी असताना १० जून १७६८ रोजी पेशवे माधवराव यांनी हल्ला करुन रघुनाथराव यांना कैद केले. अशाप्रकारे माधवराव यांनी पेशवेपदाची वस्त्रे मिळाल्या पासून चालत आलेल्या संघर्षाची सांगता झाली

### ३.४.९ पेशवे माधवराव व निजाम संघर्ष :

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर निर्माण झालेल्या राजकीय आस्थिरतेमुळे अनेक प्रादेशिक सत्तांनी आपले वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. त्याचप्रमाणे मोगल दरबारातील अनेक महत्त्वकांक्षी सरदारांनीही स्वतःचे राज्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. भारताच्या राजकारणामध्ये मराठा व निजाम या दोन्ही सत्तांचा उदय एकाच काळात झाला होता. या दोन्ही सत्तांनी राजकीय आस्थिरतेचा फायदा घेण्याचे लक्ष समोर ठेवले. त्यामुळे या दोन्ही सत्तांमध्ये नेहमीच संघर्षपूर्ण वातावरण होते. निजामापेक्षा मराठा सत्ता नेहमीच वरचढ होती. मात्र मराठा सरदारातील हेवेदावे, अंतर्गत अडचणी याचा फायदा घेण्यात निजाम कायमच यशस्वी झाला होता. मराठ्यांकडून अनेक वेळा पराभूत होऊनही भारताच्या राजकारणामध्ये अगदी खर्ड्याच्या लढाईपर्यंत निजामाचे महत्त्व कायम असल्याचे दिसते. इ. स. १७६० मध्ये उदगीरच्या लढाईमध्ये सदाशिवभाऊनी निजामाचा पराभव करून ६० लक्ष उत्पन्नाचा प्रदेश व दौलताबादचा किल्ला निजामाकडून मिळवला होता. पुढे पानिपतच्या लढाईमध्ये मराठ्यांचा पराभव झाल्यामुळे निर्माण झालेल्या राजकीय स्थितीचा फायदा निजामाने घेण्याचे ठरवले. यामुळे निजाम व पेशवे माधवराव यांच्यात संघर्ष घडून आला. रघुनाथराव यांनी पेशवा माधवराव यांना शह देण्यासाठी निजामाची मदत घेतली. मराठा राजकारणामध्ये हस्तक्षेप करण्याची नामी संधी निजामाला मिळाली. निजामाने सलाबतजंग, बसालतजंग, निजामअली व काही मराठा सरदार मुरारराव घोरपडे, हनुमंतराव निंबाळकर, रामचंद्र जाधव यांच्यासह अन्य सरदारांनी पेशव्याच्या प्रदेशावर हल्ले करण्यास सुरुवात केली. यावेळी अहमदनगर, श्रीगोंदा, पुणे या प्रदेशात दोन्ही सैन्यात अनेक चकमकी झाल्या. कोणत्याही पक्षास यश मिळाले नाही. या काळात निजामाचे हिंदू असहिष्णू धोरणामुळे निजामाकडील अनेक हिंदू सरदार पेशवा माधवराव व नानाच्या पक्षास येऊन मिळाले. त्यामुळे पेशवा

माधवरावाचा पक्ष अधिक मजबूत बनला. यावेळी निजामाचा पुरता बंदोबस्त करण्याची वेळ पेशवे माधवरावकडे होती. मात्र रघुनाथरावाच्या सत्तापिपासू धोरणामुळे फक्त चाळीस लक्ष रुपयांच्या खंडणी घेण्याचे मान्य करत निजामाला सोडून दिले.

### ३.४.१० राक्षसभुवनची लढाई – १७६३ :

निजामाने आपली ४५ हजारांची फौज व जानोजी भोसले यांची ३० हजाराच्या फौजेसह मराठा प्रदेशात धुमाकूळ घालण्यास सुरवात केली होती. भीमा नदीकाठी पूर्वेकडे सर्व प्रदेश आपणास द्यावा व आपण सांगेल त्या व्यक्तीस कारभारी नेमावे. माझ्या सल्लूयाने राज्यकारभार करावा. यासारख्या अनेक मागण्या पेशवे माधवरावाकडे केल्या. वरील सर्व मागण्या पेशवा माधवराव सारख्या महत्त्वकांक्षी पेशव्यास मान्य होणाऱ्या नव्हत्या. त्यातून राक्षसभुवनच्या लढाईची पार्श्वभूमी तयार होत गेली.

राक्षसभुवनची लढाई होण्याअगोदर चार-पाच महिने मराठा-निजाम संघर्ष चालू होता. दोघांकडून एकमेकांचा प्रदेश उद्धवस्त करणे चालूच होते. निजामाने पुणे व आसपासचा प्रदेश लुटला तर मराठ्यांनी हैदराबाद व त्याच्या आसपासच्या प्रदेशाकडे आपला मोर्चा वळवत नळदुर्ग, मेडक, उदगीर हा प्रदेश लुटला. यावेळेस निजामाशी संघर्ष कशाप्रकारे करायचा व यावरून मराठा सरदारांमध्ये दोन गट पडले होते. रघुनाथराव व इतर सरदारांनी गनिमीकाव्याने संघर्ष न करता निजामाशी सरळ संघर्ष करण्याचे ठरवले. होळकर व सखारामबापू यांनी सरळ सरळ संघर्ष न करूता निजामाचा पक्ष कमजोर करून त्याचा पराभव करण्यावर भर दिला. रामचंद्र जाधव, पटवर्धन, जानोजी भोसले यांना मराठ्यांकडे आणण्यात पेशवे माधवरावला यश आले. माधवरावाच्या फौजेने सन १७६३ मध्ये आकस्मात निजामाच्या सैन्यावर हल्ला केला. त्यात निजामाचा वकील विठ्ठल सुंदर मरण पावला. भीमा नदीपलीकडील आपल्या सैन्याची होणारी कत्तल पाहण्याखेरीज निजामाकडे पर्याय शिल्लक नव्हता. पुढे निजाम औरंगाबादकडे गेला. मराठ्यांनी औरंगाबादवर स्वारी केली. ३ सप्टेंबर रोजी पुन्हा युद्ध होऊन यात निजामाचा पुरता पराभव झाला. निजामाने शरणागती पत्करली. मराठ्यांनी निजामाकडे एक कोटी रुपयांची मागणी केली. रघुनाथराव यांनी यावेळी ही मध्यस्थी करत ४० लाख रुपये व नवीन २२ लक्ष उत्पन्नाचा प्रदेश मिळवला. मात्र हे सगळे कागदावरच राहिले. तो प्रदेश मराठ्यांना प्रत्यक्षात कधीच मिळाला नाही.

### ३.४.११ राक्षसभुवन लढाईचे परिणाम :

ही लढाई अनेक दृष्टीने महत्त्वाची होती

१) पेशवा माधवराव यांच्याकडे असणारे युद्ध कौशल्य सर्वांसमोर येण्यास मदत झाली.

२) मराठी राज्य पूर्वपदावर आणण्यासाठी आपण समर्थ आहोत हे दाखवून देण्यास पेशवे माधवराव यशस्वी झाला.

३) या लढाईद्वारे अंतर्गत व बाह्य शत्रूला ताब्यात ठेवण्यास आपण समर्थ आहोत ते दाखवण्यात पानिपत युद्धात गमावलेली प्रतिष्ठा परत मिळवण्यात मराठे यशस्वी झाले.

### ३.४.१२ पेशवे माधवराव हैदरअली संघर्ष (१७६४–१७६५) :

पानिपत युद्धात मराठ्यांच्या झालेल्या पराभवाचा फायदा अनेक शत्रूनी घेण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये हैदरअलीचाही समावेश होता. पेशवा माधवराव व रघुनाथराव यांच्यात निर्माण झालेल्या गृहकलहाचा अधिक फायदा माधवराव यांच्या शत्रूनी घेतला होता. हैदर अली यांचा जन्म १७२२ मध्ये सर्वसामान्य कुटुंबात झाला होता. अंगाच्या अंगभूत गुणांमुळे त्यांने राजकारणात चांगलाच जम बसवला होता. यावेळी म्हैसूरचा राजा चिक्ककृष्णदेवराय हा कार्यक्षम नसल्यामुळे सर्व सत्ता हैदरअलीच्या ताब्यात होती. या संधीचा फायदा घेत हैदर अलीने चिक्ककृष्णदेवरायास कैद केले व सर्व सत्ता आपल्या हातात घेत राज्यकारभारास सुरुवात केली. याच काळात मराठा निजाम यांच्यात संघर्षाला सुरुवात झाली होती.

याचा फायदा घेत हैदरअलीने आपले राज्य वाढवण्याचा प्रयत्न सुरू केला. शिरे, होस्कोट, बाळापूर हा मराठ्यांच्या ताब्यातील प्रदेश त्यांनी वर्चस्वाखाली घेत याची सुरुवात केली. हैदरअलीचा बंदोबस्त करण्यासाठी प्रथम कर्नाटक स्वारी सन १७६२ मध्ये पेशवा माधवरावाने काढली. मात्र या काळात माधवराव व रघुनाथराव यांच्यातील संघर्षामुळे पेशवे माधवराव यांना ही मोहीम पूर्णपणे तडीस नेता आली नव्हती. यामुळे हैदर अली विरोधातील मोहिमेचे नेतृत्व गोपाळराव पटवर्धनकडे सोपवून पेशवे माधवरावास पुण्यास परतावे लागले. रघुनाथराव प्रकरणातून सवड मिळताच पेशवे माधवराव यांनी हैदरअलीच्या विरोधात दुसरी कर्नाटक स्वारी काढली. पेशवे माधवराव व निजामाच्या विरोधात लढण्यात गुंतले असल्यामुळे इ स १७६३ मध्ये बिजनोर राजा चे राज्य हैदर अलीने हस्तगत केले.

यावेळी हैदर अली विरोधातील मोहिमेत पेशवे माधवरावबरोबर सखाराम बापू बोकील, हरिपंत फडके, रामचंद्र गणेश, इचलकरंजीकर घोरपडे, अक्कलकोटचे शहाजी भोसले इतक्या मातब्बर सरदारांचा समावेश होता. गोपाळराव पटवर्धनाने हैदर अलीची रसद तोडत ३ मे १७६४ रोजी हैदरअलीचा पराभव केला. मराठ्यांबरोबर समोरासमोर यश मिळणे शक्य नसल्यामुळे हैदरअली कारवारच्या जंगलात पळून जाऊन सैन्यासह त्याने कारवारच्या जंगलाचा आश्रय घेतला.

यावेळी हैदरअलीचा पूर्ण पराभव मराठ्यांना करता आला नाही. कारण याच वेळी पावसाला सुरुवात झाली होती. त्यामुळे ही मोहीम अर्धवट राहिली. पुढील काळात मराठ्यांनी हैदर अलीच्या ताब्यातील प्रदेश व किल्ले घेण्यास सुरुवात केली. ६ नोव्हेंबर १७६४ रोजी मराठ्यांनी धारवाडचा किल्ला घेतला. पुढे डिसेंबर १७६४ मध्ये आनवाडीच्या युद्धात मराठ्यांनी हैदरचा पराभव केला. मात्र मराठ्यांना निर्णायक यश मिळाले नाही. हैदर अलीने मराठ्यांच्या विरोधात गनिमी काव्याने लढत दिली. जवळ जवळ दीड वर्ष चाललेल्या या युद्धामुळे हैदर अली चांगला जेरीस आला होता. हैदरअलीने मराठ्यांबरोबर तहाची बोलणी करण्यास सुरुवात केली. यावेळी या संघर्षाचा फायदा रघुनाथरावांनी घेत तहाची सर्व सूत्रे आपल्या हाती घेतली व हैदरअली बरोबर अनंतपुरचा तह केला.

### ३.४.१३ अनंतपूरचा तह – ३० मार्च १७६५ :

१) मराठ्यांना खंडणी म्हणून ६० लक्ष रुपये हैदर अलीने द्यावेत.

२) तुंगभद्रा नदीच्या पूर्वेकडील सर्व प्रदेश मराठ्याकडे सुपूर्त करावा.

३) मुराराव घोरपडे व सावनूरच्या नबाबास त्याचप्रमाणे इतर सरदारांना हैदरअलीने त्रास देऊ नये.

यामुळे हैदर अलीचा पूर्ण पराभव करण्याची संधी रघुनाथरावामुळे मराठ्यांनी गमावली. निजामाप्रमाणे हैदर अलीची पेशवे माधवरावाच्या विरोधात मदत घेता येईल हा रघुनाथरावाचा मानस असल्यामुळे त्याने मुद्दाम ही संधी दवडली. एकंदरीत दुसऱ्या कर्नाटक स्वारीचे यश म्हणजे सावनूर, गुती दोन ठाणी मराठ्यांच्या ताब्यात आली.

**३.४.१४ तिसरी कर्नाटक स्वारी (१७६७ ते १७७२) :**

हैदरअली विरोधात पेशवा माधवरावाने दोन मोहिमा काढल्या असल्या तरी हैदरअलीचा पूर्ण पराभव त्याला करता आला नव्हता. यास अनेक कारणे कारणीभूत होती. पेशवा माधवराव-रघुनाथराव यांच्यातील संघर्ष, रघुनाथरावाचे संधीसाधू राजकारण, मराठा- निजाम संघर्ष, पेशवा माधवराव-जानोजी भोसले यांच्या मधील संघर्ष, त्याचप्रमाणे पेशवा माधवरावाचे आजारपण या वरील कारणांमुळे हैदरअलीचा पूर्ण पराभव माधवरावास करता आला नव्हता. कर्नाटकमध्ये परत आल्यानंतर हैदरअलीने अनंतपुरचा तह पाळला नाही. मराठे माघारी फिरताच मराठ्यांच्या ताब्यातील प्रदेश काबीज करण्यास त्यांनी सुरुवात केली. हैदरअलीचा पुरता बंदोबस्त करण्याच्या हेतूने माधवरावाने २६ ऑक्टोंबर रोजी पुण्यातून प्रयाण केले. बरोबर मातब्बर सरदार घेऊन माधवराव कर्नाटक स्वारीवर निघाला. कर्नाटकमध्ये बिल्लारी, कर्नूल, कनकगिरी, देवदुर्ग, रायदुर्ग या प्रदेशातून खंडण्या वसूल करत मराठ्यांचा प्रवास तुंगभद्रा नदीच्या पलीकडे चालू झाला.

पेशव्याच्या स्वारीची माहिती मिळताच हैदरअलीने नेहमीप्रमाणे पत्राव्यवहार करुन पेशव्यास गाफील ठेवण्याचा उद्योग चालू ठेवला होता. आपल्या प्रदेशातील लोकांकडून खंडण्या वसूल करू नयेत अशी विनवणीची पत्रे आपल्या वकिलांमार्फत हैदरअलीने पेशव्यास पाठवली. यावेळी निजामाचा मुलगा नजीमअलीखान हा पेशवा माधवरावाच्या मदतीसाठी हजर होता. यामुळे माधवरावाची बाजू अधिक मजबूत झाली होती. यावेळी पेशवे माधवराव ते गुर्रमकोंडाचा किल्ला, बाळापुर, कोलार इत्यादी महत्त्वाच्या ठाण्यावर आपला अंमल प्रस्थापित केला. दोन महिन्याच्या आत मराठ्यांनी जवळजवळ ३० लक्ष उत्पन्नाचा प्रदेश आपल्या ताब्यात घेतल्यामुळे माधवरावाचा कर्नाटक स्वारीचा हेतू सफल झाला होता. यावेळी घाबरून हैदरअलीने तहाची याचना करत आपला वकील व गोपाळराव पटवर्धन यांच्यामार्फत मराठ्यांबरोबर बोलणी करण्यास सुरुवात केली. यावेळी उत्तरेतील मोहिमेत रघुनाथराव यांनी अनेक अडचणी निर्माण केल्या व त्या सोडवणे आवश्यक होते. त्यामुळे नाईलाजास्तव पेशवा माधवरावाने हैदरबरोबरच्या तहाला मान्यता दिली. ७ मे १७६७ मध्ये घडून आला. या तहातील अटी खालीलप्रमाणे-

१) पेशवे नानासाहेब यांच्या काळात जेवढा प्रदेश मराठ्यांच्या ताब्यात होता तो प्रदेश मराठ्यांना मिळावा.

२) मराठ्यांनी नवीन जिंकलेला प्रदेश हैदरअलीस परत द्यावा.

३) मराठ्यांचे मांडलिक सरदार यांना त्रास देऊ नये

४) हैदरअलीने ३० लाख रुपये खंडणी म्हणून पेशव्यास द्यावी.

७ मे १७६७ रोजी वरील तहाची माहिती रामशास्त्री प्रभुणे यांना लिहिलेल्या पत्रात मिळते. पेशवे माधवराव लिहितात ठराव तेवीस लाखावर झाला मुघलांने १४ लाख घेतले काही ठिकाणी ठेवली तर काही ठिकाणी दिली. यावेळी हैदरअलीनेही मराठ्यांबरोबर नमते घेण्याचे आणखी एक कारण म्हणजे मद्रासकर इंग्रजानी हैदर विरोधात मोहीम उघडली होती. या सर्व पार्श्वभूमीवर वरील तह घडून आला होता.

**३.४.१५ कर्नाटकची चौथी स्वारी :**

तीन स्वार करूनही हैदरअलीचा पुरता बंदोबस्त झाला नाही. मराठ्यांना हैदरअलीचा कायमस्वरूपी बंदोबस्त करता आला नाही. याचे मुख्य कारण म्हणजे रघुनाथ केलेले नुसते उद्योग होय. मराठा सरदारांकडून हैदरअली खंडण्या वसूल करत होता. मराठा प्रदेश लुटून त्याने उद्धवस्त केले होते. यापूर्वी मराठ्यानी हैदरअलीच्या विरोधात केलेल्या सर्व मोहिमा अयशस्वी झाल्या होत्या. याचा राग येऊन पेशवे माधवराव यांची ७ नोव्हेंबर १७६९ रोजी पुण्यातून कर्नाटक मोहिमेवर निघाला सोबत ७५ हजारांचे सैन्य होते. यावेळी मुराराव घोरपडे,बडोद्याचे गायकवाड,नागपूरचे भोसले, गोपाळराव पटवर्धन इत्यादी सरदार या स्वारीत सहभागी झाले होते. मराठ्यांनी हैदरअलीचा प्रदेश लुटून उद्धवस्त केला आणि किल्ले आपल्या ताब्यात घेतले. यावेळी पेशवे माधवरावाची प्रकृती अस्वास्थ्यामुळे ही मोहीम अर्ध्यावर सोडून त्याला पुण्यास परतावे लागले. या वेळी कर्नाटक मोहिमेचे नेतृत्व त्रिंबकराव पेठे यांच्याकडे सोपविण्यात आले. हरिपंत फडके यांच्या पत्रव्यवहारावर कर्नाटक स्वारीचे स्पष्ट उद्देश स्पष्ट दिसतात. 'आवदा श्रीमंतांचा मानस आहे की हैदर नायकास सलोक न करता तमाम इकडील पेलेगार वगैरे पेलावून त्याचे परिपत्य करावे.' यावरून कर्नाटक स्वारीप्रती त्याचा दृष्टिकोन समजतो. ५ मार्च १७७१ मध्ये मराठ्यांनी श्रीरंगपट्टनम् जवळील मोती तलाव येथे हैदर व मराठे यांच्यात लढाई झाली. यात हैदरअलीचा पूर्ण पराभव झाला. मात्र रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत हैदरअलीने पळ काढला. मराठ्यांनी हैदर अलीचा पाटलाग करत श्रीरंगपट्टनमला वेढा दिला. हैदरने मराठ्यांजवळ तहाची मागणी केली. यावेळी मराठे तह करण्याच्या मन:स्थितीत नव्हते. पेशवे माधवराव यांच्या आजारपणामुळे मराठ्यांनी हैदर अलीबरोबर किंकेरीचा तह केला.

**३.४.१६ किंकेरीचा तह – २१ जून १७७२ :**

मराठ्यांबरोबर सततच्या युद्धांमुळे हैदर अली कंटाळला होता. त्याचप्रमाणे इंग्रजांचे संभाव्य आक्रमण लक्षात घेऊन हैदरअली मराठ्यांबरोबर तह करण्यास तयार झाला. यावेळी पेशवे माधवराव यांनी त्रिंबकरावला पाठवलेल्या पत्रात तह करून मोकळे व्हावे असे स्पष्ट उल्लेख मिळतात. हिंदुस्थान व कर्नाटक अथवा अशा दोन लष्करास मुबलक पैसा खर्च होत होता. हिंदुस्थानमधून पैसा येत नाही निदान पक्षी कर्नाटकमधून तरी २५ लाख रुपये घेऊन किल्ले व इतर ठाणे सोडून हैदर सुरु करावा. असा स्पष्ट उल्लेख पेशवा माधवराव यांच्या पत्रात आपणास दिसून येतो. त्रिंबकराव पेठे यांचे मन तह करण्याच्या मनस्थितीत नव्हते. हातात आलेली ठाणी व प्रदेश सोडून देणे त्यांच्या जिवावर आले होते. मात्र नाईलाजात्व त्यांनी पेशव्याची आज्ञा मानत हैदरबरोबर किंकेरीचा तह केला.

### ३.४.१७ किंकेरीचा तहातील कलमे :

१) हैदरने मराठयास ५० लाख लक्ष रुपये द्यावे. त्यापैकी २५ लक्ष रुपये रोख व सहा लाख किंमतीचे जवाहर व दागिने द्यावेत. उरलेल्या किंमतीचे कर्जरोखे द्यावेत.

२) शिरे, मदगिरी, कोलार, होसपेट, बळापुर हा प्रदेश मराठ्यांच्या ताब्यात राहील.

३) या पुढे मराठ्यांच्या प्रदेशावर हल्ला करणार नाही हे मान्य केले.

एकंदरीत पेशवे माधवराव यानी हैदरअलीचा पराभव करण्यासाठी चार मोहिमा काढल्या. हैदरअलीचा पुरता बंदोबस्त करण्याची मराठ्यांना संधी चालून आली होती. परंतु मराठ्यांनी त्याचा पुरता बंदोबस्त केला नाही. पेशवे माधवराव व रघुनाथराव यांच्यामध्ये संघर्ष, माधवराव याचे आजारपण, भोसले-पेशवे संघर्ष व इतर अनेक करणे यास कारणीभूत होती असे म्हणता येते. असे असले तरी कर्नाटक स्वारीचे महत्त्व कमी होत नाही. पेशवा माधवराव यांच्या रूपाने हैदरअली समोर मोठे आव्हान निर्माण झाले होते. त्याचाच परिणाम हैदरचे राज्य मर्यादित स्वरूपात राहिले. कर्नाटक स्वारीमध्ये मिळालेल्या पैशापेक्षा अधिक पैसा खर्च झाला होता. या स्वाऱ्यामुळे मराठ्यांना खूप मोठा आर्थिक फायदा झाला नाही.

### ३.४.१८ पेशवे माधवराव-जानोजी भोसले संघर्ष :

मराठ्यांच्या राजकारणामध्ये जी महत्त्वाच्या घराण्यांनी आपले योगदान दिले त्यामध्ये नागपूरकर भोसले घराण्याचा समावेश होतो. नागपूरकर भोसले घराण्याचा थेट संबंध सातारच्या छत्रपती घराण्याशी असल्यामुळे इतर सरदारांच्या तुलनेत नागपूरकर भोसले सरदार यांना मराठ्यांच्या राजकारणामध्ये एक वेगळाच मान होता. सातारा व पुणे या दोन शहरापासून नागपूर हे दूर असल्यामुळे नागपूरचे भोसले हे कायम स्वतंत्र वृत्तीने वागत होते. त्याचप्रमाणे ते स्वतःला कायम स्वतंत्र आहोत अशा अविर्भावात ते वागत. पेशवे माधवराव व रघुनाथराव यांच्या संघर्षात नागपूरचे भोसले यांनी नेहमीच रघुनाथरावाच्या पक्षात सामील होते.

पुढे निजामा बरोबर साठ-चाळीसचा करार करुन रघुनाथराव यांना पेशवेपदाची वस्त्रे देण्यासाठीच्या हालचाली जानोजी भोसले यांनी केल्या होत्या. त्या बदल्यात निजामाने व रघुनाथराव यांनी संयुक्तपणे जानोजीस छत्रपती पद मिळवून देण्याचे मान्य केले होते. राक्षसभुवनच्या लढाईच्या अगोदर भोसले निजामास सामील झाले होते. अशा या जानोजी भोसले यांचे परिपत्य करण्यासाठी पेशवा माधवराव यानी ठरवले. त्याच वेळी उत्तरेतील रामचंद्र गणेश यांच्या नेतृत्वाखाली फौजा व दक्षिणेतील गोपाळराव पटवर्धन यांच्या नेतृत्वाखाली फौजांना विदर्भाकडे कूच करण्याचा आदेश पेशवा माधवराव यानी दिला. यावेळी पेशवे स्वतः जानोजी वर चालून गेले होते. जानोजी भोसले आणि गनिमी काव्याच्या सहाय्याने वरील फौजेचा मुकाबला केला. शेवटी आपला निभाव लागणार नाही याची जाणीव होऊन जानोजी भोसले यांनी शरणगती पत्करली. पेशवे माधवराव यांनीही परिस्थितीचा अंदाज घेत सर्वांनी एकत्र राहण्यातच मराठेशाहीचे हित आहे. ही गोष्ट लक्षात घेऊन जानोजी भोसले यास माफ केले. जानोजी भोसले व माधवराव यांच्यामध्ये कनकपूरचा तह झाला.

### ३.४.१९ कनकपुरचा तह (२४ एप्रिल १७६९) :

१) जानोजी भोसले यांनी पेशव्यास पाच लक्ष रुपये द्यावेत.

२) मराठा मंडळाचा सदस्य म्हणून पेशव्याच्या आज्ञा पाळाव्यात.

३) जानोजी भोसले यांनी ठरवून दिलेल्या संख्येपेक्षा जास्त सैन्य बाळगू नये.

४) आवश्यकता असल्यास पाच हजार सैन्यासह पेशव्यांच्या चाकरीस हजर राहावे

५) पेशव्यांनीही अडचणीच्या काळात जानोजीना मदत करावी.

जानोजी भोसलेंचा पराभव हा इतर मराठा सरदारांसाठी एक धडा होता. कोणत्याही फुटीरवादी प्रवृत्तीस लगाम घालण्यासाठी आपण समक्ष आहोत. हे दाखवून देण्यात पेशवे माधवराव यशस्वी झाले. कानकपूरच्या तह नंतर तितक्याच सहजपणे त्यांनी जानोजीला सन्मानाने वागवत भोसल्याच्या सामर्थ्याचा उपयोग मराठा राज्य संवर्धनासाठी करून घेतला. यापुढे पेशवे माधवरावाच्या मृत्यूपर्यंत जानोजी भोसले नागपूरकर व पेशवे घराण्याचा स्नेह कायम होता.

### ३.४.२० पेशवे माधवराव व उत्तरेकडील राजकारण :

पेशवे माधवराव यांनी हाती घेतलेले कार्य हे कोणत्याही अडचणीशिवाय पार पडले असे कधी झाले नाही. रघुनाथराव यांनी पेशवे माधवराव याच्यापुढे निर्माण केलेल्या अडचणीमुळे कोणतीही मोहीम राबवता आली नाही. इ.स. १७६१ च्या पानिपत युद्धामध्ये मराठ्यांचा पराभव झाल्यामुळे निर्माण झालेल्या राजकीय स्थितीचा फायदा इतर सत्तांनी व इंग्रजांनी घेतला होता. उत्तरेत रजपुत, अफगाण, रोहिले, शिख यांनी मराठ्यांचा अंमल नष्ट करण्याचा सपाटा सुरू केला होता. दरम्यानच्या काळामध्ये नारोशंकर व त्याचा पुतण्या विश्वासराव लक्ष्मण, विठ्ठल शिवदेव, मल्हारराव होळकर, महादजी शिंदे, गोविंदपंत बुंदेले याचा पुत्र बाळाजी, गंगाधर बहिरे, आनंदराव पवार इत्यादी सरदारांनी आपल्यापरीने उत्तरेमध्ये मराठ्यांचा अंमल कायम करण्यामध्ये व्यस्त होते. दक्षिणेतील अंतर्गत गृहकलह निजाम हैदर यांच्याशी चालत असलेला संघर्ष यामुळे उत्तरेकडील राजकारणाकडे पेशवा माधवराव यांना नीट लक्ष देता आले नाही. यामुळे उत्तर भारताच्या राजकारणाची सारी भिस्त रघुनाथराव व उत्तरेत कार्यरत असणाऱ्या विविध सरदारांवर होती. पानिपत युद्धानंतर होळकर रामपूरा गांगुरणी व इतर प्रदेशावर मराठ्यांचे वर्चस्व प्रस्थापित केले. राजस्थानमधील राजपूतांचा पराभव करत त्यांच्याकडून खंडणी वसूल केल्या होत्या. मात्र दक्षिणेत हैदरअली व निजामाविरुद्ध मोहिमा चालू असल्यामुळे पेशव्यांनी होळकर,शिंदे यांना दक्षिणेत बोलावून घेतले.

त्यामुळे उत्तरेतील राजकारणाकडे पेशव्याचे अक्षम्य दुर्लक्ष झाले. त्यामुळे पुढील काळात मराठ्यांचा अंमल प्रस्थापित होण्यास खूप वेळ लागला. अशा सर्व पार्श्वभूमीवर रघुनाथराव यांनी मोठ्या सैन्यासह उत्तरेकडे गेले. रघुनाथरावांनी उत्तर स्वारीमध्ये असताना शिंदे-होळकर संघर्ष नीट सोडवला नाही. रजपूत प्रकरणात परस्परविरोधी भूमिका घेत वेळोवेळी आपली भूमिका बदली. त्यामुळे उत्तरेच्या स्वारीमध्ये रघुनाथराव याच्याकडून प्रश्न सुटण्याऐवजी अनेक गुंते निर्माण झाले.

### ३.४.२१ जाटांचा बंदोबस्त :

रघुनाथराव उत्तरेत असल्यामुळे मराठ्यांच्या अपेक्षा वाढल्या. रघुनाथराव यांच्या दिल्ली स्वारीमुळे सर्व काही नीट होईल ही आशा फोल ठरली होती. प्रत्यक्षात त्याच्याकडून कोणतीच लक्षनिय अशी कामगिरी घडली नाही. दिल्लीकडे कूच करत असताना जाटांनी मराठ्यांचा रस्ता अडवून धरल्यामुळे मराठ्यांपुढे अडचणी निर्माण झाल्या. यावेळी महादजी शिंदे यांनी गोहदच्य राजाकडून पंधरा लक्ष रुपये घेऊन हे प्रकरण निकालात काढले. याच काळात मल्हारराव होळकर यांचा मृत्यू व त्यांचा वारस नसल्यामुळे गंगाधर चंद्रचूड यशवंतराव होळकर व रघुनाथराव यांनी होळकर दौलत बुडवण्याचा घाट घातला होता. रघुनाथरावला मल्हारराव होळकरांची सून अहिल्याबाईंमुळे यश आले नाही. एकदरीत रघुनाथराव याना अयशस्वी पावलांनी मागे परतावे लागले. त्यामुळे माधवरावाने रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण बिनीवाले यांच्यावर उत्तर मोहिमेची जबाबदारी सोपवली. यांच्या संयुक्त फौजांनी सन १७६९ मध्ये उत्तरेत पोहोचल्यानंतर त्यांना मदत करण्यासाठी होळकर, शिंदे व इतर सरदार उपस्थित होते. यावेळी उदयपूरचा राजा व गोहद गादीसंबंधी वाद चालू झाला. आरिसिंग व रतनसिंग या वारसामध्ये चालू असलेल्या संघर्षात शिंदे-होळकर यांनी परस्पर भूमिका घेतल्या. त्याचप्रमाणे विसाजी कृष्ण बिनीवाले व रामचंद्र गणेश यांच्यामध्येही उत्तर मोहिमेमध्ये अनेक प्रसंगात मतभेद होण्यास सुरुवात झाली होती. यावेळी उदयपूरच्या राजाकडून ७ लक्ष रुपयांची खंडणी वसूल केली. पुढील काळात मराठे दिल्लीवर चालून जाण्यास निघाले तेव्हा जाटाणी मराठ्यांना विरोध करण्यास सुरुवात केली. यावेळी जाटांच्या राज्याअंतर्गत यादवीला सुरुवात झाली होती. जवाहरसिंग याच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र केसरीसिंग सत्तेवर आला. तो लहान असल्यामुळे त्याचे कारभारी सत्ता हस्तगत करण्यासाठी धडपड करू लागले. त्यात त्याचे भाऊ रणजीतसिंग व नवलसिंग यांचा समावेश होता. यास या संधीचा फायदा घेत मराठी फौजा इ. स. १७६९ च्या सुमारास चंबळ नदी पार करून जाटांच्या प्रदेशात शिरल्या. ५ एप्रिल १७७० रोजी गोवर्धन येथे मराठ्यांनी नवलसिंगाचा पराभव केला व मराठ्यांनी जाटांच्या ताब्यात असलेली मथुरा, काशी, बनारस, आग्रा इत्यादी महत्त्वाची ठाणी आपल्या ताब्यात घेतली.

### ३.४.२२ रोहिल्यांचा पराभव :

इ. स. १७६१ च्या पानिपत लढाईनंतर उत्तर भारताच्या राजकारणात कायम चर्चेत असणारे नाव म्हणजे नजीबखान रोहिले होय. मराठ्यांनी जाटाचा पराभव केल्यानंतर नजीबच्या चिंता अधिक वाढल्या. इ. स. १७७० मध्ये उत्तर भारताच्या राजकारणावर चर्चा करण्यासाठी चंबळ नदीकाठी सर्व मराठे सरदार एकत्र जमले होते. यावेळी नजीबखानाबाबत कोणते धोरण स्वीकारावे याबाबत मराठा सरदारांमध्ये मतभेद वाढण्यास सुरुवात झाली. नजीबचा शक्य तितका फायदा घेऊन राजपुतांचा प्रभाव कमी करणे या मताचा पुरस्कार तुकोजी होळकर, विसाजी कृष्ण बिनीवाले यांनी केला. तर दुसऱ्या बाजूस त्याचा समूळ नाश करावा ही भूमिका महादजी शिंदे व रामचंद्र गणेश करत होते. त्यामुळे हा वाद अधिकच वाढत गेला. राजकारणात कुणी कुणाचा कायमचा शत्रू नसतो या तत्त्वाने नजीब आपला भूतकाळातील शत्रू होता हे विसरले पाहिजे. या मताचा तुकोजी होळकर पुरस्कार करत होते. त्याचप्रमाणे त्यास महादजीने विरोध केला. आपल्या तीन पूर्वजांच्या मृत्यूचा बदला महादजीस घ्यायचा होता. या काळात नजीबखानबाबत मराठ्यांच्या धोरणात एक वाक्यता दिसून येत नाही. अशातच १३ ऑक्टोबर १७७० मध्ये नजीबखानचा मृत्यू झाला.

### ३.४.२३ नजीबखानाचा मृत्यू व दिल्लीचे राजकारण :

नजीबखानाच्या मृत्यूनंतर त्याचा वारस असलेल्या झाबेतखानने दिल्लीच्या बादशहाकडून जबरदस्तीने मीरबक्षी पद मिळवून घेतले. यावेळी होळकर-शिंदे संबंध अधिक तीव्र झाले होते. नजीबला दिलेल्या वचनानुसार त्याच्या वडिलांची जागा होळकरांनी मिळवून द्यायची होती. त्यास महादजी, रामचंद्र गणेश यांनी विरोध केला. उत्तरेतील सततच्या वादास कंटाळून विसाजी कृष्ण बिनीवाले दक्षिणेत परतले. त्यामुळे उत्तर मोहिमेची जबाबदारी रामचंद्र गणेश व महादजी शिंदे यांच्याकडे आली. पुढे रामचंद्र गणेश हेही दक्षिणेत आल्यामुळे महादजी हेच उत्तर मोहिमेचे सर्वेसर्वा होते. महादजी शिंदे यांनी पूर्ण ताकतीने हल्ला केला. इटवा फरीदाबाद इत्यादी ठाणे मराठ्यांनी जिंकून घेतली. मराठ्यांच्या विरोधात विजयाची आशा समाप्त होताच झाबेतखानाने मराठ्यांबरोबर तहाची याचना करत पानीपतपूर्वीचा मराठ्यांचा अंमल असणारा प्रदेश मराठ्यांना परत देण्याचे मान्य केले.

### ३.४.२४ मराठ्यांची मदत व बादशहा सत्ताप्राप्ती :

जाट व रोहिल्याचा पराभव झाल्यामुळे उत्तरेच्या राजकारणात मराठ्यांच्या प्रभाव वाढीस लागला होता. त्यांच्या पराभवामुळे त्याचे दिल्लीमधील महत्त्व कमी होऊन मराठ्यांचे महत्त्व वाढीस लागले होते. याच काळात दिल्लीचा बादशहा शहाआलम इंग्रजांच्या आश्रयास होता. शहाआलमचा इंग्रजांपेक्षा मराठ्याकडे जास्त केला होता. वजीर नफजखान व मराठे यांच्यामध्ये चर्चा होऊन बादशहाला दिल्लीचे तख्त मिळवून द्यावे. यावर सहमत झाले. पुढे बादशहा आग्र्याला पोचला. ४ जानेवारी १७७१ रोजी दिल्लीच्या गादीवर विराजमान झाला.

### ३.४.२५ मराठे व फतरगड मोहीम :

इ. स. १७७१ च्या सुमारास दिल्लीच्या राजकारणात एक महत्वपूर्ण व्यक्ती म्हणून झाबेतखान वावरत होता. यावेळी झाबेतखानाने शाहआलमबरोबर मराठ्यांच्या विरोधात संधान साधले. मराठ्यांनी केलेली मदत विसरुन या दोघांच्या संयुक्त फौजांनी मराठी प्रदेशावर हल्ले करण्यास सुरुवात केली. यावेळी विसाजीपंत व तुकोजी यांनी त्यांच्या संयुक्त फौजेचा पराभव केला. फेब्रुवारी १७७२ मध्ये मराठ्यांनी हल्ला करत रोहिल्यांचा प्रदेश आपल्या ताब्यात मिळवला. यावेळी महादजीने नजीबखानाची समाधी उखडून टाकली. अशा प्रकारे पानिपतमध्ये गेलेली प्रतिष्ठा परत मिळवण्यात मराठे यशस्वी झाले. पेशवे माधवराव यांची पेशवाईची वस्त्रे मिळाल्यानंतर ते मृत्यूपर्यंत जवळ जवळ अकरा वर्षांचे आयुष्य लाभले. माधवरावाला या काळात रघुनाथराव, जानोजी भोसले व स्वतःचे आजारपण अशा विचित्र परिस्थितीशी सामना करावा लागला. याच काळात दक्षिणेत निजाम, हैदरअलीबरोबर संघर्ष घडून आला. या सर्व परिस्थितीवर मात करत पेशवा माधवरावांनी मराठ्यांची प्रतिष्ठा पुन्हा स्थापन करून मराठी सत्तेस गौरवस्थान मिळवून दिले. अशा या थोर पेशव्याचा मृत्यू १८ नोव्हेंबर १७७२ रोजी थेऊर येथे झाला. पेशवे माधवराव्याने मृत्युपूर्वी आपल्या सरदारांना बोलवून राज्यकारभारसंबंधी योग्य त्या सूचना दिल्या होत्या. त्याचप्रमाणे आपला उत्तराधिकारी म्हणून नारायणराव यांचे नाव त्यांनी घोषित केले होते.

### ३.४.२६ पेशवे माधवराव यांच्या कामगिरीचे मूल्यमापन :

**१. मराठ्यांच्या इतिहासात अद्वितीय स्थान :**

मराठ्यांच्या इतिहासात छत्रपती शाहू महाराजांच्या काळात पेशव्यांचा उदय झाला. बाळाजी विश्वनाथ व बाजीराव पहिला, पेशवा नानासाहेब यांनी आपल्या कर्तृत्वामुळे भारताच्या इतिहासात एक वेगळी ओळख निर्माण केली होती. तीच परंपरा पेशवे माधवराव यांनी कायम पुढे चालवली. पेशव्यांच्या इतिहासातील सर्वश्रेष्ठ पेशवा म्हणून त्याच्याकडे पाहिले जाते. प्रामाणिकपणा, निर्भर निर्भीड न्याय, प्रजाहितदक्ष इत्यादी अष्टपैलू गुण त्यांच्या ठायी होते. त्याच्या काळात पानिपत युद्धाचा कलंक धुऊन उत्तरेमध्ये मराठा सत्ता सर्वेसर्वा झाली. दक्षिणेत निजाम, हैदरअलीचा बंदोबस्त करण्यात त्यांना यश मिळाले. इंग्रजांनाही मराठा राजकारणात हस्तक्षेप करण्यापासून दूर ठेवले. इंग्रज सोडल्यास या काळात कोणीच मराठ्यांच्या तोडीचे नव्हते.

**२. कडक शिस्त व न्यायप्रिय पेशवा :**

राज्य करत असताना शिस्तीची खूप आवश्यकता असते. मग ती लष्करी शिस्त असो किंवा राज्यकारभारातील. पेशवा माधवराव यांनी याकडे जाणीवपूर्वक लक्ष दिल्याचे दिसते. रामशास्त्री प्रभुणे सारख्या निस्पृह गृहस्थाकडे न्याय खाते देऊन न्यायप्रियता सिद्ध केली होती.

**३. कर्तृत्ववान पिढी निर्माण करणारा पेशवा :**

इ.स. १७६१ च्या पानिपतमध्ये मराठ्यांची मोठ्या प्रमाणात जीवितहानी झाली होती. एक कर्तुत्ववान पिढी या युद्धात कामास आली होती. ती उणीव भरून काढून मराठ्यांची प्रतिष्ठापना करण्यात पेशवे माधवराव यशस्वी झाले. फडके, गोपाळराव पटवर्धन, तुकोजी होळकर, महादजी शिंदे, नाना फडणीस, त्रिंबकराव पेठे, रामचंद्र गणेश, विसाजी कृष्ण बिनीवाले यासारख्या कर्तुत्ववान व्यक्तींचा उदय माधवराव पेशवे यांच्या काळात झाला. पुढे त्यांनीच १८१८ पर्यंत मराठा सत्तेचे संवर्धन केले होते. पेशवा माधवराव यांची कारकीर्द माणसे तयार करणारी शाळा म्हणून ओळखली जाते.

**४. लोक कल्याण कार्य व कार्यक्षम प्रशासन निर्माण करणारा पेशवा :**

पेशवे माधवराव यांनी आपल्या कारकिर्दीत पराक्रमाच्या जोरावर जेवढा नावलौकिक मिळवला. त्यापेक्षा जास्त लौकिक कल्याणकारी कार्य व उत्कृष्ट प्रशासक म्हणून मिळवला होता. त्यांचा दृष्टीकोन नेहमीच सुधारणावादी होता. गुन्हेगारांना कठोर शिक्षा, वेठबिगार पद्धत त्यांनी बंद केली गुप्तचर खाते सक्षम करण्याचा प्रयत्न केला. तर सरदार मंडळीवर जबर वचक बसवला. पेशवे माधवराव यांचे चरित्र निष्कलंक, सदाचारी असल्यामुळे त्यांनी आदर्श निर्माण केला. त्यांच्या मते राज्य ही उपभोगाची वस्तू नसून लोकहितार्थ कष्टाने चालवायचे असते.

**५. व्यवहारी पेशवा :**

ज्याप्रमाणे माधवराव यांनी रणांगणावरील भूमिका योग्य प्रकारे पार पडली. त्याचप्रमाणे किंवा त्यापेक्षाही अधिक सरस भूमिका ती अंतर्गत प्रशासनामध्ये पार पडल्याचे दिसते. राज्य चालवायचे असेल तर पैशाचे

काटेकोरपणे नियोजन करावे लागते याची त्यांना जाण होती. म्हणून महसूल असो किंवा कारकुनाचा जमाखर्च त्याकडे त्याचे बारीक लक्ष होते. सोबत गैरव्यवहार, कामचुकारपणा करणे त्यांना अजिबात पसंत नव्हते.

**६. सरदार व अधिकारी वर्ग यांच्यावर वचक असणारा पेशवा :**

पेशवे बाजीराव, नानासाहेब पेशवे यांचा दरारा आपल्या सरदारांवर होता. तोच धाक दरारा पेशवा माधवराव यांच्या काळामध्ये बघायला मिळतो. जानोजी भोसले, रघुनाथराव, मुराररराव घोरपडे, रामचंद्र जाधव, शिंदे, होळकर इत्यादी हे सर्व सरदारांवर पेशवे माधवराव यांना वचक होता.

**७. इंग्रजांबद्दल दूरदृष्टी असलेला पेशवा :**

इंग्रजांचे कुटील राजकारण इतरांच्या तुलनेत अधिक होते. पेशवे नानासाहेब यांच्या काळात इंग्रजांनी आंग्रे यांचे आरमार बुडाल्यामुळे इंग्रजांची सत्ता पश्चिम किनाऱ्यावर निर्धोक झाली होती. पेशवा माधवराव जिवंत असेपर्यंत इंग्रजांना मराठा राज्यात हस्तक्षेप करण्याची संधी दिली नाही. यावरुन इंग्रजांबद्दलचा त्यांचा दृष्टीकोण लक्षात येतो. अशा या गुणी पेशव्यांनी मराठ्यांच्या पानिपत पराभवाचा कलंक धुऊन मराठा सत्तेची प्रतिष्ठा पूर्वीप्रमाणे स्थापित केली. बाळाजी विश्वनाथ यांनी दूरदृष्टीने मराठा राज्याचा पहिला नकाशा आखला, पेशवा बाजीराव यांनी धडाडीने त्यास मर्यादा घातल्या, नानासाहेबांच्या काळात या शरीररूपी राज्यास बळकटी आली, तर पेशवा माधवराव यांनी त्यास परमोच्च रूप मिळवून दिले.

पेशवा माधवराव याच्या अकाली निधनामुळे अनेक इतिहासकार शोक व्यक्त करतात. इतिहासकारांच्या मते पानिपतच्या युध्दामध्ये जेवढ्या मोठ्या प्रमाणात हानी मराठ्यांची झाली. त्यापेक्षा कितीतरी पटीने जास्त हानी पेशवा माधवरावाच्या अकाली निधनामुळे झाली. यावरून मराठा राज्यामध्ये पेशवा माधवराव यांचे स्थान काय होते ते लक्षात येण्यास मदत होते.

**३.५ महादजी शिंदे :**



छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याचे साम्राज्यात रुपांतर पेशव्याच्या काळात झाले. इ. स. १७०७ मध्ये औरंगजेबाचा मृत्यू व छत्रपती शाहूंची झालेली सुटका यामुळे मराठा राजकारण ढवळून निघाले होते. छत्रपती शाहू व महाराणी ताराबाई यांच्या गृहकलहामध्ये मराठा सरदार दोन गटात विभागले गेले. छत्रपती शाहूंना सत्ता मिळवून देणे व ती व्यवस्थीत करण्यात बाळाजी विश्वनाथ यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. हे लक्षात घेऊन पेशवा बाळाजी विश्वनाथ यांच्या मृत्यूनंतर पेशवे बाजीराव पाहिले यांना पेशवेपदाची वस्त्रे प्रदान करण्यात आली. यावेळी मराठा साम्राज्य विस्ताराचे धोरण कोणते असावे यावरून वाद सुरू झाला. आपल्याला

उत्तरेकडे साम्राज्यविस्तार धोरणात जुन्या सरदार मंडळींचा पाठिंबा मिळणार नाही हे लक्षात येताच नवीन सरदाराचा गट निर्माण करण्याचा प्रयत्न पेशवा बाजीरावाने केला. यातून शिंदे, होळकर गायकवाड, जाधव, पवार या घराण्यांचा उदय झाला शिंदे हे त्यापैकी एक.

शिंदे हे सेंद्रक नावाचे क्षत्रिय घराणे महाराष्ट्रात होते. सेंद्रक या नावाचा अपभ्रंश होऊन शिंदे हे नाव पडले असावे असे इतिहासकारांचे मत आहे. त्यांचे मूळ गाव कन्हेरखेड, जि. सातारा होय. या गावची पाटिलकी राणोजी शिंदे यांच्याकडे होती. राणोजी हाच शिंदे घराण्याचा कर्ता पुरूष म्हणून ओळखले जातो. या शिंदे घराण्यातील अनेक व्यक्तीनी मराठेशाहीचे संरक्षण व संवर्धनासाठी आपले आयुष्य खर्ची घातले. त्यामध्ये राणोजी, जानकोजी, जयाप्पा, दत्ताजी, महादजी, दौलतराव इत्यादी शिंदे घराण्यातील कर्तृत्ववान व्यक्तींचा समावेश आहे.

**३.५.१ महादजी शिंदे यांचा उदय :**

महादजी शिंदे यांना ज्योतिबा व तुकोजी नावाचे दोन बंधू होते. महादजी वयाने कनिष्ठ असल्यामुळे पानिपत युद्धा पूर्वी इतर कागदपत्रांमध्ये त्यांचे नाव प्रकर्षाने जाणवत नाही. असे असले तरी त्यांनी अनेक लढायांमध्ये सहभागी होऊन योग्य ती कामगिरी बजावली होती. इ.स. १७५१ च्या निजामविरोधातील लढाईत महादजीचा प्रथम उल्लेख मिळतो. पानिपत युद्धात तुकोजी व जानकोजीचा मृत्यू झाल्यामुळे शिंदे घराण्याची जहागीर कोणास देण्यात यावी यासाठी वादास सुरुवात झाली या काळात पेशवा माधवराव, रघुनाथराव यांच्यात ही संघर्ष झाला.

महादजीला शिंदे घराण्याची जहागीर देण्यास रघुनाथराव यांनी विरोध केला. पुढे पेशवा माधवराव यांनी राजकारणाची सूत्रे स्वीकारल्यानंतर मल्हारराव होळकर व इतर सरदारांच्या पाठिंबामुळे माधवरावाकडून सरदारकीची वस्त्रे महादजी शिंदे यांना बहाल करण्यात आली. पुढे महादजी शिंदे यांच्या मृत्यूपर्यंत त्यांच्याकडून मराठेशाहीची दैदीप्यमान सेवा घडली. पानिपत लढाईमध्ये गेलेली प्रतिष्ठा परत मिळवण्यासाठी मराठे सरदारांनी शर्थीचे प्रयत्न केले. त्यामध्ये महादजी शिंदे यांचे स्थान सगळ्यात वरचे होते. महादजीने उत्तरेच्या राजकारणामध्ये एकूणच आपला व मराठेशाहीचा दबदबा कायम राखण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले.

**३.५.२ पेशवे माधवराव व महादजी :**

पेशवे माधवराव यांच्या काळात प्रामुख्याने उत्तर भारताच्या राजकारणाची मदार पूर्णपणे महादजीच्या खांद्यावर होती. इ. स. १७६६ मध्ये मल्हाराव होळकर यांचा मृत्यू झाल्यानंतर उत्तर भारताच्या राजकारणाची जाण असलेला दुसरा मात्तबर सरदार मराठेशाहीत आढळत नाही. म्हणून पेशवे माधवराव यांनी उत्तरेच्या स्वारीचे नेतृत्व रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण बिनीवाले यांच्याकडे सोपवली तर सहाय्यक म्हणून महादजीस नेमले.

**३.५.३ उत्तर भारताचे राजकारण (१७६९ ते १७७२) :**

पेशवा माधवरावाने यांनी ज्याप्रमाणे दक्षिणेत मराठ्यांचा अंमल प्रस्थापीत केला होता तसा उत्तरेत ही पानिपत लढाई पूर्वीची मराठ्यांची प्रतिष्ठा पुन्हा स्थापन करायची होती. माधव या मोहिमेत महादजीने जाठ, अहमदशहा बंगश, झाबेतखान त्याचा पराभव करत मराठ्यांची सत्ता निर्विवाद केली.

### ३.५.५ झाबेतखानचा पराभव :

इ.स. १७६१ नंतर उत्तरेच्या राजकारणामध्ये नजीबखानाच्या मृत्यूनंतर झाबेतखानाचा प्रभाव दिसून येतो. नजीबखानाच्या मृत्यूनंतर झाबेतखानाने बादशहा शहाआलम याच्याकडून मीरबक्षी हे पद मिळवून घेतले. यावेळी रामचंद्र गणेश व माहादजी शिंदे व इतर मराठा सरदारांनी इटवा व आसपासचा प्रदेश वर्चस्वाखाली आणला. डिसेंबर १७७० मध्ये फारुखाबाद ताब्यात घेतले. यावेळी झाबेतखान यांनी शरणागती पत्करली. पानिपतपूर्वी मराठ्यांच्या ताब्यात असणारा प्रदेश मराठ्याला देऊ केला. त्यामुळे दोआबमध्ये मराठ्यांची सत्ता स्थिर होऊन पूर्वीप्रमाणे मराठ्यांचा दबदबा वाढला.

### ३.५.६ फत्तरगडची लढाई (इ. स. १७७२) :

इ.स. १७७० मध्ये झाबेदखानाने मराठ्यांसमोर शरणागती पत्करली असली तरी मराठ्यांबरोबरच त्याचे शत्रुत्व काही केल्या कमी होत नव्हते. त्यातूनच इ. स. १७७२ मध्ये फत्तरगडची लढाई घडून आली. ज्या शुक्रताल च्या लढाईत दत्ताजी शिंदेचा वध झाला होता. त्या शुक्रतालवर हल्ला करुन महादजीने शुक्रताल काबिज केले. मात्र अंधाऱ्या रात्रीचा फायदा घेत झाबेतखान पळून जाण्यात यशस्वी झाला. यावेळी शिंदे घराण्याच्या नाशास कारणीभूत असलेल्या नजीबखानची कबर फोडून त्याची हाडे इतरत्र फेकून दिली. अशा प्रकारे महादजी शिंदे यांनी आपल्या पूर्वजांच्या मृत्यूचा बदला नजीबखानाची कबर फोडून घोतला. त्यानंतर मराठ्यांचा मोर्चा दिल्लीकडे वळला.

### ३.५.७ महादजी शिंदे व बादशहा शहाआलम :

दिल्लीच्या दोन दिशेस वास्तव्यास असणाऱ्या जाट व रोहिले पराभूत झाल्यामुळे दिल्लीच्या गादीवर शहाआलम यास बसवण्यास मराठे तयार झाले. त्यावेळी दिल्लीचा वजीर नफजखान हा मराठ्यांच्या संपर्कात होतो. मराठ्यांच्या नेतृत्वाखालील इतर सरदार व बादशहा आपल्या विरोधात उठाव करतील. या भीतीने इंग्रजांनी शहाआलमला आपल्या नियंत्रणाखाली अलाहाबाद येथे ठेवले होते. यावेळी शहाआलम यास दिल्लीची गादी मिळवण्यासाठी इंग्रजांपेक्षा मराठे अधिक जवळचे आहेत असे वाटू लागले होते. यावेळी बादशहाकडून नफजखान याने महादजीची भेट घेण्याची अपेक्षा व्यक्त केली. मात्र मराठ्यांच्या अटीवरून बादशहा मागेपुढे पाहत होता. याच वेळी मराठ्यांनी दिल्लीत प्रवेश करून बादशहाचा मुलगा जवानबक्ष यास गादीवर बसवले. शहाआलम यांनी भीतीने मराठ्यांच्या अटी मान्य करत १६ नोव्हेंबर १७७१ रोजी महादजीची भेट घेतली. शहाआलमने मराठ्यांच्या सर्व अटी कबूल करत ६ जानेवारी १७७२ रोजी शहाआलम दिल्लीत पोहोचला. महादजीने स्वतःच्या सामर्थ्याच्या बळावर बादशहास सत्ता मिळवून दिली होती.

### ३.५.८ बाराभाई मंडळ व महादजी शिंदे :

पेशवे माधवराव यांच्या मृत्यूनंतर मराठ्यांच्या राजकारणामध्ये गृहकलह शिगेला पोहोचला होता. त्याची परिणिती इ. स. १७७३ मध्ये शनिवारवाड्यात पेशवा नारायणरावाचा खून झाला. नारायणरावांचा खून झाल्यामुळे पेशवे पद रघुनाथरावाला मिळाले. याच वेळी रामशास्त्री प्रभुणे यांनी पेशवे नारायणराव यांच्या खुनास रघुनाथराव

हे दोषी आहेत हे जाहीर केल्यामुळे परिस्थिती आणखीनच विचित्र बनली. यावेळी मराठेशाहीचा कारभार कसा असावा यासाठी सखाराम बापू व नाना फडणीस यांनी बाराभाई मंडळाची स्थापना केली. नारायणरावाच्या पत्नी गंगाबाई यांना मुलगा झाला तर त्याच्या नावाने राज्यकारभार करायचा व मुलगी झाली तर त्यांच्या मांडीवर दत्तक ठेवून राज्यकारभार चालवायची योजना आखण्यात आली. यामध्ये बारा सरदारांचा समावेश होता. सखाराम बापू व नाना फडणीस, महदजी शिंदे, तुकोजी होळकर, रास्ते, पटवर्धन, पुरंदरे इत्यादी सरदारांचा समावेश होता. १८ एप्रिल१७७४ रोजी गंगाबाई यांना पुत्र झाल्यामुळे बाराभाई मंडळाची बाजू अधिक मजबूत झाली. यावेळी बाराभाई मंडळीने रघुनाथराव यांचा बंदोबस्त करण्यासाठी महादजी व तुकोजीस पाठविले. तुकोजी होळकर व महादजी शिंदे यांनी रघुनाथराव यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. पण त्यास अपेक्षित यश मिळाले नाही. रघुनाथराव पुढे इंग्रजांना जाऊन मिळाला.

### ३.५.९ इंग्रज–मराठा युद्ध व महादजी शिंदे :

बारभाई मंडळीतील सरदार आपणास कैद करतील या भीतीने रघुनाथरावाने इंग्रजांचा आश्रय घेत सुरतेचा तह केला. यामुळे इंग्रजांना इंग्रज–मराठा युद्ध अनिवार्य झाले. रघुनाथरावांना पेशवेपद बहाल करण्यासाठी इंग्रज फौजा करणार कर्नल कटिंग यांच्या नेतृत्वाखाली सुरतकडून पुण्याकडे रवाना झाल्या. मात्र आडास येथे झालेल्या लढाईत हरिपंत फडके यांनी इंग्रजांना प्रतिकार केला. त्यामुळे इंग्रजांचा भ्रमनिरास झाला. आपण पुणे येथे लवकर पोहोचेल असा इंग्रजांना विश्वास होता. त्यांचा भ्रमनिरास झाला. हेस्टींगने कर्नल अप्टन यांना मराठ्यांबरोबर तह करण्यासाठी पुण्यास पाठवले. १ मार्च १७७६ रोजी इंग्रज व मराठे यांच्यामध्ये पुरंदरचा तह घडून आला. यावेळी हे युद्ध जास्त काळ चालले तर उत्तरेकडील इंग्रजांचा प्रदेश उद्ध्वस्त करावा. ही जबाबदारी हरिपंतावर सोपवण्यात आली होती. ती जबाबदारी त्यांनी योग्य प्रकारे पार पाडली.

### ३.५.१० सदाशिवभाऊंचा तोतया व महादजी शिंदे :

मराठेशाहीच्या राजकारणात उद्‌भवलेले आणखीन एक प्रकरण म्हणजे सदाशिवभाऊंचे तोतया प्रकरण होय. हे प्रकरण तडीस नेण्याची जबाबदारी महादजी शिंदे, भीमराव पानसे यांच्यावर सोपवण्यात आली होती. हरिपंत फडके, महादजी शिंदे, भीमराव पानसे यांनी या तोतयास पकडून पुण्यात आणले व पुणे येथे त्यास शिक्षा ठोठावण्यात आली. कोटा दप्तरामधील या कागदपत्रात या प्रकरणाबाबतचे स्पष्ट उल्लेख मिळतात. त्याने सिंहगडावर कब्जा करून शक्ती वाढवली होती. परंतु महादजीने त्याचे पारिपत्य करून चहूबाजूंनी वाहवा मिळवली होती. यावरून सदाशिवभाऊंचा तोतया या प्रकरणात महादजीने महत्वाची भूमिका बजावली होती.

### ३.५.११ महादजी शिंदे व करवीर मोहीम (१७७६ ते १७७८) :

करवीर राज्यातील महाराणी ताराबाई व छत्रपती संभाजी यांनी छत्रपती शाहू व पेशव्यांच्या विरोधात लढाईचे हत्यार उपसले होते. रघुनाथरावाच्या चिथावणीमूळे इ. स. १७७६ मध्ये पेशव्यांच्या प्रदेशावर हल्ले करण्यास सुरुवात केली होती. यावेळी पुणे दरबाराच्या आदेशावरून महादजी यांनी करवीर मोहीम उघडून छत्रपती शिवाजी दुसरे यांना करार करण्यास भाग पाडले. २३ एप्रिल १७७८ रोजी महादजी व करवीरकर छत्रपती यांच्यात करार झाला. या करारातील अटी पुढीलप्रमाणे –

१)  १५ लक्ष रुपयांचा प्रदेश पेशव्यास देण्याचे कबूल केले.

२)  पटवर्धनांचा प्रदेश पटवर्धन यांना परत देणे.

३)  त्याचबरोबर छत्रपती धाकटे शाहू यांना त्रास न देण्याचे करवीरकरानी मान्य केले.

**३.५.१२ मोरोबा फडणीस प्रकरण :**

मराठ्यांच्या राजकारणात नाना फडणीस यांना दूर करणे. रघुनाथराव यांना पेशवे पद मिळवून देण्याकरता मोरोबा फडणीस यांनी जे कारस्थान रचले त्याचा मोरोबा फडणीस प्रकरण म्हणून ओळखले जाते. यात इंग्रजांबरोबर सदाशिव रामचंद्र, मानाजी फाकडे, तुकोजी होळकर हेही सामील होते. तुकोजीला या कामाकरता पाच लाख रुपये मिळणार होते. पैशाची अडचण असल्यामुळे तुकोजीने पैशाच्या लोभापायी मोरोबा फडणीस यांचा पक्ष घेतला. मोरोबा फडणीस व त्यांच्या सरदारांच्या फौजांनी २६ मार्च १७७० रोजी पुणे जिंकून घेतले. पुढे जवळजवळ तीन महिने पुण्याचा कारभार मोरोबा फडणीस यांच्याकडे होता. दुसऱ्या बाजूस महादजी शिंदे, हरिपंत फडके, परशुराम पटवर्धन पुण्यात पोहचले. महादजी शिंदे यांनी मोठ्या कुशलतेने तुकोजी होळकर यास पेशव्यांच्या बाजूस वळवले. मोरोबा फडणीस यांची सारी भिस्त तुकोजीच्या फौजेवर असल्यामुळे तुकोजीचा आधार नाहीसा झाल्यामुळे मोरोबा फडणीसचा गट अधिक कमजोर बनला. परिणामी मोरोबा फडणीस यांनी पुण्यातून पलायन केले. १२ जुलै १७७८ रोजी नारो गणेश, बयाबा पुरंदरे, मोरोबा फडणीस व त्यांच्या अनुयायांना कैद करण्यात आले. त्यांना अहमदनगरच्या किल्लयात कैदेत ठेवले. अशा प्रकारे मोरोबा फडणीसाच्या रूपाने मराठा राज्यावर आलेले संकट महादजीने चतुराईने परतावून लावले होते.

**३.५.१३ मराठा–इंग्रज युद्ध :**

मोरोबा फडणीस प्रकरण फसल्यामुळे रघुनाथराव यांच्या पेशवे बनण्याच्या आशेवर पाणी फिरले. त्याचप्रमाणे इंग्रजांच्या आशेवर पाणी फिरले. इंग्रजांनी रघुनाथरावाला यांना हाताशी धरून पुन्हा एकदा मराठ्यांच्या राजकारणात हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करत होते. यावेळी गव्हर्नर जनरल हेस्टिंग्ज याने मुंबईच्या गव्हर्नर हॉर्नबी यास पूर्ण स्वातंत्र्य दिले होते. त्याचप्रमाणे मद्रासचा गव्हर्नर हॉर्नबी यास पाहिजे ती मदत करण्याच्या सूचनाही दिल्या होत्या. यावेळी महादजी शिंदे यांना इंग्रजाकडे वळवण्यासाठी अनेकदा प्रयत्न झाले. त्यांची मनधरणी करण्यात आली. मात्र त्याला अपेक्षित यश मिळाले नाही.

इ. स. १७७८ मध्ये रघुनाथराव व कर्नल इगर्टन यांच्या नेतृत्वाखाली इंग्रज पुण्याच्या दिशेने निघाले. यावेळी गनिमी हल्ला करत इंग्रजांचा पराभव करणे, रसद तोडणे ही जबाबदारी महादजी शिंदे,तुकोजी होळकर, फडके इत्यादी सरदारांवर सोपवण्यात आली होती. यावेळी झालेल्या लढाईत स्टेव्हर्ट मरण पावला व इगर्टन आजारी पडल्यामुळे तो मुंबईस परत गेला. तळेगाव, वडगाव येथे झालेल्या लढाईत इंग्रजांचा दारुण पराभव झाला.

**३.५.१४ वडगावचा तह (जानेवारी १७७९) :**

१५ जानेवारी १७७९ रोजी इंग्रज वकील महादजीकडे आला. १७ जानेवारी रोजी महादजीच्या नेतृत्वाखाली मराठे व इंग्रज यांच्यात वडगावचा तह झाला या तहानुसार –

१) रघुनाथराव यांना मराठ्यांच्या स्वाधीन करावे.

२) गुजरातमधील प्रदेश मराठ्यांचा जिंकलेला प्रदेश मराठ्यांना परत द्यावा.

३) बंगालमधून मदतीसाठी बोलवलेली फौज इंग्रजांनी परत पाठवावी.

४) वरील तहाची अंमलबजावणी होईपर्यंत इंग्रजांचे दोन अधिकारी स्टेवर्ट व फार्मर यांना ओलीस ठेवावे.

बोरघाट व तळेगाव वडगाव या लढाईत महादजीने महत्त्वाची भूमिका बजावली होती.

### ३.५.१५ रघुनाथरावांचे पलायन व मराठा इंग्रज युद्ध (१७८०) :

वडगावचा तह झाला असला तरी रघुनाथराव गप्प बसणारे नव्हते. रघुनाथराव गुजरातला पळून गेले. यावेळी इंग्रज आधिकारी गोगार्ड याने त्यांचे स्वागत केले. त्यावेळी गायकवाड यांना आपल्या बाजूस वळवून वडगावच्या तहाने झालेली अप्रतिष्ठा त्यांना धुऊन काढण्याचा प्रयत्न इंग्रज करू लागले. त्यांना रघुनाथराव यांची साथ मिळाली होती. यावेळी महादजीचा बंदोबस्त असतानाही रघुनाथराव कसे काय सुटले. यावरून रघुनाथराव यांना महादजीचा पाठिंबा होता. असे अनेक प्रश्न उपप्रश्न नानांच्या मनामध्ये निर्माण होत चालले होते.

महादजीने स्टेवर्ट व फार्मर या दोन इंग्रज अधिकाऱ्यांना सोडल्यामुळे त्यांची स्वामीनिष्ठेवर प्रश्न निर्माण होण्यास सुरुवात झाली. गोगार्ड पुन्हा मराठ्यांवर चाल करून आला पण त्याचा उपयोग झाला नाही. बोरघाटच्या लढाईमध्ये मराठ्यांनी त्याचा पुरता पाडाव केला. यावेळी महादजीच्या उत्तरेच्या प्रदेशावर हल्ले करण्यास इंग्रजांनी सुरुवात केली. निजाम-भोसले यांना आपल्या बाजूस वळवून बंगालमधील आपला प्रदेश इंग्रजांनी संरक्षित केला. आपली सगळी शक्ती मराठ्यांवर केंद्रित केली.

यावेळी मराठ्यांची छावणी कोठे असावी यावरून महादजी व नाना यांच्यामध्ये वादास सुरुवात झाली. नानांच्या मते खानदेशात (कोंडाईबारी ) येथे छावणी करावी. कारण रघुनाथराव गुजरातमधून येण्याचा मार्ग कोंडाईबारी मधून होता. त्यामुळे रघुनाथराव यांना पकडावे म्हणून खानदेशात छावणी करावी असे नानास वाटत होते. यावेळी इंग्रज दिल्लीच्या बादशहाला ओलीस ठेवतील. त्यामुळे खानदेशऐवजी माळव्यात मराठ्यांची छावणी असावी हे महादजीने नानास पटवून सांगितले.

यावेळी इंग्रजांनी महादजीस शह देण्यासाठी त्यांच्या ताब्यातील बुंडेलखंड व माळवा या भागातील बालेकिल्ले आपल्या ताब्यात घेतले. थेट महादजीवर हल्ला करण्याची योजना आखली. अंत्रींकडे इग्रज फौजा फोफामच्या नेतृत्वाखाली निघालेल्या. महादजी शिंदे यांनी अंबुजी इंगळे व खंडेराव हरी यांच्यामार्फत इंग्रजांच्या हल्ल्याला तोंड देण्याची तयारी केली. यावेळी त्यांच्या मदतीस इंग्रज अधिकारी म्युर गुजरातमधून दाखल झाल्यामुळे मराठ्यांची स्थिती अधिक कमजोर झाली. अशा दयनीय परिस्थितीतही मराठ्यांनी १५ जुलै १७८१ रोजी कर्नल म्युरचा पराभव केला. कोकणातही गोगार्डचा पराभव झाल्यामुळे गव्हर्नर जनरल हेस्टिंग्जला मोठा धक्का बसला होता. गव्हर्नर जनरल हेस्टिंग्ज बनारसला येऊन महादजी बरोबरतहाची बोलणी करू लागला.

### ३.५.१६ सालबाईचा तह (१७ मे १७८२) :

उत्तरेत व दक्षिणेत आपला पराभव समोर दिसत असताना काहीही करून तह करावा व आपली प्रतिष्ठा वाचवावी. म्हणून हेस्टिंग्ज महादजीस लिहितात आमचा तह करून द्यावा व दिल्लीत जाऊन बादशाहाचा वाटेल तसा बंदोबस्त करावा. आम्ही तुमच्या आड येणार नाही. इंग्रज वकील अँडरसन व महादजी यांची भेट २३ डिसेंबर १७८१ मध्ये प्रथम झाली. यांच्यात प्रदीर्घ चर्चा होऊन १७ मे १७८२ मध्ये सालबाईचा तह मराठे व इंग्रज यांच्यामध्ये घडून आला

### ३.५.१७ महादजी उत्तर भारताचे राजकारण (१७८२ ते १७८६) :

पहिल्या मराठा-इंग्रज युध्दात इंग्रजांचे सामर्थ्य कौशल्य व इतर बाबींची जाणीव झाल्यामुळे आपल्या फौजेचे आधुनिकीकरण करण्यास महादजीने सुरुवात केली. डॉ. बॉयन याच्या नेतृत्वाखाली कवायत सैन्याची फलटणी तयार करण्यास सुरुवात केली. मधल्या काळात बाराभाई प्रकरण, रघुनाथराव संघर्ष तसेच इंग्रजांबरोबरीच्या लढ्यांमुळे दिल्लीकडे लक्ष देण्यास महादजीला वेळ मिळाला नव्हता. सततच्या युद्धांमुळे महादजीचच आर्थिक स्थिती डबघाईला आली होती. यावेळी वजीर नफजखानाचा मृत्यू झाल्यामुळे दिल्लीच्या राजकारणामध्ये जम बसेल अशी संधी मराठ्यांना चालून आली. महादजीने यावेळी नाना फडणीसाकडे २५ लक्ष रुपयांची व फौजेची मागणी केली. यावेळी नानांनी त्यांना मदत न करता उलट त्यांच्याकडून उत्तर मोहिमेचा हिशेब मागण्यास सुरुवात केली. यामुळे महादजीनी पुणे दरबाराकडून मदत मिळणार नाही हे ओळखून स्वतः उत्तर भारताकडे प्रयाण केले.

### ३.५.१८ महादजी शिंदे व माळवा बुंदेलखंड :

दक्षिणेच्या कारभारातून मुक्त होताच महादजीने आपला मोर्चा माळवा व बुंदेलखंडकडे वळवला भोपाळ, दांतिया, नरवर, सालाबाई चंदेरी या प्रदेशातील सरदार, त्याचप्रमाणे गोहद राजा छत्रजीत, चंदेरीचा राजा राजधर यांना वठणीवर आणण्याचे काम केले.

### ३.५.१९ ग्वाल्हेर व गोहद काबीज १७८३ ते १७८४ :

ग्वाल्हेर किल्ला राजा छत्रजीतच्या ताब्यात होता. महादजीने फेब्रुवारी १७८३ मध्ये या किल्ल्यास वेढा दिला. जवळजवळ पाच महिने हा वेढा चालू होता. २१ जुलै १७८३ रोजी हा किल्ला आपल्या ताब्यात घेऊन त्याची जबाबदारी खंडेराव हरि भालेराव यांच्यावर सोपवली. किल्ला जिंकल्यानंतर महादजीने आपला मोर्चा गोहदकडे वळवला. यावेळी गोहदच्या राजाने ब्रिटिशांकडे महादजीच्या विरोधात मदतीची मागणी केली. पण त्यास यश मिळाले नाही. महादजीने गोहदच्या किल्ल्यास वेढा दिला व रसद तोडली. यावेळी राजा छत्रजीतने पळून जाण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यास पकडून किल्ल्यात कैद केले. २३ फेब्रुवारी १७ ८४ ला गोहदचा किल्ला महादजीच्या ताब्यात आला.


### ३.५.२० महादजी व बादशहा शहाआलम यांची भेट (१४ नोव्हेंबर१७८४) :

आफ्राशियाब याच्या मृत्यूनंतर हमदानी यांनी दिल्लीच्या राजकारणात उच्छाद मांडला होता. त्यामुळे

शहाआलम अधिक हतबल झाला होता. यावेळी महादजीने आपल्या भेटीसाठी यावे याकरता बादशहाकडून वारंवार पत्रव्यवहार केला जात होता. महादजीने हमदानीचा बंदोबस्त करत १७ नोव्हेंबर १७८४ रोजी बादशहाची भेट घेतली. यावेळी दिल्लीच्या राजकारणातील घडी नीट बसवून देण्याची विनंती बादशहाने महादजीस केली. यावेळी महादजी म्हणतात 'बिना पद दिल्याखेरीज चौघांवर दबाव बसून सल्तणीचा बंदोबस्त होणार नाही यावेळी बादशहाने महादजीला सांगितले तुम्हाकडे पद सांगावे. वजीर आणि इंग्रज यांच्यावर दाब पडावा असा प्रकार घडला पाहिजे त्यास श्रीमंत राजश्री यांचे नावे वकील-ए-मुतालिक व वजीर बक्षीगिरी ही दोन पदे त्यांच्याकडे देऊन नायबी तुम्हास देतो.

### ३.५.२२ महादजीस वकील-ए-मुतालिक व मीरबक्षी पद बहाल (४ डिसेंबर १७८४)

महादजीस दोन्ही पदे देण्याचे बादशहाने ठरवले. ४ डिसेंबर १७८४ रोजी भव्य दरबार भरवून सर्वश्रेष्ठ बहुमान वकील-ए-मुतालिक हा बहुमान महादजीस प्रदान केला. यावेळी पदास साजेल आवश्यक तो नजराना वस्त्रे व इतर गोष्टी महादजीस बहाल करण्यात आला. प्रथम मराठा-इंग्रज युद्धात महादजी गुंतला असताना इंग्रजांनी अनेक रजपूतांबरोबर तह करून मैत्री संपादन केली होती. या काळात अनेक राजपूत राजानी मराठा प्रदेशावर हल्ले करण्यास सुरुवात केली. यामध्ये सवाई जयसिंग विजयसिंह,मोचडीचा राजाप्रतापसिंह यांचा समावेश होता. एप्रिल १७८६ मध्ये महादजीने जयपुरवर आक्रमण करत ... राजा प्रतापसिंग याचा पराभव केला. अनेक रजपूत ... महादजीच्या विरोधात राजपुतांचा संघ तयार करण्याची योज... होती. त्यामुळे त्यात विजयसिंग सगळ्यात पुढे होता. ... हल्दिया या प्रकरणात सामील होता. यावेळी रजपूत राजे ... लढाया होत होत्या.



महादजी शिंदे यांचा वकिल-ए-मुतालिकीचा शिक्का

### ३.५.२४ लालसोटचे युद्ध-जुलै १७८७ :

याच काळात रजपुताना मोहम्मदबेग हमदानी यां... ...ळे राजपुताना अधिकच उत्साह आला होता. यावेळी झालेल्या लाल... ...झाला. लालसोट युद्धातील पराभवामुळे महादजीच्या उत्तरेतील सामर्थ्याला धक्का लागला. यावेळी पुणे दरबारने महादजीला कोणतीही मदत केली नाही. उलट महादजीचे महत्व कमी कसे होईल याकडे नानाचे लक्ष होते. लालसोटच्या युद्धातील पराभव म्हणजे मराठ्यांचे दुसरे पानीपत म्हणून ओळखले जाते. लालसोट लढाईत महादजीचा पराभव फक्त आर्थिक कमतरतेमुळे झाला होता. महादजीस योग्य वेळी मदत न मिळाल्यामुळे पराभव झाल्याचे अनेक इतिहासकार मत व्यक्त करतात.

### ३.५.२५ दिल्लीवर गुलाम कादिराचे वर्चस्व :

लालसोटच्या युद्धात महादजीचा पराभव झाल्यामुळे महादजीच्या शत्रूंना अधिक जोर आला होता. याच काळात दिल्लीतील सत्ता बळकवण्यास गुलामकादर यांना यश मिळाले. त्याने बादशहाला कैद करून त्याचे डोळे काढले व अन्न-पाण्याशिवाय कैद करुन दिल्लीवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले.

यावेळी उत्तरेतील इस्माईल बेग प्रकरणाने तोंडवर काढले. इस्माईल बेग व महादजी यांच्यात संघर्षला सुरुवात झाली. पुणे दरबारने महादजीस मदत करण्यासाठी तुकोजी होळकर व आलिजाबहादूर यांना तुकोजीच्या मदतीसाठी पाठवले. मात्र त्यांनी महादजीला मदत करण्याऐवजी वेळ काढूपणाचे धोरण स्वीकारल्याचे दिसते. इस्माईल बेग याने तुकोजी होळकराशी संधान साधून महादजीस मदत करू नये अशी विनंती केली होती. इ. स. १७८८ मध्ये महादजी व इस्माईल बेग यांच्यात लढाई होऊन इस्माईल बेगाचा पराभव झाला.

इस्माईल बेगच्या पराभवामुळे लालसोटच्या युध्दात गेलेली प्रतिष्ठा परत मिळवण्यास मदत झाली. या विजयामुळे महादजीचा दबदबा वाढला. इस्माईल बेगच्या पराभवानंतर महादजीने आपला मोर्चा दिल्लीकडे वळवला व २ ऑक्टोबर १७८८ मध्ये दिल्ली जिंकून घेतली. ११ ऑक्टोबर १७७८ मध्ये अंध बादशहा शहाआलम यास गादीवर. बसवले गुलाम कादिरचे पारिपत्य करण्यात महादजीस यश आले.

### ३.५.२६ महादजी शिंदे व लाखेरीचा संघर्ष :

पेशवे बाळाजी विश्वनाथाच्या काळात होळकर व शिंदे घराण्यांनी मराठ्यांच्या इतिहासात दैदीप्यमान कामगिरी बजावली होती. या दोन घराण्याचे कार्यक्षेत्र एकच असल्यामुळे यांच्यात संघर्षाची अनेक प्रसंग उद्‌भवले. मात्र प्रत्यक्षात उघड संघर्ष कधीच झाला नाही. मल्हारराव होळकर, महादजी शिंदे, अहिल्याबाई होळकर यांनी सामोपचाराने काही प्रकरणे मिटवली. लाखेरीचे युद्ध म्हणजे या दोन घरण्यातील प्रथम उघड संघर्ष होय. मल्हारराव होळकर यांच्या मृत्यूनंतर उत्तरेच्या राजकारणात शिंदे अधिक प्रभावी बनले. त्यामुळे तुकोजीच्या मनात महादजी बद्दल असूया निर्माण झाली होती. याचा फायदा पुणे दरबारने म्हणजेच नाना फडणीस यांनी घेतला. महादजीचे वाढते महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न केला. नाना फडणीस यांना महादजीचे यांचे वर्चस्व सहन होत नव्हते. म्हणून महादजीला शह देण्यासाठी तुकोजीचा उपयोग केला. शिंदे होळकर घराण्यातील वादाचे प्रश्न पुणे दरबारने नीट सोडले नाही. लालसोट युद्ध, गुलाम कादीर प्रकरणात तुकोजीने प्रामाणिकपणे मदत न करता वेळ काढूपणाचे धोरण स्वीकारले होते.

### ३.५.२७ लाखेरीचे युद्ध (१ जानेवारी १७९३) :

इ.स. १७९२ मध्ये उत्तरेतून महादजी पुणे दरबारात आले होते. महादजीचे सर्व सैन्य उत्तरेत वेगवेगळ्या ठिकाणी कार्यरत होते. याचा फायदा घेत होळकरांच्या फौजांनी शिंद्यांच्या प्रदेशावर हल्ले करण्यास सुरुवात केली होती. यावेळी उभय पक्षांतील संघर्ष शांततेने मिटवण्याऐवजी संघर्षास सुरुवात झाली. तुकोजीचा मुलगा मल्हारराव दुसरा हा अतिशय रागीट प्रवृत्तीचा होता. शिंद्यांच्या सैन्याचा एका दिवसात मारून बरबाद करीन अशी भाषा वापरत होता. यावेळी पराशर दादा, बापू होळकर यांचा सल्ला मल्हारराव यांनी ऐकला नाही. शिंदे यांच्या बाजूने

जिवबादादांनी युद्धाची तयारी केली. उभय पक्षात १ जानेवारी १७९३ रोजी युद्ध होऊन होळकरांचा पराभव झाला. या युद्धाचे वर्णन करताना ग्रॉट डफ लिहितो 'शिंदे-होळकर यांच्या परस्पर ईर्षा व द्वेषाची भावना आजपर्यंतची लपून राहिली होती. ती आज लाखेरीच्या युद्धाने उघड झाले. सरदेसाई यांच्या मते शिंदे व होळकर या दोन परिवारामध्ये पानिपत युद्धापूर्वी सुरू झालेला संघर्ष लाखेरीच्या युद्धाने समाप्त झाले.

**३.५.२८ महादजीचा मृत्यू (१२ फेब्रुवारी १७९४) :**

पुण्यात महादजी वास्तव्यास असताना पुणे दरबारच्या प्रशासनाची योग्य ती व्यवस्था लावली. नानांबरोबर त्यांचे संबंध पूर्ववत होत गेले. पुण्यात असताना ११ फेब्रुवारी १७९४ रोजी अचानक त्यांच्या प्रकृतीमध्ये बिघाड होऊन १२ फेब्रुवारी १७९४ रोजी वानवडी येथे त्यांचे देहावसान झाले. त्यानंतर तेथेच त्यांची छत्री बांधण्यात आली.

**३.५.२९ महादजी शिंदे यांची योग्यता :**

पानिपत युद्धानंतर उत्तरेत मराठ्यांची प्रतिष्ठापना स्थापन करणे जाट रजपुत रोहिले यांचा पराभव करणे, शहाआलम यास पुन्हा गादी प्राप्त करून देणे यामध्ये महादजीचा मोठा वाटा होता.

**१. एक कुशल योद्धा म्हणून वावर :**

महादजी एक कुशल योद्धा होता. उत्तर भारतातील प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष लष्करी मोहीम असो इंग्रजांबरोबर बोरघाटची लढाई असेल, वडगावची लढाई असेल व इतर लढायांमध्ये त्यांचे कौशल्य आपणास दिसून येते. त्याचप्रमाणे इंग्रजांच्या कवायती सैन्याचे महत्त्व ओळखून डी बॉइन यांच्या नेतृत्वाखाली कवायती सैन्य उभे केली. जदुनाथ सरकार यांच्या मते महादजी यांच्या काळात त्यामुळे संपूर्ण उत्तर भारताच्या राजकारणात काही काळ त्याच्याच नावाचा दबदबा होता. त्यांच्या मृत्यूमुळे मराठ्यांचे अपरिमित नुकसान झाले.

**२. एक सत्पुरुष म्हणून महादजीची ओळख :**

उत्तर भारताच्या राजकारणात मिळालेले यश व कीर्ती याचा त्यांच्यावर कोणताच परिणाम झाला नव्हता. दिल्लीच्या बादशहाकडून सनदा पेशव्याच्या नावाने मिळाव्यात असा त्यांचा अट्टहास होता. यावरून त्यांची स्वामीनिष्ठा लक्षात येते.

**३. मराठेशाहीच्या हिताकडे कायम लक्ष ठेवले :**

मराठेशाहीचा निष्ठावंत सेवक म्हणून महादजींची ओळख आहे. महादजीना स्वसामर्थ्यावर उत्तरेत स्वतंत्र राज्य निर्माण करता आले असते. पेशव्यांशी गद्दारी करण्याचा विचार त्यांच्या मनात कधी आला नाही. ते अनेकदा म्हणत द्रव्यसंचय घेण्याचा हव्यास कशासाठी करावा आमच्या पोटी कोणी नाही. जे करणे श्रीमंताची सेवा करावी या बुद्धीने करावे मराठेशाहीचे अहित होईल असे कोणतेही कार्य त्यांच्याकडून झाले नाही.

अशा प्रकारे मराठेशाहीची सेवा करणारा एक निष्ठावंत योद्धा म्हणून मराठ्यांच्या इतिहासात त्यांचे स्थान अद्वितीय आहे

### ३.६ नाना फडणीस :



मराठेशाहीच्या उत्तर कालखंडामध्ये ज्या अनेक व्यक्तीने मराठ्यांच्या पराक्रमाची पताका तेवत ठेवली. मराठ्यांची प्रतिष्ठा पुन्हा प्रस्थापित केली. त्यामध्ये अग्रक्रमाने नाना फडणीस यांचा उल्लेख करावा लागतो. नारायणराव पेशव्यांच्या वधानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीमध्ये बाराभाई मंडळाचा उगम झाला. नानांच्या मुत्सद्देगिरीने व महादजीच्या पराक्रमाने मराठ्यांनी आपल्या सर्व शत्रूना नामोहरण केले. मराठेशाहीतील चाणाक्ष व चतुर मुत्सद्दी राजकारणी म्हणून नाना फडणीस यांना ओळखले जाते.

### ३.६.१ नाना फडणीस यांचा जन्म व बालपण :

नाना फडणीस यांचा जन्म १२ फेब्रुवारी १७४२ मध्ये सातारा येथे झाला होता. त्यांचे पूर्ण नाव बाळाजी जनार्दन भानू हे होते. भानू घराणे पूर्वीपासून पेशव्याचे फडणीशीचे काम करत होते. त्यामुळे परंपरागत पेशव्याची फडणीसी त्यांना मिळण्यात अडचण आली नाही. नानाचे बालपण पेशव्यांच्या दरबारात गेल्यामुळे मराठेशाहीचे राजकारण डावपेच त्यांनी जवळून पाहिले होते. त्यामुळे राजकारणातील मुत्सद्दीपणाचे त्यांना बाळकडू मिळाले होते. पेशव्यांच्या पूर्वजांना नानाच्या पूर्वजांनी (रामजी व बाळाची) खूप मदत केली होती. तेव्हा या भट घराण्याने आमास भाकरी मिळेल त्यामधील अर्धी भाकर तुम्हास देऊ असे वचन दिले होते. पुढे ते वचन पेशवे पदाची प्राप्ती झाल्यानंतर भट घराण्याने पाळले व फडणीशीचीचे काम भानू घराण्यास दिले.

### ३.६.२ नाना फडणीस व पानिपतचा संग्राम :

नाना फडणीस यांच्या संपूर्ण कारकिर्दीचा विचार केला तर लष्करी युद्धापेक्षा मुत्सद्देगिरीचे प्रश्न हाताळण्या मध्ये त्याचा हातखंडा होता असे म्हणता येते. त्यांच्या संपूर्ण आयुष्यात खूप कमी वेळा रणांगण व त्यांचा संबंध आला होता. त्यापैकी पानिपतचे युद्ध होय. प्रत्यक्ष रणांगणावर काय होते हे नाना फडणीस यांनी पाहिले होते. पुढील काळात इंग्रज-मराठा युद्ध जवळजवळ सहा महिने चालले होते तरी नानी त्यामध्ये प्रत्यक्षात कधीच भाग घेतला नाही. उलट पुण्यात राहून ते या युद्धाचे व फौजेचे संचलन करत होते. खर्ड्याच्या लढाईत मराठ्यांनी निजामाचा पराभव केला. यावेळी नाना रणांगणापासून पासून दहा कोस लांब होते. पानिपत युद्धावेळी त्यांचा हेतू संत-महात्मे याचे दर्शन घेणे पवित्र स्थळांना भेटी देणे एवढाच होता. पानिपत युद्धाचे वर्णन करताना म्हणतात जे प्राप्त होते ते अनाथ झाले जे मातब्बर चौदा चौकडीचे धनी ते यापूर्वीच पळाले गर्दीत नाहीशी झाले. पानिपत युद्धात जी काही मंडळी वाचून पुण्यात आली. त्यामध्ये नाना एक होते दैवाच्या आशीर्वादामुळे आपण वाचलो अशी नानाची समजूत होती आणि ती पुढे कायम राहिली.

### ३.६.३ पेशवे माधवराव व फडणीशीची प्राप्ती :

इ.स. १७६१ मध्ये पेशवाईची वस्त्रे पेशवे माधवराव यांनी स्वीकारल्यानंतर मराठा राज्याची घडी बसवण्याचा प्रयत्न त्यांनी केला. याच काळात माधवरावांनी अनेक अडचणीवर मात करत मराठ्यांची प्रतिष्ठा पुन्हा मिळवून

दिली. पेशवे माधवराव जे–जे काम सांगितले ते काम अत्यंत चोखपणे झपाट्याने पार पाडले. या काळात पेशव्यांचा मुख्य कारभारी या नात्याने सखाराम बापू बोकील कार्य करत होते. रघुनाथराव प्रकरणामुळे सखाराम बापू यांच्या निष्ठेवर प्रश्नचिन्ह निर्माण होऊन कारभारीपद आपोआप नानाकडे चालून आले. दरम्यानच्या काळात रघुनाथराव यांनी नानाची फडणीस यांची फडणीशी रद्द करून चिंतो विठ्ठल रायरीकर यांना दिले होते. अशा प्रकारे माधवराव यांच्या काळात मिळालेल्या फडणीशी पदावर रघुनाथरावांच्या काळात गंडांतर आले. राक्षसभुवनच्या लढाईनंतर माधवराव पेशवे पूर्वीप्रमाणे पेशवेपदावर कार्य करू लागले. त्यामुळे परत एकदा राजकीय फेरफार होऊन नानांना फडणीशी प्राप्त झाली. पेशवे माधवराव यांचा करारी स्वभाव, कडक शिस्त, कामाचा झपाटा, हिशोबी स्वभाव या सर्वांचा प्रभाव नानांवर पडल्याचे दिसून येतो. थोडक्यात १७६८ पर्यंत पेशवे माधवराव यांच्या खालोखाल प्रमुख अधिकारी म्हणून नानाची ओळख निर्माण झाली होती. पेशवेकाळातील लहानसहान कामे करून घेण्यासाठी सरदारांना नानाची मर्जी संपादन करावी लागत असे.

### ३.६.४ नारायणरावांचा खून व बारभाई मंडळाची स्थापना :

इ.स. १७७३ मध्ये पेशवा नारायणरावाचा खून झाला. ही घटना अत्यंत क्लेशदायक होती. नारायणरावांच्या खुनाच्या प्रकरणांमध्ये रघुनाथरावांचे नाव समोर आल्यामुळे निर्माण झालेले प्रश्न कसे सोडवावेत. यासाठी नानांच्या पुढाकाराने प्रमुख सरदारांची बैठक आयोजित करण्यात आली. त्यातून बारभाई मंडळाचा उदय झाला. या बारभाई मंडळाचा प्रमुख म्हणून नाना फडणीस वावरत होता. मराठ्यांच्या इतिहासात नारायणरावांचा खून ही अत्यंत क्लेशदायक घटना असली. तरी नाना फडणीस यांच्या वैयक्तिक प्रगतीच्या दृष्टीने ही घटना खूपच फायदेशीर होती असे म्हणता येते. कारण या खून प्रकरणानंतर नाना फडणीस यांच्या प्रगतीचा आलेख नेहमीच उंचावत राहिल्याचा दिसतो.

### ३.६.५ नाना व चतु: संघाची स्थापना १७७९ :

पेशवा माधवरावांच्या मृत्यूनंतर इंग्रजांचे राजकारण व डावपेच याची सगळ्यात जास्त जाणीव असणारा पुणे दरबारातील एकमेव व्यक्ती म्हणून नानाला ओळखले जाते. नानाला निजाम, हैदर अली किंवा उत्तरेतील ऐतदेशीय सत्तेपेक्षा इंग्रजांचे राजकारण लष्करी शक्ती याची जाणीव झाली होती. इंग्रजांनी भारतीय राजकारणातून बाहेर काढायचे असेल तर खूप मोठ्या सामर्थ्याची गरज आहे. ते सामर्थ्य एकट्या मराठेशाहीमध्ये नाही याचीही जाणीव नानाला होती. त्यातूनच नानाने चतु: संघाची स्थापना करण्याचे ठरवले. त्यात निजाम, हैदरअली मराठे जानोजी भोसले यांचा समावेश होता. तसे पहिले तर वरील चार सरदार एकत्र येणे अशक्य होते. परंतु ही अशक्य गोष्ट नानांनी शक्य करून दाखवले. पुढे हा चतु:संघ खूप दिवस टिकला नाही. इंग्रजांनी आपल्या राजकीय कौशल्य व मुत्सद्देगिरीच्या जोरावर एकमेकास एका बाजूला सारून चतु:संघाचा शेवट घडवून आणला. मराठ्यांनी हैदरअलीला विचारात न घेता इंग्रजांबरोबर सालबाईचा करार केला. त्यामुळे तो नाराज होऊन या चतु:संघातून बाहेर पडला होता.

### ३.६.६ सवाई माधवराव व नाना फडणीस :

सवाई माधवरावाचा काळ मराठीशाहीतील अत्यंत प्रतिकूल असा काळ होता. मराठेशाहीतील अंतर्गत गृहकलह व इतर प्रादेशिक सत्ता मराठ्यांचा शेवट घडवून आणण्यासाठी कार्य करू लागल्या होत्या. सवाई माधवराव लहान असताना त्यांच्या मातोश्री मरण पावल्या. त्यामुळे सवाई माधवराव यांच्या संगोपनाची संपूर्ण जबाबदारी नाना फडणीस यांनी पार पडली. ती जबाबदारी नानाने पार पडत असताना सवाई माधवराव यांना खूप स्वातंत्र्य बहाल केले नाही. सवाई माधवराव व महादजी यांचा बरेच प्रकरणात स्वभाव जुळण्यास सुरुवात झाली. त्यामुळे नाना फडणीस यांना सवाई माधवरावाची भीती वाटू लागली. त्यातूनच पुढे नाना व महादजी यांच्या शह-काटशहाचे राजकारण चालू झाले.

### ३.६.७ सवाई माधवराव यांचा मृत्यू :

नाना व रघुनाथराव यांच्यातील संघर्ष संपूर्ण मराठेशाहीस सर्वश्रुत होता. नानांनी रघुनाथराव यांची तीन मुलाना जुन्नरला कैदेत ठेवले होते. त्यापैकी बाजीराव दुसरा हा खूप चतुर होता. त्याने आपला मित्र बळवंत नागनाथ यांच्याकरवी सवाई माधवराव यांच्याशी संधान साधण्यास सुरुवात केली होती. ही बातमी नाना फडणीस यांना समजताच त्यांनी सवाई माधवरावाना समज दिली. त्याच्याही पुढे जाऊन बळवंत नागनाथ यास कैद केले. ही बातमी समजताच सवाई माधवराव यांना खूप मनस्ताप झाला. त्यातच ते हत्तीवरून पडले. पुढे शनिवारवाड्याच्या दुसऱ्या मजल्यावरून पडले. त्यात त्याचा २५ ऑक्टोबर १७९५ रोजी मृत्यू झाला.

### ३.६.८ नाना फडणीस व महादजी शिंदे :

पानिपत युद्धानंतर मराठा राजकारणात पेशवा माधवरावाशिवाय आणखी दोन महत्त्वाच्या व्यक्ती होत्या. त्यामध्ये महादजी शिंदे व नाना फडणीस यांचा समावेश आहे. त्यावेळी महादजी शिंदे यांनी आपल्या तलवारीच्या जोरावर उत्तर व दक्षिणकडे आपली प्रतिष्ठा वाढीस लावली. तर नानांनी अंतर्गत कारभारात हिशोब, जमाखर्च, राजकारणातील मुत्सद्देगिरी याच्या जोरावर आपले एक वेगळेच वलय तयार केले. असे असले तरी माधवरावाच्या झंजावातासमोर या दोघांमधील मतभेद उघड झाले नाहीत. पेशवे माधवराव यांच्या मृत्यूनंतर पुणे दरबारात नानाचे वजन वाढण्यास सुरुवात झाली. महादजीचे कार्यक्षेत्र उत्तर भारत असल्यामुळे त्यांचा पुणे दरबारातील राजकारणाशी जास्त संबंध आला नाही. सहाजिकच नानाचे पुणे दरबारातील महत्त्व वाढले. नाना फडणीस यांनी मुत्सद्देगिरीबाबतीत सर्वच आघाडीवर होते. लष्करी मोहिमेत भाग घेऊन तडीस नेण्याचे सामर्थ्य नानाकडे नव्हते. त्यांना सतत कोणाच्या तरी मदतीची गरज भासत असे. त्यामुळे नाना फडणीस यांना महादजीच्या लष्करी सामर्थ्याची भीती वाटत होती. बाह्यरुपी नाना व महादजी यांच्यात एकी असली तरी अंतर्गत शह-काटशहाचे राजकारण नाना फडणीस करत होते. उत्तर भारताच्या राजकारणामध्ये महादजीला मिळणाऱ्या मान प्रतिष्ठा नानाला सहन होत नव्हता. त्यामुळे नाना तुकोजी व अन्य सरदारांकरवी महादजीचे महत्त्व कसे कमी करता येईल याकडे लक्ष देई. होते. लालसोठ युद्ध, रजपूत विरोधातील मोहिमा, इस्माईल बेग प्रकरण या प्रकरणात नानांनी (पुणे दरबार) महादजीस प्रामाणिकपणे मदत केली नाही. असे असले तरी नाना व महादजीच्या जोडीने मराठेशाहीच्या यशाकरता

आपल्यातील मतभेद विसरून वेळोवेळी एकमेकांना मदत केली हे विसरता कामा नये. नाना व महादजी या जोडीने आपल्या मृत्यूपर्यंत इंग्रजांना मराठा राजकारणात हस्तक्षेप करू दिला नाही.

### ३.६.९ मराठा व हैदरअली संघर्ष :

नानांनी आपल्या मुत्सद्देगिरीच्या जोरावर चतु:संघाची स्थापना केली होती. त्यात परस्परविरोधी शत्रूंनाही सामील करून घेत इंग्रजांना एक धक्का दिला होता. परंतु हा चतु:संघ खूप काळ टिकला नाही. इ.स. १८८२ मध्ये मराठ्यांनी इंग्रजांबरोबर सालबाईचा तह केला. त्यावेळेस हैदर अलीला विचारात घेतले नाही. चतु: संघाची स्थापना झाली त्यावेळी एकमेकांना सहकार्य करायचे ठरले होते. यावेळी मराठ्यांबरोबर सालबाईचा तह झाल्यानंतर इंग्रजांनी आपला मोर्चा हैदरअलीकडे वळवला. यावेळी इंग्रज व हैदरअली यांच्यात लढाई झाली. इंग्रजांबरोबर केलेल्या तहामुळे मराठ्यांना हैदर अली यास मदत करता आली नाही. मराठ्यांनी आपला विश्वास घात केला अशी भावना हैदर आलीने करून तो चतु:संघातून बाहेर पडला. पुढे ७ ऑक्टोबर १७८२ रोजी हैदर अलीचा मृत्यू झाला.

हैदरअलीच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा टिपू सुलतानाने इंग्रजांविरुद्ध संघर्ष चालूच ठेवला. इंग्रजांविरोधात झालेल्या लढाईत टिपूचा पराभव होऊन ११ मार्च १७८४ मध्ये मंगलोरचा तह होऊन हे युद्ध समाप्त झाले.

### ३.६.१० मराठा–टिपू संघर्ष व नाना फडणीस :

मराठ्यांनी विश्वासघात केल्यामुळे आपला पराभव झाला असे समजून टिपूने मराठ्यांच्या प्रदेशावर हल्ला करण्यास सुरुवात केली. कित्तूर, नरगुंद या प्रदेशातील मराठा सरदारांना त्रास देण्यास सुरुवात केली. टिपूवरील मोहिमेत नाना फडणीस यांनी हरिपंत फडके, तुकोजी होळकर यांना पाठवले. यावेळी नानाने निजामाशी मैत्री करार करत टिपू विरोधातील मोहिमेत निजामास सामील करून घेतले. सुरुवातीच्या काळातील लढाईत मराठ्यांचा पराभव झाला. यावेळी नानाने फडणीस यांनी मुत्सद्देगिरी दाखवत टिपू विरोधात मराठा–इंग्रज तह घडून आला व या लढाईमध्ये टिपूचा पराभव करून गजेंद्रगडचा तह लादला.

### ३.६.११ गजेंद्रगडचा तह (७ मार्च १७८७)

गजेंद्रगड तहातील कलमे खालील प्रमाणे –

१) हैदर अली व टिपू यांनी मराठ्यांचा व निजामाचा जिंकलेला प्रदेश परत द्यावा.

२) युद्ध खंडणी म्हणून मराठ्यांना ४८ लक्ष रुपये टिपूने द्यावेत.

३) युद्धकैद्यांना एकमेकांनी सोडून द्यावे.

वरील कलमांचा त्यामध्ये समावेश होता. अशा प्रकारे मराठ्यांनी टिपूवर विजय संपादन केला.

### ३.६.१२ उत्तर भारताचे राजकारण व नाना फडणीस :

पानिपत युद्धावेळी नाना फडणीस उत्तर भारतात गेला होता. त्यानंतर नाना उत्तर भारतात कधीच गेला नाही. पुण्यात राहून उत्तर भारताचे राजकारण करत होता. उत्तर भारताच्या राजकारणाची खरीखुरी सुत्रे महादजी

शिंदे व तुकाजी होळकर व इतर सरदारांकडे होते. नाना फक्त आदेश देण्याचे काम करत होता. उत्तर मोहिमेत मराठ्यांची प्रतिष्ठा, दबदबा वाढवावा असा उद्देश असला तरी महादजीची प्रतिष्ठा वाढू नये असे त्याला मनातून वाटत होते. होळकर-शिंदे यांच्यातील संघर्ष नीट मिटवता आला असता पण नानाने त्याच्याकडे जाणून बुजून दुर्लक्ष केले. उलट तुकोजीला भरीस घालण्याचे काम केले. तुकोजीस पाठवलेल्या पत्रात ते म्हणतात 'तुम्ही व शिंदे बरोबरीचे आहात'. यावरून तुकोजीचा महादजींच्या विरोधात हत्यार म्हणून वापर करत होते. उत्तरेच्या अनेक मोहिमेत तुकोजीने महादजीस सहकार्य केले नाही. उत्तरेत मराठ्यांनी अनेक विजय मिळवले असले तरी त्याचे श्रेय पुणे दरबारास म्हणजेच नाना फडणीस यांच्याकडे जात होते.

### ३.६.१३ नाना फडणीस व निजाम संघर्ष :

मराठ्यांचे जे प्रमुख शत्रू होते त्यामध्ये निजामाचा क्रमांक सगळ्यात वरचा होता. निजामाकडे मराठ्यांची तीन कोटी रुपयाची खंडणी थकली होती. त्याची मागणी करताच निजाम व मराठे यांच्यात संघर्ष सुरु झाला. हा प्रश्न शांततेच्या मार्गाने सोडवणे शक्य होते. मात्र दोन्ही दरबारातील परस्परविरोधी गटामुळे निजाम-मराठा संघर्ष अटळ झाला. निजामाकडून वाटाघाटीसाठी गोविंदराव काळे, रामनारायण रेणुकादास हे पुण्यात आले होते. मात्र त्यांनी पुण्यातून काढता पाय घेतला. त्यातूनच पुढे दोन्ही फौजा इ.स. १७९५ मध्ये समोरा समोर आल्या. यावेळी मराठा सैन्याचे नेतृत्व परशुराम भाऊ यांच्याकडे होते. ११ मार्च १७९५ रोजी लढाई झाली. सुरुवातीस मराठ्यांना अपेक्षित यश मिळाले नाही. पुढे निजाम-मराठा संघर्ष वाढतच राहिला. मराठ्यांबरोबर समोरासमोर आपला निभाव लागणार नाही हे ओळखून निजामाने रणांगणातून पळ काढला व खर्ड्याच्या किल्ल्याचा आश्रय घेतला. मराठ्यांनी या किल्ल्यास वेढा दिला. निजाम मराठ्यांबरोबर तहाची याचना करू लागला. यावेळेस निजामाचा पुरता बंदोबस्त करण्याची संधी होती पण नानांनी ही संधी गमावली.

### ३.६.१४ खर्ड्याचा तह (२७ मार्च १७९५) :

या तहातील कलमे खालीलप्रमाणे -

१) निजामाचा मंत्री मसीर-उल-मूल्क यास मराठ्यांच्या ताब्यात द्यावे.

२) दौलताबादचा किल्ला मराठ्यांना परत करावा.

३) नागपूरकर भोसले यांना त्यांचा प्रदेश परत करावा.

४) निजामाने गोवध बंदी करावी.

निजामाने फक्त तीस लाख रुपये मराठ्यांना दिले. हा करार पुढे त्याने पाळला नाही. खर्ड्याच्या लढाईनंतर मराठ्यांच्या बदललेल्या राजकीय परिस्थितीचा व गृहकलहाचा त्याने फायदा घेतला. निजामाकडून कागदावर मिळालेल्या गोष्टी प्रत्यक्षात कधीच मराठ्यांना मिळालेल्या नाहीत.

### ३.६.१५ छत्रपती व नाना फडणीस संघर्ष :

सवाई माधवरावांच्या काळात नाना फडणीस मराठेशाहीचा सर्वसर्वे बनला होता. असे असले तरी मराठ्यांच्या

राजकारणामध्ये छत्रपतींना अनन्यसाधारण महत्त्व आहे. नानानी त्याच्या काळात छत्रपतींच्या अधिकारावर बंधने घालण्याचा प्रयत्न केला. त्यातून छत्रपती व नाना यांच्यात संघर्ष निर्माण झाला. पेशव्यांनी राज्यकारभार हातात घेतल्यापासून पेशवे मराठी दौलतीचे प्रमुख व छत्रपती हे दुय्यम बनले. त्यांनी स्वतंत्र उत्पन्नाच्या बाबी व पूर्वीसारखा सरंजाम छत्रपतींना दिला होता. यावर नानाने निर्बंध घालण्यास सुरुवात केली. हत्ती-घोडे, वर्षासने, इनामे कमी केली. नाना फडणीस हे खूप संशय वृत्तीचे होते. रघुनाथराव यांच्या संबंधातील व्यक्ती सखारामबापू, मोरोबा व इतर व्यक्तीनी छत्रपतींना भेटू नये म्हणून छत्रपतींच्या भोवती खडा पहारा उभा केला. त्यामुळे छत्रपती व नाना यांच्यामधील संघर्ष अधिक वाढला होता.

### ३.६.१६ पेशवे दुसरे बाजीराव व नाना फडणीस :

सन १७९५ मध्ये पेशवा सवाई माधवराव हे निपुत्रिक मरण पावल्यामुळे पेशवाईत गृहकलहास सुरुवात झाली. नाना फडणीस यांनी पुणे दरबारातील आपले स्थान अधिक घट्ट करण्यासाठी सवाई माधवरावाच्या पत्नी यशोदाबाई यांच्या मांडीवर दत्तक पुत्र देऊन पुणे दरबारची सत्ता आपल्या हातात ठेवण्याचा प्रयत्न केला. यावेळी रघुनाथरावाच्या मुलाकडे नानांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. नाना फडणीस यांच्या योजनेला प्रथम दौलतराव शिंदे व तुकोजी होळकर यांनी विरोध केला. अनेक मराठा सरदारांनीही रघुनाथरावाच्या मुलाना पाठिंबा दिला होता. सवाई माधवरावानंतर खऱ्या अर्थाने तीच कायदेशीररीत्या पेशवाईचे वारस होते. अशावेळी यशोदाबाई यांच्या मांडीवर दत्तक देऊन राज्य कारभार करणे योग्य नव्हते. यावेळी लहान मुलगा चिमाजी यास पेशवे पद द्यावे या विचारात सगळे होते. दुसरीकडे बाजीराव द्वितीय यांनीही बाहेरचा दत्तक घेऊ नये याकरता दीड कोटी रुपये देऊ अशी लालूच दौलतराव शिंदे यांना दाखवली होती.

### ३.६.१७ महाड कारस्थान (१० जून ते १० नोव्हेंबर १७९६) :

दुसऱ्या बाजीरावाने दीड कोटी रुपये देण्याच्या बदल्यात दौलतराव यांनी आपणास पेशवेपद मिळवून द्यावे अशी लालूच दाखवली तेव्हा दौलतराव शिंदे यांनी बाजीराव दुसरे यांना पेशवे पद मिळवून देण्यास तयार झाले. त्यापैकी एक कोटी २५ लाख रुपये रोख व २५ लाखांची जहागीरीचा समावेश होता. या कराराची माहिती नानाला समजली नाही. नानाच्या अगोदर ही माहिती हैदराबादच्या निजामाला समजली. त्यांनी पत्र पाठवून नानासही माहिती दिली. ते लिहितात तुम्ही कुठे आहात तुमच्या घरात काय चालले आहे याची वार्ता सुद्धा तुम्हास नाही हे काय. यावेळी सावध होत मुत्सद्देगिरीचा डाव टाकत वरील योजना दौलतराव शिंदे कार्यान्वित करण्याअगोदर नानांनी महाड येथे एक कारस्थान रचले. त्यामध्ये नानाने निजामाला सामील करून घेतले होते. परशुरामभाऊ पटवर्धन यांना जुन्नरला पाठवत बाजीराव दुसरे यांना आपल्या पक्षात वळवून घेतले.

बाजीराव दुसरे यांच्या अशा वागण्याचा दौलतराव शिंदे यांना खूप राग आला. पुढील काळात दौलतराव शिंदे यांनी चिमाजीच्या पक्षाचे समर्थन करण्यास सुरुवात केले. शेवटी २५ जून १७९६ रोजी पेशवेपदाची माळ चिमजीच्या गळ्यात पडली. चिमाजीस जरी पेशवेपद मिळाले असले तरी मराठेशाहीचा सर्वेसर्वा कोण हा प्रश्न अजून अनुत्तरित होता. चिमाजीला पेशवे पद मिळाल्यामुळे दौलतराव शिंदे यांना एक कोटी रुपये व भाऊस कारभारी पद मिळणार होते.

अशा परिस्थितीमध्ये नानाने नवीन खेळी करत दौलतराव शिंदे यांना एक कोटी व अहमदनगरचा किल्ला देण्याच्या बदल्यात बाजीराव दुसरे यांच्या पक्षाचे समर्थन करण्यास भाग पडले. या त्रयीच्या समर्थनामुळे पेशवे बाजीराव दुसरे यांच्या गळ्यात पेशवे पदाची माळ पडली.

**३.६.१८ नाना फडणीस यांना कैद :**

पेशवे पदाची माळ गळ्यात पडताच नाना व पेशवे बाजीराव दुसरे यांच्यातील संघर्ष वाढीस लागला. त्याचे खरे कारण म्हणजे रघुनाथरावाच्या पक्षातील लोकांना कैदेतून सोडवण्याचा आदेश बाजीराव दुसरे यांने दिला होता. नाना फडणीस यांनी पेशवा बाजीराव दुसरे यांच्या या धोरणास विरोध करण्यास सुरुवात केली. त्यामुळे हा संघर्ष वाढीस लागला. यावेळी दौलतराव शिंदे व नागपूरचे भोसले यांना आपल्याकडे वळवले. पेशवे बाजीराव दुसरे यांनी नाना फडणीस यांना कैद करण्याची योजना आखली. दौलतराव शिंदे यांनी नानास आपल्या दरबारात जेवणास बोलवून ३१ डिसेंबर १७९७ रोजी नानास कैद केले. नाना फडणीसाबरोबर बजाबा शिरोळकर, बाबा शिरोडकर, यांनाही कैद करण्यात आले व नजरकैदेत ठेवले. त्याचप्रमाणे नानाच्या पक्षातील बाबा फडके, नारोपंत चक्रदेव, त्रिंबकराव परचुरे, गोविंदराव काळे, गोविंद पिंगळे यांनाही कैद करण्यात आले.

**३.६.१९ शिंदे यांच्या घरातील गृहकलह व नानांची सुटका :**

उत्तरेच्या राजकारणामध्ये शिंदे-होळकर जवळजवळ वावरत होते. त्यांचे कार्यक्षेत्र एकच असल्यामुळे त्यांच्यात अनेकदा संघर्षाचे प्रसंग उद्भवले होते. होळकरांच्या जाहगिरीचा वाद जेव्हा चालू होतात. तेव्हा दौलतराव शिंदे यांनी हस्तक्षेप केल्यामुळे हा वाद अधिकच चिघळला होता. तोच प्रसंग दौलतराव शिंदेंवर आल्यावर यशवंतराव होळकर यांनी हस्तक्षेप केला. महादजी शिंदे यांच्या विधवा बायकांनी दौलतरावाच्या विरोधात मदत मागताच यशवंतराव होळकरानी शिंदे विधवा बायकांचा पक्ष घेतला. त्यामुळे उत्तरेत विचित्र परिस्थिती निर्माण झाली होती. या सर्व पार्श्वभूमीवर १५ जुलै १७९८ रोजी नानास कैदेतून मुक्त करण्यात आले व पुण्यास पाठवले. महादजीच्या विधवा बायका व दौलतराव यांच्यात मध्यस्थी करून नानाने हा वाद मिटवला.

**३.६.२० नाना फडणीस यांचा मृत्यू (१३ मार्च १८००)**

नानाने कैदेतून मुक्त होताच राज्यकारभार आपल्या हाती घ्यावे अशी विनवणी पेशवा बाजीराव यांनी केली. दौलतराव शिंदे यांना उत्तरेत जाणे क्रमप्राप्त होते. त्यातच त्यांचा होळकरांची संघर्ष चालू होता. वरील पार्श्वभूमीवर पेशवा बाजीराव यांना नानाशिवाय पर्याय नव्हता. म्हणून नानांनी राज्यकारभार हाती घ्यावा अशी विनवणी पेशवे बाजीराव दुसरे करत होते. पेशव्यांची मागणी नानाने धुडकावून लावली. यावेळी नानांनी एका अटीवर पेशव्यांचा सल्ला मानला. माझ्या वतीने नारोपंत चक्रदेव यांनी श्रीमंतांजवळ राहून राज्य कारभार पहावा व त्यास नाना सल्ला देतील हे मान्य केले.

वरील परिस्थितीचे ग्रँट डफ यांनी सुंदर वर्णन केले आहे. पेशव्यांनी आपल्या मनोहर वाणीने नानास भुरळ पाडली असे ते म्हणतात. यावेळी मराठेशाहीमध्ये मोठा अनागोंदी कारभार चालू होता. उत्तरेत व दक्षिणेत मराठा

सरदार आपआपसात भांडत होते. पेशवा व नाना फडणीस यांचा वचक पूर्वीप्रमाणे राहिला नव्हता. अशातच १३ मार्च १८०० रोजी नाना फडणीस यांचा मृत्यू झाला.

**३.६.२१ नाना फडणीसाच्या कामगिरीचे मूल्यमापन :**

नाना फडणीसाना वयाच्या चौदाव्या वर्षी फडणीशी मिळाली होती. माधवरावाच्या सान्निध्यात असताना त्यांना राज्यकारभार, जमा खर्च, त्याचप्रमाणे राज्यकारभाराची तडप, वचक, काम करण्याची पद्धत या सगळ्यांचा प्रभाव त्यांच्यावर पडला होता. पुढे तो त्यांच्यावर आयुष्य भर जाणवतो. त्यांची कारकीर्द प्रामुख्याने दोन कालखंडामध्ये विभागल्याचे दिसते. पहिल्या कालखंडामध्ये नारायणरावांचा खुनापासून सालबाईच्या तहापर्यंत समावेश असून या कालखंडामध्ये नारायणरावाचा खून, बाराभाई प्रकरण रघुनाथरावांचा बंदोबस्त, इंग्रजांच्या रूपाने मराठीशाहीवर आलेले संकट त्यांनी यशस्वीपणे परतवून लावणे. अशक्य वाटणाऱ्या गोष्टी शक्य करून चतु:संघाची स्थापना करत इंग्रजांना धक्का दिला. मोरोबा फडणीसाचा पाडाव करत, इंग्रजांना मराठा राजकारणापासून दूर ठेवण्याचा ठेवण्यात यशस्वी झाले. पहिल्या कालखंडांमध्ये नाना फडणीस यांनी प्रामाणिकपणे सेवा बजावली.

दुसऱ्या कालखंडात नानाच्या हातून निस्वार्थ सेवा घडली नाही. गो. स. सरदेसाई यांच्या मतानुसार मराठेशाहीची विस्कटलेली घडी बसवणे ऐवजी स्वतःचे स्थान व सत्ता टिकवण्यासाठी शर्तीचे प्रयत्न नाना फडणीसांनी केले. महादजीच्या लष्करी ताकतीचे कारण नसताना ही भीती बाळगत महादजीची प्रतिष्ठा कशी कमी होईल याचाच विचार नेहमी मनात बाळगत असत. त्यामुळे मराठेशाहीचे अतोनात नुकसान झाले. खर्ड्याच्या लढाईवेळी निजामास नामोहरण न करता त्यास तसेच सोडून दिले म्हणून इतिहासकार नानास मराठ्याच्या ऱ्हासास कारणीभूत मानतात. त्यांच्या मते सखारामबापूच्या अष्टपैलू व दमखावू राजकारणाची सर नानाच्या राजकारणात येत नाही. लष्करी दुबळेपणामुळे नाना अधिकच कमजोर पडले.

असे असले तरी ही मराठ्यांच्या इतिहासातील नानाचे स्थान कमी होत नाही. नानाच्या कामगिरीचे वर्णन करताना शर्मा म्हणतात 'नानाची रणक्षेत्र म्हणजे मुत्सद्दीपणा त्यांचा व्यूह म्हणजे राजकारणातील कारस्थानी होय. ही मुत्सद्देगिरी सुरुवातीच्या काळात यशस्वी झाली. मात्र महादजीच्या लष्करी अभावामुळे पुढे त्यांचा पराभव झाला. रिचर्ड टेंपल यांच्या मते Maratha administration lost all vestias of honesty efficiency by death of the great minister. पुणे दरबारातील इंग्रजांचा वकील कर्नल पामर यांनी नाना बरोबर मराठेशाहीतील शहाणपण व संयम लयास गेले असे वर्णन केले आहे

यावरून नानाचे मराठेशाहीमधील स्थान अधोरेखित होण्यास मदत होते.

इ.स. १७६१ मध्ये पानिपत युद्धात मराठ्यांचा पराभव झाल्यामुळे मराठ्यांच्या राजकारणास एक नवे वळण निर्माण झाल्याचे दिसते. इ.स. १७६१ पानिपतमधील दबदबा पाहता मराठे भारतीय राजकारणात सर्वोच्च सत्ता म्हणून वावरतील असा अंदाज बांधला जात होता. त्यास पानिपत युद्धातील पराभवामुळे तडा गेला. पानिपत युद्धातील पराभवाचा परिणाम मराठ्यांच्या बाह्य राजकारणाप्रमाणेच अंतर्गत राजकारणावरही झाला होता. विश्वासराव व सदाशिवराव यांच्या मृत्यूचा धक्का पेशवा नानासाहेब यांना सहन न झाल्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. पेशवे

नानासाहेब यांच्या मृत्यूनंतर पेशवेपद कोणास मिळावे यावरून माधवराव व रघुनाथराव यांच्यामध्ये संघर्ष झाला. पेशवे माधवराव व रघुनाथराव यांच्यातील संघर्षाचा फायदा घेत उत्तरेत व दक्षिणेत मराठा विरोधक सत्ता अधिक प्रभावी होण्यास सुरुवात झाली. रघुनाथराव यांचा बंदोबस्त करत पेशवे माधवराव यांनी हैदर अली यांच्या विरोधात चार कर्नाटक स्वाऱ्या काढल्या व त्याचा बंदोबस्त केला. अशा प्रकारे माधवरावाच्या काळात कर्नाटकमधील मराठ्यांचे राज्य संरक्षित झाल्याचे दिसते. राक्षसभूवनच्या लढाईत निजामाचा पराभव करत अंतर्गत व बाह्य शत्रूंना ताब्यात ठेवण्यात आपण समर्थ आहोत ही जाणीव मराठा सरदारांना माधवरावानी करून दिल्याचे दिसते. रघुनाथरावाचा बंदोबस्त करून गृहकलह मिटवण्यात पेशवे माधवराव यांना यश आल्याचे दिसते. पेशवे माधवराव यांच्या काळात महादजीचा उत्तरेच्या राजकारणात उदय झाला. महादजीच्या रुपाने उत्तर भारताचे राजकारण संभाळणारा सरदार पेशवे माधवराव यांना मिळाला होता. उत्तर भारताच्या राजकारणामध्ये रोहिले व जाट यांना वर्चस्वाखाली आणून माधवराव यांनी उत्तरेत मराठ्यांचा दबदबा कायम केला.

महादजी शिंदे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिंदे घराण्याची सरदारकीची वस्त्रे मिळवत मराठेशाहीची सेवा निष्ठापूर्वक केली.पेशवे माधवराव यांच्या मृत्यूनंतर निर्माण झालेल्या विचित्र परिस्थितीमध्ये बारभाई प्रकरण, मराठे-इंग्रज संघर्ष, झाबेतखान विरोधातील मोहीम, गोहद व ग्वाल्हेर याची प्राप्ती इत्यादी इत्यादी प्रकरणांमध्ये महादजीची भूमिका महत्त्वाची होती. महादजीने इस्माईल बेग प्रकरण,हमदानी प्रकरण यशस्वीपणे सोडवत बादशहाला पुन्हा बादशाही पद प्राप्त करून देण्यात महादजी यांचा मोलाचा वाटा होता. त्यांना दिल्लीच्या बादशहाकडून वकिल-इ-मुतालीक हा किताब बहाल करण्यात आला होता. एकंदरीत उत्तरेच्या राजकारणामध्ये मराठ्यांचा प्रभाव पुन्हा प्रस्थापित करण्यामध्ये महादजींचा मोलाचा वाटा होता. महादजीच्या वाढलेल्या महत्त्वाची नानाना विनाकारण भीती वाटल्याने नानाकडून महादजींचे महत्व कमी करण्यासाठी या काळात जाणीवपूर्वक लक्ष दिल्याचे दिसते. लालसोठचे युद्ध, हमदानी प्रकरणात पुणे दरबारने महादजीस योग्य ते सहकार्य केले नाही .नाना फडणीस यांनी पहिल्या कारकीर्दीच्या सुरुवातीच्या काळात मराठेशाहीची निष्ठापूर्वक सेवा केल्याचे दिसते. या कालखंडात हैदर अलीवर विजय प्रस्थापित करणे. इंग्रजाविरोधातील संघर्ष, चतु:संघाची स्थापना करून इंग्रजांना शह दिला. तर दुसऱ्या कालखंडामध्ये मराठीशाहीच्या हितापेक्षा स्वहिताकडे जास्त लक्ष दिल्यामुळे मराठेशाही ऱ्हासाकडे गेली. नानाच्या शह-काटशहाच्या राजकारणामुळे मराठ्यांचे अतोनात नुकसान झाले.

**※ स्व-अध्ययन प्रश्न व परिशिष्ट्ये :**

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न :**

**अ) योग्य पर्याय निवडून खालील वाक्य पूर्ण करा**

१) ------------ येथे माधवरावाला पेशवाईची वस्त्रे मिळाली.

अ) कोल्हापूर ब) सातारा क) गोवा ड) पूणे

२) माधवराव पेशवे यांच्या आईचे नाव----------- होते.

अ) अहिल्यादेवी ब) गोपिका देवी क) सखुबाई ड) सरस्वती देवी

३) पेशवा माधवरावानी राक्षसभुवन लढाईत----------पराभव केला.

अ) निजाम ब) हैदर अलीचा क) रघुनाथराव ड) इंग्रजांचा

५) राक्षसभुवन च्या लढाईत निजामाचा दिवाण ---------------हा मारला गेला.

अ) विठ्ठलसुंदर ब) निजामअली क) देवजी पंत ड) यामाजी गामजी

६) १७७१ मध्ये ---------- लढाईत मराठ्यांनी हैदर अलीचा पराभव केला.

अ) मोती तलाव ब) बाळापुर क) बाळापूर ड) मदगिरी

७) माधवराव पेशवे यांचे मृत्युपत्र------ यांनी तयार केले होते.

अ) नाना फडणीस ब) रामशास्त्री प्रभुणे क) रामचंद्र गणेश ड) महादजी सिंदे

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) कोणत्या लढाईने इंग्रजी सत्तेचे बीजारोपण भारतात झाले

२) माधवरावांना पेशवाईची वस्त्रे मिळाली तेव्हा कारभारी पदाची वस्त्रे कोणास देण्यात आली

३) आनंदवलीचा तह कोणाकोणात झाला.

४) माधवराव पेशवे यांचा मृत्यू कधी झाला.

**क) दीर्घोत्तरी प्रश्न**

१) पेशवे माधवराव यांच्या कामगिरीचे मूल्यमापन करा.

२) पेशवे माधवराव व हैदरअली संघर्ष स्पष्ट करा.

३) पेशवे माधवराव रघुनाथराव यांच्यातील गृहकलह सांगा.

४) पेशवे माधवराव व निजाम संघर्ष कारणे व परिणाम स्पष्ट करा.

५) पेशवे माधवराव उत्तर भारताचे राजकारण स्पष्ट करा.

- **महादजी शिंदे**

**स्वयं अध्ययानासाठी प्रश्न :**

**अ) योग्य पर्याय निवडून खालील वाक्य पूर्ण करा**

१) महादजी शिंदे यांच्या वडिलांचे नाव -------- होते

अ) रानोजी ब) नागोजी क) अमृतराव ड) दत्ताजी

२) इ. स. १७७२ ते इ. स. १७९४ च्या दरम्यान मराठेशाहीचा कालखंड ------ च्या कर्तुत्वाचा व पराक्रमाचा मानला जातो.

अ) पेशवे माधवराव ब)महादजी शिंदे क)बाळाजी विश्वनाथ ड) जानोजी भोसले

३) मराठे व इंग्रज यांच्यात महादजीच्या मध्यस्थीने १८७२ मध्ये---------- तह घडून आला

अ) किकेरी ब) सालाबाई क) वडगाव ड) पुरंदर

४) मोगल बादशहा --------याने महादजीस वकील-ई-मुतालिक ही पदवी दिली

अ) शहाआलम ब) महादजी क) नफजखण ड)हमदानी

५) मराठ्यांच्या इतिहासात यास अर्धा शहाणा --------म्हणून ओळखले जाते.

अ) नाना फडणीस ब) विठ्ठल सुंदर क) सखाराम बापू ड) यामाजी गामजी

६) महादजी शिंदे यांनी आपले कवायती लष्करप्रमुख म्हणून----------- यास नेमले.

अ) गॉर्डन ब) अँडरसन क) डी बायन ड) म्युर

७) गुलामकादर यास पकडून ----------- यांनी महाजी शिंदे यांच्याकडे दिले.

अ) हरिपंत फडके ब) रघुनाथराव क)अलिजा बहादूर ड) तुकोजी होळकर

८) महादजी शिंदे यांचा मृत्यू ------- येथे झाला.

अ) पुणे ब) वानवाडी क) कन्हेर खेड ड)सातारा

९) नारायणरावाच्या खुनाचा मुख्य सूत्रधार -----हा होता.

अ) हरिपंत फडके ब) सखारामबापू क) तुळाजी पवार ड) रघुनाथराव हे होते

१०) नारायणरावांची पत्नी गंगाबाई ---------किल्ल्यावर ठेवले होते.

१) रायगड २) पुरंदर ३)सिंहगड ४)राजगड

- **नाना फडणीस**

**स्वयं अध्ययानासाठी प्रश्न :**

**अ) योग्य पर्याय निवडून खालील वाक्य पूर्ण करा**

१) -------- हे बरभाई हालचालींचे प्रमुख केंद्र होते.

१) सातारा २) पुणे ३) पुरंदर ४) सिंहगड

२) नाना फडणीस याने निजामाचा -------- च्या लढाईत पराभव केला.

१) खर्डा    २) पालखेड    ३) तळेगाव    ४) उदगीर

३) राघो भरारी म्हणून यास -------- ओळखले जाते

१) हरिपंत फडके    २) महादजी शिंदे    ३) रघुनाथदादा    ४) नाना फडणीस

४) नाना फडणीस यांचे मूळ आडनाव -------- हे होते.

१) बानु    २)भट    ३) पेशवे    ४) कुलकर्णी

५) बाराभाईचे प्रमुख सूत्रधार -------- होता.

१) नाना फडणीस    २) राघोबा    ३) माधवराव    ४) महादजी

६) बारभाईने -------- च्या नावाने पेशवाईच्या कारभार सुरू केला.

१) नारायणराव    २) सवाई माधवराव    ३) रघुनाथराव    ४) नानासाहेब

७) इंग्रजांविरुद्ध चतुसंघाची स्थापना-------- ने केली.

१) दुसरा बाजीराव    २) नाना फडणीस    ३) रघुनाथराव    ४) महादजी शिंदे

८) नाना फडणीस यांना -------- येथे नजरकैदेत ठेवले होते.

१) अहमदनगर    २) पुणे    ३) सातारा    ४) कोल्हापूर

**ब) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) नारायणराव पेशव्यांची माहिती लिहा.

२) सुरतेचा तह कोणामध्ये झाला.

३) मराठा इंग्रज युद्धात कोणाचा पराभव झाला व त्यांच्यामध्ये कोणता तह झाला.

४) दिल्लीच्या बादशहाने महादजी शिंदे यांना कोणत्या पदव्या दिल्या होत्या.

५) गजेंद्रगडचा तह कोणा कोणात झाला.

६) चतु:संघाची स्थापना व सदस्य कोण होते.

७) रघुनाथराव यांना कोणी कैद केले व कोठे ठेवले.

८) महादजी शिंदे व् तुकाजी होळकर यांच्यामध्ये झालेल्या युद्धाची माहिती लिहा.

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न :**

१) नाना फडणीस यांची कामगिरी स्पष्ट करा महादजी शिंदेच्या कामगिरीचे मूल्यमापन करा.

२) बाराभाई कारस्थानाची माहिती लिहा.

३) मराठा इंग्रज युद्धाबद्दल सविस्तर माहिती लिहा.

४) खर्ड्याच्या लढाईची कारणे व परिणाम स्पष्ट करा.

५) महादजी शिंदे यांच्या उत्तरेकडील धोरणा संदर्भात चर्चा करा.

६) नाना फडणीस व दुसरा बाजीराव यांच्यातील संबंधाचे परीक्षण करा.

❖❖❖

## घटक – ४

# मराठेशाहीचा अस्त

**अनुक्रमणिका**

४.० उद्दिष्ट्े

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ बाजीराव दुसरा

४.२.२ दुसरे व तिसरे इंग्रज मराठा युद्ध

४.२.३ मराठी सत्तेच्या ऱ्हासाची कारणे

४.३ स्वयं – अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.४ सारांश

४.५ सरावासाठी स्वाध्याय

४.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.० उद्दिष्ट्े :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला –

- दुसऱ्या बाजीरावाच्या काळातील घडामोडी समजतील
- दुसरे इंग्रज मराठा युद्धाची कारणे व युद्धासंबधी माहिती मिळेल
- तिसऱ्या इंग्रज मराठा युद्धाचे स्वरूप समजेल
- मराठी सत्तेचा ऱ्हास कसा झाला व त्याकरिता कोणकोणती कारणे कारणीभूत ठरली याचा आढावा घेता येईल.

## ४.१ प्रस्तावना :

मराठेशाहीचा अस्त हा एका कारणाने झाला नसून त्यासाठी अनेक कारणे कारणीभूत होती.पानिपतच्या तिसऱ्या युद्धात मराठ्यांची एक तरुण पिढी नष्ट झाली आणि याचा दूरगामी परिणाम म्हणजे मराठेशाहीच्या

ऱ्हासाची सुरवात म्हणता येईल, जे मराठे दिल्लीच्या बादशाहीचे रक्षण करत होते तेच मराठे पराभूत झाल्याने आपोआपच मराठयांच्या राजकारणाचा अंत जवळ येवू लागला होता. अशावेळी माधवरावाने मराठा राज्याची घडी नीट बसवण्याचा केलेला प्रयत्न त्याच्या मृत्यूने व्यर्थ ठरला.त्यानंतर कर्तुत्ववान पेशव्यांची वानवा निर्माण झाली व पेशवेपदासाठी संघर्षाची परिसीमा ओलांडली व मराठेशाहीचा डोलारा कोसळू लागला, मराठीशाहीचे हस्तांतरण छत्रपतींकडून पेशव्यांकडे झाले होते. ते आता नाना फडणवीसाच्या  हाती आले .दुसऱ्या बाजीरावाने तर कहरच केला व मराठी सरदाराना घाबरून तो इंग्रजांच्या आश्रयाला गेला. हीच संधी  इंग्रज  शोधत होते त्यांनी याचा पुरेपूर फायदा उठवला व मराठेशाहीचा अस्त झाला.

## ४.२ विषय विवेचन :

### ४.२.१ पेशवा बाजीराव दुसरा :

**● पेशवे पदाचा वारसा प्रश्न :**

सवाई माधवरावाचा मृत्यू झाला आणि पेशवा कुणी व्हावे हा प्रश्न निर्माण झाला. सवाई माधवराव निपुत्रिक होता आणि पेशवे घराण्यात केवळ रघुनाथरावाची तीन मुले होती. त्यापैकी बाजीराव दुसरा हा ज्येष्ठ पुत्र आणि चिमाजी हा कनिष्ठ पुत्र होता. अमृतराव हा दत्तक पुत्र होता. या तिघांनाही शिवनेरी किल्लयावर कडेकोट बंदोबस्तात ठेवण्यात आले होते. बाजीराव हा ज्येष्ठ पुत्र असल्याने पेशवेपदावर खरा हक्क त्याचाच होता. परंतु तो आपल्यावर सूड उगवेल अशी नानाला भीती वाटत होती. त्याच्या हाती मराठेशाही सुरक्षित राहील याची खात्री नव्हती.

**● चिमाजीस पेशवे पदावर बसवण्याची योजना :**

नानाला सर्व सत्ता स्वत:च्याच हाती ठेवायची असल्याने त्याने पेशव्यांच्या भट घराण्याच्या नात्यातील एखाद्या मुलाला दत्तक घेण्याचे ठरविले. बाजीरावाला नानाची ही योजना कळताच त्याने दौलतराव शिंदेशी संधान बांधले व पेशवेपद मिळवून देण्याच्या मोबदल्यात त्याने दौलतरावाला रोख १ कोटी रु. व २५ लक्ष रु. उत्पन्नाची जहांगीर देण्याचे कबूल केले. त्यामुळे दौलतरावाने नानाच्या योजनेला विरोध केला. तुकोजी होळकर व इतर वजनदार मराठा सरदारांचाही नानाच्या योजनेला विरोध होता. कारण त्यांच्या मते प्रत्यक्ष पेशव्यांच्या भट घराण्यात वारस हयात असताना त्यांच्या नात्यातील अन्य मुलाला दत्तक घेण्याची गरज नव्हती. म्हणून नानाची वरील योजना बारगळली. शेवटी नानाने रघुनाथरावाचा कनिष्ठ पुत्र चिमाजीला पेशवेपद देण्यास मान्यता दिली. त्यानुसार परशुराम भाऊ पटवर्धनास शिवनेरी किल्ल्यावर चिमाजीला आणण्यास पाठविले. परंतु बाजीरावाने चिमाजीस पटवर्धनांच्या हवाली करण्यास नकार देवून पेशवेपदावर स्वतः चा दावा सांगितला. शेवटी परशुराम भाऊ पटवर्धनने बाजीराव व चिमाजी या दोघांनाही पुण्याला आणले. बाजीरावाचे मन वळविण्याचा सर्वच सरदारांनी प्रयत्न केला. पण त्यात अपयश येऊन शेवटी बाजीरावाने पेशवा व्हावे व त्याने नानाच्या सल्ल्यानुसार कारभार करावा असे निश्चित झाले. त्यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या.

**● चिमाजी पेशवेपदी (२ जून १७९६) :**

नानाने बाजीरावाला पेशवेपदी बसविण्याची जबाबदारी पत्करल्याने दौलतराव शिंदेचे सव्वा कोटी रु बुडल्यात जमा होते म्हणून तो ससैन्य पुण्याला आला व त्याने बाजीरावाकडे सव्वा कोटी रु. ची मागणी केली. परंतु ही मागणी पुरविण्यास बाजीराव असमर्थ असल्याने त्याने बाजीरावाऐवजी चिमाजीला पेशवेपदी बसविण्याचे ठरविले. दौलतराव शिंदेच्या व बाजीरावाच्या भितीने नानाने पुणे सोडले. परशुरामभाऊ पटवर्धनही दौलतरावाला सामिल झाला. शेवटी २ जून १७९६ रोजी चिमाजीला पेशव्याची वस्त्रे देण्यात आली. अशा प्रकारे सवाई माधवरावाच्या मृत्यूनंतर सात महिन्यांनी मराठी सत्तेला पेशवा मिळाला.

**● महाड कारस्थान :**

पुण्याहून नाना साताऱ्यास गेला. तेथे परशुरामभाऊने सेनापती व्हावे व नानाने पेशव्याचा कारभार सांभाळावा अशी सूचना नानाला करण्यात आली. परंतु दौलतराव शिंदे पुण्यात असेपर्यंत नानाची पुण्याला येण्याची हिंमत होईना त्यामुळे. तो साताऱ्याहून महाड मुक्कामी गेला. पुण्यात चिमाजीला पेशवा करून दौलतरावाने बाजीरावाला थेऊर येथे कैदेत ठेवले होते. बाजीरावही नानाप्रमाणेच महत्वाकांक्षी व सत्तालोलुप होता. दोघांचीही सत्तेतून उचलबांगडी झाल्याने दोघेही सम दुःखी होते. तेव्हा नानाने बाजीरावाला पेशवेपदी बसविण्याचे व सर्व कारभार स्वतःच्या हाती घेण्याचे ठरविले. यासाठी त्याने दौलतराव शिंदे, तुकोजी होळकर, कोल्हापूरचे छत्रपती, इंग्रज, निझाम, टिपू सुलतान या सर्वांची मदत घेण्याचे ठरविले, काल चिमाजीचा पक्ष उचलून धरणारा नाना आज बाजीरावाचा पक्ष उचलून धरणारा दिसतो. तर दौलतराव काल बाजीरावाचा, आज चिमाजीचा आणि उद्या पुनः बाजीरावाचा पक्ष उचलून धरताना दिसतो. महाड या ठिकाणाहून नानाने ही सारी सूत्रे हलविली म्हणून याला 'महाडचे कारस्थान' म्हणतात.

**● बाजीराव पेशवेपदी (५ डिसें १७९६) :**

बाजीरावाला पेशवेपदी बसविण्यासाठी नानाने दौलतरावाचे मन वळविले व त्या बदल्यात दोन कोट रुपये दौलतरावाला मिळणार होते, हे पहाताच परशुरामभाऊ पटवर्धनने चिमाजीला घेवून पुण्यातून पळून जाण्याचा बेत केला. परंतु दौलतरावाच्या सतर्कतेमुळे परशुरामभाऊचा हा बेत फसला. तो दौलतरावाचा कैदी झाला. यानंतर नाना पुण्याला आला व सातारच्या छत्रपतींकडून पेशवाईची वस्त्रे मागवली व ५ डिसें. १७९६ रोजी बाजीरावाला पेशवेपदावर बसवले. पेशव्याचा कारभारी म्हणून नानाची नियुक्ती करण्यात आली.

**● नाना फडणीसाची कैद (३१ डिसें. १७९७) :**

नानाचे महाडचे कारस्थान यशस्वी झाले. बाजीराव पेशवा व नाना त्याचा मुख्य सल्लागार झाला. नानाच्या सहकार्याशिवाय आपल्याला पेशवेपद मिळू शकणार नाही याची बाजीरावाला संपूर्ण कल्पना होती. तसेच नानाला प्रमुख कारभारीपद दिल्याशिवाय तो आपल्याला सहकार्य करणार नाही याचीही त्याला कल्पना होती. म्हणून संधी मिळताच त्याने नानाला दूर करण्याचे ठरविले. त्यासाठी नाना जिवंत असेपर्यंत दौलतरावाने पुण्यातच रहावे अशी दौलतरावाला गळ घातली व त्या मोबदल्यात त्याला दोन कोटी रु. देण्याचे कबूल केले. दौलतरावालाही

नानाची भिती वाटत होती. नाना आपल्याला दूर सारून बाजीरावाला स्वतःच्या मुठीत ठेवेल या भीतीने दौलतरावाने बाजीरावाची नानाच्या जाचापासून सुटका करण्याचे मान्य केले व ३१ डिसे. १७९७ रोजी नानाला जेवणाच्या निमित्ताने स्वतःच्या छावणीत बोलावून कैद केले व अहमदनगरच्या किल्ल्यात कडेकोट बंदोबस्तात ठेवले. नानाला दूर केल्याने बाजीरावाला हायसे वाटले. परंतु दौलतरावाला दोन कोटी देणे त्याच्या हाताबाहेरचे होते. शेवटी दौलतरावाने स्वतःचा सासरा सर्जेराव घाटगे व फकीरजी गाढवे नावाच्या अधिकाऱ्याला पुण्यातील नाना त्याच्या साथीदारांच्या वाड्यांची लूट करण्याचा आदेश दिला. डिसें. १७९६ ते १७९८ या दोन वर्षात दौलतरावाने पुण्यात अत्याचाराचे थैमान घातले. पैशासाठी त्याने अनेक निरपराध लोकांचा जाच केला. त्यामुळे दौलतरावाविषयी प्रजेच्या मनात असंतोष निर्माण झाला. नानाच्या जाचातून सुटका करून घेण्याच्या प्रयत्नात बाजीराव दौलतरावाच्या तावडीत सापडला. दौलतरावापासून स्वत:ची सुटका करून घेण्यासाठी त्याने निझाम व नागपूरकर भोसल्यांशी संधान बांधले. दौलतरावाला हे कळताच त्याने बाजीरावाचा डाव हाणून पाडण्यासाठी नानाला मुक्त करण्याचे ठरविले. दहा लाख रु.च्या मोबदल्यात दौलतरावाने नानाची सुटका जुलै १७९८ मध्ये केली.

**● नानाची सुटका व मृत्यू :**

बाजीरावाने पेशवेपद मिळविले पण पेशवेपदाची जबाबदारी सांभाळण्याची क्षमता त्याच्याजवळ नव्हती. म्हणूनच टिपूला कायमचा संपविण्यासाठी ग. ज. लॉर्ड वेलस्लीने जेव्हा मराठ्यांकडे मदत मागितली तेव्हा काय करावे ते बाजीरावाला सुचेना. दौलतरावालाही निर्णय घेता येईना. शेवटी दोघांनीही याबाबत नानाला शरण जाण्याचे ठरविले. बाजीरावाने नानाला कारभारीपद स्वीकारण्याची गळ घातली. पण दौलतराव पुण्यात असेपर्यंत नानाने ही जबाबदारी स्वीकारण्यास नकार दिला. शेवटी त्याच्याकडे कारभारी पदाची जबाबदारी सोपविण्यात आली. परंतु दोन वर्षांच्या कैदेने नानाची सारी उमेदच संपली, नाना फडणिस बाजीरावाकडून कैद झाल्यामुळे पार खचला व निराश झाला. शेवटी १३ मार्च १८०० रोजी त्याचा मृत्यू झाला .

**● नाना फडणिसाची योग्यता :**

पेशवाईत साडेतीन शहाणे झालेत. त्यापैकी नागपूरकर भोसल्यांचा दिवाण देवाजीपंत, निझामाचा दिवाण विठ्ठल सुंदर आणि रघुनाथरावाचा कारभारी सखारामबापू हे पूर्ण शहाणे म्हणजे तलवार बहाद्दर व मुत्सद्दी दोन्ही होते. नाना फडणिस हा अर्धा शहाणा म्हणजे केवळ मुत्सद्दी होता. १२ फेब्रुवारी १७४२ मध्ये नानाचा सातारा येथे जन्म झाला आणि २९ नोव्हें. १७५६ रोजी त्याला फडणिशीची वस्त्रे मिळाली. सदाशिवरावभाऊच्या तालमीत तो जमाखर्चाच्या कामात तज्ञ झाला. इ. स. १७६० मध्ये तो भाऊच्या स्वारीबरोबर उत्तरेत गेला आणि पानिपताच्या पराभवानंतर कसाबसा जीव वाचवून पुण्याला परत आला. पुढे माधवरावाच्या कारकिर्दीत त्याला राजकारणाचे धडे मिळाले आणि माधवरावाच्या मृत्यूनंतर मराठ्यांच्या राजकारणावर त्याचाच ठसा उमटला. इ.स. १७७२ ते १७९६ ही मराठेशाहीची वर्षे म्हणजे नानाच्या कर्तबगारीचा आलेख होय. त्याच्या मृत्यूबरोबर मराठेशाहीच्या अस्ताची सुरवात झाली .

**● होळकर वारसा संघर्ष :**

तुकोजी होळकरांच्या मृत्यूनंतर होळकरांच्या घराण्यात वारसा हक्काचा प्रश्न उपस्थित झाला. दौलतराव शिंदेनी अकार्यक्षम काशीरावाचा पक्ष उचलून धरला व बाजीराव पेशव्याकडे त्याची शिफारस करून त्याला होळकरांचा वारस नियूक्त केले. काशीराव हा होळकरांचा वारस झाल्यास त्याला स्वतःच्या तालावर नाचवणे कठीण नाही हे दौलतरावाने ओळखले, परंतु तुकोजीचा दुसरा मुलगा मल्हारराव हा चाणाक्ष होता. काशीरावाला वारस म्हणून नियुक्त करण्यामागील दौलतरावाच्या दुष्ट हेतूची त्याला पूर्ण कल्पना होती म्हणून त्याने नाना फडणिसाशी संपर्क साधून वारसा पदावर स्वत:चा हक्क सांगितला. दौलतरावाला मल्हाररावाच्या हालचालींची बातमी लागताच त्याने भांबुर्डा येथील मल्हाररावाच्या गोटावर १४ सप्टेंबर १७९७ रोजी अचानक हल्ला केला व मल्हाररावासह त्याची सारी छावणी उध्वस्त केली, विठोजी व यशवंतराव हे तुकोजीचे दोन दासीपूत्र मात्र या हल्ल्यातून बचावले. हे दोघेही पराक्रमी होते. मल्हारराव हाच होळकर घराण्याचा वारस होण्यास योग्य आहे या मतामुळे त्यांनी मल्हाररावाला साथ दिली होती. मल्हाररावाचा मृत्यू होताच दोघेही निसटले. यशवंतरावाने स्वतःची फौज उभी केली व खंडेराव हा मल्हाररावाचा मुलगा हाच होळकर घराण्याचा खरा वारस असून आपण त्याच्या नावाने कारभार करणार, असे जाहीर केले. यशवंतरावाने आता काशीरावाच्या प्रदेशांवर हल्ले करण्यास सुरुवात केली. त्याने महेश्वर ही होळकरांची राजधानीही जिंकली. यशवंतरावाचा पराक्रम पाहून काशीराव घाबरला. त्याने यशवंतरावाची भेट घेवून शिक्का आमच्या नावाचा व होळकर घराण्याचा सर्व कारभार यशवंतरावाने पहावा या अटीवर त्याच्याशी सलोखा केला. यशवंतरावाचे वाढते बळ आणि काशीरावाचे यशवंतरावाच्या तंत्राने चालणे यामुळे होळकरशाही संपवण्याचा दौलतरावाचा डाव उलटण्याची शक्यता निर्माण झाली. त्याने बाजीरावाला सांगून काशीरावाचे होळकरांच्या दौलतीचे अधिकार काढून घेतले व यशवंतरावाचा बंदोबस्त करण्यासाठी डिसें. १८०० मध्ये तो स्वत: पुण्याहून उत्तरेकडे निघाला. काशीरावाला दौलतीवरून काढून टाकल्याचे कळताच यशवंतरावाने शिंद्यांचे उज्जैन लुटले व त्यांच्या बुऱ्हाणपूरपर्यंतच्या प्रदेशात धुमाकूळ घातला. यशवंतरावाची तडफ पाहून दौलतरावाचे धाबे दणाणले. यशवंतरावाशी सलोखा करण्याच्या दृष्टीने त्याने हालचाली सुरू केल्या. परंतु पुण्याला अनपेक्षित घडले. बाजीराव पेशव्याने यशवंतरावाचा मोठा भाऊ विठोजी होळकरला ठार मारले .

**● विठोजी होळकराचा वध (१६ एप्रिल १८०१) :**

उत्तरेत यशवंतराव होळकर पराक्रम गाजवित असताना दक्षिणेत विठोजी होळकर पेशव्याच्या प्रदेशात लुटालूट करीत होता. लवकरच त्याच्या नेतृत्वाखाली २०,००० फौज गोळा झाली. पेशव्याच्या सैन्याचा त्याने ठिक-ठिकाणी पराभव केला. शेवटी पेशव्याचा सरदार बापू गोखलेने विठोजीचा पराभव करून त्याला कैद केले व त्याची पुण्याला रवानगी केली. १६ एप्रिल १८०१ रोजी बाजीरावाने हत्तीच्या पायाखाली देवून विठोजीला ठार मारले. बाजीरावाच्या या कृत्यामुळे यशवंतराव संतापाने बेभान झाला व त्याने पुण्यावर स्वारी करून पेशव्याला धडा शिकविण्याचा निर्णय घेतला.

**● यशवंतरावाची पुण्यावर स्वारी (इ. स १८०२)**

दौलतराव उत्तरेत पोहोचल्यावर त्याच्या व यशवंतरावाच्या सैन्यात चकमकीला सुरुवात झाली. ऑक्टो.

१८०१ मध्ये शिंद्यांनी होळकरांचे उज्जैन लुटले. यशवंतरावाने शिद्यांच्या चंबळ व राजस्थानातील प्रदेशात लुटालूट सुरु केली .यावेळी मल्हाररावाचा मुलगा खंडेराव दौलतरावाच्या कैदेत होता, यशवंतरावाने स्वत:च्या वकीलाला पुण्याला बाजीरावाकडे पाठवून त्याने दौलतरावाला सांगून खंडेरावाची सुटका करावी अशी विनंती केली. परंतु बाजीरावाने त्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे यशवंतराव चिडला व त्याने पेशव्याच्या प्रदेशावर हल्ले सुरू केले. यावेळी यशवंतरावाने बाजीरावाला विनंती केली की त्याने खंडेरावाला यशवंतरावाच्या स्वाधीन करावे व यशवंतरावाशी सलोखा करावा असा सल्ला अनेक सरदारांनी बाजीरावाला दिला. परंतु तिकडे कानाडोळा करून बाजीरावाने यशवंतरावाचे पारिपत्य करण्यासाठी दौलतरावाला पाचारण केले, यशवंतरावाला हे कळताच त्याने पेशव्याच्या कृष्णा नदीपर्यंतच्या प्रदेशात धुमाकूळ घातला. त्यामुळे बाजीरावाने होळकराची सारी दौलत जप्त करण्याचा हुकूम काढला.

- **हडपसरची लढाई / पेशव्याचा पराभव (२५ आक्टो. १८०२) :**

पेशव्याला वारंवार विनंती करूनही तो आपली दखल घेत नाही हे पहाताच यशवंतरावाने नाइलाजाने पुण्याकडे निघाला. मार्गात त्याने शिंद्यांचा प्रदेश जाळून, लुटून उध्वस्त केला. त्याने शिद्यांचा अहमदनगरचा किल्लाही जिंकला. अशा रितीने यशवंतरावाचे सैन्य पुण्याच्या वेशीजवळ पोहोचले. पुण्यावर आक्रमण करेपर्यंत यशवंतरावाने बाजीरावाचे मन वळविण्याचा शेवटपर्यंत प्रयत्न केला पण बाजीरावने त्याकडे लक्ष दिले नाही. यशवंतरावाला रोखण्यासाठी त्याने सर्व सरदारांना पुण्याला पाचारण केले. परंतु बाजीरावाच्या वागणुकीने सर्वच नाराज झाले असल्याने बाजीरावाची कुणीही दखल घेतली नाही. दौलतरावाने मात्र सदाशिव भास्कर बक्षीला ससैन्य बाजीरावाच्या मदतीसाठी पाठविले. २५ ऑक्टो १८०२ रोजी पुण्यालगत हडपसर येथे घनघोर युद्ध होवून यशवंतरावाने पेशवे व शिद्यांच्या संयुक्त सैन्याचा पराभव केला

- **बाजीरावाचा इंग्रजाकडे आश्रय :**

हडपसर युद्धाच्यावेळी बाजीराव हा चिमाजीसोबत पुण्याजवळ वानवडी येथे होता. हडपसरच्या पराभवाची बातमी कळताच तो वानवडीहून पळाला व महाड येथे आला. त्याने मुंबईचा गव्हर्नर जोनाथन डंकनकडे मदत मागितली. व १६ डिसें. १८०२ रोजी तो वसईला आला. बाजीरावाने इंग्रजांच्या आश्रयाला जावू नये यासाठी अनेकांनी त्याचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. दौलतराव शिंदे व यशवंतराव होळकरनेही बाजीरावाला परावृत करण्याचा प्रयत्न केला. परंतु बाजीरावाच्या बुद्धीला ग्रहण लागले होते. सर्वांचा सल्ला न मानता केवळ स्वार्थापोटी त्याने इंग्रजांचा आश्रय घेतला. बाजीराव इंग्रजांच्या आश्रयाला गेल्याने यशवंतरावाने रघुनाथरावाचा दत्तक पुत्र अमृतराव याला पेशवे केले व पुण्याचा कारभार सुरू केला.

बाजीराव १६ डिसेंबर १८०२ ला वसईला पोहचला. लॉर्ड वेलस्ली हा गव्हर्नर जनरल होता. तो या संधीची वाट बघत होता. बाजीराव पेशवा इंग्रजांची मदत मागण्यासाठी वसईला गेला होता. स्वार्थापोटी त्याच्या मनात दूसरा विचारच आला नाही. शिंदे-होळकरांमध्ये मैत्री घडवून त्याला मराठेशाहीची सेवा करता आली असती परंतु त्याच्यात दूरदृष्टीचा अभाव होता. शेवटी जे होऊ नये ते झाले. इंग्रजांनी बाजीरावाशी वसईचा तह केला.

● **वसाईचा तह – ३१ डिसेंबर १८०२ :**

या तहाच्या अटी पुढीलप्रमाणे होत्या.

१) एकाचे शत्रू-मित्र ते दुसऱ्याचेही शत्रू-मित्र मानले जावेत.

२) इंग्रजांनी बाजीरावाच्या मुलूखाचे संरक्षण करावे.

३) तैनाती फौजेच्या खर्चासाठी पेशव्याने इंग्रजांना वार्षिक २६ लाख रु. उत्पन्नाचा मुलूख द्यावा.

४) इंग्रजांव्यतिरिक्त इतर कोणत्याही युरोपियन शक्तीला स्वत:च्या राज्यात स्थान देवू नये.

५) मराठे-निझाम संघर्ष झाल्यास इंग्रजांचा निर्णय पेशव्यांवर बंधनकारक राहील.

६) इंग्रजांनी गायकवाडांशी केलेल्या तहास पेशव्याने मान्यता द्यावी.

७) आवश्यकतेनुसार इंग्रज व पेशव्यानी परस्परांना लष्करी मदत करावी.

८) इंग्रजांच्या परवानगीशिवाय पेशव्याने कुणाशीही युद्ध किंवा तह करू नये.

हा तह कर्नल क्लोज व बाजीराव यांच्यात वसई या ठिकाणी झाला. १८ मार्च १८०३ रोजी ग. ज. वेलस्लीने या तहावर शिक्कामोर्तब केले.

● **वसई तहाचे परिणाम :**

या तहाचे मराठ्यांच्या इतिहासावर अत्यंत घातक परिणाम झाले.

१) या तहामुळे इंग्रजांचे दक्षिण भारतात प्रभुत्व स्थापन झाले. दक्षिण भारत अप्रत्यक्षपणे कंपनीच्या ताब्यात गेला.

२) डॉ. ईश्वरीप्रसाद म्हणतात की या तहामुळे संपूर्ण भारतातेच स्वातंत्र्य गमावले गेले. कारण पेशवा मोगल साम्राज्याचा वकील-इ-मुतलक (पंतप्रधान) होता. त्याने इंग्रजांचे वर्चस्व स्वीकारणे म्हणजे मोगल साम्राज्याने ही इंग्रजांचे वर्चस्व स्वीकारण्यासारखे व पर्यायाने संपूर्ण भारताने स्वातंत्र्य गमावण्यासारखे होते.

३) या तहामुळे बाजीरावाला अंतर्गत व बहिर्गत शत्रूचे भय न उरल्याने त्याच्या विलासी वृत्तीला मोकळे रान मिळाले. राज्यकारभाराविषयी तो उदासीन बनला व सारा वेळ ख्याली खुशालीत व्यतीत करू लागला. यासाठी जेव्हा जेव्हा त्याला पैशाची कमतरता पडे तेव्हा तेव्हा तो स्वकियांवर अत्याचार करून त्यांच्याकडून पैसे उकळू लागला.

४) या तहामुळे पेशव्याच्या परराष्ट्र धोरणावर इंग्रजाचे नियंत्रण प्रस्थापित होऊन मराठेशाहीचे सार्वभौमत्व संपुष्टात आले.

५) अंतर्गत प्रश्न सोडविण्यासाठी परक्या शत्रूची मदत घेण्याचे बाजीरावाचे हे धोरण संपूर्ण राष्ट्राच्या दृष्टीने घातक ठरून सारा देश इंग्रजांचा गुलाम बनला.

६) बाजीरावाने हा तह स्वीकारल्यामुळे यशवंतरावाने संतप्त होऊन पुण्याची मनसोक्त लूट केली.

७) वसईच्या तहामुळे मराठेशाहीची एकात्मता भंग पावली. कर्नल ऑर्थर वेलेस्लीने बाजीरावाला पेशेवेपदी बसवले. असे म्हणता येईल कि वसई च्या तहानेच दुसरे इंग्रज मराठा युद्ध घडून आले.

**● स्वयं अध्ययनासाठी प्रश्न १ :**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) सवाई माधवरावानंतर पेशवे पदावर कोणाला बसवण्यात आले.

२) महाडचे कारस्थान कोणी रचले होते.

३) दुसरा बाजीराव पेशवेपदावर कधी आला.

४) हडपसरच्या युद्धात कोणाचा पराभव झाला.

५) वसईचा तह कोणा कोणामध्ये झाला.

**ब) रिकाम्या जागा भरा.**

१) चिमाजी पेशवेपदी .................. साली आला.

२) नाना फडणवीसाचा मृत्यू .................. रोजी झाला.

३) .................. याने विठोजी होळकरास मारले.

४) हडपसरचे युद्ध .................. रोजी झाले.

५) वसईचा तह .................. रोजी झाला.

**४.२.२ दुसरे व तिसरे इंग्रज-मराठा युद्ध :**

**● दुसरे इंग्रज मराठा युद्ध :**

बाजीरावाला वसईचा तह करण्यास भाग पाडून वेलस्लीने एक महत्वाचा टप्पा पार केला होता. या तहामुळे मराठा मंडळातील इतर सरदार नाराज होतील व बाजीरावाला या तहाच्या कचाट्यातून सोडविण्यासाठी एकजुटीने प्रयत्न करतील याची वेलस्लीला पूर्ण कल्पना होती म्हणून त्यादृष्टीने त्याच्या हालचाली सुरू होत्या. दौलतराव शिंदेनी होळकर व भोसले या मातब्बर मराठा सरदारांची मदत घेवून इंग्रजविरोधी आघाडी उभारण्याचे ठरविले. दौलतरावाने वसईच्या तहाला मान्यता द्यावी म्हणून वेलस्लीने आटोकाट प्रयत्न केले. तेव्हा सालबाईचा तह अजूनही कायम असून शिंद्याच्या मध्यस्थीने झाला असल्याने वसई तहाच्या वेळी इंग्रजांनी दौलतराव शिंदेचा सल्ला घ्यायला हवा होता असे उत्तर दौलतरावाने दिल्याने युद्धाला सुरवात झाली. इंग्रजांनी शिंदे-होळकरांमध्ये फुट पाडली व आपला स्वार्थ साधला.

**● दक्षिणेत भोसल्यांचा पराभव :**

दौलतरावाच्या योजनेनुसार भोसले व होळकर इंग्रजविरोधी आघाडीत सामिल झाले. परंतु वेलस्लीने धूर्तपणे होळकराना या आघाडीपासून दूर ठेवले. ग. ज. वेलेस्लीने शिंदे-भोसले युतीविरुद्ध उत्तर व दक्षिण भारतात योजनाबद्ध मोहिमा आखल्या. उत्तर हिंदुस्थानातील इंग्रजी फौजेचे नेतृत्व जनरल लेककडे देण्यात आले तर दक्षिण हिंदुस्थानात ही जबाबदारी ग. ज. लॉर्ड वेलेस्लीचा भाऊ ऑर्थर वेलेस्लीकडे सोपविण्यात आली. वेलेस्लीने शिद्यांचा अहमदनगरचा किल्ला जिंकला. २४ ऑगस्ट १८०३ रोजी शिंदे-भोसले संयुक्त सैन्याचा ऑर्थर वेलेस्लीने आसईच्या युद्धात पराभव केला. बुऱ्हानपूर आणि अशीरगढ ही शिद्यांची महत्वाची ठाणीही ऑर्थर वेलेस्लीने जिंकली. आडगाव येथे शिंदे -भोसले संयुक्त सैन्याचा पुन: पराभव झाला. गाविलगड हा भोसल्यांचा महत्वाचा किल्ला इंग्रजांनी जिंकला. भोसलेनी इंग्रजांपुढे शरणागती पत्करली व भोसल्यांनी इंग्रजांबरोबर तह करून युद्धातून माघार घेतली, त्यामुळे दक्षिणेतील इंग्रज-मराठा युद्ध थांबले .

**● भोसल्यांशी देवगावचा तह- १७ डिसेंबर १८०३ :**

भोसल्यांचा दुसऱ्या इंग्रज-मराठा युद्धात पराभव झाला. त्यांना तह स्वीकारावा लागला. त्यामुळे ते आता इंग्रजांचे अंकित बनले, तहाच्या अटी पुढीलप्रमाणे होत्या.

१) भोसल्यांची राजधानी नागपूर येथे इंग्रज वकील रहावा.

२) निझामावरील सर्व हक्क भोसल्यांनी सोडून द्यावेत.

३) इतर सत्तांशी संघर्ष झाल्यास इंग्रजांचा निर्णय मान्य करावा.

४) इंग्रजांच्या शत्रुना स्वतःच्या चाकरीत ठेवू नये.

५) मराठा राजमंडळाचा भोसल्यांनी त्याग करावा.

६) भोसल्यांनी इंग्रजांना वर्धा नदीच्या पश्चिमेकडील वऱ्हाडचा प्रदेश व कटकचा प्रदेश द्यावा.

**● उत्तरेत शिंद्याचा पराभव :**

दक्षिणेत भोसल्यांचा सर्व आघाड्यांवर पराभव होत असताना, जनरल लेकने शिंद्याचा सेनापती पेरॉन याला फितूर केले व युद्ध न करताच शिद्यांचा अलिगडचा किल्ला जिंकला. यानंतर लेक दिल्लीकडे वळला. १४ सप्टें. १८०३ रोजी त्याने दिल्ली जिंकून बादशहा शहाआलमला ताब्यात घेतले. त्यानंतर मथुरा व आग्र्याचा किल्ला जिंकला. १ नोव्हें १८०३ रोजी लासवाडी येथे शिंदे व इंग्रजात मोठे युद्ध होऊन या युद्धात जनरल लेकच्या सैन्याने दौलतरावाच्या सैन्याचा पराभव केला. दौलतरावाचा पराभव होताच त्याच्या वर्चस्वाखालील भरतपूर, जयपूर, जोधपूर, कोटा, उदेपूर इत्यादी जाट व रजपूत राजांनी इंग्रजांशी तह केला. गुजराथ व बुंदेलखंडातही इंग्रजांनी दौलतरावाचा पराभव केल्याने दौलतराव इंग्रजांना शरण आला. अशा रितीने उत्तरेत शिंद्यांचा सर्व आघाड्यांवर पराभव झाल्याने उत्तरेतील इंग्रज-मराठा युद्ध संपुष्टात येवून दुसरे इंग्रज-मराठा युद्ध या तहाने तात्पुरते थांबले.

**● शिद्यांशी सुर्जी–अंजनगावचा तह (३० डिसें १८०३) :**

महादजी शिंदे हा या घराण्यातील सर्वात कर्तबगार पुरुष. त्याने स्वतःच्या एकटयाच्या बळावर मराठेशाही तोलून धरली होती. परंतु इ. स. १७९४ मध्ये त्याचा मृत्यू झाला आणि केवळ दहा वर्षांच्या आत या बलाढ्य घराण्याला इंग्रजानी धूळ चारली. या तहाच्या अटी पुढीलप्रमाणे होत्या.

१) शिद्यांनी इंग्रजांना गंगा–यमुना दुआब प्रदेश, दिल्ली, आग्रा, बुंदेलखंडातील काही प्रदेश, भडोच जिल्हा, अहमदनगरचा किल्ला आणि गोदावरी ते अजिंठा दरम्यानचा प्रदेश द्यावा.

२) शिद्यांनी पेशवा, गायकवाड, निझाम आणि मोगल बादशहावरील स्वत:च्या सर्व अधिकारांचा त्याग करावा आणि इंग्रजांनी संस्थानिकांशी स्वतंत्रपणे केलेल्या तैनाती फौजेच्या सर्व करारास मान्यता द्यावी.

३) इंग्रजांच्या पूर्व परवानगीशिवाय कोणत्याही युरोपियन व्यक्तीस स्वत:च्या चाकरीत ठेवू नये.

४) वेलेस्लीने दौलतरावाला तैनाती फौजेच्या बंधनात अडकविण्याचा बराच प्रयत्न केला परंतु दौलतरावाने इंग्रजांची तैनाती फौज स्वीकारण्यास नकार दिला.

अशा रितीने वेलेस्लीने शिंदे व भोसल्यांचा पराभव करून व त्यांना तह करावयास भाग पडले. आता यशवंतराव होळकर याचा बंदोबस्त करणे बाकी होते. म्हणून वेलेस्लीने आपले लक्ष त्याच्याकडे वळवले.

**● यशवंतराव होळकराचा पराभव (इ. स १८०४–१८०५) :**

शिंदे व भोसल्यांच्या पराभवामुळे यशवंतरावाला प्रचंड धक्का बसला. इंग्रजविरोधी आघाडीत शिंदे भोसल्यांना साथ न दिल्याबद्दल त्याला पश्चाताप होऊ लागला. त्याने त्यादृष्टीने इंग्रजांशी लढण्याची तयारी सुरू केली. शिंदे पराभूत होऊन त्यांनी इंग्रजांशी तह करताच यशवंतरावाने शिद्यांच्या प्रदेशावर हल्ले सुरू केले. त्याने इंग्रजांचे मित्र असलेल्या जयपूर राज्यावरही हल्ला केला. तेव्हा वेलेस्लीने यशवंतरावास होळकरांच्या दौलतीवरील हक्क सोडून स्वस्थ बसण्यास सांगितले, परंतु यशवंतरावाने वेलस्लीच्या जाळयात न फसता इंग्रजविरोधी आघाडी उभारण्याची तयारी सुरू केली. रजपूत, जाट, बुंदेले. शिख इत्यादींना त्याने या आघाडीत सामिल होण्याचे आवाहन केले. शिंदे, भोसले, गायकवाड या इंग्रजांचे मांडलिकत्व पत्करलेल्या सत्तानाही त्याने आवाहन केले. 'यशवंतरावाने इंग्रजविरोधी हालचाल सुरु करताच ग. ज. लॉर्ड वेलेस्लीने एप्रिल १८०४ मध्ये त्याच्याविरुद्ध युद्ध पुकारले.

यशवंतरावाचा पराक्रम व युद्ध कौशल्याची वेलेल्सीला पुरेपूर जाग होती. म्हणून त्याने यशवंतरावाची कोंडी करून त्याला असहाय्य करण्याचे ठरविले. त्यासाठी एकाच वेळी तीन दिशानी त्याच्यावर हल्ला करण्याचे वेलेस्लीने ठरविले. उत्तरेतून जनरल लेक, दक्षिणेतून ऑर्थर वेलेस्ली आणि पश्चिमेतून कर्नल मॉन्सन या तिघांनी एकाचवेळी यशवंतरावाविरुद्ध मोहीम उघडली या तिन्ही फौजा एकत्र आल्या तर आपली धडगत नाही याची यशवंतरावाला कल्पना असल्याने त्याने अत्यंत वेगाने कर्नल मॉन्सनला कोट्याजवळ एकटे गाठले व त्याचा पराभव केला. मॉन्सनवरील विजयाने यशवंतरावाची हिम्मत वाढली व तो दिल्ली ताब्यात घेण्यासाठी निघाला. दिल्ली यशवंतरावाच्या ताब्यात गेल्यास त्याच्या सामर्थ्यात वाढ होईल हे जनरल लेकने ओळखले व त्याने दिल्लीकडे धाव

घेतली हे पहाताच यशवंतराव गंगा-यमुनेच्या प्रदेशात शिरला. १७ नोव्हे १८०४ रोजी होळकर व इंग्रजी फौजेची फरूखाबाद येथे गाठ पडून त्यात होळकरी फौजेचा पराभव झाल्याने यशवंतरावाने भरतपूरचा जाट राजा रणजितसिंहाच्या किल्ल्याच्या आश्रयाला गेला. तेव्हा जनरल लेकने किल्ल्याला वेढा दिला. किल्ल्यातून रणजितसिंह व बाहेरून यशवंतराव जनरल लेकच्या फौजेवर मारा करू लागले. त्यामुळे जनरल लेकची पंचाईत झाली. परंतु १० एप्रिल १८०५ रोजी रणजितसिंहाने इंग्रजांशी तह केल्याने यशवंतरावाचा एकमेव आधारही तुटला. याच सुमारास इंग्रजांनी होळकरांची माहेश्वर ही राजधानी जिंकल्याने यशवंतरावाची अवस्था अतिशय वाईट झाली.

यशवंतराव हा कितीही धाडसी व पराक्रमी असला तरी इंग्रजांसारख्या प्रबळ शक्तिशी एकाकी लढा देणे सामान्य बाब नव्हती. त्यात माहेश्वर हे राजधानीचे शहर इंग्रजांनी जिंकल्याने यशवंतरावाच्या सामर्थ्याला फार मोठा धक्का बसला. या सुमारास दौलतराव शिंदेला चुकांचा पश्चाताप होवून यशवंतरावाला येवून मिळण्याचा विचार करू लागला. इंग्रजानी २१ नोव्हे १८०५ रोजी दौलतरावावर एक नवीन तह लादला. दौलतरावाच्या भेटीने यशवंतरावाच्या मनात नवीन आशा प्रज्वलित झाली होती. पण तेथे त्याच्या पदरी निराशा आल्याने तो पंजाबचा शिख राजा रणजितसिंहाकडे वळला. परंतु रणजितसिंहानेही त्याला मदत केली नाही. कॉर्नवॉलीसही हे युद्ध बंद करण्याच्या प्रयत्नात होता. शेवटी २४ डिसे. १८०५ रोजी दोन्ही पक्षात राजघाटाचा तह झाला. यानुसार चंबळ नदीच्या उत्तर व पश्चिमेकडील प्रदेशावरील होळकरांचा हक्क समाप्त झाला. हा प्रदेश सोडून त्यांच्या ताब्यातील उरलेला प्रदेश त्यांच्याकडेच ठेवण्यात आला. यशवंतराव धाडसी व पराक्रमी होता. परंतु इंग्रजांविरुद्ध आलेले अपयश, पुतण्या खंडेरावाचा मृत्यू आणि एकाकीपणा त्यातून त्याचा मानसिक तोल बिघडला. राजघाटच्या तहानंतर वयाच्या केवळ ३५ व्या वर्षी होळकर घराण्यातील या पराक्रमी पुरुषाचा मृत्यू झाला.

यशवंतराव होळकरच्या पराभवामुळे दुसऱ्या इंग्रज-मराठा युद्धाला पूर्णविराम मिळाला. या युद्धामुळे मराठेशाहीचे अखंडत्व नाहीसे होऊन तिचे अनेक लहान लहान तुकडे झाले मोगल बादशहा पुनः एकदा इंग्रजांच्या आश्रयाखाली आला आणि इंग्रज ही भारतातील एकमेव शक्तिशाली सत्ता बनली.

### ● तिसरे इंग्रज मराठा युद्ध (१८१७ -१८१८) :

वसईच्या तहाने बाजीराव पेशव्याने इंग्रजांचा आश्रय घेतल्याने त्याला अंतर्गत व बहिर्गत शत्रूंचा धोका उरला नाही. त्यामुळे तो स्वत:च्या अधिकाराचा दुरुपयोग करू लागला. बाजीराव व त्याच्या साथीदारानी वसईच्या तहानंतर पुण्यातील प्रजेवर अनन्वित अत्याचार केले. बाजीरावाला पैशाची नेहमीच चणचण असे. त्यासाठी त्याने पटवर्धन, रास्ते, पानसे, देसाई या त्याच्या सरदारांकडून पैसे उकळण्यासाठी त्यांच्यावर दडपण आणले. त्यांच्या जहागिरी जप्त करण्याचा आदेश दिला. शेवटी पुणे येथील ब्रिटिश रेसिडेंट एलफिन्स्टनने बाजीरावाला सांगितले की, त्याने करारानुसार निश्चित केलेली खंडणीच स्वत:च्या सरदारांकडून घ्यावी व आर्थिक बाबींवरून त्यांच्या छळ करू नये. तसेच त्यांच्या जहागिरीही जप्त करू नये असा करार लिहून घेतला यालाच पंढरपूर करार म्हणतात. ब्रिटीशांचे हे धोरण बाजीरावाला सहन झाले नाही. अंतर्गत कारभारातील इग्रजांच्या या हस्तक्षेपामुळे बाजीराव-इंग्रज संबंध दुरावण्यास सुरवात झाली.

● **पंढरपूर करार (१९ जुलै १८१२)**

१) इंग्रजांच्या परवानगीशिवाय बाजीरावाने सरदारांकडे नवीन मागण्या करू नयेत.

२) इंग्रजांच्या परवानगीशिवाय बाजीरावाने सरदारांचे सरंजाम जप्त करू नये .

३) सरदारांशी परस्पर करार करण्याचा अधिकार इंग्रजांना राहील .

४) बाजीराव-सरदार संघर्षाचे अंतिम अधिकार इंग्रजांकडे राहतील .

● **गंगाधर शास्त्री खून प्रकरण (२० जूलै १८१५) :**

वसईचा तह स्वीकारत असताना बाजीरावापुढे एकच उद्दिष्ट होते. आणि ते म्हणजे यशवंतरावापासून स्वत:च्या जीव वाचविणे. हा तह स्वीकारल्यानंतर यशवंतरावाचा धोका नाहीसा झाला. बाजीरावाची पेशवेपदी स्थापना झाली. त्यामुळे नाईलाजाने स्वीकारलेल्या अटींची बाजीरावाला अडचण भासू लागली. त्यातून कुरबुरीला सुरवात झाली. बाजीराव इंग्रजांच्या कचाट्यातून सुटण्याची तर इंग्रज पेशवाई बुडविण्याची संधी शोधू लागले. गंगाधर शास्त्रीच्या खूनामुळे तशी संधी इंग्रजांना मिळाली.

बडोद्याचे गायकवाड हे मराठेशाहीतील एक बडे प्रस्थ होते. त्यांनी पेशव्याला वार्षिक २४ लक्ष रु. खंडणी द्यावी असा उभयपक्षी करार झाला होता. सुरवातीला काहि वर्ष गायकवाडानी ही खंडणी नियमितपणे दिली. परंतु मधल्या काळात मराठेशाहीत जी अस्थिरता निर्माण झाली त्यामुळे गायकवाडांनी ही खंडणी देणे बंद केले. दरम्यान आर्थिक स्थिती खालावल्याने त्याने गायकवाडांकडे राहिलेली खंडणी व नजराण्यापोटी ५६ लक्ष रु. अशा ३ कोटी रु.चा तगादा लावला. गायकवाडांनुसार ही रक्कम बरीच जास्त असल्याने या बाबत विचारविनियम करून रक्कम निश्चित करण्यासाठी गायकवाड घराण्याचे प्रमुख फत्तेसिंहराव गायकवाडने गंगाधर शास्त्री नावाचा स्वतःचा वकील पुणे येथे पाठविला. गंगाधर शास्त्रीच्या संरक्षणाची हमी इंग्रजांनी दिली. गंगाधर शास्त्री व बाजीरावामध्ये वरील रकमेबाबत वाटाघाटी झाल्या. पण काहीही निष्पन्न झाले नाही. बाजीराव पंढरपूर येथे मुक्कामास असताना गंगाधर शास्त्री त्याला भेटण्यासाठी पंढरपुरास गेला. परंतु २० जुलै १८१५ च्या रात्री गंगाधर शास्त्रीचा खून झाला. या सुमारास त्रिंबकजी डेंगळे हा अत्यंत चाणाक्ष सरदार बाजीरावाचा प्रमुख सल्लागार होता. गंगाधर शास्त्रीच्या जीविताची हमी इंग्रजांनी दिली असल्याने व गंगाधर शास्त्रीचा खून त्रिंबकजी डेंगळेने केला असा इंग्रजांचा संशय असल्याने त्यांनी त्रिंबकजीला इंग्रजांच्या स्वाधीन करावे अशी पेशव्याकडे मागणी केली. अत्यंत अनिच्छेने बाजीरावाने त्रिंबकजीला इंग्रजाच्या स्वाधीन केले. त्रिंबकजीला सप्टें. १८१५ मध्ये ठाणे येथे तुरूंगात ठेवण्यात आले. परंतु सप्टें. १८१६ मध्ये तो इंग्रजांच्या कैदेतून निसटला. त्रिंबकजीचा ठावठिकाणा बाजीरावाला माहित असेल या समजुतीने इंग्रजांनी बाजीरावाकडे त्रिंबकजीला शोधून काढून इंग्रजांच्या हवाली करण्यासाठी लकडा लावला व बाजीरावाने त्रिंबकजीला इंग्रजांच्या स्वाधीन न केल्यास इंग्रज-पेशवे संबंध दुरावतील अशी धमकीही दिली, त्यामुळे बाजीरावापुढे गंभीर समस्या निर्माण झाली. त्रिंबकजी प्रकरणावरून इंग्रजांनी बाजीरावाला चांगलेच कोंडीत पकडले. १३ जून १८१७ रोजी इंग्रजांनी बाजीरावावर एक नवीन तह लादला. त्याच्या अटी पुढीलप्रमाणे होत्या.

● **पुण्याचा तह (१३ जून १८१७) :**

१) पेशव्याने मराठा साम्राज्याच्या प्रमुख पदावरील हक्क सोडावा.

२) अहमदनगरचा किल्ला व नर्मदेच्या उत्तरेकडील प्रदेशावरील पेशव्याचा हक्क संपुष्टात यावा.

३) माळवा, बुंदेलखंड आणि उत्तर प्रदेशातील स्वतःच्या सर्व अधिकारांचा पेशव्याने त्याग करावा.

४) इंग्रजांच्या पूर्व परवानगीशिवाय परराज्यांशी कोणतेही संबंध ठेवू नये.

५) स्वतःच्या पदरी बाळगलेल्या तैनाती फौजेच्या संख्येत वाढ करावी.

६) रायगड, पुरंदर, सिंहगड हे किल्ले इंग्रजांच्या स्वाधीन करावे.

७) गायकवाडांकडून पेशव्यांना येणे असलेली थकबाकी रद्द समजण्यात यावी.

८) त्रिंबकजी डेंगळेस पकडून इंग्रजांच्या हवाली करावे

गंगाधरशास्त्री खून प्रकरणात सर्व जबाबदारी बाजीरावावर टाकून इंग्रजांनी त्याला नवीन तह स्वीकारण्यास भाग पाडले. या नवीन तहाद्वारे बाजीराव हा इंग्रजांच्या हातचे बाहुला बनला. इंग्रजांचा जाच दिवसेंदिवस इतका वाढू लागला की बाजीरावाने त्यातून कायमचे मुक्त होण्यासाठी शेवटचा निकराचा प्रयत्न करण्याचे ठरवले. त्यातूनच तिसरे इंग्रज - मराठा युद्ध झाले.

● **खडकीची लढाई व बाजीरावाचे पलायन :**

इंग्रजांशी एकटयाने लढणे शक्य नाही त्यासाठी इंग्रजविरोधी आघाडी उभारण्याचे बाजीरावाने ठरविले. त्याप्रमाणे त्याने दौलतराव शिंदे, मल्हारराव होळकर, अप्पासाहेब भोसले इत्यादी सरदारांशी गुप्त पत्रव्यवहार करून त्यांचे सहकार्य मिळविण्याचा प्रयत्न केला. तसेच स्वत:च्या सैन्यात वाढ करण्यास सुरूवात केली. ९ ऑक्टो १८१७ रोजी इंग्रज वकील एल्फिंस्टन बाजीरावाला भेटण्यासाठी आला असताना बाजीरावाने त्याला अपमानास्पद वागणूक दिली. त्यामुळे त्याने बाजीरावाचा हेतू ओळखला व पुणे येथे ज्यादा सैन्य बोलावले. ते येण्यापूर्वीच बाजीरावाने त्याच्या सैन्याला इंग्रज रेसिडेन्सीवर हल्ला करण्याचा आदेश दिला. मराठी सैन्याने इंग्रज रेसिडेन्सी जाळून उध्वस्त केली. त्यानंतर पुण्याजवळच खडकी येथे इंग्रज व पेशव्याच्या सैन्यात चकमक उडून त्यात पेशव्याच्या सैन्याचा पराभव झाला. स्वत:च्या सैन्याचा पराभव झालेला पहाताच तो पुरंदर किल्ल्याकडे पळाला. १७ नाव्हें. १८१७ रोजी इंग्रजी सैन्याने शनिवारवाड्यात प्रवेश केला. भगवा झेंडा उतरविण्यात आला व त्याजागी इंग्लंडचा युनियन जॅक लावला गेला.

● **बाजीरावाची शरणागती :**

पुण्याहून बाजीराव पुरंदर, माहुली व तेथून पंढरपुरास पळाला. तेथे त्याला सेनापती बापू गोखले व सातारचे छत्रपती प्रतापसिंह येवून मिळाले. इंग्रजी सैन्य बाजीरावाच्या मार्गावर होते. बाजीरावाला उसंत मिळू न देणे हाच इंग्रजांचा उद्देश होता. १ जाने. १८१८ रोजी कोरेगाव आणि २० फेब्रुवारी १८१८ रोजी आष्टी येथे बाजीरावाची गाठ

इंग्रजांशी पडली. या दोन्ही युद्धात बाजीरावाचा दारुण पराभव झाला. आष्टी येथील युद्धात त्याचा सेनापती बापू गोखलेही ठार झाला. या युद्धानंतर छत्रपती प्रतापसिंह इंग्रजांच्या स्वाधीन झाले. त्यामूळे बाजीराव एकाकी पडला. साधन सामुग्री व मनुष्यबळाचा अभाव असलेला बाजीराव स्वतःचा जीव वाचविण्यासाठी पळू लागला. होळकर, शिंदे, भोसले यांच्याकडून मदत मिळेल या अपेक्षेने बाजीराव उत्तरेकडे धावला. परंतु त्या तिघांनीही इंग्रजांपुढे अगोदरच शरणागती पत्करली असल्याने बाजीरावाला त्यांच्याकडून काडीचीही मदत मिळू शकली नाही. ४ जून १८१८ रोजी बाजीराव खैरी या गांवी इंग्रज सेनापती माल्कमच्या स्वाधीन झाला. इंग्रजांनी बाजीरावाला राजकारण संन्यास घ्यायला लावून त्याला उत्तरेत कानपूरजवळ विठूर उर्फ ब्रह्मावर्त येथे कायमचे रहाण्यास पाठविले. त्याला सालीना ८ लक्ष रु. निवृत्तीवेतन मंजूर करण्यात आले. प्रतापसिंहाना साताऱ्याजवळचा लहानसा प्रदेश राज्य म्हणून देण्यात आला. अशा पद्धतीने मराठे शाहीचा अस्त झाला.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न २**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) जनरल लेकने दिल्ली कधी जिंकली.

२) देवगावचा तह कोणामध्ये झाला.

३) गंगाधर शास्त्री हा कोणाचा वकील होता.

४) राजघाटचा तह कधी झाला.

५) मराठी सत्तेचा शेवट कधी झाला.

**ब) रिकाम्या जागा भरा.**

१) .............. मध्ये शिंदे - भोसलेंच्या सैन्याचा पराभव लॉर्ड वेलस्लीने केला.

२) सुर्जी अंजनगावचा तह ............ व ........... यांच्यात झाला.

३) .............. ही यशवंतराव होळकरांची राजधानी होती.

४) .............. रोजी गंगाधर शास्त्रीचा खून झाला.

५) .............. च्या लढाईत सेनापती बापू गोखले ठार झला.

**४.२.३ मराठी सत्तेच्या पतनाची कारणे :**

मराठेशाहीचा अस्त हा काही एका कारणाने घडून आला नाही. त्यासाठी अनेक कारणे कारणीभूत ठरली. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले स्वराज्य हे सार्वभौम होते. या स्वराज्याचा पेशवे काळात विस्तार झाला. परंतु नंतरच्या काळात प्रबळ नेतृत्व मिळाले नसल्याने ते अस्थिरतेकडे गेले व त्याचा शेवट घडून आला.

**१) शिवाजी महाराजांचा धोरणाचा विसर :**

'स्वराज्य' निर्मितीचे ध्येय शिवाजी महाराजांनी साध्य केले होते. हे करताना जिंकलेल्या प्रदेशाची व्यवस्था लावून त्या ठिकाणी प्रबळ प्रशासन व्यवस्था निर्माण केली .परंतु त्या नंतरच्या काळात राजकर्त्यांना या धोरणांचा विसर पडला आणि निव्वळ सारा वसुलीसाठी साम्राज्यविस्तार ही संकल्पना पुढे आली.

**२) सरंजामशाही व्यवस्था :**

सरंजामशाहीची बेसुमार वाढ हे मराठयांच्या नाशाचे मुख्य कारण ठरले .अतिरिक्त वतन लोभ व सैराचारी वृत्ती यामुळे मराठी सरदार केंद्रीय सत्तेला जुमानासे झाले. छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात वतनदारीची सुरवात झाली. तर पेशवाई काळात वतनदारी हेच धोरण बनले.

**४) गनिमी काव्याचा त्याग :**

गनिमी काव्याचा त्याग हे मराठेशाहीच्या नाशाचे कारण मानले जाते. परंतु हे सबळ कारण मानता येणार नाही. कारण ही पद्धती डोंगर, दऱ्या, घनदाट जंगलात योग्य होती. परंतु सपाट मैदानावर ही पद्धती चालणार नव्हती. यामुळे हे कारण होऊ शकत नाही असे बरेच इतिहासकारांचे मत आहे.

**५) सामंजस्याचा अभाव :**

पेशवे काळामध्ये मराठा सरदारच मुलुखाचे मालक बनले. तर उत्तर भारतातील सरदारांनी मध्यवर्ती सत्ता झुगारली इतकेच नव्हे तर शिंदे, होळकर, आंग्रे, पेशवे यांच्यामधील वैरत्वाने इंग्रजांचे फावले. या सरदारांमध्ये सामंजस्य निर्माण करण्यात पेशवे कमी पडले. यामुळे मराठेशाही नाशाच्या दिशेने चालली.

**६) पानिपत पराभव :**

पानिपत युद्धातील पराभव हे मराठयांच्या अस्ताचे कारण आहे कि नाही या बाबत इतिहासकारांमध्ये एकमत नाही. असे जरी असले तरी एक गोष्ट मान्य करावी लागते कि एक कर्ती पिढी यामध्ये संपली, उत्तरेतील दबदबा संपला, माधवरावांच्या मृत्यूने कर्तबगार लोकांची कमतरता निर्माण झाली. यामुळे असे म्हणता येईल कि पानिपतच्या युद्धातील पराभव म्हणजे इंग्रजांचे आगमन असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

**७) मध्यवर्ती सत्तेचा अभाव :**

शिवाजी महाराजानंतर छत्रपतीची मध्यवर्ती सत्ता हळूहळू कमकुवत होत जाऊन मराठी राज्याचा पाया ढासळण्यास सुरवात झाली .मराठ्यांमध्ये अंगभूत असलेल्या स्वातंत्र्य वृत्तीची मध्यवर्ती सत्तेशी फटकून वागण्यापर्यंत गेलेली मजल, यामुळे आपोआपच मध्यवर्ती सत्ता कोलमडून पडली व याचा फायदा इंग्रजांनी घेतला. एकेक मराठा सरदाराला गाठून संपवले. साहजिकच मराठेशाहीचा अस्त जवळ आला.

**८) आरमार :**

आरमार हे मराठा राज्याचे एक महत्वाचे अंग आहे. म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराजांनी मोठ्या दूरदृष्टीने

मराठी आरमाराचा पाया घातला. कान्होजी व तुळाजी आंग्रे यांनी या आरमाराला बळकटी आणली.

नानासाहेब पेशव्यांनी इंग्रजांच्या मदतीने तुळाजीच्या आरमाराचा नाश घडवून आणला. परंतु हे आरमार मराठ्यांचे होते .याचा विसर पेशव्यांना पडला

**९) इंग्रजांची मुसद्देगिरी :**

भारतातील राजकीय परिस्थितीचा इंग्रजांनी पुरेपूर फायदा उठवला. फोडा आणि झोडा नीती वापरली तर अनेकाना फितूर करून मैदानातील लढाईपेक्षा कागदावरील लढाईत विजयी झाले. अनेक प्रकारची प्रलोभने दाखवून तर कधी सैन्याच्या बळावर विजय मिळवणे मराठ्यांना जमले नाही व तसा प्रयत्न हि कोणी केला नाही.

**१०) हेरखाते :**

लष्करी सामर्थ्याचा विचार करताना हेरखात्याला फार मोठे स्थान द्यावे लागते. छत्रपती शिवाजी महाराजांनी हेरखात्याला फारच महत्व दिले होते, कारण सर्व गुप्त योजना त्यांच्या हेरांनी आणलेल्या अचूक माहितीवर अवलंबून असत.

या उलट मराठ्यांना इंग्रजांची काहीच माहिती नव्हती. इंग्रजांचे सैन्यबळ, द्रव्यबळ व राज्यव्यवस्था, इत्यादी गोष्टीची माहिती मराठी मुत्सद्दयांनी व सरदारांनी अवश्य मिळवावयास हवी होती.

हेरखात्याकडे केलेल्या दुर्लक्ष्यामुळे इंग्रजांच्या योजना मराठ्यांना समजल्या नसल्याने मराठ्यांना ठीक ठिकाणी पराभव पत्करावा लागला.

**११) धर्माचरणाचे स्तोत्र :**

पेशवाईमध्ये यज्ञ, याग, कर्मकांडे, अधिष्ठान यांचा अतिरेक झाला. यामुळे पुन्हा एकदा समाज अधोगतीकडे निघाला. जग ज्यावेळी नवनवीन शोध लावण्यात दंग होते, त्यावेळी भारतामध्ये अंधश्रद्धा व कर्मकांडाचे स्तोम माजले होते. तर दुसऱ्या बाजीरावाचे जीवन चैन, विलासीपणा उपभोगण्यात व्यस्त होते. यामुळे आपोआपच याचा समाजकारणावर व अर्थकारणावर परिणाम झाला.

**१२) मराठ्यांनी इंग्रजांची घेतलेली मदत :**

नानासाहेबाने इंग्रजांची मदत घेऊन आंग्रेचे आरमार बुडवले, राघोबाने सुरतेचा तह केला. त्यामुळे पहिले इंग्रज मराठा युद्ध झाले. दुसऱ्या बाजीरावाने तैनाती फौज स्विकारली.

**१३) आर्थिक दिवाळखोरी :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी जरी अनेक युद्धे खेळली तरी त्यांनी संपत्ती वाढवून स्वराज्याची तिजोरी भरली होती. शिवाजी महाराजांनी शिल्लक ठेवलेली संपत्ती छत्रपती संभाजी व छत्रपती राजाराम महाराज यांच्या काळात औरंगजेबाशी झालेल्या प्रदीर्घ युद्धामुळे संपून मराठी राज्याची तिजोरी रिकामी झाली.

पहिल्या बाजीरावाने अनेक मोहिमा आखल्या. सरंजामी फौज त्यांना नेहमी बाळगावी लागे. शिवाजी

महाराजांप्रमाणे किंवा इंग्रजांप्रमाणे वेळेच्या वेळी पगार देण्याची पेशव्यांची पद्धत नव्हती. सरंजामी फौजेकारिता तोडून दिलेल्या मुलुखाचे उत्पन्न येईल तेंव्हा खर्चाची तजवीज होई .

शिंदे, होळकर, भोसले, पवार, गायकवाड, रस्ते, पटवर्धन, आंग्रे सरदारांकडे जे सरंजाम नेमून देण्यात आलेले होते त्यांच्या मुलकी व लष्करी कारभाराची व्यवस्था त्या त्या सरदारांवरच टाकण्यात आलेली होती. पेशव्यांना त्या बाबतीत काहीच अधिकार नसल्याने प्रत्येक सरदार त्याच्या त्याच्या सरंजामापुरता राजाच होता.

**१४) कर्जबाजारीपणा :**

छत्रपती, पेशवे, सरदार, जहागीरदार इतकेच नव्हे तर पेशव्यांचे कमाविसदार हे ही वारंवार सावकारांकडून कर्जे काढत. सावकाराच्या कर्जावर प्रमाणाबाहेर अवलंबून राहण्याची मराठ्याची सवय हे आर्थिक दिवाळखोरीचे व राज्य संपुष्टात येण्याचेच लक्षण होते.

मराठेशाही ही सावकारी कर्जावर जास्त विसंबून राहिली. याचे कारण व्यापार व उद्योगधंदे यांच्या भरभराटीला पेशव्यांनी व त्याच्या सरदारांनी जेवढे महत्व द्यायला हवे होते तेवढे दिले नाही.

**१५) व्यापाराची पीछेहाट :**

मराठी राज्याला कोकणचा व उत्तर गुजराथचा किनारा लाभला होता. तरीसुद्धा पश्चिम किनाऱ्यावरील सागरी व्यापारावर मराठे वर्चस्व गाजवू शकले नाहीत. तो व्यापार मुख्यत्वे इंग्रज व इतर युरोपियनांच्या हातातच राहिला. चौल, दाभोळ यांसारखी पूर्वापार चालत आलेली कोकणकिनाऱ्यावरील बंदरे मराठ्यांच्या व्यापाराने गजवजली नाहीत, तर परदेशी व्यापाऱ्यांनी स्वत:च्या व्यापारासाठी त्यांचा उपयोग केल्याने त्यांचे महत्व टिकून राहिले.मराठ्यांच्या व्यापाराची पीछेहाट हेही मराठेशाहीच्या नाशाचे कारण ठरले .

**१६) नेतृत्वाचा अभाव :**

मराठेशाहीचा असत होण्यास त्यांच्या राजकीय,लष्करी व आर्थिक अवनती प्रमाणेच त्यांचा नेतृत्वातील ऱ्हासाला कारणीभूत आहे.मराठ्यांना सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती राजाराम, रामचंद्रपंत अमात्य, शंकराजी नारायण सचिव, संताजी, धनाजी यांचे नेतृत्व लाभले. पुढे छत्रपती शाहुंच्या कारकिर्दीपासून, बाळाजी विश्वनाथापासून थोरल्या माधवरावापर्यंत चार पिढ्या मराठ्यांना पेशव्यांचे कणखर पुढारीपण मिळाले. माधवरावानंतर पेशवेही शक्तिहीन झाले तेंव्हा नाना व महादजी यांनी काही काळ नेतृत्वाची पोकळी भरून काढली. पण त्यांच्यामागे मराठ्यांचा नाव घेण्यासारखा एकही नेता न मिळाल्याने मराठेशाहीची दुरावस्था झाली.

**१७ ) दुसरा बाजीराव :**

मराठेशाहीचा अस्त दुसऱ्या बाजीरावाच्या काळात झाला. त्यामुळे त्यालाच जबाबदार धरले जाते, ते एका अर्थी बरोबरच आहे. मुळात पेशवेपद मिळवण्यासाठी सत्तेच्या अभिलाषेपायी त्याने साम, दाम, दंड, भेद या सर्वाचा वापर केला आणि पेशवेपद मिळवले. परंतु मिळालेले पेशवेपद टिकवता आले नाही. सतत कटकारस्थाने आणि चैनी विलासी जीवन यामुळे मराठी सत्तेला उतरती कळा लागली. नाना फडणवीसाची कैद असो की

विठोजी होळकराचा प्रश्न यातून तर त्याची अपरिपक्वता दिसलीच. परंतु सर्वात कळस म्हणजे इंग्रजांच्या आश्रयाला जाणे व तैनाती फौजेचा फास आपल्या गळ्यात अडकवून घेणे. हा फास त्याच्या गळ्यात अडकला नसून त्या फासाने मराठी सत्तेचा बळी गेला हे निर्विदाद सत्य आहे.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) वतनदारीची सुरुवात कोणाच्या काळात झाली.

२) पानिपतचे युद्ध कोणा-कोणामध्ये लढले गेले.

३) आंग्रेचे आरमार कोणी बुडवले.

४) सुरतेचा तह कोणी केला.

५) तैनाती फौज कोणी स्वीकारली.

**४.३ स्वयं –अध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

प्रश्न १ (अ)

१) चिमाजी  २) नाना फडणवीस  ३) १७९६

४) दुसरा बाजीराव  ५) दुसरा बाजीराव इंग्रज

प्रश्न १ (ब)

१) १७९६  २) १८००  ३) दु. बाजीराव

४) १८०२  ५) १८०२

प्रश्न २ (अ)

१) १८०३  २) भोसले – इंग्रज  ३) फत्तेसिंग गायकवाड

४) १८०५  ५)१८१८

प्रश्न २ (ब)

१) १८०३  २) इंग्रज – शिंदे  ३) माहेश्वर

४) १८१५  ५) आष्टी

प्रश्न ३

१) छत्रपती राजाराम महाराज  २) मराठे – अब्दाली  ३) नानासाहेब पेशवा

४) राघोबादादा  ५) दुसरा बाजीराव

## ४.४ सारांश :

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याची धुरा छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज, महाराणी ताराराणी यांनी समर्थपणे सांभाळली. मराठा साम्राज्य संपवण्याचा औरंगजेबाने पुरेपूर प्रयत्न केला व आपल्या आयुष्याची २६ वर्षे दक्षिणेत घालवली. यानंतर मात्र छत्रपती शाहू महाराजांच्या कालावधीत कर्तृत्ववान पेशव्यांची पिढी निर्माण झाली व पेशव्यांनी मराठा साम्राज्याचा उत्तरेकडे विस्तारच केला नाही तर मुगल बादशहाचे संरक्षण मराठे करू लागले. मराठ्यांनी आटकेपार झेंडा रोवला. परंतु दुर्दैवाने पानिपतच्या पराभवानंतर माधवराव पेशव्याने  मराठा साम्राज्य सांभाळायचा प्रयत्न केला. परंतु दुर्दैवाने त्याला अल्पकाळ मिळाला. मात्र त्यानंतर पेशवेपद मिळविण्यासाठी सौदेबाजी सुरु झाली, कटकारस्थानांना उत आला. आणि यातच दुसऱ्या बाजीरावाने मराठा सरदारांना एकत्र आणून इंग्रजांना शह दयायला हवा होता. परंतु मराठा सरदारांना घाबरून दुसरा बाजीराव इंग्रजांच्या आश्रयास गेला. इंग्रजांनी याच संधीचा फायदा घेवून शिंदे, भोसले व होळकरांसारख्या सरदारांना फोडा आणि झोडा नीती वापरून बाजूला केले व मराठ्यांची सत्ता संपवली.

## ४ .५ सरावासाठी स्वाध्याय;

**अ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (दीर्घोत्तरी प्रश्न)**

१) पेशवा बाजीराव दुसरा व इंग्रज संबध स्पष्ट करा.

२) दुसऱ्या इंग्रज - मराठा युद्धाचा आढावा घ्या.

३) तिसरे इंग्रज-मराठा युद्धाचे वर्णन करा.

४) मराठी सत्तेच्या ऱ्हासाची कारणे स्पष्ट करा.

**ब) टिपा लिहा (लघुत्तरी प्रश्न)**

१) महाड कारस्थान

२) होळकर-बाजीराव संघर्ष

३) वसईचा तह (३१डिसेंबर १८०२)

४) देवगावचा तह

५) पंढरपूर करार

## ४.६ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१) Vaidya S. G.; Peshwa Bajirao II and the downfall of the Maratha Power- 1976, Nagpur.

२) Sen S. N. ; Anglo Maratha Relation 1785-1796 Madras-1974

३) Gupta P. C. ; Bajirao II and East India Company, Calcutta-1964

४) डॉ. पवार जयसिंगराव - मराठी साम्राज्याचा उदय आणि अस्त, कोल्हापूर १९९३

५) आठवले व सासवडकर - मराठी सत्तेचा विकास व ऱ्हास, १९७४

६) डॉ. वैद्य सुमन - अखेरचा पेशवा, नागपूर

७) डॉ. कदम विकास - मराठे सत्तेचा विस्तार आणि ऱ्हास, औरंगाबाद.

८) सरदेसाई गो. स. - मराठी रियासत खंड - ८.

❖❖❖

## घटक – १

# साधने (Sources)

**अनुक्रमणिका :**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ साधनांचे महत्त्व

१.२.२ भारतीय भाषेतील साधने (संस्कृत–मराठी–फारसी)

१.२.३ परकीय भाषेतील साधने (इंग्रजी–पोर्तुगीज)

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्दांचे अर्थ

१.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


**१.० उद्दिष्टे :**

या प्रकरणात आपणास लक्षात येईल की,

- इतिहासाची संदर्भ साधने म्हणजे काय?
- इतिहास लेखनामधील संदर्भ साधनांचे महत्त्व लक्षात येईल.
- भारतीय भाषेतील साधने समजून घेता येतील.
- संस्कृत भाषेतील साधनांची उपयुक्तता जाणून घेता येईल.
- मराठी भाषेतील साधनांचे महत्त्व समजून घेता येईल.
- फारसी भाषेतील साधने पहाता येतील.
- परकीय भाषेतील साधने समजून घेता येतील.

- इंग्रजी भाषेतील साधनांची उपयुक्तता जाणून घेता येईल.
- पोर्तुगीज भाषेतील साधनांचे महत्त्व समजून घेता येईल.

## १.१ प्रास्ताविक :

इतिहासाचा संबंध भूतकाळाशी असून इतिहास ही एक विकसीत ज्ञानशाखा म्हणून पुढे आली आहे. वर्तमान काळातील समाजाला इतिहासापासून मिळणारे ज्ञान हे प्रत्यक्ष दिसण्याच्या स्वरूपाचे नसते तर अप्रत्यक्ष प्रकारचे असते. इतिहासाचा शास्त्रशुद्ध अभ्यास व संशोधन करण्यासाठी ऐतिहासिक साधनांचा उपयोग करावा लागतो. सर्वसाधारणपणे इतिहासकार ज्या लिखीत-अलिखीत पुराव्यांच्या आधारे इतिहासलेखन करतात त्या पुराव्यांनाच इतिहासाची साधने म्हणतात. ऐतिहासिक संशोधनाचे महत्त्व हे त्या इतिहासकाराने कोणती साधने वापरलेली आहेत यावर अवलंबून असते. त्यामुळे इतिहासकाराला उपलब्ध होणाऱ्या साधनांची शहानिशा करूनच विश्लेषण करावे लागते. सर्वच ऐतिहासिक साधनांमधून एकसारखी व पाहिजे तशी माहिती मिळत नसते. म्हणून इतिहासकाराला आपल्या संशोधनासाठी आवश्यक असणारी विश्वसनीय माहिती विविध साधनांच्या माध्यमातून शोधावी लागते. एकंदरीतच इतिहासकाराला संदर्भ साधनांच्या आधाराशिवाय इतिहासाचे लेखन करता येत नाही. यावरून आपणास संदर्भसाधनांचे महत्त्व लक्षात येते. सदरच्या प्रकारात मराठ्यांचा इतिहास समजून घेण्यासाठी उपयुक्त असणाऱ्या साधनांचा विचार करणार आहोत. भारताच्या इतिहासात मराठ्यांच्या इतिहासाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. अभ्यासाच्या सोयीसाठी आपणास मराठ्यांच्या इतिहासाचे अनुक्रमे छत्रपतींचा काळ (१६०० ते १७०७) व पेशव्यांचा काळ (१७०७ ते १८१८) असे पाडता येतील. प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण मराठ्यांच्या इतिहासावर (१७०७ ते १८१८) प्रकाश टाकणाऱ्या साधनांचा अभ्यास करणार आहोत.

## १.२ विषय विवेचन :

### १.२.१ साधनांचे महत्त्व :

कोणताही इतिहास हा साधनांच्या आधारेच लिहिला जातो. साधन म्हणजे इतिहास लेखनाचा आधार किंवा पुरावा होय. म्हणजेच इतिहासकार ज्या पुराव्यांच्या आधारे किंवा इतिहासलेखन करतो त्या पुराव्यांनाच साधन (source) असे म्हणतात. यासंदर्भात प्रो. मायकेल स्टॅनफोर्ड म्हणतात की, 'ऐतिहासिक घटिते पुरावा निर्माण करतात आणि हे पुरावे (साधने) ऐतिहासिक ज्ञानाचा आधार ठरतात. पुराव्यांशिवाय ऐतिहासिक ज्ञान प्राप्त होऊच शकत नाही. कारण पुराव्यांशिवाय म्हणजेच साधनांशिवाय लिहिले जाणारे लिखान हे ऐतिहासिक लिखान न रहाता ते अंदाजाने लिहिले गेलेले लिखान होते. Oxforad English Dictionary नुसार 'साधन म्हणजे एखाद्या घटनेची पात्रता ज्यामधून सिद्ध होते ते किंवा जे सहजासहजी दृष्टीस पडते ते.'

इतिहासातील घटनांचे सत्य स्वरूप समजावून घेत असताना आपणास विविध संदर्भ साधनांवरच अवलंबून राहावे लागते. साधनांच्या म्हणजेच पुराव्यांच्या आधाराशिवाय आपण वस्तुनिष्ठ व सत्य माहिती देऊच शकत नाही. म्हणूनच इतिहासलेखन प्रक्रियेमध्ये संदर्भ साधनांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. यासंदर्भात प्रो. लँजिलॉस

व सेनबॉस यांनी म्हटल्याप्रमाणे "No Document No History" यामध्ये काहीही गैर नसून यावरून इतिहासलेखनांमध्ये संदर्भ साधनांचे महत्त्व अधोरेखीत होते. म्हणजेच संदर्भ साधन नाही तर इतिहास नाही हे सूत्रच इतिहासलेखनात प्रमाण मानले जाते. इतिहास हे एक सामाजिक शास्त्र असल्याने सर्वमान्य झाल्यामुळे इतिहासलेखनात वस्तुनिष्ठता व सत्यकथन या गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. संदर्भ साधनांमुळेच इतिहास लेखनाचा दर्जा सुधारत असतो. इतिहास संशोधनासाठी वापरण्यात आलेली साधने, पुरावा यामुळेच त्या घटनेचे पर्यायाने इतिहासाचे महत्त्व ठरत असते. प्रो. नेविस यांनी म्हटल्याप्रमाणे विध्वंसनीय संदर्भ साधन आणि त्याचे शास्त्रशुद्ध मुल्यमापन या दोन बाबी इतिहासलेखनात अत्यंत महत्त्वाच्या आहेत. ही साधने विविध ठिकाणी विविध स्वरूपात विखूरलेली असतात. त्यांचे संकलन करून इतिहास लेखनासाठी उपयोग करावा लागतो.

घटना घडत असताना निर्माण केलेले किंवा झालेले साधन म्हणजे प्राथमिक साधन होय. प्राथमिक साधने इतिहास लेखनासाठी अव्वल दर्जाची ठरतात. मात्र त्यामुळे दुय्यम साधनांना न्युनत्व प्राप्त होत नाही. ज्या ठिकाणी प्राथमिक साधने उपलब्ध होत नाहीत तेथे दुयम्म साधनांवरच अवलंबून रहावे लागते व त्याआधारेच इतिहास लेखन करावे लागते. अभ्यासाच्या सोयीसाठी ऐतिहासिक साधनांचे वर्गीकरण प्राथमिक व दुय्यम, लिखित व अलिकित भारतीय व परकीय साधने असे करता येते. साधनांशिवाय इतिहास नाही हे विषद करताना प्रो. आर्थर मार्विक म्हणतात की, ''ऐतिहासिक कृतीला विद्वत्तापूर्ण विश्वसनीय असे म्हणता येईल. परंतु ती ऐतिहासिक कृति मुलभूत साधनांवर (पुराव्यांवर) आधारीत असली पाहिजे.'' साधनांचे महत्त्व लक्षात घेत असताना हे ही लक्षात ठेवले पाहिजे की, व्यक्तीला क्वचित प्रसंगी गेल्या क्षणाला कोणती घटना घडली हे लक्षात राहाणार नाही. त्यामुळे जर आपण त्या व्यक्तीला घडलेल्या प्रसंगाचे पुन्हा वर्णन करावयास सांगितले तर ते त्या व्यक्तिला जमेलच असे नाही. म्हणजेच इतिहासाची पूनर्रचना करणे व्यक्तीला सहजासहजी शक्य होणार नाही. असाच प्रकार मानवी हालचालींबद्दल आहे. एखाद्या बुद्धीमान व्यक्तीलासुद्धा गतकाळातील घटना इतिहास रूपाने उभ्या करता येतीलच असे नाही. म्हणून व्यक्तीच्या जीवनातील घटना, व्यक्तीशी झालेले संभाषण. व्यक्त केलेले विचार, घटना घडलेली ठिकाणे या सर्वांच्या नोंदी अक्षररुपाने कोठेतरी केलेल्या असणे आवश्यक आहे. या सर्व बाबी कागदपत्रांमध्ये नमूद करून ठेवलेल्या असतात. म्हणून साधनांचे महत्त्व अनन्यसाधारण मानले जाते.

भूतकाळातील ऐतिहासिक घटना एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे व दुसऱ्या पिढीकडून तिसऱ्या पिढीकडे जायच्या असतील तर त्यासाठी साधनांशिवाय दुसरा पर्याय नसतो. थोडक्यात कोणत्याही इतिहासलेखनाचा शास्त्रशुद्ध दर्जा, सत्यता व वस्तुनिष्ठता ही वापरण्यात आलेल्या संदर्भ साधनांवर अवलंबून असते. म्हणून इतिहासलेखनामध्ये साधनांचे महत्त्व अनन्यसाधारण असते.

- **स्वयंअध्ययन प्रश्न – १**

**अ) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१) संदर्भ साधनांच्या उपयुक्तते संदर्भात No Document No History असे .............. यांनी म्हटले आहे.

अ) ग्रँड डफ   ब) एल्फीन्टन   क) सेनबॉस-लॉन्जीलॉस  ड) राजवाडे

२) इतिहासलेखनात .............. अधिक महत्त्वाची असते.

अ) वस्तुनिष्ठता   ब) व्यक्तीनिष्ठता   क) काल्पनिकता   ड) अतिरंजीतपणा

३) घटना घडत असताना निर्माण झालेल्या साधनाला .............. दर्जाचे साधन मानले जाते.

अ) प्राथमिक   ब) दुय्यम   क) तृतीय   ड) चतुर्थ

४) ............. काळात मराठा इतिहास लेखनास चालना मिळाली.

अ) पोर्तुगीज   ब) फ्रेंच   क) डच   ड) ब्रिटीश

५) ............ डिक्शनरीनुसार साधन म्हणजे एखाद्या घटनेची पात्रता ज्यामधून सिद्ध होते ते किंवा जे सहजासहजी दृष्टीस पडते ते.

अ) इंग्लश   ब) अमेरिकन   क) अफ्रिकन   ड) इस्लाम

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) इतिहासकार कशाच्या आधारे इतिहास लेखन करत असतो.

२) इतिहास लेखनाचा शास्त्रशुद्ध दर्जा कशावर अवलंबून असतो.

३) मराठ्यांचा पहिला इतिहासकार कोणास समजले जाते.

४) कोणाच्या मते ऐतिहासिक घटीते पुरावा निर्माण करतात आणि हे पुरावेच ऐतिहासिक ज्ञानाचा आधार ठरतात.

५) विखुरलेली संदर्भ साधनांचे संकलन करून त्याचा अन्वयार्थ लावण्याचे काम केण करत असतो.

### १.२.२ भारतीय भाषेतील साधने :

मराठ्यांचा इतिहास समजून घेण्यासाठी भारतीय भाषेतील साधने अत्यंत उपयुक्त ठरतात. त्यामध्ये प्रामुख्याने संस्कृत, मराठी आणि फारसी भाषेतील साधनांचा समावेश होतो.

**अ) संस्कृत साधने :**

मध्ययुगीन कालखंडात संस्कृत ही राजदरबाराची भाषा होती. छत्रपती हे संस्कृतचे जाणकार असून त्यांच्या दरबारात अनेक संस्कृत विद्वान होते. शिवकाळाच्या तुलनेत पेशवेकालीन संस्कृत साधने फारशी उपलब्ध होत नाहीत. तरी संस्कृत भाषेतील पुढील काही साधनांच्या माध्यमातून पेशवेकालीन इतिहासावर प्रकाश टाकता येतो.

**१) विश्वगुणदर्शक :**

हा ग्रंथ कर्नाटकातील प्रसिद्ध विद्वान व्यंकट धावरी याने सतराव्या शतकात लिहिला. या ग्रंथामधील एका प्रकरणामध्ये महाराष्ट्राचे वर्णन केलेले आढळते. महाराष्ट्रातील ब्राह्मण समाज, मराठे, समाजातील इतर वर्ग यांच्या संबंधीची माहिती दिलेली आहे. या ग्रंथातील माहितीचे वैशिष्ट्य म्हणजे लेखकाने संभाषणात्मक पद्धतीने महाराष्ट्रीय लोकांचे गुण-दोष वर्णन केले आहेत. एकूणच ज्या महाराष्ट्रात मराठी सत्ता उदयास आली त्या महाराष्ट्रावर ऐतिहासिक प्रकाश टाकण्याच्या दृष्टीने हा ग्रंथ निश्चितच महत्त्वाचे साधन म्हणून उपयुक्त ठरतो.

**२) राजाराम चरितम् :**

छत्रपती राजाराम महाराज यांच्या पदरी असणाऱ्या केशव पंडित यांनी या काव्यग्रंथाची रचना केली आहे. हा ग्रंथ तंजावर येथील 'सरस्वती महाल' या ग्रंथालयात इतिहास संशोधक वा. सी. बोंद्रे यांनी शोधून काढला व तो सन १९३१ साली प्रसिद्ध केला. या ग्रंथात छत्रपती संभाजी महाराजांच्या हत्येनंतर निर्माण झालेली परिस्थिती, छत्रपती राजाराम महाराजांची करकिर्द, महाराणी ताराबाई यांची राजाराम महाराजांना मिळालेली साथ याविषयीची माहिती मिळते. त्यामुळे मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धाबरोबरच छत्रपती शाहू व महाराणी ताराबाई यांच्या सुरूवातीच्या हालचाली व कामगिरीवर प्रकाश टाकण्यासाठी ऐतिहासिकदृष्ट्या हा ग्रंथ महत्त्वाचा ठरतो. तथापी याविषयी वा. सी. बेंद्रे म्हणतात की, ''काव्य या दृष्टीनेच हा ग्रंथ रचला आहे. या ग्रंथाची भाषा सरळ व सोपी आहे. परंतु लेखन मात्र तत्कालीन पद्धतीप्रमाणे सुरूवातीला कथा पुराणांच्या थाटाचे झाले असून विवेचनात स्वप्नवृत्तांत व भविष्यकथनाचाच मार्ग कवीने स्विकारला आहे.'' या दोषामुळे या ग्रंथातील ऐतिहासिक सत्य शोधून काढावे लागते.

शिवकाळावर आधारीत असणारी मोठ्या प्रमाणावरील संस्कृत ग्रंथ व इतर काही संस्था ग्रंथ हे भटांच्या काव्यासारखीच आहेत. ती लिहिणाऱ्या कवींचा नेहमीच सांगण्याचा प्रयत्न असतो की, त्यांची चरित्रवर्णने किंवा प्रसंग वर्णने प्रत्यक्ष पाहून किंवा माहिती मिळवून रचलेली आहेत. पण अशा काव्यात स्फूर्तीविषयक भाग अधिक असण्याचा संभव असतो. चरित्र नायकाच्या पराक्रमाचे वर्णन अधिक रम्य व उदात्तीकरण करण्याकडे लेखकांचा कल राहिलेला असतो. पण असे काही दोष असले तरी या संस्कृत साधनांच्या उपयुक्ततेविषयी वा. सी. बेंद्रे म्हणतात की, ''या भटांची विवेचन पद्धती समग्र वृत्तांत देणारी असल्यामुळे या वर्णनात बराचसा ऐतिहासिक सत्याचा भाग प्राप्त होतो. कारण सदरची माहिती त्यांनी बारकाईने व जबाबदारीने मिळविलेली असते. या काव्यांचे समकालीन म्हणून महत्त्व तर आहेच पण चरित्रनायकाची त्यास संमती असल्याने त्यात सत्यही सापडते. म्हणूनच इतर कोणत्याही साधनातून निर्मळ सत्य सापडणार नाही इतके ऐतिहासिक सत्य या काव्यातून सापडते. हा शाहीरी काव्यमय इतिहासच मराठ्यांचा इतिहास पूर्ण करू शकेल.''

**ब) मराठी साधने :**

मराठ्यांच्या कालखंडातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व प्रशासकीय इतिहास समजून घेताना

समकालीन मराठी साधने अत्यंत उपयुक्त ठरतात. १७०७ साली मराठ्यांचा स्वातंत्र्यसंग्राम संपुष्टात आल्यानंतर मराठी सत्तेचे स्वरूपच बदलत गेले. १७०७ ते १८१८ या काळात पेशव्यांचे महत्त्व वाढले होते. त्यासंदर्भातील माहिती देणारी बरीच साधने उपलब्ध होतात. त्यामध्ये पेशवे दप्तर, इतिहासाचार्य राजवाडे यांनी संपादित केलेले खंड, रोजनिशा, बखर वाङ्मय, ताराबाईकालीन कागदपत्रे, जिजाबाईकालीन कागदपत्रे इत्यादींचा समावेश होतो.

ब्रिटीश काळात मराठा इतिहास लेखनास चालना मिळाली. कारण पाश्चात्य संशोधकांनी इतिहासाची अनेक कागदपत्रे एकत्र केली. त्यापैकी ग्रॅन्ट डफ याने मराठ्यांचा इतिहास प्रथमच तीन खंडात लिहून काढला. या इंग्रज रेसीडेंटचा ग्रंथ वाचून भारतीयांना लिखानाची प्रेरणा मिळाली. त्यातूनच अनेक भारतीयांनी ऐतिहासिक कागदपत्रे शोधून ग्रँट डफच्या लिखानातील चूक शोधून त्या पुराव्यासह दाखवून दिल्या. राजवाडे, सरदेसाई, खरे यांनी अस्सल कागदपत्रांच्या आधारे सत्य इतिहास लिहिण्याची एक नवी परंपरा सुरू केली.

**१) पेशवे दप्तर :**

पेशवा बाळाजी विश्वनाथ ते दुसरा बाजीराव ही साधारणपणे एक शतकाची परंपरा असून या काळाची नोंद पेशवे दप्तरामध्ये झालेली आहे. शिवकालोत्तर इतिहासाला म्हणजेच मराठ्यांच्या दुसऱ्या पर्वातील इतिहासाला पुरक व उपयुक्त अशी असंख्य कागदपत्रे या पेशवे दप्तरात आहेत. त्यामुळे ऐतिहासिक साधन या नात्याने पेशवे दप्तराचे फार मोठे महत्त्व आहे. रियासतकार सरदेसाई यांनी पेशवे दप्तरातील कागदपत्रे संकलीत करून ती ४५ खंडातून प्रसिद्ध केली आहेत. इतिहास संशोधन व मराठ्यांच्या इतिहासावर प्रकाश टाकण्याच्या दृष्टीने त्यांची ही कामगिरी अत्यंत महत्त्वाची आहे.

मराठ्यांच्या इतिहासावर प्रकाश टाकणाऱ्या सरदेसाई यांचे ४५ खंड पुढीलप्रमाणे -

१) उदगीरची लढाई (१७६०)

२) पानिपतचे युद्ध (१७६१)

३) शाहुंची जंजीरा मोहिम (१७३३ ते १७३६)

४) आनंदीबाई (सप्टे, १७८६ ते ऑक्टो १७८८)

५) बारभाईचे कारस्थान

६) रामराजाचा सत्तासंघर्ष

७) शाहू व बाळाजी विश्वनाथ यांच्या प्रारंभीच्या हालचाली.

८) शाहूंचे खाजगी (वैयक्तिक) जीवन

९) बाजीराव व त्यांचे घराणे (१७२० ते १७४०)

१०) निझाम व बाजीराव संघर्ष

११) शाहू व कोल्हापूरचा संभाजी यांचे संबंध

१२) दाभाडे व गुजराथ मोहिम

१३) माळवा व बुंदेलखंडात बाजीरावाचा प्रवेश

१४) मराठ्यांच्या मोहिमा

१५) बाजीरावाची दिल्ली मोहिम

१६) वसई मोहिम

१७) शाहू व बाजीराव यांचे प्रशासन

१८) शाहू व पेशव्यांचे खाजगी जीवन

१९) पेशवे माधवराव व रघुनाथराव

२०) नागपूरकर भोसले

२१) बाजीराव व उत्तरेकडील राजकारण

२२) पेशव्यांच्या रोजनिशीतील उतारे

२३) बाळाजी बाजीरावाचे प्रशासन

२४) पश्चिम किनाऱ्यावरील पेशव्यांच्या हालचाली

२५) निजाम व बाळाजी बाजीराव (१७४० ते १७६१)

२६) ताराबाई आणि संभाजी (१७३८ ते १७६१)

२७) बाळाजीच्या उत्तरेकडील हालचाली (१७४२ ते १७६१)

२८) बाळाजी बाजीराव कर्नाटकातील हालचाली.

२९) माधवराव पेशव्यांच्या उत्तरेकडील हालचाली.

३०) शाहू व पहिल्या दोन पेशव्यांची पत्रे.

३१) जमाव दप्तरातील निवडक कागदपत्रे

३२) पेशव्यांचे खाजगी जीवन (उत्तरकाळ)

३३) शाहूंची जंजीरा मोहिम (पुरवणी)

३४) वसईची मोहिम (पुरवणी)

३५) इंग्रजांचा साष्टी विजय (१७७४)

३६) पहिले इंग्रज-मराठा युद्ध (१७७४ ते १७८३)

३७) माधवरावांच्या कर्नाटक मोहिमा

३८) माधवराव आणि निजाम (१७६१ ते १७७२)

३९) माधवरावांची प्रशासनविषयक कागदपत्रे (१७६१ ते १७७२)

४०) बाळाजीची संकिर्ण कागदपत्रे.

४१) मराठी सत्तेचे अखेरचे दिवस (१७७९ ते १८१८).

४२) साताऱ्याच्या प्रतापसिंहांची कागदपत्रे.

४३) काही ऐतिहासिक घराणी

४४) मराठ्यांच्या प्रशासनाबाबतची कागदपत्रे.

पेशवे दप्तरामध्ये बाळाजी विश्वनाथांच्या कामगिरीवर प्रकाश टाकणारी कागदपत्रे फारशी नसली तरी नंतरच्या पेशव्यांची व त्यांच्या करकीर्दिची इथभूत माहिती देणारी असंख्य कागदपत्रे उपलब्ध आहेत. त्यामुळे पेशवेकालीन मराठ्यांच्या इतिहासावर प्रकाश टाकण्यासाठी पेशवे दप्तर हा सर्वात मोठा दप्तरखाना होय. कारण यामध्ये अनेक प्रकारची माहिती उपलब्ध आहे. यापैकी शाहू दप्तर अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. शिवाय जमाव दप्तरामध्येही अनेक गाववार दप्तरे सापडतात. एकूणच मराठ्यांचा इतिहास समजून घेण्याच्या अनुषंगाने पेशवे दप्तराचे महत्त्व अनन्यसाधारण असेच आहे.

**२) राजवाडे यांची कागदपत्रे :**

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचे इतिहास संशोधनातील कार्य खूपच महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी मराठा इतिहास संशोधन कार्यात स्वत:ला वाहून घेतले होते. अस्सल कागदपत्रे गोळा करण्यासाठी त्यांना खूपच भटकंती व कष्ट सहन करावे लागले. त्यांनी हजारो अस्सल कागदपत्रे जमवून त्यांची चिकित्सा केली आहे. मराठ्यांच्या इतिहासावर प्रकाश टाकणारी असंख्य संदर्भ साधने त्यांनी गोळा केली. राजवाडे यांनी ''मराठ्यांच्या इतिहासाची साधने'' या नावाने २२ खंड प्रसिद्ध केले आहेत. त्यापैकी बरेच खंड पेशवेकालीन मराठ्यांच्या इतिहास अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. खंड एक मध्ये एकूण ३०४ कागदपत्रे असून ती १७५० ते १७६१ पर्यंतच्या काळाची माहिती देणारी आहेत. खंड दोन मध्ये बाळाजी विश्वनाथ, बाजीराव व बाळाजी बाजीराव या पहिल्या तीन पेशव्यांच्या विषयी म्हणजेच १८१३ ते १७६१ या कालखंडाविषयी ऐतिहासिक माहिती देणारी कागदपत्रे संकलीत करण्यात आली आहेत. खंड तीन व पाच मध्ये इ.स. १७०० ते १७६१ या काळातील महत्त्वाची पत्रे संग्रहीत केलेली आहेत. खंड सहामध्ये पुरंदरे, हिंगणे या मराठा सरदारांच्या संबंधातील कागदपत्रे आहेत. खंड सातमध्ये दुसरा बाजीराव व दौलतराव शिंदे यांच्या बद्दलची विश्वसनीय माहिती देणारी कागदपत्रे आहेत. खंड दहामध्ये पेशवे माधवराव, सवाई माधवराव आणि दुसरा बाजीराव म्हणजेच १७६१ ते १८१८ या काळाची माहिती देणारी कागदपत्रे संकलित करण्यात आली आहेत. खंड पंधरामध्ये मराठी सत्तेला महत्त्वपूर्ण

योगदान देणाऱ्या सहा मराठा सरदार घराण्यांची माहिती देणाऱ्या कागदपत्रांचा समावेश आहे. तर खंड २० व २१ मध्येही महत्त्वाच्या सरदार घराण्याबद्दलच माहिती देणारी कागदपत्रे संकलित करण्यात आली आहेत. या सर्व खंडांतील महत्त्वाच्या कागदपत्रावर आपणास मराठ्यांच्या इतिहासावर चांगला प्रकाश टाकता येतो. बा. प्र. मोडक यांनी कोल्हापूर प्रांताचा इतिहास, कोल्हापूर राज्याचा इतिहास या ग्रंथांचे लेखन केले आहे. डॉ. आप्पासाहेब पवार हे शिवाजी विद्यापीचे पहिले कुलगुरु. त्यांनी 'ताराबाईकालीन कागदपत्रे' खंड १ ते ३ व जिजाबाईकालीन कागदपत्रे संपादित केली. तसेच स. मा. गर्गे यांनी करवीर रियासतीची कागदपत्रे खंड १ ते ४ संपादन व करवीर रियासत ग्रंथांचे लेखन केले. याशिवाय मा. वि. गुजर यांनी संपादित केलेली 'करवीर छत्रपती घराण्याच्या इतिहासाची साधने' खंड १ ते ८ यामुळे मराठ्यांच्या इतिहासावर प्रकाश टाकता येतो.

**३) रोजनिशा व दप्तर :**

मराठ्यांचा इतिहास अभ्यासण्यासाठी रोजनिशा महत्त्वांच्या ठरतात. यामध्ये छत्रपती शाहूंची रोजनिशी, पेशव्यांच्या रोजनिशा, पुरंदरे दप्तर, बावडा दप्तर इत्यादींचा समावेश होतो.

i) **शाहूंची रोजनिशी :**

रावबहादूर गणेश चिमाजी वाड यांनी छत्रपती शाहूंची रोजनिशी संपादित केली असून त्यातून छत्रपती शाहूकालीन मराठ्यांचा इतिहास जाणून घेण्यास खूपच मोलाची मदत होते.

ii) **पेशव्यांच्या रोजनिशा :**

पेशव्यांच्या रोजनिशामधील अनेक महत्त्वाचे उतारे रावबहादूर गणेश चिमाजी वाड यांनी संकलित केले आहेत. त्यामधून पेशवेकालीन इतिहास समजून घेण्यासाठी अतिशय उपयुक्त माहिती मिळते.

iii) **पुरंदरे दप्तर :**

इतिहास संशोधक कृ. वा. पुरंदरे यांनी पुरंदरे दप्तर संपादित केले असून यामध्ये ऐतिहासिक पुरंदरे घराण्याविषयी माहिती मिळते. पेशवेकाळात हे घराणे होवून गेल्यामुळे पुरंदरे घराण्याबरोबरच पेशवाईचा इतिहासही जाणून घेण्यासाठी या साधनांचा चांगलाच उपयोग होतो.

iv) **बावडा दप्तर :**

या दप्तराचे संपादन इतिहास संशोधक केशव गोविंद सबनीस यांनी केलेले असून यामध्ये रामचंद्रपंत अमात्य यांच्या घराण्याविषयीची माहिती आहे. राजवाडे यांच्या २२ खंडांपैकी ८ वा खंड म्हणजेच हे अमात्यांचे दप्तर होय. याशिवाय तळबीड दप्तरातून तळबीड येथील मोहिते घराण्याची माहिती मिळते. यादव दप्तरातून कोल्हापूरातील सरदार यादव घराण्याची माहिती मिळते.

**४) बखर वाङ्मय :**

बखर हा एक वाङ्मयीन प्रकार आहे. म्हणून बखरींना केवळ ऐतिहासिक दृष्टीकोनच नव्हे तर वाङ्मयीन दृष्टीनेही महत्त्व आहे. बखर वाङ्मयामध्ये हकिकती, कैफियती, आत्मवृत्त, ऐतिहासिक स्त्री-पुरुषांची चरित्रे यांच्या

आख्यायिका इत्यादींचा समावेश होतो. बखरीचे लेखन प्रामुख्याने मराठ्यांच्या काळात झाले असले तरी त्याची परंपरा पुरातन आहे. स्वराज्य स्थापनेपासून ते पेशवाईच्या शेवटपर्यंत अनेक बखरींचे लेखन झाले आहे. बखरीचा मुख्य हेतू इतिहास कथन करणे हा असतो. बखरींच्या अस्सलपणाबद्दल मार्मिक विवेचन करताना इतिहासाचार्य राजवाडे म्हणतात की, ''या बखरी बऱ्याच विश्वसनीय असतात. पण असे असले तरी त्यांच्या विश्वासनियतेला काही मर्यादाही असतात. कारण अस्सल कागदपत्रे मिळाली असता, यातील खुलासेवार मजकूरात बरीच तफावत दिसून येते असे आढळून आले आहे. तरीही अस्सल कागदापत्रांच्या अभावी या बखरींवर बराच विश्वास ठेवण्यास हरकत नाही.''

शिवकाळाच्या तुलनेत पेशवेकाळात बखर वाङ्मय हा प्रकार अल्प प्रमाणात आढळतो. पण असे असले तरीही पेशवेकालीन मराठ्यांच्या इतिहासाची माहिती देणाऱ्या काही बखरी उपलब्ध अहेत. यामध्ये ''भाऊसाहेबांची बखर'' अतिशय महत्त्वाची असून तिच्या आधारे तिसरा पेशवा बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे यांच्या काळातील बरीच माहिती मिळते. तर रघुनाथ यादव यांनी ''पानिपतची बखर'' लिहिली. पानिपतचा रणसंग्राम मराठ्यांच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाची घटना असल्याने तिची माहिती घेण्याच्या दृष्टीने ही पानिपत बखर विशेष महत्त्वाची ठरते. कारण या बखरीतून पानिपतच्या रणमैदानावरील मराठ्यांच्या कामगिरीवर चांगलाच प्रकाश पडतो. नाना फडणीसाने लिहिलेल्या ''पानिपतचा वृत्तांत'' यातूनही पानिपतच्या युद्धातील महत्त्वपूर्ण घडामोडींची सविस्तर माहिती आलेली आहे. याशिवाय काशीराजाने लिहिलेल्या बखरीमधूनही पेशवेकालीन इतिहासाची उपयुक्त माहिती मिळते. तसेच थोरले शाहू महाराज यांची बखर पेशव्यांची बखर, भट पेशवे घराण्याची हकिकत, होळकरांची कैफियत इत्यादी बखरींच्या माध्यमातून आपणास पेशवेकाळावर ऐतिहासिक प्रकाश टाकता येतो.

**क) फारसी साधने :**

मध्ययुगीन भारताचा पर्यायाने मराठ्यांचा इतिहास समजून घेण्यासाठी फारसी भाषेतील साधने महत्त्वाची ठरतात. कारण फारसी ही मुघल दरबारी भाषा होती. बऱ्याच मुघल सत्ताधिशांनी आपल्या दरबारात इतिहासकार ठेवून लेखन करून घेतले आहे. शिवाय काही अधिकाऱ्यांनीही तत्कालीन प्रसंगांचा इतिहास लिहून ठेवला आहे. तेव्हा या मोगली सत्ता व मराठे यांचा एकमेकांशी आलेला संबध, झालेल्या हालचाली समजून घेण्यासाठी फारसी साधनांचा उपयोग होतो. या साधनांमध्ये एकाकीपणा, काल्पनिकता, कालविपर्यास, पक्षपातीपणा, चूकीच्या घटनांची नोंद आणि महत्त्वाच्या घटनांकडे केलेले जाणीवपूर्वक दुर्लक्ष इत्यादी दोष असले तरी परकीयांच्या दृष्टीकोनातून मराठ्यांचा इतिहास समजून घेण्यासाठी ही साधने निश्चितच मोलाची ठरतात.

**१) तारीखे इरादतखाना :**

हा ग्रंथ मीर मुबारक उल्ला याने लिहिला आहे. या ग्रंथात मोगल सम्राट फरुखसियरपासून ते सम्राट शहाआलमपर्यंतच्या छाप्यात घडलेल्या दक्षिण भारतातील अनेक घडामोडींची माहिती दिलेली आहे. विशेष करून मराठ्यांना नेहमीच उपद्रव देणारा निजाम-उल्क-मुल्क, सय्यद हुसेन याच्या दक्षिणेतील हालचालींवर या ग्रंथामधून चांगलाच प्रकाश पडतो. कॅप्टन स्कॉट यांनी या ग्रंथाचे इंग्रजी भाषांतर केले आहे.

**२) मिराते अहमदी :**

मिराते अहमदी हा ग्रंथ अली मुहमदखान याने इ.स. १७४८ साली लिहिला. अली महमदखान हा मोगल काळात गुजराथ प्रांताचा दिवाण होता. त्याने आपल्या ग्रंथात गुजराथचा इतिहास कथन केला आहे. तसेच मराठ्यांनी गुजरातवर केलेल्या स्वाऱ्यांचा उल्लेख या ग्रंथात आढळतो.

**३) सियार उल मुतख्खारीन :**

सय्यद गुलाम हुसैन याने इ.स. १७८२ च्या सुमारास हा ग्रंथ लिहिला असून मराठ्यांच्या इतिहासातील तो उपयुक्त ठरतो. छत्रपती शाहू व महाराणी ताराबाई यांच्यातील संघर्षाची माहिती या ग्रंथात दिली आहे. याशिवाय निझाम, सय्यद अली आणि मराठे यांच्या दक्षिणेतील राजकारणाबद्दलचीही बरीच महत्त्वपूर्ण माहिती या ग्रंथात सापडते.

वरील साधनांचा विचार करता पेशवेकालीन इतिहासाला उपयुक्त असणारी फारसी भाषेतील साधने शिवकालीन फारसी साधनांच्या तुलनेत फारच कमी प्रमाणात असल्याचे दिसून येते. पण जी उपलब्ध आहेत त्यांचा पेशवेकालीन इतिहासावर प्रकाश टाकण्यासाठी उपयोग होतो. शिवाय ही साधने समकालीन असल्याने अधिक महत्त्वाची ठरतात.

**● स्वयंअध्यन प्रश्न – २**

**अ) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१) ............. याने विश्वगुणदर्शन हा संस्कृत ग्रंथ लिहिला.

अ) व्यंकट धावरी ब) केशव पंडीत क) परमानंद ड) यापैकी नाही.

२) .............. ही मोगल दरबारची भाषा होती.

अ) मराठी ब) फारसी क) इंग्रजी ड) संस्कृत

३) मिराते अहमदी हा ग्रंथ ................ यांनी लिहिला.

अ) मुहम्मदखान ब) सय्यद गुलाम हुसैन क) मुबारक उल्ला ड) ग्रँड डफ

४) .............. यांनी पानिपतची बखर लिहिली.

अ) गणेश वाड ब) रघुनाथ यादव क) वि. का. राजवाडे ५) कृष्णाजी सभासद

५) ............ यांनी मराठ्यांच्या इतिहासाची साधने या नावाने २२ खंड प्रसिद्ध केले आहेत.

अ) वि.का. राजवाडे ब) वा. सी. बेंद्रे क) रियासतकार सरदेसाई ड) पांडुरंग पिसुर्लेकर

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) राजाराम चरितम् या ग्रंथाचा लेखक कोण आहे.

२) बखरींचा मुख्य हेतू कोणता असतो.

३) तारीखे इरादतखाना हा फारशी ग्रंथ कोणी लिहिला.

४) शाहूंची रोजनिशी कोणी संपादित केली आहे.

५) ताराबाईकालीन कागदपत्रे कोणी संपादित केली आहेत.

**१.२.३ परकीय भाषेतील साधने :**

मराठ्यांच्या इतिहासाची विविध साधने विखुरलेल्या स्वरूपात आढळतात. हे ऐतिहासिक सत्य मानावे लागते की, मराठ्यांनी इतिहास निर्माण केला परंतु इतिहास लिहिला नाही. त्यामुळे मराठ्यांचे पराक्रम, प्रशासन, आर्थिक व्यवहार इत्यादींची माहिती मराठी साधनांमधून अतिशय त्रोटक स्वरूपात मिळते. म्हणजेच कागदपत्रे जपून ठेवावीत, तपशीलवार घटना लिहून ठेवाव्यात किंवा शास्त्रशुद्ध इतिहास लिहून काढावा हे झाले नाही. हा मराठ्यांचा एक दोषच मानावा लागेल. परिणामी आपणास आपल्याच इतिहासावर प्रकाश टाकण्यासाठी व समजून घेण्यासाठी परकीयांच्या कागदपत्रांवर व लिखानावर अवलंबून किंवा विसंबून राहावे लागते. मराठी सत्तेच्या स्थापनेपूर्वीच पोर्तुगीज, डच, फ्रेंच, इंग्रज यासारख्या युरोपीयन (परकीय) सत्ता भारतामध्ये व्यापारासाठी आल्या होत्या. भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर त्यांनी आपल्या वखारी स्थापन केल्या होत्या. पुढे मराठ्यांनी कोकणचा प्रदेश आपल्या ताब्यात घेतल्यानंतर त्यांचा पाश्चिपात्य सत्तांबरोबर संबंध आला. युरोपीयन व्यापारी व त्यांचा स्थानिक सत्तांशी येणारा संबध यांची बरीच माहिती त्यांच्या कागदपत्रांमधून मिळते. कारण युरोपीयनांच्या भारतातील वखारी व त्यांच्या मायदेशातील सरकार व कार्यालये यांच्यात नियमितपणे पत्रव्यवहार चालत असे. तो पत्रव्यवहार आजही उपलब्ध होत असून ती मराठ्यांच्या इतिहासावर प्रकाश टाकण्यासाठीची अत्यंत उपयुक्त ठरतात. अशा विविध युरोपीयन किंवा परकीय सत्तांपैकी इंग्रजी व पोर्तुगीज यांच्या भाषेतील साधनांचा आपण आढावा घेणार आहोत.

**१) इंग्रजी भाषेतील साधने :**

सतराव्या शतकात इंग्रज व्यापारासाठी भारतात आले व त्यांनी भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर आपल्या वखारी स्थापन केल्या. त्या वखारींना प्रेसिडेन्सी हाऊस असे म्हणत असत. इंग्लीश ईस्ट इंडिया कंपनीच्या भारतात मुंबई, सुरत, राजापूर, कारवार, मद्रास, कलकत्ता इत्यादी ठिकाणी वखारी होत्या. प्रत्येक वखारीच्या प्रशासनासाठी प्रेसिडेंट आणि त्यांचे कौन्सिल होते. तर भारतातील या सर्व वखारींवर नियंत्रण ठेवण्यासाठी लंडन येथे इंडिया ऑफीस कार्यरत होते. भारतातील वखारींच्या नियमितपणे सभा होत असून त्यांची इतिवृत्ते लिहून ठेवण्याची पद्धत होती. भारतातील वखारी आपला सर्व वृत्तांत इंग्लंडमधील संचालकांना कळवित असत. वखारींचा वृत्तांत, मंडळांच्या बैठकीतील विविध ठराव, अधिकाऱ्यांचे स्वतंत्र पत्रव्यवहार, अधिकाऱ्यांच्या रोजनिशा यामध्ये मराठ्यांच्या हालचाली, मराठ्यांच्या मोहिमा व राजकारण याविषयी अतिशय उपयुक्त व महत्त्वपूर्ण माहिती मिळते. इंग्रज व्यापारी व अधिकारी अशी माहिती गोळा करत असत. कारण त्यांच्या व्यापाराच्या संरक्षणाच्या दृष्टीने तसे करणे त्यांना आवश्यक होते. त्यांच्या या कागदपत्रातून मराठ्यांचा तपशीलवार इतिहास लिहिण्यास व समजून घेण्यास खूपच मदत होते.

इंग्रजी भाषेतील असंख्य कागदपत्रे इंडिया ऑफीसमधील दप्तरखान्यात जतन करून ठेवण्यात आलेली आहेत. इंडिया ऑफीसमधील कागदपत्रांचे फॅक्टरी रेकॉर्ड व प्रेसिडेन्सी रेकॉर्ड असे वर्गीकरण करण्यात आले आहे. यापैकी वखारींच्या स्थापनेपासून ते १७०८ पर्यंतचा पत्रव्यवहार फॅक्टरी रेकॉर्डस् या नावाने ओळखला जातो. तर त्यानंतरच्या काळातील कागदपत्रे प्रेसिडेन्सी रेकॉर्डस् या नावाने ओळखली जातात. फॅक्टरी रेकॉर्डस्मध्ये मुंबई, कलकत्ता, सुरत इत्यादी वखारींची कागदपत्रे स्वतंत्रपणे ठेवलेली आहेत. त्यामधून मराठ्यांच्या इतिहासाची बरीच माहिती मिळते.

लंडन, कलकत्ता, मद्रास, मुंबई इत्यादी ठिकाणी असणाऱ्या सरकारी दप्तरखान्यात कंपनीची लक्षावधी कागपत्रे उपलब्ध आहेत. मुंबई येथील सरकारी दप्तरखान्यातही मराठ्यांच्या इतिहासाविषयी कागदपत्रे मोठ्या संख्येने पहावयास मिळतात. वरील ठिकाणच्या इंग्रजी दप्तरखान्यात उपलब्ध होणाऱ्या कागदपत्रांमधून मराठ्यांचा राज्यकारभार, व्यापार, अधिकारी, पराक्रम, युद्धमोहिमा, इतर सत्तांशी आलेले संबंध, संघर्ष, मराठी सत्तेचा अखेरच्या पर्वातील इंग्रजांचा मराठ्यांच्या राजकारभारातील अंतर्गत यादवी इंग्रजांशी झालेले तह, करार, इंग्रज-मराठे युद्धे (संघर्ष) मराठ्यांच्या सत्तेत पदांसाठी चाललेला संघर्ष यासारख्या बारीक सारीक गोष्टींची महत्त्वपूर्ण माहिती मिळते. इंग्रजी साधनांमध्ये अप्रत्यशित साधनेही बरीच आहेत. त्यामध्ये वखारींच्या खाजगी पत्रव्यवहाराशिवाय स्थानिक व हिंदुस्थानातील इतर काही भागातील परिस्थितीची वर्णने केलेले अहवाल आहेत. प्रत्येक वखारीतील रोजनिशी, तह व करारनामे, याद्या यांचाही मराठ्यांच्या इतिहास लेखनासाठी फारच उपयोग होतो. शिवाय तंजावर येथील सरस्वती महाल ग्रंथालय व मद्रास येथील मेकॅसी संग्रह सुद्धा मराठ्यांचा इतिहास लिहिण्यासाठी उपयुक्त माहिती पुरवितात.

लंडनमधील इंडिया ऑफीसमधील शेकडो कागदपत्रांचे उतारे इतिहासकार वा. सी. बेंद्रे यांनी नक्कल करून आणले आहेत. त्या कागदपत्रांचे २० ते २२ अप्रत्यक्षित खंड असून ते भारत इतिहास संशोधन मंडळाच्या ग्रंथालयात जतन करून ठेवण्यात आलेले आहेत. या अप्रत्यक्षित, खंडातील उताऱ्यावरून आपना मराठ्यांच्या इतिहाससंबंधीची अत्यंत उपयुक्त व खूप माहिती मिळते. याशिवाय पेशवाईतील महत्त्वाच्या विविध राजकीय घडामोडींचे दर्शन घडविणारे काही इंग्रजी ग्रंथही रचले गेलेले आहेत. त्यांचाही मराठ्यांच्या इतिहासावर प्रकाश टाकण्यासाठी उपयोग होतो. फ्रँकलीन नावाच्या लेखकाने मोगल सम्राट शहाआलमच्या कारकिर्दीचा इतिहास लिहिलेला आहे. त्याच्या या ग्रंथामध्ये सम्राट शहाआलमच्या माहिती बोबरच मराठ्यांच्या राजकारणावर प्रकाश टाकणारी मोलाची माहिती मिळते. ईस्ट इंडिया कंपनीचा एक अधिकारी अलेक्झांडर डाऊ यानेही हिंदुस्थानचा इतिहास तीन खंडात लिहिला आहे. त्यामध्ये पेशवेकालीन म्हणजेच मराठ्यांच्या अखेरच्या पर्वातील अत्यंत उपयुक्त माहिती उपलब्ध होते. याच ग्रंथात मराठ्यांच्या इतिहासात अतिशय महत्त्वपूर्ण ठरलेल्या तिसऱ्या पानिपतच्या युद्धाबद्दलची सविस्तर वर्णने आलेली आहेत. त्यामुळे पानिपतचा रणसंग्राम समजून घेताना त्याच्या या ग्रंथाचा निश्चितच उपयोग होतो. ब्रिटीश राजवटीत एल्फिन्स्टन, ग्रँड डफ इत्यादी लेखकांनीही हिंदुस्थानचा इतिहास लिहून काढला आहे. त्यांचाही मराठ्यांच्या इतिहासाचे साधन म्हणून विचार करता येतो.

इंग्रजी साधनांचा उपयोग करताना आपणास बऱ्याच गोष्टींबद्दल सावधगिरी बाळगावी लागते. इंग्रजी

पत्रांमधील माहिती समकालीन इतिहासाच्या दृष्टीने फारच महत्त्वाची आहे. परंतु त्यामध्ये गावाच्या व नावाच्या बऱ्याच चुकाही आढळतात. कित्येक ठिकाणी तर त्यांचे लिहिणे अगदी दुर्बोध झाले आहे. याशिवाय मराठ्यांच्या चालीरिती इंग्रजांच्या चांगल्या आंगवळणी न पडल्याने त्यांच्या पत्रातून साध्या साध्या गोष्टींचा हास्यास्पद विपर्यास केलेला आढळतो. थोडक्यात इंग्रजी भाषेतील साधनांमध्ये जरी समकालिनता असली तरी त्यातील हेतू व परिस्थिती याची नीट छाननी केल्याशिवाय इतिहासलेखनासाठी उपयोग करणे योग्य ठरणार नाही. पण असे असले तरी इंग्रजी साधनांची उपयुक्तता सांगताना वा. सी. बेंद्रे असे म्हणतात की, ''बारकाईने माहिती मिळवून ती तपशीलवार व क्रमवार सांगण्याची व लिहिण्याची इंग्रज लोकांची पद्धती शास्त्रशुद्ध आहे. इंग्रज दप्तरांमधील समकालीन साधने अस्सल स्वरूपाची आहेत.''

कोल्हापूर राज्यासंबंधीची अनेक कागदपत्रे कोल्हापूर पुराभिलेखागारात आहेत. याशिवाय मेजर ग्रॅहमचा Statistical Report on the Principality of Kolhapoor, आर. व्ही. सबनीस यांचे Notes on Kolhapur, मनोहर माळगावकर यांचे Chhatrapati of Kolhapur या ग्रथांमधून कोल्हापूर राज्याची माहिती मिळते. यातील मेजर ग्रॅहम हे कोल्हापूर राज्याचे पहिले पोलिटिकल सुपरिटेंडेंट सन १८४५ ते १८५३ या काळात होते. त्यांनी कोल्हापूर राज्यातील सर्व प्रकारची माहिती गोळा करून रिपोर्ट तयार केला. यामध्ये कोल्हापूर राज्याचे राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक जीवन समजावून घेता येते.

**२) पोर्तुगीज भाषेतील साधने :**

हिंदुस्थानच्या राजकारणात भाग घेऊन आपल्या राज्याची स्थापना करणारे पोर्तुगीज हे पहिले युरोपीयन होते. पोर्तुगीज खलाशी वास्को-दि-गामा याने भारताकडे येणारा जलमार्ग शोधून काढल्यानंतर मोठ्या प्रमाणात पोर्तुगीज व्यापारी भारताकडे येऊ लागले. सोळाव्या शतकांमध्येच त्यांनी भारताच्या सभोवतालच्या समुद्रावर आपले वर्चस्व निर्माण केले. त्यामुळे प्रारंभी अरबी समुद्रात संचार करण्यासाठी त्यांचा परवाना घ्यावा लागत असे. भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर महाराष्ट्रालगत असणाऱ्या गोवा, वसई, दिव, दमण, साष्टी, बारदेश इत्यादी प्रदेशावर त्यांनी आपली सत्ता प्रस्तापित केली होती. मराठ्यांचे हे जवळचे शेजारी होते. शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याच्या सीमा पोर्तुगीजांच्या सरहद्दीपर्यंत पोहोचल्यानंतर मराठ्यांचा पोर्तुगीजांशी संबंध आला. त्यामुळे त्यांच्या कागदपत्रात मराठ्यांच्या राजकारणाचे पडसाद उमटणे स्वाभाविकच होते. सुरूवातीला त्यांचे संबंध सौहादार्याचे होते. कारण शिवाजी महाराजांनी मराठ्यांच्या आरमाराची उभारणी करत असताना पोर्तुगीज तंत्रज्ञानाची मदत घेतली होती. पण पुढील काळात हे संबंध बिघडले. त्याचे मुख्य कारण म्हणजे पोर्तुगीजांचे कडवे धार्मिक धोरण व त्यांनी जबरदस्तीने धर्मप्रसाराचा केलेला प्रयत्न होय. हिंदुस्थानातील गोवा आणि पोर्तुगालमधील लिस्बन येथील दप्तखान्यात मराठ्यांच्या इतिहासाशी संबंधीत हजारो कागदपत्रे आहेत. त्यामध्ये पोर्तुगीज व्हाईसरॉयने आपल्या राजास लिहिलेली पत्रे, मराठा मोगल सरदारांना लिहिलेली पत्रे, आपल्या मंडळातील विविध ठराव, मासिक व वार्षिक अहवाल, पोर्तुगीज राजाकडून व्हाईसरॉयला आलेली पत्रे इत्यादींचा समोवश होतो.

गोवा दप्तर हे ऐतिहासिक साधनांचे अत्यंत महत्त्वाचे व फार मोठे आगार आहे. या दप्तराची व्यवस्था नीट

ठेवण्यात आली असून त्याचे फेरिस्त करण्यात आले आहेत. या साधनांचा अभ्यास करून इतिहास संशोधक डॉ. पांडुरंग विसुर्लेकर यांनी पोर्तुगीज भाषेत मराठ्यांच्या इतिहासावर अनेक ग्रंथ लिहिले आहेत. त्यांचा पुणे विद्यापीठाने प्रकाशित केलेला ''पोर्तुगीज-मराठा संबंध' हा मराठीतील ग्रंथ अतिशय महत्त्वाचा आहे. तसेच गोव्याचे पुराणवस्तू संशोधन विभागाचे प्रमुख ब्रागास परेश यांनी पोर्तुगीज कागदपत्रांचे अनेक खंड प्रकाशित केले आहेत. त्यांचा मराठी अनुदान महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने ''मराठ्यांच्या इतिहासाची साधने- पोर्तुगीज दप्तर'' या नावाने दोन ग्रंथात प्रसिद्ध केला आहे. हा अनुवाद प्रसिद्ध पोर्तुगीज पंडीत व संशोधक श्री. स. शं. देसाई यांनी केला आहे. शिवाय शिवाजी विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या ''ताराबाई कालीन कागदपत्रे'' या साधन ग्रंथातही श्री. देसाई यांनी अनुवादीत केलेली अनेक पोर्तुगीज पत्रे छापलेली आहेत. त्यामुळे मराठ्यांच्या इतिहासाचा अभ्यास अधिक सखोलपणे करता येतो.

पोर्तुगीज साधने पोर्तुगालची राजधानी लिस्बन व एव्होरा येथे मोठ्या प्रमाणात जतन करून ठेवण्यात आलेली आहेत. पैकी एव्होरांच्या ''पब्लीक लायब्ररी'' मध्ये बराच संग्रह उपलब्ध आहे.या संग्रहातून रिव्हेरा यांनी ''अर्काइव्ह पोर्तुगीज ॲरिएंटल'' या नावाने सहा (६) साधन ग्रंथ तयार केले आहेत. तर लिस्बन येथील ''अकॅडेमिक रिअल देस सायान्सिस'' या संस्थेच्याही संग्रहात बरीच इतिहासोपयोगी साधने उपलब्ध आहेत. याशिवाय गोव्यातील पणजी येथील दप्तरखान्यात मराठा-पोर्तुगीज संबंधावर प्रकाश टाकणारे २२ खंड आहेत. गोव्याचा एक पोर्तुगीज अधिकारी कोंदी द लिव्हारेस याने आपली रोजनिशी लिहिली असून त्यामध्ये मराठा सरदार यांच्याविषयी माहिती दिली आहे. तसेच फ्रान्सीस्कू जुझे फ्रैरि, मानुयल आंतोनियु द मैरेलिस, फ्रान्सीस्क रायमुंदू द मोराईस पेरै इत्यादी लेखक, चित्रकार, धर्मप्रसारक यांनी पोर्तुगीज भाषेतून लिहून ठेवलेली माहिती मराठ्यांच्या इतिहास अभ्यासासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. लिस्बन व एव्होरा येथील दप्तरखान्यात पुढील कागदपत्रांचा समावेश होतो.

**i) लिव्हरूश दश मॉसोइश दु रैनु (राज्याची मान्सून पत्रके) :**

पोर्तुगालहून पाठवलेली पत्रे व सर्व प्रकारचा पत्रव्यवहार मान्यता पावसाळ्यात गोव्याला पोहोचत असे. असा पत्रव्यवहार राज्याची मान्सून पत्रके या नावाने ओळखला जातो. या विभागामध्ये सन १५६० ते १९१४ पर्यंतची पत्रे आहेत. अशा कागदपत्रांचे एकूण ४५६ खंड आहेत. ही कागदपत्रे लिस्बन येथे ठेवण्यात आलेली असून त्यातील काही खंड पणजी येथे आहेत.

ii) **लीव्हरूश दुशरैश विझीन्युश (शेजारील राजांची पुस्तके) :**

भारतात पोर्तुगीजांच्या अनेक ठिकाणी वसाहती होत्या. त्या वसाहतीशेजारी असलेल्या सत्ताधिशांना पाठवलेली व त्यांच्याकडून आलेली पत्रे शेजारील राजांची पुस्तके या नावाने जतन केलेली आहेत. सन १६१९ ते १८४२ या काळातील कागदपत्रे या विभागात ठेवण्यात आलेली आहेत. त्याचे २२ खंड आहेत.

iii) **लीव्हरूश दश पझेश ई त्रानादुश दंदरिया (भारताच्या तह व कराराची पुस्तके) :**

भारतातील विविध सत्ताधिशांबरोबर वसाहती शासनाने तह व करार केले होते. अशा तह व करारांची कागदपत्रे ५ खंडात संग्रहित करण्यात आली आहेत.

iv) **असेतुंश दु कॉसन्यु दु इश्तादु (राज्य सल्लागार मंडळाची इतिवृत्ते) :**

भारतात वसाहतीचे प्रशासन पहात असताना सल्लागार मंडळाच्या अनेकवेळा बैठका होत असत. अशा सर्व सभांची इतीवृत्ते पोर्तुगीजांनी ठेवलेली आहेत. त्यांचे एकूण नऊ खंड आहेत. ती सन १६१८ ते १७५० या कालावधीमधील आहेत.

v) **हकूमे तुश आव्हुल खुशरलती व्हुरा (भारताविषयी सुटी कागदपत्रे) :**

वरील मुख्य प्रकारामध्ये समाविष्ठ न झालेली कागदपत्रे पोर्तुगीजांनी भारताविषयी खुली कागदपत्रे या नावाने जतन करून ठेवलेली आहेत.

vi) **कोल्हापूर-पोर्तुगीज संबंध :**

डॉ. शिरोडकर यांनी गोवा येथील पुराभिलेखागारातून मराठ्यांशी संबंधीत कागदपत्रे संकलित केली आहेत. अशा कागदपत्रांच्या खंडाला 'कोल्हापूर-पोर्तुगीज संबंध' असे नाव दिले आहे. यामध्ये सन १६९९ ते १८१० पर्यंतची म्हणजेच छत्रपती राजाराम महाराज यांच्यापासून ते छत्रपती चौथे शिवाजी महाराज यांच्यापर्यंतची कागदपत्रे समाविष्ठ आहेत. याशिवाय डॉ. आप्पासाहेब पवार यांनी कोल्हापूर संबधी काही कागदपत्रांचे डॉ. स. शं. देसाई यांच्याकडून भाषांतर करून गेतले आहे.

मराठे आणि पोर्तुगीज यांच्यात आलेल्या सततच्या संबंधामुळे पोर्तुगीज कागदपत्रात मराठ्यांच्या इतिहासाचे प्रतिबिंब पहावयास मिळते. मराठ्यांनी पोर्तुगीजांशी केलेले तह-करार, त्यांच्यावर केलेल्या कारवाया समजून घेण्यासाठी पोर्तुगीज भाषतील साधने महत्त्वाची ठरतात.

● **स्वयंअध्यन प्रश्न - ३**

**अ) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१) भारताच्या ............. किनाऱ्यावर परकीयांनी आपल्या वखारी स्थापन केल्या.

अ) पूर्व ब) पश्चिम क) दक्षिण ड) उत्तर

२) इंग्रजी भाषेतील असंख्य कागदपत्रे ........... येथे जतन केलेली आहेत.

अ) इंडिया ऑफीस ब) मॅन्चेस्टर क) लिस्बन ड) एव्होरा

३) ............ या इंग्रज लेखकाने मोगल सम्राट शहाआलम याच्या कारकिर्दीचा इतिहास लिहिला आहे.

अ) ऑक्कसीडेन ब) डस्टीक क) फ्रँकलीन ड) ग्रँड डफ

४) ............ हे भारतातील पोर्तुगीजांचे मुख्य ठाणे होते.

अ) मुंबई ब) गोवा क) कलकत्ता ड) मद्रास

५) ........... येथे पोर्तुगीज साधने मोठ्या प्रमाणात जतन करून ठेवण्यात आली आहेत.

अ) लंडन ब) श्रीलंका क) लिस्बन ड) मुंबई.

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) भारतातील ब्रिटीश वखारींवर नियंत्रण ठेवण्यासाठी कोठे इंडिया ऑफीस कार्यरत होते.

२) भारताकडे येणारा जलमार्ग कोणी शोधून काढला.

३) हिंदुस्थानात सत्ता स्थापन करणारे पहिले युरोपीयन कोण होते.

४) पोर्तुगीज-मराठे संबंध या ग्रंथातून पोर्तुगीज साधनांची सविस्तर चर्चा कोणी केलेली आहे.

५) इंडिया ऑफीसमधील शेकडो कागदपत्रांचे उतारे कोणी नक्कल करून ठेवलेले आहेत.

६) Statistical Report on the Principality of Kolhapoor हा ग्रंथ कोणी लिहिला.

## १.४ सारांश :

मध्ययुगीन भारताच्या इतिहासात मराठ्यांच्या सत्तेला विशेष महत्त्व आहे. इस्लामी सत्तांच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी १७ व्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी 'हिंदवी स्वराज्याच्या रूपाने मराठ्यांची सत्ता स्थापन केली. ती पुढे सन १८१८ पर्यंत टिकून होती. मराठी सत्तेचा सुरूवातीचा काळ हा छत्रपतींचा काळ व शेवटचा काळ हा पेशवाईचा काळ म्हणून ओळखला जातो. या दोन्ही कालावधीत मराठ्यांनी आपल्या पराक्रमाचा व राज्यकारभाराचा स्वतंत्र दबदबा निर्माण केला होता. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या उत्कृष्ठ कार्याचा, लोककल्याणकारी राज्यकारभाराचा आदर्श घालून दिला होता. त्यामध्ये मध्ययुगीन भारताच्या इतिहासात मराठ्यांची सत्ता राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि प्रशासकीय अशा विविध पैलुंनी महत्त्वाची ठरते.

कोणत्याही सत्तेचा इतिहास समजून घेण्यासाठी संदर्भ साधनांची आवश्यकता असते. किंबहुना संदर्भ साधनांच्या आधाराशिवाय इतिहास लिहीताच येत नाही. म्हणूनच इतिहासलेखनामध्ये 'No Document, No History" हे सूत्र प्रमाणभूत मानले जाते. इतिहास संशोधक जेवढी जास्त साधने वापरेल तेवढा त्याचा लेखनाचा दर्जा वाढत असतो. म्हणजे विविध ठिकाणी वेगवेगळ्या स्वरूपातील विखूरलेली साधने गोळा करून त्यांचा इतिहास लेखनासाठी वापर करण्याची मुख्य जबाबदारी इतिहास संशोधकाची असते. मराठ्यांच्या इतिहासावरही प्रकाश टाकण्यासाठी विविध साधनांचा आधार घ्यावा लागतो. मराठा इतिहासाच्या संदर्भातील (महत्त्वाची) संदर्भ साधने कोणकोणती असून त्यांचे ऐतिहासिक महत्त्व जाणून घेणे आवश्यक ठरते. भारतीय भाषेतील संस्कृत-मराठी आणि फारशी भाषेतील असंख्य साधनांमधून आपणास मराठ्यांच्या इतिहासावर चांगला प्रकाश टाकता येतो. अनेक कवी व लेखकांनी मराठ्यांच्या व मोगलांच्या दरबारात वास्तव्य करून राज्यकारभाराचा प्रत्यक्ष अनुभव घेतला असल्याने त्यांच्या लेखनग्रंथांना अधिक महत्त्व प्राप्त

होते. याशिवाय इंग्रज व पोर्तुगीज भाषेतील संदर्भ साधनांच्या आधारे मराठ्यांचा इतिहास समजून घेण्यास निश्चित मदत होते.

### १.४. पारिभाषिक शब्दांचे अर्थ :

१) इतिहासकार – इतिहासाचे लेखन करणारा संशोधक

२) संदर्भ साधन – इतिहास लेखनाचा पुरावा किंवा आधार

३) No Document No History - इतिहास लेखनाचे प्रमाण सूत्र.

४) वस्तुनिष्ठा – जे घडले आहे ते सत्य किंवा खरं.

५) अस्सल साधन – घटना (प्रत्यक्ष) घडत असताना निर्माण केलेले साधना किंवा पुरावा.

६) रोजनिशी – दैनंदिन जीवनात घडणाऱ्या घटनांचा तपशील.

७) बखर वाङ्मय – इतिहास कथन करण्यासाठी केलेले काव्यात्मक लिखान.

८) दरबारी भाषा – दरबारात (प्रशासनात) वापरली जाणारी भाषा.

९) वखार – परकीयांचे भारतातील मुख्य ठाणे किंवा सत्ताकेंद्र.

१०) जलमार्ग – पाण्यातून जाणारी वाट किंवा मार्ग.

११) लिस्बन – पोर्तुगालच्या राजधानीचे ठिकाण.

१२) दप्तखाना – महत्वाची कागदपत्रे जतन करून ठेवलेली जागा.

### १.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :

● **स्वयंअध्यन प्रश्न – १**

अ) १) सेनलॉस–लॉगीलॉस २) वस्तुनिष्ठता ३) प्राथमिक
४) ब्रिटीश ५) इंग्लीश

ब) १) पुरावा किंवा संदर्भ साधनांच्या २) संदर्भ साधनावर
४) ग्रंट डफ ४) प्रो. मायकेल स्टॅनफोर्ड ५) इतिहासकार

● **स्वयंअध्यन प्रश्न – २**

अ) १) व्यंकट धावरी २) फारसी ३) मुहमदखान
४) रघुनाथ यादव ५) वि. का. राजवाडे

ब) १) केशव पंडित २) इतिहास कथन ३) मीर मुबारक मुल्ला
४) गणेश चिमाजी बाड ५) रियासतकार सरदेसाई

● **स्वयंअध्यन प्रश्न – ३**

| | | |
|---|---|---|
| अ) १) पश्चिम | २) इंडिया ऑफीस | ३) फ्रँकलिन |
| ४) गोवा | ५) लिस्बन | |
| ब) १) लंडन | २) वास्को-दी-गामा | ३) पोर्तुगीज |
| ४) पांडुरंग पिसुर्लेकर | ५) वा. सी. बेंद्रे | |

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

**अ) टिपा लिहा.**

१) साधनांचे महत्त्व.

२) संस्कृत साधने

३) पेशवे दप्तर

४) राजवाडेंची कागपत्रे

५) रोजनिशा

६) बखर वाङ्मय

७) तारिखे इरादतखाना

८) लिस्बन व एव्होरा येथील कागदपत्रे

९) इंडिया ऑफीस

१०) राजाराम चरितम्

**ब) दिर्घोत्तरी प्रश्न.**

१) इतिहास लेखनातील संदर्भ साधनांचे महत्त्व विषद करा.

२) मराठ्यांच्या इतिहास लेखनासाठी उपयुक्त असणाऱ्या मराठी साधनांची चर्चा करा.

३) फारसी भाषेतील साधनांची माहिती द्या.

४) मराठ्यांच्या इतिहासलेखनातील इंग्रजी भाषेतील साधनांचे महत्त्व व उपयुक्तता सांगा.

५) पोर्तुगीज भाषेतील साधनांवर सविस्तर चर्चा करा.

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची यादी :

१) वि. ग. खोबरेकर, महाराष्ट्रातील दप्तरखाने वर्णन आणि तंत्र, १९६८.

२) आ. व्ही. हेरवाडकर, मराठी बखर, व्हीनस प्रकाशन, मुंबई, १९८६

३) Duff Grand, A Hisotry of Maratha, Vol. I to III, Oxford University Press, Calcutta, 3rd Ed. 1921.

४) Langlosis & Seianbas, An Introduction of the Study of History.

५) H. C. Hockett, The Critical Method in Historical Research & Working, Macmillan Company, New York, 1955.

६) स. मा. गर्गे - इतिहासाची साधने-एक शोधयात्रा.

७) सदाशिव शिवडे, मराठ्यांच्या इतिहासाची संस्कृत साधने.

८) रियातकार सरदेसाई, पेशवे दप्तरातील कागदपत्रे, ४५ खंड.

९) वि. का. राजवाडे, मराठ्यांच्या इतिहासाची साधने, २२ खंड.

१०) पांडुरंग पिसूर्लेकर, पोर्तुगीज दप्तरातील मराठ्यांचा इतिहास (पोर्तुगीज-मराठा संबध)

११) वा. सी. बेंद्रे, साधन चिकित्सा.

१२) कृ. ना. चिटणीस, मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था, ४ खंड.

१३) स. मा. गर्गे - करवीर रियासत.

१४) मा. वि. गुजर - करवीर छत्रपती घराण्याच्या इतिहासाची साधने खंड १ ते ८.

❖ ❖ ❖

## घटक – २

# मराठी सत्तेची राज्य व्यवस्था

**अ) 'राजा' संकल्पना ब) अष्टप्रधान मंडळ**

**क) सत्तांतर – राजा ते पेशवा, पेशवा ते कारभारी**

**अनुक्रमणिका :**


२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ 'राजा' संकल्पना

२.२.२ अष्टप्रधान मंडळ

२.२.३ सत्तांतर–राजा ते पेशवा, पेशवा ते कारभारी

२.३ स्वयं अध्ययन प्रश्न

२.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.५ सारांश

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ संदर्भ ग्रंथ


**२.० उद्दिष्टे :**

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणाला,

- राजपदाची संकल्पना – प्राचीन व मध्ययुगीन काल.
- मराठेकालीन छत्रपतींचे स्थान – अधिकार व कर्तव्ये.
- मराठेकालीन अष्टप्रधान मंडळ.
- अष्टप्रधान मंडळाचा पूर्व इतिहास.
- अष्टप्रधान मंडळाची रचना व कार्य.
- अष्टप्रधान मंडळाची वैशिष्ट्ये.

- सत्तांतर – छत्रपती ते पेशवा, पेशवा ते कारभारी.
- सत्तांतराची कारणे.
- सत्तातरांचे स्वरूप.
- सत्तांतराचे परिणाम.

### २.१ प्रास्ताविक :

छत्रपती शिवाजी महाराजांनी सतराव्या शतकात महाराष्ट्रामध्ये हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. 'हिंदवी स्वराज्या'ची स्थापना ही त्यांचे सर्वात मोठे कार्य होय. इस्लामी सत्तेच्या अधिपत्याखाली महाराष्ट्र असताना सामान्य जनतेमध्ये स्वातंत्र्य व स्वराज्याचे बीज पेरले. जनतेच्याच सहभागातून महाराजांनी स्वराज्य स्थापन केले. शिवाजी महाराजांनी स्वत:ला राज्याभिषेक करून घेऊन महाराष्ट्राला 'छत्रपती' पदाची परंपरा निर्माण केली. मुलकी व लष्करी प्रशासनाची कार्यक्षम यंत्रणा उभी केली. या राज्यकारभार यंत्रणेवर भारतीय आणि महाराष्ट्रीयन संस्कृतीचा प्रभाव होता.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ राजेशाही संकल्पना :

**● प्राचीन काळ :**

भारतामध्ये व त्या अनुषंगाने महाराष्ट्रामध्येही राजेशाहीची परंपरा प्राचीन काळापासून होती. मानव प्राचीन काळी टोळी व्यवस्थेतून समाजव्यवस्थेकडे स्थित्यंतरीत होत गेला व टोळी प्रमुखाकडून राजपदाकडे त्याची वाटचाल झाली. सुरूवातीला प्रजेने आपला राजा निवडला असला तरी नंतर याच राजपदाच्या बाबतीत वंशपरंपरा निर्माण झाली. या व्यवस्थेतून राजेशाही अथवा राजसत्तेचा उदय झाल्याचे दिसून येते. वैदिक वाङ्मयामध्ये राजेशाही निर्मितीची माहिती मिळते. इ. स. पूर्व चौथ्या शतकातील कौटिल्यांच्या 'अर्थशास्त्र' या ग्रंथामध्येही प्राचीन काळातील 'राजा', राजाचे कर्तव्य, अधिकार या संबंधीचे सविस्तर माहिती पहावयास मिळते.

**● मध्ययुग :**

'राजा हा ईश्वराचा अंश' अशी धारणा जनतेची व राजांची प्राचीन काळीच निर्माण झाली होती. ती मध्ययुगीन कालखंडात ही मजबूत होती. राजाने राज्य व राज्यातील सर्व घटकांचे सरंक्षण, पालन पोषण करणे हे त्याचे प्रमुख कर्तव्य होते. त्यासाठी त्याला काही विशेष अधिकारही दिले होते. या अधिकाराच्या आधारेच राजेशाही अनियंत्रित व वंश परंपरागत अशा स्वरूपाची बनली होती. मध्ययुगात भारत आणि अपरिहार्यपणे महाराष्ट्रही मुस्लीम सत्तेच्या वर्चस्वाखाली गेला. तो जात असताना राजकीय संघर्षाबरोबर धार्मिक संघर्षही झाला. मुस्लीम राज्यकर्त्यांनी हिंदू धर्मियांवर अत्याचार केले. धर्मांतर, हिंदू धर्मस्थळे, धर्मग्रंथांची अहवेलना, स्त्रिया

बालवृध्दांवर अत्याचार या घटना इस्लामी राजाश्रयानेच होत होत्या. किंबहुना हेच इस्लामी राजेशाहीचे स्वरूप बनले. काही अपवाद होते पण बहुतांशी स्वरूप याच प्रकारचे होते.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. अन्यायी, अत्याचारी आणि धार्मिक वृतीने ग्रासलेल्या मध्ययुगातील अनियंत्रित हुकूमशाही प्रवृत्तीच्या राजेशाहीच्या पार्श्वभूमीवर महाराजांनी कल्याणकारी आणि धर्मसहिष्णू स्वराज्य स्थापन केले.

**● छत्रपती शिवाजी महाराज :**

मध्ययुगामध्ये मुस्लिम आक्रमकांनी उत्तर हिंदुस्थान पादाक्रांत करून दक्षिण हिंदुस्थानवरही वर्चस्व मिळविले. महाराष्ट्रातील यादवांचे साम्राज्य नष्ट केले. इस्लामी आक्रमकांना विजयनगर साम्राज्यानेही प्रतिकार केला. पण महाराष्ट्रातील यादवांचे राज्य नष्ट झाल्यापासून स्वातंत्र्य सूर्य उगवलाच नव्हता. बहामनी कालखंड व तद् नंतर उत्तर महाराष्ट्रावर निजामशाही तर दक्षिण महाराष्ट्रावर आदिलशाहीचे वर्चस्व प्रस्थापित झाले होते. या काळात महाराष्ट्रात राजे बरेच होते पण ते नावाचेच ! ते इस्लामी सत्तांची जहागिरी मिळवून त्यांची सेवा करण्यातच धन्यता मानत होते.

अशा परिस्थितीमध्ये शहाजीराजे व राजमाता जिजाबाई यांनी महाराष्ट्राला स्वराज्य देण्याचे स्वप्न पाहिले. शिवाजी महाराजांच्या जन्मानंतर त्यांनी नियोजनबध्द परिश्रम घेतले. या परिश्रमाचे फळ म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रामध्ये कल्याणकारी स्वराज्याची निर्मिती केली.

शिवाजी महाराजांनी पुणे येथे येऊन शहाजीराजांचे मार्गदर्शन, जिजाऊंचे संस्कार, सहकार्य व मार्गदर्शन घेऊन मावळप्रांत काबीज केला. स्वराज्याच्या कार्याला सुरूवात केली. मावळे, वतनदार, सर्व जाती जमातीला एकत्र करून त्यांच्यामध्ये स्वातंत्र्यासाठी लढण्याची जिद्द निर्माण केली. धार्मिक स्वातंत्र्याचा आदर केला. बेबंदशाही नष्ट केली. वतनदारांच्या जुलूमातून रयतेला सोडवले. रयतेला स्वराज्याबरोबरच सुराज्याची अनुभूती देण्याचा सर्वोत्कृष्ट प्रयत्न केला. या प्रयत्नातूनच रयतेच्या सर्वांगीण विकासाची आणि सुराज्याच्या प्रशासनाची भक्कम चौकट निर्माण केली. रामचंद्रपंत अमात्य यांच्या आज्ञापत्रात ही चौकट पहायला मिळते.

**● मराठेकालीन छत्रपतींचे स्थान :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या राज्यकारभार यंत्रणेच्या केंद्रस्थानी 'छत्रपती' म्हणजेच 'राजा' हे सर्वोच्च व सार्वभौम पद होते. महाराजांनी महाराष्ट्रात विजयनगरच्या हिंदू साम्राज्याच्या आधारावर राजेपद निर्माण केले. राजा व त्याची कर्तव्ये याबद्दल धर्मग्रंथांमध्ये प्रतिपादन केलेली तत्वे अंगिकारण्याचा प्रयत्न त्यांनी केला. शिवाजी महाराजांनी स्थानिक चालीरिती, आचार-विचारांमध्ये धर्माला असणा-या महत्वाबद्दल प्रतारणा केली नाही. पण कालानुरूप योग्य त्या सुधारणा करून आपले कर्तव्य बजावले. 'राजा कालस्य कारणम्' हे वचन त्यांनी सिध्द केले होते.

'शिवकाळात 'राजा' हाच सर्व राज्ययंत्रणेचा मुख्य टेकू होता.' असे विधान डॉ. सेन यांनी केले आहे. राजपद नामधारी नसून त्याच्या हाताखाली अष्टप्रधान मंडळ, सर्व सरसुभे, १८ कारखाने, १२ महाल, प्रशासनातील

सर्व अधिकारी यांचा समावेश होता. कायदे, कार्य आणि न्याय व्यवस्थेचा प्रमुख राजाच होता. या अनुषंगाने राजाची प्रमुख कर्तव्ये पुढील प्रमाणे -

**१) रयतेचे पालन पोषण :**

राजाने जात-पात, धर्म, गरीब-श्रीमंत असा भेदभाव न करता जनतेचे पालन पोषण करावे हे राजाचे पहिले कर्तव्य होते. शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेचेही हेच पहिले तत्व होते.

**२) राज्याचे संरक्षण :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेच्या शांततापूर्ण जीवनासाठी संरक्षणाचे महत्व जाणले होते. तत्कालीन संरक्षण व्यवस्थेमध्ये असणारी वतनदारी पध्दत महाराजांनी मोडीत काढली. संरक्षणासाठी जहागिरदार, वतनदारांवर अवलंबून न राहता त्यांनी राज्याचे म्हणजे स्वतःचे राष्ट्रीय लष्कर असले पाहिजे हा विचार कृतीमध्ये उतरविला होता असे वा. सी. बेंद्रे यांनी म्हटले आहे.

**३) समाजव्यवस्थेतील पुरोगामीत्व :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थानिक रूढी, परंपरा, चालीरिती, धार्मिक आचार-विचारांमध्ये हस्तक्षेप केला नाही. पण समाजव्यवस्थेतील दुर्गूणांना पायबंद घालण्याचा निश्चितच प्रयत्न केला होता. धर्ममार्तंडांच्या जोखडात सापडलेल्या समाजाला मुक्त करण्याचा प्रयत्न केला. सक्तीने मुस्लीम झालेल्या नेताजी पालकर व बजाजी नाईक-निंबाळकर यांना पुन्हा हिंदू धर्मात घेतले. त्यांच्या कुटूंबाशी सोयरिक जुळविली. समाजाला सुधारणेची दिशा देणे हे राजाचे कृतीशील कर्तव्य शिवाजी महाराजांनी पार पाडले होते.

**४) कार्यक्षम प्रशासन यंत्रणा :**

राज्याच्या मुलकी व लष्करी प्रशासनामध्ये शिवाजी महाराजांनी सर्व जातीधर्माच्या लोकांना एकत्र आणले. प्रशासकीय अधिका-यांमध्ये मतभेद, संघर्ष निर्माण होणार नाहीत याची दक्षता घेतली. प्रशासनातील अनिष्ट परंपरा नष्ट केल्या. वतनदारी पध्दत बंद केली. वेतनदारी व बदलीचे धोरण स्विकारले. लष्करी प्रशासनात गनिमी काव्याचा तंत्रासह अनेक योग्य नवे बदल स्विकारले. त्यामुळे जनता व अधिकारी वर्गाला स्वराज्य हे सुराज्य आहे असा अनुभव येत होता.

**५) रयतेच्या ठिकाणी स्वराज्याप्रती निष्ठा :**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तव्यनिष्ठ व लोककल्याणकारी कारभारामुळे रयतेला हे स्वराज्य आपले आहे ही निष्ठा निर्माण झाली होती. ही निष्ठा निर्माण करण्यासाठी महाराजांनी प्रसंगी धाडस दाखविणे, कडक शासन करणे इ. उपाययोजना अंगिकारल्या होत्या.

**६) कल्पकता :**

शिवाजी महाराजांचा अत्यंत महत्त्वाचा गुण म्हणजे कल्पकता. शिवाजी महाराजांच्या ठिकाणी असणारी

कल्पकता, आग्रा भेट व सुटका या प्रसंगातून दिसून येते. कर्नाटक मोहिमेत जिंकलेला प्रदेश व आपल्याकडेच ठेवलेला जिंजीचा किल्ला हे महाराजांच्या दूरदृष्टीचे उत्तम उदाहरण आहे.

वरील सर्व कर्तव्ये पाहिली असता, शिवकाळातील 'राजा' हे पद निर्विवाद महत्त्वाचे होते. महाराजांच्या अंगी राजाचे सर्वगुण होते. राजाची सर्व कर्तव्ये ते सुरूवातीपासूनच दक्षतेने बजावत होते. सन १६४५ मध्ये त्यांनी स्वराज्य कार्यास प्रारंभ केला. १६७४ मधील राज्याभिषेकाने त्यांच्या या कार्यास पुर्णत्व आले. प्रारंभापासून पूर्णत्वापर्यंत त्यांनी राजा म्हणून जी राजमुद्रा वापरली ती त्यांच्या एकूणच कार्याच्या स्थितीसाठी दिशा द्योतक होती.

*प्रतिपच्चंद्र लेखेव वर्धिष्णुविश्ववंन्दिता।*

*शाहसुनो शिवसैष्या मुद्रा भद्राय राजते।।*

अर्थ – प्रतिपदेच्या चंद्रकलेप्रमाणे हळूहळू क्रमाने वाढणारी व विश्वाने वंदिलेली शहाजीपुत्र शिवाजी यांची ही मुद्रा सर्वांच्या कल्याणासाठी विलसत आहे.

अशा प्रकारे स्वराज्य हे लोककल्याणकारी होते असे लक्षात येते. सन १९ मे १६७३ च्या पत्रात दाभोळ येथे लष्कराची छावणी असताना रयतेला थोडासुध्दा उपद्रव देवू नये यासंबंधीची माहिती मिळते. यावरून शिवाजी महाराजांची लोककल्याणकारी भूमिका स्पष्ट होते.

**● स्वयंअध्ययन प्रश्न – १**

**अ) योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.**

१) 'राजा हा ईश्वराचा अंश' ही धारणा --------- काळातील आहे.

अ) आधुनिक    ब) प्राचीन    क) मध्ययुगीन    ड) मराठेकालीन

२) बहामनी राजवटीनंतर उत्तर महाराष्ट्रावर -------- वर्चस्व निर्माण झाले.

अ) निजामशीही    ब) आदिलशाही    क) कुतूबशाही    ड) इमादशाही

३) 'शिवकाळात राजा हाच सर्व राज्ययंत्रणेचा मुख्य टेकू होता' असे विधान -------- यांनी केले आहे.

अ) वा. सी. बेंद्र    ब) डॉ. सेन    क) वि. का. राजवाडे    ड) जदूनाथ सरकार

४) छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याबरोबर -------- स्थापन केले.

अ) साम्राज्य    ब) सुराज्य    क) हुकूमशाही    ड) लोकशाही

५) छत्रपती शिवाजी महाराजांनी -------- मध्ये राज्याभिषेक केला.

अ) सन १६७६    ब) सन १६७७    क) सन १६७३    ड) १६७४

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) दक्षिणेतील कोणत्या साम्राज्याच्या पाडावाचा दुःखद परिणाम महाराष्ट्रावर झाला होता ?

२) 'राजा' संदर्भात कोणता सिध्दांत प्रचलित होता ?

३) छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात सर्वोच्च प्रशासकीय प्रमुख कोण होता ?

४) कौटिल्याच्या कोणत्या ग्रंथामध्ये राजा व राज्य कारभाराबद्दल चिकित्सा केली आहे ?

५) छत्रपती शिवाजी महाराजांनी जनतेला स्वराज्याबरोबर कोणती अनुभूती दिली ?

### २.२.२ अष्टप्रधान मंडळ :

हिंदुस्थानात प्राचीन काळापासून मंत्रीमंडळाची पध्दत अस्तित्वात होती. पूर्व वैदिक काळामध्ये 'पुरोहित', 'सेनानी' अथवा 'सभा', 'समिती' हे प्रशासनातील महत्वाचे अंग होते. तर वेदोत्तर काळात राजाला मदत करण्यासाठी 'रत्नीन' नावाचे मंत्रीमंडळच अस्तित्वात असल्याचे उल्लेख सापडतात. शुक्रनितीमध्ये प्रधान मंडळाबद्दल पुढीलप्रमाणे उल्लेख आहे.

*'यद्यप्यलतर कर्म तदप्येकेन दुष्करम्।*
*पुरूषेणासहायेन किमु राज्यं महोदयेम्।।'*

(काम लहानसे असले तरी ते एकट्याने पार पाडणे कठीण असते, मग राज्यासारखे महत्कार्य एक माणूस दुस-याच्या मदती वाचून कसे करणार)

प्रधान मंडळाचे हे महत्व 'याज्ञवल्ययस्तुती', कौटिल्याचे 'अर्थशास्त्र' इ. ग्रंथातही आहे. दक्षिणेकडील विजयनगर साम्राज्यामध्येही प्रधान मंडळाचे अस्तित्व होते. म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्या पूर्वी प्रधानमंडळाची परंपरा होती. महाराजांनी यामध्ये आपल्याला हवे ते बदल करून अष्टप्रधान मंडळ निर्माण केले होते.

**● छत्रपती शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळ निर्मितीचा इतिहास :**

छत्रपती शिवाजी महाराजांचे अष्टप्रधान मंडळ सन १६७४ मध्ये राज्याभिषेकावेळी पूर्ण झाले. पण निर्मिती प्रक्रिया सन १६४० पासूनच सुरू झाली होती. महाराजांचे अष्टप्रधान मंडळ म्हणत असलो, तरी कधी काळी त्यांच्या मंडळात १० मंत्री होते असे डॉ. बाळकृष्ण यांनी म्हटले आहे. शिवाजी राजे व मातोश्री जिजाऊ यांना बंगलोरहून पुण्याकडे पाठविताना त्यांच्या बरोबर शामराव निळकंठ यांना पेशवा म्हणून, बाळकृष्णपंत हणमंते यांची मुजुमदार म्हणून, सानोपंत यांना डबीर म्हणून तर रघुनाथ बल्लाळ यांची सबनीस म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. दादोजी कोंडदेव हे मुख्य कारभारी होते. त्यांच्या मृत्युनंतर सन १६४७ मध्ये 'सेनापती' म्हणून प्रथम तुकोजी चोर व तद्नंतर लगेचच माणकोजी दहातोंडे यांची नेमणूक केली होती. पुढे जावळी विजयानंतर निळो सोनदेवास सुरनीस तर गंगाजी मंगाजी यांना वाकनीस म्हणून नियुक्त केले. पुरंदर वेढ्यावेळी मिर्झा राजे जयसिंगाकडे

रघुनाथपंत कोरडे यांना पंडित म्हणून पाठविल्याचा उल्लेख सापडतो. सन १६६२ साली महादेव मतिमंत हे शिवाजी महाराजाचे 'पेशवे' होते. सन १६६८ च्या दरम्यान निराजी रावजी यांना न्यायाधिश या पदावर नियुक्त केले होते. महाराजांनी अकार्यक्षम मंत्र्यांना काढून टाकल्याची उदाहरणे आहेत. तर काही पदांवर दोन व्यक्तींची नियुक्ती केली होती. महाराजांनी सन १६७४ मध्ये राज्याभिषेक करून घेतला. त्यावेळी त्यांचे अष्टप्रधान मंडळ पूर्ण झाले. महाराजांनी यावेळी त्यांची फारसी भाषेतील नावा ऐवजी जाणिवपूर्वक संस्कृत नावे प्रचलित केल्याचे राज्यव्यवहार कोशांवरून लक्षात येते.

● **अष्टप्रधान मंडळातील प्रधान, त्यांची नावे व कार्य :**

| अ.क्र. | पदनाम | | प्रधानाचे नाव | थोडक्यात प्रमुख कार्य |
|---|---|---|---|---|
| | संस्कृत | फारसी | | |
| १ | मुख्य प्रधान | पेशवा | मोरो त्रिंबक | राज्यकारभार प्रमुख |
| २ | अमात्य | मुजूमदार | नारो, रामचंद्र निळकंठ | राज्याचा जमाखर्च |
| ३ | सेनापती | सरलष्कर | हंबीरराव मोहिते | संरक्षण |
| ४ | सचिव | सुरनीस | आण्णाजी दत्तो | छत्रपतींचा पत्रव्यवहार |
| ५ | मंत्री | वाकनीस | दत्ताजी त्रिंबक | राजांचा राजकीय व राजनैतिक व्यवहार |
| ६ | पंडितराव | -- | रघुनाथपंत | धार्मिक कार्य |
| ७ | सुमंत | डबीर | रामचंद्र त्रिंबक | परराष्ट्र व्यवहार |
| ८ | न्यायाधीश | -- | निराजी रावजी | न्यायदान |

**अष्टप्रधानांची कामे व कर्तव्ये :**

मल्हार रामराव चिटणीस यांच्या 'शककर्ते श्रीशिवछत्रपती महाराज' या बखरीमध्ये आणि इतिहास संशोधक का. ना. साने यांनी प्रसिध्द केलेल्या 'सनदापत्रे' यामध्ये अष्टप्रधानांची कामे व कर्तव्ये सांगितली आहेत.

**१) मुख्य प्रधान :** सर्व राज्याचा 'कारभार प्रमुख' म्हणून कारभार करणे, महाराजांच्या राजपत्रावर संमतीदर्शक मुद्रा करणे. इतर प्रधानांशी सलोख्याने राहाणे, त्यांच्याकडून कार्य करवून घेणे इ.

**२) अमात्य :** राज्याच्या उत्पनाचा जमाखर्च पहाणे व आर्थिक बाबींकडे लक्ष देणे.

**३) सेनापती :** सैन्याचे अधिपत्य करून शत्रूचा पराभव करणे. स्वराज्याचे संरक्षण करणे, सैन्याचा पगार, त्यांच्या पराक्रमाची व अडचणीची माहिती आणि लुटीचा हिशोब छत्रपतींकडे सादर करणे.

**४) सचिव :** छत्रपतींचा सर्व पत्रव्यवहार पहाणे, पत्रातील मजकूर शुध्द व कमी अधिक करणे.

**५) मंत्री :** राज्याच्या राजकीय व राजनैतिक बाबी सांभाळणे, हेरव्यवस्था देखरेख, दरबारी, पाहुण्यांचे स्वागत करणे, छत्रपतींची दिनचर्या व कार्याची नोंद ठेवणे छत्रपतींचे भोजन तपासणे.

**६) पंडितराव :** सर्व धार्मिक बाबींवर पंडितराव यांचा अधिकार होता. धार्मिक खटल्यात समाजातील रूढी परंपरा व आचार विचार, पाहून न्याय देणे. पंडित व विव्दान यांचा सन्मान करणे, आवश्यक तेव्हा छत्रपतींना सुचवून यज्ञ, शांती, अनुष्ठान करणे.

**७) सुमंत :** राज्याचा परराष्ट्र व्यवहार पहाणे, परदरबारचे वकील आपल्या दरबारी आल्यानंतर त्यांचे स्वागत करणे, परराज्यातील राजकारण समजून घेऊन छत्रपतींना निवेदन करणे.

**८) न्यायाधीश :** राज्यातील सर्व प्रकारच्या खटल्यांवर न्यायाधीशाचा अधिकार होता. निःपक्षपातीपणे न्यायदान करणे, ब्रह्म सभेच्या न्यायदानावर लक्ष ठेवणे. राज्यातील प्रमुख खटल्यातील निकालपत्रांवर संमत अशी मुद्रा करणे.

**● अष्टप्रधानांचे समान कार्य :**

अष्टप्रधान मंडळातील पंडितराव व न्यायाधीश यांच्या व्यतिरिक्त सहा प्रधानांना महाराजांनी खालील कामे आवश्यक केली होती.

१) सैन्य घेऊन शत्रू विरोधात युध्दाचे नेतृत्व करणे.

२) नेमून दिलेल्या प्रदेशाचा कारभार करणे.

३) राज्याच्या संबंधित कागदपत्रांवर 'संमत' मुद्रा करणे.

**● अष्टप्रधान मंडळाची वैशिष्ट्ये :**

**१) पदे वंश परंपरागत नाहीत :**

व्यक्ती जोपर्यंत कार्यक्षम आहे. सचोटीने दक्ष राहून कर्तबगारी बजावत असेल तरच तो त्या पदावर काम करेल. तरीही ते पद त्याच्या घराण्यात वंशपरंपरेने दिले जात नव्हते. प्रतापराव गुजर यांच्या बलीदानानंतर त्यांचे सेनापती पद त्यांच्या मुलाला न देता हंबीरराव मोहिते यांना दिले.

**२) अकार्यक्षम प्रधानांची हकालपट्टी :**

कार्यक्षमता सिध्द करून पदावर आल्यानंतर जर प्रधान अकार्यक्षम वागत असतील तर त्यांची प्रधान मंडळातून हकालपट्टी केली जात असे. महाराजांच्या कारकिर्दीत एकूण सहा सेनापती झाले. तुकोजी चोर, माणकोजी दहातोंडे फार दिवस सेनापती म्हणून कार्यरत नव्हते. नेताजी पालकर यांच्या सारख्या पराक्रमी सेनापतीने उध्दट वर्तन केल्यानंतर महाराजांनी त्यांना सेनापती पदावरून काढून टाकले होते.

**३) जहागीर ऐवजी रोख पगार :**

मंत्री अथवा तत्सम अधिकारी, नोकर यांना कामाचा मोबदला म्हणून जहागीर दिली की, संरजामशाही येते व शेवटी केंद्रसत्ता कमकुवत होते. जहागीरदार बंडखोर बनतात. म्हणून महाराजांनी प्रधानांना मोबदला म्हणून रोख पगार देणे सुरू केले. हा पगार त्या काळाच्या मानाने खूप मोठा होता. मुख्य प्रधानास १५ हजार, अमात्यास १२ हजार तर इतर प्रधानांना १० हजार होन वेतन होते. प्रधानांचे हे वेतन समाधानकारक होते.

**४) प्रधानांना लष्करी कामगिरी सक्तीची :**

अष्टप्रधान मंडळामध्ये 'सेनापती' हा लष्कर प्रमुख होता. तरीही पंडित व न्यायाधीश वगळता इतर सर्व प्रधानांना लष्करी नेतृत्व करून शत्रूला पराभूत करणे, मोहिमा करणे ही कामे करावी लागत.

**५) मुलकी कारभाराची जबाबदारी :**

अष्टप्रधान मंडळातील बहुतेक सर्व प्रधानांना नेमून दिलेल्या मुलूखाचा कारभार करावा लागत असे. स्वराज्याचे एकूण चार सरसुभे होते. त्यापैकी महाराष्ट्रातील तीन सरसुभ्यांवर मोरोपंत पेशवे, आण्णाजी दत्तो, दत्ताजीपंत यांची नियुक्ती केली होती.

प्रधान म्हणून काम करताना लष्करी व प्रशासकीय काम केल्याने अनुभवातून निर्णय घेणे सोपे जाते ही महाराजांची भूमिका होती.

**६) प्रधानांवर राज्यकारभाराची संयुक्त जबाबदारी :**

राज्यकारभारतील महत्वाच्या कागदपत्रांवर प्रधानमंडळातील सर्व प्रधानांच्या संमतीदर्शक मुद्रा असत. त्यामुळे एखादा निर्णय न चुकता सर्वानुमते घेतला जात असे. तसेच प्रधानांना जबाबदारीची जाणीव सतत राहून राज्यकारभार कार्यक्षम होत होता.

**७) प्रधान मंडळाचा सल्ला छत्रपतींवर बंधनकारक नसे :**

शिवाजी महाराजांची लोककल्याणकारी अनियंत्रित राजेशाही होती. त्यामुळे महाराजांनी सल्ला मागितला तर तो प्रधानांनी द्यायचा होता. पण दिलेला सल्ला महाराजांनी मान्य केलाच पाहिजे असे बंधन नव्हते. कारण राज्यकारभाराच्या सोयीसाठी हे प्रधानमंडळ तयार केले होते.

**८) प्रधानांची संख्या :**

मराठेकालीन राज्यकारभार यंत्रणेमध्ये 'अष्टप्रधान मंडळ' असे म्हटले जात असले तरी संख्या बदललेली दिसून येते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकावेळी प्रधानांची पदे आठ पण व्यक्ती नऊ होत्या. अमात्य हे पद नारो व रामचंद्र निळकंठ या दोन बंधूंकडे होते. छत्रपती संभाजीराजांच्या कारकिर्दीत सेनापती व पंडितराव (छंदोगामात्य) हे दोनच मंत्री अधिक सामर्थ्यशाली बनले. इतर सर्वजण निष्प्रभ झाले. राजाराम महाराजांनी 'प्रतिनिधी' हे नवे पद निर्माण केले होते. तर छत्रपती शाहू महाराजांच्या कारकिर्दीत मुख्य प्रधान (पेशवा) हेच पद सर्वेसर्वा बनले होते. अशाप्रकारे प्रधान मंडळातील संख्येत स्थित्यंतरे होत गेली.

**९) प्रधानमंडळात ब्राह्मण वर्गाचे संख्या बलत्व :**

प्रधान मंडळात क्षत्रिय वर्णातील सेनापती वगळता इतर सर्व पदे ब्राह्मण समाजातील व्यक्तींकडे होती. त्यावेळी वर्णव्यवस्था मजबूत असल्याने लिहीणे वाचण्याचे ज्ञान ब्राह्मण व्यक्तींकडेच असल्याने त्यांना महत्व प्राप्त झाले होते.

**१०) प्रधानांच्या दुय्यम अधिका–यांची निवड छत्रपती करत :**

प्रधानांकडे काम करणारे दुय्यम अधिकारी उदा. मुतालिक, चिटणीस यांची नियुक्तीही स्वतः महाराज करत होते. प्रधान जेव्हा मोहिमेवर अथवा प्रदेशाच्या दौऱ्यावर असत तेव्हा हे अधिकारी दरबारी काम करत होते.

अशा प्रकारे छत्रपती शिवाजी महाराजांनी अष्टप्रधान मंडळाची निर्मिती करून स्वराज्याच्या राज्यकारभाराची चौकट भक्कम व कार्यक्षम केली. स्वराज्यात छत्रपती हजर नसताना देखील नि:स्वार्थपणे व दक्षतेने राज्याची सेवा करण्याची जबाबदारी या अष्टप्रधानमंडळावर होती.

- **स्वयंअध्यन प्रश्न – २**

**अ) योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.**

१) 'रत्नीन' नावाचे मंत्रीमंडळ ------- काळात अस्तित्वात होते.

अ) पूर्व वैदिक  ब) पेशवे  क) शिवशाही  ड) वेदोत्तर

२) प्रधानमंडळाचे महत्त्व कौटिल्याच्या --------- या ग्रंथामध्ये नमूद आहे.

अ) नितीशास्त्र  ब) अर्थशास्त्र  क) समाजशास्त्र  ड) इतिहास

३) सन १६६८ च्या दरम्यान निराजी रावजी यास छत्रपती शिवाजी महाराजांनी ---------- या पदावर नियुक्त केले.

अ) पेशवा  ब) अमात्य  क) न्यायाधिश  ड) सेनापती

४) प्रतापराव गुजर यांच्यानंतर सेनापती पद -------- यांना दिले होते.

अ) हंबीरराव मोहिते  ब) आण्णाजी दत्तो  क) रघुनाथपंत  ड) नेताजी पालकर

५) सेनापती वगळता सर्व मंत्रीपदे -------- या समाजातील व्यक्तिंकडे होती.

अ) मराठा  ब) ब्राह्मण  क) क्षत्रिय  ड) मुसलमान

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) छत्रपती शिवाजी महाराजांचे अष्टप्रधान मंडळ केव्हा पुर्णत्वास गेले ?

२) अष्टप्रधानातील कोणते दोन मंत्री सैन्याचे नेतृत्व करत नव्हते ?

३) छत्रपती संभाजी राजांनी कवी कलशास कोणत्या नावाने मंत्रीपद दिले ?

४) छत्रपतीचा सर्व पत्रव्यवहार पाहण्याचे काम कोणत्या मंत्र्याचे होते ?

५) छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात मुख्य प्रधानास सालीना किती पगार होता ?

**२.२.३ सत्तांतर – राजा ते पेशवा व पेशवा ते कारभारी :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी 'रयतेचे कल्याण' हा विचार केंद्रस्थानी ठेवून प्रजा हितदक्ष राज्यकारभार यंत्रणा उभी केली. पण सन १६८० साली शिवाजी महाराजांचे निधन झाले. त्यानंतर औरंगजेब स्वराज्याचा घास घेण्यासाठी दक्षिणेत आला. महाराजांच्या पश्चात मराठी दरबारातही सत्तासंघर्ष सुरू झाला. त्यामध्ये छत्रपती संभाजी राजे यशस्वी झाले. त्यांनी राज्याभिषेक करून स्वराज्याची सुत्रे आपल्या हाती घेतली व मराठ्यांचे मोगलाविरूध्द स्वातंत्र्य युध्द सुरू झाले. ते औरंगजेबाच्या मृत्यूनंतर म्हणजेच सन १७०७ मध्ये संपुष्टात आले. सन १७०७ नंतर मराठ्यांचे यादवी युध्द सुरू झाले. यामध्ये छत्रपती संभाजी पुत्र शाहू यांचा खेडच्या लढाईत विजय झाला. ते मराठी सत्तेचे वारसदार झाले. छत्रपती शाहू महाराजांच्या कारकिर्दीतच पेशवाई अस्तित्वात आली. पेशव्यांचे वारसही पुढे निष्प्रभ होत गेले व मराठी सत्तेची धुरा कारभारी म्हणून काम करणाऱ्या नोकरांच्या हाती गेली.

अशा प्रकारे छत्रपती ते पेशवा व पेशवा ते कारभारी असे सत्तांतर होत गेले.

● **सत्तांतराची कारणे :**

**१) वंश परंपरागत पद देण्यास प्रारंभ :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी वतनदारी बंद केली. औरंगजेब दक्षिणेत आल्यानंतर छत्रपती संभाजी राजांच्या काळात वतने व जहागिरी देण्याची प्रथा सुरू झाली होती. छत्रपती राजाराम महाराज, महाराणी ताराबाई यांच्या काळात हे प्रस्थ वाढतच गेले तर छत्रपती शाहू महाराजांच्या काळात वतनदारी, जहागीरदारी पध्दत खूपच मजबूत झाली. वतनदारीचे छत्रपती शिवाजी महाराजानी सांगितलेले दुष्परिणाम म्हणजेच पुढील काळात झालेले सत्तांतर होय.

**२) मराठ्यांचे यादवी युध्द :**

औरंगजेबाच्या मृत्युनंतर ८ मे १७०७ रोजी मोगलांच्या कैदेतून शाहूंची सुटका झाली. महाराणी ताराबाईंनी त्यांना विरोध केला. त्यातून यादवी युध्द झाले. त्यामुळे मराठा सरदारांच्या स्वराज्याशी असलेल्या निष्ठा दुभंगल्या. परिणामी छत्रपती पदाप्रती असलेल्या निष्ठासुध्दा दुभंगल्या. यामुळेही सत्तांतरास पोषक वातावरण निर्माण होत गेले.

**३) मराठा सरदारांचा स्वार्थ :**

जहागिरी पध्दतीमुळे व यादवी युध्दामुळे मराठा सरदार स्वार्थी बनले. स्वराज्य हितापेक्षा वैयक्तिक स्वार्थ पाहू लागले. परिणामी केंद्रीय प्रशासनाची चौकट खिळखिळी बनली.

**४) छत्रपती शाहू महाराजांचे धोरण :**

छत्रपती शाहू महाराजांची मोगलाच्या कैदेतून सुटका झाल्यानंतर व राज्याभिषेकापर्यंत त्यांना अनेक अडचणी आल्या. त्यांना राजकारण, युध्द याचा अनुभव नसल्याने त्यांनी प्रामाणिक व कर्तृत्ववान सरदार सेवकांवर विश्वास ठेवला. त्यांच्यावर सोपवलेल्या कामात हस्तक्षेप केला नाही. छत्रपती शाहू महाराजांचे हेच धोरण छत्रपती ते पेशवा सत्तांतरास कारणीभूत ठरले.

**५) कर्तबगार पेशवे :**

बाळाजी विश्वनाथ या पहिल्या पेशव्यानंतर पहिला बाजीराव, बाळाजी बाजीराव (नानासाहेब) हे कर्तबगार पेशवे निघाले. त्यामुळे छत्रपती शाहू महाराजांनी पेशव्यांना छत्रपतींचेही काही अधिकार बहाल केले. स्वराज्याचा कारभार पुण्यातूनच होऊ लागला. फक्त पेशवाईची वस्त्रे साताऱ्याहून पुण्यात जात असत.

**६) पानिपतच्या तिसऱ्या युध्दाचा परिणाम :**

१४ जानेवारी १७६१ च्या तिसऱ्या पानिपतच्या युध्दातील पराभावानंतर लवकरच नानासाहेब पेशव्यांचा मृत्यू झाला. नानासाहेबानंतर सर्वांस धाकात ठेवून सर्वांकडून योग्य कामगिरी करून घेणारा चालक राष्ट्रास मिळाला नाही. असे रियासतकार गो. स. सरदेसाई म्हणतात.

**७) पेशव्यांचे उत्तरेकडील धोरण :**

मराठी सत्तेचा विस्तार उत्तरेकडे करण्याचे धोरण पेशव्यांनी स्विकारले. अंतर्गत संघर्षातून मराठा सरदारांनी बाहेर पडावे हा जरी त्यामागे हेतू असला तरी मध्यवर्ती सत्ता दुर्बल होत गेली. उत्तर भारतात शिंदे, होळकर, गायकवाड यांनी दरारा निर्माण केला. पण ते मध्यवर्ती सत्तेपासून स्वतंत्र वृत्तीने वागू लागले. पुढील काळातील राजकारणात त्यांचेच महत्व वाढले.

**८) नेतृत्वाचा अभाव :**

माधवराव पेशव्याच्या अकाली मृत्यूंतर सन १७७२ रोजी नारायणरावास पेशवाईची वस्त्रे मिळाली. माधवरावाच्या मृत्युपत्रानुसार सखारामबापू व नाना फडणवीस यांच्या हाती कारभार गेला. पण रघुनाथराव पेशव्याने नारायणरावाचा खून केला. या सर्व गृहकलहामध्ये मराठेशाहीला सावरून धरण्याचे महत्त्वाचे कार्य नाना फडणवीस व महादजी शिंदे यांनी केले.

**९) पेशवा दुसरा बाजीराव :**

छत्रपती शाहू महाराजांच्या कारकिर्दीमध्ये त्यांच्या मर्यादा व अडचणींमुळे जसा पेशवाईचा उदय झाला, तसा पेशवाईतील राघोबादादाच्या सत्ता लालसेमुळे आणि त्याचा पुत्र दुसरा बाजीराव याच्या बेजाबदार व नाकर्तेपणामुळे नाना फडणवीस, महादजी शिंदे, यशवंतराव होळकर इ. सरदारांकडे सत्तेचे हस्तांतर झाले होते.

● **सत्तेचे हस्तांतरण – राजकीय परिस्थिती :**

**छत्रपती संभाजी महाराजांची कारकिर्द – (सन १६८० ते १६८९) :**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर छत्रपती संभाजी महाराजांनी औरंगजेबाबरोबर स्वातंत्र्य युध्द सुरू केले. तत्कालीन परिस्थितीशी जुळवून घेताना त्यांनी वतने व जहागिरी दिल्या. प्राप्त परिस्थितीत त्यांचा निर्णय योग्य असला तरी जहागरीची प्रथा पुढे वाढली. छत्रपती संभाजी महाराजांनी कवी कलषासाठी 'छंदोगामात्य' हे पद निर्माण केले. राज्य कारभारात काही बदल करून संभाजी महाराजांनी मृत्युपर्यंत म्हणजे सन १६८९ पर्यंत स्वराज्य अबाधित ठेवले.

● **छत्रपती राजाराम महाराजांची कारकिर्द – (सन १६८९–१७००) :**

छत्रपती संभाजी महाराजांच्या हौतात्म्यामुळे अवघा महाराष्ट्र हळहळला आणि स्वराज्याच्या रक्षणार्थ पेटून उठला. मोगल सरदार झुल्फीकारखानने रायगडला वेढा दिला. अशा वेळी महाराणी येसुबाईंच्या सल्ल्याने राजाराम महाराज निसटून कर्नाटकातील जिंजीला गेले. आणि स्वराज्यात येसुबाईच्या मार्गदर्शनाखाली मराठे लढत राहिले. पण दुर्दैवाने नोव्हें. १६८९ मध्ये येसूबाई व पुत्र शाहू यांना मोगलांनी कैद केली आणि रायगड मोगलाच्या हाती गेला.

छत्रपती राजाराम महाराजांनी जिंजीस पोहचल्यानंतर स्वराज्याची प्रशासकीय यंत्रणा सिध्द केली. प्रतिनिधी हे नवीन पद निर्माण केले व प्रल्हाद निराजी यांना ते दिले. हेतू हा की मराठी राजा पकडला गेला तर छत्रपतींची जागा त्याने घ्यावी, गादी छत्रपतींची राहिल पण आदेश मात्र प्रतिनिधीचे असतील. छत्रपती शिवाजी महाराजांच्या धोरणांशी विसंगत व्यवस्था या काळात होती.

छत्रपती राजाराम महाराज जिंजीला गेले तेव्हा त्यांनी स्वराज्याचा कारभार रामचंद्रपंत अमात्यांवर सोपविला होता. औरंगजेबाने झुल्फीकारखानाला जिंजी घेण्यास कर्नाटकात पाठविले. फेब्रु. १६९८ मध्ये त्याने जिंजी जिंकले. तेव्हा राजाराम महाराज व महाराणी ताराबाई स्वराज्यात आले. मरगळलेल्या स्वराज्यात स्फुल्लींग पेटविण्याचा प्रयत्न केला. पण सन १७०० मध्ये वयाच्या ३० व्या वर्षी छत्रपती राजाराम महाराजांचे अकाली निधन झाले.

● **महाराणी ताराबाईंची कारकिर्द – (सन १७०० ते १७०७)**

छत्रपती राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर स्वराज्याला वाली उरला नाही असे औरंगजेबाला वाटले. तेव्हा आपण स्वराज्य जिंकलेच असे औरंगजेबला वाटले. पण महाराणी ताराबाईंनी स्वातंत्र्य लढ्याचे शिवधनुष्य पेलले. पुत्र शिवाजी यांना गादीवर बसविले व स्वतःला स्वातंत्र्यलढ्यात झोकून दिले. म्हणूनच सन १७०० ते १७०५ पर्यंत मोगलांना चार किल्लेही जिंकता आले नाहीत. मराठी सैन्याने मोगलांना जेरीस आणले. मोगलाच्या तावडीतून स्वराज्य सही सलामत ठेवले याचे श्रेय महाराणी ताराबाईंना जाते.

**● छत्रपती शाहू महाराजांची कारकिर्द – (सन १७०८ ते १७४९)**

छत्रपती शाहूंची मोगलाच्या कैदेतून सुटका झाल्यानंतर महाराणी ताराबाई व छत्रपती शाहू यांच्यात यादवी युध्द झाले. खेडच्या लढाईत (१२ आक्टों. १७०७) शाहू महाराजांचा विजय झाला. बाळाजी विश्वनाथ व धनाजी जाधव यांचा या विजयात मोठा वाटा होता. पुढे मराठी सत्ता दुभंगली, सातारा व कोल्हापूर अशा दोन गाद्या निर्माण झाल्या. मराठी सत्तेच्या इतिहासातील ही अत्यंत महत्त्वाची घटना होती. या संघर्षात मराठी सरदार दोन गटात विभागले. सरदारांनी देशहितापेक्षा स्वहिताला प्राधान्य दिले. परिणामी दमाजी थोरात, उदाजी चव्हाण, कान्होजी आग्रे हे तर मराठी मुलुखच लुटू लागले. यांना आळा घालणे छत्रपती शाहूंना जमले नाही. हेच काम पहिला पेशवा बाळाजी विश्वनाथ याने केले. पेशवे पद वंशपरंपरागत भट घराण्याकडे कायम स्वरूपी आले. येथूनच सत्ता हस्तांतराला सुरूवात झाली.

**● बाळाजी विश्वनाथ – (सन १७१३ ते १७२०) :**

पेशवे घराण्याचा संस्थापक बाळाजी विश्वनाथ होता. मुळचे कोकणातील श्रीवर्धनचे हे घराणे. छत्रपती शाहूंच्या सुटकेनंतर संकटकाळी शाहूंचा पक्ष उचलून धरला. धनाजी जाधव, कान्होजी आग्रे या सारख्या सरदारांना छत्रपती शाहूंकडे वळविले तर काही बंडखोर सरदारांना वठणीवर आणले. नोव्हे. १७१८ ला दिल्लीवर स्वारी करून चौथाई सरदेशमुखीही त्यांनी मिळविली. राजमाता येसुबाईंची मोगल कैदेतून सुटका केली. मराठा राजमंडळाची स्थापना केली. पेशवे घराण्याचे कर्तृत्व पुढे आणण्यास बाळाजीच कारणीभूत ठरला होता.

**● पेशवा बाजीराव पहिला – (सन १७२० ते १७४०) :**

पेशवा बाळाजी विश्वनाथाने छत्रपती शाहूंचे आसन स्थिर केले, तर बाजीराव पाहिल्याने मराठ्यांचा हाडवैरी निजामास जेरीस आणले. बुंदेलखंडाच्या छत्रसालला मदत केली. सन १७३७ मध्ये दिल्ली मोहिम आखली आणि मोगलाच्या तख्ताला धक्का दिला. सिद्दी व पोर्तुगीजांचा बंदोबस्त केला. पहिल्या बाजीरावाच्या कारकिर्दीतच मराठ्यांच्या खऱ्या विस्तारवादी धोरणाला प्रारंभ झाला. त्याने मावळ व बुंदेलखंडावर वर्चस्व मिळवले.

**● बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवा – (सन १७४० ते १७६१)**

पहिल्या बाजीरावचा एप्रिल १७४० रोजी रावेर येथे मृत्यू झाला. यानंतर छत्रपती शाहू महाराजानी २५ जून १७४० रोजी बाजीराव पुत्र बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब यास पेशवे पद बहाल केले. उत्तरेत कमी झालेला मराठ्यांचा दबदबा वाढवणे, निजामाचा बंदोबस्त करणे, परकियांना पायबंद घालणे या बरोबरच मराठा राज्याची आर्थिक घडी बसवणे असे महत्त्वाचे प्रश्न नानासाहेब पेशव्यापुढे होते.

नानासाहेबाने सन १७४१ ते १७४८ पर्यंत उत्तरेत ४ मोहिमा काढल्या. या मोहीमेतून पेशव्याने माळव्याची चौथाईची सनद, धार, बांदे इ. प्रदेश मिळवले. खंडण्या वसूल करणे इ. कामे केली. दुस-या मोहिमेवेळीच नानासाहेबाचा रघुजी भोसलेशी बंगालच्या वर्चस्वावरून संघर्ष झाला. हा संघर्ष मराठी सत्तेच्या विकासाच्या दृष्टीने घातक होता. तिस-या मोहिमेवेळी झाशी, सागर इ. ठिकाणी मराठी सत्ता प्रस्थापित केली. भेलासा जिंकले. तेव्हा उत्तरेकडील जबाबदारी शिंदे-होळकरांवर सोपविली. पेशव्यांने शेवटच्या चौथ्या मोहिमेत (नेवाईची मोहिम) जयपूर

येथील रजपूतांच्या वारसा प्रश्नात हस्तक्षेप केला. तोच पुढे मराठ्यांना हानीकारक ठरला.

सन १७४३ पासून छत्रपती शाहू महाराजांची प्रकृती ढासळत चालली होती. घरगुती तसेच दरबारी कट कारस्थाने वाढली होती. याच सुमाराला शाहू महाराजांपुढे आर्थिक अडचणीही होत्या. दरबारातील प्रतिनिधी, दाभाडे, यमाजी शिवदेव यांच्या पेशव्या विरोधात तक्रारी होत्या. तेव्हा छत्रपती शाहूंनी नानासाहेबांस पेशवे पदावरून काढून टाकले (सन १७४७). याचा फायदा घेवून मराठ्यांच्या शत्रूंनी उचल खाल्ली. दक्षिणेत निजाम व कोल्हापूरचे छत्रपती संभाजी यांनी तर उत्तरेकडे अब्दालीने स्वारी केली. ही परिस्थिती सावरण्यास कोणीही पुढे आले नाही तेव्हा छत्रपती शाहूंनी पुन्हा नानासाहेबास पेशवे पदाची वस्त्रे दिली. दरम्यान १५ डिसेंबर १७४९ रोजी सातारा येथे छत्रपती शाहूंचे निधन झाले. यामुळे वारसा प्रश्न पुढे आला. छत्रपती शाहूंच्या निधनाने राजसत्ता दुर्बल झाली. तेव्हा ही सर्व जबाबदारी पेशव्यांकडे आली. आता साताऱ्याहून मराठा साम्राज्याची सूत्रे पुण्याकडे आली व पुणे हे मराठा साम्राज्याचे केंद्र बनले. छत्रपती ते पेशवा या सत्तांतराच्या दृष्टीने ही घटना अत्यंत महत्त्वाची आहे.

पुढे १७६१ मध्ये मराठ्यांचे अब्दालीबरोबर पानिपतचे युध्द झाले. या युध्दात मराठ्यांचा पराभव झाला. त्याचे अनेक गंभीर परिणाम मराठी सत्तेवर झाले. यापैकी एक म्हणजे नानासाहेब पेशव्याचा मृत्यू होय.

**● पेशवा माधवराव पहिला – (१७६१ ते १७७२) :**

नानासाहेब पेशव्याच्या मृत्युनंतर २० जुलै १७६१ मध्ये महाराणी ताराबाईंच्या सल्ल्यानुसार छत्रपती रामराजांकडून माधवरावास वयाच्या सोळाव्या वर्षी पेशवाईची वस्त्रे मिळाली. त्याने प्रथम घरातील अंतर्गत संघर्ष मिटविला. निजामाविरूध्द मोहिम उघडली. माधवरावास उरळीकांचन येथे निजामाचा सर्वनाश करण्याची संधी आली होती. पण ती राघोबादादामुळे घालविली. यातून माधवराव-राघोबा संघर्ष निर्माण झाला. पेशव्याने १७६४-६५ मध्ये हैदर अलीवर स्वारी करून त्याचा बंदोबस्त केला. याच काळात मराठा सरदार महादजी शिंदे यानी दिल्लीवर स्वारी करून दिल्ली व बादशहाला ताब्यात घेतले. म्हणजेच मराठ्यांनी उत्तर हिंदूस्थानवर आपली सत्ता पूर्णपणे प्रस्थापित केली. जाट रोहिल्यांचा पाडाव केला. परंतू दुर्दैवाने माधवरावाचा अकाली मृत्यू १७ नोव्हें. १७७२ रोजी झाला.

**● नारायणराव पेशवा व राघोबादादाची कारकीर्द :**

माधवरावाच्या मृत्यूनंतर आपणास पेशवेपद मिळाले नाही ही गोष्ट राघोबादादाच्या मनातून जात नव्हती. तो नेहमी संधी शोधण्याचा प्रयत्न करत होता. राघोबादादा नजर कैदेत होता. त्यांने गारद्यांच्या मदतीने नारायणरावाचा खून केला व केवळ आठ महिन्यात नारायणरावाच्या कारकीर्दीचा शेवट झाला.

३१ ऑक्टोबर १७७३ रोजी राघोबादादाने पेशवाईची वस्त्रे स्विकारली. नारायणरावाचा वध ही अतिशय दुर्दैवी घटना होती. राघोबाने नारायणरावाच्या प्रकरणाशी काही संबंध नसल्याचा आव आणला. परंतू चौकशी अंती रामशास्त्री प्रभुणे या न्यायाधिशांनी त्याला दोषी ठरवले. तेव्हा राघोबाने रामशास्त्रींची हकालपट्टी केली. त्यामुळे जनमत बिघडले. पुणे दरबारातील नाना फडणीस, सखारामबापू बोकिल यासारख्या बारा मुसद्यांनी एकत्र येऊन राघोबादादास पदच्यूत केले.

● **बारभाई कारस्थान व मराठी सत्ता पेशव्याकडून कारभाऱ्यांकडे :**

सखारामबापू, नाना फडणीस, हरिपंत फडके, पेठे, मोरोबा फडणीस, बापूजी नाईक, मालोजी घोरपडे, भवानराव प्रतिनिधी, महादजी शिंदे, तुकोजी होळकर, रास्ते, पटवर्धन या बारा मुसद्यांनी नारायणरावाची पत्नी गंगाबाईस पुरंदरवर आणून राघोबाला पदच्युत केले व २८ मे १७७४ रोजी तिच्या पुत्रास चाळिसाव्या दिवशी पेशवे पदाची वस्त्रे दिली. त्याचे नाव 'सवाई माधवराव' ठेवले. त्याच्या नावे राज्यकारभार सुरू केला. राघोबाला ही बातमी कळताच त्याने इंग्रजांची मदत घेतली व इंग्रजांना आयती संधी चालून आली. राघोबाचा हा डाव हाणून पाडण्यास बारभाई मंडळ पुढे आले व पुरंदरच्या तहाने मराठे-इग्रंज युद्ध थांबले. परंतू पुढे मराठा राज्यकारभाराची सूत्रे नाना फडणीसाच्या हाती एकवटली व नानाचा मुत्सद्दीपणा व महादजी शिंदे यांचे शौर्य यामुळेच मराठी सत्ता टिकून राहिली हे निर्विवाद सत्य आहे.

● **सत्तांतराचे परिणाम :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याचे सार्वभौम अधिकार छत्रपतींकडे केंद्रीत झाले होते. पण त्यांच्या नंतर यथावकाश सत्तेचे हस्तांतरण झाले. याचे दुरगामी परिणाम झाले.

**१) छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या ध्येयधोरणास तिलांजली :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रातील रयतेला स्वातंत्र्य व स्वाभिमानाने जगता यावे म्हणून कल्याणकारी हिंदवी स्वराज्य स्थापन केले. रयतेचे कल्याण व स्वराज्य हे महाराजांचे ध्येय होते. या ध्येयाप्रती महाराजांचे धोरण होते. पण छत्रपती ते पेशवा व पेशवा ते कारभारी असे सत्तांतर झाल्याने महाराजांच्या ध्येय धोरणास तिलांजली मिळाली. पेशवे नेहमी आर्थिक विवंचनेत होते. त्यांनी स्वराज्याबाहेर प्रदेश मिळविणे, खंडणी मिळविणे यावर भर दिल्याचे दिसून येते. सामान्य रयतेच्या कल्याणाकडे दुर्लक्षच केले. पेशवा ते कारभारी या सत्तांतरामुळे मराठा सरदारांनी स्वराज्याचा प्रदेश सुद्धा लुटला.

**२) मराठा सरदरांमध्ये अतंर्गत संघर्ष :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रातील सर्व मराठा सरदारांमध्ये ऐक्य निर्माण केले त्यांच्यामध्ये स्वातंत्र्याचा विचार पेरला. त्यांच्याच सहकार्याने स्वराज्य उभा केले. पण कारभाऱ्यांपर्यंत सत्तेचे हस्तांतरण होत असतानाच मराठा सरदारांमध्ये अंतर्गत मत्सर, कारस्थान, संघर्ष सुरू झाला. पेशवे-आग्रे, पेशवे-दाभाडे, पेशवे-भोसले, होळकर-शिंदे अशी अंतर्गत संघर्षाची उदाहरणे पहायला मिळतात.

**३) मराठी सत्तेचा ऱ्हास :**

छत्रपती-पेशवा-कारभारी अशा सत्ता हस्तांतरामुळे तत्कालीन सत्ताधाऱ्यांचे अनेक बाबींकडे दुर्लक्ष झाले. उदा. अद्यावत शस्त्र सामग्री, आरमार, विज्ञान, हेरखाते, व्यापार, प्रशासन इ. या सर्वांमुळे मराठी सत्ता कमकुवत बनत गेली. कमकुवत होत असलेल्या मराठी सत्तेला सावरणारे खंबीर नेतृत्व मिळाले नाही या सर्वांमुळे अखेर मराठी सत्ता संपुष्टात आली.

### ४) महाराष्ट्रावर इंग्रजांचे वर्चस्व :

छत्रपती शिवाजी महाराजांनी भविष्यकालीन इंग्रजाचा धोका ओळखून आरमार व खांदेरी, उंदरी, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग अशी अनेक आरमारी केंद्रे उभारली. आंग्रे घराणे आरमारी नेतृत्व करत होते. पण नानासाहेब पेशव्याने आंग्रे व आरमार दुर्बल करण्यासाठी इंग्रजांचीच मदत घेतली हे दुर्दैवच म्हणावे लागेल. या निमित्ताने इंग्रजांना मराठी सत्तेत हस्तक्षेप करण्याची संधी मिळाली. पुढील राजकारणात इंग्रज मुत्सद्देगिरीत श्रेष्ट ठरले. त्यामुळेच ब्रिटीश सत्तेपुढे पेशव्याला हार खावी लागली. आणि हा छत्रपती ते पेशवा व पेशवा ते कारभारी या सत्तांतराचाच गंभीर परिणाम आहे.

● **स्वयंअध्यन प्रश्न – ३**

**अ) योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.**

१) छत्रपती शाहू व महाराणी ताराबाई यांच्यातील यादवी युध्दात -------- लढाई निर्णायक ठरली.

अ) खेडची ब) पानिपतची क) पन्हाळ्याची ड) जिंजीची

२) छत्रपती ते पेशवा सत्तांतरास ----------- चे धोरण कारणीभूत होते.

अ) छत्रपती संभाजी ब) छत्रपती राजाराम क) छत्रपती शाहू ड) महाराणी ताराबाई

३) -------- यास शेवटचा पेशवा म्हणून संबोधले जाते.

अ) बाळाजी विश्वनाथ ब) बाळाजी बाजीराव क) नानासाहेब ड) दुसरा बाजीराव

४) छत्रपती शाहू महाराजांचा ------------ येथे १७४९ रोजी मृत्यु झाला.

अ) रायगड ब) सातारा क) राजगड ड) पुणे

५) ------ या मराठा सरदाराने दिल्ली व बादशहाला ताब्यात घेतले होते.

अ) महादजी शिंदे ब) यशवंत होळकर क) दत्ताजी शिंदे ड) नाना फडणीस

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर मराठ्यांचे कोणाबरोबर स्वातंत्र्य युध्द सुरू झाले ?

२) छत्रपती राजाराम महाराजांनी स्वराज्याचा कारभार कोठून पाहिला ?

३) कोणत्या छत्रपतींच्या कारकिर्दीत सत्ता हस्तातंरणाला सुरूवात झाली ?

४) पेशव्यांकडून सत्तेचे हस्तातंर कोणाकडे झाले ?

५) पेशवे घराण्याचा संस्थापक कोणाला मानले जाते ?

**२.४. पारिभाषिक शब्द–शब्दार्थ :**

छत्रपती – राजा ज्याने छत्र धारण केले आहे असा.

पेशवा – मंत्रीमंडळातील मुख्य मंत्री.

अधिपत्य – वर्चस्व

धर्म सहिष्णू – स्वधर्माबद्दल स्वाभिमान असतानाच दुस–या धर्माबद्दल आदराची भावना असणे.

कल्याणकारी स्वराज्य – जनतेचे संरक्षण, न्याय इ. बाबी केंद्रीत ठेवून स्वतःच्या राज्याचा कारभार.

वतन – प्रशासकीय मुलकी अथवा लष्करी सेवा करण्याच्या मोबदल्यात दिलेली जमीन अथवा ठराविक प्रदेशाची महसूल रक्कम.

जोखड – बंधन.

शककर्ता – कालगणना प्रारंभ करणे. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक प्रसंगी 'शिवराज' नावाने नवीन कालगणना सुरू केली त्याला 'शिवराज शक' म्हणतात.

मुद्रा – प्रस्तुत घटकामध्ये मुद्रा म्हणजे 'राजमुद्रा', म्हणजेच राष्ट्रचिन्ह असा आहे. तसेच चिन्ह, खूण, निशाणी या अर्थानेही हा शब्द वापरला जातो. (याबरोबरच, मुद्रा म्हणजे नाणी, चलन, असाही अर्थ आहे.)

यादवी युद्ध – एखाद्या देशातील अधिकृत शासन यंत्रणा ताब्यात घेण्यासाठी त्याच देशातील किंवा राज्यातील दोन गटात झालेला लष्करी संघर्ष.

सत्तांतर – सत्ता एकाकडून दुस–याकडे जाणे.

तिलांजली देणे – नष्ट करणे.

**२.५) स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

- **स्वयंअध्यन प्रश्न – १**

अ) १) मध्ययुगीन २) निजामशाही ३) डॉ. सेन
४) सुराज्य ५) सन १६७४

ब) १) विजयनगर २) दैवीअधिकाराचा सिध्दांत ३) राजा
४) अर्थशास्त्र ५) सुराज्य

- **स्वयंअध्यन प्रश्न – २**

अ) १) वेदोत्तर २) अर्थशास्त्र ३) न्यायाधिश
४) हंबीरराव मोहिते ५) ब्राह्मण

ब) १) राज्याभिषेकावेळी २) पंडित व न्यायाधिश ३) छंदोगामात्य

४) सचीव ५) १५००० होन

● **स्वयंअध्यन प्रश्न – ३**

अ) १) खेडची २) छत्रपती शाहू ३) बाळाजी विश्वनाथ

४) सातारा ५) महादजी शिंदे

ब) १) मोगल २) कर्नाटकातील जिंजी ३)छत्रपती शाहू महाराज

४) कारभारी ५) बाळाजी विश्वनाथ

## २.६) सारांश :

या घटकामध्ये मराठी सत्तेची राज्यव्यवस्था पाहत असताना प्रथम आपण प्राचीन काळातील राजपदाची संकल्पना अभ्यासली. राजा हा ईश्वराचा अंश असतो या अनुशंगाने 'राजा' हे पद होते. असे आपल्या लक्षात आले. मध्ययुगापर्यंत साधारण समाजाची हीच धारणा होती. राज्याचा सार्वभौम सत्ताधीश राजाच होता. या पार्श्वभूमीवर छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रामध्ये जे हिंदवी स्वराज्य स्थापन केले. छत्रपती हे राजपद सार्वभौम होते पण छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य सुराज्य कसे होईल. रयतेचे कल्याण, स्वातंत्र्य, धर्म सहिष्णूता कार्यक्षम कल्याणकारी प्रशासन या अनुशंगाने आपल्या सार्वभौम राजपदाचा जनतेला अनुभव दिल्याचे लक्षात येते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी कल्याणकारी प्रशासनासाठी अष्टप्रधान मंडळाची निर्मिती केली. यामधील मंत्र्यांना राज्यकारभाराचे उच्च स्तरीय अधिकार होते. पण सर्वोच्च अधिकार मात्र छत्रपतींकडे होता. हे लक्षात आले. मंत्र्यांना प्रदेशाचा काटेकोर कारभार लष्करी नेतृत्व, निर्णय प्रक्रियेत सहभाग व आपल्याला नेमून दिलेल्या खात्याचा चोख कारभार करावा लागत असे. महाराजांनी अष्टप्रधानांसाठी काही नियम, धोरण, निश्चित केल्याचे दिसून येते. उदा. पदे वंशपरंपरागत नाही. वतनाऐवजी रोख पगार. छत्रपती संभाजी महाराजांच्या कारकिर्दीनंतर ही व्यवस्था हळूहळू कमकुवत होत गेली. याचाच परिणाम म्हणून केंद्रीय सत्तेत सत्तांतर होऊ लागले.

छत्रपती शाहू महाराजांच्या कारकिर्दीत त्यांना काही कठीण प्रसंगी पेशव्यांनी सहकार्य केल्यामुळे मराठी सत्तेत हळूहळू पेशवे सर्वेसर्वा झाल्याचे दिसते. बाळाजी बाजीरावापासून माधवराव पेशव्यापर्यंतचे सर्व पेशवे कर्तबगार निघाल्याने मराठी सत्तेत पेशवाई आली. पण नंतर दुर्बल व स्वार्थी पेशव्यांमुळे मराठ्यांची सत्ता नाना फडणवीस, शिंदे, होळकर अशा कारभाऱ्यांकडे गेल्याचे दिसते. याचा परिणाम पुढे मराठी सत्ता संपुष्टात आली हे सत्य आपल्याला नाकारता येत नाही.

## २.७ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१) शिवकालीन राजपदाची संकल्पना स्पष्ट करा.

२) छत्रपती शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळाच्या निर्मितीचा आढावा घ्या.

३) छत्रपती शिवाजी महाराजाच्या अष्टप्रधान मंडळाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

४) छत्रपती ते पेशवा व पेशवा ते कारभारी सत्तांतराची कारणे स्पष्ट करा.

५) सत्तांतराच्या परिणामांची सविस्तर चर्चा करा.

**ब) टीपा लिहा.**

१) राजाची कर्तव्ये २) छत्रपती पद ३) अष्टप्रधानांची कार्ये.

४) छत्रपती शाहू महाराज. ५) बाळाजी विश्वनाथ ६) सत्तांतराची वाटचाल

## २.८ संदर्भ ग्रंथ :


१) कुलकर्णी श्री. रं. – शिवकालीन राजनीती आणि रणनीती, आज्ञापत्राच्या संहितेसह, (१९९४), मुंबई.

२) भागवत दुर्गा – कौटिलीय अर्थशास्त्र

३) गर्गे स. मा.– करवीर रियासत.

४) पवार डॉ. आप्पासाहेब – ताराबाईकालीन कागदपत्रे खंड १ ते ३

५) डॉ. पवार जयसिंगराव – मराठेशाहीचा मागोवा

६) फाटक न. र. – मराठी सत्तेचा उत्कर्ष

७) सरदेसाई गो. स. – मराठी रियासतकार–खंड–३

८) कोलारकर श. गो. – भारताचा इतिहास (इ.स. १२०६ ते १७६१)

९) कुलकर्णी अ. रा. व देशपांडे प्र. न. – मराठ्यांचा इतिहास भाग २

१०) कुलकर्णी अ. रा. व खरे ग. ह. – मराठ्यांचा इतिहास

११) पगडी सेतू माधवराव – मोंगल व मराठे

१२) पगडी सेतू माधवराव – मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध

१३) देशपांडे डॉ. प्र. न. – मराठ्यांचा उदय व उत्कर्ष

१४) पवार डॉ. जयसिंगराव – मराठी सत्तेचा उदय

१५) राजवाडे वि. का. – मराठ्यांच्या इतिहासाची साधने

१६) Ranade M. G., Telang K. T. - Rise of the Maratha Power and Glean Maratha Chronicles.

१७) Sarkar Jadunath - Shivaji and His Times.

## २.९ क्षेत्रिय कार्य :

१) छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी रायगड किल्ल्यास भेट द्या व 'राजधानी'चे केंद्रस्थान या दृष्टीकोनातून निबंध लिहा.

२) पेशव्यांचे सत्ताकेंद्र असलेल्या पुणे शहरास भेट द्या व पुण्यातील ऐतिहासिक स्थळांचा अभ्यास करा.

३) सातारा व कोल्हापूर शहरांना भेट द्या व तेथील ऐतिहासिक स्थळांचा अभ्यास करा.

❖ ❖ ❖

## घटक – ३

# आर्थिक परिस्थिती

**अनुक्रमणिका :**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

    ३.२.१ कृषि व्यवस्था–जमीन महसूल, पाटबंधारे.

    ३.२.२ उद्योगधंदे.

    ३.३.३ व्यापार आणि वाणिज्य.

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

३.५ स्वंय–अध्यन प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ संदर्भ ग्रंथ

## ३.० उद्दिष्टे :

- या घटकांच्या अभ्यासानंतर आपणास.
- मराठाकालीन कृषीव्यवस्था आणि जमीन महसूलाचे स्वरूप समजून घेता येईल.
- मराठाकालीन पाटबंधाऱ्यांच्या सोईची माहिती होईल.
- मराठाकालीन उद्योगधंद्याची माहिती समजेल.
- मराठाकालीन व्यापाराची जाणिव होईल.
- मराठाकालीन व्यापारी केंद्रांची माहिती होईल.
- मराठाकालीन दळणवळणांची साधने समजतील.
- राज्याच्या जमा–खर्चाची माहिती होईल.

### ३.१ प्रास्ताविक :

महाराष्ट्रात शेतीची अर्थव्यवस्था अठराव्या शतकाच्या सुरूवातीस सर्वसामान्यपणे जशी होती तशीच ती त्या संपूर्ण शतकात पुढेही चालू राहिली. शेतीमालाचे उत्पादन हे मुख्यत: वेगवेगळ्या पिकांना लागवडीस योग्य अशी उपलब्ध जमीन, जमिनीचा कस व तिचे घटक, जमिनीचा मगदूर (प्रत), प्रदेशाचा उंच सखलपणां, हवामान, पावसाचे प्रमाण, सिंचीत क्षेत्र, दुष्काळ, उपलब्ध अवजारे, बियाणांची उत्पादनक्षमता , पीक घेण्याच्या पध्दती, खते, सैन्य, चोर व हिंस्रश्वापदांचा उपद्रव इत्यांदीवर अवलंबून होते. असे असले तरी अठराव्या शतकात महाराष्ट्रात शेतीचे लागवडीखालील क्षेत्र विस्तारीत होते.

भारतात प्राचीनकाळापासून बहुसंख्य समाज हा खेडेगावात राहात होता. शेती हाच लोकांचा मुख्य व्यवसाय होता. शेती हाच अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार होता. शेती व्यवसायाशी संबंधित व खेड्यातील लोकांच्या गरजा गावातील विविध कारागीर पूर्ण करत होते. प्रा. डॉ. एन. जी. भवरे यांच्या मते मध्ययुगात महाराष्ट्रात ३९,३५४ खेडी होती. या खेड्यात राहाणाऱ्या लोकसंख्येच्या ८५% पेक्षा अधिक लोक एक तर शेती करत किंवा शेतीशी प्रत्यक्ष निगडीत असलेले व्यवसाय करत असत. पेशवेकालीन आर्थिक परिस्थितींचा अभ्यास करताना प्रामुख्याने शेतीव्यवस्था, महसूल व्यवस्था, पाटबंधाऱ्यांच्या सोईसुविधा, व्यापार आणि उद्योग व्यवसायांचा विचार करावा लागतो.

### ३.२ विषय विवेचन :

मराठा कालखंडात शेती हाच लोकांचा मुख्य व्यवसाय होता. जमीन महसूल हा राज्याच्या उत्पन्नाचा मुख्य आधार होता. त्यामुळेच शिवशाहीत व नंतरही शेतजमीन लागवडीखाली आणण्यासाठी अनेक प्रयत्न झाल्याचे दिसते. शासनाकडून मिळणारे हरतऱ्हेचे प्रोत्साहन, अभय, वतने इनामे देणे, शेतसाऱ्यांत सवलती किंवा काही प्रसंगी सूट देणे, तगाई देणे इत्यादी सोईसवलतीमुळे लागवडीखालील क्षेत्रफळ वाढत होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी जमीनदारी पध्दतीऐवजी रयतवारी पध्दतीचा अवलंब केला. त्यामुळे सामान्य शेतकरी व राजा यांच्यामध्ये सलोख्याचे संबंध निर्माण झाले. जमीन लागवडीखाली आणण्यासाठी अनेक सवलती दिल्या गेल्या. जनावरे, अवजारे व बी-बियाणे करिता सरकारने तगाई पध्दती सुरू केली. मराठाकाळात सुध्दा याच कृषीव्यवस्थेचा अवलंब केला गेला.

#### ३.२.१ कृषी व्यवस्था: जमीन महसूल, पाटबंधारे :

मराठा कालखंडात शेती हा मुख्य व्यवसाय होता. उदरनिर्वाहाचे शेती हे प्रमुख साधन होते. जमीन महसूल हा राज्याच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत होता. मराठाकालीन कृषी व्यवस्थेचा आढावा घेताना शेतजमिनीचे प्रकार, शेतजमिनीच्या इनामाचे प्रकार, कृषीतंत्र, कृषी उत्पादने, जमीन महसूल पध्दती, शेतीसाठी पाणी पुरवठ्याच्या सोई इत्यादीची माहिती घेणे क्रम प्राप्त ठरते.

● **शेतजमिनीचे प्रकार :**

मराठा कालखंडात शेती दोन मुख्य भागात विभागली होती. पहिली गाव पांढरी व दुसरा काळी आई होय.

पांढरी म्हणजे गावची वसाहत ज्या पांढऱ्या मातीच्या जमिनीवर वसाहत होई ती जमीन. काळी म्हणजे ज्या जमिनीवर पिके घेतली जात अशी जमीन होय.

**१) लागवडीखालील जमिन :**

प्रत्यक्ष लागवडीखालील असणारी पिकांची जमीन होय. या जमिनीस काळी आई म्हटले जाते. प्रत्येक शेतकऱ्यांस काळ्या आईबद्दल जिव्हाळा, प्रेम होते. पिकाऊ जमिनीचे अव्वल, दुम, सीम म्हणजेच सरस, मध्यम व कनिष्ठ असे उपप्रकार पडतात. ज्या काळ्या कसदार जमिनीतून दोन पिके घेतली जात. त्यास अव्वल म्हणत. मध्यम प्रतीच्या जमिनीस दुम म्हणत. तर मुरमाड व कोरडवाहू जमिनीस सीम म्हणत.

**२) वांजट जमीन :**

नापिक, पडीक जमिनीला वांजट जमीन म्हणत. अशा वांजट जमिनीचा वापर गावकरी गुराढोरांना चरण्यासाठी, गावच्या यात्रांसाठी अथवा आठवडी बाजार भरविण्यासाठी करत असत. वांजट जमीन लागवडीखाली आणण्यासाठी सरकारचे व पाटील, देशमुख या वतनदारांचे सतत प्रयत्न चालू असत.

**३) जिराईत व बागाईत :**

जमिनीमध्ये घेतल्या जाणाऱ्या पिकांच्या आधारे जिराईत व बागाईत असे दोन प्रकार पडत. पावसाच्या पाण्यावर अवलंबून असणारी सर्वसाधारण पिके जिराईत जमिनीत घेत. तर पाण्याचा वापर करून ऊस, हळद, फळे व भाजीपाला ही पिके बागाईत जमिनीतून घेतली जात.

**४) पाटस्थळ व मोटस्थळ :**

पिकाला पाणी देण्याच्या साधनांवरून पाटस्थळ व मोटस्थळ हे दोन प्रकार पडतात. कालवे, तळे यांच्या साहाय्याने ज्या जमिनीला पाणी दिले जाई त्यास पाटस्थळ म्हणत. तर मोटेच्या साहाय्याने ज्या जमिनींना पाणी दिले जाई त्यास मोटस्थळ म्हणत.

**● शेतजमिनीच्या इनामांचे प्रकार :**

जमिनीवर सरकारची मालकी असे. सरकार विशेष सेवेबद्दल काही लोकांना अगर स्थळांना इनाम देत असे. मराठा कालखंडात जमिनीचा काही भाग हा इनाम जमिनीचा होता. भूमीच्या हक्कदारांचे वतन, इनाम, मिरास, बलुते, उपरी, मोकास, अग्रहार या वर्गात विभाजन होते.

वतन हा अरबी भाषेतील शब्द आहे. त्याचा मूळ अर्थ देश, जमीन असा होतो. वतन म्हणजे एखाद्या पदाधिकाऱ्याला दिले गेलेले भूमिदान. वतन हे नेहमी सेवेच्या मोबदल्यात मिळत असे. ती करमुक्त जमीन असे. तसेच काही अधिकार आणि मानही मिळत असे. इनाम हे कायमचे भूमीदान असे. भूतकाळात केल्या गेलेल्या सेवेबद्दलचा तो पुरस्कार असे. शेतीव्यवस्थेमध्ये मिरासी व्यवस्था सर्वात महत्वाची व प्रमुख होती. मिरास हा अरबी शब्द आहे. ज्या जमिनीवर व्यक्तीचा एकछत्री पिढीजात अधिकार असणाऱ्या जमिनीस मिरास म्हणतात. उपरी ही व्यवस्था मिरास व्यवस्थेप्रमाणे कायमची नव्हती. काही विशिष्ट काळासाठी जमीन दिली जात होती. शेतजमिनीच्या

इनामाचे प्रकार पुढीलप्रमाणे–

**१) धर्मादाय इनाम :**

मध्ययुगीन काळात धर्माला विशेष महत्व होते. या धर्मभावनेचा आदर राखून धर्मक्षेत्रांना , मठ, मंदिरे, मशीद व साधूसंत, फकीर यांना इनाम जमिनी दिल्या होत्या. त्यास देवस्थान इनाम, धर्मादाय इनाम असे म्हणत. या जमिनीतून येणाऱ्या उत्पन्नातून धर्मस्थळांची व्यवस्था मार्गी लावण्यांचा उद्देश होता.

**२) सनदी इनाम/दिवाण निसबत इनाम :**

सरकारने लेखी आदेश काढून देण्यात आलेल्या इनामांना सनदी इनाम किंवा दिवाण निसबत इनाम म्हणत. या इनाम प्रकारात शेतसारा पूर्ण माफ केला जाई किंवा त्यात काही प्रमाणात सवलत दिली जाई.

**३) गावनिसबत इनाम :**

एखाद्या कारागिरास किंवा गावकऱ्यांना आवश्यक वाटणाऱ्या व्यक्तीला गोतसभेत निर्णय घेऊन आपल्या गावाच्या जमिनीपैकी काही जमीन देत असत त्यास गावनिसबत इनाम म्हणत. या इनामांचे प्रमाण संख्येने कमी होते. असे इनाम दिल्यामुळे राज्याच्या महसुलात जो तोटा होत असे तो ग्रामसुमदाय भरत असे. अशा प्रकारच्या इनामांला 'टिकानाती बेगारी' म्हणजे एखाद्याला गावात मजुरीशिवाय दिल्या जाणाऱ्या सेवेबद्दल दिली जाणारी जमीन होय. देहानगी इनाम म्हणजे अनेक प्रकारच्या ग्रामीण कारागिरांना व चाकरांना दिले गेलेले मर्यादीत इनाम होय. ही जमीन गहाण ठेवता येत असे, मात्र विकता येत नसे. परंतु जर तो इनामदार अपेक्षित सेवा देऊ शकला नाही तर गाव ती जमीन परत घेऊ शकत होते.

**४) वतनी इनाम :**

गावचा कारभार पाहणारे अधिकारी पाटील, कुलकर्णी व चौगुले, व्यापारी पेठेचे अधिकारी शेटे–महाजन व परगण्यांचे अधिकारी देशमुख–देशपांडे, यांना त्यांच्या कामाच्या मोबदल्यात वतनी जमीन मिळत असे. बलुतेदारांनाही वतनी जमीन मिळे. हे वतनदार गोरगरीब रयतेचा छळ करत म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांनी वतनदारांची वतने, हक्क, लाजिमे सरकारजमा करून वतनदारांना वेतनदार बनविले होते.

**५) अग्रहार इनाम :**

सरकारकडून एखाद्या ब्राह्मणास संपूर्ण गाव किंवा काही जमीन इनाम म्हणून दिली जाई ती करमुक्त असे अशा इनामास अग्रहार इनाम असे म्हणत.

**६) साडी–चोळी किंवा दुधभात इनाम :**

राजा एखाद्या प्रसंगी आपल्या मुलीस इनाम देत असे त्यास साडीचोळी किंवा दुधभात इनाम म्हटले जाई. छत्रपती संभाजी महाराजांची दुधआई झालेल्या कापूरहोळ येथील गाडेपाटील घराण्यातील धाराऊला दुधभात इनाम दिले होते.

**७) चोळखण इनाम :**

लढाईमध्ये स्वराज्याच्या कामी आलेल्या सैनिकांच्या आईस अथवा बायकोस राजाकडून देण्यात येणाऱ्या इनामास चोळखण म्हणत.

**● मराठाकालीन कृषी तंत्र :**

मराठा कालखंडात शेती व्यवसाय हा पारंपारिक पध्दतीचा होता. बहुतांश शेती ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून होती. मनुष्यबळ, बैलजोडी, शेतीची अवजारे, बी-बियाणे, खते, घात-वाफ साधने, आर्थिक मदत व शेती व्यवसायाची पध्दत इत्यादी घटकांचा अभ्यास कृषी तंत्रामध्ये होतो.

**१) शेती व्यवसायाची पध्दत :**

मराठा काळात शेती व्यवसाय हा पारंपारिक पध्दतीचा होता. पाणी पुरवठ्याची साधने मर्यादित होती. त्यामुळे विहिरी, तलावाच्या साहाय्याने बागायत शेती केली जाई. बहुतांश शेती कोरडवाहू होती. उन्हाळ्याच्या सुरूवातीस जमिन नांगरली जाई. वळवाच्या पावसानंतर कुळवणी, साफसफाई व खते देऊन जमिन पेरणीयोग्य केली जाई. मोसमी पाऊस सुरू होताच घात साधून पेरणी करत. पीक कापणीस येताच काढणी, मळणी केली जाई.

**२) शेतीची अवजारे :**

शेती कसण्यासाठी विविध अवजारांची गरज होती. नांगर, कुळव कोळपा, तिफण, बिलंगा, पाटे, बैलगाडी ही शेतीसाठी महत्वाची अवजारे होती. गावातील सुतार व लोहार हे कारागीर ही अवजारे तयार करत. शेतकरी लाकूड व इतर साहित्य देऊन कारागीरांकडून शेतीस आवश्यक सर्व अवजारे बनवून घेत. सरकारकडून शेती अवजारे खरेदीसाठी तगाई मिळत असे.

**३) बैलजोडी :**

शेती कसण्यासाठी बैलाजोडीची गरज होती. नांगरणी , पेरणी, मशागत, मळणी, मोटेव्दारे शेतीस पाणी देणे, मालांची व माणसांची ने-आण करणे या प्रत्येक कामाकरिता बैलजोडीची नितांत गरज होती. या काळात जनावरे ही शेतकऱ्यांचे पशुधन होते. शस्त्रूच्या स्वारी वेळी रयतेचे व पशुधनाचे संरक्षण केले जाई. मराठा कालखंडात बैलजोडी विकत घेण्यासाठी शेतकऱ्यांना तगाईव्दारे मदत केली जाई.

**४) बी-बीयाणे :**

मराठा कालखंडात पारंपारिक बियाणांचा वापर केला जाई. त्याकाळी संकरित बियाणे उपलब्ध नव्हते. शेतकरी आपल्या पिकांतील उत्तम प्रतीचे धान्य बियाणांसाठी वेगळे काढत व ते काळजीपूर्वक जतन करून ठेवत. एखाद्या बिकट प्रसंगी दिडीच्या (११/२) दराने शेतकरी एकमेकांना बियाणे देत असत. सरकारकडून गरजू शेतकऱ्यांना बियाणे घेण्यास अर्थसहाय्य केले जाई.

### ५) खते :

शेतकरी शेतीसाठी शेणखताचा वापर करत. बैल, म्हैस, गाई, शेळ्या, मेंढ्या, घोडे, गाढव हे शेतकऱ्यांचे पशुधन होते. त्यांच्या मलमुत्रापासून खत तयार करत. शेणखताच्या वापरामुळे उत्पादन चांगले येई.

### ६) घात-वाफ साधणे :

उन्हाळ्याच्या सुरूवातीस जमिनीची नांगरणी केली जाई. वळवाच्या पाऊसानंतर आंतर मशागत करून जमिन पेरणीयोग्य केली जाई. मोसमी पाऊसाला सुरूवात होताच योग्य ओलावा पाहून पेरणी केली जाई. त्यास घात-वाफ साधणे असे म्हणतात. 'झाकुनी मढे करितसे पेरणी' या संत तुकारामांच्या अभंगातून पेरणीसाठी घात-वाफ साधने किती महत्वाचे आहे हे लक्षात येते. शेतीत पुरेसा ओलावा नसेल किंवा जास्त ओलावा असेल तर पेरणी करता येत नसे. जर पेरणी केलीच तर पिकांची उगवण क्षमता अत्यल्प असे. म्हणून शेतकरी सुख-दु:खाच्या प्रसंगाला बाजूला ठेवून शेतीची घात साधून पेरणी करत असे.

### ७) मनुष्यबळ :

मराठाकालखंडात शेती व्यवसाय हा मनुष्यबळ व पशुबळाच्या साहाय्याने केला जाई. जिराईत शेतीपेक्षा बागायत शेतीसाठी व नगदी पिकांसाठी जास्त मनुष्यबळाची व पशूबळाची गरज होती. या कालखंडात आठ महिने मुलूखगिरी व चार महिने शेती अशी पध्दत असलेली दिसते. अनेक प्रसंगी शेतीची कामे एकमेकांच्या सहकार्याने केली जात होती.

### ● कृषी उत्पादने :

मराठा काळात बहुतांश शेती पारंपारिक पध्दतीने, उपजीविकेसाठी अन्नधान्य पिकवले जाई. शेतसारा व कुटुंबाचा उदरनिर्वाह आणि पेरणीचे बियाणे बाजूला काढले जाई. काही अन्नधान्य शिल्लक राहिल्यास त्याची विक्री केली जाई. पाण्याची सोय असणाऱ्या ठिकाणी काही प्रमाणात व्यापारी स्वरूपाची नगदी पिके घेतली जात असत.

### अ) अन्नधान्य उत्पादने :

### १) जोंधळा :

महाराष्ट्रात देशावर जोंधळा हे पीक मोठ्या प्रमाणात घेत असत. काही भागात खरीप व रब्बी अशा दोन्ही हंगामामध्ये हे पीक घेत असत. जोंधळ्याचा उपयोग खाद्यान्न म्हणून केला जाई. तर पिकांच्या ताटांचा उपयोग जनावरांच्या चाऱ्यांसाठी होई.

### २) बाजरी :

सह्याद्रीच्या पूर्वेकडील कमी पावसाच्या प्रदेशात बाजरी पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाई. जोंधळा, बाजरीपासून भाकरी केली जाई तर या पिकांच्या ताटांच्या उपयोग जनावरांच्या चाऱ्यांसाठी होई.

### ३) तांदूळ :

जास्त पाऊस असणाऱ्या ठिकाणी तसेच पाण्याची उपलब्धता जास्त असलेल्या ठिकाणी तांदूळाचे उत्पादन

चांगले येई. कोकणात व सह्याद्रीच्या पूर्वेकडील नजीकच्या प्रदेशात तांदूळाचे पीक घेतले जाई. मेजर जार्विसने कोकणातील तांदूळाच्या जमिनीचे बारा प्रकार सांगितले आहेत. तांदूळाचा उपयोग भात, भाकरी व अनेक प्रकारचे खाद्यवस्तू तयार करण्यासाठी केला जाई.

**४) गहू व हरभरा :**

महाराष्ट्रात कृष्णा, वारणा, पंचगंगा, भीमा व गोदावरी या नद्यांच्या सखल भागात गहू व हरभरा हे पीक घेतले जाई. तसेच सह्याद्री नजीकच्या पूर्व भागात जिथे आडव्या पाटाच्या पाण्याची सोय असलेल्या ठिकाणी गहू व हरभरा ही पिके घेतली जात.

**५) नाचणी :**

तांबूस, मुरमाड व पाण्याचा निचरा होणारी जमिन नाचणी पिकास उत्तम मानली जाते. कोकणातील उताराच्या जमिनीवर हे प्रमुख पीक घेत असत. नाचणीप्रमाणे वरई (वरी) चे पीकदेखील घेतले जाई.

**६) कडधान्ये :**

उडीद, मटकी, मूग, मसूर, तूर, हुलगा ही पिके कडधान्ये म्हणून ओळखली जात. लोक आहारात कडधान्ये वापरत असत. कडधान्ये हा अंतर्गत व्यापारातील एक महत्वाचा घटक होता.

**७) विविध प्रकारची फळे :**

कोकणात आंबा व फणसाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाई. मराठा कालखंडात आंबा, फणस, लिंबू, चिंच, बोर, केळी इत्यादी फळांचे उत्पादन घेतले जाई.

**ब) नगदी पिके / व्यापारी पिके :**

पैसा मिळवून देणाऱ्या पिकांना नगदी पिके किंवा व्यापारी पिके म्हणत. या पिकांचा उद्योगांसाठी तसेच निर्यातीसाठी वापर होत असे.

**१) मसाल्याचे पदार्थ :**

मराठा काळात मसाल्याच्या पदार्थाची मोठ्या प्रमाणात परदेशात निर्यात होत असे. मसाल्याच्या पदार्थाचे उत्पादन कोकणात मोठ्या प्रमाणात घेतले जाई. जिरे, मिरे, वेलची, दालचिनी, लवंग, तमालपत्र, जायपत्री या मसाल्याच्या पदार्थाच्या उत्पादनासाठी कोकण प्रसिध्द होते.

**२) तेलबिया :**

करडई, तीळ, मोहरी, भुईमूग या पिकांचा समावेश तेलबियांमध्ये होत असे. तेलबियांचे उत्पादन व्यापारी पीक म्हणून घेतले जाई. तेली लाकडी घाण्यापासून तेल काढण्याचा व्यवसाय करत असत.

**३) ऊस :**

ऊस हे एक नगदी पीक होते. कोल्हापूर, सांगली , सातारा भागात ऊसाचे उत्पादन मोठ्याा प्रमाणात घेतले

जाई. कोल्हापूर , कराड व इंदापूर याठिकाणी गुळाच्या बाजारपेठा भरभराटीस आल्या होत्या. ऊसापासून गूळ तयार करण्याचा व्यवसाय केला जाई.

**४) नारळ व सुपारी :**

नारळ व सुपारीच्या उत्पादनासाठी कोकण अग्रेसर होता. धार्मिक कार्यासाठी व दैनंदिन वापरासाठी नारळ व सुपारीचा वापर केला जाई. त्यामुळे व्यापारी तत्वानुसार याचे उत्पादन घेतले जाई.

**५) तंबाखू व हळद :**

इ.स. १६०० च्या सुमारास पोर्तुगिजांनी भारतात तंबाखू पिकाची सुरूवात केली. तंबाखू पिकाचा अल्पावधीत देशभर प्रसार झाला. तंबाखू व हळद यांचे उत्पादन व्यापारी तत्वावर घेतले जाई.

**६) कापूस :**

वस्त्र हे जीवनाश्यक असल्याने कापूस उत्पादनाला सतत चांगली मागणी होती. महाराष्ट्राच्या अनेक भागात कापसाचे उत्पादन घेतले जाई. महाराष्ट्रात पैठण, चांदवड, येवला, पुणे, सातारा व चौल याठिकाणी विणकाम व्यवसाय सुरू होता. धोतरजोड्या व जाडेभरडे कापड पुण्यात तयार होत असे.

● **मराठाकालीन शेतीसुधारणा :**

छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणे मराठा काळातही शेतीस उत्तेजन दिले. त्यामुळे पेशव्यांच्या काळात लागवडीखालील क्षेत्रात वाढ झाल्याचे दिसते. पेशव्यांच्या काळात सरकारने कालवे, बंधारे खोदून शेतीस पाटाने पाणी देण्याच्या सोयी केल्या होत्या. तसेच बांधबंधाऱ्यांच्या दुरूस्तीसाठी प्रयत्न केले. गावोगावी धान्य साठविण्यासाठी पेवे किंवा धान्य कोठारे बांधली. परप्रांतातून मोठ्याा प्रमाणात कसबी कारागीर महाराष्ट्रात स्थायिक झाले. त्यामुळे शेतमालाची मागणी वाढल्यामुळे शेतमालाच्या किंमतीही वाढल्या. पेशव्यांनी पडीक, खडकाळ आणि समुद्राच्या पाण्यात बुडालेली जमीन लागवडीखाली आणण्याकरिता उत्तेजन दिले. कसबे गुहागरचे महाजन नारो अनंत परचुरे यांनी पेशव्यांकडे जमीन लागवडीखाली आणण्यासाठी मदतीची विनंती केली. पेशव्यांनी ही विनंती मान्य करून जमीन लागवडीखाली आणण्यास उत्तेजन दिले त्यानुसार:

१. तालुक्यातील खडकाळ जमीन दुसरीकडून माती आणून ती चांगली करून लागवडी खाली आणावी. तसेच ओढे नाले भरून काढावेत. असे काम करणाऱ्यास निम्मी जमीन इनाम देण्यात येईल. राहिलेल्या निम्म्या जमिनीचा शेतसारा २० वर्षापर्यंत निम्मा घेतला जाईल. २५ वर्षानंतर अशा जमिनीचा नियमित शेतसारा घेतला जाईल.

२. शेती करण्यासाठी उपयुक्त असलेली पण समुद्राच्या पाण्यात बुडालेली जमीन तिला बंधारा घालून लागवडीखाली आणणाऱ्या शेतकऱ्यास १/४ जमीन इनाम देण्यात येईल. राहिलेल्या ३/४ जमिनीच्या महसुल किती वर्षासाठी व किती माफी द्यावयाची हे या कामासाठी किती मेहनत व रक्कम खर्च झाली यावरून ठरविण्यात येईल, असे सवाई माधवराव पेशवे यांनी जाहिर केले होते.

३. शेतीच्या कामासाठी आणि इतर कामासह जातीवंत जनावरांची गरज होती. शनिवारवाड्यात पश्चिम बाजूस पेशव्यांची गोशाळा होती. या गोशाळेत हणमगाई या जातीवंत गाईचा संग्रह होता. नानासाहेब पेशव्यांनी कान्हेरे यास पत्र लिहून ५०० हणमगाई पाठवण्याची आज्ञा केली होती. श्रीपतराव प्रतिनिधी यांच्याकडे ३०० ते ३५० गाई वासरांचे खिलार होते. हणमजातीचे गाई व बैल सुंदर आणि बळकट असल्याने शेती करण्यासाठी शेतकऱ्यांना उपयोग होत असे. पेशव्यांनी शेतीस उत्तेजन दिल्यामुळे पेशवाईच्या अखेरीस जमीन मोठ्या प्रमाणात लागवडीखाली आली. एलफिन्स्टन यांनी मराठ्यांची जमीन लागवडीखाली आणण्याची पध्दत चांगली वाटल्याने त्यांनी ती सुरू ठेवण्याची सरकारला शिफारस केली. ड्यूक ऑफ वेलिंग्टन यांनी हा मुलूख पाहिल्यावर देशातील जमीन पुष्कळच लागवडीखाली आली आहे अशी नोंद केली.

**● जमीन महसूल :**

आर्थिकदृष्ट्या सबल असणारी सत्ताच विकासाच्या दृष्टीने सक्षमपणे वाटचाल करू शकते. राज्यकारभार चांगला करण्यासाठी राज्याची तिजोरी भरलेली असणे गरजेचे असते. विविध करांच्या माध्यमातून सरकार आपली तिजोरी भरत असते. जकात, अबकारी कर, सागरी व्यापार, जंगल खात्याचे उत्पन्न, मच्छीमारी, युध्दातील लूट, टांकसाळ या विविध करांच्या माध्यमातून सरकारला उत्पन्न मिळते.परंतु मराठा कालखंडात जमीन महसूल हेच सरकारी उत्पन्नाचे मुख्य साधन होते.

बिघावनी, पीक पाहणी व सारा आकारणी हे जमीन महसूलातील तीन महत्वाचे टप्पे होते. शिवकाळात शेतीपासून मिळणारा महसूल हाच राज्याच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत होता. महसूल निश्चित करण्यापूर्वी जमिनीची मोजणी केली जाई. त्यास बिघावणी, चावरन किंवा चकबंदी म्हणत. शिवाजी महाराजांनी जमीन मोजण्यासाठी शिवशाहीकाठीचा वापर केला. या काठीची लांबी ५ हात ५ मुठी व २ तसू इतकी होती. १ तसू म्हणजे दोन बोटांच्या सांध्यातील अंतर. १ मूठ म्हणजे अंगठ्याजवळचे बोट व करंगळी आणि १ हात म्हणजे ७ मुठी होय. २० चौरस काठ्यांचा १ पांड, २० पांडाचा १ बिघा व १२० बिघ्यांचा १ चावर होई. जमिनीच्या मोजणीनंतर तिची प्रतवारी केली जाई. त्यानंतर पीक पाहणी करून सारा आकारण्यात येई.

शिवकाळात सारा निश्चित करण्याचे तीन प्रयत्न झाले. १६३६ साली दादोजी कोंडदेव यांनी पुणे-मुठे-मावळ या परगण्यात प्रथम प्रयोग केला. १६४८-४९ साली मोरो त्रिमल पिंगळे या पेशव्याने शिरवळ परगण्याचा धारा निश्चित केला. तर १६७८ साली आण्णाजी दत्तो यांनी रोहिडखोऱ्यात शेतसारा निश्चित केला. मेजर जार्विसच्या मते शिवाजी महाराजांनी रायगड, अंजनवेल, रत्नागिरी, विजयदुर्ग या भागातून प्रत्येकी दोन गावे निवडून तेथील तीन वर्षाच्या उत्पन्नाचा अंदाज काढला व त्या आधारे शेतसारा ठरविला. शिवकाळात रोखीने आणि धान्य स्वरूपाने शेतसारा वसूल केला जाई. जमीन महसूल हा उत्पन्नाच्या २/५ (राजभागपचादुई) एवढा आकारला जात असे. शिवकालीन जमीन महसूलाबाबत पेशवेकालीन महाराष्ट्र या ग्रंथात वा. कु. भावे म्हणतात की, शिवकाळात १/३ एवढी महसूलाची रक्कम ठरवली. असा महसूल प्रत्येक शेतकऱ्यांकडून न वसूल करता संपूर्ण गावाने किती शेतसारा भरावा हे निश्चित केले. त्यानुसार पाटलाने गावातील प्रत्येक शेतकऱ्यांवर महसूलाची वाटणी करावी गावच्या महसूलाच्या वसुलीसाठी पाटलास जबाबदार धरत. त्यामुळे पाटलाच्या अधिकारात वाढ झाली.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जमीन महसूल व्यवस्थेबाबत ग्रँट डफ आपल्या ग्रंथात म्हणतात की, शिवकाळात महसूल हा प्रत्यक्ष पिकाच्या परिस्थितीवर अवलंबून असे शेतकऱ्यांनी स्वत:कडे उत्पन्नाच्या ३/५ हिस्सा ठेवावा व २/५ हिस्सा सरकारात महसूल म्हणून जमा करावा. जेंव्हा एखादा प्रदेश जिंकून घेतल्यावर त्यावर मालकी प्रस्थापित होई. तेंव्हा त्या प्रदेशातील लष्करी कर बंद केला जाई. आणि शिवाजी महाराजांनी नेमलेल्या मुलकी अधिकाऱ्यांकडून महसूल जमा केला जाई. शिवाजी महाराजांची जमीन महसूल व्यवस्था ही शेतकऱ्यांचे हित जोपासणारी होती.

● **मराठाकालीन जमीन महसूल व्यवस्था :**

शिवशाहीप्रमाणेच पेशवाईतसुध्दा जमीन महसूल हेच राज्याच्या उत्पन्नांचे मुख्य साधन होते. शेती व्यवसायाला उत्तेजन देऊन रयतेला खूश ठेवण्याचा प्रयत्न पेशव्यांनी केला. त्यांनी पडीक जमीन लागवडीखाली आणण्याचा प्रयत्न केला. शेतकऱ्यांना पेरणीच्या हंगामात तगाई (सरकारी कर्ज) दिली. जमीनदार, सावकार यांच्याकडून शेतकऱ्यांचे शोषण होणार नाही याची काळजी घेतली. शेतकऱ्यांकडून योग्य शेतसारा घेण्यावर भर दिला. त्यामुळे उत्तर पेशवाईत जमीन पुष्कळच लागवडीखाली आल्याची नोंद डयूक ऑफ वेलिंग्टन यांनी केली आहे.

शिवशाहीप्रमाणेच पेशवाईतसुध्दा राज्याच्या उत्पन्नांचे महत्वाचे साधन म्हणजे जमीन महसूल होय. जमीन महसूल हा उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत असल्याने पेशव्यांनी त्याकडे बारकाईने लक्ष दिले. सन १७५८ मध्ये पेशवे बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब यांनी महसूल वसूलाची घडी नीट बसविली. त्यानंतर नाना फडणविस यांनी त्यांच्या कारकिर्दीत महसूल व्यवस्थेतील त्रुटी दूर करून तिला पूर्णत्व देण्याचा प्रयत्न केला. दुसऱ्या बाजीरावाच्या कालखंडात या महसूल व्यवस्थेची घडी बिघडलेली दिसते.

शिवकाळाप्रमाणे पेशवाईतही जमीन महसूल पध्दत थोड्याफार फरकाने पेशवेकाळात सुरू होती. बिघावणी, पीक पाहणी व सारा आकारणी हे महसूलातील तीन महत्वाचे टप्पे होते. पेशवेकालीन जमीन महसूल व्यवस्था पुढीलप्रमाणे.

१. **बिघावणी :**

जमिनीच्या मोजणीसाठी मराठाकाळातदेखील शिवशाही काठीचा वापर केला गेला. २० चौरस काठ्यांचा १ पांड २० पाडांचा १ बिघा व १२० बिघ्यांचा १ चावर, हे जमिनीचे तत्कालीन मोजमाप होते. यालाच बिघावणी चावरान किंवा चकबंदी असे म्हणत.

२. **पीक पाहणी :**

बिघावणी केल्यानंतर लागवडीखाली असलेल्या जमिनीची तिच्या मगदुराप्रमाणे प्रतवारी ठरवली जाई. अशा जमिनीत कोणती पिके येतात. वर्षातून एक पिक घेतले जाते की दोन पिके घेतली जातात. बिघ्यांतून किती उत्पादन घेतले जाते. याची माहिती गोळा केली जाई. खेड्यातील सर्व शेतकऱ्यांच्या शेती व पिकांसंबंधी माहिती देणारे एक पत्रक तयार केले जाई त्यास पीकपाहणी असे म्हणत.

## ३. जमिनीचे वर्गीकरण :

जमिनीची प्रत व पिकाऊपणा यावर आधारित तिचे वर्गीकरण अव्वल, दुम सीम असे प्रकार केले जात. या जमिनीतून घेतल्या जाणाऱ्या पिकांवरून बागाईत व जिराईत असे दोन प्रकार केले जात. पिकांना पाणी देण्याच्या पध्दतीवरून पाटस्थळ व मोटस्थळ असे दोन उपप्रकार केले जातात. ओढ्या नाल्यांवर अथवा छोट्या नद्यांवर लहान लहान बंधारे घालून त्यातील पाणी पाटाने शेतीस पुरविले जाई त्यास पाटस्थळ म्हणत. तर विहीरीतून मोटेच्या साह्याने पिकास पाणी दिले जाई त्यास मोटस्थळ म्हणत.

## ४. शेतसारा आकारणीची तत्वे :

शिवशाहीप्रमाणे पेशवाईतही शेतसारा निश्चित करताना पुढील प्रमुख तत्वांकडे काळजीपूर्वक लक्ष दिले जात असे.

अ) लागवडीखाली असलेल्या जमिनीवरच शेतसारा आकारण्यात येत असे.

ब) वांजट किंवा पडीक जमिनीवर कोणताही शेतसारा आकारला जात नसे.

क) शेतीच्या वर्गीकरणानुसारच शेतसारा निश्चित केला जात असे.

ड) शेतसारा पीकनिहाय पध्दतीने निश्चित केला जात असे.

इ) नगदी पिकांवर अधिक शेतसारा आकारला जाई.

## ५. जमिनीच्या वर्गवारीनुसार सारा :

पेशवेकाळात शेतसारा हा रोख रक्कमेच्या स्वरूपात किंवा धान्याच्या स्वरूपात घेण्यात येत असे. पेशवेकालीन जमिनमहसूल पध्दत पुढीलप्रमाणे–

| जमिनीचा प्रकार | मण |
|---|---|
| अव्वल (सरस) | ३। |
| मध्यम (दूम) | २।। |
| कनिष्ठ (सीम) | १।।। |

थोरल्या माधवराव पेशव्यांनी नेरळ तालुक्यातील जमिनींना व पिकांना लावलेले वेगवेगळे दर खालीलप्रमाणे–

| जमिनीचा प्रकार (प्रत्येक बिघ्यास) | रुपये | आणे | पैसे |
|---|---|---|---|
| अव्वल (सरस) | ५ | ० | ० |
| मध्यम (दूम) | ४ | ० | ० |
| कनिष्ठ (सीम) | ३ | ० | ० |
| रब्बी | १ | ८ | ० |
| वरकस | १ | ८ | ० |

ज्या बागाईत जमिनी पूर्वीपासून लागवडीखाली होत्या त्या जमिनीवर सारा प्रति बिघ्याला १० रूपये असे. नव्याने बागाईतीखाली आणलेल्या जमिनीवर प्रतिबिघा शेतसारा पुढीलप्रमाणे–

| वर्ष | प्रतिबिघा | |
|---|---|---|
| | पाटस्थळ | मोटस्थळ |
| प्रथम | ५ रू. | १ रू. |
| दुसरे | ६ रू. | २ रू. |
| तिसरे | ७ रू. | ३ रू. |
| चौथे | ८ रू. | ४ रू. |
| पाचवे | १० रू. | ५ रू. |

नानासाहेब पेशवा यांने हवेली येथील आपल्या अधिकाऱ्यांना सन. १७४०–४१ मध्ये दिलेल्या आज्ञेत शेतसाऱ्यांचे स्वरूप पुढीलप्रमाणे–

जमिनीला प्रत्येक बिघ्याला १० मण धान्य, ऊस जमिनीस प्रतिबिघा ५ रूपये तर भाजीपाला पिकवणाऱ्या जमिनीस प्रत्येक बिघा २ रूपये शेतसारा करावा. पाटील किंवा शेतकऱ्यांकडील आंब्याच्या झाडांना आंबे लागण्यापासून १००० आंब्यास एक रूपया महसूल घ्यावा. सरकारी आमराईतील झाडांचे आंबे सरकार जमा करावेत.

**६. नारळ व इतर झाडापासून महसूल :**

मराठाकाळात कोकणच्या विस्तीर्ण  किनारपट्टीचा प्रदेश स्वराज्यात समाविष्ठ होता. समुद्रकिनारी नारळाची झाडे लावण्यास लोकांना उत्तेजन देण्याचे काम पेशव्यांनी केले. भंडारी लोकांना झाडापासून दारू काढण्याकरिता प्रोत्साहन दिले. उदाणीच्या झाडापासून पहिल्या १२ वर्षापर्यंत, सुपारीच्या झाडापासून पहिल्या १५ वर्षापर्यंत तर नारळाच्या झाडापासून पहिल्या २० वर्षापर्यंत शेतसारा माफ असे. हा कालावधी पूर्ण झाल्यानंतर उदाणीच्या झाडापासून ३ आणे, सुपारी झाडास १ रूपया तर नारळाच्या प्रत्येक झाडास ४ आणे महसूल द्यावा. भंडारी लोकांनी जर ताडामाडाचे झाड लावले तर त्यांच्याकडून प्रत्येकी एक रूपया व झावळयाचा एक भारा घ्यावा.

**७. पडजमीन लागवडीखाली आणण्याचे धोरण :**

पेशवा पहिला बाजीरावापासून सवाई माधवरावापर्यंत सर्व पेशव्यांनी पडजमीन लागवडीखाली आणण्याचा कसोशीने प्रयत्न केला. शेतकऱ्यांनी डोंगराळ जमीन फोडून खाचखळगे मातीने भरून जमीन तयार करावी, अशा जमिनीवर पहिली २० वर्षे सारा माफ होता. त्यानंतर च्या ५ वर्षात टप्याटप्याने शेतसारा वाढवून २५ वर्षानंतर त्या जमिनीवर पूर्ण शेतसारा आकारला जाई. पेशव्यांनी पडजमीन लागवडीखाली आणण्यासाठी शेतसाऱ्यात भरघोस सूट दिल्याने मोठ्या प्रमाणात जमीन लागवडीखाली आली.

## ८. संकटकाळी शेतसाऱ्यात सूट :

रोगराई, दुष्काळ किंवा लूटमारीमुळे पिक आले नाही किंवा पिकाचे नुकसान झाले तर सरकारकडून त्यावर्षी जमीन महसूलात सूट दिली जाई. सन १७४५-४६ साली कानू गावात भयंकर आग लागली. त्यामुळे सरकारने शेतकऱ्यांच्या वेदना जाणून त्यावर्षीचा संपूर्ण गावावरील शेतसारा माफ केला. त्या गावाकडून केवळ नाममात्र १ खंडी (१२ मन) एवढाच शेतसारा घेतला. बावडा परगण्यातील रामचंद्र बल्लाळ या अधिकाऱ्यांने १७४७-४८ साली येथील दुष्काळाची विदारक हाकिकत पेशव्यांना कळविली. पेशव्यांनी बावडा परगण्याचा सारा चार वर्षे माफ केला. पाचोरा तेथील शेतकऱ्यांना शेतीत चांगले पीक आले नाही. हे कळताच सरकारने महसूलात निम्मी सूट दिली. १७७०-७१ सालात आळंदी गाव शत्रूने लुटले. तेथील अधिकाऱ्यांनी पेशवा माधवरावाकडे साऱ्यात सूट मिळण्याची विनंती केली. पेशव्यांनी पुढील दोन वर्षे शेतसारा पूर्ण माफ केला.

## ९. तगाई :

शिवकाळापासून तगाईची पध्दत सुरू होती. सरकारकडून मिळणाऱ्या बिनव्याजी कर्जास तगाई म्हणत. गरजू व्यक्तींना तगाई दिली जाई. त्या भागातील कमावीसदार किंवा मामलेदार आपल्या वसुलातून तगाईची रक्कम देत. त्याची मुदत ३ ते ७ वर्षे असे. तगाई देताना रयतेची जमीन गहाण ठेवू नये तसेच जमिनीची विक्रीही करू नये. तगाई वसूल करताना रयतेवर अन्याय होणार नाही याची खबरदारी घेत. डॉ. सुरेंद्रनाथ सेन यांनी या पध्दतीचे दोन उपयोग सांगितले आहेत.

अ) शेतकऱ्याला दुष्काळ व टंचाईच्या काळात पैसा उपलब्ध करून देणे.

ब) रयतेची सावकारी पाशातून सुटका करणे.

तगाईमुळे रयतेचा पैशाचा प्रश्न सोडविला जात असे. तगाईमुळे रयतेला मोठा दिलासा मिळाला होता.

## १०. महसूल अधिकारी / मुलकी अधिकारी :

मराठाकाळात जमीन महसूल वसुलीच्या अनेक पध्दती होत्या. महसूल वसूल करणारे अधिकारी व त्यांची कामे पुढीलप्रमाणे.

**अ) मामलेदार :** मामलेदार हा पगारी अधिकारी होता. महसूल वसुलीचा तो प्रमुख अधिकारी होता. प्रत्येकी कुळाने पुढील ५ वर्षासाठी किती शेतसारा द्यावा हे तो निश्चित करत असे. तो आपल्या हाताखालील पाटील, कुलकर्णी व नोकरांच्या मदतीने सारा वसूल करीत असे. मामलेदाराकडे शिबंदी(सैन्य) असे. रयतेच्या पिकांचे संरक्षण करणे ही त्याची जबाबदारी होती. मामलेदाराला दरसाल ५००० रूपये पगार असे.

**आ) कमाविसदार :** तर्फामध्ये कमाविसदार हा महसूल अधिकारी होता. त्याला मामलेदाराएवढे अधिकार होते. कमाविसदार कुळांना तगाई देणे, पाटांची दुरूस्ती करणे, बागा खंडाने देणे, शेतकऱ्यांना धीर व पाठबळ देवून त्यांना शेती करावयाला लावणे ही त्यांची कामे होती. कमाविसदाराकडेही शिबंदी(सैन्य) असे. शेतकरी व त्यांच्या पिकांचे रक्षण करण्याचे काम तो करत असे.

**इ) खोत :** कोकणातील गावचा वसूल खोत करत असे. पाटील व कुलकर्णी या दोघांचे अधिकार व कामे खोत करत असे. कधी तो हाताखाली कारकूनही ठेवत असे. खोताकडे गावच्या पाटीलकीचे वतन होते पण ते वंश परांपरागत नव्हते. गावच्या वसुलाचा मक्ता खोताकडे होता.

पेशवा दुसऱ्या बाजीरावाच्या काळात उत्कृष्ठ अशी मराठ्यांची महसूल पध्दत बंद झाली. त्याऐवजी मामलती मक्त्याने देण्याची पध्दत सुरू झाली. परिणामी मामलेदार रयतेवर जुलूम करू लागले. त्यामुळे पेशवा दुसरा बाजीरावाने रयतेचा विश्वास व सहानुभूती गमावली.

पेशवेकाळात जमीन महसूल पध्दत ही लोकाभिमुख होती. डॉ.सुरेंद्रनाथ सेन यांच्यामते पेशव्यांच्या महसूल पध्दतीचे मुख्य सूत्र म्हणजे करदात्यांची भरभराट हे होते. पेशव्यांच्या महसूल पध्दतीविषयी न्या. महादेव गोविंद रानडे म्हणतात की, बाळाजी बाजीराव, माधवराव व नाना फडणवीस यांच्या कारकिर्दीत महसूल पध्दतीची उत्तम काळजी घेतलेली दिसून येते. त्यांनी उत्पन्नाची जुनी साधने टिकवून धरली व नवी निर्माण केली. जमीन महसुलाच्या बाबतीत पेशव्यांनी लोकांवर अन्याय केला नाही. परंतु त्याचबरोबर सरकारचा हक्क मात्र त्यांनी गमावलेला नाही. ही सर्व पध्दत सरकारला उपयुक्त अशीच केलेली दिसून येते.

**● पाटबंधारे / शेतीसाठी पाणीपुरवठ्याच्या सोई :**

मध्ययुगात बहुतांश शेती ही निसर्गाच्या मेहेरबानीवरच अवलंबून होती. पाऊस पडला नाही तर दुष्काळाची अवस्था होई. मराठा कालखंडही त्याला अपवाद नव्हता मराठा कालखंडातही शेती प्रामुख्याने पावसावर अवलंबून होती. बागाईत शेती आणि बारमाही बागाईत शेतीचे प्रमाण अत्यल्प होते. पारंपारिक पध्दतीने विहीरी व पाटाच्या पाण्यावर शेती करत असत. शेतीवर आधारलेल्या अर्थव्यवस्थेत पाटबंधारे, कालवे व धरणे यांना अनन्य साधारण महत्व होते. मराठाकालीन शेतीसाठी पाणीपुरवठ्याच्या सुविधा पुढीलप्रमाणे-

**१) मोटस्थळ :**

शेतात विहीर खणून मोटेच्या साह्याने जमिनीला पाणी दिले जाई याला मोटस्थळ असे म्हणतात. दोन किंवा चार बैलांचा वापर करून मोटेच्या साहाय्याने विहीरीतील पाणी काढून ते पिकांना दिले जाई. विहीरीचे प्रमाण अत्यल्प होते.

**२) पाटस्थळ :**

लोक एकत्रित येऊन श्रमदानाने किंवा शासनाच्या सहकार्याने नदी, नाले किंवा गावाजवळून वाहणाऱ्या ओढ्यावर बांध घालून पाणी अडवीत. अडवलेले पाणी नैसर्गिक उतारानुसार पाट काढून शेतीला पुरवले जाई. त्यास आडव्या पाटाचे पाणी किंवा पाटस्थळ म्हणत. शेतकरी विचार विनिमयाने या पाण्याच्या वापराचे नियोजन करत. शिवकाळात ॲबे कॅरे हा फ्रेंच प्रवासी पश्चिम किनारपट्टीवर येऊन गेला. त्याने आपल्या प्रवास वर्णनात कोकणातील डोंगरकपारीच्या ठिकाणी अनेक गावात लहान लहान नद्यांना बंधारे घातल्याचे व त्यांचे पाट काढून शेतीला उपयोग केल्याचे त्याने नोंद केले आहे.

पेशवाईत तलाव बांधणे, विहीर खोदणे याकरिता सरकारातून खर्चाची रक्कम मिळत असे तर काही वेळेस तलावाच्या बांधकामासाठी किंवा दुरूस्तीसाठी होणारा खर्च सरकार व लोकवर्गणीतून केला जाई. पेशवेकाळात पाटबंधारेबाबत झालेली काही महत्वाची कामे पुढीलप्रमाणे.

**अ) बंधारे व पाट बांधणे :** बागलाण प्रांतातील बंधाऱ्यांतून पाटाव्दारे शेतीस पाणी पुरविले जाई. हे बंधारे फुटल्यामुळे शेतीस पाणी जाणे बंद झाले. त्यामुळे हे बंधारे व पाट बांधण्यास दरवर्षी ५००० रूपये याप्रमाणे एकूण २५००० रूपये खर्च करण्यास मान्यता मिळाली.

**ब) सावकी बंधारा दुरूस्ती :** लोकनेर परगण्यातील सावकी या गावातली बंधारा जीर्ण झाला होता. अतिजीर्णतेमुळे चार पाच ठिकाणाहून पाणी वहावू लागले. तो वेळेवर दुरूस्ती न केल्याने २००० रूपये महसुलाचा गाव अवघ्या ४०० ते ५०० रूपये महसूलावर येईल. हे ओळखून पेशव्यांनी सावकाराकडून कर्ज घेवून बंधाऱ्यांची डागडुजी करण्याची आज्ञा दिली.

**क) जामखेड बंधारा दुरूस्ती :** बागलाण प्रांतात कसबे जामखेड येथे दोन बंधाऱ्यातून पाटस्थळाने जमिनीला पाणीपुरवठा होत होता. त्यातील एक बंधारा वाहून गेला. राधो नारायण कुलकर्णी यांनी तो बंधारा बंदिस्त करण्याची जबाबदारी घेतली. याकामासाठी ८ ते १० हजार रूपये खर्च अपेक्षित होता. जामखेड गावचे महसूली उत्पन्न ५००० रूपये होते. बंधारा बांधल्यावर १४ वर्षानी ते ८५०० रूपये होईल असा अंदाज होता. म्हणून पेशव्यांनी राधो नारायण यांस बंधारा बांधण्याची आज्ञा दिली. त्या मोबदल्यात त्यास १०० बिघे नवीन बागाईत जमिनीपैकी १० बिघे इनाम याप्रमाणे ४० बिघे जमीन इनाम देण्याचा करार केला. राधो नारायण कुलकर्णी यांनी स्वत:च्या पैशाने बंधारा बांधला. त्याचा लाभ सरकार व गावकऱ्यांना झाला.

**ड) बनेश्वर धरण निर्मिती :** बनेश्वर येथील धरणासाठी ८०० रूपये खर्च अपेक्षित होता. या धरणनिर्मितीसाठी सरकारकडून ४०० रूपये दिले गेले. उर्वरित ४०० रूपये ज्याला धरणाचे पाणी मिळणार होते त्यांच्या कडून घेण्यात आले.

**इ) कोपल परगणा धरण दुरूस्ती :** कोपल परगण्यात धरण बांधून पाटस्थळाच्या माध्यमातून शेतीस पाणी पुरवठा केला जाई. या परगण्यातील गोविंदराव यादव यांनी सरकाकडे अर्ज करून धरण नादुरूस्त झाल्याचे निदर्शनास आणले. या धरणाच्या दुरूस्तीसाठी पेशव्याकडून २००० रूपये मंजूर करणेत आले.

ई) तुंगभद्रा नदीवर कालव्याचा बंधारा होता तो बंधारा फुटला. सरकारने तो बांधण्यासाठी जलद हालचाल केली नाही. तेंव्हा लोकांनी तो बंधारा बांधण्यासाठी पेशव्यांवर दबाव टाकल्याचे दिसते.

पेशवेकाळात धरण व पाटाच्या कामासाठी सरकारातून व लोक वर्गणीतून प्रसंगी सावकारातून कर्ज घेऊन कामे केली. काही प्रसंगी धरणाच्या बांधकामासाठी इनाम जमीन देऊन अधिकाधिक जमीन बागाईती करण्याचे करण्याचे प्रयत्न केले. पाटबंधाऱ्यांचा लाभ शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी व सरकारचा महसूल वाढविण्यासाठी झाला. याविषयी ड्यूक ऑफ वेलिंग्टन म्हणतात 'देशातली जमीन पुष्कळच लागवडीखाली आली आहे.'

● **स्वयंअध्ययन प्रश्न क्र. १**

**अ) योग्य पर्याय निवडून खालील वाक्ये पूर्ण करा.**

१) नापिक पडीक जमिनीला --------- म्हणतात.

अ) वांझट ब) पाटस्थळ क) काळी आई ड) अव्वल

२) मराठाकाळात प्रत्यक्ष शेती केली जाई त्या जमिनीस --- म्हणत.

अ) पांढरी ब) काळी आई क) अग्रहार ड) गाव पांढरी

३) पेशव्यांच्या काळात मामलेदारास दरसाल ----- पगार दिला जाई.

अ) तीन हजार ब) चार हजार क) पाच हजार ड) सहा हजार

४) १७४५-४६ मध्ये ------ गाव आगीच्या भक्षस्थानी पडले.

अ) पुणे ब) सातारा क) पाचवड ड) कानू

५) मराठ्याची नावाजलेली महसूल पध्दत -- पेशव्याच्या काळात बंद पडली.

अ) दुसरा बाजीराव ब) माधवराव क) सवाई माधवराव ड) नानासाहेब

**ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) अग्रहार म्हणजे काय ?

२) मोटस्थळ म्हणजे काय ?

३) पेशव्यांच्या गोशाळेत कोणत्या जातीतील गाईचा संग्रह होता ?

४) पाटस्थळ म्हणजे काय ?

५) तगाई म्हणजे काय ?

### ३.२.२ उद्योगधंदे :

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यातील पेढ्या, व्यापार व उद्योगधंद्याना संरक्षण दिले होते. व्यापार व उद्योग वाढीशिवाय राज्याची भरभराट होणार नाही हे शिवाजी महाराजांनी ओळखले होते. त्यासाठी त्यांनी व्यापार व उद्योगधंद्याना सवलती व उत्तेजन दिले. शिवकाळात कापड, लाकूड व जहाज बांधणी, मीठ उत्पादन, मासेमारी, धातूकाम, कागद व रंग निर्मिती इत्यादी उद्योग सुरू होते.

पेशवेकाळात मराठा राज्याचा मोठा विस्तार झाला. शहरे, खेडी व दूरदूरच्या प्रांतात दळणवळण वाढीस लागले. त्यामुळे आयात निर्यात वाढली. पेशवेकाळात सरकारी उद्योग अत्यल्प होते. युध्दसाहित्य बनविणारे

कारखाने सरकारी मालकीचे होते. बाकी सर्व उद्योग खाजगी होते. या उद्योगधंद्याचे स्वरूप लघू उद्योगाचे होते हे उद्योगधंदे पुढीलप्रमाणे–

**१. युध्दसाहित्याचे कारखाने :**

पेशवेकाळात युध्दसाहित्य तयार करणारे कारखाने सरकारी मालकीचे होते. मराठ्यांच्या साम्राज्य विस्ताराच्या धोरणामुळे सतत मोहिमा व लढाया होत होत्या. अद्यावत युध्दसाहित्य लढाईत निर्णायक ठरते. तोफ गोळे तयार करण्याचा कारखाना पहिल्या बाजीराव पेशव्याने सुरू केला. पुणे व पुरंदर येथे युध्दसाहित्याचे कारखाने पेशवा पहिल्या माधवराव यानी सुरू केले होते. पुण्याच्या कारखान्यात लोहार, सुतार, संदूकदार, बाणांचे कारागीर, ढालाईत, गोलंदाज, जिनगर, भालदार, गाडीवान, परीट, शिंपी, पखालीवाले, खलाशी अशा कुशल १५० कारागीरांचा समावेश होता. इंधनासाठी बाभळीच्या लाकडाचा वापर करत. लोखंड, शिसे, कथिल यासारख्या कारखान्यासाठी लागणारा कच्चा माल मुंबईहून आयात केला जाई.

**२. बांधकाम उद्योग :**

बांधकाम उद्योग हा सरकारी व खाजगी अशा दोन्ही स्तरावर चालत होता. साग व शिसव या लाकडाचा उपयोग लाकडी कामासाठी केला जात असे. दगडी बांधकामासाठी काळा दगड, कुरूंदाचा दगड व जांभा दगडाचा वापर करत. पेशवेकाळात महादेव बनेश्वर, देवदेवेश्वर, वटेश्वर व शंकुतेश्वर ही अत्यंत भव्य आणि सुंदर मंदिरे बांधली गेली. मराठाकाळात सरकारी व खाजगी वाडे, धर्मशाळा, मंदिरे व नद्यांवरील घाट इत्यादी बांधकामे केली गेली. या कामासाठी काहीवेळा बाहेरून मिस्त्री व सुतार आणले जात. उत्तर हिंदुस्तानातून बधाई जमातीचे कसबी सुतार पुण्यात उद्योगधंदा करण्यासाठी आले. बांधकामासाठी आंध्रप्रदेशातून तेलगू व काठेवाड–कच्छमधूनही कसबी गवंडी पुण्यात आणले.

**३. जहाजबांधणी उद्योग :**

छत्रपती शिवाजी महाराजांची 'ज्याच्याजवळ आरमार त्याचा समुद्र' ही सागरी निती होती. त्यांनी पोर्तुगीजांकडून आरमार बांधणीचे तंत्रज्ञान आत्मसात केले. ते स्थानिक कारागीरांना शिकविले. व्यापारी व लष्करीदृष्ट्या जहाजांची नितांत गरज होती. कोकणात जहाजबांधणीसाठी लागणारी सागाची जंगले होती. त्यामुळे जहाजबांधणी हा कोकण किनारपट्टीवरील मोठा उद्योग होता. कल्याण, भिवंडी, पनवेल, राजापूर, देवगड, मालवण, अलिबाग याठिकाणी जहाजबांधणी व दुरूस्तींचा उद्योग वाढीस लागला. मराठा आरमारात गुराब, गलबत, तारू, मचवा, शिवाड व तीरकाठी ही जहांजे समाविष्ठ होती.

**४. मीठ उद्योग :**

मराठा राज्यास मोठा समुद्रकिनारा लाभला होता. समुद्राच्या पाण्यापासून मीठ तयार करणे हा कोकण किनारपट्टीतील महत्वाचा उद्योग होता. ठाणे, पनवेल, नागोठाणे, पेण, कुलाबा, कल्याण,रत्नागिरी, राजापूर, रेवदंडा या ठिकाणी मीठ तयार केले जाई. शिवाजी महाराजांनी देशी उद्योगाला उत्तेजन देण्यासाठी बारदेशहून येणाऱ्या मिठावर जादा जकात आकारली होती.

**५. मत्स्योद्योग :**

कोकण किनाऱ्यावरील अनेक बंदारातून मच्छीमारीचा व्यवसाय चालत असे. कोळी लोकांचा हा उद्योग होता. नदी, तलाव व खाडीच्या ठिकाणीही मत्स्योद्योग होत असे. पेन, पनवले, रोहा, कल्याण, नागोठाणे, रत्नागिरी, भिवंडी या ठिकाणी हा उद्योग वाढीस लागला. सुकवलेली व खारवलेली मासळी देशावर विक्रीसाठी पाठवत असत.

**६. लाकूड कामावर आधारित उद्योग :**

अठराव्या शतकात पेशव्यांनी व इतर सरदारांनी, शेठ व सावकारांनी तसेच देशमुख वतनदारांनी प्रशस्त व कलाकुसर असलेले वाडे व देवळे बांधली. या वाड्यांसाठी लागणारे लाकडी खांब, दरवाजे, खिडक्या ही कामे कुशल सुतारवर्ग करीत असे. तसेच पालखी, छकडे, बैलगाड्याा, लहान नौका ही वाहतुकीची साधने सुतारवर्ग तयार करीत असे. शेती अवजारे व शहरी फर्निचरसाठी लाकडाचा उपयोग सुतारवर्ग करत असे.

**७. धातू उद्योग :**

मराठा कालखंडात सोने-चांदी, तांबे, पितळ आणि लोखंड या धातूपासून विविध प्रकारच्या नित्योपयोगी वस्तू तयार केल्या जात. विविध प्रकारचे दागिने तयार करण्यासाठी सोने, चांदी व हिरे यांचा वापर केला जाई. सोने, चांदी व तांबे यांचा वापर टांकसाळीत नाणी पाडण्यासाठी केला जाई. लोखंडापासून तोफा, ढाल, तलवार, भाला, बिचवा, कट्ट्यार दांडपट्टा, साखळदंड ही लढाईतील आयुधे बनवत. तसेच कुलपे, घोड्याच्या खोगिराला लागणारी बैठक, रिकीब, नाल या वस्तू ही तयार करत. मूर्ती व देवळांचे कळस बनविण्यासाठी तांबे व पितळ या धातूचा वापर करत. तसेच या धातूपासून अनेक प्रकारची भांडीही बनविली जात.

**८. सोनारकाम :**

पेशवाईत पुण्यामध्ये लोक मोठ्या संख्येने सोन्या चांदीचे दागिने बनवत असत. सुवर्णकाराचा व्यवसाय करणारे रत्नागिरी जिल्ह्यातील दैवज्ञ ब्राह्मण पुण्यात स्थायिक झाले. थोड्याा कालावधीनंतर खानदेशी सोनार, लाड सोनार, अहेर सोनार, वैश्य सोनार व परदेशी सोनार पुण्यात येऊन आपला व्यवसाय वाढवू लागले. ते सोन्या चांदीच्या देवदेवतांच्या मूर्ती व विविध सुवर्णालंकार बनवत. सोन्याचे दागिने बनविणे हा त्यांचा वंशपरपरागत व्यवसाय होता.

**९. चर्मकला उद्योग :**

चामड्यापासून वस्तू तयार करणे हा चांभाराचा व्यवसाय होता. पेशवेकाळात प्रदेश विस्तार उत्तरेकडे झाल्याने घोडदलास महत्व प्राप्त झाले. घोड्याला खोगीर बनविणे हा एक महत्वपूर्ण व स्वतंत्र व्यवसाय बनला होता. मोटस्थळ जमिनीत विहीरीतून पाणी काढण्यासाठी चामड्याची मोट चांभार तयार करत. त्याशिवाय सापत्या, आसूड व चपला तयार करण्याचे काम चांभार करत.

**१०. कुंभार उद्योग :**

याकाळात ग्रामीण भागातील बहुतांश जनता मातीची भांडी वापरत. चूल, रांजन, माठ, गाडगी व इतर ही

अनेक मातीची भांडी कुंभार तयार करत असे. कुंभार मातीची कौले ही तयार करत. कुंभारामुळे खेड्यातील व शहरातील लोकांची भांड्याची गरज पूर्ण होई.

**११. गुऱ्हाळ उद्योग :**

याकाळात कोल्हापूर, सातारा, सांगली, कराड , इंदापूर या भागात उसाचे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाई. त्या काळात आजच्या सारखे साखर कारखाने नव्हते. त्यामुळे गुऱ्हाळाच्या माध्यमातून ऊसापासून गुळ तयार केला जाई.

**१२. तेलनिर्मितीचा उद्योग :**

दैनंदिन गरजेकरिता तेल महत्वाचे होते. आजच्या सारखे याकाळात तेलनिर्मितीचे कारखाने नव्हते. लाकडी तेलघाण्यातून तेल काढले जाई. प्रत्येक खेड्यात एखादा तरी तेलघाणा होता. तेली तेल काढण्याचे काम करीत असे. करडई, सरकी, भूईमूग, जवस या तेलबियांपासून तेल काढले जाई. तेली लाकडी तेलघाणा बैलाच्या मदतीने फिरवून तेल काढण्याचा व्यवसाय करत.

**१३. कापड उद्योग:**

मराठाकाळात कापड निमिर्तीचा उद्योगधंदा घरगुती पध्दतीने व हातमागाच्या सहाय्याने चालू होता. स्त्रीया- सुती, सुती-रेशमी आणि शुध्द रेशमी अशा प्रकारची लुगडी(साड्या) वापरत. पैठण शहर हे रेशमी लुगड्याविषयी व त्यावरील भरतकामाविषयी सर्वत्र प्रसिध्द होते. बुऱ्हाणपूर, नागपूर व सासवड या ठिकाणी चिटाचे उत्पादन होत असे.

पुरूषवर्ग धोतर, पायजमे, अंगरखे , पागोटी, पगड्या वापरत. धोतरांचे उत्पादन महाराष्ट्रात सासवड, सुपे, टाकळी येथे होत असे. तर फैजपूर, नांदेड, जालना, पैठण व जुन्नर या ठिकाणी पागोटे व फेटे तयार करत.

**१४. रंग उद्योग :**

रंगउद्योग हा कापड उद्योगाला पूरक असा व्यवसाय होता. रंग तयार करण्यासाठी नैसर्गिक घटकांचा उपयोग केला जाई. नीळ, मेहंदी, लिंब, बाभूळ, हिरडा, बेहडा व कात यांचा उपयोग रंग तयार करण्यासाठी केला जाई. तसेच चुना, हळद , लाख, तुरटी व फेरस सल्फेट यांचाही रंग निर्मितीसीठी उपयोग होई. रंग घटक रंगात मिसळून त्यात सूत रंगविले जाई. तयार झालेला रंगाचा अर्क तांब्याच्या भांड्यात उकळला जाई. यामध्ये कापड ठराविक वेळ बुडविले जाई. नंतर ते कापड स्वच्छ पाण्याने धुतले जाई व त्या कापडावर लाकडी ठसे वापरून छपाई केली जात असे. रंगकाम व छपाईच्या अनेक पध्दती वापरल्या जात. अनेक प्रकारची सुबक नक्षी काढली जाई.

**● स्वयं अध्ययन प्रश्न क्र. २ :**

**अ) योग्य पर्याय निवडून खालील वाक्ये पूर्ण करा.**

१. तोफगोळे तयार करण्याचा कारखाना ------ पेशव्यांनी सुरू केला.

अ) पहिला बाजीराव ब) नाना फडणवीस क) राघोबादादा ड) दुसरा बाजीराव

२) पेशवा पहिल्या माधवरावांने पुणे येथे सुरू केलेल्या शस्त्रास्त्र निर्मिती कारखान्यात --- कुशल कारागीर होते.

अ) १२५ ब) १५० क) १७५ ड) २००

३) उत्तर हिंदुस्थानातून बधाई जमातीचे कसबी ------ पुण्यात आले.

अ) चर्मकार ब) लोहार क) सुतार ड) शिंपी

४) मराठ्यांनी आरमारबांधणी तंत्रज्ञान ------ कडून आत्मसाद केले.

अ) इंग्रज ब) फ्रेंच क) डच ड) पोर्तुगीज

५) बारदेशहून येणाऱ्या ------ वस्तूवर जादा जकात आकारली होती.

अ) मीठ ब) धान्य क) कापड ड) लोखंड

**ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. पुण्यात स्थायिक झालेल्या दैवज्ञ. ब्राह्मणांचा व्यवसाय कोणता होता ?

२. गुऱ्हाळ उद्योग कोणत्या भागात चाले ?

३. पैठण शहर कशासाठी प्रसिध्द होते ?

४. महाराष्ट्रात धोतराचे उत्पादन कोठे होत असे ?

५. तयार झालेल्या रंगाचा अर्क कोणत्या भांड्यात उकळला जाई ?

### ३.२.३ व्यापार आणि वाणिज्य :

महाराष्ट्रात आठराव्या शतकात नवा व्यापारी, सावकार व ठेकेदारांचा वर्ग निर्माण झाला. अशा व्यापार व उद्योगात अनेक जातीतील लोकांचा समावेश होता. पण सावकारी क्षेत्रात ब्राह्मण अग्रेसर होते. 'साहुकार (व्यापारी) म्हणजे राज्याची व राजश्रीची शोभा साहुकाराकरिता राज्य अबादान होते. न मिळे वस्तुजात राज्यात येते राज्य श्रीमंत होते.' या शब्दात रामचंद्रपंत अमात्य यांनी आज्ञापत्रात छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यापारनितीवर प्रकाश टाकला आहे. शिवकाळाप्रमाणे पेशवाईतही व्यवसाय उत्तेजन देण्याचे धोरण दिसून येते. मराठा कालखंडातील व्यापार व्यवसाय पुढील प्रमाणे-

**१. शेती :**

सतराव्या व आठराव्या शतकात महाराष्ट्रात शेती हाच मुख्य व्यवसाय होता. ग्रामीण अर्थव्यवस्था ही शेती

व्यवसायाभोवती केंद्रीत झालेली होती. त्या कालखंडात बहुतांश जनता खेड्यात राहत असे. त्यामुळे त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन शेती व त्यास पुरक व्यवसाय असत. शिवकाळात रयतेच्या भाजीच्या देठालीही हात लावू नका इतकी दक्षता घेतली गेली. शेतकऱ्यांना अनेक सोई-सवलती व शेतसाऱ्यांत सूट तर कधी माफीही दिली गेली. पेशवेकाळात पडीक जमीन लागवडीखाली आणण्याचे प्रयत्न झाले. पण शेती आणि शेतकऱ्यांच्या विकासासाठी विशेष काळजी घेतली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे जीवन हालाखीचे होते. पेशवाईच्या उत्तरार्धात राज्यकर्ते चैन, विलास, डामडौल, दानधर्म, ब्राह्मण भोजने याकरिता रयतेकडून जास्त पैसे वसूल करू लागले. शेतसारा व कर वसुलीसाठी शेतकऱ्यांना अमानुष व क्रुर छळाला सामोरे जावे लागले.

### २. गावगाड्यातील व्यवसाय :

मराठा काळात ग्रामीण अर्थव्यवस्था ही शेती व्यवसायाभोवती केंद्रीत झाली होती. शेतीसाठी आवश्यक साहित्य बनविणारे व्यवसाय खेड्यामध्ये केले जात. खेड्यापाड्यातून बलुतेदारी पध्दतीने मुख्यत: शेतीची अवजारे, शेतकऱ्याला लागणाऱ्या दैनंदिन वस्तूंचे त्या त्या खेड्यापुरते मर्यादित उत्पादन होत असे. गावच्या उभारणीसाठी व स्थैर्यासाठी बलुतेदार काम करत. म्हणूनच अ. रा. कुलकर्णी यांनी ग्रामसेवक म्हटले आहे. सुतार, लोहार, कुंभार, न्हावी, परीट, गुरव , महार, मांग, चांभार, तराळ, जोशी व मुलांणी हे बारा बलुतेदार होत. त्यांना कारू म्हणत. साळी , माळी, तेली, तांबोळी, शिंपी, वाणी , गोंधळी, सोनार, सनगर, ठाकर, जंगम, घडशी हे बारा आलुतेदार होत. त्यांना नारू म्हणत. शेतकऱ्यांच्या व गावकऱ्यांच्या गरजा बलुतेदार व अलुतेदार भागवत. त्या मोबदल्यात शेतकऱ्यांकडून त्यांना धान्याचा स्वरूपात जो मोबदला मिळे त्यास बलुते व आलुते म्हणत. महाराष्ट्रातील महार ही जमात अत्यंत कामसू, उपयुक्त आणि हुशार होती, असे ग्रँट डफने नोंदविले आहे. डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी बलुतेदारांची विभागणी तीन प्रकारात केली आहे.

१) **खेड्यातील कारागीर :** यात सुतार, कुंभार, लोहार, न्हावी, परीट, चर्मकार, इ. समावेश होतो.

२) **खेड्यातील सेवक वर्ग :** यामध्ये महार, मांग, रामोशी व तराळ यांचा समावेश होतो.

३) **धार्मिक सेवा देणारा वर्ग :** जोशी , गुरव, जंगम, ठाकूर , कोळी व मुलाणा यांचा समावेश होता. गावकऱ्यांच्या धार्मिक व सामाजिक गरजा हा वर्ग पुरवित असे. जोशी हा पंचांग वाचून , लावणी, संचणी व मंगल कार्याचे मूहूर्त काढून देत. गुरव हा गावच्या मंदिराचा पुजारी असे. तो मंदिराची देखभाल करी. जंगलात राहणाऱ्या काही जमातीचा पुरोहित म्हणून ठाकूर काम करत असे. बलुतेदारांना गोतसभेच्या सभांना हजर राहण्याचा व कामाकाजात भाग घेण्याचा अधिकार होता. महजरावर प्रत्येक बलुतेदाराची स्वतंत्र निशानी असे.

### ३. ठेकेदार :

पेशवाईत सैन्याला अन्नधान्य, कपडे व शस्त्रे पुरविणाऱ्या लोकांचा कंत्राटदारांचा /ठेकदारांचा वर्गच उदयाला आला. हे सेवेकरी श्रीमंत होते व मुख्य म्हणजे ते परप्रांतीय होते. पेशवाईत इमारती बांधणे, पाट बांधणे, वाड्यात रोजच्या भोजनाची, पाटपाण्याची व्यवस्था ठेवणे, दिवाबत्तीची सोय करणे, फुलांचा पुरवठा करणे, अग्निबाण बनविणे, तोफांचे गोळे बनविणे, कागद शाई पुरविणे, टपाल सेवा, नदीवर नावा चालवून वहातूक करणे

ही कामे ठेके देऊन केली जात. पेशवे काळात छोट्या मोठ्या ठेकेदाराचा एक स्वतंत्र वर्ग महाराष्ट्रात निर्माण झाला होता.

### ४. सावकार :

सरकारला व रयतेला कर्ज देणे हा महाराष्ट्रात पेशवेकाळात एक मोठा व्यवसाय बनला होता. हा व्यवसाय खेड्यापासून शहरापर्यंत आपली पाळेमुळे घट्ट रोवून होता. सन १७४० च्या सुमारास सरकारला कर्ज पुरविणारे सुमारे १५० छोटे मोठे सावकार पुण्यात व्यवसाय करत असल्याचे पेशवे दप्तरात आढळते. देशस्थ व कोकणस्थ ब्राह्मण घराण्यांनी आपला जम या व्यवसायात बसविला होता. त्याचबरोबर कऱ्हाडे ब्राह्मण, शिंपी, सोनार, मराठा, शेणवी ही मंडळीही सावकारी पेशात होती. सावकार मल्हारशाही, सुरती, चांदवडी, पट्टणी रूपये इ. चांदीच्या नाण्यांचा चलनात वापर करत. गरजेनुसार व्याजाचा दर दरसाल दरशेकडा १२ पासून ३६ पर्यंत गेल्याचे दिसते. सावकार शाहीतील नफा पाहून मोघे, दशपुत्रे, भिडे, कानडे, शास्त्री, जोशी आणि कर्वे ही ब्राह्मण मंडळी आपले पैरोहित्य व अध्यापनाचे कार्य सोडून सावकारीत उतरली. ब्रहमेंद्रस्वामी या पेशव्याच्या गुरूनीही सावकारी सुरू केली होती. पानिपतच्या तिसऱ्या लढाईनंतर मागील कर्जाची फेड करण्यासाठी पुन्हा नवीन कर्ज या दुर्दैवी पर्वाला सुरूवात झाली. उत्तर पेशवाईत राजकीय अस्थिरता व गोंधळाची परिस्थिती निर्माण झाल्यामुळे पुढे हा व्यवसाय मोडकळीस आला.

### ५. पेठांची निर्मिती व नियंत्रण :

व्यापार उद्दीम वाढविण्याकरिता पेठांची भूमिका महत्वाची होती. मराठाकाळात नवीन पेठांची निर्मितीचे काम शेटे, महाजन, बिडवई हे अधिकारी करीत. शेटे पेठेचा प्रमुख असे. तर महाजन हा पेठेचा हिशोब ठेवण्याचे काम करी. बिडवई हा पेठेत येणाऱ्या वस्तूंवरील जकात वसूल करत असे. पेशवेकाळात पुणे व इतर मोठ्या शहरातील व्यापारावर नियंत्रण ठेवण्यासाठी चौधरी या सरकारी अधिकाऱ्यांची नेमणूक केली होती. तो शहरात येणाऱ्या मालाच्या नोंदी व हिशोब ठेवत असे. तसेच सरकारच्या आज्ञेने मालाच्या किंमती ठरविणे, वजन व मापे यावर देखरेख ठेवणे, दुष्काळाच्या सुमारास शहरात लागेल तेवढा माल पुरविणे ही कामे तो करत असे.

शिवकाळात राजमाता जिजाबाई यांच्या आज्ञेने पुण्याजवळ पाषाण येथे जिजापूर ही पेठ वसविली गेली. तर खेडजवळ शिवापूर (खेड-शिवापूर) ही पेठ वसविली गेली. राजधानी रायगडवर अत्यंत नियोजनबध्द पध्दतीने बाजारपेठ बांधली गेली. कसब्याच्या ठिकाणी व महत्वाच्या किल्ल्यांवर बाजारपेठांची निर्मिती शिवकाळात झाली होती. कोल्हापूर राज्यातील मौजे वळीवडे येथेही सन १७५९ मध्ये नवीन पेठ वसवल्याचा उल्लेख सापडतो.

सतराव्या शतकाच्या अखेरीस पुण्यात कसबा, रविवार, सोमवार, मंगळवार व शनिवार या पाच पेठा होत्या. सन १७०३ साली बुधवार पेठ वसविण्यात आली. १७२१ मध्ये पहिल्या बाजीरावाने बापूजी श्रीपत या अधिकाऱ्यावर पुणे शहराची वाढ करण्याची जबाबदारी सोपविली. सन १७३० च्या दशकात वाढत्या लष्करी मोहिमांमुळे शहराच्या बाहेरील भागातून सैनिकांसाठी व बाजार बुणग्यांसाठी राहण्याची सोय करणे गरजेचे होते. म्हणून सन १७३४ मध्ये गावाबाहेर शुक्रवार पेठेची वसाहत झाली. सन १७५० च्या शतकात अनेक ठिकाणचे व्यावसायिक

पुण्यात आले. त्यामुळे या व्यवसायिकासाठी वेताळपेठ, गंजपेठ, मजफ्फर गंज व निहाल गंज या पाच पेठांची निर्मिती केली गेली. सन १७६७ मध्ये भवानी पेठेची निर्मिती झाली. तर सन १७६९ मध्ये सदाशिव पेठ व नारायण पेठ या दोन पेठा वसविल्या गेल्या. सन १७८० च्या दशकात नाना फडणविसांच्या उत्कर्षाच्या काळात बाहेरून आलेल्या लोकांसाठी नव्या तीन पेठा घोरपडे पेठ (१७८१) रास्ता पेठ (१७८३) नाना पेठ (१७८९) वसविल्या गेल्या. दुसऱ्या बाजीरावाच्या काळात मराठी सत्तेचा उतरता काळ होता. राजधानी पुणे असुरक्षित झाल्याने उद्योगधंदे व व्यापारास येणाऱ्या बाहेरील लोकांचा ओघ आटला. त्यामुळे दुसरा बाजीरावच्या काळात पुण्यात एकही नविन पेठ निर्माण झाली नाही. पेशवेकालीन पुण्याच्या शहर वाढीचा इतिहास हे भारतातील इतर राजकीय शहरांच्या वाढीच्या इतिहासाचे एक नमुनेदार उदाहरण आहे.

- **मराठाकालीन प्रमुख व्यापारी केंद्रे :**

मराठा कालखंडात छत्रपती शिवाजी महाराजांच्या विधायक प्रयत्नातून स्वराज्यात अनेक व्यापारी केंद्रे व बाजारपेठा विकसित झाल्या होत्या. अंतर्गत व्यापाराचे स्वरूप दळणवळण साधनांच्या अभावामुळे मर्यादीत होते. कसब्याच्या ठिकाणी आठवडी बाजार भरत असे. कसब्यामध्ये अधिक मोठे व्यापारी केंद्र पेठ होते. कोल्हापूर, पुणे, महाड, अष्टे, चिपळूण, पेण, नागोठाणे, नाशिक, नगर, कराड, सोलापूर या ठिकाणी बाजारपेठा होत्या. मराठा कालखंडात समुद्रमार्गे मोठ्या प्रमाणात व्यापार चालत असे. चौल, दाभोळ, राजापूर, संगमेश्वर, वेंगुर्ला, विजयदुर्ग, कल्याण-भिवंडी ही व्यापारी केंद्रे भरभराटीस आली होती. पेशवेकाळात देखील यातील बहुतांश केंद्रे व्यापारी दृष्ट्या महत्वाची होती. प्रमुख व्यापारी केंद्राचा आढावा पुढीलप्रमाणे-

**१. चौल :**

चौल हे बंदर सन १६७० नंतर स्वराज्यात समाविष्ठ झाले. दक्षिण देशांची ही मोठी बाजारपेठ होती. हे बंदर अलिबाग तालुक्यातील कुंडलिका नदीच्या मुखाशी वसले आहे. मध्ययुगात ते मूर्तजाबाद या नावाने ओळखले जाई. रेशमाच्या व्यापारासाठी हे बंदर प्रसिध्द होते. मसाल्याचे पदार्थ, अन्नधान्य, कापड, नीळ, अफू, विविध धातू व घोड्यांचा व्याापार या बंदरातून चालत होता. सन १६७४ ला लागलेल्या आगीत येथील सुमारे तीन हजार घरे भस्मसात झाली. त्यामुळे चौलकरांनी मुंबईचा आश्रय घेतला.

**२. दाभोळ :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी वशिष्ठी नदीच्या मुखाशी वसलेले दाभोळ हे बंदर सन १६६९ मध्ये आपल्या ताब्यात घेतले. येथूनच मुंबई, सुरत, गोवा या बंदराकडे मराठ्यांच्या जहाजांची ये-जा होत असे. या बंदरातून पूर्व आफ्रिका, अरबस्थान, इराण या देशांशी व्यापार चालत होता. मुंबईच्या व्यापाराला सुरतेपेक्षा दाभोळ हे बंदर अत्यंत सोयीचे होते. दाभोळ हे एक भव्य आणि दाट वस्तीचे सागरी ठिकाण होते. अनेक धनिकांची सुंदर घरे, उत्तम मंदिरे व मशिदी येथे होत्या. येथे अनेक वस्तू स्वस्त मिळत. या बंदरातून कापड, अन्नधान्य व मसाल्याचे पदार्थ यांचा व्यापार मोठ्या प्रमाणात चालत होता.

### ३. कल्याण–भिवंडी :

उत्तर कोकणातील कल्याण हे दाट लोकवस्तीचे व भरभराटीस आलेले व्यापारी केंद्र होते. उत्तर भारत, गोवळकोंडा आणि केरळ या भागातून अनेक व्यापारी येथे वस्तूंच्या खरेदी विक्रीसाठी येत. भिवंडी हे देखील व्यापार आणि उद्योगधंद्याचे एक महत्वाचे ठाणे होते. विणकरांचा धंदा येथे तेजीत होता. येथे जहाजे आणि घरे बांधण्यासाठी लागणारे टिंबर जातीचे लाकूड मुबलक प्रमाणात मिळत असे. या लाकडास इंग्रज भारताचा ओकवृक्ष म्हणत. येथे जहाजबांधणी व दुरूस्तीचा व्यवसाय तेजीत होता. सन १६७४ मध्ये ही ठिकाणे स्वराज्यात आली.

### ४. वेंगुर्ला :

आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी प्रसिध्द असलेले कोकणातील हे बंदर होते. वेंगुर्ला येथे डचांची वसाहत होती. सतराव्या शतकात येथून बटाव्हिया, जपान, सिलोन, इराणची सामुद्रधुनी , तांबडा समुद्र या ठिकाणांशी व्यापार चालत होता.

### ५. राजापूर :

रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर हे मराठाकाळातील एक महत्वाचे व्यापारी केंद्र होते. या ठिकाणी इंग्रज, फ्रेंच या परकीय व्यापाऱ्यांच्या वखारी होत्या. राजापूर मिठागरासाठी प्रसिध्द होते. लोखंड , शिसे, मसाल्याचे पदार्थ, सुती कापड व विविध फळांची निर्यात केली जाई.

### ६. विजयदुर्ग :

विजयदुर्ग हे बंदर वाघोटन नदीच्या मुखाशी वसले आहे. येथे विड्याच्या पानाची निर्मिती मोठ्या प्रमाणात होत असे. या बंदरातून देशात व विदेशात विड्यांच्या पानांची निर्यात होत असे. म्हणूनच बार्बोसा या परकीय प्रवाशाने या नदीचा उल्लेख 'विड्यांची नदी' असा केला होता.

- **मराठा कालीन दळणवळणाची व वाहतुकीची साधने :**

देशाच्या आर्थिक औद्योगिक विकासासाठी दळणवळणाची साधने महत्वाची असतात. मराठाकाळात व्यापार हा प्रामुख्याने खुष्कीचे मार्ग व जलमार्गाने चालत असे.

### १. जलमार्ग :

मराठाकाळात राज्यातील समुद्रकिनाऱ्यावर असलेल्या चौल, दाभोळ, राजापूर, वेंगुर्ला, कल्याण, भिवंडी, संगमेश्वर, विजयदुर्ग या आठ प्रमुख बंदरातून मालाची वाहतूक होत असे. विजयदुर्ग, जयगड, तेरेखोल, धरमतर, वसई, ठाणे या कोकणातील खाड्यामधून मालाची ने–आण केली जाई. याशिवाय भीमा, कृष्णा व गोदावरी या तीन प्रमुख नद्यांमधून व्यापार चालत असे. छत्रपती शिवाजी महाराजांनी व्यापारासाठी व कोकण किनारपट्टीच्या संरक्षणासाठी प्रबळ आरमार व जलदुर्गाची निर्मिती केली होती. पेशवेकाळात ठाणे, कुलाबा, रत्नागिरी, बाणकोट, हार्णे, देवगड, दाभोळ, राजापूर, मालवण आणि वेंगुर्ला ही बंदरे व्यापार वाहतुकीसाठी प्रसिध्द होती.

२. **रस्तेमार्ग :**

मराठाकाळात जमिनीवरून होणारी वाहतूक अतिशय खडतर डोंगर दऱ्याखोऱ्यातून असलेल्या लहानशा व अरूंद मार्गाने होत असे. या मार्गाला खुष्कीचे मार्ग असे म्हणत. बुऱ्हाणपूर ते गोवळकोंडा यांना जोडणारा हमरस्ता महाराष्ट्राच्या काही भागातून जात होता. मराठी मुलखातून जाणारा महत्वपूर्ण कोकण मार्ग चौल-चिपळूण, राजापूर, मालवण, गोवा असल्याचे मत प्रो. इरफान हबीब यांनी 'मुघल अॅटलास' मध्ये नोंदविले आहे.

३. **घाटमार्ग :**

महाराष्ट्राचे दोन नैसर्गिक विभाग म्हणजे देश आणि कोकण होय. सह्याद्री पर्वत व अरबी समुद्र यांच्या दरम्यानच्या प्रदेशाला कोकण किनारपट्टी म्हणून ओळखले जाते. कोकणातून देशावर येण्यासाठी व देशातून कोकणात उतरण्यासाठी सह्याद्री पर्वतात अनेक घाटमार्ग आहेत. नाणेघाट, पारघाट, अंबाघाट, फोंडाघाट, अंबोलीघाट, थळघाट हे घाटमार्ग प्रसिध्द होते. या मार्गावर चौक्या बसवून जकात वसूल केली जाई. घाटपांडे हा घाटावरचा प्रमुख अधिकारी होता. घाटपांडेच्या मदतीला पत्की , डांगे, मेटकरी, मोडवी, पथकदार, पानसरे हे अधिकारी असत. या अधिकाऱ्यांच्या मदतीने जकात वसूली व घाटमार्गावरील व्यापाराचे संरक्षण घाटपांडे करीत.

● **वाहतूकीची साधने :**

मराठाकालीन वाहतूकीची साधने पुढील प्रमाणे-

**१. नौका :**

जलमार्गाने चालणारी माल वाहतूक होडी, पडाव, तराडे या लहान शिडाच्या जहाजातून चाले. मीठाची वाहतूक करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वतंत्र मीठ वाहू जहाजांचा काफीला उभारला होता.

**२. जनावरे :**

जमिनीवरून चालणाऱ्या माल वाहतुकीसाठी बैल, घोडे, म्हैस, गाढव, रेडे यांचा उपयोग केला जाई. घाटातून जड सामान वाहून नेण्याचे काम बैलांच्या साह्याने केले जाई. लमाण, बंजारा जमातीचे लोक आपल्या मालवाहू बैलांचे तांडे घेऊन गावोगावी जात. प्रवासासाठी घोडा, बैलगाडीचा वापर करत.

**३. मजूर :**

डोक्यावरून ओझे वाहणारे हमाल, बिगारी ही संख्येने पुष्कळ होते. कमी अंतरावरील तसेच अवघड भागातील मालाची ते वाहतूक करत. सधन लोक पालखीतून प्रवास करत. पालखी सहा ते सात फूट लांब व तीन फूट रूंद असे ती वाहून नेण्यासाठी चार ते सहा माणसे लागत.

**४. टपाल व्यवस्था :**

सरकार आपल्या पत्राची देवाण-घेवाण करण्यासाठी काही व्यक्ती नेमत त्यास हरकारे म्हणत. घोडेस्वार, सांडणीस्वार यांचा उपयोग टपालकामी होत असे. खाजगी पत्रव्यवहारही केला जात असे. महत्वाची पत्रे खास

दूताबरोबर अथवा सांडणीस्वाराबरोबर पाठविली जात. यावर होणारा खर्च ज्याला पत्र द्यावयाचे त्याच्याकडून वसूल केला जात असे याला मसाला म्हणत.

- **व्यापार उद्योगास संरक्षण व पाठबळ :**

शिवकाळाप्रमाणेच पेशवेकाळातही व्यापार उद्दीम वाढीस लागावा यासाठी प्रयत्न केलेले दिसतात. देशभरातून चांगले कसबी कारागीर पुण्यात आणले. नवीन पेठांची निर्मिती केली. कसबी कारागीरांना राहण्यास जागा व मानसन्मान दिला. रत्नागिरीतील चिमणाजी गणेश साठे यांनी व्यापारासाठी गलबत बांधले. सरकारने त्याची जकात माफ केली. वसई येथील विठोजी कृष्णा कामत यांनी स्वत:च्या जहाजातून व्यापार सुरू केला. त्यास उत्तेजन देण्यासाठी पेशव्यानी त्याला राहण्यासाठी व वखारीसाठी जागा दिली. तसेच पालखीचा मान व गावातली खोती दिली. अंजनवेल येथील जहाज बांधणाऱ्या अधिकाऱ्यास सरकारने तीनखंडी लोखंड दिले. मोरशेठ व सदाशिव शेठ आणि त्यांच्या पाच सहकाऱ्यांनी सरकारात तोफांचे चांगले काम केले. त्याबदल्यात सरकारने ५०० रूपये महसूल असणारी दोन गावे इनाम दिली. पेशव्यानी कारागीर, नवागत सावकार, व्यापाऱ्यांना जकात माफ करणे, मानाची वस्त्रे देणे, पालखीचा मान देणे, गावात राहण्यास मोफत वाडा देणे, वखारीसाठी किंवा कोठार बांधण्यास मोफत जमीन देणे इत्यादी सवलती देवून व्यापार उद्योगास संरक्षण व पाठबळ दिले. पेशवाईच्या शेवटी या व्यापार उद्योगास उतरती कळा लागली.

- **मराठी राज्याचा जमा व खर्च :**

मराठाकाळात उत्पन्न कमी व खर्च जास्त असे. त्यामुळे राज्यकर्ते सतत आर्थिक विवंचनेत असल्याचे दिसतात.

**अ) सरकारी उत्पन्नाच्या बाबी :**

**१) जमीन महसूल :**

मराठा कालखंडात राज्याच्या उत्पन्नाचे प्रमुख व महत्वाचे साधन जमीन महसूल हेच होते. उत्पन्नाच्या २/५ एवढा जमीन महसूल आकारला जाई. काही ठिकाणी बटाई म्हणजे उत्पन्नाच्या निम्मा हिस्सा शेतसारा घेतला जाई.

**२) खंडणी :**

दुर्बल राजाला अभयदान दिल्याबद्दल त्यांच्याकडून खंडणी वसूल केली जाई. चौथाई व सरदेशमुखी राज्याच्या उत्पन्नाच्या या दोन प्रमुख बाबी होत्या. चौथाई म्हणजे उत्पन्नाच्या एक चतुर्थांश भाग होय. तर सरदेशमुखी म्हणजे पूर्ण उत्पन्नाच्या एक दशांश भाग एवढी असे. मराठा साम्राज्यात या दोन्ही वसुली मराठी राज्याबाहेर पण राज्याच्या छायेखाली असलेल्या प्रदेशातून वसूल केल्या जात. चौथाई राज्याच्या खजिन्यात जमा होत असे. तर सरदेशमुखीचा वसूल छत्रपतींच्या खाजगी उत्पन्नात जात असे सन १७१९ मध्ये दिल्लीच्या बादशहाने आपल्या दक्षिणेतील सहा सुभ्यावरील चौथाई-सरदेशमुखीच्या वसुलीचे अधिकार छत्रपती शाहू महाराजांना दिले होते.

**३) जकात :**

व्यापाऱ्यांकडून हा कर घेतला जाई.

**४) विविध कर :**

शेतकऱ्यांकडून शेतसाऱ्याशिवाय इतर कर घेतले जात. उल्फापटी किंवा शिधा पट्टी (गावात आलेल्या सरकारी अधिकाऱ्यांना दिला जाणारा शिधा किंवा भोजन) दसरा पट्टी (दसऱ्याचा सण साजरा करण्यासाठी गावकऱ्यांकडून घेतले जाणारे साहाय्य) मेजवानीपट्टी (अधिकाऱ्यांच्या मेजवानीसाठी साहाय्य), तोरणपट्टी (अधिकाऱ्यांच्या स्वागतासाठी तोरण बांधण्याकरता घेतलेले साहाय्य), ठाणेपट्टी (पोलीस ठाण्याच्या खर्चासाठी साहाय्य), राज्यारोहणासारख्या विशेषप्रसंगी सिंहासनपट्टी वसूल केली जाई. शेतकऱ्यांकडून कोणत्या ना कोणत्या बहाण्याने वसूल केले जाणारे कर हे दक्षिणी समाजातील वतनदारी संस्थेच्या शोषण पध्दतीचे पुरावेच आहेत.

**५) व्यवसाय कर :**

निरनिराळ्या व्यवसायांवर कर आकारले जात. सराफांवर सराफपट्टी, धनगरांवर धनगरपट्टी, चर्मकारावर पायपोशी, मोहतर्फा-पेठेतील दुकानांवर हा कर आकारला जाई. कारागिरांवर कारूक कर आकारला जाई. वेठबिगारीवरही कर आकारला जाई.

**६) अप्रत्यक्ष कर :**

प्रत्यक्ष कराखेरीज अप्रत्यक्ष करही आकारले जात. फसकी-पसाभर, पळकी-पळीभर, सेवाधारा-फळफळावळ, उरी दलाली-पूर्ण वजनानंतर उरलेला शेष भाग. हे कर वस्तूंच्या रूपाने वसूल केले जात. याशिवाय खर्चपट्टी, सादिलवार पट्टी, वऱ्हाड अथवा लग्नटका, घरटका, पाटदाम (पूनर्विवाहावरील कर), तूटपट्टी, कोतवाली, गडछावणी इत्यादी विविधकरांचा व २५ पट्ट्यांचे संदर्भ पेशवेकाळात मिळतात.

**७) गुन्हेगारी, हरकी व शेरणी :**

न्यायदान प्रक्रियेत गुन्हेगाराला गुन्हेगारी दंड भरावा लागे. दावा जिंकणाऱ्याकडूनही हरकी व शेरणीची रक्कम वसूल केली जाई.

**८) नजराणे :**

जहागीरदार, वतनदार, सरदार वारस ठरविताना किंवा सरदारकी देताना राजाला मोठ्या किंमतीचे नजराणे देत. परकीय वकीलही काही सवलती मिळवण्यासाठी राजाला महागडे नजराणे देत.

**ब) खर्चाच्या बाबी :**

शिवकाळात स्वराज्याचा विस्तार झाल्यानंतरही स्वराज्याला पैशाची फारशी टंचाई जाणवली नाही. किल्ले व किल्ल्यांवरील अधिकारी यांच्यावर मोठा खर्च होत असे. तसेच रयतेच्या कल्याणासाठी मोठा खर्च होत असे.

पेशवेकाळात राज्याचा विस्तार अटक ते बंगाल व उत्तरप्रदेश ते म्हैसूर-कर्नाटक एवढा होऊनही राज्यात आर्थिक स्थैर्य लाभले नाही. मराठाकाळातील खर्चाच्या बाबी पुढीलप्रमाणे-

**१) राजावरील खर्च :**

छत्रपती शिवाजी महाराजांची राहणी अत्यंत साधी होती. त्यामुळे त्यांचा खाजगी खर्च तत्कालीन राजांच्या मानाने खूपच कमी होता. परंतु राज्याभिषेकासमयी त्यांनी उदारपणे खर्च केला. पेशवेकाळात उत्तरेतून ऐषआरामाच्या कल्पना दक्षिणेत आल्या. त्यामुळे पेशवाईत हे खर्चाचे प्रमाणे वाढलेले दिसते.

**२) सनदी प्रशासनावरील खर्च :**

यामध्ये प्रामुख्याने नोकरांच्या पगाराचा समावेश होता. मुख्य प्रधानाला वार्षिक १५००० होन, अमात्यास १२ हजार होन तर इतर सहा प्रधनांना प्रत्येकी १० हजार होन. वार्षिक वेतन दिले जाई. चिटणिसाला वार्षिक ६ हजार, फडणिसाला वार्षिक २ हजार होन, सुभेदाराला व सुभ्याच्या कारकुनाला वार्षिक ४०० होन, सुभ्याच्या मुजूमदारास वार्षिक १०० ते १२५ होन मिळत होता. कारखान्यावरील अधिकाऱ्यांना वार्षिक १०० ते ५०० होनांपर्यत पगार मिळत. परगण्याच्या आणि गावच्या वतनदारांना सारा माफ जमिनी वंशपरंपरागत दिल्या जात होत्या.

**३) लष्करी प्रशासनावरील खर्च :**

लष्करी खर्चामध्ये पायदल, घोडदल, नौदल यांचा समावेश होता. तीनही दलातील सर्व सैन्यांचा पगार, शस्त्रास्त्रे, घोडेखरेदी-देखरेख, किल्ल्यांची बांधणी, देखभाल, आरभार बांधणी, लष्करी मोहिमा या सर्व खर्चाचा समावेश होता. शिवकाळात सैन्यात शिस्त व साधी राहणी होती. पेशवेकाळात युध्दमोहिमांवर कुटूंब व बाजारबुणगे यांचा मोठा प्रमाणात भरणा होता. त्यामुळे लष्करी मोहिमांवर मोठा खर्च होत असे व त्या तुटीच्या ठरत होत्या.

**४) शेती आणि इतर व्यवसायांवर होणारा खर्च :**

शेतसारा ही सरकारच्या उत्पन्नाची मुख्य बाब होती. मराठा कालखंडात शेती व्यवसायाकडे विशेष लक्ष दिले गेले. शेतकऱ्यांना खते, बि-बियाणे, अवजारे, बैल व मशागतीसाठी सरकारकडून तगाई म्हणजे बिनव्याजी कर्ज दिले जाई. कर्जाची वसुली शेतकऱ्यांच्या सवडीनुसार ३ ते ७ वर्षापर्यत केली जाई. शेतकऱ्यांना पाणी पुरवठा करणे, शेतसाऱ्यात सुट देणे, माफ करणे यासाठीही सरकार खर्च करीत असे.

**५) पेशव्याच्या व्यवहाराचा खर्च :**

हुंडणावळ व बट्टा, कर्जावरील व्याज यासाठी खर्च होत असे.

**६) धार्मिक अनुष्ठाणे :**

पेशवेकाळात अनुष्ठाणे, वर्षासने , श्रावणमास, धर्मादाय, देवस्थाने, ब्राह्मणभोजने व दक्षिणा उत्सव यावर मोठ्या प्रमाणात खर्च केला जाई.

### ७) खाजगी खर्च :

पाडवा, दिवाळी, दसरा , संक्रात, भाऊबीज, ओवाळणी , नवस या सण उत्सवाच्या काळात पेशवे मोठा खर्च करित असत.

● **स्वयंअध्ययन प्रश्न क्र. ३ :**

**अ) योग्य पर्याय निवडून खालील वाक्ये पूर्ण करा.**

१. -------- म्हणजे राज्याची व राजश्रीची शोभा होय.

अ) साहुकार ब) दिवाण क) हवलदार ड) सबनीस

२. अ. रा. कुलकर्णी यांनी बलुतेदारांना -------- म्हटले आहे.

अ) साहुकार ब) ग्रामसेवक क) राजा ड) दिवाण

३. सन १७४० च्या सुमारास सरकारला कर्ज पुरविणारे सुमारे -------- छोटे मोठे सावकार पुण्यात व्यवसाय करीत होते.

अ) १०० ब) १२५ क) १५० ड) १७५

४. पुणे व इतर मोठ्या शहरातील व्यापारावर नियंत्रण ठेवण्यासाठी ---- या सरकारी अधिकाऱ्यांची नेमणूक केली होती.

अ) शेठे ब) महाजन क) कोतवाल ड) चौधरी

५. पहिल्या बाजीरावाने बापूजी श्रीपत या अधिकाऱ्यावर -------- शहराची वाढ करण्याची जबाबदारी सोपविली.

अ) पुणे ब) सातारा क) कराड ड) कोल्हापूर

**ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. बलुतेदार व अलुतेदारांना काय म्हणत?

२. रेशमाच्या व्यापारासाठी कोणते बंदर प्रसिध्द होते ?

३. इंग्रजांनी कोणत्या लाकडास भारताचा ओकवृक्ष म्हटले आहे ?

४. विजयदुर्ग बंदर कशासाठी प्रसिध्द होते ?

५. घाटावरचा प्रमुख अधिकारी कोण होता ?

## ३.३. सारांश :

मराठाकालखंडात महाराष्ट्रातील बहुतांश लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हाच होता. जमीन महसूल हेच राज्याच्या उत्पन्नाचे मुख्य साधन होते. जमिनीची मोजणी, प्रतवारी, बागाईत व जिराईत जमिन, पाटस्थळ व मोटस्थळ जमीन, घेतली जाणारी पिके व येणारे उत्पादन याचा विचार करून शेतसारा निश्चित केला जाई. नैसर्गिक आपत्ती, युध्द, लुटालूट, जाळपोळ इत्यादी प्रसंगी शेतसाऱ्यात सूट अथवा माफी दिली जाई. कालव्याच्या व पाटबंधाऱ्याच्या बांधकामासाठी, दुरूस्तीसाठी व जमीन लागवडीखाली आणण्यासाठी सरकार प्रयत्न करीत असे.

मराठा काळातील व्यवसाय शेतीशी निगडीत होते. त्याचे स्वरूप कुटीर उद्योगाचे होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यातील व्यापार, उद्योग व व्यावसायिकांना प्रोत्साहन दिले होते. पेशवाईत सुरूवातीच्या कालखंडात पेशव्यानी साम्राज्य विस्ताराबरोबर व्यापार, उद्योग व व्यवसायांकडे लक्ष दिले. त्यामुळे पेशवाईत नव्या व्यापारी, व्यवसाईक, सावकार आणि ठेकेदारांचा वर्ग निर्माण झाला. विविध जाती-धर्मातील लोक या क्षेत्रात दाखल झाले. सावकारी क्षेत्रात कोकणस्थ ब्राह्मणांचे वर्चस्व होते. मराठेशाहीच्या अस्तापर्यंत चांगले रस्ते बांधण्याकडे, दळणवळणाच्या सोईकडे फारसे लक्ष दिले नाही. उत्तर पेशवाईत व्यापार, उद्योग व व्यवसायांकडे पेशव्यांचे अक्षम्य दुर्लक्ष झाले. त्यामुळे व्यापार बसला, उद्योग बुडाले व व्यवसाय संपला. त्यामुळे या क्षेत्रातील सर्वांचा बोजा पुन्हा शेती व शेतीवर अवलंबून असणाऱ्या व्यवसायांवर पडला. लुटीतून मिळणारा पैसा पेशवाईला तारू शकला नाही. शेतकरी, समाज व राज्य यांची आर्थिक अवस्था अत्यंत बिकट झाली.

## ३.४ पारिभाषिक शब्द शब्दार्थ :

बिघावणी - जमिनीची मोजणी

बटाई - उत्पन्नाचा निम्मा हिस्सा.

खोत - कोकणातील शेतसारा वसूल करणारी व्यक्ती.

तगाई - शेतकऱ्यास अडचणीच्या काळात सरकारकडून मिळणारे कर्ज होय. तगाईची मुदत ३ ते ७ वर्षे असे. हे बिनव्याजी कर्ज होते. शेतकऱ्यांच्या सोई प्रमाणे कर्ज फेड केली जाई.

पाटस्थळ - नदी / नाले किंवा गावाजवळून वाहणारे ओढे यास बांध घालून अडविलेले पाणी पाट काढून शेतीस दिले जाई त्यास पाटस्थळ म्हणत.

मोटस्थळ - बैलांचा वापर करून मोटेच्या साहाय्याने विहिरीतील पाणी काढून पिकाला देण्याच्या पध्दतीस मोटस्थळ म्हणत.

चौथाई - उत्पन्नाच्या एक चतुर्थांश भाग.

सरदेशमुखी - पूर्ण उत्पन्नाच्या एकदशांश भाग.

## ३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

- **स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे १ :**

अ) १. वांझट २. काळी आई ३. पाच हजार

४. कानू ५. दुसरा बाजीराव.

ब) १. ब्राह्मणांना दान दिलेली करमुक्त जमिन म्हणजे अग्रहार होय.

२. बैलांचा वापर करून मोटेच्या साह्याने विहीरीतील पाणी काढून पिकाला देण्याच्या पध्दतीस मोटस्थळ असे म्हणतात.

३. पेशव्यांच्या गोशाळेत हणमगाई जातीच्या गाईचा संग्रह होता.

४. नदी-नाले किंवा गावाजवळून वाहणारे ओढे यास बांध घालून अडविलेले पाणी पाट काढून शेतीस दिले जाई त्यास पाटस्थळ म्हणत.

५. शेतकऱ्यांना अडचणीच्या काळात सरकारकडून मिळणारे बिनव्याजी कर्ज म्हणजे तगाई होय.

- **स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे २**

अ) १. पहिला बाजीराव २. १५० ३. सुतार ४. पोर्तुगीज ५. मीठ

ब) १. पुण्यात स्थानिक झालेल्या दैवज्ञ ब्राह्मणाचा व्यवसाय सुवर्णकाराचा होता.

२. गुऱ्हाळ उद्योग कोल्हापूर, सातारा, सांगली, कराड , इंदापूर भागात चालत असे.

३. पैठण शहर रेशमीलुगडी व त्यावरील भरतकामाविषयी प्रसिध्द होते.

४. महाराष्ट्रात धोतराचे उत्पादन सासवड, सुपे, टाकळी येथे होत असे.

५. तयार झालेल्या रंगाचा अर्क तांब्यांच्या भांड्याात उकळला जाई.

- **स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे ३ :**

अ) १. साहुकार २. ग्रामसेवक ३. १५० ४. चौधरी ५. पुणे.

ब) १. बलुतेदारांना कारू तर आलुतेदारांना नारू म्हणत.

२. चौल बंदर रेशमाच्या व्यापारासाठी प्रसिध्द होते.

३. इंग्रजांनी टिंबर जातीच्या लाकडास भारताचा ओकवृक्ष म्हटले आहे.

४. विजयदुर्ग बंदर विड्याच्या पानाच्या निर्मितीसाठी प्रसिध्द होते.

५. घाटपांडे हा घाटावरचा प्रमुख अधिकारी होता.

## ३.६. सरावासाठी स्वाध्याय :

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. मराठाकालीन महसूल व्यवस्थेचा आढावा घ्या.

२. पेशव्याच्या शेतीबाबतच्या धोरणाचे मूल्यमापन करा.

३. मराठाकालीन उद्योगधंद्याचा आढावा घ्या.

४. मराठाकालीन व्यवसायाची माहिती द्या.

५. मराठाकालीन राज्याच्या जमाखर्चाचा आढावा घ्या.

६. पेशव्यांची व्यापार उद्योगधंद्याबाबतची धोरणे स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा.**

१. मराठाकालीन शेतीसुधारणा.

२. मराठाकालीन पाटबंधारे व्यवस्था.

३. मराठोकालीन पेठांची निर्मिती.

४. मराठाकालीन शेतसारा आकारणीची तत्वे.

५. मराठाकालीन महसूल अधिकारी.

६. मराठाकालीन गावगाड्यातील व्यवसाय.

७. मराठाकालीन प्रमुख व्यापारी केंद्रे.

८. मराठाकालीन दळणवळणाची व वाहतुकीची साधने.

## ३.७ संदर्भ ग्रंथ :


१. गवळी पा. आ. (२०००) पेशवेकालीन महाराष्ट्र संस्था व संकल्पना, कैलास पब्लिकेशन्स औरंगाबाद.

२. ओतूरकर आर. व्ही. (१९५०) पेशवेकालीन सामाजिक व अर्थिकजीवन खंड १ भारतीय इतिहास संशोधन मंडळ.

३. चाफेकर ना. गो. (१९३७) पेशवाईच्या सावलीत, पुणे.

४. गवळी पा. आ. (१९८२) पेशवेकालीन समाज व जातीय संघर्ष.

५. गवळी पा. आ. (१९९०) पेशवेकालीन गुलामगिरी व अस्पृश्यता, प्राची प्रकाशन कोल्हापूर.

६. कुलकर्णी अ. रा. (२००७) मराठे आणि महाराष्ट्र डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

७. कुलकर्णी अ. रा. खरे ग.ह. (१९८५) मराठ्यांचा इतिहास खंड-२, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

८. कुलकर्णी अ. रा. खरे ग.ह. (१९८४) मराठ्यांचा इतिहास खंड-१, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

९. भावे वा. कृ. (१९७६) पेशवेकालीन महाराष्ट्र, भारतीय इतिहास अनुसंदान परिषद, नवी दिल्ली.

१०. खोबरेकर वि.गो.(१९९८) मराठा कालखंड भाग-२, म.रा. सा. आणि सं.मंडळ,मुंबई.

११. गर्गे स. मा. करवीर रियासत, कोल्हापूर, २००३

१२. पवार डॉ. आप्पासाहेब, ताराबाईकालीन कागदपत्रे, खंड १, २, ३, शिवाजी विद्यापीठ प्रकाशन.

१३. पवार डॉ. आप्पासाहेब, जिजाबाईकालीन कागदपत्रे, शिवाजी विद्यापीठ प्रकाशन, १९७८.

१४. Mahajan T.T. (1980) Industry Trade and Commerce during the Peshwa period, Jaipur.

१५. Kulkarni A. R. (1969) , Maharashtra in the Age of Shivaji (A study in Economic History), Pune.

१६. Chitnis K. N. (1994) , Glimpses of Maratha Socio-Economic History, Atlanta Publishers, New Delhi.

❖ ❖ ❖

## घटक – ४

# सामाजिक परिस्थिती

**अनुक्रमणिका :**

४.० उद्दिष्टे

४.१. प्रास्ताविक

४.२. विषय – विवेचन

    ४.२.१. सामाजिक रचना – कुटुंब, अस्पृश्यता, वेठबिगार, गुलामगिरी

    ४.२.२. स्त्रियांची स्थिती आणि जाती संस्था

    ४.२.३. स्वयं अध्ययन प्रश्न

४.३. स्वयं अध्ययन प्रश्न

४.४. पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.५. स्वं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६. सारांश

४.७. सरावासाठी स्वाध्याय

४.८. सदर्भ ग्रंथ

**४.०. उद्दीष्टे :**

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणांस –

- मराठाकालीन समाज–जीवन जाणुन घेता येईल.
- या कालखंडातील कुटुंबव्यवस्था, अस्पृश्यता, वेठबिगार आणि गुलामगिरी यांची माहिती घेता येईल.
- मराठाकालीन स्त्रियांची स्थिती अभ्यासता येईल.
- मराठकालीन जातीसंस्था जाणून घेता येईल.
- या काळातील शिक्षण आणि सण यांची माहिती घेता येईल.

### ४.१. प्रास्ताविक :

प्राचिन काळापासून चालत आलेल्या सामाजिक परिस्थितीत मध्ययुगीनही कालखंडात फारसा फरक पडलेला नव्हता. शतकानुशतके चालत असलेली सामाजिक परिस्थिती मराठा काळातही त्याच पद्धतीने होती. पेशवे काळात अस्तित्वात असलेल्या या सामाजिक परिस्थितीची बीजे येथील धर्मव्यवस्था, वर्णव्यवस्था, समाजव्यवस्था यामध्ये असल्याचे दिसते. पेशवे काळातील समाज हा चातुर्वर्ण्याश्रम धर्मशास्त्रे, पुराणे, स्मृती यावर आधारित होता. प्राचिन काळापासुन भारतीय समाज हा प्रामुख्याने ग्रामीण भागात राहणारा होता. शेती हा मुख्य व्यवसाय होता. खेडी स्वयंपूर्ण होती. खेड्यातील समाजाला लागणाऱ्या गरजा गावातुनच पूर्ण होत. शेतकऱ्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी गावात बारा बलुतेदार व अलुतेदारांचा वर्ग असे. शेती हा काळातील अर्थव्यवस्थेचा कणा होता. या देशावर अनेक राजवटींनी राज्य केले, परंतु या राज्यव्यवस्थेचा ग्रामीण जीवनावर फारसा फरक पडला नाही.

मध्ययुगातील समाजव्यवस्थेत छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या कारकिर्दीत बदल करण्याचा प्रयत्न केला. इस्लामी राजवटीच्या छळातून हिंदू समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी स्वराज्याची स्थापना केली. हे करीत असताना त्यांनी काही नव्या परंपरा निर्माण केल्या. परकिय सत्तांना नमविण्यासाठी आरमार बांधणी केली. सिंधुदूर्गसारखा आरमारी किल्ला बांधुन समुद्र पर्यटन निषिद्ध मानणाऱ्या हिंदूना जलमार्ग खुला केला. सक्तीने धर्मांतर केलेल्यांचे शुद्धीकरण करून त्यांना सन्मानाने स्वधर्मात घेतले. हे सर्व बदल नक्कीच क्रांतीकारक होते. महाराष्ट्रात हिंदवी स्वराज्य स्थापन करून समाजात स्वाभिमान स्वधर्माभिमान छत्रपती शिवाजी महाराजांनी जागृत केला, मात्र महाराजांचे हे समाजोपयोगी क्रांतीकारक बदल पुढे पेशवाईमध्ये चालू ठेवले नाहीत. कारण त्या काळात समाजव्यवस्थेवर धर्म व धर्मशास्त्राचा प्रभाव होता. आठराव्या शतकात मराठा राज्याची सत्तासूत्रे पेशव्याच्या हाती केंद्रित होती. त्यामुळे आपोआपच त्यांचे समाजात वर्चस्व प्रस्थापित झाले.

### ४.२. विषय विवेचन :

#### ४.२.१. सामाजिक रचना :

भारत हा खेड्यांचा देश म्हणून ओळखला जात होता. खेडी स्वयंपूर्ण होती किंबहुना त्या काळात सामाजिक आणि आर्थिक व्यवहाराचा केंद्रबिंदू म्हणजे खेडे होते. गावाची समाजरचना जातीव्यवस्थेवर आधारित होती. गावच्या या समाजरचनेला गावगाडा असे म्हणत. शेती व्यवसाय हाच जीवनाचा प्रमुख मार्ग असल्याने बहुतांशी लोक प्रामुख्याने त्यावरच अवलंबून असत. त्यामुळे शेतकरी हेच गावचे प्रमुख रहिवाशी. गावचा संपूर्ण कारभार हा गावगाडा चालवत असे. या गावगाड्यातील महत्वाचा घटक म्हणजे बलुतेदार. या बलुतेदारांच्या व्यवसायावरून बलुतेदारी पद्धत पुढे आली. या गावगाड्याच्या मध्यभागी पाटील, कुलकर्णी असत, सोबत बारा बलुतेदार असत.

खेड्याच्या अधिकार क्षेत्रात येणाऱ्या भुपृष्ठाचे वसाहतीची जागा अथवा पांढरी किंवा पांढरी आई आणि लागवडीची जागा अथवा काळी किंवा काळी आई, असे दोन विभाग होते. गावात वतनदार, मिरासदार,

बलुतेदार आणि उपरे या लोकांची वस्ती असे. गावात वेशीच्या आत सवर्ण तर वेशीबाहेर अस्पृश्यांची वस्ती असे. वेशीच्या आतील गावातही सवर्णांच्या वेगवेगळ्या जातींची गल्ली असे. गावकुसाबाहेरील शुद्रांना कोणत्याही परिस्थितीत वेशीच्या आत वस्ती करता येत नसे. पेशवेकाळात जातीव्यवस्था कडक असल्याने अस्पृश्यांच्या सर्वांगीण व्यवहारावर अनेक बंधने घातली होती. त्यांचे पाणवठे, मसणवटे वेगळे असत. ही समाजरचना माणसाच्या मनात घट्ट घर करून बसली होती.

**२. कुटूंब पद्धती/व्यवस्था :**

मराठाकाळात एकत्र कुटुंबपद्धती अस्तित्वात होती. या एकत्र कुटुंबात आई-वडिल, भाऊ-बहिण, चुलते त्यांची मुले व बायका असे घरातील आप्तजण मिळून २५-३० लोक एकत्र रहात असत. या सर्व कुटूंबावर पित्याचा अधिकार चाले म्हणजेच ही कुटूंबपद्धती पितृसत्ताक होती. घरातील कर्ता पुरूष (पिता) हा कुटुंब प्रमुख असे, त्याचा सर्वजण म्हणजे लहान मंडळी, व इतर मान ठेवत असत. कुटुंबप्रमुख हाच आर्थिक, सामाजिक, धार्मिक, नैतिक बाबतीत जबाबदार असे. पित्यानंतर त्याच्या ज्येष्ठ मुलाकडे कुटूंबाचे पालकत्व येई. एकत्र कुटुंबपद्धतीचा सर्वांना अभिमान वाटे. नात्याने व वयाने ज्येष्ठ असणाऱ्यांचा धाक लहानांच्यावर असे. मुले पित्याच्या, लहान भाऊ ज्येष्ठ भावाच्या आणि स्त्रिया पुरूषांच्या धाकात असत.

तत्कालिन काळ हा धामधुमीचा होता. इस्लामी तसे सत्ताधीशांच्या माहिमा, जाळपोळ, लुटमार, दरोडेखोरी तसेच साथीचे रोग, दुष्काळ या सारख्या नैसर्गिक आपत्तीसारखी अनेक संकटे कुटूंबावर येत असत. अशा या संकटांवर मात करण्यासाठी, मार्ग काढण्यासाठी एकमेकांच्या साथीची, आधाराची, प्रेमाची गरज लोकांना भासत असे. त्यामुळे एकत्र कुटूंबात एकमेकांबद्दल प्रेम, माया, त्याग, संयम इ. सद्‌गूण आपोआप जोपासले जात. माणसाचे सुख व दुःख पूर्णपणे कुटूंबाच्या स्वाधीन असे. एकत्र कुटुंबपद्धतीमुळे माणसाचे मनोधैर्य, आत्मबल वाढण्यात नक्कीच मदत होत होती.

शेती हा एकत्र कुटूंबाचा प्रमुख व्यवसाय होता. यासोबत शेतीशी निगडित पशुपालन हा ही व्यवसाय केला जाई. हे केवळ एकत्र कुटूंबपद्धतीमुळे त्यांना सोईचे ठरत असे. त्या काळातील समाजव्यवस्थेतील कुटुंब संस्था हा महत्वाचा घटक होता. कुटूंबात आनंदाचे वातावरण असे. अशा अनेक कुटुंबाचे मिळून गाव बनत असे.

**३. अस्पृश्यता :**

मध्ययुगीन कालखंडात जातीव्यवस्थेने उग्ररूप धारण केले होते. हिंदू धर्मातील वर्णव्यवस्थेची परिणती जातीव्यवस्थेत झाली. या जातिव्यवस्थेच्या विषवृक्षाला लागलेले अस्पृश्यता हे अत्यंत विषारी फळ होय. ग्रामीण जीवनात असणारी बलुतेदारी पद्धत आणि हिंदू समाजरचना यामुळे जातीयतेचे व अस्पृश्यतेचे अधिक पोषक झाले होते. या काळातही समाज हा अनेक जाती, उपजातीमध्ये विभागला गेला होता. धर्मशास्त्रीय कल्पनांचा पगडा समाजावर असल्याने समाजाचे आचरण, व्यवहार हा पुराण, स्मृती मधील तत्वाप्रमाणे होते. त्यांच्या सर्व व्यवहारावर अनेक बंधने घातली होती. या धर्मग्रंथांनीच शुद्र, अतिशुद्र, चांडाळ, दास अशा कनिष्ठ व सामाजिकदृष्ट्या हीन दर्जाच्या जातींना जनम दिला. यामधून त्यांनी कोणती कामे करावीत, कोणती कामे

करू नयेत हे स्पष्ट ठरवून दिले होते. धर्मशास्त्राप्रमाणे 'स्पर्श करण्यास अयोग्य' त्याला अस्पृश्य म्हणत. डॉ. आंबेडकरांच्या मते – 'विटाळ, भ्रष्टता, बाटणे आणि अशा प्रकारच्या विटाळातून मुक्त होण्याची भावना हीच अस्पृश्यतेमध्ये अंतर्भूत आहे.' अस्पृश्यांनी गावाबाहेर वस्ती करून राहावे, त्यांनी हीन दर्जाची कामे करावी. ठरवून दिलेल्या कामात त्यांनी दिरंगाई केली तर कठोर शिक्षेची त्यांना तरतुद होती. त्यांची सावलीसुद्धा विटाळ समजली जाई अस्पृश्यांना पाणवठा, मंदिर स्मशानभूमी इ. सार्वजनिक ठिकाणी बंदी होती.

पेशवेकाळात महार, मांग, चांभर, ढोर यांना अस्पृश्य म्हणून वागविले जाई. यांचे जगणे अत्यंत हालअपेष्टेचे होते. पेशवेकाळात अस्पृश्यता खूप काटेकोरपणे पाळली जाई. अस्पृश्यांना रस्त्यातून फिरताना गळ्यात मडके व कमरेला खराटा बांधणे बंधनकारक होते. कारण सपृश्यांची पावले अस्पृश्यांच्या पावलावर पडून विटाळ होवू नये अशी पद्धत होती.

**● अस्पृश्य जाती व त्यांची कामे :**

**१) महार :**

यांचा गावगाड्याशी फार जवळचा संबंध असे. मराठेकालीन प्रशासन, न्याय, जमिनीचे तंटे, शेतसारा यामध्ये महाराला महत्वाचे स्थान होते. त्यांच्या तराळ, येसकर, जागले, भूमिपुत्र, राबता अशा उपजातींच्या नोंदी तत्कालिन कागदपत्रांत दिसतात. गावकऱ्यांकडून त्याला ५२ प्रकारचे हक्क होते.

महारांची बलुतेदारीसंबंधित तीन प्रकारची कामे असत.

१) बलुतेदारीची कामे २) पारंपारिक सरकारी कामे ३) पारंपारिक गलिच्छ कामे.

**१) बलुतेदारीची कामे :–**

१) शेतकऱ्यांचे नांगर, बी व इतर सामान शेतावरून दररोज नेणे व आणणे.

२) शेतकऱ्यांच्या गुरांचे गोठे दररोज साफ करणे.

३) शेतकऱ्यांची लाकडे फोडणे, त्यांना सरपण आणुन देणे.

४) जमीनदार, वतनदार, मिरासदार यांना प्रवासात सहाय्य करणे.

५) गावकीची कामे करणे.

**२) पारंपारिक सरकारी कामे :**

१) गावचा वसूल तालुक्याला पोहोचविणे.

२) सरकारी अधिकारी गावात आल्यास सर्व गावकऱ्यांना चावडीवर बोलविणे.

३) सरकारी अधिकाऱ्याचे दफ्तर तालुक्याला पोहोचविणे.

४) गावच्या पीक पाहणीत पाटील- कुलकर्णी यांना मदत करणे.

५) गावातील जन्म-मृत्यू नोंदी पाटलाला कळविणे.

६) पाटलाच्या जोडीने रात्री गावात गस्त घालणे.

७) गावातील मोकाट जनावरे कोंडवाड्यात घालणे.

८) गावातील चोरीचा माग काढणे.

**३) पारंपारिक गलिच्छ कामे :-**

१) गावची झाडलोट करणे.

२) इच्चभ्रू लोकांचा परिसर झाडून साफ करणे.

३) गावात जनावर मेल्यास ओढून गावाबाहेर नेणे.

४) जनावराचे कातडे सोलून ते मालकास परत देणे

**२. मांग :**

मांग या जातीमध्ये अनेक पोटजाती होत्या. उदा. घोटके - घोड्याची देखभाल करणारे, डफळे - डफ किंवा हलगी तयार करणे, मांग गारूडी - सापाचा खेळ करणारे इ.

**कामे :**

१) शेतकऱ्यांना दोरखंड पुरविणे.

२) सणाला आंब्याचे तोरण गावच्या वेशीला बांधणे.

३) पाटील, कुलकर्णी व इतर वतनदारांच्या दरवाज्यावर आंब्यांचे तोरण बांधणे.

४) लग्नाच्या वेळी केरसुण्या, झाडू पुरविणे.

५) लग्नाच्या वेळी सनई वाजविणे.

**३. चांभार : कामे -**

१) शेतीसाठी आवश्यक असणारी कातड्याची मोट शिवणे.

२) जुन्या मोटेस ठिगळ लावणे.

३) गोफणी तयार करणे किंवा गोफणीला खळे लावणे.

४) चपला शिवणे. वर्षातून ठराविक चपला व जोडा वतनदारांना पुरविणे.

५) आसूड तयार करणे.

**४. ढोर :**

१) कातडी कमविणे हे यांचे मुख्य काम होय.

२) मेलेले जनावर गावाबाहेर ओढून नेणे व त्याची कातडी सोलणे.

३) विहीरीवरील मोट बांधणे.

- **बलूतेदारांना मिळणारे बलूते :**

बलुतेदार सातत्याने खेड्यातील लोकांची सेवा करीत असत. त्यांना शेतीसाठी आवश्यक कामापासुन इतरही हलकी कामे करावी लागत. त्याचा मोबदला म्हणून त्यांना बलूते मिळत.

१) बलुते रोख पैसे किंवा वस्तूंच्या रूपाने मिळे.

२) लग्न कार्य व सणासुदीला मानपान व हकलाजिमा मिळत असे.

३) काही प्रमाणात करमुक्त जमीन इनाम म्हणून मिळत असे.

**४. वेठबिगारी :**

प्राचिन काळापासून वेठबिगारी पद्धत अस्तित्वात होती. त्याकाळी राजेशाही पद्धत असल्यामुळे प्रजेच्या संरक्षणाच्या बदल्यात करवसुल केला जात असे. ज्या समाज घटकांना हा कर देण्याची ऐपत नसे त्यांना या कराऐवजी काही काळापुरते विनावेतनावर काम करावे लागत असे म्हणजेच सरकारला कर देता येत नसल्यामुळे कराचा मोबदला म्हणून त्यांनाआपली सेवा सरकारला द्यावी लागे. ही विनावेतन काम करण्याची पद्धत म्हणजे 'विष्टी' होय. जो वेठबिगार म्हणून काम करित असे त्याला 'वेठेकरी' व 'बिगारी' म्हणून संबोधले जाई. यामध्ये बकाळ, ठाकूरी, गुरव, बुरूड, धनगर, महार, मांग, चांभार इ. वर्गाचा समावेश असे. पेशवेकाळात सात प्रकारची वेठबिगारी होती ती पुढीलप्रमाणे -

१) सरकारी बांधकाम करणे

२) किल्ले बांधणी व दुरूस्तीचे काम करून घेणे

३) धरणे, तलाव यांचे बांधकाम करून घेणे

४) सरकारी गवत, कुरणे कापणे

५) घर बांधण्यासाठी मदत घेणे.

६) देशमुख - वतनदारांचे वाडे बांधण्यासाठी मदत घेणे.

७) सरकारी कामकाजासाठी वापर करून घेणे.

पेशवेकाळात अस्पृश्यांना वेठबिगारीची कामे दिली जात. वेठबिगारीचा कार्यकाल प्रत्येक प्रांतामध्ये, परगण्यामध्ये भिन्न असे. तो आठवड्याचा, दोन महिन्यांचा किंवा सहा महिन्यांचाही असे. त्यांची कामे अंग

मेहनतीची असे. गावगाड्यात व वतनदारांकडे उपाशीसुद्धा राबविले जाई. राबता महार, तराळ, जागल्या इ. वेठबिगारांकडून सरकारसुद्धा कामे करून घेत असे. वतनदार, जहागीरदार यांनाही वेठबिगारांकडून सरकारसुद्धा कामे करून घेत असे. वतनदार, जहागीरदार यांनाही वेठबिगारीकडुन सेवा करून घेण्याचा हक्क होता. वतनदार, सरदार प्रवास, शिकार व तीर्थक्षेत्रास जात तेव्हा त्यांच्या प्रवासाची, राहण्याची, साहित्याची, जेवणखान व पाण्याची सोय करण्यासाठी कुंभार, सुतार, गुरव, लोहार व बुरूड इ. लोकांना वेठबिगारीने काम करावे लागे. मोठ्या वतनदारांच्या घरी सण-समारंभाच्या वेळी वेठबिगारी काम करत असत. या कामाच्या मोबदल्यात त्यांना धान्य किंवा पैशाच्या स्वरूपात अडशेरी देण्यात येई. मोबदला दिला नाही तर तक्रार करण्याचीही सोय नव्हती. पेशवे काळातील वेठबिगार अती काम व श्रमामुळे त्रस्त झाल्याचे आणि काम सोडून पळून गेल्याचे संदर्भ मिळतात. वेठबिगारी ही एक प्रकारची गुलामगिरीच होती. वेठबिगारांच्या कामास काळ-वेळ नसे. ऊन-पावसात, थंडी-वाऱ्यात, रात्री-अपरात्री त्यांना काबाडकष्ट करावे लागत होते. वेठबिगारांना अपमान व आर्थिक शोषणाला बळी पडावे लागे. कोल्हापूर राज्यातील मौजे आडवली तर्फ साळसी गावातील मिरासी व साठम यांच्या वेठीच्या धास्तीमुळे लोक पळून जात असल्याची तक्रार केली होती.

**५. गुलामगिरी :**

मध्ययुगीन महाराष्ट्रात असणाऱ्या गुलामगिरी या संज्ञेचे स्वरूप ग्रीक किंवा रोमन साम्राज्यामधील गुलामगिरीपेक्षा वेगळे होते. तेथील गुलामांना वाईट वागणूक मिळत असे. त्यामुळे गुलामगिरी हा एक शाप म्हणून ओळखला जात असे. भारतातील गुलामगिरीचे अस्तित्व व स्वरूप निश्चितपणे सौम्य होते. भारतीय समाजात गुलामगिरीच्या संस्थेचे फार प्राचीन काळापासून अस्तित्व होते. प्राचीन काळामध्ये गुलामांची खरेदी-विक्री होत असे. आणि फार मोठ्या प्रमाणात असे घरकाम करणारे गुलाम असत. परंतु या काळी काही पैसे देवून गुलामांना स्वतःची मुक्तता करुन घेण्याची मोकळीक होती. मोगलकाळात गुलामगिरी हे मुस्लिम समाजाचे एक स्थायी वैशिष्ट होते. या काळात भारतात गुलामगिरी मोठ्या प्रमाणावर होती. युद्धकैद्यांना सुद्धा गुलाम बनविले जाई. मध्ययुगीन भारतामध्ये हिंदू-मुस्लिम दोन्ही समाजामध्ये गुलाम ठेवण्याची पद्धत होती. गुलामांचे नियमित बाजार भरत असत. कोल्हापूर राज्यातही माणसांची खरेदी-विक्री होत होती.

शिवकाळामध्ये गुलामगिरी या प्रथेमध्ये फारसा फारक पडलेला नव्हता. पेशवाईत गुलामगिरीचे स्वरूप हिंदु धर्मशास्त्रात सांगितल्याप्रमाणेच होते, पण त्यात काही कालानुरूप बदल करून तिचे अस्तित्व मात्र त्या काळच्या समाजजीवनात होते.

- **पेशवेकालीन गुलामगिरीच्या निर्मितीची कारणे :**

१) प्राचीन आणि मध्ययुगीन काळात युद्धामध्ये पराभूत झालेल्यांना गुलाम बनविले जाई. त्याचप्रमाणे पेशवाईत युद्धोत्तर धरपकडीत प्रामुख्याने स्त्रियांना गुलाम म्हणून आणले जाई.

२) कर्ज बाजारीपणा हे गुलामगिरीचे महत्वाचे कारण. कर्ज फेड करता आली नसल्यामुळे गुलामगिरीचा मार्ग स्विकारावा लागे.

३) दुष्काळासारख्या नैसर्गिक आपत्तीमध्ये गुलामांच्या संख्येत वाढ होत असे. त्यामुळे अशा परिस्थितीत मरण स्विकारण्यापेक्षा लोक श्रीमंतांचा गुलाम होणे हा पर्याय स्विकारत असत.

४) पेशवाईत बदकर्म करणाऱ्या स्त्रिला गुलाम केले जाई, पण हा निर्णय सर्व जातीतील स्त्रियांस नव्हता. जर स्त्री शुद्र असेल तरच गुलाम केले जाई.

५) पेशवेकाळात राजे, प्रधान, सरदार किंवा श्रीमंत माणूस आपल्या जवळच्या नातलगास किंवा आप्तास बटीक किंवा कुणबीण बक्षीस म्हणून देत असत.

६) एखादा गरीब माणूस आपल्या मुलगा किंवा मुलगी व्यंग असल्यास त्यास कोणाला विकत किंवा फुकट देई.

**● गुलामांना मिळणारी वागणूक :**

गुलामांना मिळणारी वागणूक व त्यांचे जीवनमान हे त्यांच्या मालकांवर अवलंबून असे. गुलामांना सदा सर्वकाळ वाईट वागणूक दिली जात नसे, तर काही वेळा मालकाकडून चांगल्या प्रकारचीही वर्तणूक त्यांना मिळत असे. म्हणून तर पेशवेकाळात गुलाम नसलेल्या माणसापेक्षा त्यांना वागणुक चांगली मिळत असे. गुलामांच्या मालकांकडून प्रत्येक शुभप्रसंगी गुलामांना चांगली वागणूक मिळत असे. मालक श्रीमंत आणि उदार असेल तर बक्षीस म्हणून रोख रक्कम व भेटीदाखल वस्तू देत असे. काही वेळेस मालक आपल्या कुणबिणीच्या मुलामुलींची लग्नेसुद्धा लावून देत असत. गुलामाचे मालक काही वेळा सरकारी दरबारी जर त्यांच्या गुलामांचे लग्न त्यांच्या संमतीशिवाय ठरत असेल तर तक्रार करीत असत. मालक दयाळू असेल तर त्याच्याप्रमाणे त्यांच्या खाण्यापिण्याची, कपडालत्याची व लग्नाची सोय करीत असे, तसेच तो जमीन बक्षीस देत असे.

**● मराठाकालीन गुलामगिरीचे स्वरूप आणि कामे :**

मराठाकालीन समाजामध्ये गुलामगिरी ही पद्धत होती. सरदारांच्या पदरी दास-दासी असत. दासांना 'पोरगे' म्हणत तर दासींना 'कुणबिणी' म्हटले जाई. त्यांना सर्व प्रकारची घरगूती व सेवेची कामे करावी लागत. बहुतेक सर्व जातींमधील कुणबिणी असत. कुणबिणी जशा विकत मिळत तशाच त्या गहाणही ठेवता येत असत. पेशवाईत पुरूष गुलामांपेक्षा स्त्री-गुलामांची संख्या जास्त होती. स्त्री गुलामांना नानाविविध प्रकारची कामे करावी लागत असत. त्यांच्या कामांचे स्वरूप त्यांच्या दर्जावर अवलंबून असे. शेतीकाम व घरकाम ही गुलामांची प्रमुख कामे होती. पण घरकामात उपयोगाला येणारे गुलामच जास्त होते. दळण-कांडण, राखण, मुलांचा सांभाळ अशी कामे स्त्री गुलामांना करावी लागत. तर घोड्यांचे तबेले, अतिथीगृह, नाट्यगृह, शिकारखाना, मुदपाकखाना, दफ्तरखाना, पीलखाना इ. ठिकाणी पुरूष गुलामांना कामे करावी लागत. करवीर महाराणी जिजाबाई यांच्याकडे गंगू व लिंगू या कुणबिणी होत्या. या दोघी महाराणी जिजाबाईंना कारभारात मदत करत होत्या.

पेशवेकाळात दासाची (पोरगे) किंमत १२५-१५० रूपये तर दासीची (गुणबिण) ची किंमत ६०-७० रु.

होती. पेशवाईत गुलामांचा व्यापार समुद्रकिनारी चालत असे. हा व्यापार चारण आणि बंजारी लोक करीत असत. या व्यापारातून सरकारला जकात मिळत असे.

गुलामांना वेळप्रसंगी तारण ठेवले जाई. इतर संपत्तीप्रमाणे गुलाम स्त्री-पुरूषांची वाटणी मालकाच्या वारसांमध्ये होत असे. ना. गो. चापेकर 'पेशवाईच्या सावलीत' या ग्रंथात म्हणतात- 'जेव्हा एखाद्या गुलाम स्त्रीवरील हक्क दोन वाारसांकडे जात असे तेव्हा तिची किंमत पैशात करून निम्मी किंमत ज्याला गुलाम स्त्री मिळे, त्याने दुसऱ्या हक्कदाराला द्यावयाची असे. गुलाम स्त्रीकडून काही भेट मिळाल्यास तिची गुलामगिरीतून मुक्तता करून तिला स्वातंत्र्य देण्यात येई. गुलाम दास-दासींना मोबदला देऊन, पर्यायी व्यक्ती देवून स्वतःची मुक्तता करून घेता येत असे. गुलाम मालकांच्या सेवेत असला तरीही त्याला मालमत्ता करण्याचा हक्क होता.

कुणबिणींप्रमाणेच नायकिणींचा व्यवसाय, धंदा पेशवाईत चालत होता. या धंद्यासाठी पोरी विकत घेतल्या जात असत. हिंदू लोक नायकिण विकत घेत असत. नायकिणींचा पिढीजात धंदा नाचणे व गाणे हा होता. पेशवे व सरदारांच्या दरबारी नायकिणींचे नृत्य व गायन होत असे.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - १.**

**अ) अचूक पर्याय निवडा.**

१. खेड्यातील वसाहतीच्या जागेला .......... असे म्हणत.

अ) काळी आई ब) पांढरी आई क) हिरवी आई ड) वनराई.

२. गावगाड्यातील महत्वाचा घटक ......... होय.

अ) अलुतेदार ब) मिरासदार क) बलुतेदार ड) उपरे.

३. 'विटाळ, भ्रष्टता, बाटणे आणि अशा प्रकारच्या विटाळातुन मुक्त होण्याची भावना हीच अस्पृश्यतेमध्ये अंतर्भूत आहे' असे .......... यांचे मत आहे.

अ) डॉ. आंबेडकर ब) महात्मा फुले क) शंकरराव खरात ड) दया पवार.

४. कातडी कमविणे हे .......... याचे काम आहे.

अ) मांग ब) चांभार क) ढोर ड) महार.

५. जो वेठबिगार म्हणून काम करी त्याला .......... म्हणून संबोधले जाई.

अ) फेटेकरी ब) मेठेकरी क) पेठेकरी ड) वेठेकरी.

६. पेशवे काळात .......... इतक्या प्रकाराची वेठबिगारी होती.

अ) ५ ब) ६ क) ७ ड) ८

७. पेशवेकाळात दासांना .......... असे संबोधले जाई.

अ) छोट्या  ब) पोरगे  क) मुलगा  ड) पिंट्या.

८. पेशवाईत गुलामांचा व्यापार .......... येथे चाले.

अ) समुद्रकिनारी  ब) किल्ल्यावर  क) सरदारांचे वाडे  ड) अज्ञान स्थळी.

९. 'पेशवाईच्या सावलीत' हा ग्रंथ .......... यांनी लिहिला आहे.

अ) अ. रा. कुलकर्णीब) ना. गो. नाफेकर  क) वा. कृ. भावे  ड) प्रमोद ओक.

१०. नायकिणींचा पिढी जात धंदा .......... व .......... होता.

अ) नाचणे, गाणे.  ब) कपडे शिवणे, विकणे

क) दागिणे तयार करणे, विकणे  ड) वेगवेगळया वस्तू बनविणे , विकणे.

### ४.२.२ स्त्रियांची स्थिती आणि जाती संस्था :

**१) स्त्रियांची स्थिती** :

मराठाकाळातील ही समाजव्यवस्थेमध्ये स्त्रियांची स्थिती फारसी चांगली नव्हती. समाजात स्त्रिला गौण स्थान होते. कुटूंबामध्ये पुरूषप्रधान संस्कृती असल्याने तिला कुटूंबातही स्थान नव्हते. तत्कालिन स्त्रियांचे जीवन हे धर्मशास्त्रे, रूढी, परंपरा, चालीरीती यांच्या बंधनात चारी बाजूंनी जखडले होते. म्हणजेच जन्माला आल्यापासून मरेपर्यंत तिला वडील, पती, मुलगा यांच्यावरच अवलंबून राहावे लागे. स्त्रिकडे भोगवस्तू म्हणून पाहिले जाई. तिला आचार व विचारांचे स्वातंत्र्य नव्हते. शिक्षण घेण्याचा तिला अधिकार नव्हता. स्त्रियांना रुढीच्या बंधनांनी जखडून टाकलेले होते. त्या असहाय्य जीवन जगत होत्या. परंपरेने माहीत असलेल्या गोष्टी, ओव्या, लोकगीते, लोककथा यांचा संस्कार ग्रामीण स्त्रियांवर होत असे, हेच तिचे शिक्षण असे. अंधश्रद्धेची पकड मध्ययुगात दृढ होती. त्यामुळे अनेक धार्मिक विधी, व्रते, पूजा-अर्चा यांच्यात स्त्रियांचा जीव मेटाकुटीला येत असे. धर्मशास्त्रे व धर्मग्रंथ वाचण्याचा तिला अधिकार नव्हता. स्त्रियांना अर्थार्जनासाठी घराबाहेर जाता येत नसे. शेतकऱ्यांच्या स्त्रिया मात्र शेतकऱ्यांच्या बरोबरीने शेतीची कामे करत असत. याचसोबत बलुतेदार व अलुतेदारांच्या स्त्रियांही शेतीसाठी उपयुक्त कामासाठी घराबाहेर जात असत. स्मृतिकारांनी स्त्रिला पतिसेवा हाच तिचा खरा धर्म असे तिच्यावर बिंबविल्याने तिला पूर्णपणे परावलंबी बनवले होते.

समाजामध्ये त्या काळात असणाऱ्या वाईट चालीरीती पुढील प्रमाणे -

**१. बालविवाह** :

मराठा काळात सर्रास बालविवाह होत असत. मुलगी आठ वर्षापूढे लग्नावाचून राहू देणे हा अधर्म मानला जात असे. ही पद्धती समाजात रूढ असल्याने घराणे, प्रतिष्ठा पैसा या गोष्टींना विवाह ठरविताना फार महत्व असे. त्या वधूला मात्र फारसे महत्व नसे. मुलाचे वय १२ ते १३ वर्षांचे असे. पेशवेकाळात धर्मशास्त्राचे

विवाहविषयक नियमांचे पालन तंतोतंत केल्याचे दिसते. खुद्द पेशव्यांनी धर्मधास्त्राचे पालन करून आपल्या मुला-मुलींची लग्न बालपणातच केल्याचे दिसते. उदा. नानासाहेब पेशवे वय ९-१० वर्ष विवाह ४-५ वर्षांच्या गोपिकांबाई समवेत, बाजीराव दुसरा विवाह ९ व्या वर्षी, हिंदूधर्माप्रमाणे पुरूष हा विवाहसमयी दान घेणारा व वधु ही केवळ 'देय' वस्तू होती. ती तिच्या पालकांनी वराला अर्पण करावयाची असे. या बालविवाहांचे अत्यंत दुःखद आणि वाईट परिणाम त्या स्त्रिला भोगावे लागत. लग्नापासून ऋतुप्राप्तीपर्यंतचा तीन ते चार वर्षांचा काळ मुली आपल्या माहेरीच राहात असत. ऋतुप्राप्ती होण्याचा प्रसंग म्हणजे तिच्या सासर व पतीसाठी एखाद्या उत्सवासारखा वाटे. याचा परिणाम स्त्रियांना मातृत्व ही अल्पवयातच येई. कोवळ्या वयातील बाळंतपणामुळे त्या मृत्युदेखील पावत तसेच साथीचे रोग किंवा लढाईमध्ये मृत्यू पावला तर त्या मुलीस अकाली वैधत्व येई व तिला पुढचे संपूर्ण आयुष्य दुःखात आणि कष्टात घालवावे लागे.

**२. विधवा विवाह बंदी :**

मराठा काळात ब्राम्हण समाज व ९६ कुळी मराठा समाज यांच्यात विधवांच्या पुनर्विवाहास, बंदी होती. स्त्रियांवर चारही बाजूंनी बंधने घालून स्त्रियांनी पुनर्विवाह करू नये हा नियम आचारात आणणारा केवळ हाच समाज होता. या बाबतीत ब्राम्हण स्त्रियांचा संयम अलौकिक म्हटला पाहिजे. विवाह हा धार्मिक विधी होता. त्यामुळे एकदा विवाह झाला की तो वर्जलेप समजला जाई, इतका की एखादी ८-९ वर्षाची मुलगी विधवा झाली तरी तिच्या पुनर्विवाहाचा विचार पापमय समजला जात असे. मात्र शुद्र व अतिशुद्र समाजात विधवांच्या विवाहाला परवानगी होती. पण बहुसंख्य समाज उच्यवर्णियांचे अनुकरण करीत असे.

**३. केशवपन :**

व्रतस्थ संन्यासिनीचे जीवन विधवेने जगलेच पाहिजे अशी त्या काळची समजूत होती. त्यामुळे थोडा जरी सुखाचा विचार जरी मनात आला तरी ते पाप मानले जाई. विधवेने केसांचे वपन करावे अशी पद्धत त्याकाळात ब्राम्हण समाजात होती. तिने चांगले दिसू नये अशी बंधने तिच्यावर लादण्यात आली. उपासतापास करून तिने शरीर झिजवावे आणि धर्माचे उदात्त आचरण करीत देहधर्म विसरावा, मोहाच्या क्षणांवर विजय मिळवावा अशी हेतुपुरस्सर योजना होती. कुटूंबात, समाजात हरघडी तिचे दुर्देव आडवे येई. तिला कोणत्याही समारंभात जाण्याची परवानगी नसे. त्या काळी अत्यंत कठिण अशी व्रते विधवा करीत. त्यांचे सोवळे तर फारच कडक असे. ब्राम्हण विधवांना वपन करण्यासाठी न्हाव्यापुढे बसावे लागे. न्हाव्याचा स्पर्श त्यांना होई, म्हणूनच वपन करून घेण्याच्या क्रियेला 'विराळ करुन घेणे' असेच नाव होते. थोडक्यात विधवेने आयुष्यभर परावलंबी व अपमानित जिणे जगावे असाच प्रघात होता.

**४. सती पद्धत :**

सती जाण्याची पद्धती म्हणजे हिंदु समाजातील स्त्री जातीच्या जीवनाला मिळालेला मोठा शाप होता. मराठा काळातही सतीची चाल महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर रुढ होती. खरे म्हणजे पतीवरील असीम प्रेमामुळे त्याच्याशिवाय जीवन अशक्य असल्याने स्त्रियांनी स्वेच्छेने सहगमन करणे हे सती प्रथेमध्ये अभिप्रेम होते.

पेशवाईत १०-१२ वर्षांच्या मुलीसुद्धा सती गेल्याचे दाखले आढळतात. उदा. बापू गोखले यांची १२ वर्षांची सती गेलेली सून.

सतीच्या उदाहरणात खुपवेळा धार्मिक वृत्तीचा मनावरील पगडा, मोक्षाचे प्रलोभ, पुढील जन्माची व्यवस्था, घराण्याची प्रतिष्ठा ही सुद्धा कारणे दिसतात. त्या काळी नवऱ्याच्या राखेत आपली राख मिसळणे हे फार मोठे धार्मिक कृत्य आहे, हा संस्कार मुलींच्या मनावर केला जात असे.

काही वेळा स्त्रीला सती जाणेसाठी जबरदस्ती सुद्धा केली जात असे. उदा. छत्रपती शाहू महाराजांची पत्नी सकवारबाई, कोल्हापूरच्या छत्रपती घराण्यातील स्त्रिया सती गेलेल्या दिसत नाहीत. पेशवेकाळात थोरल्या माधवराव पेशव्यांची पत्नी रमाबाई देखील सती गेली होती. देशस्थापेक्षा कोकणस्थ ब्राम्हण समाज सती जाण्याच्या पद्धतीस बराच काळ चिकटून राहिल्याचे दिसते. या संदर्भात लोकहितवादी म्हणतात - 'उच्च जातीत म्हणजे ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य यामध्ये नवरा मेला म्हणजे स्त्रिया सती जात. ही चाल मोठी प्रबळ होती व स्त्रिया हा मान मोठा समजून अग्नीत उड्या टाकीत'. सती जाणाऱ्या स्त्रिच्या बलिदानाचा स्त्री समाजाच्या मनावर दृढ परिणाम झाला असावा हे मात्र नक्की.

**५. बहुपत्नीकत्व :**

मराठा काळात बहुपत्निकत्वाची चाल मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात होती. करवीर छत्रपती शिवाजी दुसरे यांना १३ बायका होत्या. सरदार, जहागिरदार, वतनदार यांच्यात ही सर्रास पद्धत होती. पुरूष कोणत्याही वयात कितीही स्त्रियांशी विवाह करीत असे. बहुजन समाजात बहुधा एकच पत्नी असे. गोरगरिब पुरूषांना मुलीचे बाप मुली देत नसत. विवाहबाह्य संबंध ठेवण्यास पुरूषांना परवानगी होती तसेच अंगपत्नीही ठेवण्यात समाजमान्यता होती.

उदा. छत्रपती शाहू महाराज - विरूबाई, बाजीराव - मस्तानी, महादजी शिंदे - केशरी.

**६. अंधश्रद्ध - व्रतवैकल्ये व लोकभ्रम :**

पेशवाईत अंधश्रद्धा, व्रतवैकल्यांना ऊत आला होता. शकुन, अपशकून, पायगूण, ग्रहपीडा, नवस, अनुष्ठान, भूतबाधा, चेटूक, होम-हवन, ब्राम्हण भोजने व दक्षिणा इ. गोष्टींवर लोकांचा विश्वास होता. या सर्व गोष्टी केल्याने आपले ईप्सित साध्य होते, गुण येतो, संकट दूर होते अशा पद्धतीचा लोकांचा समज होता. काही स्त्रिया चार्तुर्मासात तुळशी, वड, पिंपळ यांना प्रदक्षिणा घालीजत ही श्रद्धा एवढी बळावलेली होती की एखादा बुवा जर त्यांना म्हणाला की निवडुंग, बाभळला प्रदक्षिणा घाला तर त्या घालीत असत. काही वेळा पेशव्यांच्या स्त्रियांनी पिराला नवस केल्याचे दिसते. उदा. काशीबाईंनी आपल्या मुलांना आलेल्या देवी संबंधीचा नवस मुसलमानी राजवटीमुळे व इस्लामच्या कडवट धर्मप्रचारामुळे सामान्य जनताही हिंदू देवतांच्या बरोबर मुसलमानी पीर - अवलियांना भजू लागले होते.

सुर्योपासना केल्याने पुत्रप्राप्ती होते अशी ही समजूत त्या काळी होती. व उपासनेनंतर त्यांची नावे सुर्याजी, रविशंकर असे ठेवीत.

ज्योतिषावरही त्याकाळी बराच विश्वास होता. पैसा खर्च करून जन्मपत्रिका करून घेत. आजार घालविण्याकरिताही बरेच तोडगे असत. उदा. शिशाची यंत्रे गळ्यात बांधणे, अंगावरून मांस व दारू ओवाळणे इ.

भूतांवर त्या काळातील समाजाचा गाढा विश्वास होता. या संदर्भात वा. कृ. भावे म्हणतात. 'कोकणातील भूते देशावरच्या भूतांपेक्षा जास्त खट्याळ होती.' कोल्हापूर राज्यातील मौजे म्हाळुंगे येथील कृष्णाजी साठम यास एका भूताचा उपद्रव झाला होता असा उल्लेख सापडतो. अशा पद्धतीच्या कितीतरी अंधश्रद्धा सर्रास रूढ असल्याचे दिसते.

पेशवेकाळात धार्मिक कृत्यांनी सर्व भूमी दुमदूमली होती. स्त्रिया कोणतेही व्रत वगळत नसत. त्रिपुरारी पार्णिमा व्रत, सप्तमीव्रत, संकष्टी चतुर्थीव्रत, प्रतिपदाव्रत, ऋषिपंचमी, रथसप्तमी, हरितालिका, सोळा सोमवार इ. या मागचा उद्देश हा देवदेवतांना प्रसन्न करून घेणे, संकटमुक्त होणे, कार्यसिद्धीस जाणे असाच होता.

**७. विवाहपद्धती :**

पेशवे काळात विवाहाचे अनेक प्रकार प्रचलित होते. त्यापैकी बालविवाहाचा मुद्दा आपण मागे अभ्यासला आहे. इतर विवाहाच्या पद्धती.

**१. विषम विवाह :** ही प्रथा सर्वमान्य होती. विषम विवाह पद्धती म्हणजे वर वधुपेक्षा बराच मोठा असणे. उदा. नानासाहेब पेशवे वय ४० तर वधूचे वय ९ वर्षे, नाना फडणवीस वय ६७ तर शेवटची पत्नी ९ वर्षे,

**२. असुर विवाह :** या विवाह प्रकारामध्ये वधूला विकत घेवून विवाह केला जात असे. या पद्धतीमध्ये मुलीच्या मनाचा विचार केला जात नसे.

**३. राक्षस विवाह :** वधूला जबरदस्तीने पळवून नेऊन विवाह करण्याची ही पद्धत होती. मराठा कालखंडात या विवाह प्रकारची अनेक उदाहरणे सापडतात.

**४. विधवा विवाह :** ब्राम्हण जातीमध्ये विधवा विवाहास संमती नव्हती. त्यामुळे अल्पवयात विधवा झालेल्या मुलींना आपले जीवन अत्यंत दुःखात कंठावे लागे. पण ब्राम्हणेत्तर जातीमध्ये विधवांना विवाह मान्यता होती. या प्रकारच्या विवाहास पाट लावणे असे संबोधले जाई. डॉ. इरावती कर्वे यांच्या मते पाट लावणे याचा अर्थ वस्त्र नेसवणे असा असावा. सासरकडून उघड्या पडलेल्या बाईला वस्त्र देणे असा अर्थ दिसतो. पाट लावलेल्या स्त्रीला धर्मपत्नीचा मान धार्मिकदृष्ट्या मिळत नव्हता, पण तिला संसारातल्या विशिष्ट स्थानाला धक्का बसत नसे. सर्व जातींत पाट रात्रीचाच लावला जाई. यासाठी सुवासिनी, कुमार कुमारिका, लग्नाचे पुरूष हजर नसत तर विधवा स्त्रिया, पाट लावलेल्या बायका, म्हातारी माणसे हजर असत.

**८. घटस्फोट :**

उच्चवर्णियांमध्ये घटस्फोट किंवा पुनर्विवाह मान्य नसल्याने या जातीतील स्त्रीला नवऱ्याचा व सासूचा अन्याय निमुटपणे सहन करावा लागे. कनिष्ठ जातीमध्ये नवरा-बायकोच्या भांडणावरून काडीमोड घेतला जाई.

**९. समाजातील निकृष्ट स्थान असलेला स्त्रीवर्ग :**

**१. गणिकांचा वर्ग (रखेली)** : महाराष्ट्रातील गणिकांचा वर्ग अस्तित्वात होता. सरदार, राज्यकर्ते, वतनदार यांचे जनानखाने असत. यांनाच रक्षा, उपस्त्री, अंगवस्त्र, नाटकशाळा असे ही संबोधले जाई. काही महत्वाकांक्षी गणिका राज्यकर्ते व सरदारांच्या जनानखान्यात प्रवेश मिळवत आणि आपले वेगळे स्थान निर्माण करीत असत.

**२. मुरळी** : मुले न होणाऱ्या व होऊन अल्पवी जाणाऱ्या मुलांची आई खंडोबाला नवस करे की तिला मूल झाल्यास ती जगली तर दुसऱ्या मुलाच्या जन्मानंतर पहिले मूल देवाला वाहील. ते मुलगा असेल तर वाघ्या व मुलगी असेल तर मुरळी असे म्हटले जाई. मुरळ्या देवाची सेवा करत, देवळात झाडणे, सारवणे यासोबत ती देवाला रिझविण्यासाठी नाच, गाणे करीत असे.

**३. कुणबिणी** : ज्या कुटूंबात एखाद्या दासीला दोन वेळचे जेवण देण्याची ऐपत असे अशा सर्व कुटूंबात कुणबिणी असत. त्या सर्व जातीतल्या असत. अनेक कुणबिणी पेशव्यांने नजर केलेल्या असत. वाटणीमध्ये कुणबिणींचीही वाटणी होई. बटकी किंवा कुणबिण बाळगणे हे तत्कालिन समाजात मानाचे समजले जाई.

**१०. स्त्रीशिक्षण :**

शिक्षणापासून स्त्रियांची परवड झाल्याचेच दिसते. पेशवे, ब्राम्हण, मराठे सरदार यांच्या स्त्रिया म्हणजेच राजघराण्यातील स्त्रियांना अक्षरओळख असल्याचे दिसते. राजघराण्यातील स्त्रियांना पोथी वाचण्याचे व पत्रे लिहिण्याचे ज्ञान होते. उदा. राजमाता जिजाबाई, महाराणी येसूबाई, महाराणी ताराबाई, छत्रपती शाहूंच्या राण्या इ. बाजीरावांचा धाकटा मुलगा जनार्दन याची पत्नी सगुणाबाई हिचा स्वतःचा धार्मिक पोथी पुस्तकांचा संग्रह मोठा होता. हे झाले राजघराण्यातील स्त्रियांबाबत. मात्र सर्वसामान्य स्त्री वर्ग हा शिक्षणापासून वंचितच होता.

**११. स्त्रियांचा मालमत्तेचा हक्क आणि सामाजिक स्वातंत्र्य :**

मराठाकालीन स्त्रियांना कौटुंबिक मालमत्तेसंबंधीच्या हक्काबाबत दुर्लक्षित करून दुय्यम स्थानच दिले होते. मुलीला वाडवडिलांच्या मालमत्तेत हक्क नव्हता. तिच्या लग्नकार्यातील खर्चामुळे ती वाडवडिलांची वारस ठरू शकत नव्हती. पत्नीला पतीच्या मालमत्तेबाबत मर्यादित हक्क होता. विधवेला आपल्या नवऱ्याच्या मालमत्तेमधील वाटा मिळे पण त्यासाठी तिचा नवरा संयुक्त कुटुंबातून विभक्त झालेला पाहिजे आणि त्याला वारस नसला पाहिजे तथापी एखाद्या व्यक्तिचे निपुत्रिक निधन झाल्यास त्याच्या जंगम मालमत्तेतील तिसरा किंवा अर्धा हिस्सा सरकारजमा होई. एकत्र कुटूंबामधील विधवेला पोटगी मागण्याचा हक्क असे.

मराठा कालखंडातील सततच्या लढाया, शत्रू आक्रमणे यामुळे स्त्रिला आपले स्वातंत्र्य संरक्षणाच्या नावाखाली गमवावे लागले. समाजात तिचे स्थान नगण्य होते. तिचे जीवन फक्त चूल आणि मूल एवढ्यापर्यंतच सिमीत होते.

**२) जाती संस्था :**

मराठाकाळात ही समाजाची उभारणी परंपरागत चालत असलेल्या जाती व्यवस्थेवर आधारीतच होती.

जातीची बंधने नितीशास्त्र आणि धर्मशास्त्रापेक्षाही कडक होती. जातीचा संबंध व्यवसायाशी होता. याबाबत प्रो. घुर्ये, आपल्या 'कास्ट, क्लास आणि ऑक्युऐशन' या ग्रंथात म्हणतात की – 'जाती व्यवस्थेची बंधने इतकी ताठर असत की व्यक्तीला व्यवसाय स्वातंत्र्य नसे, जाती व्यवस्थेच्या मुळाशी आर्थिक कारणेही आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. आर्थिक कारणे प्रामुख्याने बलुतेदार पद्धतीशी निगडीत आहेत. म्हणजे स्वयंपूर्ण खेडे, गावगाडा व बलुतेदारी पद्धत यामुळे प्रत्येक जातीचा धंदा व व्यवसाय परंपरेने ठरवलेला होता. जाती संस्थेचा समाजावर मोठा प्रभाव होता. जाती व्यवस्थेमध्ये व्यक्तीचा दर्जा त्याच्या समाजामधील स्थानावर अवलंबून असे. जाती व्यवस्थेने व्यक्ती व समाज यांच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकिय व सांस्कृतिक जीवनावर मोठा प्रभाव पाडून त्यांच्यावर कडक नियंत्रणे लादली होती. त्याला आपल्या जातीचा धंदा सोडुन दूसऱ्याच्या जातीचा धंदा करता येत नसे. कारण त्यावर कडक निर्बंध होते या निर्बंधाचे उल्लंघन केल्यास कठोर शिक्षा केली जाई. जाती संस्थेची वैशिष्ट्यपूर्ण अशी एक उतरंडच तयार झाली होती. समाजात प्रत्येक जातीचे सामाजिक स्थान निश्चित होते. त्यानुसार प्रत्येक जातीला विशेष हक्क, कर्तव्ये, अधिकार मिळाले होते. उच्च वर्णातील जातींना अनेक प्रकारचे विशेष हक्क व अधिकार होते. मात्र अतिशुद्र, कनिष्ठांना मूलभूत मानवी हक्कांपासून वंचित ठेवले होते. त्यांच्यावर कडक व जाचक बंधने लादली होती. त्या बंधनांचे उल्लंघन केल्यास जाती बहिष्कृत केले जाई. सवर्णात ब्राम्हण सोडून रोटी व्यवहार चाले, पण बेटी व्यवहार अजिबात चालत नसे. विवाह जातीत करण्याचे सामाजिक बंधन होते. जातीबाहेर विवाह करण्याचा प्रयत्न केला तर तो गंभीर गुन्हा समजून त्याला जातीतून बहिष्कृत केले जाई. मराठा काळात अनेक जाती-जमाती अस्तित्वात होत्या.

**१) ब्राम्हण** : ब्राम्हण म्हणजे ज्याला धर्मशास्त्राने पूजा-अर्चा करण्याचा अधिकार आहे. जो अध्ययन व अध्यापन करतो, वेदशास्त्रात पारंगत असतो, असा वर्ग ब्राम्हण स्वतःला सर्व जातींच्या पेक्षा श्रेष्ठ समजत, इतर सर्व जातीतील लोकांना तुच्छ समजत असे. शुद्रांनी कायम आपली सेवा करावी अशी एक समाजव्यवस्था त्यांनी निर्माण केली होती. ब्राम्हण जातीतसुद्धा वर्गवारी होती. त्यांच्यात संघर्ष होत असत. उदा. देशस्थ, कोकणस्थ, कऱ्हाडे, देवरूखे इ. या संदर्भात वा. कृ. भावे म्हणतात – 'भिक्षुक वर्गांमध्ये ऋग्वेदी, सामवेदी, यजुर्वेदी, तैतरिय, वाजक्षेत्रिय असे पोटभेद होते. त्यांच्यात मोठेपणाविषयी अहमहमिका लागून तट पट पडत, मारामाऱ्या होत, ग्रामणे माजत.' पेशवेकाळात या वर्गाने पौराहित्य, क्षात्रधर्म, राजकारण यावरही वर्चस्व राखले.

**२) मराठा** : महाराष्ट्रात बहुसंख्य समाज हा मराठा जातीचा होता. ब्राह्मणानंतर समाजात क्षत्रियांना स्थान होते. मराठा स्वतःला क्षत्रिय समजत. शिवकाळात मराठ्यांना मानाचे स्थान होते. मराठा समाजात जहागीरदार, सरदार, देशमुख, पाटील असे वतनदारांचे वर्ग होते. मराठा समाजात कुणबी हा एक वर्ग होता. कुणबी हा शेतकरी, शेतमजूर कष्ट करणारा असा हा वर्ग होता. यांना मराठा समाज कनिष्ठ समजत होते. मराठा व कुणबी यांच्यात रोटीबेटी व्यवहार होत नसे.

**३) इतर जाती** : यामध्ये अठरा पगड जातींचा समावेश होतो. त्यात सर्व अलुतेदार व अस्पृश्य जाती सोडून सर्व बलुतेदारांचा समावेश होता. कुंभार, सुतार लोहार, न्हावी, गुरव, जोशी, परीट, कोळी इ. चा समावेश होता. या जातीत पून्हा उपजाती व उपजातीत पोटजाती होत्या. याशिवाय कोळी, साळी, सनगर, तांबोळी,

ठाकुर, गोसावी, कोष्टी, कलावंत अशाही जाती होत्या. या सर्वच जातीत बेटीव्यवहार फक्त जातीतच होत असे. प्रत्येक जात आपली जात शुद्ध ठेवण्यासाठी जातीची बंधने कटाक्षाने पाळत असे.

**४) अतिशुद्र – अस्पृश्य जाती** : अतिशुद्र जातींना गावगाड्यात महत्वाचे स्थान होते. त्यांची वस्ती गावकुसाबाहेर असे. त्यांना अगदी हलक्या दर्जाची कामे करावी लागत. यात महार, मांग, चांभार, ढोर, भंगी, चांडाळ इ. जातींचा समावेश असे. यातील काही अस्पृश्य जातीत पुन्हा त्यांच्या कामावरून उप व पोटजाती असल्याचे दिसते.

**● स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – २**

**अ) अचूक पर्याय निवडा.**

१) पेशवाई काळात मुलगी .......... वर्षापुढे लग्नावाचुन राहु देणे हा अधर्म मानला जाई.

अ) ५ ब) ६ क) ७ ड) ८.

२) केशवपन .......... चे केले जाई.

अ) गुलाम स्त्री ब) शुद्र स्त्री क) कुरूप स्त्री ड) विधवा स्त्री.

३) छत्रपती शाहू महाराजांची पत्नी .......... यांना जबरदस्तीने सती पाठविल्याचे उदाहरण दिसते.

अ) सकवारबाई ब) सगुणाबाई क) लक्ष्मीबाई ड) जानकीबाई.

४) 'कोकणातील भूते देशावरच्या भूतांपेक्षा जास्त खट्याळ होती.' असे .......... यांनी म्हटले आहे.

अ) डॉ. अ. रा. कुलकर्णी ब) डॉ. पी. ए. गवळी

क) डॉ. जयसिंगराव पवार ड) वा. कृ. भावे.

५) वर वधुपेक्षा बराच मोठा असणे या विवाह प्रकाराला .......... असे म्हणतात.

अ) आसुर विवाह ब) राक्षस विवाह क) विषय विवाह ड) विधवा विवाह.

६) खंडोबाला नवस फेडण्यासाठी अर्पण केलेल्या मुलीला .......... म्हणतात.

अ) कुणबिण ब) मुरळी क) दासी ड) रक्षा.

७) वेदशास्त्रात पारंगत असणारा .......... हा वर्ग होता.

अ) ब्राम्हण ब) मराठा क) व्यापारी ड) शुद्र.

८) मराठा समाजात हा .......... हा वर्ग होता.

अ) कुणबी ब) सुतार क) कोळी ड) कोष्टी.

### ४.२.३. शिक्षण आणि सण :

**१) शिक्षण** :

मराठाकालीन समाजात शिक्षणामध्ये मल्लविद्या, लष्करी शिक्षण, व्यावहारिक शिक्षण, मराठाकालीन स्त्रीशिक्षण, व्यावसायिक शिक्षण इ. चा अंतर्भाव होता.

**१. मल्लविद्या** : मध्ययुगीन कालखंडात स्वसंरक्षण आणि राष्ट्रसंरक्षण ही प्राथमिक गरज लक्षात घेवून मल्लविद्या व लष्करी शिक्षणाला प्राधान्य होते. मल्लविद्येमध्ये जोर, बैठका, कुस्ती, वजन उचलणे इ. चा समावेश होत असे. गावागावातुन तालमीची व्यवस्था होती. राज घराण्यात पैलवान बाळगले जात. छत्रपती व पेशवे घराण्यातील तरुणांनी तालमीतील शिक्षणाद्वारे शरीर कमविणे आणि या व्यायामास उत्तेजन दिले होते. स्वतः नानासाहेब पेशवे स्वतःच्या तालमीत नियमाने मेहनत करीत. विश्वासराव, माधवराव, नारायणराव पेशवे यांनी दरबारात कुस्त्या घडवून आणल्याचेही दिसते. पेशव्यांप्रमाणे त्यांच्या सरदारांनीही शरीर कमाविण्याची हौस होती. ते आपल्या पदरी महाराष्ट्रीयन पैलवान बाळगत.

**२) लष्करी शिक्षण** : लष्करी शिक्षणामध्ये तलवार चालविणे, दांडपट्टा खेळणे, बंदूक, भाला, बाण चालविणे यांचा समावेश होता. तसेच घोड्यावर बसणे व भालाफेक हा वरिष्ठ वर्गातील नित्याचाच व्यायाम प्रकार होता. महाराष्ट्रात शिपाईगिरीचा शौक असलेला प्रत्येक माणूस मिळेल ते लष्करी शिक्षण आपल्या खाजगी प्रयत्नाने संपादित असे. पण विशिष्ट प्रकारच्या शिक्षणाची तजवीज छत्रपतींना, पेशव्यांना, सरदारांना करावी लागे. सरदार आपल्या मुलांना स्वारीवर नेत व तेथे प्रात्यक्षिकद्वारे शिक्षण देत. 'Foreign Bioqraphies of Shivaji' या ग्रंथात युरोपियन प्रवासी अॅबे कॅरे लिहितो की – ‘शिवाजीच्या सैन्यात ठिकठिकाणचे नवशिखे लोक होते. त्यांना युद्धाच्या शिक्षणाकरिता उघड्या शेतात तीन महिने तळ द्यावा लागे. सखोल शिक्षण त्या सैनिकाला काळजीपूर्वक दिले जाई.’

पेशवेकाळात पेशव्यांनी सैनिकांना प्रशिक्षणासाठी गारदी लोक ठेवले. महादजी शिंदे यांनी बॉयन, जॉर्ज टॉमस, पेरन इ. युरोपियनांद्वारे कवायती पलटणे तयार करून घेतली. सोबत हत्तींना ताब्यात ठेवणे व युद्धातील कामे त्याच्याकडून करून घेणे ही कला शिपायांना फौजेत गेल्यावरच मिळत असे. नानासाहेब पेशव्यांच्या कारकिर्दीत हत्तींच्या झुंजी लावल्याच्या नोंदी आढळतात.

**३) व्यावहारिक शिक्षण** : व्यावहारिक शिक्षणाचे दोन प्रकार हाते.

१) प्राथमिक शिक्षण, २) उच्च शिक्षण.

**१) प्राथमिक शिक्षण** : व्यवहारातील प्राथमिक ज्ञान विद्यार्थ्यांना मिळावे या हेतूने प्राथमिक शिक्षण दिले जाई. शिक्षणाची सुरुवात ‘ श्री गणेशायन नमः’ या अक्षरांनी होत असे. मुळाक्षरे, बाराखडी, १०० पर्यंत अंक मोजणे, लिहणे, पाढे, पावकी, निमकी, सवाईकी, औटकी इ. चे शिक्षण दिले जाई. कठीण संख्येच्या पाठांतरावर भर असे. वजनमापाच्या बाबतीत शेर, पावशेर, अच्छेर, छटाक, पायली या मापांची वजने करण्यास शिकवले जाई. मोजण्याची कोष्टके पाठ करून घेवून त्या आधारे अंकगणिताचे ज्ञान दिले जाई.

मराठा कालखंडात सामान्यांचा पत्रव्यवहार व सरकारी पत्रव्यवहार मोडीमध्ये असल्याने प्राथमिक शिक्षणात मोडी लिपीला महत्व होते. हस्ताक्षर सुंदर येण्यासाठी कित्ते गिरविले जात. ज्याचे हस्ताक्षर सुंदर त्याच्याकडून असे कित्ते लिहून घेतले जात. वाचनावरही भर होता. मोडी लिपी वाचनासाठी भरपूर सरावाची आवश्यकता भासे. यासाठी विद्यार्थ्यांनी घरातून किंवा इतरांची कागदपत्रे जमा करून त्यांचे वाचन करण्याचा नियम होता. मराठा कालखंडात अस्पृश्य जाती वगळता प्राथमिक शिक्षण सर्वांना खुले होते. यात प्रामुख्याने ब्राम्हण, प्रभू, सोनार, मराठा व वाणी या जातीतील मुलेच शिक्षण घेत पुढे यांना मराठा राज्यात कारकुन, चिटणीस अशा नोकऱ्या मिळत. महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षण हे अत्यंत साध्या पद्धतीने दिले जाई. याचे वर्णन जेम्स फोर्बेसने केले आहे तो म्हणतो – 'खेड्यात शेणामातीने लिपलेले व तीन बाजुबंद असलेले छप्पर असे, चौथ्या दिशेस समोर वाळू असे. त्यात अक्षरे शिकविली जात. अंकगणित, गुणाकार, भागाकार त्या वाळूमध्ये शिकवित असत. बऱ्याच ठिकाणी शाळा देवळात किंवा श्रीमंत व्यक्तींच्या वाड्यामध्ये एका बाजूला भरत असे.

प्राथमिक शाळेत शिकविण्याची पद्धत वैशिष्ट्यपूर्ण होती. जेविस या युरोपियन प्रवाशाने विस्तृत माहिती दिली आहे. त्यानुसार शिक्षकाचे काम प्रौढ विद्यार्थ्यांकडे दिले जात. साधारणपणे दोन-दोन विद्यार्थ्यांचे गट केले जात. अशा शिक्षणाचे काही फायदेही असत. आर्थिकदृष्ट्या हे शिक्षण परवडणारे असे. शिक्षक प्रौढ विद्यार्थ्यांच्या सहाय्याने मोठ्या वर्गाचे व्यवस्थापन करू शकत. असे तसेच प्रौढ विद्यार्थ्यांची उजळणी होत असे व कालांतराने ते ही पंतोजीच्या कामासाठी तयार होत. त्या काळी मुद्रणकला विकसित नसल्याने पाठांतरावर भर दिला जाई.

महाराष्ट्रातील मुलांचे प्राथमिक शाळेत जाण्याचे वय, शिक्षणाचा कालावधी, परिक्षा पद्धती या विषयी फारशा नोंदी नाहीत पण साधारणपणे वयाच्या ६ व्या वर्षी विद्यार्थी शिक्षणासाठी जात असे असा संदर्भ डॉ. देसाई सुधा आणि वा. कृ भावे यांनी दिला आहे. शिक्षणाचा कालावधीही निश्चित नव्हता. केवळ हुशारी, कार्यक्षमता यावर हा अवलंबून होता. मिळालेले शिक्षण पुरेसे आहे असे वाटल्यावर शिक्षण बंद केले जात होते.

**२) उच्च शिक्षण :**

उच्च शिक्षण देण्याच्या दोन शाखा दिसतात.

१) पाठशाळा २) खाजगी वाड्यातील शिकवण्या.

**पाठशाळा :** या मुख्यत्वेकरून तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी असत. उदा. वाई, नाशिक, पुणे, बनारस, कोल्हापूर, सांगली इ. बर्निअर हा फ्रेंच प्रवासी मोगल काळात भारतात आला होता, त्याने अनेक विद्याकेंद्रांना भेटी दिल्या होत्या. त्याच्या प्रवास वृत्तांतामधून असा उल्लेख आढळतो की उच्च शिक्षण केंद्रात पवित्र धर्मग्रंथ, वेद, उपनिषद तसेच शरीर विज्ञान, ज्योतिषशास्त्र यांचाही अभ्यास केला जात असे. तसेच मुंबई विभागातील ब्रिटीश आमदानीमधील सर्व कलेक्टर्सनी शिक्षणविषयक माहिती गोळा केली. त्यावर विलियम चॅपलीन यांने एक शैक्षणिक अहवाल तयार केला, त्यातून उच्चशिक्षणातून ज्योतिष, वैदक, वेदान्त, न्यायमीमांसा, धर्मशास्त्र, व्याकरण, काव्य अलंकार हे विषय शिकवत. विद्यादानाचे कार्य प्रामुख्याने बाम्हण अध्यापकांकडून होत असे.

बर्निअरच्या प्रवास वृत्तांतावरून महाराष्ट्राच्या शिक्षण पद्धतीचा तर्क करता येतो. अध्यापकांकडे ४ ते १५ विद्यार्थी असत. विद्यार्थी गुरूकडे १०-१२ वर्षे रहात. शिक्षण मोफत दिले जाई. चॅपलिनच्या अहवालानुसार उच्च शिक्षण केंद्रातून भोजन व निवासाची सोय असे. पूर्ण शिक्षणानंतर बौद्धिक क्षमतेनुसार शास्त्री, पंडित, वैदिक अशा पदव्या दिल्या जात.

**खाजगी वाड्यातील शिक्षण** : चांगल्या स्थितीतील लोक विद्वान ब्राम्हणांची आपल्या मुलांना शिकविण्याकरिता नेमणुक करीत असत. विद्यार्थ्यांना गावातील श्रीमंत लोक आपल्या पैशातून शिकवत असत. चॅपलिनच्या अहवालानुसार पुणे व इतर आजुबाजूच्या प्रदेशातील श्रीमंत लोक संस्कृतसाठी पगारी शिक्षक नेमत. अशा वेळी शेजाऱ्यांचीही मुले तेथे येत. अध्यापक यजमानाच्या घरी राहूनच शिकविण्याचे काम करी. रामायण, महाभारत, रघुवंश, विदुरनीती, चाणक्यनीती इ. ग्रंथ शिक्षणामध्ये असत.

**३) मराठकालीन स्त्री शिक्षण :**

मध्ययुगीन महाराष्ट्रात स्त्रियांची शिक्षणापासुन फारकत झाल्याचे दिसते. मात्र राजघराण्यातील स्त्रियांना अक्षर ओळख असल्याचे दिसते. राज घराण्यातील व पेशवे, शिंदे, होळकर, दाभाडे, पटवर्धन, गायकवाड यांच्या घराण्यातील स्त्रियांना परंपरागत शिक्षण मिळाले होते. यांचे शिक्षण घरीच वडीलधाऱ्या माणसांच्या देखरेखाली किंवा एखादा शिक्षक नेमून दिले जात असे. काही स्त्रियांना लष्करी व प्रशासनाचे शिक्षण मिळत असे. उदा. राजमाता जिजाबाई, महाराणी ताराबाई, करवीर महाराणी जिजाबाई इ. स्त्रियांनी युद्धकला व प्रशासनात आपला नावलौकिक प्राप्त केला होता.

**४) व्यावसायिक शिक्षण :**

व्यावसायिक शिक्षणासाठी कोणत्याही संस्था किंवा पाठशाळा नव्हत्या. साधारणतः वडिलांची विद्या मुलगा शिकत असे. व्यवसायावर आधारित जाति व्यवस्थेमुळे निरनिराळे व्यवसाय पिढ्यानपिढ्या चालत असत. वडील आपल्या मुलाला आपल्या व्यवसायातील कला कौशल्य शिकवित असत. त्यामुळे त्याला त्या व्यवसायाचे लहानपणापासूनच बाळकडू मिळत असे. मुलगा आपल्या वडिलधाऱ्यांना व्यवसाय करण्यास मदत करत असे. जातीच्या पूर्वापार धंद्याशिवाय इतर धंदा करण्याची परवानगी नसे. त्यामुळे हा व्यवसाय पुढच्या पिढीमध्ये कसा टिकेल याची काळजी कुटूंबप्रमुखाला असे.

**५) राज्यकर्त्यांचे शिक्षणविषयक धोरण :**

शिवकाळात देवालये ही भारतीय पुरातन विद्या व कला यांच्या संवर्धनाची केंद्रे असल्याने छत्रपती शिवाजी महाराजांनी उदार हस्ते देवालयांना जमिनी इनाम दिल्या. वेदशास्त्राचा अभ्यास करणारे ब्राम्हण यांना प्रोत्साहन देण्यासाठी पंडितरावामार्फत त्यांच्या परिक्षा घेऊन छत्रपती शिवाजी महाराजांनी वर्षासने दिली. चिटणीस बखरीत या संदर्भात उल्लेख आढळतो. पेशवे तर विद्वत्तेचे मोठे आश्रयदाते होते. त्यांच्या कारकिर्दीत भारताच्या विविध भागातील अनेक पंडितांचा गौरव करून त्यांना आश्रय दिला जात असे. यात शृंगेरी मठाचे शंकराचार्य, काशीचे मथुराभट, बरेलीचे तात्याचार्य इ. चा समावेश होतो. पेशव्यांनी वरील प्रकारे वार्षिक दक्षिणा

वाटण्यास सुरूवात केल्याचा फायदा अनेक रूपांनी समाजास मिळाला. दक्षिणेच्या आशेने तरुण लोक विद्या शिकू लागल्यामुळे जुन्या पाठशाळा भरभराटीस आल्या व नव्या पाठशाळा स्थापण्यास उत्तेजन मिळाले. कृष्णा, गोदावरी, भीमा इ. नद्यांच्या काठी भिक्षुकवर्गाने जाऊन नवी क्षेत्रे वसविली यातून नविन कवी व ग्रंथकार निर्माण झाले. उदा. निरंजन महादेव, शिवराम अकोलकर, कवी श्रीधरपंत, मोरोपंत, शाहीर परशुराम, रामजोशी, अनंत फंदी इ. पेशव्यांचा कित्ता इतर मराठा सरदारांनीही गिरविला. पण पेशव्यांच्या दक्षिणेची किर्ती साऱ्या भरतखंडात पसरली. पेशवेकाळात ग्रंथांचे पुनर्लेखनाद्वारे विद्येच्या प्रसारास चालना मिळाल्याचे दिसते. जुन्या हस्तलिखिताचे व ग्रंथांचे पुनर्लेखन करणे, दुसऱ्यांकडील ग्रंथांचे आपल्याकडील ग्रंथालयात जतन करणे इ. प्रकार विद्यासंवर्धन केले गेले. पेशव्यांच्या १८ खात्यांपैकी ग्रंथालय हे एक महत्वाचे खाते होते. ग्रंथाच्या पुनर्लेखनाची कायमची व्यवस्था आनंदवल्ली (नाशिक) येथे केली होती कारण तेथे स्वतंत्र लेखनिक वर्ग नेमला होता.

● **सण** :

समाज-मन निर्मितीमध्ये सण समारंभाचा वाटा मोठा असतो. सण-समारंभाच्या निमित्ताने समाजाच्या भिन्न स्तरावरील व्यक्ती एका पातळीवर एकत्रित येतात. यातून सामाजिक जाणीवांची अभिव्यक्ती होते. मराठा काळातही सण समारंभांना अतिशय महत्व होते.

**१) दसरा** : साडेतीन मुहूर्तातील एक मुहूर्त असलेला दसरा. शिवकाल व पेशवेकाळात या सणाचे महत्व वेगळेच होते. मराठे लोक आपली हत्यारे साफसुफ करून त्यांची पूजा करत. घोड्यांना सजवून सीमोल्लंघनासाठी जात. या सिमोल्लंघनाचा थाट प्रत्येक गावात प्रेक्षनीय असे. आबालवृद्ध उंची वस्त्रे घालून मिरवणुकीत सहभाग घेत. शमीची पूजा करीत, शेतातील कणसे तोडून ती सोने म्हणून लुटीत. शमीची पाने सोने म्हणून परस्परांना देत. घरी आलेल्या मुलांना बहिण, आई कौतुकाने ओवाळत. लुटून आणलेले सोने स्त्रियांना ओवाळणी म्हणून देत. करवीर छत्रपती शिवाजी दुसरे यांचे सिंहासनारूढ दसऱ्यादिवशी झाले होते.

बाजीराव दुसरा हा सण कशापद्धतीने साजरा करीत होता याचे सर जॉन माल्कम याने वर्णन केले आहे. तो म्हणतो - 'पेशव्याने शमीची पाने खुडल्यानंतर तोफा व बंदुकांची सरबत्ती होई. बाजरी अगर ज्वारीच्या ताट्यांसाठी मुद्दाम शेतं खरेदी केले जाई. सिमोल्लंघनानंतर पेशवा दरबार भरवून योग्यतेप्रमाणे ज्याला त्याला पोशाख देई. इ.स. १७९४ मध्ये यासाठी २,२०,१४४ रू. चे पोशाख दिल्याची नोंद सापडते.

**२) दिवाळी** : दिवाळी हा सण मराठाकाळात महत्वाचा मानला जात असे. हा सण घरोघरी साजरा केला जात असे. हा सण ३ किंवा ४ दिवस साजरा केला जाई. बलिप्रतिपदा, लक्ष्मीपूजन, पाडवा, भाऊबीज हे सर्व खूप मोठ्या आनंदाने साजरा केला जात असे. घरोघरी वेगवेगळ्या पद्धतीने पक्वान्न/फराळ बनविला जाई. पाडवा हा दिवस पवित्र मानला जाई. या दिवसापासून नवीन वर्षाची सुरूवात केली जाई. विशेषतः व्यापारी वर्गासाठी नववर्षाची सुरूवात होत असे. या सणांना दिपोत्सव व आतिषबाजी करून आनंदाने साजरा करण्याचा प्रघात होता.

राज घराण्यात सरदार, पेशवे यांच्या घरी तावदानी रोषणाई, आकाशमंडळ तारांगण, चादरी दारूकाम,

नारळी झाडे, प्रभाचमक, कैचीची झाडे, बादलगर्ज, बाण, पाणकोंबडी, हातनळे, कोण्याचे नळे इ. आतषबाजीचे प्रकार रूढ होते.

**३) मकर संक्रांत** : दिवाळीनंतरचा हा महत्वाचा सण. या सणाला लहानांना मोठ्यांनी तिळगूळ देण्याची प्रथा होती. एकमेकांच्या घरी जाऊण तिळगूळ दिले जाई. एकमेकांमधील स्नेहभाव वृद्धिंगत व्हावा या उद्देशाने तीळगुळ देण्या-घेण्याची पद्धत होती. छत्रपती आपल्या सरदारांनाही तिळगूळ पाठवत. करवीर राज्याच्या महाराणी जिजाबाई यांना प्रसिद्धगडचे बारगीर, तटसरनोबत व नाईकवडी यांनी तिळगूळ पाठवल्याचा उल्लेख जिजाबाईकालीन कागदपत्रात सापडतो.

**४) वसंत पंचमी** : वसंतपंचमी म्हणजे वसंतऋतुच्या आगमनाची पूर्वसुचना होय. या सुमारास हिवाळा संपून उन्हाची तीव्रता किंचित भासत असल्यामुळे या पंचमीला रंग खेळण्यात येत असे. पेशवाईत हा सण थाटात खेळला जात असे. यादिवशी ब्राम्हणांची सन्मानपूर्वक पूजा केली जात असे. दुसऱ्या बाजीरावांच्या काळातील वसंत पंचमीच्या उत्सवाचे वर्णन आपल्याला बाजीरावांचा कारभारी त्रिंबकजी डेंगळे यांना मल्हारराव भोसलेंनी लिहिलेल्या पत्रातून कळते.

**५) शिमगा-होळी** : फाल्गून पौर्णिमेस हा सण साजरा केला जात असे. सुगी संपल्याने समाजात शांतता नांदत असे, या सणाच्या निमित्ताने करमणूक व्हावी हा उद्देश. पेशवे व सरदार स्वतः आपल्या घरी हा सण उत्साहाने साजरा करीत. पेशव्यांच्या दरबारातील सवाई माधवरावांच्या कारकिर्दीतील १७८६ च्या काळातील या सणाचे वर्णन करणारे पत्र नाना फडणवीसांच्या मेणवली दप्तरांत सापडते. यात वाघ, बकरीच्या खेळाचा, तमाशाचा, डफगाण्याचा उल्लेख दिसतो.

गावोगावी व वैयक्तिक होळी पेटविण्यात येत असे. होळी पेटविण्याचा मान पाटलाचा असे. होळीभोवती फेरधरून शिवीगाळ करण्याची पद्धत होती. होळीच्या दुसऱ्या दिवशी धुळवड असे. यात एकमेकांच्या अंगावर शेण, चिखल टाकला जाई याप्रकाराच्या नोंदीही वरील पत्रात दिसतात.

**६) रंगपंचमी** : रंगपंचमीच्या कार्यक्रमात पेशवेही सहभागी होत असत. धुळवडीपासुन रंगपंचमीपर्यंत रंग खेळला जात असे. दिवसा रंग खेळणे व रात्री करमणुकीचे कार्यक्रम असत. यात कलावंतिणीचे नाच गाणे, जेठीची झोंबी, वाघ-बकरीचे खेळ, सोंगे, डफगाणे इ. चा समावेश असे. वरील गोष्टींचा उल्लेख आपल्याला मेणवली दप्तरामध्ये वाचावयास मिळतात. इ.स. १७९२ मध्ये महादजी शिंदेंनी सवाई माधवरांना जयपूर, मथूरा येथील रंगाच्या गोष्टी सांगितल्याने व अशा प्रकारचा थाट पुण्यालाही झाला पाहिजे असा आग्रह धरल्याने पेशव्यांनी आपल्या सरदारांना रंगाची तयारी करण्याचा आदेश देवून हा सर्व बेत झाल्याचा दाखला बखरीतून सापडतो.

**७) गणेशोत्सव** : गणेशाला आद्यदेवतेचे स्थान दिलेले आहे. भाद्रपद महिन्यामध्ये गणेश चतुर्थीपासून अनंत चतुर्दशीपर्यंत हा उत्सव साजरा होतो. महाराष्ट्रामध्ये गणेश पुजेच्यावेळी म्हटली जाणाऱ्या गणेशाची आरतीची रचना समर्थ रामदासांनी केली आहे. सेतु माधवराव पगडी यांनी समर्थ व समर्थ संप्रदाय या ग्रंथामध्ये

समर्थ रामदासांनी सन १६७५ मध्ये महाराष्ट्रातील पहिल्या सार्वजनिक गणेशोत्सवाचे आयोजन केल्याचे म्हटले असून या उत्सवात छत्रपती शिवाजी महाराजांनी १२१ खंडी धान्य दिल्याचे नोंद आहे.

पेशवेकाळात सुरवातीच्या काळात अधिक प्रमाणात हा सण साजरा केला जाई. मात्र सवाई माधवराव पुण्याला रहावयास आल्यानंतर पेशव्यांच्या योग्यतेने साजेशा थाटाने हा सण साजरा केला जाऊ लागला. इ.स. १७७८ च्या मल्हार बल्लाळ यांच्या पत्रातून पुरंदरावरील गणेशात्सवाची माहिती मिळते. या सणासाठी खास तेजरावा हत्तीण शिवापूराहून आणल्याची नोंद सापडते. तसेच पुण्यामधील शनिवारवाड्यामध्ये कशा प्रकारे हा सण साजरा केला जाई याच्या नोंदी पेशवे दप्तरातून मिळतात. यातील दुसऱ्या पत्रामध्ये फक्त हरिकिर्तन आणि ललिताच्या चार ओव्या म्हणून आरती करण्याची नोंद दिसते.

**८) गुढीपाडवा किंवा वर्षप्रतिपदा** : चैत्र महिन्यातील पहिला दिवस नव्या वर्षाची सुरूवात या दिवसापासून होत असे. म्हणून गुढ्या तोरणे उभारून हा सण साजरा केला जात असे. साडेतीन मुहूर्तपैकी हा एक असल्याने यादिवशी अनेक मंगलकार्याचा आरंभ होत असे. मोहिमेवरील सैन्य व सरदार या दिवसाकरिता शक्य असल्यास घरी परत येत असत. यादिवशी खेड्यापाड्यात पंचांग वर्तविण्याचा कार्यक्रम एखाद्या देवळात होत असे.

वरील प्रमुख सणांशिवाय पोळा, अक्षयतृतीया, नागपंचमी, नारळी पोर्णिमा, चंपाषष्ठी यांसारखे सणही थोड्याअधिक प्रमाणात साजरे केले जात असत.

- **स्वयं अध्ययन प्रश्न – ४**

**अ) अचूक पर्याय निवडा.**

१) सैनिकांच्या युद्ध शिक्षणाच्या नोंदी .......... च्या प्रवासवर्णनात सापडतात.

अ) बर्नियर ब) इल्नबतुता क) ॲबे कॅरे ड) डोमिंगो पेस.

२) पेशवेकाळात सैनिकांना प्रक्षिण देण्यासाठी .......... यांची नियुक्ती असे.

अ) गारदी ब) लमाणी क) माहूर ड) सेनापती.

३) .......... यांच्या कारकिर्दीतील हत्तींच्या झुंजींच्या नोंदी सापडतात.

अ) नानासाहेब पेशवे ब) माधवराव पेशवे क) नारायणराव पेशवे ड) सवाई माधवराव पेशवे.

४) मोजण्याच्या कोष्टकाद्वारे .......... चे ज्ञान दिले जाई.

अ) मुळाक्षरे ब) बाराखडी क) अंकगणित ड) मोडी.

५) मराठा कालखंडात सामान्यांचा पत्रव्यवहार व सरकारी पत्रव्यवहार .......... मध्ये हाता.

अ) मोडी ब) ऊर्दू क) संस्कृत ड) फारसी.

६) महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणाच्या साधेपणाचे वर्णन .......... याने केले आहे.

अ) चॅपलीन ब) जेम्स फोर्बेस क) माल्कम ड) बर्नियर.

७) महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणाचे वय साधारणपणे .......... असे डॉ. देसाईंनी सांगितले आहे.

अ) ६ वर्षे ब) ५ वर्षे क) ७ वर्षे ड) ८ वर्षे.

८) पाठशाळा मुख्यत्वेकरून .......... ठिकाणी असत.

अ) गाव चावडीच्या ब) तीर्थक्षेत्राच्या क) यजमानांच्या घराच्या ड) गावाबाहेरच्या.

९) शिवकाळात .......... ही भारतीय पुरातन विद्या व कलेच्य संबर्धनाची केंद्रें होती.

अ) तीर्थक्षेत्रे ब) देवालये क) मठ ड) पाठशाळा.

१०) हत्यारांची सफाई आणि त्यांची पूजा ही .......... सणानिमित्त केली जाई.

अ) दिवाळी ब) दसरा क) शिमगा ड) वसंतपंचमी.

११) .......... या पेशव्याच्या दसरा सणाचे वर्णन जॉन माल्कम ने केले आहे.

अ) माधवराव ब) बाजीराव पहिला क) बाजीराव दुसरा ड) सवाई माधवराव.

१२) .......... या सणाला ब्राम्हणांची सन्मानपूर्वक पूजा केली जाई.

अ) वसंतपंचमी ब) शिमगा क) दिवाळी ड) रंगपंचमी.

## ४.४. पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

१) विष्टी - विनावेतन काम करण्याची पद्धत.

२) पोरगे - पेशवे, सरदार, श्रीमंत लोकांच्या पदरी असणारा पुरूष.

३) कुणबिणी - पेशवे, सरदार, श्रीमंत लोकांच्या पदरी असणारी स्त्री.

४) तारण ठेवणे - गहाण ठेवणे.

५) कबरीबंध - केसाचा बुचडा.

६) वपन - केस कापणे.

७) पीर - मुसलमान देवदूत.

८) तोडगे - उपाय.

९) जनानखाना - राणीवसा.

१०) कुणबिण - विनावेतन स्त्री चाकर वर्ग.

११) कित्ते - सराव, पुन्हा करणे.

१२) पंतोजी - शिक्षक (ब्राम्हण).

१३) तावदानी रोषगाई - काचेच्या कामीवरून व त्याला आरसे लावून दारूकाम.

१४) आकाशमंडळ तारांगण - दारु कामाची उंच झाडे तयार करून आकाशातील ताऱ्यांप्रमाणे विविध रंगांचे तारे उडविणे.

१५) चादरी दारूकाम - तापलेल्या सुवर्णाप्रमाणे लाल व पिवळ्या रंगांची झाडे तयार करणे.

१६) नारळी झाडे - उंच झाडे करून तोफ व बंदूकांप्रमाणे आवाज यातून येई.

२७) प्रकाशचमक -सूर्योदयावेळी सूर्यकिरणांच्या प्रमाणे चमकदार देखावा.

१८) बादलगर्ज, बाण, पाणकोंबडी, हातनळी, कोठ्याचे नळे - सर्व दारूकामाचे प्रकार होत.

## ४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे.

**४.२.१.**

१) अ (काळी आई)

२) ब (बलुतेदार)

३) अ (डॉ. आंबेडकर)

४) क (ढोर)

५) ड (वेठेकरी)

६) क (७)

७) ब (पोरगे)

८) अ (समुद्रकिनारी)

९) ब (ना. गो. चापेकर)

१०) अ (नाचणे, गाणे)

**४.२.२.**

१) क (अॅबे कॅरे)

२) अ (गादरी)

३) अ (सकवारबाई)

४) ड (वा. कृ. भावे)

५) क (विषम विवाह)

६) ब (मुरळी)

७) अ (ब्राम्हण)

८) अ (कुणबी)

४.२.३.

१) क (अॅबे कॅरे)

२) अ (गारदी)

७) अ (६ वर्ष)

८) ब (तीर्थक्षेत्राच्या)

| | |
|---|---|
| ३) अ (नानासाहेब पेशवे) | ९) ब (देवालये) |
| ४) क (अंकगणित) | १०) ब (दसरा) |
| ५) अ (मोडी) | ११) क (बाजीरव दुसरा) |
| ६) ब (जेम्स फोर्बस) | १२) अ (वसंतपुचमी) |

## ४.६ सारांश :

पूर्वापार चालत असलेल्या सामाजिक परिस्थितीत मध्ययुगीन कालखंडामध्ये फारसा फरक पडलेला दिसत नाही. प्राचीन काळाप्रमाणे याही कालखंडामध्ये समाज हा ग्रामीण भागात रहाणारा असून शेती हाच त्यांचा व्यवसाय होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेतुन समाजात स्वाभिमान, स्वधर्मभिमान जागृत केला. पण शिवाजी महाराजांचे हे समाजोपयोगी क्रांतीकारी पुढे पेशवाईमध्ये चालू राहिले नाही हे याचे कारण समाजव्यवस्थेवर त्या काळात असणारे धर्म व धर्मशास्त्राचा प्रभाव होय.

मराठा काळातील समाजरचनेची व्यवस्था पहात असताना कुटूंब पद्धती त्यातील कुटूंबप्रमुखाचे स्थान, अत्यंत कडक पद्धतीने प्रचलित असणारी जातीव्यवस्था त्यातील अस्पृश्य जाती या जातींनी करावयाची कामे त्यातील विशेषतः महार या जातीने करावयाची हलक्या दर्जाची कामे, पेशवेकाळात अस्तित्वात असणारी सात प्रकारची वेठबिगारी, या वेठबिगारांची कामे, एक शाप म्हणून ओळखली जाणारी गुलामगिरी, तिच्या निर्मितीची कारणे, गुलामांना मिळणारी वागणूक, स्वरूप आणि कामे इ. सर्व घटकांचा ऊहापोह करत असताना अगदी सखोलपणे आपल्याला त्याकाळातील समाजव्यवस्थेचे स्वरूप लक्षात येते. या काळातील स्त्रिया अंधश्रद्धेच्या गराड्यामध्ये अडकलेल्या होत्या. स्त्रियांच्या स्थितीचे विदारक वर्णन अभ्यासताना आश्चर्य वाटते. विधवा स्त्रियांकडे समाजाचा पहाण्याचा क्रुर दृष्टिकोण दिसतो.

शिक्षणाच्या विविध पद्धती अस्तित्वात असल्याचे दिसते. शिक्षणाबाबत राज्यकर्त्यांचे उदार धोरण होते हे आपल्या लक्षात येते. राज घराण्यात व पेशव्यांच्या दरबारात सण अतिउत्साहाने साजरे होत असल्याच्या नोंदी दिसतात. पेशव्यांच्या दरबारात प्रमुख सणांव्यतरिक्त छोटे मोठे सणसुद्धा साजरे केल्याचे दिसते. या सणसमारंभाच्या निमित्ताने समाजाच्या भिन्न स्तरावरील व्यक्तींना एकत्रित आणणे हाच उद्देश असावा.

## ४.७. सरावासाठी स्वाध्याय.

### १. टीपा लिहा.

१) अस्पृश्यता

२) वेठबिगारी

३) जातीसंस्था

४) राज्यकर्त्यांचे शिक्षणविषक धोरण.

**२. दिर्घोत्तरी प्रश्न सोडवा.**

१) मराठेकालीन सामाजिक संरचनेचे स्वरूप स्पष्ट करा.

२) मराठेकालीन स्त्रियांची स्थितीचे वर्णन करा.

३) मराठेकालीन शिक्षण पद्धतीची चर्चा करा.

४) मराठाकालीन सणांची माहिती द्या.

## ४.८ संदर्भ ग्रंथ :

१) कुलकर्णी डॉ. अ. रा. – शिवकालीन महाराष्ट्र.

२) भावे वा. कृ. –पेशवेकालीन महाराष्ट्र.

३) गवळी डॉ. पी. ए. – पेशवेकालीन गुलामगिरी व अस्पृश्यता.

४) चाफेकर ना. गो. – पेशवाईच्या सावलीत.

५) जोशी एस. एन. – मराठेकालीन समाजजीवन.

६) गर्गे स. मा. – करवीर रियासत (२००३) कोल्हापूर.

७) पवार डॉ. आप्पासाहेब – ताराबाईकालीन कागदपत्रे खंड १, २, ३, शिवाजी विद्यापीठ, प्रकाशन.

८) पवार डॉ. आप्पासाहेब – जिजाबाईकालीन कागदपत्रे, शिवाजी विद्यापीठ प्रकाशन.

❖❖❖